सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२१




DES


**अर्थ व सांख्यिकी संचालनालय,**
**नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई**

# ¨É½É®É¹]ÅSÉÒ +ÉÌlÉEò {ÉÉ½hÉÒ 2020-21

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# प्रस्तावना

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०२०-२१ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ६० वा अंक आहे.

२. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत. हे प्रकाशन राज्याच्या महत्वाच्या सांख्यिकीची समयमालिकानिहाय अद्ययावत माहिती आणि भारतातील सर्व राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक उपलब्ध करुन देते. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. राज्य व केंद्र शासनाचे संबंधित विभाग, कार्यालये व उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

र.र. शिंगे
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : ५ मार्च, २०२१

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२१

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | १ |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | ३ |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | ६ |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | ९ |
| २. | **लोकसंख्या** | १९ |
| ३. | **राज्य उत्पन्न** | २९ |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | ४७ |
| ५. | **लोकवित्त** | ७७ |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | ९३ |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | १०३ |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | १४३ |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | १६९ |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल विकास<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय<br>मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये | १९५ |
| | **व्याख्या सूची** | २८३ |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | २८९ |

# परिशिष्टे



| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या | २७ |
| **परि. २.२** | जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या | २७ |
| **परि. २.३** | जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक | २८ |
| **परि. ३.१** | मूळ किंमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३६ |
| **परि. ३.२** | मूळ किंमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ३७ |
| **परि. ३.३** | मूळ किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३८ |
| **परि. ३.४** | मूळ किंमतींनुसार वास्तविक निव्वळ राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार वास्तविक निव्वळ राज्य उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ३९ |
| **परि. ३.५** | मूळ किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि व बाजार किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ४० |
| **परि. ३.६** | मूळ किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि व बाजार किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ४१ |
| **परि. ३.७** | मूळ किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत निव्वळ मूल्यवृद्धि व बाजार किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ४२ |
| **परि. ३.८** | मूळ किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत निव्वळ मूल्यवृद्धि व बाजार किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ४३ |
| **परि. ३.९** | सांकेतिक स्थूल जिल्हा मूल्यवृद्धि (चालू किंमतींनुसार) | ४४ |
| **परि. ३.१०** | वास्तविक स्थूल जिल्हा मूल्यवृद्धि (स्थिर किंमतींनुसार) | ४५ |
| **परि. ३.११** | सांकेतिक दरडोई स्थूल जिल्हा मूल्यवृद्धि (चालू किंमतींनुसार ) | ४६ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ६० |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ६१ |
| **परि. ४.३** | राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाने महाराष्ट्र राज्याकरीता परिगणित केलेले ग्रामीण, नागरी व एकत्रित गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ६२ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ६३ |
| **परि. ४.५** | औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ६४ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ६५ |
| **परि. ४.७** | महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ६६ |
| **परि. ४.८** | महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर | ६७ |
| **परि. ४.९** | अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक | ६८ |
| **परि. ४.१०** | जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर, २०२० रोजी) | ६९ |
| **परि. ४.११** | अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना वाटप केलेला तांदूळ व गहू | ७० |
| **परि. ४.१२** | भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन | ७० |
| **परि. ४.१३** | जिल्हावार उपलब्ध गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या | ७१ |
| **परि. ४.१४** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०१९-२० करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ७२ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ४.१५** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०१९-२० करिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ७४ |
| **परि. ५.१** | दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ८८ |
| **परि. ५.२** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल | ८९ |
| **परि. ५.३** | अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चाचे कल | ९० |
| **परि. ५.४** | कर्जे व इतर दायित्वे | ९१ |
| **परि. ५.५** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ९२ |
| **परि. ६.१** | सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | १०० |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१९-२०) | १०१ |
| **परि. ६.३** | जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजना | १०२ |
| **परि. ७.१** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र | १३३ |
| **परि. ७.२** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | १३४ |
| **परि. ७.३** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता | १३५ |
| **परि. ७.४** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | १३८ |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र | १३९ |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी | १४० |
| **परि. ७.७** | राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी | १४१ |
| **परि. ८.१** | राज्यातील खनिजांचे उत्पादन | १६२ |
| **परि. ८.२** | राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) | १६३ |
| **परि. ८.३** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १६५ |
| **परि. ८.४** | राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील | १६६ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १९१ |
| **परि. ९.२** | राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील) | १९२ |
| **परि. ९.३** | जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखभालीखालील) | १९३ |
| **परि. ९.४** | राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने | १९४ |
| **परि. १०.१** | विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या | २६७ |
| **परि. १०.२** | सन २०२०-२१ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६८ |
| **परि. १०.३** | सन २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २६९ |
| **परि. १०.४** | सन २०२०-२१ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २७० |
| **परि. १०.५** | सन २०२०-२१ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | २७१ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.६** | राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्वस्थ संस्था रुग्णालये) | २७२ |
| **परि. १०.७** | राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भक मृत्युदर व एकूण जननदर | २७३ |
| **परि. १०.८** | काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ नुसार आर्थिक वर्गवारी | २७४ |
| **परि. १०.९** | राज्यातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार | २७५ |
| **परि. १०.१०** | राज्यातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार | २७६ |
| **परि. १०.११** | राज्यातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २७७ |
| **परि. १०.१२** | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत डिसेंबर, २०२० अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या | २७८ |
| **परि. १०.१३** | राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या विविध कामांच्या प्रकारानुसार संख्या व त्यावरील खर्च | २७९ |
| **परि. १०.१४** | राज्यातील औद्योगिक विवाद ** | २८० |
| **परि. १०.१५** | जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ | २८१ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाच्या पश्चिम व मध्य भागात वसलेल्या महाराष्ट्राला अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा आहे. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसूल विभागांत करण्यात आली आहे. जनगणना २०११ नुसार ११.२४ कोटी लोकसंख्या असलेले महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार ३.०८ लाख चौरस किमी भौगोलिक क्षेत्रफळासह तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या देशातील राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य आहे.

राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे. मार्चपासून सुरु होणाऱ्या व अंगाची काहिली करणाऱ्या उन्हाळ्या पाठोपाठ जूनच्या सुरुवातीला पाऊस येतो. पावसाळ्यातील हरित व आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या असुखद वातावरणानंतर येणाऱ्या सौम्य हिवाळ्यात टिकून राहते.

राज्याची राजधानी मुंबई ही फक्त अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार, हा देखील याच शहरात दिमाखात उभा आहे.

उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विकास होण्याच्या दृष्टीने कृषि व अन्न प्रक्रीया घटक, वस्त्रोद्योग यंत्रसामग्रीचे उत्पादन, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा, विद्युत वाहने, उद्योग ४.० (कृत्रिम बुद्धीमत्ता, त्रिमिती छपाई, इंटरनेट ऑफ थिंग्ज व रोबोटिक्स, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान), एकात्मिक माहिती केंद्र संकुले, इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन, अर्ध-संवाहक बनावट, इत्यादी प्राधान्य क्षेत्रे निश्चित करण्यात आली आहेत. व्यावसायिक सुलभतेसाठी राज्याने विविध उपाय योजिले आहेत. प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रांसाठी अनुरूप अशी प्रगत सुविधा आणि किफायतशीर किंमत रचनेसह परिपूर्ण असे कारखाना सुरू करण्यासाठी तयार (रेडी-टू-मूव्ह-फॅक्टरी) वातावरण उपलब्ध करित आहे.

उत्तम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानातील प्रगती, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता, प्रमुख भागांशी संपर्क व्यवस्था आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची मुबलकता यामुळे महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांसाठी कायमच पसंतीचे राज्य राहिले असून नुकत्याच झालेल्या 'मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० गुंतवणूक शिखर संमेलनाला' मिळालेला प्रचंड प्रतिसाद हेच सिद्ध करतो.

महाराष्ट्र ही फक्त एक भौगोलिक संज्ञा नसून लोकांच्या एकत्रित प्रयत्नांनी उभे राहिलेले राज्य आहे. राज्यात विविध चालीरीतींचे व परंपरांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. आपल्या समृद्ध संगीत व नृत्य परंपरेसाठी राज्य देशात प्रसिद्ध आहे. पोवाडा, भारुड, गोंधळ आणि लावणीद्वारे लोककलेमध्ये केलेल्या भरीव योगदानासाठी राज्य ओळखले जाते. सर्व मुख्य धार्मिक सण समारंभ राज्यात शांततेने व सौहार्दतेने साजरे केले जातात. देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीमध्ये राज्याचा बहुमोल वाटा आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरी लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि चैत्य व विहार सारखी वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेली स्थळे ही कायमच जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. पर्यटनाला चालना देण्यासाठी राज्याने कृषी पर्यटन धोरण व बीच शॅक धोरण जाहीर केले आहे. राज्याने आदरातिथ्य क्षेत्रास उद्योगाचा दर्जा दिला आहे. राज्याने साहित्य, कला, क्रीडा व सामाजिक सेवा यांमध्ये आपला स्वतःचा ठसा उमटवला आहे. मनोरंजन क्षेत्रात जागतिक स्तरावर नावाजलेले बॉलीवूड हे देखील राज्याचा एक हिस्सा आहे.

काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतिशील राहून आपले पुरोगामित्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्र राज्याने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०१९-२०<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१. भौगोलिक रचना** - क्षेत्र (हजार चौ किमी) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| समुद्र किनाऱ्याची लांबी (किमी) | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० |
| **२. प्रशासकीय रचना** - | | | | | | | |
| महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ |
| तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५[@@] | ३५५[@@] |
| वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ |
| शहरे[#] | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| **३. जनगणनेनुसार लोकसंख्या** -(हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| लोकसंख्येची घनता (प्रती चौ किमी) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५५.८ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२ | ३१.१२ | ३५.० | ३८.७ | ४२.४ | ४५.२ | ४५.२ |
| **४. सांकेतिक राज्य उत्पन्न** - | | | | | | | |
| राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | २४,८२,५३६[+†] |
| कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | २,५६,९५७[+††] |
| उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ६,१९,००१[+††] |
| सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | १२,७६,८०६[+††] |
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | २,०२,१३०[+] |
| **५. पर्जन्य** - सरासरीशी तुलना (टक्के) | | | | | | १०२.३ | ११२.६ |
| **६. कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टर) | | | | | | | (२०१८-१९) |
| निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | १६,८१५ |
| पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | २३,२१२ |
| स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ |
| *त्यापैकी* लाभ क्षेत्र ^ | २२६[$] | ४२२ | ७१८ | १,०७६[$$] | १,७६४[##] | २,९५५[##] | ४,०५२[##++!] |
| स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ ना | उ ना |
| **७. प्रमुख पिकांखालील क्षेत्र** - (हजार हेक्टर) | | | | | | | |
| तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५५३ |
| गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | १,०५७ |
| ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | २,३७१ |
| बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ६७३ |
| सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ६,९७६ |
| सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ४,३१६ |
| सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | ११,२९२ |

उ ना उपलब्ध नाही @@ मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील तीन तालुके वगळून # गणना शहरांसह + पहिले सुधारित अंदाज (पायाभूत वर्ष २०११-१२)

† बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न †† मूळ किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धी ! अंदाजित ^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

@ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये माहिती संकलनाच्या पद्धतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

$ १९६१-६२ $$ १९९१-९२ ## प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट

टीप : राज्य उत्पन्नाचे १९६०-६१ ते २०१०-११ चे अंदाज घटक खर्चावर आधारित आहेत.

++ *आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| | बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०१९-२०<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | उ ना |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | ८८२ |
| | कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,४९१ |
| | भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | २९१ |
| **८.** | **प्रमुख पिकांचे उत्पादन -** | | | | | | | |
| | (हजार टन) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | २,८९७ |
| | गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | १,७९३ |
| | ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | १,८६५ |
| | बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ५१२ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | ९,२१८ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | ३,८४९ |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१३ | १३,०३७ |
| | ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | ६९,३१३ |
| | कापूस (रुई)# | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | ६,६३९ |
| | भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | ३०९ |
| **९.** | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक@-** | -- | -- | -- | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | १९९.० |
| **१०.** | **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२०१०-११) | (२०१५-१६) |
| | वहिती खातेदारांची संख्या (हजार) | -- | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,६९९ | १५,२८५ |
| | वहिती क्षेत्र (हजार हेक्टर) | -- | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | १९,७६७ | २०,५०६ |
| | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४४ | १.३४ |
| **११.** | **पशुधन गणना -** | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२०१२) | (२०१९) |
| | एकूण पशुधन (हजार) | २५,४४९ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५ | ३२,४८९ | ३३,०८० |
| | एकूण कुक्कुटादी पक्षी+ (हजार) | ९,९०२ | १८,७५१ | २४,८३० | ३५,३९२ | ६४,७५६@@ | ७७,७९५@@ | ७४,२९८@@ |
| | | | | | | | (२००३) | (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| **१२.** | **वन क्षेत्र** (चौ किमी) | | | | | | | (२०२०) |
| | | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,९५२* |
| **१३.** | **औद्योगिक गुंतवणूक -** | | | | | | | (२०२०)$$ |
| | मंजूर प्रकल्प (संख्या) | -- | -- | -- | -- | -- | १६,६८६ | २०,९०९ |
| | प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी) | -- | -- | -- | -- | -- | ८,१०,८६४ | १४,२९,१४२ |
| **१४.** | **वीज** - (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | १,२३,३१४ |
| | एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,२५,४६४ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४६,५०७ |
| | कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २९,११८ |
| | घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २९,३०१ |

* अस्थायी    # कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये    @ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १००

$$ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर    @@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये कुक्कुटपालन केंद्रामधील पक्षी समाविष्ट

+ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी समाविष्ट    उ ना उपलब्ध नाही

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१५. बँका-(अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून, १९७१) | (जून, १९८१) | (जून, १९९१) | (जून, २००१) | (जून, २०१०) | (३१ मार्च, २०२०) |
| बँक कार्यालये | उ ना | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | १३,११४ |
| | | | | (मार्च, १९९१) | (मार्च, २००१) | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ ना | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | ३,१८६ |
| **१६. शिक्षण+ -** | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | १,०६,४९१ |
| विद्यार्थी (हजार) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १५,६९४ |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २८,०९३ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ६,४८१ |
| **१७. आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | ( २०१९) |
| रुग्णालये | उ ना | २९९ | ५३० | ७६८ | ९८१ | १,३६८ | १,४०२ |
| दवाखाने | उ ना | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,६२९ | ३,०१२ | ३,०८७ |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ ना | ८८ | ११४ | १४४ | १०५ | १०३ | १०२ |
| | | | | | | | (२०१८) |
| जन्मदर@ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १५.६ |
| मृत्यूदर@ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ५.५ |
| अर्भक मृत्यूदर@ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | १९ |
| **१८. वाहतूक -** | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किमी) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,२१० |
| एकूण रस्त्यांची लांबी (किमी) † | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | ३,०९,३४२* |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,५४,०९३* |
| मोटार वाहने (हजार) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | ३७,७६२* |
| **१९. सहकार -** | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २०,७४४ |
| सभासद (लाख) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १४७* |
| सहकारी संस्थांची संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ | २,१२,९५१ |
| सभासद (लाख) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ५५६* |
| सहकारी संस्थांचे खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | ३,९७,४६६* |
| **२०. स्थानिक स्वराज्य संस्था -** | | | | | | | (२०१९-२०)$ |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २७,८३२ |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २४१ |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २७ |
| नगर पंचायत | -- | -- | -- | -- | ३ | ४ | १२८ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी @ नमुना नोंदणी पाहणी प्रमाणे उ ना उपलब्ध नाही

† सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते $ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार (दि.३१.१२.२०१९ रोजीची)

+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (इयत्ता १ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आहे.

# ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजार | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -"- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -"- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजार | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजार | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धिदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| १.६ साक्षरता दर | -"- | ८२.३ | ७३.० | -- |
| १.७ अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | हजार | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -"- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र | लाख चौ. किमी | ३.०८ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०१६-१७)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १६,९१० | १,३९,४१५ | १२.१ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -"- | २३,२२४ | २,००,२०३ | ११.६ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -"- | उ ना | ९८,१४८ | -- |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ ना | ४९.० | -- |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०१६-१७ ते २०१८-१९ या वर्षांची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,४८४ | ४३,९७५ | ३.४ |
| (२) गहू | -"- | १,०४४ | २९,९१८ | ३.५ |
| (३) ज्वारी | -"- | २,३०५ | ४,९१४ | ४६.९ |
| (४) बाजरी | -"- | ७४५ | ७,३४८ | १०.१ |
| (५) एकूण तृणधान्ये | -"- | ६,७८५ | ९७,७०६ | ६.९ |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -"- | १०,९७५ | १,२७,१७७ | ८.६ |
| (७) ऊस क्षेत्र | -"- | उ ना | ४,७४५ | -- |
| ऊस तोडणी क्षेत्र | -"- | ८९९ | उ ना | -- |
| (८) कापूस | -"- | ४,१२३ | १२,००९ | ३४.३ |
| (९) भूईमूग | -"- | २९७ | ४,९८६ | ६.० |

उ ना उपलब्ध नाही

## महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती (पुढे चालू... )

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२०१९) | हजार | ३३,०८० | ५,३६,७६१ | ६.२ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -”- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व विद्युत पंप (२००३) | -”- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०१९) | चौ. किमी | ६१,५७९ | ७,६७,४१९ | ८.० |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक$$ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | २०,९०९ | १,१६,२५७ | १८.० |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | १४,२९,१४२ | १,३३,४३,४३८ | १०.७ |
| **६. वीज (२०१९-२०)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | १,२३,३१४ | १३,८३,३९८ | ८.९ |
| ६.२ एकूण वापर# | -”- | १,२५,४६४ | १०,५०,९९६ | ११.९ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -”- | ४६,५०७ | ३,४२,७०२ | १३.६ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३७.१ | ३२.६ | -- |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च, २०२०) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | १३,११४ | १,४८,९०४ | ८.८ |
| ७.२ ग्रामीण बँक कार्यालये (मार्च, २०२०) | -”- | ३,१८६ | ५२,०९८ | ६.१ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०१९-२०)** | | | | |
| ८.१ सांकेतिक (नॉमिनल) स्थूल राज्य उत्पन्न / सांकेतिक (नॉमिनल) देशांतर्गत स्थूल उत्पन्न† | ₹ कोटी | २८,१८,५५५+ | २,०३,५१,०१३+ | १३.८ |
| ८.२ सांकेतिक (नॉमिनल) उत्पन्न | ₹ कोटी | २४,८२,५३६+ | १,७९,९४,३०१+ | १३.८ |
| ८.३ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | २,०२,१३०+ | १,३४,१८६+ | -- |

$$ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०२० + पहिले सुधारित अंदाज # वितरण परवानाधारकांमार्फत ग्राहकांना केलेली वीज विक्री

† स्थूल राज्य उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्न बाजार किंमतीनुसार

# 1

# ®úÉVªÉ +lÉ´ªÉ´ÉºlÉÉ



# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ सन २०२०-२१ च्या पुर्वानुमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत (-)८.० टक्के वाढ तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेतही (-)८.० टक्के वाढ अपेक्षित आहे. ‘कृषि व संलग्न कार्ये’ क्षेत्रात सन २०२०-२१ मध्ये ११.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०२०-२१ मध्ये ‘उद्योग’ व ‘सेवा’ क्षेत्रात अनुक्रमे (-)११.३ टक्के व (-)९.० टक्के वाढ अपेक्षित आहे. पुर्वानुमानानुसार सन २०२०-२१ साठी सांकेतिक (‘नॉमिनल’) (चालू किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २६,६१,६२९ कोटी अपेक्षित आहे आणि वास्तविक (‘रिअल’) (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतीनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ १९,६२,५३९ कोटी अपेक्षित आहे.

- सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक (१४.२ टक्के) आहे
- सन २०१९-२० च्या तुलनेत सन २०२०-२१ च्या सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नात ₹ १,५६,९२५ कोटी घट अपेक्षित आहे
- सन २०२०-२१ चे दरडोई राज्य उत्पन्न ₹ १,८८,७८४ अपेक्षित आहे

१.२ पहिल्या सुधारित अंदाजानुसार सन २०१९-२० चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २८,१८,५५५ कोटी होते, तर ते सन २०१८-१९ मध्ये ₹ २५,७९,६२८ कोटी होते. सन २०१९-२० चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २१,३४,०६५ कोटी होते, तर ते सन २०१८-१९ साठी ₹ २०,३३,३१४ कोटी होते. सन २०१९-२० मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,०२,१३० होते, तर ते सन २०१८-१९ मध्ये ₹ १,८७,११८ होते.

दरडोई राज्य उत्पन्न आणि सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+++ | २०१८-१९++ | २०१९-२०+ | २०२०-२१$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ९९,५९७ | १,१२,०९२ | १,२५,२६१ | १,३२,८३६ | १,४६,८१५ | १,६३,७२६ | १,७२,६६३ | १,८७,११८ | २,०२,१३० | १,८८,७८४ |
| सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (₹ कोटी) | १२,८०,३६९ | १४,५९,६२९ | १६,४९,६४७ | १७,७९,१३८ | १९,६६,२२५ | २१,९८,१८५ | २३,५२,७८२ | २५,७९,६२८ | २८,१८,५५५ | २६,६१,६२९ |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज $ पुर्वानुमान

सन २०१९-२० करिता निवडक राज्यांचे दरडोई उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | हरियाणा | तेलंगणा | कर्नाटक | तामीळनाडू | महाराष्ट्र | आंध्र प्रदेश | मध्य प्रदेश | उत्तर प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | २,६४,२०७ | २,२८,२१६ | २,२३,४३३ | २,१८,५९९ | २,०२,१३० | १,६९,५१९ | ९९,७६३ | ६५,७०४ |

सन २०२० करिता जागतिक स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर

| तपशील | जागतिक | विकसित अर्थव्यवस्था | विकसनशील अर्थव्यवस्था | अल्प विकसित अर्थव्यवस्था | अमेरीकेची संयुक्त राज्ये | जपान | चीन | भारत$ | महाराष्ट्र$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर (टक्के) | (-)४.३ | (-)५.६ | (-)२.५ | (-)१.३ | (-)३.९ | (-)५.४ | २.४ | (-)८.०^ | (-)८.०^^ |

$ सन २०२०-२१ करिता ^ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचेकडील दुसरे पुर्वानुमान ^^ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील पुर्वानुमान

## किंमती

१.३ कोविड-१९ लॉकडाऊनच्या कालावधीत एप्रिल आणि मे, २०२० या महिन्यांमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गोळा करण्यात अडचणी आल्या. खाद्यपदार्थ गटाव्यतिरिक्त इतर गटातील वस्तूंच्या किंमती सदर कालावधीत उपलब्ध झाल्या नाहीत. परिणामी एप्रिल आणि मे, २०२० या महिन्यांकरिता 'पान, सुपारी व मादक पदार्थ', 'कापड, बिछाना व पादत्राणे', 'संकीर्ण (नागरी भागातील वैद्यकीय सेवा वगळता)' आणि 'सर्वसाधारण' या गटांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित करणे शक्य झाले नाही. राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) जून, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीसाठी अनुक्रमे ३१८.५ व ३०३.२ होता तर जून, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीसाठी तो अनुक्रमे ३००.५ व २८४.२ होता. सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित जून, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीसाठी वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागात ६.० टक्के व नागरी भागात ६.७ टक्के होता, तर जून, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीसाठी तो अनुक्रमे ९.४ टक्के व ६.३ टक्के होता.

➢ **कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना**

- दि.३१ मार्च, २०२१ पर्यंत 'शिव भोजन' थाळीच्या किंमतीत घट करुन ₹ पाच करण्यात आली. या योजनेच्या सुरुवातीपासून एकूण ९०६ शिवभोजन केंद्रांमधून डिसेंबर, २०२० पर्यंत २.८१ कोटी शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले
- 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना' या योजने अंतर्गत राज्यात सुमारे सात कोटी अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य व प्रतिमाह प्रति कुटुंब एक किलो डाळ विनामूल्य वितरित करण्यात आली
- राज्य शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम व दारिद्र्य रेषेवरील शेतकरी योजने अंतर्गत समाविष्ट न झालेल्या सर्व दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांना पाच किलो अन्नधान्य रास्त दरात (₹ १२ प्रतिकिलो दराने दोन किलो तांदूळ आणि ₹ आठ प्रतिकिलो दराने तीन किलो गहू) वितरित केले

१.४ सन २०२०-२१ मध्ये जानेवारीपर्यंत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत एकूण पात्र १५६.६३ लाख शिधापत्रिकाधारकांपैकी १५३.१२ लाख शिधापत्रिकांची आणि १४ अवर्षणप्रवण जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील शेतकऱ्यांपैकी एकूण पात्र ९.०९ लाख शिधापत्रिकाधारकांपैकी ८.९६ लाख शिधापत्रिकांची आधार जोडणी पूर्ण करण्यात आली आहे.

१.५ जानेवारी, २०२१ पर्यंत राज्यातील ५२,५३२ रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्य वितरणाकरिता 'पॉईंट ऑफ सेल' उपकरणे बसविण्यात आली आहेत. जानेवारी, २०२१ मध्ये सुमारे १.४३ कोटी कुटुंबांनी आधार आधारीत बायोमेट्रिक अधिप्रमाणनाद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

१.६ 'एक देश, एक शिधापत्रिका' ही योजना दि.१ जानेवारी, २०२० पासून देशात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत शिधापत्रिकाधारक देशातील कोणत्याही भागातील रास्त भाव दुकानांमध्ये कार्यान्वित 'पॉईंट ऑफ सेल' या उपकरणाच्या सहाय्याने पोर्टेबिलिटीच्या माध्यमातून रास्त दराने अन्नधान्य विकत घेऊ शकतात. योजनेच्या सुरुवातीपासून जानेवारी, २०२१ पर्यंत राज्यातील ४,३८१ शिधापत्रिकाधारकांनी इतर राज्यांत आणि इतर राज्यांतील ६०९ शिधापत्रिकाधारकांनी या राज्यात योजनेचा लाभ घेतला.

## लोकवित्त

- अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ नुसार राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.१ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १९.६ टक्के आहे
- पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सन २०२१-२२ ते २०२५-२६ करिता केंद्राकडून राज्यास ₹ ३,३७,२५२ कोटी वित्तीय संसाधने हस्तांतरीत होणार असून त्यापैकी ₹ ७०,३७५ कोटी सहाय्यक अनुदाने असतील
- **कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना**
    - फक्त औषधे, अत्यावश्यक वैद्यकीय साधने व पुरवठा इ. खरेदी करिता मान्यता
    - नविन योजनांच्या खर्चात कपात
    - मालमत्ता निर्मिती आणि नोकरीच्या संधी निर्माण करण्यासाठी अर्थसंकल्पीत निधी वितरित करण्यास मान्यता
    - दि.१ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता मुद्रांक शुल्क तीन टक्क्यांनी व उर्वरित राज्याकरिता दोन टक्क्यांनी कमी करण्यात आले, तर दि.१ जानेवरी ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता दोन टक्क्यांनी आणि उर्वरित राज्याकरिता १.५ टक्क्यांनी कमी करण्यात आली
    - वार्षिक कर भरणाऱ्या मालवाहतूक व पर्यटक वाहने, खनित्रे, खाजगी सेवा वाहने, व्यावसायिक शिबिरे वाहने आणि शालेय विद्यार्थी वाहतूक वाहने यांना सन २०२०-२१ मध्ये वार्षिक कराच्या ५० टक्के कर माफ करण्यास मान्यता

१.७ राज्याची सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार महसुली जमा ₹ ३,४७,४५७ कोटी, तर सन २०१९-२० सुधारित अंदाजानुसार ₹ ३,०९,८८१ कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ नुसार कर महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ₹ २,७३,१८१ कोटी आणि ₹ ७४,२७६ कोटी आहे. एप्रिल ते डिसेंबर,२०२० या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ १,७६,४५० कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५०.८ टक्के) आहे.

१.८ अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ नुसार राज्याचा महसुली खर्च ₹ ३,५६,९६८ कोटी असून सन २०१९-२० च्या सुधारित अंदाजानुसार ₹ ३,४१,३२४ कोटी आहे.

१.९ अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ नुसार भांडवली जमेचा एकूण जमेतील आणि भांडवली खर्चाचा एकूण खर्चातील हिस्सा अनुक्रमे २०.० टक्के व १७.८ टक्के आहे.

१.१० अर्थसंकल्पीय अंदाज २०२०-२१ नुसार विकास खर्चाचे एकूण महसुली खर्चातील प्रमाण ६८.७ टक्के आहे

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

- देशातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व स्थूल कर्जे यामध्ये महाराष्ट्रातील बँकांचा हिस्सा दि.३१ मार्च, २०२० रोजी अनुक्रमे २०.० टक्के व २७.० टक्के होता
- सन २०२०-२१ ची राज्याकरिता प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज योजना ₹ ४.७५ लाख कोटी आहे

१.११ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या दि.३१ मार्च, २०२० रोजी एकूण ठेवी व स्थूल कर्जे अनुक्रमे ₹ २७.५५ लाख कोटी व ₹ २८.२६ लाख कोटी होते. अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे दि.३१ मार्च, २०२० रोजी कर्ज-ठेवी प्रमाण १०२.६ टक्के होते.

१.१२ सन २०२०-२१ च्या वार्षिक कर्ज योजनेअंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा हिस्सा १९.७ टक्के आणि 'एमएसएमई (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, खादी व ग्रामोद्योग)' क्षेत्राचा हिस्सा ५२.४ टक्के आहे.

१.१३ सन २०१९-२० मध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत राज्यातील ४७.७१ लाख ('शिशु' अंतर्गत ४१.३३ लाख, 'किशोर' अंतर्गत ५.०५ लाख व 'तरुण' अंतर्गत १.३३ लाख) लाभार्थ्यांना एकूण ₹ २७,३९८ कोटी कर्ज वितरित करण्यात आले.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१४ मान्सून २०२० मध्ये सरासरी पावसाच्या ११३.४ टक्के पाऊस राज्यात पडला. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळून) १३९ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, १७३ मध्ये सरासरी आणि ४३ मध्ये अपुरा पाऊस पडला.

१.१५ राज्याचे सरासरी वहिती क्षेत्र कृषी गणना २०१५-१६ नुसार १.३४ हेक्टर आहे तर कृषी गणना २०१०-११ नुसार ते १.४४ हेक्टर होते. अल्प व अत्यल्प वहिती खातेदारांचे (२.० हेक्टर पर्यंत) एकूण क्षेत्र ९२.२० लाख हेक्टर असून एकूण वहिती क्षेत्राच्या ४५.० टक्के होते, तर अल्प व अत्यल्प वहिती खातेदारांची संख्या १२१.५५ लाख असून, ती एकूण वहिती खातेदारांच्या ७९.५ टक्के होती.

१.१६ सन २०२०-२१ च्या खरीप हंगामामध्ये १५६.८९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, कापूस व ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ६० टक्के, १४ टक्के, २८ टक्के, ३३ टक्के व ४० टक्के वाढ अपेक्षित आहे.

१.१७ सन २०२०-२१ च्या रब्बी हंगामामध्ये डिसेंबर अखेर ५३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये व कडधान्ये यांच्या उत्पादनात अनुक्रमे एक टक्का व १२ टक्के वाढ अपेक्षित असून तेलबियांच्या उत्पादनात १८ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१८ सन २०१९-२० मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र १९.२० लाख हेक्टर असून २७८.७५ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.

राज्यातील पाऊस व पीक उत्पादन

| तपशील | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पावसाची सरासरीच्या तुलनेत टक्केवारी | १०२.३ | ९०.३ | १२४.६ | ७०.२ | ५९.४ | ९४.९ | ८४.३ | ७३.६ | ११२.६ |
| पीक | उत्पादन ('००० मे.टन)$ | | | | | | | | |
| तृणधान्ये | १०,२७६ | ८,६६७ | १०,६७७ | ९,२५९ | ७,२१० | १२,६४६ | १०,९४४ | ७,९४७ | ९,२१८ |
| कडधान्य | २,२२५ | २,२६२ | ३,११४ | २,०१९ | १,५४५ | ४,५८४ | ३,६८४ | २,६८३ | ३,८४९ |
| एकूण अन्नधान्ये | १२,५०१ | १०,९२९ | १३,७९१ | ११,२७८ | ८,७५५ | १७,२३० | १४,६२८ | १०,६३० | १३,०६७ |
| तेलबिया | ४,४८५ | ५,०८७ | ५,२९४ | २,८५० | २,४३६ | ५,११३ | ४,२०८ | ४,८८५ | ५,१७८ |
| ऊस | ८६,७३३ | ६९,६४८ | ७६,९०१ | ८४,६९९ | ७३,६८० | ५४,२३७ | ८३,१३८ | ८९,७७१ | ६९,३१३ |
| कापूस (रुई)@ | ७,२०० | ७,६५५ | ८,८३४ | ७,००० | ७,५०० | १०,७५५ | ६,०९४ | ६,५९३ | ६,६३९ |
| फळे | १०,५३८ | ९,७८५ | १३,४५८ | ११,०९० | ९,७५० | १०,६३० | ११,७२९ | १०,७७८ | ११,५४४ |
| भाजीपाला | ८,७७८ | ८,००८ | १०,१६२ | ८,७८३ | ९,४५२ | १०,५२० | १२,३०७ | ११,४७२ | १४,३९४ |

$ खरीप, रब्बी आणि उन्हाळी अंतर्भूत @ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये # अंतिम अंदाज

> ➢ 'महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९' च्या सुरुवातीपासून जानेवारी, २०२१ अखेर ३१.०४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ १९,८४७ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला
>
> ➢ **कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना**
>
> - कृषी निविष्ठा आणि कृषी उत्पादनांच्या वाहतूक व विक्रीसाठी संबंधित विभागांकडून परवाने उपलब्ध
> - कृषी निविष्ठांचे ९.४२ लाख शेतकऱ्यांना घरपोच वाटप
> - शेतकऱ्यांच्या ३,७९० गटांच्या माध्यमातून सुमारे १.३७ लाख मे. टन फळे व भाजीपाल्याची नागरी ग्राहकांना थेट विक्री

१.१९ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) प्रकल्पांद्वारे दि.३० जून, २०१९ अखेर ५३.०४ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आणि २०१९-२० मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ४०.५२ लाख हेक्टर (७६.४ टक्के) होते. लघु सिंचन (स्थानिक क्षेत्र) प्रकल्पांद्वारे दि. ३० जून, २०२० अखेर १९.२६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आणि २०१९-२० मध्ये ८.६३ लाख हेक्टर (४४.८ टक्के) क्षमतेचा वापर झाला.

१.२० मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे दि. १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी एकूण उपयुक्त जलसाठा ३०,५७९ दशलक्ष घनमीटर होता व तो जलसाठा क्षमतेच्या ६९.२ टक्के होता.

१.२१ वार्षिक कर्ज योजने अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रासाठी वार्षिक लक्ष्य ₹ ९३,६२६ कोटी होते. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर वित्तीय संस्थांद्वारे ₹ ४०,५१५ कोटी पीक कर्ज वाटप करण्यात आले तर सन २०१९-२० मध्ये ते ₹ २८,६०४ कोटी होते. सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबर अखेर ₹ ३०,०१४ कोटी रकमेचे कृषी मुदत कर्ज वाटप करण्यात आले, तर सन २०१९-२० मध्ये ते ₹ ३४,४२७ कोटी होते.

१.२२ प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांनी सन २०१९-२० मध्ये शेतकऱ्यांना एकूण ₹ १०,८९८ कोटी कर्ज वितरित केले.

१.२३ जून ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झाले. आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना कमाल दोन हेक्टर क्षेत्रासाठी, शेतीपिकांसाठी ₹ १०,००० प्रति हेक्टर व फळपिकांसाठी ₹ २५,००० प्रति हेक्टर या दराने दोन हप्त्यात एकूण ₹ ४,३७४.४३ कोटी रकमेची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

१.२४ देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नास जोड देण्यासाठी केंद्र शासनाने 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' योजना २०१८-१९ पासून सुरू केली. या योजने अंतर्गत पात्र कुटुंबांना (पती-पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये मिळून) ₹ २,००० प्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ₹ ६,०००अनुदान अनुज्ञेयअसून ते लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. या योजने अंतर्गत दि. ४ जानेवारी, २०२१ अखेर राज्यातील १०२.५४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ₹ ९,४९६.३८ कोटी रक्कम जमा करण्यात आली.

> ➢ **कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना**
>
> - आकाशवाणी, दूरदर्शन आणि इतर प्रसारमाध्यमांद्वारे कुक्कुट आणि कुक्कुट उत्पादनांच्या सेवनाच्या सुरक्षेविषयी आणि पौष्टीक मुल्यांच्या फायद्यांबद्दल जनजागृती
> - पशुधनाचे आरोग्य राखून सातत्यपूर्ण दूध उत्पादनासाठी निरंतर लसीकरण, कृत्रिम रेतन व इतर पशुवैद्यकीय सेवा, चारा उपलब्धता, वाहतूक तसेच जनावरांवरील क्रुरतेविरुद्ध कारवाई
> - पशुपालक व पशुखाद्य उत्पादक यांना चाऱ्याचा सुरळीत पुरवठा

१.२५ पशुगणना २०१९ नुसार सुमारे ३.३१ कोटी पशुधनासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर आहे. सुमारे ७.४३ कोटी कुक्कुटादी पक्ष्यांच्या संख्येसह राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे.

१.२६ शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे दैनिक सरासरी दूध संकलन सन २०१९-२० मध्ये अनुक्रमे ०.९६ लाख लिटर व ३९.७६ लाख लिटर होते, तर ते सन २०१८-१९ मध्ये अनुक्रमे १.७९ लाख लिटर आणि ४९.१४ लाख लिटर होते.

१.२७ सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन सन २०१९-२० मध्ये अनुक्रमे ४.४४ लाख मे. टन व १.१८ लाख मे. टन होते, तर सन २०१८-१९ मध्ये सदर उत्पादन अनुक्रमे ४.६७ लाख मे. टन व एक लाख मे. टन होते.

१.२८ राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार अपेक्षित ३३ टक्के च्या तुलनेत सन २०१९-२० अखेर राज्याचे वनक्षेत्र भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के होते.

## उद्योग व सहकार

- मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत जून, २०२० मध्ये राज्यात ₹ १.१३ लाख कोटी गुंतवणूक व २.५० लाखांपेक्षा जास्त अपेक्षित रोजगार असलेले प्रस्ताव प्राप्त
- डिसेंबर, २०२० अखेर राज्यात ७,६०३ स्टार्टअप होते
- प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा अंतर्गत रेडी-टू-मूव्ह-इन-फॅक्टरी सुविधा देण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुमारे ४०,००० एकर जागेचे वाटप करीत आहे; या व्यतिरिक्त महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योगांची त्वरित स्थापना करण्यासाठी भाडेतत्वावर औद्योगिक शेडसाठी जागा देखील पुरवणार
- पर्यटन उद्योगाला चालना देण्यासाठी राज्याचे ऑगस्ट, २०२० मध्ये बीच शॅक धोरण आणि सप्टेंबर २०२० मध्ये कृषी पर्यटन धोरण जाहीर
- कोविड-१९ महामारीचा सर्वाधिक फटका बसलेल्या आदरातिथ्य क्षेत्रास पुनरुज्जीवित करण्यासाठी राज्याचा या क्षेत्रास उद्योग म्हणून वर्गीकृत करण्याचा निर्णय

१.२९ उदारीकरणाच्या धोरणापासून (ऑगस्ट, १९९१) ऑक्टोबर, २०२० पर्यंत राज्यात ₹ १४,२९,१४२ कोटी गुंतवणुकीसह २०,९०९ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले. सन २०२० मध्ये ऑक्टोबरपर्यंत ₹ ३७,८८७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या २४७ प्रकल्पांची नोंदणी झाली.

१.३० एप्रिल, २००० ते सप्टेंबर, २०२० पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक ₹ ८,१८,५२२ कोटी असून ती देशातील एकूण थेट परदेशी गुंतवणूकीच्या २७.७ टक्के होती. सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबर पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक ₹ २७,१४३ कोटी होती.

१.३१ मार्च, २०२० पर्यंत, राज्यात एकूण १७.६७ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांनी 'उद्योग आधार' साठी नोंदणी केली असून त्यापैकी १५.६० लाख सूक्ष्म, १.९९ लाख लघु व ०.०८ लाख मध्यम उपक्रम होते. या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची राज्यात एकूण ₹ २,३८,५४३ कोटी गुंतवणूक असून त्याद्वारे ९१.०१ लाख रोजगार निर्माण झाला.

१.३२ दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिकेचा एक भाग म्हणून कामावर चालत जाणे (वॉक-टू-वर्क) या संकल्पनेवर आधारित सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. ऑरिकमध्ये सुमारे २१२ एकर क्षेत्रावरील ६२ भूखंडांचे गुंतवणूकदारांना वाटप करण्यात आले आहे. ऑरिकमध्ये ₹ ५,००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २,८११ रोजगार निर्मिती झाली आहे.

१.३३ 'दृष्टीक्षेपात भारत पर्यटन सांख्यिकी-२०२०' अहवालानुसार २०१९ मध्ये राज्यात १४.९३ कोटी देशांतर्गत पर्यटकांनी आणि ०.५५ कोटी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या, तर २०१८ मध्ये ११.९२ कोटी देशांतर्गत पर्यटकांनी आणि ०.५१ कोटी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या.

१.३४ राज्यात दि. ३१ मार्च, २०२० रोजी सुमारे ५.५६ कोटी सभासद असलेल्या २.१३ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९.७ टक्के प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था , ९.८ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा संस्था, ५२.४ टक्के गृहनिर्माण संस्था, १२.५ टक्के कृषि प्रक्रिया संस्था, ५.१ टक्के मजूर कंत्राटी संस्था आणि १०.५ टक्के इतर कार्यात गुंतलेल्या संस्था होत्या.

## पायाभूत सुविधा

### ऊर्जा

- दि. ३१ मार्च, २०२० रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता आणि सन २०१९-२० मध्ये राज्यातील वीज निर्मिती देशात सर्वाधिक होती
- नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेत राज्य देशात चौथ्या क्रमांकावर आहे
- सन २०१९-२० मध्ये प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापरामध्ये देशात राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे

१.३५ सन २०१९-२० मध्ये एकूण १,५८,३०२ दशलक्ष युनिटस् (केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त विजेसह) वीज निर्मिती झाली असून राज्यातील एकूण विजेचा वापर १,२५,४६४ दशलक्ष युनिटस् होता.

१.३६ सन २०२०-२१ मध्ये डिसेंबरपर्यंत विजेची सरासरी कमाल मागणी १७,३४५ मेगावॅट होती व पुरवठा २१,८४१ मेगावॅट होता. सन २०१९-२० मध्ये विजेची सरासरी कमाल मागणी १९,१०३ मेगावॅट होती व पुरवठा २१,७७१ मेगावॅट होता.

१.३७ सन २०१९-२० मध्ये महापारेषणची पारेषण हानी, महावितरणची वितरण हानी आणि 'एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक' हानी अनुक्रमे ३.१७ टक्के, १५.९१ टक्के व १७.५१ टक्के होती.

## परिवहन व दळणवळण

- कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांची वाहतूक
- कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीत मालवाहतूकीवर होण्याऱ्या विपरित परिणामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या च्या प्रवासी वाहनांमधून अत्यावश्यक व इतर वस्तू वाहून नेण्याची परवानगी
- प्रवासी वाहतूक सुकर व्हावी व नवी मुंबईची झपाट्याने वाढ व्हावी यासाठी 'मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प' (अंदाजित किंमत ₹ १७,८४३ कोटी) प्रगतीपथावर
- मुंबई किनारा रस्ता प्रकल्प (दक्षिण) (अंदाजित किंमत ₹ १२,७२१ कोटी) प्रगतीपथावर असून नोव्हेंबर, २०२० अखेर सुमारे २० टक्के काम पूर्ण
- बेलापूर-सीवूड-उरण (नवीन मार्ग) चा बेलापूर ते खारकोपर मार्ग कार्यान्वित
- मुंबई मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द (₹ १७,३९६ कोटी), कुलाबा-वांद्रे-सिप्झ (₹ २३,१३६ कोटी), वडाळा-कासारवडवली-गायमुख (₹ १५,४९८ कोटी), ठाणे-भिवंडी-कल्याण (₹ ८,४१७ कोटी), स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी (₹ ६,६७२ कोटी ) व अंधेरी ते दहिसर-मिरा भाईंदर (₹ १२,८१५ कोटी) ची कामे प्रगतीपथावर
- नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प (अंदाजित किंमत ₹ ३,०६४ कोटी) व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प (अंदाजित किंमत ₹ ११,४२० कोटी ) यांचे काम प्रगतीपथावर
- नागपूर मेट्रो रेल प्रकल्प ( अंदाजित किंमत ₹ ८,८६० कोटी ) चे काम प्रगतीपथावर असून या प्रकल्पामधील खापरी ते सीताबर्डी (उत्तर- दक्षिण मार्ग) आणि लोकमान्य नगर ते सीताबर्डी ( पूर्व-पश्चिम मार्ग) जनतेसाठी खुले
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (अंदाजित किंमत ₹ १४,१७९ कोटी) विकसनाचे काम सुरु

१.३८ मार्च, २०१९ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.०९ लाख किमी होती.

१.३९ मुंबई व नागपूर यांना जोडणारा 'हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' हा आठ पदरी (७०१ किमी लांब व १२० मीटर रुंद) द्रुतगती महामार्ग प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचा एकूण अपेक्षित खर्च ₹ ५५,३३५.३२ कोटी आहे. डिसेंबर, २०२० पर्यंत या महामार्गासाठी आवश्यक असलेल्या एकूण जमिनीपैकी ९२.३ टक्के जमिनीचे भूसंपादन झाले आहे.

१.४० राज्यातील रस्त्यावरील वाहनांची संख्या दि.१ जानेवारी, २०२१ रोजी ३८६ लाख (प्रति किमी रस्ता लांबी १२५ वाहने) होती, तर दि.१ जानेवारी, २०२० रोजी ३७८ लाख (प्रति किमी रस्ता लांबी १२२ वाहने) होती.

१.४१ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०१९-२० मध्ये प्रति दिन सरासरी १५,५०५ बसेसमधून ५३.२९ लाख सार्थ किमी प्रवास करुन ६०.०७ लाख प्रवासी वाहतूक केली आहे.

१.४२ सन २०१९-२० मध्ये मोठी बंदरे व लहान बंदरे यांच्या मार्फत झालेली एकत्रित मालवाहतूक १,७२८.०५ लाख मे. टन होती तर ती मागील वर्षी १,७७०.८० लाख मे. टन होती.

१.४३ सन २०१९-२० मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे ३.३० लाख मे. टन व ५.८३ लाख मे. टन होती तर सन २०१८-१९ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ३.४५ लाख मे. टन व ६.७८ लाख मे. टन होती. सन २०१९-२० मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे ४५८.४९ लाख व १२५.२१ लाख होती तर सन २०१८-१९ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे ४६८.१४ लाख व १४६.३३ लाख होती.

१.४४ राज्यात सप्टेंबर, २०२० अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या ९.७ कोटी असून ती देशातील राज्यांमध्ये सर्वाधिक आहे.

## सामाजिक क्षेत्र

- देशातील शालेय तसेच उच्च शिक्षण प्रणालीमध्ये परीवर्तनशील सुधारणा घडवून आणण्याकरीता जुलै, २०२० मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० घोषित
- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सन २०२०-२१ मध्ये जानेवारी पर्यंत एकूण ६३,०६३ स्वसहाय्यता गटांना ₹ ८७२.५२ कोटी पतपुरवठा करण्यात आला

१.४५ सन २०१९-२० मध्ये एकूण १,०६,४९१ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व पटावरील विद्यार्थ्यांची संख्या १५६.९ लाख होती. सन २०१९-२० मध्ये २८,०९३ माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शाळा होत्या व पटावरील विद्यार्थ्यांची संख्या ६४.८ लाख होती.

१.४६ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालानुसार सन २०१९-२० मध्ये राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांची संख्या अनुक्रमे ६५ व ४,७३२ होती.

१.४७ एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत, सुमारे ४.५४ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून त्यावर ₹ ७४४.६५ कोटी खर्च झाला.

१.४८ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंत २१७ शहरांना ओडीफ+ व ११६ शहरांना ओडीफ++ म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## कोविड-१९ महामारी

- **कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना**
  - 'घरी राहून शिक्षण' ही संकल्पना राबविण्यात आली असून राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषदेच्या 'दीक्षा' तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या 'शैक्षणिक दिनदर्शिका' इत्यादी सारख्या विविध ॲप्लीकेशन्सचा वापर करण्यात आला. देशातील 'दीक्षा' ॲपच्या एकूण सरासरी वापरापैकी महाराष्ट्र राज्याचा हिस्सा ४६ टक्के आहे
  - शालेय पोषण आहार योजने अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शाळेत अथवा घरोघरी जाऊन तांदूळ, मुगडाळ, हरभरा इ. धान्याचे वाटप करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांना धान्याचे वाटप घरपोच करण्याबाबत विशेष निर्देश देण्यात आले
  - अंगणवाडीतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील सर्व लाभधारक बालके तसेच स्थलांतरीत बालकांना अन्नधान्ये व किराणा मालाचा पुरवठा करण्यात आला.
  - ग्राम बाल विकास केंद्राचे रुपांतर होम बेस्ड ग्राम बाल विकास केंद्रात करण्यात आले व ८,०३७ बालकांना ऊर्जायुक्त पौष्टीक आहार देण्यात आला
  - अनुसूचित जमातीच्या आर्थिक दुर्बल कुटुंबांकरीता एका वर्षासाठी खावटी अनुदान योजना पुनरुज्जीवित करण्यात आली

- **कोविड-१९ महामारीची परिस्थिती हाताळण्याकरिता केलेल्या उपाययोजना**
  - कोविड-१९ रुग्ण निदानासाठी दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात एकूण ४८७ प्रयोगशाळा
  - प्रत्येक बाधित रूग्णाच्या निकट संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी संपर्क शोध पथके स्थापित केली
  - महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना लाभार्थी नसलेल्यांना देखील लागू करण्यात आली
  - खाजगी रूग्णालयातील ८० टक्के खाटा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली आणल्या
  - खाजगी रूग्णालयांच्या बिलाबद्दल तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करण्यात आली

१.४९ कोविड-१९ आजाराचा जगातील पहिला रूग्ण चीन मधील वुहान शहरात डिसेंबर, २०१९ मध्ये आढळला. भारतात या आजाराचा पहिला रूग्ण दि. ३० जानेवारी, २०२० रोजी केरळ येथे आढळला. राज्यात दि.९ मार्च, २०२० रोजी पुणे येथे पहिला रूग्ण आढळला.

१.५० कोविड-१९ महामारीची दि.१५ जानेवारी, २०२१ रोजीची राज्यातील परिस्थिती खालील प्रमाणे होती.

- बाधित रूग्णांची संख्या १९.८४ लाख तर त्यापैकी बरे झालेल्या रूग्णांची संख्या १८.८१ लाख होती
- रूग्ण बरे होण्याचा दर ९४.८ टक्के होता
- एकूण मृत्यू ५०,३३६ होते
- रूग्ण मृत्यूदर २.५ टक्के होता
- प्रति दहा लाख लोकसंख्येमागे रूग्णसंख्या १५,६४९ होती
- रुग्णवाढीची साप्ताहिक सरासरी वाढ जानेवारी, २०२१ पर्यंत ०.१६ टक्के झाली
- राज्यात एकूण १.३७ कोटी चाचण्या करण्यात आल्या

१.५१ दि.१५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर,२०२० दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'माझे कुटुंब माझे जबाबदारी' या मोहिमेमध्ये प्रत्येक कुटुंबाला दोनदा भेटी देण्यात आल्या. पहिल्या टप्प्यामध्ये २.७६ कोटी कुटुंबांपैकी २.७४ कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आणि ११.९२ कोटी लोकांशी थेट संपर्क साधण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात २.७० कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आणि १०.०१ कोटी लोकांना भेटी दिल्या.

- राज्यात सर्वेक्षणात आढळलेल्या तापसदृष्य लक्षणे असणाऱ्या व श्वसनसंस्थेचा तीव्र आजार असणाऱ्या (सारी) ३.५७ लाख रुग्णांपैकी ३.२२ लाख रुग्णांची कोविड-१९ साठी तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५१,०६४ रुग्णांना कोविड-१९ चा संसर्ग झाल्याचे आढळून आले व त्यांचेवर आवश्यकतेनुसार उपचार करण्यात आले
- सर्वेक्षण एकूण २३.७५ लाख सह आजार असलेले रुग्ण आढळून आले आणि त्यांचेकरीता पुढील उपचारांची सोय करण्यात आली

१.५२ राज्यात कोविड-१९ लसीकरण कार्यक्रम दि.१६ जानेवारी, २०२१ रोजी सुरु झाला. दि.१८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत एकूण ७,८१,८०० कोविड योद्धयांना लस देण्यात आली.

- सन २०१८ मध्ये अर्भक मृत्यूदर १९ होता
- सन २०१८ मध्ये पाच वर्षाखालील अर्भक मृत्यूदर, नवजात शिशु मृत्यूदर व एकूण जनन दर हे अनुक्रमे २२, १३ व १.७ होते
- सन २०१६-१८ मध्ये माता मृत्यूप्रमाण ४६ होते

१.५३ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमधील ग्रामीण भाग व त्या तालुक्यांमधील क वर्ग नगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत शिक्षण, आरोग्य व उत्पन्न यांचा स्तर उंचविणाऱ्या योजना राबविण्यात येत आहेत. मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत सन २०२०-२१ साठी ₹ ३५९.२० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून नोव्हेंबर, २०२० अखेर ₹ ४५.६२ कोटी खर्च झाला.

* * * * *

# 2

# ±ÉÉEòºÉJªÉÉ







# २. लोकसंख्या

२.१ लोकसंख्येची गणना, त्याची रचना आणि इतर वैशिष्ट्यांशी संबंधित आकडेवारीसाठी जनगणना हा प्रमुख स्त्रोत आहे. जनगणनेद्वारे संकलित केलेले मानवी संसाधनाशी संबंधित बहुमोल निर्देशक संच हे भूतकाळाचे मूल्यमापन करणे, सद्य:स्थितीचे मूल्यांकन करणे व भविष्यासाठी माहितीपूर्ण निर्णय घेणे यासाठी अनुभवजन्य आधार आहेत. जनगणना ही केवळ शिरगणती नसून विशिष्ट काळातील देशातील सामाजिक - आर्थिक, लोकसंख्याशास्त्रीय आणि सांस्कृतिक रेखाचित्र यांचे प्रतिबिंब दर्शविते.

### जनगणना २०२१

२.२ कोविड-१९ महामारीमुळे केंद्र शासनाकडून जनगणना २०२१ चा पहिला टप्पा व दि.१ एप्रिल, २०२० पासून सुरु होणारे राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवहीचे अद्ययावतीकरणआणि इतर संबंधित क्षेत्रिय कामकाज पुढे ढकलण्यात आले आहे.

### जनगणना २०११

२.३ जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी होती व ती अखिल भारताच्या लोकसंख्येच्या ९.३ टक्के होती. महाराष्ट्र हे देशामध्ये उत्तरप्रदेश नंतर सर्वात जास्त लोकसंख्या असलेले दुसऱ्या क्रमांकाचे राज्य होते. राज्यातील लोकसंख्येची घनता ३६५ प्रति चौ.किमी होती. लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर राज्याकरिता १६.० टक्के तर अखिल भारताकरिता १७.७ टक्के होता. नागरी लोकसंख्येचे प्रमाण व साक्षरता या दोन्ही बाबींमध्ये अखिल भारतीय स्तरावर राज्य अनुक्रमे पाचव्या व सहाव्या स्थानावर होते. राज्यामध्ये कुटुंबाचा सरासरी आकार ४.६ असून तो राष्ट्रीय स्तरावर ४.९ होता. महाराष्ट्र आणि अखिल भारताच्या लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक तक्ता २.१ मध्ये दिले आहेत. महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या परिशिष्ट २.१ मध्ये दिली आहे तर जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या परिशिष्ट २.२ मध्ये दिली आहे आणि जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक परिशिष्ट २.३ मध्ये दिले आहेत.

२.३.१ राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, केंद्र शासन यांनी प्रकाशित केलेल्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार राज्याची दिनांक १ मार्च, २०२१ रोजीची प्रक्षेपित लोकसंख्या १२.४४ कोटी असेल.

### लोकसंख्या वृद्धीदर

२.४ स्वातंत्र्योत्तर काळात २००१-२०११ या कालावधीत राज्यातील लोकसंख्येच्या दशवार्षिक वृद्धीदरात लक्षणीय घट दिसून येते. हा दर २००१ मधील २२.७ टक्क्यांवरुन ६.७ टक्केवारी अंकांची लक्षणीय घट होऊन २०११ मध्ये १६.० टक्के झाला.

**आलेख २.१ : महाराष्ट्र व भारतातील लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर**




**आलेख २.२ : क्षेत्रनिहाय महाराष्ट्रातील लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर**



**तक्ता २.१ महाराष्ट्र आणि अखिल भारताच्या लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक**

| तपशील | | महाराष्ट्र | | अखिल -भारत | |
|---|---|---|---|---|---|
| | | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| **लोकसंख्या (कोटी)** | | | | | |
| एकूण | व्यक्ती | ९.६९ | ११.२४ | १०२.८७ | १२१.०९ |
| | पुरुष | ५.०४ | ५.८२ | ५३.२२ | ६२.३३ |
| | स्त्री | ४.६५ | ५.४१ | ४९.६५ | ५८.७६ |
| ग्रामीण | व्यक्ती | ५.५८ | ६.१५ | ७४.२५ | ८३.३८ |
| | पुरुष | २.८५ | ३.१५ | ३८.१६ | ४२.७८ |
| | स्त्री | २.७३ | ३.०० | ३६.०९ | ४०.६० |
| नागरी | व्यक्ती | ४.११ | ५.०८ | २८.६१ | ३७.७१ |
| | पुरुष | २.१९ | २.६७ | १५.०६ | १९.५५ |
| | स्त्री | १.९२ | २.४१ | १३.५६ | १८.१६ |
| अनुसूचित जाती | व्यक्ती | ०.९९ | १.३३ | १६.६६ | २०.१४ |
| | पुरुष | ०.५१ | ०.६८ | ८.६१ | १०.३५ |
| | स्त्री | ०.४८ | ०.६५ | ८.०५ | ९.७९ |
| अनुसूचित जमाती | व्यक्ती | ०.८६ | १.०५ | ८.४३ | १०.४५ |
| | पुरुष | ०.४४ | ०.५३ | ४.२६ | ५.२५ |
| | स्त्री | ०.४२ | ०.५२ | ४.१७ | ५.२० |
| लोकसंख्या (० ते ६ वर्षे वयोगट) | व्यक्ती | १.३७ | १.३३ | १६.३८ | १६.४५ |
| | पुरुष | ०.७१ | ०.७० | ८.५० | ८.५७ |
| | स्त्री | ०.६५ | ०.६३ | ७.८८ | ७.८८ |
| किशोरवयीन लोकसंख्या (१० ते १९ वर्षे वयोगट) | | २.०९ | २.१४ | २२.५१ | २५.३२ |
| युवा लोकसंख्या (१५ ते २४ वर्षे वयोगट) | | १.८४ | २.१७ | १९.०० | २३.२० |
| दशवार्षिक वृद्धीदर (टक्के) | | २२.७ | १६.० | २१.५ | १७.७ |
| स्त्री - पुरुष प्रमाण | | ९२२ | ९२९ | ९३३ | ९४३ |
| बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण (० ते ६ वर्षे वयोगट) | | ९१३ | ८९४ | ९२७ | ९१८ |
| साक्षरता दर ( वय ७ वर्षे व अधिक) (टक्के) | | ७६.९ | ८२.३ | ६४.८ | ७३.० |
| लोकसंख्येची घनता (प्रति चौ.किमी) | | ३१५ | ३६५ | ३२५ | ३८२ |
| नागरी लोकसंख्या (टक्के) | | ४२.४ | ४५.२ | २७.८ | ३१.१ |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

टीप : आकडे संक्षिप्तामध्ये दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

## प्रौढ साक्षरता दर

२.५ जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावर एकूण प्रौढ (वय १५ वर्षे व अधिक) साक्षरता दर ६९.३ टक्के, पुरुषांकरिता ७८.८ टक्के व स्त्रियांकरिता ५९.३ टक्के होता. जनगणना २०११ नुसार राज्याचा एकूण प्रौढ साक्षरता दर ८०.२ टक्के, पुरुषांकरिता ८७.४ टक्के व स्त्रियांकरिता ७२.६ टक्के होता.

## वयोगटानुसार लोकसंख्या

२.६ लोकसंख्येचा लाभांश लोकसंख्येच्या वय संरचनेतील बदलांमुळे होणारी अर्थव्यवस्थेतील वाढ सूचित करते. राज्यातील काम करणाऱ्या लोकसंख्येचा हिस्सा (१५ ते ५९ वर्षे वयोगट) २००१ मधील ५९.० टक्क्यांवरुन ४.१ टक्केवारी अंकांनी वाढून २०११ मध्ये ६३.१ टक्के झाला. काम करणारी लोकसंख्या (१५ते ५९ वर्षे वयोगट) ही काम न करणाऱ्या लोकसंख्येपेक्षा (वय १४ वर्षाखालील व वय ६० वर्षावरील) जास्त होती. महाराष्ट्र व अखिल भारताची निवडक वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी तक्ता २.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता २.२ महाराष्ट्र व अखिल भारताची निवडक वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी**

(टक्के)

| वयोगट (वर्षे) | महाराष्ट्र | | | अखिल - भारत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९९१ | २००१ | २०११ | १९९१ | २००१ | २०११ |
| ०-४ | १२.० | ९.८ | ८.३ | १२.२ | १०.७ | ९.३ |
| ५-९ | १२.३ | १०.६ | ८.७ | १३.३ | १२.५ | १०.५ |
| १०-१४ | ११.३ | ११.७ | ९.६ | ११.८ | १२.१ | ११.० |
| **०-१४** | **३५.६** | **३२.१** | **२६.६** | **३७.३** | **३५.४** | **३०.८** |
| **१५-५९** | **५७.०** | **५९.०** | **६३.१** | **५५.४** | **५६.९** | **६०.३** |
| **६० व अधिक** (वय न सांगितलेले अंतर्भूत) | **७.४** | **८.९** | **१०.३** | **७.३** | **७.७** | **८.९** |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

**आलेख २.३ : जनगणना २०११ नुसार निवडक राज्यांतील साक्षरता दर व प्रौढ साक्षरता दर**




**आलेख २.४ : महाराष्ट्रातील वयोगटानुसार लोकसंख्येची टक्केवारी**




## किशोरवयीन व युवा लोकसंख्या

२.७ जनगणना २०११ नुसार किशोरवयीन लोकसंख्या (१० ते १९ वर्षे वयोगट) राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या १९.० टक्के होती व अखिल भारतातील २०.९ टक्के होती. जनगणना २०११ नुसार अनुक्रमे राज्य व भारतातील युवा लोकसंख्या (१५ ते २४ वर्षे वयोगट) एकूण लोकसंख्येच्या १९.३ टक्के व १९.२ टक्के होती. जनगणना २०११ नुसार किशोरवयीन लोकसंख्येचे प्रमाण नंदुरबार जिल्ह्यात सर्वाधिक (२३ टक्के) व मुंबई शहरामध्ये ते सर्वात कमी (१६.१ टक्के) होते. युवा लोकसंख्येचे प्रमाण गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक (२०.५ टक्के) व सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी (१६.५ टक्के) होते. महाराष्ट्र व अखिल भारतातील किशोरवयीन लोकसंख्या व युवा लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक तक्ता २.३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.३ महाराष्ट्र व अखिल भारतातील किशोरवयीन लोकसंख्या व युवा लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक**

| निर्देशक | महाराष्ट्र | | अखिल - भारत | |
|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| **किशोरवयीन लोकसंख्या (१० ते १९ वर्षे वयोगट)** | | | | |
| लोकसंख्या (कोटी) | २.०९ | २.१४ | २२.५१ | २५.३२ |
| एकूण लोकसंख्येशी प्रमाण (टक्के) | २१.६ | १९.० | २१.९ | २०.९ |
| स्त्री-पुरुष प्रमाण | ८६५ | ८७८ | ८८२ | ८९८ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ९३.४ | ९५.२ | ८०.६ | ९०.० |
| **कामगारांचे प्रमाण** (टक्के) | | | | |
| किशोरवयीन मुख्य कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण | ५.८ | ४.७ | ६.४ | ४.३ |
| किशोरवयीन सीमांतीक कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण | २.८ | १.४ | ४.४ | ३.५ |
| **युवा लोकसंख्या (१५ ते २४ वर्षे वयोगट)** | | | | |
| लोकसंख्या (कोटी) | १.८४ | २.१७ | १९.०० | २३.२० |
| एकूण लोकसंख्येशी प्रमाण (टक्के) | १९.० | १९.३ | १८.५ | १९.२ |
| स्त्री-पुरुष प्रमाण | ८३५ | ८७९ | ८९५ | ९०८ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ८९.५ | ९३.७ | ७६.४ | ८६.१ |
| **कामगारांचे प्रमाण** (टक्के) | | | | |
| युवा मुख्य कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण | १४.९ | १४.० | १३.९ | ११.७ |
| युवा सीमांतीक कामगारांचे एकूण कामगारांशी प्रमाण | ४.३ | २.७ | ६.१ | ६.१ |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

## अनुसूचित जातींची  व अनुसूचित जमातींची लोकसंख्या

२.८ जनगणना २०११ नुसार राज्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ११.८ टक्के होती. एकूण अनुसूचित जातीच्या लोकसंख्येपैकी ५६.५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर ४३.५ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण अकोला जिल्ह्यामध्ये सर्वाधिक (२०.१ टक्के) होते व नंदुरबार जिल्ह्यात सर्वात कमी (२.९ टक्के) होते.

२.९ जनगणना २०११ नुसार राज्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के होती. एकुण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येपैकी ८५.७ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर १४.३ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण नंदूरबार जिल्ह्यात सर्वाधिक (६९.३ टक्के) व सांगली जिल्ह्यात सर्वात कमी (०.७ टक्के) होते. राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक तक्ता २.४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.४ राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे महत्वाचे निर्देशक**

| निर्देशक | २००१ | | २०११ | |
|---|---|---|---|---|
| | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| लोकसंख्या (कोटी) | ०.९९ | ०.८६ | १.३३ | १.०५ |
| एकूण लोकसंख्येशी प्रमाण (टक्के) | १०.२ | ८.९ | ११.८ | ९.४ |
| कुटुंबे  (लाख) | २०.६ | १७.१ | २९.० | २१.६ |
| स्त्री -पुरुष प्रमाण | ९५२ | ९७३ | ९६२ | ९७७ |
| बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण | ९३६ | ९६५ | ९२६ | ९५५ |
| **साक्षरता दर** (टक्के) | | | | |
| एकूण | ७१.९ | ५५.२ | ७९.७ | ६५.७ |
| पुरुष | ८३.३ | ६७.० | ८७.२ | ७४.३ |
| स्त्री | ६०.० | ४३.१ | ७१.९ | ५७.० |
| कार्य सहभाग दर (टक्के) | ४१.९ | ४९.७ | ४३.९ | ५०.६ |
| **एकूण कामगारांशी टक्केवारी** | | | | |
| मुख्य कामगार | ८१.९ | ७६.९ | ८७.४ | ८२.३ |
| सीमांतीक कामगार | १८.१ | २३.१ | १२.६ | १७.७ |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

## कार्य सहभाग दर

२.१० जनगणना २०११ नुसार राज्यातील ४.९४ कोटी व्यक्तींची आर्थिक कार्यात सक्रीय असल्याची नोंद झाली असून त्यापैकी ४.३८ कोटी मुख्यत: काम करणारे होते. राज्याचा कार्य सहभाग दर जनगणना २००१ मधील ४२.५ टक्क्यांवरुन जनगणना २०११ मध्ये ४४.० टक्क्यापर्यंत वाढला होता. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी काम करणाऱ्यांचे प्रमाण पुरुषांमध्ये ५६.० टक्के तर स्त्रियांमध्ये ३१.१ टक्के होते. गडचिरोली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण सर्वाधिक (५४.५ टक्के) तर मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये सर्वात कमी (३९.९ टक्के) होते. राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता २.५ मध्ये दिली आहे.

**आलेख २.५ : महाराष्ट्रातील कार्य सहभाग दर**




**तक्ता २.५ राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| कामगारांची वर्गवारी | २००१ | २०११ |
|---|---|---|
| शेतकरी | २८.७ | २५.४ |
| शेत मजूर | २६.३ | २७.३ |
| घरगुती उद्योगातील कामगार | २.६ | २.५ |
| इतर कामगार | ४२.४ | ४४.८ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

## दिव्यांग लोकसंख्या

२.११.१ जनगणना २०११ नुसार भारतातील दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण २.२ टक्के तर राज्यात २.६ टक्के होते. उत्तर प्रदेश (०.४२ कोटी) खालोखाल महाराष्ट्रात (०.३० कोटी) सर्वाधिक दिव्यांग व्यक्ती होत्या. राज्यात २० ते २९ वर्षे वयोगटामध्ये सर्वाधिक (१६.६ टक्के) दिव्यांग व्यक्ती होत्या. एकूण दिव्यांग लोकसंख्येपैकी ६७.६ टक्के व्यक्ती साक्षर होत्या. एकूण पुरुष दिव्यांग लोकसंख्येपैकी ७३.८ टक्के पुरुष साक्षर होते व एकूण स्त्री दिव्यांग लोकसंख्येपैकी ५९.४ टक्के स्त्रिया साक्षर होत्या.

२.११.२ जनगणना २०११ नुसार राज्यातील दिव्यांगांपैकी सर्वाधिक दिव्यांगता दृष्टीदोष (१९.४ टक्के) व त्या खालोखाल हालचाल दोष (१८.५ टक्के) या दिव्यांग प्रकारामधील होता. राज्यातील ५ ते १९ वर्षे वयोगटातील दिव्यांग लोकसंख्या एकूण दिव्यांग लोकसंख्येच्या २३.१ टक्के होती. राज्यातील ५ ते १९ वर्षे वयोगटातील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या दिव्यांगांचे प्रमाण ७०.३ टक्के आणि शैक्षणिक संस्थेत कधीही न गेलेल्या दिव्यांगांचे प्रमाण १७.१ टक्के इतके होते. जनगणना २०११ नुसार दिव्यांगतेच्या प्रकारानुसार राज्यातील दिव्यांग लोकसंख्येची टक्केवारी तक्ता २.६ मध्ये दिली आहे. जनगणना २०११ नुसार वयोगटानुसार दिव्यांगांचे राज्यातील प्रमाण तक्ता २.७ मध्ये दिले आहे. जनगणना २०११ नुसार राज्यातील ५ ते १९ वर्षे वयोगटातील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या किंवा शैक्षणिक संस्थेत कधीही न गेलेल्या दिव्यांगांचे प्रमाण तक्ता २.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता २.६ जनगणना २०११ नुसार दिव्यांगतेच्या प्रकारानुसार राज्यातील दिव्यांग लोकसंख्येची टक्केवारी**

(टक्के)

| दिव्यांगतेचा प्रकार | एकूण | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| दृष्टीदोष | १९.४ | १८.४ | २०.६ |
| कर्णदोष | १६.० | १५.७ | १६.४ |
| मूक / वाचा दोष | १६.० | १५.४ | १६.८ |
| हालचाल दोष | १८.५ | २१.१ | १५.० |
| मतिमंद | ५.४ | ५.४ | ५.५ |
| मनोरुग्ण | २.० | १.९ | २.० |
| इतर | १७.२ | १६.५ | १८.२ |
| बहूविध दिव्यांगता | ५.५ | ५.६ | ५.५ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार*: भारताचे महानिबंधक कार्यालय

**तक्ता २.७ जनगणना २०११ नुसार वयोगटानुसार दिव्यांगांचे राज्यातील प्रमाण**

(टक्के)

| वयोगट (वर्षे) | दिव्यांगतेचा प्रकार | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दृष्टीदोष | कर्णदोष | मूक / वाचा दोष | हालचाल दोष | मतिमंद | मनोरुग्ण | इतर | बहूविध दिव्यांगता |
| ०-४ | २२.७ | १७.४ | ४.० | ८.८ | ४.१ | ०.५ | ३७.५ | ५.० |
| ५-१९ | १९.५ | १५.४ | १६.३ | ११.९ | ९.९ | १.१ | १८.० | ७.९ |
| २०-२९ | १७.५ | १५.१ | १७.५ | १८.३ | ७.० | १.९ | १७.४ | ५.२ |
| ३०-३९ | १६.२ | १५.० | १८.८ | २०.९ | ५.० | २.९ | १७.१ | ४.० |
| ४०-६९ | १९.६ | १५.९ | १७.१ | २२.७ | २.८ | २.७ | १५.३ | ४.० |
| ७० व अधिक (वय न सांगितलेले अंतर्भूत) | २५.४ | २०.२ | १०.२ | २२.१ | १.३ | १.३ | ११.२ | ८.४ |
| **एकूण** | **१९.४** | **१६.०** | **१६.०** | **१८.५** | **५.४** | **२.०** | **१७.२** | **५.५** |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

**तक्ता २.८ जनगणना २०११ नुसार राज्यातील ५ ते १९ वर्षे वयोगटातील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या किंवा शैक्षणिक संस्थेत कधीही न गेलेल्या दिव्यांगांचे प्रमाण**

(टक्के)

| दिव्यांगतेचा प्रकार | शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या दिव्यांगांचे प्रमाण | | | शैक्षणिक संस्थेत कधीच न गेलेल्या दिव्यांगांचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली |
| दृष्टीदोष | ७६.२ | ७७.० | ७५.२ | ११.७ | ११.० | १२.५ |
| कर्णदोष | ७४.० | ७४.६ | ७३.२ | १३.० | १२.५ | १३.६ |
| मूक / वाचा दोष | ७१.९ | ७२.७ | ७०.९ | १४.५ | १४.१ | १५.१ |
| हालचाल दोष | ६९.२ | ७०.७ | ६६.६ | १४.८ | १३.७ | १६.८ |
| मतिमंद | ५५.९ | ५८.४ | ५२.४ | ३३.२ | ३१.५ | ३५.६ |
| मनोरुग्ण | ४८.२ | ५०.३ | ४५.४ | ३२.० | २९.९ | ३४.७ |
| इतर | ७७.९ | ७८.४ | ७७.२ | १०.७ | १०.४ | ११.० |
| बहूविध दिव्यांगता | ५०.८ | ५२.० | ४९.१ | ४०.२ | ३९.५ | ४१.२ |
| **एकूण** | **७०.३** | **७१.१** | **६९.३** | **१७.१** | **१६.६** | **१७.८** |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

## कुटुंबे व कुटुंबांसाठी सुविधा

२.१२ जनगणना २०११ नुसार राज्यामध्ये कुटुंबांची (संस्थांत्मक कुटुंबे वगळून) संख्या २.३८ कोटी होती तर हीच संख्या भारतात २४.६७ कोटी होती. जनगणना २०११ नुसार महाराष्ट्र व अखिल भारतातील कुटुंबांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा तक्ता २.९ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता २.९ जनगणना २०११ नुसार महाराष्ट्र व अखिल भारतातील कुटुंबांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा $**

(टक्के)

| तपशील | महाराष्ट्र | अखिल- भारत |
|---|---|---|
| **स्थानानिहाय पाण्याच्या स्त्रोतानुसार पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असलेली कुटुंबे** | | |
| परिसरात | ५९.४ | ४६.६ |
| परीसराबाहेर | ४०.६ | ५३.४ |
| **प्रकाश योजनेच्या स्त्रोतानुसार कुटुंबे** | | |
| वीज | ८३.९ | ६७.३ |
| प्रकाश योजना नसलेली | ०.९ | ०.५ |
| घराच्या परिसरात शौचालय सुविधा उपलब्ध असलेली कुटुंबे | ५३.१ | ४६.९ |
| घराच्या परिसरात शौचालय सुविधा उपलब्ध नसलेली कुटुंबे | ४६.९ | ५३.१ |
| घराच्या परिसरात आंघोळीची सुविधा उपलब्ध असलेली कुटुंबे | ८५.४ | ५८.४ |
| बँकिंग सेवांचा लाभ घेणारी कुटुंबे | ६८.९ | ५८.७ |

*आधार* : भारताचे महानिबंधक कार्यालय

$ संस्थांत्मक कुटुंबे वगळून

## झोपडपट्टयांतील लोकसंख्या

२.१३ जनगणना २०११ नुसार भारतातील झोपडपट्टयांतील लोकसंख्या ६.५५ कोटी होती. झोपडपट्टयांमधील लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक (१८.१ टक्के) होते, त्याखालोखाल आंध्र प्रदेश (१५.६ टक्के), पश्चिम बंगाल (९.८ टक्के), उत्तर प्रदेश (९.५ टक्के), तामिळनाडू (८.९ टक्के), मध्य प्रदेश (८.७ टक्के) आणि कर्नाटक (५.० टक्के) ही राज्ये होती.

## दशलक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमधील झोपडपट्टयांतील लोकसंख्या

२.१४ जनगणना २०११ नुसार दशलक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली देशात ५३ शहरे होती. देशातील एकूण झोपडपट्टयांतील लोकसंख्येपैकी ३८.३ टक्के लोकसंख्या या शहरांमध्ये वास्तव्यास होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये झोपडपट्टयांमधील सर्वाधिक लोकसंख्या होती आणि देशातील एकूण झोपडपट्टयांमधील लोकसंख्येच्या ७.९ टक्के होती, त्याखालोखाल हैद्राबाद ३.५ टक्के, दिल्ली २.५ टक्के, कोलकाता २.१ टक्के, चेन्नई २.० टक्के व नागपूर १.३ टक्के यानुसार झोपडपट्टयांमधील लोकसंख्या होती.

## नागरी भागातील व झोपडपट्टयांमधील कुटुंबांसाठीच्या सुविधा

२.१५ जनगणना २०११ नुसार राज्यात १.०८ कोटी आणि भारतात ७.८९ कोटी नागरी कुटुंबे होती. राज्यात ०.२४ कोटी आणि भारतात १.३७ कोटी झोपडपट्टयांमधील कुटुंबे होती. जनगणना २०११ नुसार महाराष्ट्र व अखिल भारतातील नागरी भागातील व झोपडपट्टयांमधील कुटुंबांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा तक्ता २.१० मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता २.१० जनगणना २०११ नुसार महाराष्ट्र व अखिल भारतातील नागरी भागातील व झोपडपट्टयांमधील कुटुंबांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा $**

(टक्के)

| तपशील | महाराष्ट्र | | अखिल- भारत | |
|---|---|---|---|---|
| | नागरी | झोपडपट्टी | नागरी | झोपडपट्टी |
| **स्थानानिहाय पाण्याच्या स्त्रोतानुसार पिण्याच्या पाण्याची उपलब्धता असलेली कुटुंबे** | | | | |
| परिसरात | ७९.३ | ६४.६ | ७१.२ | ५६.७ |
| परीसराबाहेर | २०.७ | ३५.४ | २८.८ | ४३.३ |
| **प्रकाश योजनेच्या स्त्रोतानुसार कुटुंबे** | | | | |
| वीज | ९६.२ | ९३.८ | ९२.७ | ९०.५ |
| प्रकाश योजना नसलेली | ०.४ | ०.६ | ०.३ | ०.५ |
| घराच्या परिसरात शौचालय सुविधा उपलब्ध असलेली कुटुंबे | ७१.३ | ४१.६ | ८१.४ | ६६.० |
| घराच्या परिसरात शौचालय सुविधा उपलब्ध नसलेली कुटुंबे | २८.७ | ५८.४ | १८.६ | ३४.० |
| घराच्या परिसरात आंघोळीची सुविधा उपलब्ध असलेली कुटुंबे | ९५.४ | ९१.४ | ८७.० | ८१.० |
| बॅंकिंग सेवांचा लाभ घेणारी कुटुंबे | ७६.० | ६४.४ | ६७.८ | ५३.२ |

*आधार :* भारताचे महानिबंधक कार्यालय

$ संस्थात्मक कुटुंबे वगळून

## स्थलांतर

२.१६ जनगणनेमध्ये स्थलांतर जन्माच्या ठिकाणानुसार स्थलांतर व मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतर अशा दोन प्रकारच्या स्थितीनुसार गणले जाते. एखाद्या व्यक्तीची गणना त्याच्या /तिच्या जन्म ठिकाणापेक्षा म्हणजेच जन्म गांव किंवा शहर यापेक्षा वेगळया जागी होते तेव्हा त्या व्यक्तीस जन्माच्या ठिकाणानुसार स्थलांतरित मानले जाते. एखाद्या व्यक्तीची गणना त्याच्या / तिच्या मागील वास्तव्याच्या ठिकाणापेक्षा वेगळ्या ठिकाणी होते तेव्हा त्या व्यक्तीस मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतरित मानले जाते. जनगणनेत स्थलांतराबाबतच्या कारणांची सुध्दा नोंद घेण्यात येते. कामकाज/रोजगार, व्यवसाय, शिक्षण, विवाह, जन्मानंतर स्थान बदल, कुटुंबासमवेत स्थान बदल आणि इतर याप्रमाणे मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार स्थलांतराबाबतच्या कारणांचे वर्गीकरण करण्यात आले होते. जनगणना २०११ नुसार मागील वास्तव्याच्या ठिकाणानुसार राज्यात ५.७४ कोटी व्यक्ती स्थलांतरीत असल्याचे दिसुन आले. एकूण स्थलांतरित व्यक्तींमध्ये पुरुषांचे प्रमाण ४२.२ टक्के, तर स्त्रियांचे प्रमाण ५७.८ टक्के होते. सामान्यत: जन्माचे ठिकाण व वास्तव्याच्या ठिकाणाच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या दर्जाशी संबंधित स्थलांतराचे वेगवेगळे प्रवाह असतात. राज्यात एकूण स्थलांतरीतांपैकी (वर्गीकरण करता न येणारे वगळून) ३७.४ टक्के व्यक्तींनी ग्रामीण भागातून ग्रामीण भागात, ७.५ टक्के व्यक्तींनी नागरी भागातून ग्रामीण भागात स्थलांतर केले तर २२.६ टक्के व्यक्तींनी ग्रामीण भागातून नागरी भागात व २२.२ टक्के व्यक्तींनी नागरी भागातून नागरी भागात स्थलांतर केले आहे. स्थलांतरामध्ये विवाहपश्चात वास्तव्याच्या ठिकाणात झालेल्या बदलामुळे स्त्रियांच्या स्थलांतराचे प्रमाण लक्षणीय आहे. विवाह, जन्मानंतर स्थान बदल, कुटुंबासमवेत स्थान बदल ही स्थलांतरांची कारणे वगळून स्थलांतराच्या प्रमुख कारणांमध्ये कामकाज/रोजगार याकरिता स्थलांतराचे प्रमाण ३७.१ टक्के, शिक्षणाकरिता ३.६ टक्के, व्यवसायाकरिता १.८ टक्के, तर इतर कारणांकरिता स्थलांतराचे प्रमाण ५७.५ टक्के होते.

* * * * *

## परिशिष्ट २.१

## महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | दशवार्षिक वृध्दीदर (टक्के) | | साक्षरतेची टक्केवारी ££ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १९६१ | ३.९६ | ४३.९२ | २३.६ | २१.६ | ३५.१ | २८.३ |
| १९७१ | ५.०४ | ५४.८२ | २७.५ | २४.८ | ४५.८ | ३४.५ |
| १९८१ | ६.२८ | ६८.५२@ | २४.५ | २५.० | ५५.८ | ४३.६§ |
| १९९१ | ७.८९ | ८४.६३£ | २५.७ | २३.९£ | ६४.९ | ५२.२@@ |
| २००१ | ९.६९ | १०२.८७ | २२.७ | २१.५ | ७६.९ | ६४.८ |
| २०११ | ११.२४ | १२१.०९ | १६.० | १७.७ | ८२.३ | ७३.० |

*आधार* - भारताचे महानिबंधक कार्यालय

@ आसामची प्रक्षेपित लोकसंख्या धरुन

£ जम्मू व काश्मीरची प्रक्षेपित लोकसंख्या धरुन

££ १९६१ व १९७१ ची साक्षरतेची टक्केवारी ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्येसाठी आहे. १९८१, १९९१, २००१ व २०११ ची साक्षरतेची टक्केवारी ७ वर्षे व अधिक लोकसंख्येसाठी आहे.

§ साक्षरतेची टक्केवारी आसाम वगळून

@@ साक्षरतेची टक्केवारी जम्मू व काश्मीर वगळून

## परिशिष्ट २.२

## जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | | | | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | स्त्री-पुरुष प्रमाण | | | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.किमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | पुरुष | स्त्रिया | | ग्रामीण | नागरी | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | २.८४ | १.१२ | ३.९६ | २.०४ | १.९१ | २८.२ | ९९५ | ८०१ | ९३६ | १२९ |
| १९७१ | ३.४७ | १.५७ | ५.०४ | २.६१ | २.४३ | ३१.२ | ९८५ | ८२० | ९३० | १६४ |
| १९८१ | ४.०८ | २.२० | ६.२८ | ३.२४ | ३.०४ | ३५.० | ९८७ | ८५० | ९३७ | २०४ |
| १९९१ | ४.८४ | ३.०५ | ७.८९ | ४.०८ | ३.८१ | ३८.७ | ९७२ | ८७५ | ९३४ | २५७ |
| २००१ | ५.५८ | ४.११ | ९.६९ | ५.०४ | ४.६५ | ४२.४ | ९६० | ८७३ | ९२२ | ३१५ |
| २०११ | ६.१६ | ५.०८ | ११.२४ | ५.८२ | ५.४१ | ४५.२ | ९५२ | ९०३ | ९२९ | ३६५ |

*आधार* - भारताचे महानिबंधक कार्यालय

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट २.३

## जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक

| अनु. क्र. | जिल्हा | लोकसंख्या ('०००) | | | दशवार्षिक वृध्दी दर (टक्के) (२००१-२०११) | साक्षरता दर (टक्के) | | | स्त्री - पुरुष प्रमाण | बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण (० -६ वर्षे वयोगट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | पुरुष | स्त्री | एकूण | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मुंबई शहर | १,६८५ | १,४०१ | ३,०८५ | (-) ७.६ | ९१.५ | ८६.५ | ८९.२ | ८३२ | ९१४ |
| २ | मुंबई उपनगर | ५,०३१ | ४,३२६ | ९,३५७ | ८.३ | ९२.९ | ८६.४ | ८९.९ | ८६० | ९१३ |
| ३ | ठाणे # | ५,८६५ | ५,१९५ | ११,०६० | ३६.० | ८८.७ | ७९.८ | ८४.५ | ८८६ | ९२४ |
| ४ | रायगड | १,३४४ | १,२९० | २,६३४ | १९.३ | ८९.१ | ७६.९ | ८३.१ | ९५९ | ९३५ |
| ५ | रत्नागिरी | ७६१ | ८५४ | १,६१५ | (-) ४.८ | ९०.९ | ७४.५ | ८२.२ | १,१२२ | ९३६ |
| ६ | सिंधुदुर्ग | ४१७ | ४३२ | ८५० | (-) २.२ | ९१.६ | ७९.८ | ८५.६ | १,०३६ | ९२२ |
| **कोकण विभाग** | | **१५,१०४** | **१३,४९८** | **२८,६०१** | **१४.९** | **९०.७** | **८२.०** | **८६.६** | **८९४** | **९२१** |
| ७ | नाशिक | ३,१५७ | २,९५० | ६,१०७ | २२.३ | ८८.२ | ७६.१ | ८२.३ | ९३४ | ८९० |
| ८ | धुळे | १,०५४ | ९९७ | २,०५१ | २०.१ | ७९.५ | ६५.८ | ७२.८ | ९४६ | ८९८ |
| ९ | नंदुरबार | ८३३ | ८१५ | १,६४८ | २५.७ | ७२.२ | ५६.५ | ६४.४ | ९७८ | ९४४ |
| १० | जळगाव | २,१९७ | २,०३३ | ४,२३० | १४.९ | ८५.४ | ७०.६ | ७८.२ | ९२५ | ८४२ |
| ११ | अहमदनगर | २,३४३ | २,२०० | ४,५४३ | १२.४ | ८६.८ | ७०.९ | ७९.१ | ९३९ | ८५२ |
| **नाशिक विभाग** | | **९,५८५** | **८,९९५** | **१८,५७९** | **१८.१** | **८४.९** | **७०.७** | **७८.०** | **९३८** | **८७६** |
| १२ | पुणे | ४,९२४ | ४,५०५ | ९,४२९ | ३०.४ | ९०.८ | ८१.१ | ८६.२ | ९१५ | ८८३ |
| १३ | सातारा | १,५११ | १,४९३ | ३,००४ | ६.९ | ८९.४ | ७६.३ | ८२.९ | ९८८ | ८९५ |
| १४ | सांगली | १,४३६ | १,३८६ | २,८२२ | ९.२ | ८८.२ | ७४.६ | ८१.५ | ९६६ | ८६७ |
| १५ | सोलापूर | २,२२८ | २,०९० | ४,३१८ | १२.२ | ८५.० | ६८.५ | ७७.० | ९३८ | ८८३ |
| १६ | कोल्हापूर | १,९८१ | १,८९५ | ३,८७६ | १०.० | ८८.६ | ७४.२ | ८१.५ | ९५७ | ८६३ |
| **पुणे विभाग** | | **१२,०७९** | **११,३७०** | **२३,४४९** | **१७.३** | **८८.९** | **७६.२** | **८२.७** | **९४१** | **८८०** |
| १७ | औरंगाबाद | १,९२४ | १,७७७ | ३,७०१ | २७.८ | ८७.४ | ७०.१ | ७९.० | ९२३ | ८५८ |
| १८ | जालना | १,०११ | ९४८ | १,९५९ | २१.५ | ८१.५ | ६१.० | ७१.५ | ९३७ | ८७० |
| १९ | परभणी | ९४३ | ८९३ | १,८३६ | २०.२ | ८२.६ | ६३.६ | ७३.३ | ९४७ | ८८४ |
| २० | हिंगोली | ६०६ | ५७१ | १,१७७ | १९.३ | ८६.९ | ६९.० | ७८.२ | ९४२ | ८८२ |
| २१ | बीड | १,३४९ | १,२३६ | २,५८५ | १९.६ | ८५.६ | ६७.८ | ७७.० | ९१६ | ८०७ |
| २२ | नांदेड | १,७३० | १,६३१ | ३,३६१ | १६.९ | ८४.३ | ६६.१ | ७५.५ | ९४३ | ९१० |
| २३ | उस्मानाबाद | ८६२ | ७९६ | १,६५८ | ११.५ | ८५.८ | ७०.५ | ७८.४ | ९२४ | ८६७ |
| २४ | लातूर | १,२७३ | १,१८१ | २,४५४ | १८.० | ८४.४ | ६९.६ | ७७.३ | ९२८ | ८८९ |
| **औरंगाबाद विभाग** | | **९,६९९** | **९,०३३** | **१८,७३२** | **१९.९** | **८४.९** | **६७.४** | **७६.४** | **९३१** | **८७०** |
| २५ | बुलढाणा | १,३३८ | १,२४९ | २,५८६ | १५.८ | ९०.५ | ७५.८ | ८३.४ | ९३४ | ८५५ |
| २६ | अकोला | ९३२ | ८८२ | १,८१४ | ११.३ | ९२.३ | ८३.५ | ८८.० | ९४६ | ९१२ |
| २७ | वाशिम | ६२० | ५७७ | १,१९७ | १७.३ | ९०.५ | ७५.५ | ८३.२ | ९३० | ८६३ |
| २८ | अमरावती | १,४८१ | १,४०८ | २,८८८ | १०.८ | ९१.५ | ८३.१ | ८७.४ | ९५१ | ९३५ |
| २९ | यवतमाळ | १,४२० | १,३५२ | २,७७२ | १२.८ | ८९.४ | ७५.९ | ८२.८ | ९५२ | ९२२ |
| **अमरावती विभाग** | | **५,७९१** | **५,४६७** | **११,२५८** | **१३.२** | **९०.८** | **७९.०** | **८५.०** | **९४४** | **९००** |
| ३० | वर्धा | ६६८ | ६३२ | १,३०१ | ५.२ | ९१.९ | ८१.८ | ८७.० | ९४६ | ९१९ |
| ३१ | नागपूर | २,३८५ | २,२६९ | ४,६५४ | १४.४ | ९२.१ | ८४.५ | ८८.४ | ९५१ | ९३१ |
| ३२ | भंडारा | ६०६ | ५९५ | १,२०० | ५.६ | ९०.४ | ७७.१ | ८३.८ | ९८२ | ९५० |
| ३३ | गोंदिया | ६६२ | ६६१ | १,३२३ | १०.१ | ९२.० | ७७.९ | ८५.० | ९९९ | ९५६ |
| ३४ | चंद्रपूर | १,१२४ | १,०८० | २,२०४ | ६.४ | ८६.८ | ७३.० | ८०.० | ९६१ | ९५३ |
| ३५ | गडचिरोली | ५४१ | ५३२ | १,०७३ | १०.६ | ८२.३ | ६६.३ | ७४.४ | ९८२ | ९६१ |
| **नागपूर विभाग** | | **५,९८६** | **५,७६९** | **११,७५४** | **१०.०** | **९०.०** | **७८.९** | **८४.५** | **९६४** | **९४१** |
| **महाराष्ट्र राज्य** | | **५८,२४३** | **५४,१३१** | **१,१२,३७४** | **१६.०** | **८८.४** | **७५.९** | **८२.३** | **९२९** | **८९४** |

*आधार* - भारताचे महानिबंधक कार्यालय

\# अविभाजित ठाणे जिल्हा

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# 3

# ®ÉVªÉ =i{ÉzÉ



# ३. राज्य उत्पन्न

३.१ स्थूल देशांतर्गत उत्पादनाद्वारे अर्थव्यवस्थेच्या आकारमानाचे मापन करण्यात येते व त्याचा वृद्धिदर हा आर्थिक विकास व प्रगतीचा एक महत्वपूर्ण निर्देशक आहे. शासनास धोरणं ठरविण्यासाठी हा निर्देशक उपयोगी ठरतो त्याचबरोबर गुंतवणुकदारांना गुंतवणूकीबाबत अधिक चांगला निर्णय घेण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ महामारीचे जगापुढे व बहुतांश देशांपुढे फार मोठे आर्थिक आव्हान उभे ठाकले.

३.२ चालू पायाभूत वर्ष २०११-१२ मालिकेच्या कार्यपद्धतीनुसार क्षेत्रनिहाय अंदाज मूळ किंमतीवर आधारित स्थूल राज्य मूल्यवृद्धिच्या स्वरुपात तर देशांतर्गत स्थूल उत्पादन बाजार किमंतीवर आधारित आहे. त्याचप्रमाणे राज्यासाठी क्षेत्रनिहाय अंदाज मूळ किंमतींवर आधारित स्थूल राज्य मूल्यवृद्धिच्या स्वरुपात व स्थूल राज्य उत्पन्नाचे अंदाज बाजार किंमतींवर आधारित आहेत. चालू वर्षाच्या किंमतींवर आधारित अंदाजांना 'सांकेतिक' ('नॉमिनल') अंदाज तर पायाभूत वर्षातील किंमतींवर आधारित अंदाजांना 'वास्तविक' ('रियल') अंदाज असे संबोधण्यात येत आहे.

## राज्य अर्थव्यवस्था

### स्थूल राज्य उत्पन्न पुर्वानुमान (सन २०२०-२१)

३.३ पुर्वानुमानानुसार सन २०२०-२१ च्या वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नात सन २०१९-२० च्या तुलनेत (-)८.० टक्के वाढ अपेक्षित असून ते ₹ १९,६२,५३९ कोटी अंदाजित आहे.

३.३.१ सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत (-)५.६ टक्के अपेक्षित वाढीसह ₹ २६,६१,६२९ कोटी अंदाजित आहे. वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि, वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे पुर्वानुमानानुसार सन २०२०-२१ चे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ३.१ वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि, वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे पुर्वानुमानानुसार सन २०२०-२१ चे वार्षिक वृद्धिदर**

(टक्के)

| क्षेत्र | वृद्धिदर |
|---|---|
| i) कृषि व संलग्न कार्ये (कृषि#, वने व मत्स्यव्यवसाय) | ११.७ |
| ii) खाण व दगड खाणकाम | (-)१२.१ |
| iii) वस्तुनिर्माण | (-)११.८ |
| iv) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | ३.३ |
| v) बांधकाम | (-)१४.६ |
| vi) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा | (-)२०.४ |
| vii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | (-)४.९ |
| viii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | (-)५.० |
| **स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **(-)७.८** |
| **स्थूल राज्य उत्पन्न** | **(-)८.०** |
| **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न** | **(-)८.९** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

# पीक व पशुसंवर्धन समाविष्ट

३.३.२ राज्याचे सन २०२०-२१ करीताचे पुर्वानुमान अंदाज कोविड-१९ महामारीच्या असाधारण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विचारात घेणे आवश्यक आहे. संपूर्ण लॉकडाऊन व त्यानंतर टप्प्या टप्प्याने उठविण्यात आलेले निर्बंध याचा परिणाम आर्थिक कार्यांवर तसेच आकडेवारीच्या उपलब्धतेवर झाला आहे. आकडेवारीची अनुपलब्धता किंवा उपलब्ध आकडेवारीतील चढ उतार यामुळे प्रक्षेपणाच्या पद्धतीत अनुषंगिक सुधारणा कराव्या लागल्या. महामारीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांच्या परिणामी सन २०२०-२१ चे प्रथम सुधारित अंदाज प्रकाशित करताना सदर अंदाजांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल संभवतात.

३.३.३ अर्थव्यवस्थेच्या तीन प्रमुख क्षेत्रांपैकी 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्र हे स्थूल राज्य मूल्यवृद्धित सन २०२०-२१ मध्ये सकारात्मक वाढ करणारे एकमेव क्षेत्र असून शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनांमुळे त्यावर कोविड-१९ महामारीचा सर्वात कमी परिणाम झाला. एकंदरीत चांगल्या मान्सूनमुळे (सरासरीच्या ११३.४ टक्के) 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नात ११.७ टक्के

वाढ अपेक्षित आहे. अंदाजित पीक उत्पादनातील एकंदरीत वाढीमुळे 'पीक' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित १६.२ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'पशुसंवर्धन', 'वने व लाकूड तोडणी' आणि 'मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती' या क्षेत्रांत अनुक्रमे ४.४ टक्के, ५.७ टक्के व २.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वस्तुनिर्माण' व 'बांधकाम' क्षेत्रांवर कोविड-१९ महामारीचा मोठा आघात झाला असल्याने त्यात अनुक्रमे (-)११.८ टक्के व (-) १४.६ टक्के वाढ अपेक्षित आहे, परिणामी 'उद्योग' क्षेत्रात(-)११.३ टक्के वाढ अपेक्षित आहे. कोविड-१९ महामारीचा प्रामुख्याने व्यापार, दुरुस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे आणि वाहतुक या क्षेत्रांवर देखिल मोठा परिणाम झाला असून त्यामुळे 'सेवा' क्षेत्रात (-)९.० टक्के वाढ अपेक्षित आहे.

## स्थूल राज्य उत्पन्न (सन २०१९-२०)

३.४ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार सन २०१९-२० चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न सन २०१८-१९ च्या तुलनेत ५.० टक्के अपेक्षित वाढीसह ₹ २१,३४,०६५ कोटी अंदाजित आहे.

३.४.१ सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २८,१८,५५५ कोटी अंदाजित असून ते मागील वर्षाच्या तुलनेत ९.३ टक्क्यांनी जास्त आहे. वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न, क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व दरडोई वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ३.२ वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न, क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व वास्तविक दरडोई स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

(टक्के)

| तपशील | वृद्धिदर | | | | | | | | सरासरी वृद्धिदर (२०१२-१३ ते २०१९-२०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+++ | २०१८-१९++ | २०१९-२०+ | |
| **स्थूल राज्य उत्पन्न** | **६.१** | **६.९** | **६.३** | **७.२** | **९.२** | **६.०** | **६.२** | **५.०** | **६.६** |
| **स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **६.०** | **६.८** | **६.२** | **६.७** | **८.९** | **५.६** | **५.७** | **५.२** | **६.४** |
| **कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र** | **(-)०.४** | **१२.३** | **(-)१०.७** | **(-)३.७** | **२१.०** | **(-)०.७** | **(-)०.९** | **६.१** | **२.९** |
| i) पीक | (-)१.८ | १८.६ | (-)१६.७ | (-)७.५ | २५.० | (-)५.१ | (-)५.१ | ८.४ | २.० |
| ii) पशुसंवर्धन | ३.८ | १.१ | ४.० | ४.८ | ११.५ | ८.५ | ६.० | ४.१ | ५.५ |
| iii) वने व लाकूड तोडणी | ०.८ | (-)३.३ | २.८ | ३.४ | १८.० | ९.३ | ८.८ | (-)०.८ | ४.९ |
| iv) मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ०.९ | २.० | ७.० | (-)४.२ | २१.२ | (-)११.५ | (-)१०.६ | ७.८ | १.६ |
| **उद्योग क्षेत्र** | **५.१** | **३.१** | **८.०** | **८.८** | **५.९** | **७.२** | **५.२** | **०.२** | **५.४** |
| i) खाण व दगड खाणकाम | ४.२ | (-)२५.४ | २३.६ | १०.८ | ३.१ | ७.१ | ७.० | २.० | ४.१ |
| ii) वस्तुनिर्माण | ८.२ | १०.० | ५.१ | १०.८ | ६.८ | ८.२ | ५.५ | (-)१.० | ६.७ |
| iii) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | ५.१ | (-)४.४ | १४.७ | ४.८ | ३.१ | १०.७ | ७.९ | ५.७ | ६.० |
| iv) बांधकाम | (-)३.८ | ३.८ | ७.९ | १.९ | ५.४ | २.० | १.६ | १.७ | २.६ |
| **सेवा क्षेत्र** | **८.३** | **८.१** | **९.१** | **७.४** | **८.७** | **५.८** | **७.२** | **८.३** | **७.९** |
| i) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा | ९.६ | १.३ | ६.१ | ५.५ | ९.५ | ७.१ | ७.४ | ७.१ | ६.७ |
| ii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ८.३ | १२.२ | १०.८ | ८.१ | ८.० | ४.५ | ७.३ | ७.३ | ८.३ |
| iii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ६.३ | ७.३ | ८.६ | ८.२ | १०.० | ७.८ | ६.८ | १३.१ | ८.५ |
| **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न** | **४.९** | **५.७** | **५.२** | **६.०** | **८.१** | **४.९** | **५.२** | **४.०** | **५.५** |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

टीप : क्षेत्रनिहाय वृद्धिदर स्थूल राज्य मूल्यवृद्धिवर आधारित असून राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर स्थूल राज्य उत्पन्नावर आधारित आहे

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

३.४.२ क्षेत्रनिहाय उपलब्ध माहितीचा वापर करुन सन २०१९-२० चे पहिले सुधारित अंदाज परिगणित करण्यात आले आहेत. सन २०१९-२० च्या आकडेवारीच्या उपलब्धतेवर कोविड-१९ महामारीच्या झालेल्या परिणामांमुळे हे अंदाज पुढे सुधारित करताना लक्षणीय बदल संभवतात.

३.४.३ सन २०१९-२० मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ६.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०१९-२० मध्ये मागील वर्षांच्या तुलनेत झालेल्या चांगल्या पावसामुळे (सरासरीच्या ११२.६ टक्के) अन्नधान्य व तेलबिया यांच्या उत्पादनात अनुक्रमे २२.९ टक्के व ६.० टक्के वाढ अपेक्षित आहे. कापसाच्या उत्पादनात अल्पशी वाढ तर ऊसाच्या उत्पादनात २२.८ टक्के घट अपेक्षित आहे. फळे व भाजीपाल्याच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे १२.५ टक्के व ४२.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. परिणामी 'पीक' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ८.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'पशुसंवर्धन' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित दुग्ध उत्पादनातील व अंडी आणि पोल्ट्री मांस उत्पादनातील वाढीमुळे मागील वर्षीच्या तुलनेत ४.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. मागील वर्षीच्या तुलनेत गौण वनोत्पादनात घट झाल्यामुळे 'वने व लाकूड तोडणी' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित (-)०.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. गोड्या पाण्यातील मत्स्यउत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाल्यामुळे 'मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ७.८ टक्के वाढ अपेक्षित आहे.

३.४.४ 'उद्योग' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित सन २०१९-२० मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ०.२ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वस्तुनिर्माण' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित (-)१.० टक्के वाढ अपेक्षित आहे तर 'वीज, वायू, पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा' आणि 'बांधकाम' या क्षेत्रांच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित अनुक्रमे ५.७ टक्के व १.७ टक्के वाढ अपेक्षित आहे.

३.४.५ 'सेवा' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित मागील वर्षाच्या तुलनेत ८.३ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे' या क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ६.२ टक्के तर 'वाहतूक, साठवण, दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा' या क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ८.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा', 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' आणि 'इतर सेवा' या क्षेत्रात अनुक्रमे ७.३ टक्के, १८.४ टक्के व ११.० टक्के वाढ अपेक्षित आहे.

## चालू मालिकेतील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा व सरासरी वार्षिक वृद्धि

३.५ सन २०११-१२ ते २०१९-२० मध्ये अखिल भारताच्या सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात (पायाभूत वर्ष २०११-१२) राज्याचे योगदान सरासरी १४.२ टक्के असून देशात सर्वाधिक आहे. राज्याच्या सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धिमध्ये 'सेवा' क्षेत्राचा (५५.७ टक्के) सर्वाधिक सरासरी हिस्सा असून त्याखालोखाल 'उद्योग' (३२.६ टक्के) आणि 'कृषि व संलग्न कार्ये' (११.७ टक्के) या क्षेत्रांचा हिस्सा आहे.

**आलेख ३.१ : स्थूल राज्य मूल्यवृद्धि/स्थूल देशांतर्गत मूल्यवृद्धितील क्षेत्रनिहाय हिस्सा**




३.६ सन २०१२-१३ ते २०१९-२० मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्र, 'उद्योग' क्षेत्र आणि 'सेवा' क्षेत्राच्या स्थूल राज्य मूल्यवृद्धितील (पायाभूत वर्ष २०११-१२) सरासरी वार्षिक वृद्धिदर अनुक्रमे २.९ टक्के, ५.४ टक्के व ७.९ टक्के आहे. क्षेत्रनिहाय सरासरी वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.२ मध्ये दिले आहेत.

## राज्य उत्पन्न (२०१९-२०)

३.७ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार सन २०१९-२० मधील सांकेतिक राज्य उत्पन्न म्हणजे ‘चालू किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न’ ₹ २४,८२,५३६ कोटी आहे व ते सन २०१८-१९ मधील ₹ २२,७६,७९३ कोटी उत्पन्नात ९.० टक्के वाढ दर्शविते. वास्तविक राज्य उत्पन्न म्हणजे ‘स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार निव्वळ राज्य उत्पन्न’ सन २०१९-२० मध्ये ₹ १८,७३,८०१ कोटी अपेक्षित असून ते मागील वर्षाच्या तुलनेत ४.७ टक्क्यांनी जास्त आहे. स्थूल व निव्वळ राज्य उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.१ ते परिशिष्ट ३.४ मध्ये दिला आहे.

३.७.१ चालू किंमतींनुसार सन २०१९-२० चे अंदाजित दरडोई राज्य उत्पन्न (म्हणजेच दरडोई सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न) ₹ २,०२,१३० असून सन २०१८-१९ मध्ये ते ₹ १,८७,११८ होते.

## जिल्हानिहाय स्थूल मूल्यवृद्धि

३.८ पायाभूत वर्ष (२००४-०५ वरुन २०११-१२) सुधारित झाल्याने कार्यपद्धती व परिभाषा यामध्ये बदल झाले. स्थूल जिल्हा मूल्यवृद्धिचे अंदाज तयार करण्यासाठी ‘उत्पन्न स्रोत पद्धती’ चा अवलंब करण्यात येत असून त्यास अंगभूत मर्यादा आहेत. वस्तु उत्पादन क्षेत्रांसाठी जिल्हास्तरीय माहिती उपलब्ध आहे परंतु इतर क्षेत्रांकरीता स्थूल राज्य मूल्यवृद्धिचे अंदाज जिल्ह्यांत वाटप करण्यासाठी अनुरूप निर्देशकांचा वापर करण्यात येतो. हे जिल्हास्तरीय अंदाज केवळ जिल्हा स्तरावरील अर्थव्यवस्थेची ढोबळमानाने कल्पना यावी यासाठी वापरले जाऊ शकतात. सांकेतिक व वास्तविक स्थूल जिल्हा मूल्यवृद्धि अंदाज व सांकेतिक दरडोई स्थूल जिल्हा मूल्यवृद्धि अंदाज परिशिष्ट ३.९ ते परिशिष्ट ३.११ मध्ये देण्यात आले आहेत.

**आलेख ३.३ : निवडक राज्यांचे व भारताचे दरडोई उत्पन्न (२०१९-२०)**




**आलेख ३.२ : स्थूल राज्य मूल्यवृद्धितील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा (२०११-१२ ते २०१९-२०)**



# भारतीय अर्थव्यवस्था

## देशांतर्गत स्थूल उत्पन्न (सन २०२०-२१)

३.९ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांनी प्रसिद्ध केलेल्या सन २०२०-२१ च्या दुसऱ्या पूर्वानुमानानुसार सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ १,९५,८६,१६१ कोटी अपेक्षित असून वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ १,३४,०८,८८२ कोटी अपेक्षित आहे. सन २०२०-२१ करीता वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वृद्धिदर (-)८.० टक्के अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' या क्षेत्रांच्या वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धित सन २०२०-२१ मध्ये अनुक्रमे ३.० टक्के, (-)८.२ टक्के व (-)८.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. क्षेत्रनिहाय वार्षिक वास्तविक स्थूल मूल्यवृद्धि, वास्तविक स्थूल देशांतर्गत उत्पन्न आणि दरडोई वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न यांचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.३ मध्ये दिले आहेत.

## देशांतर्गत स्थूल उत्पन्न (सन २०१९-२०)

३.१० पहिल्या सुधारित अंदाजांनुसार, सन २०१९-२० मध्ये सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ २,०३,५१,०१३ कोटी अपेक्षित असून वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ १,४५,६९,२६८ कोटी अपेक्षित आहे. वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात सन २०१९-२० मध्ये ४.० टक्के वाढ अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' क्षेत्रांच्या वास्तविक स्थूल मूल्यवृद्धित अनुक्रमे ४.३ टक्के, (-)१.२ टक्के आणि ७.२ टक्के वाढ अपेक्षित आहे. वास्तविक स्थूल उत्पन्न, क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल मूल्यवृद्धि आणि दरडोई वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न यांचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.४ मध्ये दिले आहेत. देशांतर्गत स्थूल व निव्वळ उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.५ ते परिशिष्ट ३.८ मध्ये दिला आहे.

**आलेख ३.४ : स्थूल राज्य उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील वाढ**




**आलेख ३.५ : स्थूल राज्य मूल्यवृद्धि व देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धितील वाढ**



**तक्ता ३.३ वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि, वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न व दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

| क्षेत्र | मागील वर्षाच्या अस्थायी अंदाजाच्या तुलनेत टक्केवारीतील बदल |
|---|---|
| | २०२०-२१ |
| (i) कृषि व संलग्न कार्ये (कृषि#, वने व मत्स्यव्यवसाय) | ३.० |
| (ii) खाण व दगड खाणकाम | (-)९.२ |
| (iii) वस्तुनिर्माण | (-)८.४ |
| (iv) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | १.८ |
| (v) बांधकाम | (-)१०.३ |
| (vi) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा | (-)१८.० |
| (vii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | (-)१.४ |
| (viii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | (-)४.१ |
| **देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि** | **(-)६.५** |
| **देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **(-)८.०** |
| **दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **(-)८.९** |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकारद्वारे दि.२६ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्रकाशित प्रेसनोट

# पीक व पशुसंवर्धन समाविष्ट

**तक्ता ३.४ वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न, क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल मूल्यवृद्धि व दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

*(टक्के)*

| तपशील | वृद्धिदर | | | | | | | | सरासरी वृद्धिदर (२०१२-१३ ते २०१९-२०) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+++ | २०१८-१९++ | २०१९-२०+ | |
| **स्थूल राज्य उत्पन्न** | **५.५** | **६.४** | **७.४** | **८.०** | **८.३** | **६.८** | **६.५** | **४.०** | **६.६** |
| **स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **५.४** | **६.१** | **७.२** | **८.०** | **८.०** | **६.२** | **५.९** | **४.१** | **६.४** |
| **कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र** | **१.५** | **५.६** | **(-)०.२** | **०.६** | **६.८** | **६.६** | **२.६** | **४.३** | **३.५** |
| i) पीक | ०.२ | ५.४ | (-)३.७ | (-)२.९ | ५.३ | ५.४ | (-)१.६ | ४.० | १.५ |
| ii) पशुसंवर्धन | ५.२ | ५.६ | ७.४ | ७.५ | १०.० | ७.९ | ८.५ | ७.० | ७.४ |
| iii) वने व लाकूड तोडणी | ०.२ | ५.९ | १.९ | १.७ | ५.५ | ५.४ | ७.९ | ०.३ | ३.६ |
| iv) मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ४.९ | ७.२ | ७.५ | ९.७ | १०.४ | १५.२ | ९.० | १.० | ८.१ |
| **उद्योग क्षेत्र** | **३.३** | **३.८** | **७.०** | **९.६** | **७.७** | **५.९** | **५.३** | **(-)१.२** | **५.२** |
| i) खाण व दगड खाणकाम | ०.६ | ०.२ | ९.७ | १०.१ | ९.८ | (-)५.६ | ०.३ | (-)२.५ | २.८ |
| ii) वस्तुनिर्माण | ५.५ | ५.० | ७.९ | १३.१ | ७.९ | ७.५ | ५.३ | (-)२.४ | ६.२ |
| iii) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | २.७ | ४.२ | ७.२ | ४.७ | १०.० | १०.६ | ८.० | २.१ | ६.२ |
| iv) बांधकाम | ०.३ | २.७ | ४.३ | ३.६ | ५.९ | ५.२ | ६.३ | १.० | ३.७ |
| **सेवा क्षेत्र** | **८.३** | **७.७** | **९.८** | **९.४** | **८.५** | **६.३** | **७.२** | **७.२** | **८.१** |
| i) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा | ९.८ | ६.५ | ९.४ | १०.२ | ७.७ | १०.३ | ७.१ | ६.४ | ८.४ |
| ii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ९.७ | ११.२ | ११.० | १०.७ | ८.६ | १.८ | ७.२ | ७.३ | ८.४ |
| iii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ४.३ | ३.८ | ८.३ | ६.१ | ९.३ | ८.३ | ७.४ | ८.३ | ७.० |
| **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न** | **४.२** | **५.०** | **६.१** | **६.६** | **६.९** | **५.६** | **५.५** | **३.०** | **५.४** |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार +++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

## चालू मालिकेतील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा व सरासरी वार्षिक वृद्धि

३.११ चालू मालिकेत (पायाभूत वर्ष २०११-१२) सन २०११-१२ ते २०१९-२० मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व सेवा क्षेत्राच्या स्थूल मूल्यवृद्धित अनुक्रमे ३.५ टक्के, ५.२ टक्के व ८.१ टक्के सरासरी वार्षिक वाढ अपेक्षित आहे. सन २०१२-१३ ते २०१९-२० करिता क्षेत्रनिहाय सरासरी वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.४ मध्ये दिले आहेत.

३.१२ 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व सेवा या क्षेत्रांचा अनुक्रमे १८.२ टक्के, २९.९ टक्के व ५१.९ टक्के सरासरी हिस्सा आहे.

## राष्ट्रीय उत्पन्न (२०१९-२०)

३.१३ सन २०१९-२० मध्ये सांकेतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ७.९ टक्के वाढीसह ₹ २,०१,५७,८९९ कोटी अंदाजित आहे. सांकेतिक निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ७.७ टक्के वाढीसह सन २०१९-२० मध्ये ₹ १,७९,९४,३०१ कोटी अपेक्षित आहे. वास्तविक स्थूल राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ४.२ टक्के वाढीसह सन २०१९-२० मध्ये ₹ १,४४,२७,६३२ कोटी अंदाजित आहे. वास्तविक निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न सन २०१९-२० मध्ये ₹ १,२६,८१,२४६ कोटी अपेक्षित असून मागील वर्षाच्या तुलनेत ३.६ टक्क्यांनी जास्त आहे.

३.१३.१ दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (म्हणजेच दरडोई सांकेतिक निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न) सन २०१९-२० मध्ये ₹ १,३४,१८६ अपेक्षित असून ते सन २०१८-१९ मध्ये ₹ १,२५,८८३ होते.

## जागतिक अर्थव्यवस्था

३.१४ संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट्स -२०२१' या अहवालानुसार जागतिक स्थूल उत्पादनाची वाढ सन २०२० मधील (-)४.३ टक्क्यांच्या तुलनेत सन २०२१ मध्ये ४.७ टक्के अपेक्षित आहे. विकसित देशांचा वृद्धिदर सन २०२० मध्ये (-)५.६ टक्के व सन २०२१ मध्ये ४.० टक्के अपेक्षित आहे तर विकसनशील देशांचा वृद्धिदर सन २०२० मध्ये (-)२.५ टक्के व सन २०२१ मध्ये ५.७ टक्के अपेक्षित आहे. दक्षिण आशियाई देशांचा वृद्धिदर सन २०२० मध्ये (-)८.६ टक्के व सन २०२१ मध्ये ६.९ टक्के अपेक्षित आहे. जागतिक स्थूल उत्पादन व स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढ तक्ता ३.५ मध्ये दिली आहे.

**आलेख ३.६ : अर्थव्यवस्थांच्या प्रकारनिहाय उत्पादनाचा वृद्धीदर**




स्रोत: संयुक्त राष्ट्रसंघाचा 'वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्टस २०२१' अहवाल

**तक्ता ३.५ जागतिक स्थूल उत्पादन व देशांतर्गत उत्पन्नातील वाढ**

| तपशील | वार्षिक टक्केवारीतील बदल | | |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०^ | २०२१^^ |
| जग | २.५ | (-)४.३ | ४.७ |
| विकसित अर्थव्यवस्था | १.७ | (-)५.६ | ४.० |
| अमेरिकेची संयुक्त राज्ये | २.२ | (-)३.९ | ३.४ |
| जपान | ०.७ | (-)५.४ | ३.० |
| युरोपियन युनियन | १.५ | (-)७.४ | ४.८ |
| संक्रमणशील अर्थव्यवस्था | २.२ | (-)३.४ | ३.४ |
| विकसनशील अर्थव्यवस्था | ३.६ | (-)२.५ | ५.७ |
| दक्षिण आशिया | ३.१ | (-)८.६ | ६.९ |
| भारत | ४.७ | (-)९.६ | ७.३ |
| पूर्व आशिया | ५.३ | १.० | ६.४ |
| चीन | ६.१ | २.४ | ७.२ |
| अल्प विकसित देश | ४.८ | (-)१.३ | ४.९ |

^ अंदाजित ^^ पुर्वानुमान

*आधार*: संयुक्त राष्ट्रसंघाचा 'वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट्स - २०२१' अहवाल

* * * * *

## परिशिष्ट ३.१
## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न
## (चालू किंमतींनुसार)

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+++ | २०१८-१९++ | २०१९-२०+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पीक | १,०१,९३० | १,३६,७७६ | १,१५,१४१ | १,१४,८०३ | १,५३,८२४ | १,४१,२३१ | १,३१,८१२ | १,६८,८९१ |
| २ | पशुसंवर्धन | २८,५५७ | ३५,१७१ | ३९,११७ | ४४,१२० | ५१,३८३ | ५७,७४४ | ५९,४२५ | ६४,२३१ |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १६,६०१ | १६,५१८ | १७,४६६ | १७,२०१ | २४,२७९ | २८,२६४ | ३३,२९३ | ३३,८२९ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | २,९३९ | ३,८५२ | ४,७५१ | ४,७२९ | ६,२७४ | ६,२७८ | ५,४२९ | ५,९६४ |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये** | **१,५०,०२७** | **१,९२,३१८** | **१,७७,२७५** | **१,८०,८५३** | **२,३५,७६०** | **२,३३,५१८** | **२,२९,९६०** | **२,७२,९१५** |
| | **(उप-बेरीज-१+२+३+४)** | *(१३.१)* | *(१३.१)* | *(११.२)* | *(१०.५)* | *(१२.४)* | *(११.३)* | *(१०.१)* | *(११.०)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | ५६,४९३ | ४८,२३२ | ५३,४९७ | ५९,६१५ | ६०,२४७ | ६१,७६३ | ६७,१४२ | ६४,०१७ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **२,०६,५२०** | **२,४०,५४९** | **२,३०,७७१** | **२,४०,४६८** | **२,९६,००७** | **२,९५,२८१** | **२,९७,१०१** | **३,३६,९३१** |
| ८ | वस्तुनिर्माण | २,४६,०३२ | ३,२४,२३७ | ३,४१,९८० | ३,७२,९१७ | ३,७७,०६९ | ४,०३,७२४ | ४,३९,६९० | ४,३३,५६० |
| ९ | वीज, वायू, पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | २६,८०५ | ४०,३२३ | ३९,१२२ | ४१,३६० | ३९,६३७ | ५३,२०३ | ५८,२६१ | ६७,२१४ |
| १० | बांधकाम | ८०,५५२ | ९२,५३६ | १,०१,१५१ | १,००,४१० | १,०८,९८२ | १,१८,०९९ | १,३१,८२० | १,४०,९७० |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **३,५३,३८९** | **४,५७,०९६** | **४,८२,२५३** | **५,१४,६८७** | **५,२५,६८८** | **५,७५,०२६** | **६,२९,७७१** | **६,४१,७४४** |
| **१२** | **उद्योग** | **४,०९,८८२** | **५,०५,३२७** | **५,३५,७४९** | **५,७४,३०२** | **५,८५,९३५** | **६,३६,७८९** | **६,९६,९१३** | **७,०५,७६०** |
| | **(उप-बेरीज - ६+११)** | *(३५.८)* | *(३४.४)* | *(३३.८)* | *(३३.४)* | *(३०.७)* | *(३०.८)* | *(३०.७)* | *(२८.४)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | १,०५,६०९ | १,३६,३३३ | १,४८,७२३ | १,५६,१९३ | १,८३,२७५ | २,०६,०८३ | २,२९,८८२ | २,५४,९४४ |
| १४ | रेल्वे | ५,९८७ | ६,८५५ | ८,३०४ | ९,१५७ | ११,५१२ | १३,४५६ | १३,५३८ | १५,०९९ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | ४१,६९६ | ५०,८९१ | ५६,२७६ | ६१,४९० | ६५,४२२ | ७१,५२७ | ७३,५५७ | ७९,४८३ |
| १६ | साठवण | ९२५ | १,१४८ | १,२५८ | १,३०८ | १,३६४ | १,५१४ | १,६४१ | १,७७९ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १५,८९२ | २१,७३२ | २४,६९६ | २९,०४१ | २८,९३२ | २८,३८७ | ३०,५५५ | ३४,७०४ |
| १८ | वित्तीय सेवा | १,१७,८३६ | १,४९,७३० | १,६४,०७९ | १,७८,२३९ | १,८७,७८२ | १,९७,७२१ | २,२६,५८२ | २,४६,८१४ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १,९०,८७० | २,६५,८१२ | ३,१२,४०८ | ३,५१,६११ | ४,०४,०४१ | ४,४५,३१३ | ५,०८,३१५ | ५,७३,३९६ |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ३९,०७० | ४७,९४० | ५१,८०२ | ५६,७८९ | ६३,५८५ | ७०,४७३ | ७५,१८९ | ९२,९७९ |
| २१ | इतर सेवा | ६६,६२५ | ९०,८८२ | १,०६,३६८ | १,२१,५०४ | १,४०,८७८ | १,५९,६५१ | १,८१,९३४ | २,१०,९१० |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **५,८४,५०९** | **७,७१,३२३** | **८,७३,९१३** | **९,६५,३३३** | **१०,८६,७९०** | **११,९४,१२५** | **१३,४१,१९२** | **१५,१०,१०८** |
| | **(उप-बेरीज - १३ ते २१)** | *(५१.१)* | *(५२.५)* | *(५५.१)* | *(५६.१)* | *(५६.९)* | *(५७.८)* | *(५९.१)* | *(६०.७)* |
| **२३** | **एकूण स्थूल मूल्यवृद्धि** | **११,४४,४१८** | **१४,६८,९६८** | **१५,८६,९३७** | **१७,२०,४८८** | **१९,०८,४८५** | **२०,६४,४३२** | **२२,६८,०६५** | **२४,८८,७८३** |
| | **(५+१२+२२)** | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* | *(१००.०)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | १,६२,०८५ | २,१६,३२२ | २,२८,८०८ | २,७६,६८० | ३,१७,६७५ | ३,१५,२०० | ३,४१,१६८ | ३,६३,८३५ |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २६,१३४ | ३५,६४३ | ३६,६०७ | ३०,९४३ | २७,९७५ | २६,८५१ | २९,६०६ | ३४,०६३ |
४.४ 'कोविड-१९' लॉकडाऊनमुळे माहे एप्रिल, २०२० आणि माहे मे, २०२० या कालावधीत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गोळा करण्यात अडचणी आल्यात. त्याचप्रमाणे खाद्यपदार्थ गटाव्यतिरिक्त इतर गटातील वस्तूंच्या किंमती सदर काळात उपलब्ध झाल्या नाहीत. परिणामी, माहे एप्रिल, २०२० आणि माहे मे, २०२० या महिन्याकरिता 'पान, सुपारी व मादक पदार्थ', 'कापड, बिछाना व पादत्राणे', 'संकीर्ण' (नागरी भागातील वैद्यकीय सेवा वगळता) आणि 'सर्वसाधारण' या गटांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित केले जाऊ शकले नाहीत.

४.४.१ माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२० या कालावधीत ग्राहक किंमती निर्देशांकाचा वार्षिक सरासरी टक्केवारीत गतवर्षीतील याच कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ग्रामीण आणि नागरी भागासाठी ८.७ आणि ६.२ बदल नोंदविण्यात आला. ग्रामीण भागाकरिता माहे जून, २०२० करिता ग्राहक किंमती निर्देशांकात ३११.२ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये ३१४.४ पर्यंत वाढ झाली आहे. ग्राहक किंमती निर्देशांकात नागरी भागाकरिता माहे जून, २०२० करिता २९७.३ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये ३००.५ पर्यंत वाढ झाली आहे. वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर माहे जून, २०२० मध्ये ५.५ टक्क्यांवरून टप्याटप्याने कमी होत माहे डिसेंबर, २०२० मध्ये २.९ टक्के ग्रामीण भागासाठी आणि नागरी भागासाठी तो ६.४ टक्क्यांवरून कमी होत ४.१ टक्के नोंदविण्यात आला आहे. माहे जून, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या कालावधीत सर्वसाधारण ग्राहक किंमती निर्देशांकातील वाढीस 'खाद्यपदार्थ गट' (ग्रामीण भागासाठी ६६ टक्के आणि नागरी भागासाठी ६० टक्के) आणि 'इंधन व दिवाबत्ती गट' (ग्रामीण भागासाठी १७ टक्के आणि नागरी भागासाठी १९ टक्के) हे गट कारणीभूत आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी भागाकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.१ व परिशिष्ट ४.२ मध्ये दिले आहेत.

४.४.२ माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२० या कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटाचा ग्राहक किंमती निर्देशांकाच्या ग्रामीण व नागरी भागाकरिता वार्षिक सरासरी टक्केवारीतील बदल गतवर्षीच्या तुलनेत १३.५ टक्के आणि १०.९ टक्के होता. ग्रामीण भागातील 'खाद्यपदार्थ' गटाचा ग्राहक किंमती निर्देशांकात माहे एप्रिल, २०२० मधील ३१९.८ वरून वाढ होऊन माहे डिसेंबर, २०२० मध्ये ३२३.८ व नागरी भागात माहे एप्रिल, २०२० मध्ये ३२२.४ वरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये ३२५.६ झाला. ग्रामीण भागातील 'खाद्यपदार्थ' गटातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढ माहे एप्रिल, २०२० मध्ये १०.३ टक्के वरुन कमी होत माहे डिसेंबर, २०२० मध्ये १.३ टक्के झाली. याचप्रमाणे नागरी भागासाठी माहे एप्रिल, २०२० मध्ये १०.९ टक्के वरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये २.२ टक्के झाली. माहे एप्रिल, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या कालावधीत 'खाद्यपदार्थ' गटाकरिता सरासरी चलनवाढीचा दर ग्रामीण भागासाठी ७.५ टक्के आणि नागरी भागासाठी ८.४ टक्के होता. 'खाद्यपदार्थ' गटाच्या चलनवाढीत 'अंडी, मांस व मासे', 'कडधान्ये व उत्पादने', 'खाद्य तेल' आणि 'भाज्या व फळे' या उपगटांचा हिस्सा मोठा आहे. 'खाद्यपदार्थ' गटातील उपगटनिहाय सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आधारीत चलनवाढीचा दर तक्ता ४.१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ४.१ सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित उपगटनिहाय खाद्यपदार्थ गटातील चलनवाढीचा दर**

(टक्के)

| खाद्यपदार्थ गटातील उपगट | ग्रामीण | | नागरी | |
|---|---|---|---|---|
| | एप्रिल ते डिसेंबर, २०१९ | एप्रिल ते डिसेंबर, २०२० | एप्रिल ते डिसेंबर, २०१९ | एप्रिल ते डिसेंबर, २०२० |
| तृणधान्ये व उत्पादने | २१.९ | ९.१ | १५.२ | १२.९ |
| कडधान्ये व उत्पादने | १४.९ | १४.३ | १७.१ | १४.० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | ५.७ | ३.८ | ३.१ | ३.८ |
| खाद्य तेल | १.८ | ८.४ | २.९ | ८.८ |
| अंडी, मांस व मासे | ७.१ | १६.७ | ७.९ | १८.० |
| भाज्या व फळे | २६.९ | ३.५ | २७.५ | ६.० |
| मसाले व मसाल्याचे पदार्थ | १२.३ | १०.३ | १८.२ | ११.१ |
| इतर खाद्यपदार्थ | २.१ | २.३ | १.९ | ३.६ |
| **खाद्यपदार्थ गट** | **१४.४** | **७.५** | **११.३** | **८.४** |

*आधार*: अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ४.१ : राज्यातील निवडक गटांसाठी गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर**



४.४.३ 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटातील ग्राहक किंमती निर्देशांकाच्या वार्षिक सरासरी टक्केवारीत माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२० या कालावधीत ग्रामीण भागासाठी ४.१ आणि नागरी भागासाठी ०.९ बदल नोंदविण्यात आला. 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटासाठी ग्राहक किंमती निर्देशांक ग्रामीण भागासाठी माहे एप्रिल, २०२० मध्ये ५७०.० वरुन डिसेंबर, २०२० मध्ये ५७०.२ आणि नागरी भागासाठी माहे एप्रिल, २०२० मध्ये ५६१.६ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये ५४७.७ दिसून आला. ग्रामीण भागातील 'इंधन, वीज व दिवाबत्ती' गटासाठी ग्राहक किंमती निर्देशांक आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर माहे एप्रिल, २०२० मधील ९.४ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये ६.० टक्के झाला. याच कालावधीकरिता सदर चलनवाढीचा दर नागरी भागासाठी ११.५ टक्यांवरुन ७.६ टक्के झाला.

## इतर संस्थांद्वारे परिगणित करण्यात येणारे ग्राहक किंमती निर्देशांक

४.५ राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय, भारत सरकार यांचेमार्फत दरमहा ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१२) हे अखिल भारत, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश स्तरावर ग्रामीण भाग, नागरी भाग व एकत्रित भागाकरिता परिगणित व प्रकाशित केले जातात. याकरिता १,१८१ ग्रामीण व १,११४ नागरी केंद्रांमधून अनुक्रमे २८१ व २८७ बाबींकरिता किंमती संकलित करण्यात येतात. यातील ६६ ग्रामीण व ८६ नागरी केंद्रे राज्यातील आहेत. 'कोविड -१९' महामारीमुळे एप्रिल, २०२० व मे, २०२० या महिन्यांत बाजारपेठांतील वस्तूंच्या मर्यादित उलाढालींमुळे वस्तूंच्या किंमतींचे अल्प प्रमाणात संकलन झाल्याने, राज्यस्तरीय किंवा अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक परिगणना करण्यात आली नाही (राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाची जुलै, २०२० मध्ये प्रकाशित तांत्रिक टिप्पणी). राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाने अखिल भारतीय स्तरावर माहे एप्रिल, २०२० आणि मे, २०२० या कालावधीकरिता केवळ 'खाद्यपदार्थ' आणि 'इंधन व दिवाबत्ती' गटासाठी ग्राहक किंमती निर्देशांक प्रकाशित केला. अखिल भारतीय स्तरावर ग्राहक किंमती निर्देशांकात ग्रामीण भागासाठी माहे जून, २०२० करिता १५२.७ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये १५८.५ तर नागरी भागासाठी माहे जून, २०२० मध्ये १५०.८ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये १५६.० वाढ झाली. एकत्रित ग्राहक किंमती निर्देशांक माहे जून, २०२० मध्ये १५१.८ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये १५७.३ वाढ झाली. याच कालावधीत, सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भाग, नागरी भाग व एकत्रित भागाकरिता प्रत्येकी ६.६ टक्के होता.

४.५.१ राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय राज्याकरिता देखील दरमहा ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित करते. माहे जून, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता परिगणित केलेला सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक राज्यातील ग्रामीण भाग, नागरी भाग आणि एकत्रित याकरिता अनुक्रमे १५६.०, १५०.२ आणि १५२.२ होता. याच कालावधीकरिता वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागाकरिता ५.८ टक्के, नागरी भागाकरिता ६.७ टक्के आणि एकत्रित ६.४ टक्के होता. महाराष्ट्राकरिता राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाने परिगणित केलेले ग्रामीण, नागरी व एकत्रित गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.३ मध्ये देण्यात आले आहेत.

४.६ श्रम केंद्र, भारत सरकार शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष १९८६-८७) व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष १९८६-८७) दरमहा प्रकाशित करतात. याकरिता किंमतींचे संकलन २० राज्यांमधील ६०० केंद्रांमधून केले जात असून त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. अखिल भारतीय स्तरावर शेत मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक माहे एप्रिल, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता अनुक्रमे १०३२.७ आणि १०३८.६ असून त्यांचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर अनुक्रमे ६.६ टक्के आणि ६.४ टक्के होता.

४.६.१ माहे एप्रिल, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता श्रम केंद्र, भारत सरकार यांचे मार्फत परिगणित केलेला सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक महाराष्ट्रातील शेत मजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता अनुक्रमे ११६८.८ आणि ११५३.७ असून त्यांचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर अनुक्रमे ८.३ टक्के आणि ७.७ टक्के होता. महाराष्ट्र व अखिल भारतातील शेत मजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.४ मध्ये दिले आहेत.

४.७ श्रम केंद्र, भारत सरकार, औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००१) दरमहा परिगणित व प्रकाशित करते. औद्योगिक कामगारांकरिताचा ग्राहक किंमती निर्देशांक हा महागाई भत्ता निश्चित करणे तसेच नियत कार्य क्षेत्रातील किमान मजुरी दर निश्चिती करणे आणि वेतन संरचना सुधारित करण्यासाठी वापरला जातो. औद्योगिक कामगारांकरिताचा ग्राहक किंमती निर्देशांक हा भारतातील ७८ औद्योगिकदृष्ट्या विकसित केंद्रांमधून गोळा केलेल्या जीवनावश्यक वस्तू आणि सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारित आहे. यामध्ये राज्यातील पाच केंद्रांचा समावेश आहे. अखिल भारतीय स्तरावर औद्योगिक कामगारांकरिताचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक माहे एप्रिल, २०२० ते माहे ऑगस्ट, २०२० या कालावधीत ३३३.० असून, वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ५.३ टक्के होता. राज्यातील मुंबई, सोलापूर, नागपूर, पुणे आणि नाशिक या निवडक केंद्रांकरिता माहे एप्रिल, २०२० ते माहे ऑगस्ट, २०२० या कालावधीचा सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ३२७.२, ३५२.२, ४०९.६, ३६९.० आणि ३८५.२ होता. औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक व महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.५ व परिशिष्ट ४.६ मध्ये देण्यात आले आहेत. श्रम केंद्र, भारत सरकार यांचेमार्फत नवीन पायाभूत वर्ष २०१६ ची मालिका सुरू करण्यात आली असून माहे सप्टेंबर, २०२० पासून निर्देशांक प्रकाशित करण्यात येत आहे.

४.७.१ कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन राज्यातील अकोला, कोल्हापूर, जळगाव, नांदेड आणि औरंगाबाद या पाच केंद्रांकरिता स्वतंत्ररित्या औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००१) दरमहा परिगणित आणि प्रकाशित करते. महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.७ मध्ये देण्यात आले आहेत. अखिल भारतीय स्तरावरील महत्त्वाच्या ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.८ मध्ये दिले आहेत.

## अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक

४.८ आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत दरमहा घाऊक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२) परिगणित व प्रकाशित केले जातात. घाऊक किंमती निर्देशांक परिगणित करण्याकरिता विचारात घेतल्या जाणाऱ्या विविध वस्तूंचे वर्गीकरण 'प्राथमिक वस्तू', 'इंधन व वीज' आणि 'उत्पादित वस्तू' या गटांत केले जाते.

४.९ घाऊक किंमती निर्देशांक माहे एप्रिल, २०२० मधील ११९.२ वरुन माहे डिसेंबर, २०२० मध्ये १२४.५ (अस्थायी) झाला. याच कालावधीत 'प्राथमिक वस्तू' गटाचा घाऊक किंमती निर्देशांक १३७.८ वरुन १४६.५ (अस्थायी), 'इंधन व वीज' या गटाचा निर्देशांक ८९.८ वरुन ९४.२ (अस्थायी) आणि 'उत्पादित वस्तू' गटाचा निर्देशांक ११८.७ वरुन १२३.० (अस्थायी) झाला. अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.९ मध्ये देण्यात आले आहेत.

४.१० घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर माहे एप्रिल, २०२० मधील (-)१.६ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये १.२ टक्क्यांपर्यंत (अस्थायी) झाला. 'प्राथमिक वस्तू' गटाकरिता या चलनवाढीच्या दरात माहे एप्रिल, २०२० मधील (-)१.१ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये (-)१.६ टक्क्यांपर्यंत (अस्थायी) घट झाली आहे. 'इंधन व वीज' गटाकरिता चलनवाढीचा दर माहे एप्रिल, २०२० मधील (-)१२.६ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये (-)८.७ टक्क्यांपर्यंत (अस्थायी) झाला. 'उत्पादित वस्तू' गटाकरिता चलनवाढीच्या दरात माहे एप्रिल, २०२० मधील ०.२ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये ४.२ टक्क्यांपर्यंत (अस्थायी) वाढ झाली. 'प्राथमिक वस्तू' गटातील 'खाद्यपदार्थ' उपगटाचा चलनवाढीचा दर माहे एप्रिल, २०२० मधील ३.८ टक्क्यांवरून माहे डिसेंबर, २०२० मध्ये (-)१.१ टक्के झाला.

**आलेख ४.२ : अखिल भारतीय स्तरावर घाऊक किंमती निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचा दर**



*अस्थायी

# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.११ 'भूक संपविणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण साध्य करणे आणि शाश्वत शेतीस प्रोत्साहन देणे' हे शाश्वत विकास ध्येयांपैकी एक ध्येय आहे. अन्नसुरक्षा मध्ये सर्व लोकांना, सर्व काळ, भौतिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या पुरेसा, सुरक्षित आणि पौष्टिक आहार उपलब्ध होवून त्यांच्या उत्साही व आरोग्यदायी आयुष्याकरिता आहारविषयक गरजांच्या पूर्ततेची सुनिश्चिती होते. शासन सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अधिकतर उपेक्षितांसाठी रास्त दरात अन्नसुरक्षा प्रदान करते.

४.१२ दि.३१ डिसेंबर, २०२० रोजी राज्यात ५२,५१३ रास्त भाव दुकाने कार्यरत होती, त्यापैकी ५,४२७ आदिवासी भागात तर २८ फिरती होती. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कार्य प्रभावीपणे होण्याकरिता रास्त भाव दुकानांना परवाने देताना सहकारी, स्व-सहाय्यता गट आणि स्थानिक संस्था यांना प्राधान्य देण्यात येते. रास्त भाव दुकानांची मालकी प्रकारानुसार संख्या तक्ता ४.२ मध्ये तर निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकानांची संख्या तक्ता ४.३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ४.२ रास्त भाव दुकानांची मालकी प्रकारानुसार संख्या**

(३१ डिसेंबर, २०२० रोजी)

| मालकीचा प्रकार | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| वैयक्तिक | |
| सर्वसाधारण | ३०,०५६ |
| अनुसूचित जाती | ३,३०० |
| अनुसूचित जमाती | ३,४९३ |
| माजी सैनिक | २६४ |
| महिलांचे स्व-सहाय्यता गट | ५,३९३ |
| पुरुषांचे स्व -सहाय्यता गट | १५८ |
| ग्रामपंचायत | २३८ |
| नागरी स्थानिक संस्था | २३० |
| सहकारी संस्था | ८,३६५ |
| इतर | १,०१६ |
| **एकूण** | **५२,५१३** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ४.३ निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकानांची संख्या**

(१ फेब्रुवारी, २०२१ रोजी)

| राज्य | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| आंध्र प्रदेश | ३७,७१३ |
| गुजरात | १५,२९४ |
| कर्नाटक | १९,९६० |
| केरळ | १४,१७५ |
| मध्य प्रदेश | २४,७१३ |
| **महाराष्ट्र** | **५२,५१३#** |
| राजस्थान | २६,८५४ |
| तेलंगणा | १६,९९८ |
| उत्तर प्रदेश | ७९,७९२ |
| **अखिल भारत** | **५,४५,५७५** |

# ३१ डिसेंबर, २०२० रोजी

*आधार*: १. अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, केंद्र शासन
२. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४.१३ सुनिश्चित गुणवत्तेच्या अन्नधान्याचा नियमित पुरवठा होण्यासाठी आणि गैरप्रकार कमी करण्यासाठी रास्त भाव दुकानांची वर्षभर नियमितपणे निरीक्षणे घेतली जातात. याबरोबरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाचे संनियंत्रण करण्यासाठी राज्यात विविध स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या. सन २०२० मध्ये एकूण ५१,३४८ रास्त भाव दुकानांची निरीक्षणे घेण्यात आली. या निरीक्षणांदरम्यान ४०० रास्त भाव दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले, ६१५ दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले व एकूण ₹ १.२० कोटी दंड गोळा करण्यात आला.

४.१४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत वाटप करण्यात येणाऱ्या अन्नधान्याचे खुल्या बाजारातील विक्रीस आळा घालणे आणि गरजू कुटुंबांना अन्नधान्य उपलब्ध करुन देणे या दृष्टीकोनातून राज्य शासनाने दि.१ मे, १९९९ पासून तीन वेगवेगळ्या रंगांच्या शिधापत्रिकांची योजना लागू केली. शिधापत्रिकांचे मुख्यत: वार्षिक कुटुंब उत्पन्न निकषावर आधारित पिवळे, केशरी व शुभ्र असे वर्गीकरण केले जाते. डिसेंबर, २०२० पर्यंत राज्यात शिधापत्रिकाधारकांची संख्या २.५३ कोटी होती. शिधापत्रिकेच्या प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांची संख्या तक्ता ४.४ मध्ये व शिधापत्रिकाधारकांची जिल्हानिहाय संख्या परिशिष्ट ४.१० मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ४.४ शिधापत्रिकेच्या प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांची संख्या**

(लाख)

| वर्ष | शिधापत्रिकाधारकांची संख्या (डिसेंबर पर्यंत) | | | |
|---|---|---|---|---|
| | पिवळी | केशरी | शुभ्र | एकूण |
| २०१८ | ६४.३२ | १६०.९० | २२.०७ | २४७.५२ |
| २०१९ | ६०.८७ | १७०.५२ | २२.१७ | २५३.७० |
| २०२० | ६४.१८ | १६६.८० | २२.१८ | २५३.२४ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

४.१४.१ केंद्रपुरस्कृत अन्नपूर्णा योजना राज्यात दि.१ एप्रिल, २००१ पासून राबविण्यात येत आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन किंवा श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्ष व त्यावरील वयोगटातील निराधार व्यक्तींना या योजनेंतर्गत प्रतिमाह १० किलो अन्नधान्य मोफत पुरविण्यात येते. डिसेंबर, २०२० पर्यंत अन्नपूर्णा योजनेंतर्गत लाभार्थ्यांची संख्या ८,९९९ होती.

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थी

४.१५ नागरिकांना अन्न व पोषण सुरक्षा पुरविण्याकरिता त्यांच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी रास्त दरात पुरेशा प्रमाणात दर्जेदार अन्नधान्य नियमितपणे उपलब्ध व्हावे हा राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ चा उद्देश आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून करण्यात येत आहे. या अधिनियमांतर्गत राज्यातील सुमारे ६२.३ टक्के लोकसंख्या तांदूळ, गहू आणि भरडधान्ये प्रति किलो अनुक्रमे ₹ तीन, ₹ दोन आणि ₹ एक या दराने मिळण्यास पात्र आहे. लाभार्थ्यांचे अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब असे वर्गीकरण करण्यात आले आहे. अंत्योदय अन्न योजनेच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा अंत्योदय अन्न योजना कुटुंबात समावेश होतो. अंत्योदय अन्न योजनेत समावेश न झालेली दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे आणि ग्रामीण भागात ₹ ४४,००० पर्यंत तर नागरी भागात ₹ ५९,००० पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबांचा समावेश प्राधान्य कुटुंबात केला जातो. अंत्योदय अन्न योजनेंतर्गत कुटुंब प्रति शिधापत्रिका प्रतिमाह ३५ किलो अन्नधान्य तर प्राधान्य कुटुंब प्रति व्यक्ति प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य मिळण्यास पात्र आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण याचा तपशील तक्ता ४.५ मध्ये देण्यात आला आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना करण्यात आलेले वितरण याचा जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.१४ मध्ये तर प्राधान्य कुटुंबांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना करण्यात आलेले वितरण याचा जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.१५ मध्ये देण्यात आला आहे. निवडक राज्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या तक्ता ४.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.५ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

(लाख मे.टन)

| लाभार्थी | वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| अंअयो कुटुंब | २०१८-१९ | ५.५२ | ५.१० | ५.०२ | ५.०० | ४.४७ | ४.४० |
| | २०१९-२० | ५.२६ | ४.७३ | ४.७५ | ५.२४ | ४.६६ | ४.६७ |
| | २०२०-२१+ | ३.७८ | ३.५८ | ३.५३ | ४.०८ | ३.८५ | ३.८२ |
| प्राधान्य कुटुंब | २०१८-१९ | १४.६९ | १२.६८ | १२.५१ | २०.८४ | १७.७२ | १७.५७ |
| | २०१९-२० | १४.८४ | १२.५९ | १२.६१ | २०.४७ | १७.४४ | १७.४७ |
| | २०२०-२१+ | ११.२७ | १०.०३ | ९.८८ | १५.१६ | १३.५० | १३.५० |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन अंअयो अंत्योदय अन्न योजना + डिसेंबरपर्यंत

**तक्ता ४.६ निवडक राज्यांकरिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या**

(१ फेब्रुवारी, २०२१ रोजी) (लाख )

| राज्य | समाविष्ट करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या | | | शिधापत्रिकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | अंअयो | प्राधान्य कुटुंब | एकूण |
| आंध्र प्रदेश | २००.२० | ६८.०३ | २६८.२३ | ९.०८ | ७९.०४ | ८८.१२ |
| गुजरात | २५८.७८ | १२४.०६ | ३८२.८४ | ८.१३ | ६३.१४ | ७१.२७ |
| कर्नाटक | २८५.५५ | ११६.३८ | ४०१.९३ | १०.९२ | १११.११ | १२२.०३ |
| केरळ | ९१.८७ | ६२.९३ | १५४.८० | ५.८७ | ३२.५१ | ३८.३८ |
| मध्य प्रदेश | ४२०.८३ | १२५.५९ | ५४६.४२ | १४.५९ | ९२.७० | १०७.२९ |
| **महाराष्ट्र** | **४६९.७२** | **२३०.४५** | **७००.१७** | **२४.७४** | **१३१.७९** | **१५६.५३** |
| राजस्थान | ३५६.०९ | ९०.५३ | ४४६.६२ | ६.२९ | १००.५८ | १०६.८७ |
| तेलंगणा | १४३.०८ | ४८.६२ | १९१.७० | ५.६४ | ४७.८९ | ५३.५२ |
| उत्तर प्रदेश | १,२३४.१० | २८६.५२ | १,५२०.६२ | ४०.७६ | ३१७.३४ | ३५८.११ |
| **अखिल भारत** | **६,२४९.३३** | **१,८८५.६८** | **८,१३५.०१** | **२३६.०९** | **२,१२६.१९** | **२,३६२.२९** |

*आधार* : अन्न सुरक्षा पोर्टल, केंद्र शासन

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळतीलच असे नाही

४.१६ अवर्षणप्रवण १४ जिल्ह्यांतील (औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट नसलेल्या दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना तांदूळ व गहू अनुक्रमे प्रति किलो ₹ तीन व ₹ दोन या दरात प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य वितरीत करण्यात येते. दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.७ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.७ दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण**

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| २०१८-१९ | १.१८ | ०.९८ | ०.९६ | २.०५ | १.७८ | १.७२ |
| २०१९-२० | १.१२ | ०.८८ | ०.८६ | १.९४ | १.५३ | १.४६ |
| २०२०-२१+ | ०.७७ | ०.६४ | ०.६३ | १.३३ | १.०७ | १.०७ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

+ डिसेंबरपर्यंत

## प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

४.१७ कोविड-१९ महामारीमुळे संपूर्ण देशाला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले परिणामी लोकांची अन्नधान्याच्या असुरक्षिततेविषयी समस्या अधिक बळावली. या संकटाच्या काळात, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची केंद्र शासनाकडून घोषणा करण्यात आली. एप्रिल ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब सर्व लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य व प्रति कुटुंब प्रतिमाह एक किलो डाळ विनामूल्य वितरण करण्यात आली.

४.१७.१ प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना एप्रिल ते जून, २०२० या कालावधीत प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो तांदूळ मोफत वितरीत करण्यात आले तर जुलै ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य (तांदूळ व गहू) वितरीत करण्यात आले. तांदळाचे नियतन, उचल व वितरण तक्ता ४.८ मध्ये तर अन्नधान्याचे (तांदूळ व गहू) नियतन, उचल व वितरण तक्ता ४.९ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.८ प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत तांदळाचे नियतन, उचल व वितरण**

(लाख मे.टन)

| महिना | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
|---|---|---|---|
| एप्रिल, २०२० | ३.५० | ३.४४ | ३.१५ |
| मे, २०२० | ३.५० | ३.३६ | ३.१७ |
| जून, २०२० | ३.५० | ३.२८ | ३.२० |
| **एकूण** | **१०.५०** | **१०.०८** | **९.५२** |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**तक्ता ४.९ प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत अन्नधान्याचे (तांदूळ व गहू) नियतन, उचल व वितरण**

(लाख मे.टन)

| महिना | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| जुलै, २०२० | १.५४ | १.३५ | १.३९ | १.९६ | १.८७ | १.७८ |
| ऑगस्ट, २०२० | १.५४ | १.४७ | १.३६ | १.९६ | १.८८ | १.७५ |
| सप्टेंबर, २०२० | १.५४ | १.४० | १.३५ | १.९६ | १.८२ | १.७२ |
| ऑक्टोबर, २०२० | १.५४ | १.३५ | १.३७ | १.९६ | १.७६ | १.७४ |
| नोव्हेंबर, २०२० | १.५४ | १.१४ | १.३२ | १.९६ | १.६९ | १.६९ |
| **एकूण** | **७.७०** | **६.७१** | **६.७९** | **९.८०** | **९.०२** | **८.६८** |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

४.१७.२ प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत एप्रिल ते जून, २०२० या कालावधीत चणाडाळ / तूरडाळ वितरीत करण्यात आली. केंद्र शासनाकडून जुलै ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीकरिता प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत वितरीत करावयाचा अख्खा चणा प्राप्त झाला. तथापि, राज्यात अख्ख्या चण्याऐवजी चणाडाळीस अधिक पसंती असल्याने केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या चण्याची भरडाई करुन त्यापासून प्राप्त झालेली चणाडाळ पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्याचा निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात आला. त्यानुसार जुलै ते नोव्हेंबर, २०२० या कालावधीत प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत प्रति कुटुंब प्रतिमाह एक किलो चणाडाळ मोफत वितरीत करण्यात आली. डाळींचे नियतन, उचल व वितरण तक्ता ४.१० मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१० प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत डाळींचे नियतन, उचल व वितरण**

('००० मे. टन)

| कालावधी | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण* |
|---|---|---|---|
| एप्रिल ते जून, २०२० | ४६.१५ | ४४.७९ | ३९.८८ |
| जुलै ते नोव्हेंबर, २०२० | ८५.६९@ | ६७.६३@@ | ६३.८५@@ |

@ चणा @@ ८४.५४ हजार मे. टन चण्यापासून तयार केलेली चणाडाळ * अस्थायी

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांना रास्त दराने अन्नधान्य

४.१८ कोविड-१९ महामारीच्या कालावधीत आर्थिक धोरणाचा भाग म्हणून राज्य शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम आणि दारिद्र्य रेषेवरील शेतकरी योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या सर्व दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांना मे ते ऑगस्ट, २०२० दरम्यान रास्त दरात अन्नधान्याचे वितरण केले. पात्र लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती प्रतिमाह पाच किलो अन्नधान्य (₹ १२ प्रतिकिलो दराने दोन किलो तांदूळ आणि ₹ आठ प्रतिकिलो दराने तीन किलो गहू) वितरित करण्यात आले. दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व वितरण तक्ता ४.११ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.११ दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य नियतन, उचल व वितरण**

('००० मे. टन)

| महिना | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण* | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण* |
| मे, २०२० | ६१.६८ | ५१.७४ | २७.५८ | ९२.५३ | ७७.५३ | ४४.३३ |
| जून, २०२० | ६१.६८ | २३.५३ | ७.२० | ९२.५३ | ३५.९३ | ११.०१ |
| जुलै, २०२० | ६१.६८ | ५.७३ | ७.१८ | ९२.५३ | ८.३३ | १०.९३ |
| ऑगस्ट, २०२० | ६१.६८ | ०.९६ | १.८१ | ९२.५३ | १.२१ | १.९६ |
| **एकूण** | **२४६.७२** | **८१.९६** | **४३.७७** | **३७०.१२** | **१२३.००** | **६८.२३** |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## आत्म निर्भर भारत योजनेंतर्गत अन्नधान्याचे मोफत वितरण

४.१९ कोविड-१९ महामारीच्या काळात देशभरातील स्थलांतरितांच्या / अडकून पडलेल्या स्थलांतरितांच्या अन्नसुरक्षेच्या गरजा भागविण्याकरिता केंद्र शासनाने आत्म निर्भर भारत योजना घोषित केली. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत वा राज्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत इतर योजनेत समाविष्ट नसलेल्या किंवा इतर कोणत्याही कारणास्तव सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य मिळू न शकलेल्या सर्व व्यक्तींना या योजनेंतर्गत विशेषत्वाने अंतर्भूत करण्यात आले. सर्व पात्र लाभार्थ्यांना मे ते जून, २०२० या कालावधीत प्रति सदस्य प्रतिमाह पाच किलो तांदूळ आणि प्रतिकुटुंब प्रतिमाह एक किलो अख्खा चणा वितरीत करण्यात आला. आत्म निर्भर भारत योजनेंतर्गत तांदूळ व अख्खा चणा यांचे नियतन, उचल व वितरण अनुक्रमे तक्ता ४.१२ व तक्ता ४.१३ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१२ आत्म निर्भर भारत योजनेंतर्गत तांदळाचे नियतन, उचल व वितरण**

('००० मे. टन)

| महिना | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण* | लाभार्थी संख्या* (लाखात) |
|---|---|---|---|---|
| मे, २०२० | १७.९७ | १७.४३ | १३.८७ | २७.७५ |
| जून, २०२० | १७.९७ | १६.७५ | ३.४६ | ६.९३ |
| **एकूण** | **३५.९४** | **३४.१८** | **१७.३३** | **३४.६८** |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**तक्ता ४.१३ आत्म निर्भर भारत योजनेंतर्गत चण्याचे नियतन, उचल व वितरण**

('००० मे. टन)

| महिना | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल* | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण* | लाभार्थी कुटुंब संख्या* (लाखात) |
|---|---|---|---|---|
| मे, २०२० | ०.८८ | ०.६९ | ०.५६ | ५.६९ |
| जून, २०२० | ०.८८ | ०.५६ | ०.१९ | १.९२ |
| **एकूण** | **१.७६** | **१.२५** | **०.७५** | **७.६१** |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## भरड धान्यांचे वितरण

४.२० राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांना तांदूळ आणि गहू यासह भरड धान्यांचेही वितरण करण्यात येते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांकरिता भरड धान्यांचे नियतन, उचल व रास्तभाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.१४ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१४ भरड धान्यांचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

('००० मे.टन)

| वर्ष | ज्वारी | | | मका | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
| २०१८-१९ | १३.७१ | १३.७१ | १२.७६ | ५४.६८ | ५४.६८ | ५४.०५ |
| २०१९-२० | ७.१७ | ७.१७ | ७.१७ | ११४.९० | ११४.९० | ११४.९० |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन  टिप : सन २०२०-२१ करिता भरडधान्याची खरेदी प्रक्रिया सुरु आहे

## तांदळाचे पोषणतत्व गुणसंवर्धन व त्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाटप

४.२१ पोषण सुरक्षेच्या दिशेने वाटचाल सुरु करणे आणि देशातील अशक्तपणा व सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता दूर करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने 'तांदळाचे पोषणतत्व गुणसंवर्धन व त्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाटप' या केंद्र पुरस्कृत पथदर्शी योजनेस मान्यता दिली.

४.२१.१ तांदळाचे पीठ, पाणी आणि लोह, फॉलीक ॲसिड, जीवनसत्व बी१२ यासारख्या सूक्ष्म पोषक घटकांपासून पोषणतत्व गुणसंवर्धित तांदळाचे मगज तयार करण्यात येतात. गुणसंवर्धनाच्या प्रक्रियेत, पोषणतत्व गुणसंवर्धित तांदळाचे मगज हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वाटप करावयाच्या सर्वसाधारण तांदळामध्ये १: १०० या प्रमाणात मिसळले जातात. गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व भामरागड या दोन तालुक्यांमध्ये टाटा ट्रस्ट च्या सहाय्याने एक वर्षाच्या कालावधीकरिता हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला. या दोन तालुक्यांमध्ये सन २०१८-१९ मध्ये एकूण ५.४८ हजार मे.टन पोषणतत्व गुणसंवर्धित तांदूळ वितरीत करण्यात आला.

४.२१.२ सन २०१९-२० मध्ये राज्य शासनाने टाटा ट्रस्ट आणि भारत पेट्रोलिअम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सहाय्याने गडचिरोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंत ३४.३३ हजार मे.टन पोषणतत्व गुणसंवर्धित तांदळाचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

## शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्य वितरण

४.२२ राज्यातील विविध कुटुंबांकरिता रास्त भाव दुकानांना करण्यात येणाऱ्या वितरणाखेरीज कल्याणकारी संस्था व वसतीगृहे योजनेंतर्गत शासकीय / शासनामार्फत चालविण्यात येत असलेल्या कल्याणकारी संस्थांसह शासन अनुदानित कल्याणकारी संस्था व वसतीगृहांमधील लाभार्थ्यांसाठी केंद्र शासनामार्फत अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात येते. सप्टेंबर, २०२० पर्यंत ३.८८ लाख सदस्य असलेल्या ३,८९४ शिधापत्रिकाधारक आस्थापना आहेत. यापैकी ०.३२ लाख सदस्य असलेल्या २१४ शासकीय संस्था आणि ३.५६ लाख सदस्य असलेल्या ३,६८० शासन अनुदानित संस्था आहेत. शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्याचे नियतन, उचल व वितरण तक्ता ४.१५ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१५ शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्याचे नियतन, उचल व वितरण**

('००० मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | वितरण | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | वितरण |
| २०१८-१९ | १६.४२ | १३.५१ | ७.९१ | २४.६४ | १९.९७ | ९.५६ |
| २०१९-२० | ४.५१ | २.४० | ४.६० | ५.०० | २.८३ | ५.७६ |
| २०२०-२१+ | १४.३३ | ४.२४ | ०.२४ | १३.९० | ४.२७ | ०.२९ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन  + सप्टेंबरपर्यंत

## विकेंद्रित खरेदी

४.२३ धान / भरड धान्ये यासाठी विकेंद्रित खरेदी योजना महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित या संस्थांकडून सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी आणि खरेदी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने नॅशनल इ-मार्केट लिमिटेड यांचे मार्फत राबविण्यात येते. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ७०९.४५ कोटी रक्कमेच्या एकूण ३७.४१ लाख क्विंटल धानाची खरेदी केली.

## धान आणि भरड धान्यांची खरेदी

४.२४ केंद्र शासन निरनिराळ्या पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करते. बिगर आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित मार्फत आणि आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित मार्फत किमान आधारभूत किंमतीने धान व भरड धान्यांची खरेदी करण्यात येते. सन २०१९-२० मध्ये ४.०५ लाख शेतकऱ्यांना आधारभूत खरेदी किंमत ₹ ३,४५८.५१ कोटी ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात आली. धान आणि भरड धान्यांची खरेदी तक्ता ४.१६ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ४.१६ धान आणि भरड धान्यांची खरेदी**

('००० मे.टन)

| वर्ष | धान | भरडधान्य | |
|---|---|---|---|
| | | ज्वारी | मका |
| २०१८-१९ | ८६५.६७ | १०.९६ | ६.९९ |
| २०१९-२० | १,७४२.५९ | ७.१५ | ११४.९८ |
| २०२०-२१+ | ६८८.२५ | १७.७९ | ८८.२८ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

## साखरेचे वितरण

४.२५ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जुलै, २०१७ पासून फक्त अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना साखरेचे वाटप करण्यात येत आहे. या शिधापत्रिकाधारकांना प्रति किलो ₹ २० या दराने प्रत्येक कुटुंबास प्रतिमाह एक किलो साखर पुरविण्यात येते. साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.१७ साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

(लाख मे.टन)

| वर्ष | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
|---|---|---|---|
| २०१८-१९ | ०.३८ | ०.३८ | ०.३७ |
| २०१९-२० | ०.२५ | ०.२५ | ०.२५ |
| २०२०-२१+ | ०.३४ | ०.३३ | ०.३० |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## केरोसिनचे वितरण

४.२६ एलपीजी गॅस जोडणी असलेले सर्व शिधापत्रिकाधारक वगळून उर्वरित शिधापत्रिकाधारकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत केरोसिनचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये केरोसिनचा साठा व व्यापार करण्याकरीता परवाना आवश्यक आहे. राज्यात ६१,७४१ केरोसिन विक्री परवानाधारक असून त्यापैकी ६६९ घाऊक, १,५३७ निम घाऊक व ५९,५३५ किरकोळ विक्रेते आहेत. केरोसिनचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण तक्ता ४.१८ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१८ केरोसिनचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वितरण**

(लाख किलो लिटर)

| वर्ष | नियतन | उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वितरण |
|---|---|---|---|
| २०१८-१९ | २.५९ | २.४२ | २.४२ |
| २०१९-२० | १.४४ | ०.६९ | ०.६९ |
| २०२०-२१+ | ०.४६ | ०.२० | ०.२० |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## गोदामे

४.२७ सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमधून करण्यात येते आणि त्याची साठवणूक राज्याच्या गोदामांमध्ये करण्यात येते. डिसेंबर, २०२० अखेर, राज्य शासनाकडे एकूण ७.८२ लाख मे. टन साठवणूक क्षमतेची १,१५३ गोदामे आहेत. यापैकी १.२० लाख मे. टन क्षमतेची २६९ गोदामे अन्नधान्य साठवणूक करण्याकरिता योग्य नाहीत, ०.४१ लाख मे. टन क्षमतेची ४९ गोदामे भाडेतत्वावर देण्यात आली आहेत आणि १.११ लाख मे. टन क्षमतेची ९० गोदामे भाडेतत्वावर घेण्यात आली आहेत.

४.२७.१ अन्नधान्याची सुरक्षित साठवणूक करण्यासाठी आणि अन्नधान्याची नासधूस टाळण्यासाठी राज्य शासनाने नाबार्डच्या अर्थ सहाय्याने नवीन गोदामे बांधकाम करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण ४.१० लाख मे. टन क्षमतेच्या २८० गोदामांना बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यापैकी २०० गोदामांचे बांधकाम पूर्ण झाले आहे आणि ६२ गोदामांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. जिल्हानिहाय गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१३ मध्ये देण्यात आली आहे.

## अन्नधान्याकरिता अनुदान

४.२८ केंद्र शासनाकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य वितरणाकरिता राज्यास प्रतिकूल परिस्थितीत अन्नधान्याच्या राखीव साठ्याकरिता येणारा खर्च आणि राज्याला अन्नधान्य खरेदी व विक्री करतेवेळी किंमतींच्या फरकामुळे होणारा तोटा याकरिता अन्नधान्य अनुदान स्वरुपात अर्थ सहाय पुरविण्यात येते. सन २०१९-२० करिता ₹ २,६४१.६८ कोटी अन्नधान्य अनुदान प्राप्त झाले होते तर सन २०२०-२१ (सुधारित अंदाज) नुसार ₹ २,८३७.८० कोटी अन्नधान्य अनुदान आहे.

## शिवभोजन योजना

४.२९ राज्यातील गरीब व गरजू जनतेला प्रती थाळी ₹ १० अशा स्वस्त दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने शिवभोजन योजना दि.२६ जानेवारी, २०२० पासून राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालये व महानगरपालिका क्षेत्रात सुरु केली. दि.१ एप्रिल, २०२० पासून या योजनेचा विस्तार तालुका स्तरावर करण्यात आला.

४.२९.१ कोविड-१९ महामारीच्या कालावधीत मजूर, स्थलांतरीत, बेघर तसेच बाहेरगावचे विद्यार्थी इ. यांना अन्न अनुपलब्धतेच्या समस्येस सामोरे जावे लागले परिणामी अशा लोकांना रास्त दरात अन्न उपलब्ध करुन देण्यासाठी दि.३१ मार्च, २०२१ पर्यंत शिवभोजन थाळीच्या किंमतीत घट करुन ₹ ५ एवढी करण्यात आली. या योजनेंतर्गत सन २०१९-२० आणि २०२०-२१ करिता अनुक्रमे ₹ ६.४८ कोटी आणि ₹ १५० कोटी तरतूद करण्यात आली. या योजनेच्या सुरुवातीपासून ९०६ शिवभोजन केंद्रांमधून डिसेंबर, २०२० पर्यंत २.८१ कोटी शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण

४.३० केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्य शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम योजनेंतर्गत अन्नधान्य वितरणातील गैरप्रकार दूर करण्याकरिता आणि पात्र लाभार्थ्यांना पारदर्शक पद्धतीने अन्नधान्य वितरणाकरिता लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यपद्धतीचे ओळख अधिप्रमाणन पद्धतीचा वापर करुन सर्वांकष संगणकीकरण हाती घेतले आहे.

४.३०.१ राज्य शासनाकडून शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली मध्ये आधार जोडणीचे काम सुरु आहे. सन २०२०-२१ करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट एकूण पात्र १५६.६३ लाख पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी १५३.१२ लाख शिधापत्रिकांची आधार जोडणी जानेवारी, २०२१ पर्यंत करण्यात आली. अवर्षणप्रवण १४ जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील शेतकऱ्यांपैकी एकूण ९.०९ लाख पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी ८.९६ लाख शिधापत्रिकांची आधार जोडणी जानेवारी, २०२१ पर्यंत करण्यात आली. जानेवारी, २०२१ पर्यंत राज्यातील ५२,५३२ रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्य वितरणाकरिता पॉईंट ऑफ सेल हे उपकरण बसविण्यात आले. सन २०१९-२० करिता, पॉईंट ऑफ सेल या उपकरणाद्वारे अन्नधान्याचे वितरण केल्याच्या परिणामी अन्नधान्याच्या उचलीत सुमारे ७.५३ हजार मे.टन घट झाली आहे.

४.३०.२ मे, २०१८ मध्ये राज्य शासनाने अन्नधान्याकरिता शासनावर अवलंबून असलेल्या समाजातील कमकुवत वर्गास धान्य उपलब्धता व लाभ देण्याच्या हेतूने सर्व रास्त भाव दुकानांमध्ये आधार इनेबल्ड पब्लिक डिस्ट्रिब्युशन सिस्टम (AePDS) सुरू केली आणि त्याचबरोबर आंतरराज्य व राज्यांतर्गत पोर्टेबिलिटीची सुविधा सुरु केली. जानेवारी ,२०२१ मध्ये सुमारे १.४३ कोटी कुटुंबांनी आधार बेस बायोमेट्रिक अधिप्रमाणनद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

४.३०.३ 'वन नेशन, वन रेशन कार्ड' ही योजना दि.१ जानेवारी, २०२० पासून देशात लागू करण्यात आली. शिधापत्रिका पोर्टेबिलिटीच्या माध्यमातून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत शिधापत्रिकाधारकांना अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याची नवीन शिधापत्रिकेविना देशभरातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून पॉईंट ऑफ सेल उपकरणाद्वारे उचल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या प्रणालीच्या माध्यमातून रोजगार व इतर कारणाकरिता आपले राहण्याचे ठिकाण वारंवार बदलणाऱ्या स्थलांतरीत लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अन्नधान्य इतर राज्यातील / केंद्रशासित प्रदेशातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून घेणे शक्य झाले आहे. लाभार्थ्यांना सद्य:स्थितीतील शिधापत्रिकांवरील १२ अंकी क्रमांकाचा वापर करुन आधार अधिप्रमाणनद्वारे धान्य वितरीत करण्यात येते. योजनेच्या सुरुवातीपासून जानेवारी, २०२१ पर्यंत राज्यातील ४,३८१ शिधापत्रिकाधारकांनी इतर राज्यातून आणि इतर राज्यातील ६०९ शिधापत्रिकाधारकांनी या राज्यात अन्नधान्याची उचल केली आहे.

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

४.३१ राज्याने ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग स्थापन केला आहे. राज्य आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असून औरंगाबाद आणि नागपूर या दोन ठिकाणी खंडपीठे आहेत. राज्यात कोल्हापूर, पुणे, अमरावती आणि नाशिक येथे राज्य आयोगाचे सर्किट बेंच स्थापन करण्यात आले आहेत. राज्यात प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि तक्रारींचा ओघ विचारात घेऊन मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे आणि नागपूर येथे अतिरिक्त जिल्हा आयोग स्थापन करण्यात आले आहेत. ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अन्वये, **₹** एक कोटी ते **₹** १० कोटी रकमेपर्यंतच्या तक्रारी राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या कार्यकक्षेत असून **₹** एक कोटी व त्यापेक्षा कमी रकमेच्या तक्रारी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या कार्यकक्षेत आहेत. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्याकडील तक्रारींचे संनियंत्रण करण्याकरिता कॉम्प्युटरायझेशन अँड कॉम्प्युटर नेटवर्कींग ऑफ कन्झुमर फोरम्स इन इंडिया (CONFONET) प्रणाली विकसित करण्यात आली आहे. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगासह ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्या स्थापनेपासून एकूण ३,७०,५८२ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी २,६०,५१४ तक्रारींचे डिसेंबर, २०२० पर्यंत निवारण करण्यात आले आहे.

* * * * *

## परिशिष्ट ४.१

## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी व मादक पदार्थ | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | -- |
| २०१०-११ | १८४ | १७४ | २९७ | ११४ | १५० | १८१ | १०.९ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | ३२६ | ११९ | १६२ | १९८ | ९.१ |
| २०१२-१३ | २२२ | २४३ | ३८३ | १२५ | १७२ | २१८ | १०.५ |
| २०१३-१४ | २४२ | २६४ | ४३४ | १३१ | १९२ | २४१ | १०.२ |
| २०१४-१५ | २४९ | २९३ | ४६७ | १३३ | २०० | २५१ | ४.२ |
| २०१५-१६ | २६२ | ३२५ | ४४६ | १३५ | २०५ | २५८ | २.८ |
| २०१६-१७ | २७१ | ३५२ | ४६३ | १३७ | २०९ | २६६ | ३.२ |
| २०१७-१८ | २७० | ४१० | ४९८ | १३९ | २०८ | २७० | १.७ |
| २०१८-१९ | २७२ | ४४४ | ५१३ | १४३ | २१३ | २७५ | १.७ |
| २०१९-२० | ३०९ | ४५० | ५३४ | १४७ | २१९ | २९९ | ८.७ |
| २०२०-२१@ | ३३१ | ४६८# | ५६५ | १५२# | २२८# | ३१८# | ६.०# |
| एप्रिल २०२० | ३२० | -- | ५७० | -- | -- | -- | -- |
| मे २०२० | ३२२ | -- | ५७१ | -- | -- | -- | -- |
| जून २०२० | ३२६ | ४६७ | ५४६ | १५२ | २२४ | ३११ | ५.५ |
| जुलै २०२० | ३३२ | ४७१ | ५६३ | १५२ | २२७ | ३१७ | ७.२ |
| ऑगस्ट २०२० | ३३५ | ४६९ | ५६५ | १५१ | २२८ | ३१९ | ६.७ |
| सप्टेंबर २०२० | ३३५ | ४६८ | ५६८ | १५१ | २३० | ३२० | ६.१ |
| ऑक्टोबर २०२० | ३४२ | ४६५ | ५६७ | १५१ | २३० | ३२३ | ७.२ |
| नोव्हेंबर २०२० | ३४३ | ४६७ | ५६७ | १५२ | २३१ | ३२४ | ६.३ |
| डिसेंबर २०२० | ३२४ | ४६९ | ५७० | १५२ | २३० | ३१४ | २.९ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. @ ९ महिन्यांची सरासरी # माहे जुन ते डिसेंबर या महिन्यांची सरासरी

टीप - चलनवाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

## परिशिष्ट ४.२

## महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी व मादक पदार्थ | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४५.८०** | **१.५४** | **१०.२८** | **७.५१** | **३४.८७** | **१००.००** | -- |
| २०१०-११ | १८६ | १६९ | २७८ | ११८ | १४३ | १७५ | ११.४ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | २९७ | १२६ | १५४ | १८९ | ७.९ |
| २०१२-१३ | २२४ | २३३ | ३४९ | १३२ | १६० | २०८ | १०.१ |
| २०१३-१४ | २४८ | २६२ | ३९६ | १३७ | १७५ | २३० | १०.३ |
| २०१४-१५ | २५४ | २८८ | ४२९ | १३९ | १८५ | २४० | ४.५ |
| २०१५-१६ | २६८ | ३२२ | ४०८ | १४२ | १९१ | २४७ | ३.० |
| २०१६-१७ | २७८ | ३४७ | ४२६ | १४५ | १९४ | २५५ | ३.२ |
| २०१७-१८ | २७८ | ३८६ | ४६२ | १४६ | १९५ | २६० | २.० |
| २०१८-१९ | २७८ | ४१७ | ५०३ | १४७ | २०१ | २६७ | २.५ |
| २०१९-२० | ३०८ | ४३४ | ५०७ | १५० | २०६ | २८३ | ६.२ |
| २०२०-२१@ | ३३३ | ४५३# | ५४३ | १५४# | २१६# | ३०३# | ६.७# |
| एप्रिल २०२० | ३२२ | -- | ५६२ | -- | -- | -- | -- |
| मे २०२० | ३२४ | -- | ५४९ | -- | -- | -- | -- |
| जून २०२० | ३३० | ४४७ | ५२७ | १५३ | २११ | २९७ | ६.४ |
| जुलै २०२० | ३३७ | ४५० | ५३८ | १५३ | २१४ | ३०३ | ७.१ |
| ऑगस्ट २०२० | ३३७ | ४५२ | ५४० | १५४ | २१५ | ३०४ | ७.४ |
| सप्टेंबर २०२० | ३३७ | ४५५ | ५४० | १५३ | २१६ | ३०४ | ७.२ |
| ऑक्टोबर २०२० | ३४२ | ४५४ | ५४० | १५४ | २१७ | ३०७ | ७.७ |
| नोव्हेंबर २०२० | ३४५ | ४५७ | ५४० | १५४ | २१८ | ३०८ | ७.२ |
| डिसेंबर २०२० | ३२६ | ४५८ | ५४८ | १५५ | २१९ | ३०१ | ४.१ |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. @ ९ महिन्यांची सरासरी # माहे जुन ते डिसेंबर या महिन्यांची सरासरी

टीप - चलनवाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

## परिशिष्ट ४.३

## राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालयाने महाराष्ट्राकरीता परिगणित केलेले ग्रामीण, नागरी व एकत्रित गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २०१२)

| गट | भारांक | वर्ष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१# |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **ग्रामीण** | | | | | | | | |
| खाद्यपदार्थ व पेये | ५४.२८ | १२०.८ | १२९.२ | १३६.५ | १४०.६ | १३९.३ | १४५.०@ | १५८.२ |
| पान, तंबाखू व मादक पदार्थ | २.७२ | ११४.६ | १३०.५ | १४०.५ | १५५.० | १५८.६ | १५८.५@ | १६७.३ |
| कापड व पादत्राणे | ७.५६ | ११९.० | १२७.३ | १३५.० | १४५.९ | १४८.७ | १४९.०@ | १५१.६ |
| निवास | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| इंधन व दिवाबत्ती | ७.८६ | ११६.३ | १२४.७ | १२९.४ | १४१.१ | १४७.५ | १४८.१@ | १५४.० |
| संकीर्ण | २७.५८ | ११३.६ | ११९.० | १२६.९ | १३६.७ | १४४.४ | १४९.३@ | १५५.६ |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | ११८.२ | १२६.० | १३३.३ | १४०.४ | १४२.६ | १४७.३ | १५६.९ |
| चलनवाढ | -- | ६.१ | ६.६ | ५.८ | ५.३ | १.६ | ३.३ | ५.७ |
| **नागरी** | | | | | | | | |
| खाद्यपदार्थ व पेये | ३४.३८ | १२३.३ | १२८.४ | १३३.४ | १३५.४ | १३७.८ | १४८.५@ | १६२.२ |
| पान, तंबाखू व मादक पदार्थ | ०.९७ | ११८.५ | १३४.१ | १५२.६ | १६२.९ | १६९.२ | १७४.३@ | १८५.० |
| कापड व पादत्राणे | ५.१४ | ११७.९ | १२२.२ | १२६.७ | १३१.९ | १३८.४ | १४१.९@ | १४७.२ |
| निवास | २४.७४ | १११.७ | ११५.३ | ११९.६ | १२७.० | १३४.६ | १३९.९@ | १४६.४ |
| इंधन व दिवाबत्ती | ५.२१ | ११२.९ | ११६.० | ११८.५ | १२२.२ | १२७.३ | १३१.७@ | १३९.८ |
| संकीर्ण | २९.५६ | ११२.१ | ११४.२ | ११७.६ | १२१.५ | १२७.४ | १३१.४@ | १४४.१ |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | ११६.२ | १२०.१ | १२४.४ | १२८.६ | १३३.७ | १४०.५ | १५१.२ |
| चलनवाढ | -- | ५.२ | ३.३ | ३.६ | ३.४ | ४.० | ५.१ | ६.७ |
| **एकत्रित** | | | | | | | | |
| खाद्यपदार्थ व पेये | -- | १२२.२ | १२८.८ | १३४.८ | १३७.७ | १३८.५ | १४७.०@ | १६०.४ |
| पान, तंबाखू व मादक पदार्थ | -- | ११६.२ | १३२.० | १४५.५ | १५८.३ | १६३.० | १६५.१@ | १७४.६ |
| कापड व पादत्राणे | -- | ११८.४ | १२४.४ | १३०.२ | १३७.९ | १४२.८ | १४४.९@ | १४९.१ |
| निवास | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| इंधन व दिवाबत्ती | -- | ११४.४ | ११९.७ | १२३.२ | १३०.३ | १३६.० | १३८.८@ | १४५.९ |
| संकीर्ण | -- | ११२.६ | ११५.७ | १२०.६ | १२६.३ | १३२.८ | १३७.१@ | १४७.८ |
| सर्वसाधारण निर्देशांक | -- | ११६.९ | १२२.० | १२७.३ | १३२.५ | १३६.७ | १४२.८ | १५३.१ |
| चलनवाढ | -- | ५.५ | ४.४ | ४.४ | ४.१ | ३.१ | ४.४ | ६.३ |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय, भारत सरकार    @ ११ महिन्यांची सरासरी    # माहे ऑगस्ट ते डिसेंबर या महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.४

## महाराष्ट्र व अखिल भारतातील शेत मजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष - १९८६-८७)

| वर्ष / महिना | शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | | ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | अखिल भारत | | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २०१०-११ | ६३३ | ६०० | ५७२ | ५६४ | ६२९ | ५९५ | ५७३ | ५६४ |
| २०११-१२ | ७०४ | ६७६ | ६०२ | ६११ | ६९७ | ६६८ | ६०३ | ६११ |
| २०१२-१३ | ७७० | ७४४ | ६५८ | ६७२ | ७६३ | ७३७ | ६६० | ६७३ |
| २०१३-१४ | ८१८ | ७९३ | ७३७ | ७५० | ७९३ | ७८६ | ७३९ | ७५१ |
| २०१४-१५ | ८७३ | ८४८ | ७७८ | ८०० | ८६१ | ८४१ | ७८२ | ८०१ |
| २०१५-१६ | ९३० | ८९७ | ८०७ | ८३५ | ९१५ | ८८७ | ८१० | ८३६ |
| २०१६-१७ | ९९३ | ९५० | ८४१ | ८७० | ९८१ | ९४३ | ८४७ | ८७५ |
| २०१७-१८ | ९७५ | ९५७ | ८४६ | ८८९ | ९६३ | ९५१ | ८५२ | ८९५ |
| २०१८-१९ | ९६३ | ९६७ | ८५० | ९०७ | ९५० | ९६३ | ८५५ | ९१५ |
| २०१९-२० | ११३१ | १०९४ | ९३२ | ९८० | १११३ | १०८४ | ९३७ | ९८६ |
| २०२०-२१@ | १२२८ | ११६९ | ९९३ | १०३३ | १२०३ | ११५४ | ९९८ | १०३९ |
| एप्रिल २०२० | १२०५ | ११५० | ९७१ | १०१४ | ११८० | ११३६ | ९७५ | १०१९ |
| मे २०२० | १२१७ | ११५९ | ९७७ | १०१९ | ११९१ | ११४४ | ९८२ | १०२५ |
| जून २०२० | १२२३ | ११६२ | ९७५ | १०१८ | ११९८ | ११४८ | ९८० | १०२४ |
| जुलै २०२० | १२२३ | ११६३ | ९७८ | १०२१ | ११९५ | ११४७ | ९८४ | १०२८ |
| ऑगस्ट २०२० | १२२८ | ११६६ | ९८६ | १०२६ | १२०० | ११५१ | ९९१ | १०३३ |
| सप्टेंबर २०२० | १२३० | ११७० | ९९९ | १०३७ | १२०३ | ११५४ | १००४ | १०४३ |
| ऑक्टोबर २०२० | १२५० | ११८५ | १०१७ | १०५२ | १२२३ | ११६९ | १०२२ | १०५७ |
| नोव्हेंबर २०२० | १२५२ | ११८७ | १०२५ | १०६० | १२२८ | ११७२ | १०३१ | १०६५ |
| डिसेंबर २०२० | १२२८ | ११७७ | १००५ | १०४७ | १२०५ | ११६२ | १०१० | १०५३ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.५

## औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००१)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी, तंबाखू व मादक पदार्थ | इंधन व दिवाबत्ती | निवास | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४६.२०** | **२.२७** | **६.४३** | **१५.२७** | **६.५७** | **२३.२६** | **१००.००** |
| २०१०-११ | १९४ | १६८ | १६३ | २०१ | १३६ | १५७ | १८० |
| २०११-१२ | २०६ | १९४ | १८८ | २२२ | १५५ | १६८ | १९५ |
| २०१२-१३ | २३० | २२३ | २१४ | २३८ | १७० | १८२ | २१५ |
| २०१३-१४ | २५९ | २४९ | २३० | २५४ | १८१ | १९५ | २३६ |
| २०१४-१५ | २८० | २८४ | २४३ | २७३ | १९२ | २१० | २५४ |
| २०१५-१६ | २९३ | ३०५ | २४९ | २८५ | १९८ | २१६ | २६५ |
| २०१६-१७ | ३०५ | ३२७ | २४९ | २९८ | २०६ | २२६ | २७६ |
| २०१७-१८ | ३१० | ३५६ | २६० | ३१३ | २१४ | २३५ | २८४ |
| २०१८-१९ | ३१२ | ३७९ | २७१ | ३८२ | २२१ | २४६ | ३०० |
| २०१९-२० | ३३५ | ३९३ | २८५ | ४३५ | २२७ | २५५ | ३२३ |
| एप्रिल २०२० | ३४१ | ३९९ | २९७ | ४५० | २२९ | २५६ | ३२९ |
| मे २०२० | ३४२ | ४०१ | २९५ | ४५० | २२९ | २५६ | ३३० |
| जून २०२० | ३४६ | ४०४ | २९७ | ४५० | २२९ | २५७ | ३३२ |
| जुलै २०२० | ३५० | ४०६ | २९९ | ४६५ | २२९ | २६० | ३३६ |
| ऑगस्ट २०२० | ३५२ | ४०८ | २९९ | ४६५ | २३० | २६० | ३३८ |
| | | | | | | | (पायाभूत वर्ष -२०१६) |
| सप्टेंबर २०२० | ११९.७ | १३१.६ | १२५.६ | ११३.५ | ११७.६ | ११६.८ | ११८.१ |
| ऑक्टोबर २०२० | १२३.० | १३२.५ | १२६.४ | ११३.५ | ११७.४ | ११७.० | ११९.५ |
| नोव्हेंबर २०२० | १२३.६ | १३३.१ | १२६.८ | ११३.५ | ११७.४ | ११७.२ | ११९.९ |
| डिसेंबर २०२० | ११९.७ | १३३.३ | १३२.४ | ११३.५ | ११७.६ | ११७.६ | ११८.८ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार.

# परिशिष्ट ४.६

## महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००१) (केंद्रिय केंद्रे)

| वर्ष / महिना | मुंबई | | सोलापूर | | नागपूर | | पुणे | | नाशिक | | ठाणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **भारांक** | **४८.९** | **१००.०** | **५४.७** | **१००.०** | **४३.१** | **१००.०** | **३९.८** | **१००.०** | **४१.४** | **१००.०** | | |
| २०१०-११ | १९१ | १७८ | १८९ | १८२ | २०५ | २०७ | २०३ | १८५ | २०२ | १८६ | | |
| २०११-१२ | २०८ | १९६ | २१४ | २०४ | २१६ | २२४ | २२६ | २०४ | २१६ | २०८ | | |
| २०१२-१३ | २३२ | २१८ | २२८ | २२० | २४४ | २४६ | २४७ | २२१ | २३३ | २२८ | | |
| २०१३-१४ | २६० | २४२ | २६० | २४६ | २८० | २६८ | २८० | २४२ | २५८ | २४४ | | |
| २०१४-१५ | २८४ | २६२ | २८३ | २६५ | २९४ | २८१ | २९९ | २५७ | २८० | २६१ | | |
| २०१५-१६ | ३०६ | २८० | ३०६ | २८४ | ३१७ | २९८ | ३१६ | २६९ | २८९ | २७४ | | |
| २०१६-१७ | ३१२ | २८६ | ३१६ | २९४ | ३२५ | ३०८ | ३३१ | २७७ | ३०३ | २८७ | | |
| २०१७-१८ | ३१४ | २९१ | ३११ | २९५ | ३२४ | ३१७ | ३२३ | २८० | ३०५ | २९७ | | |
| २०१८-१९ | ३१४ | २९७ | ३१८ | ३११ | ३२३ | ३५९ | ३४२ | ३१६ | ३०४ | ३३३ | | |
| २०१९-२० | ३३८ | ३१६ | ३४५ | ३४२ | ३४७ | ४०१ | ३८४ | ३५३ | ३३४ | ३७० | | |
| एप्रिल २०२० | ३४० | ३२० | ३४९ | ३४९ | ३४३ | ४०४ | ४०३ | ३६७ | ३४९ | ३८१ | | |
| मे २०२० | ३४६ | ३२४ | ३५३ | ३५२ | ३४८ | ४०६ | ४०२ | ३६७ | ३५६ | ३८४ | | |
| जून २०२० | ३५१ | ३२६ | ३५५ | ३५३ | ३५६ | ४१० | ४०२ | ३६७ | ३५८ | ३८५ | | |
| जुलै २०२० | ३५२ | ३३३ | ३५३ | ३५३ | ३६२ | ४१५ | ४०० | ३७२ | ३५६ | ३८७ | | |
| ऑगस्ट २०२० | ३५२ | ३३३ | ३५५ | ३५४ | ३५९ | ४१३ | ४०१ | ३७२ | ३६० | ३८९ | | |
| | | | | | | | | | | | (पायाभूत वर्ष -२०१६) | |
| सप्टेंबर २०२० | ११९.४ | ११३.५ | ११४.० | ११४.९ | ११५.५ | ११६.६ | ११९.९ | ११४.७ | ११७.५ | ११३.७ | ११५.५ | ११२.४ |
| ऑक्टोबर २०२० | १२२.७ | ११४.८ | ११५.३ | ११६.६ | १२०.६ | ११८.४ | १२२.६ | ११५.३ | १२०.१ | ११४.९ | ११९.३ | ११३.३ |
| नोव्हेंबर २०२० | १२०.७ | ११४.० | ११५.० | ११७.० | ११९.३ | ११८.२ | १२४.१ | ११५.८ | १२२.४ | ११६.१ | ११९.५ | ११३.४ |
| डिसेंबर २०२० | ११६.७ | ११२.९ | ११९.१ | ११९.४ | ११८.७ | ११८.६ | १२१.४ | ११५.४ | १२१.० | ११५.९ | ११५.६ | ११२.४ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार

# परिशिष्ट ४.७

## महाराष्ट्रातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २००१) (राज्य केंद्रे)

| वर्ष / महिना | अकोला | | कोल्हापूर | | जळगाव | | नांदेड | | औरंगाबाद | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **भारांक** | **४५.८८** | **१००.००** | **४८.२२** | **१००.००** | **४७.७६** | **१००.००** | **४९.०५** | **१००.००** | **४०.८९** | **१००.००** |
| २०१०-११ | १७० | १७५ | १९१ | १८४ | १९५ | १८६ | १८७ | २०० | १८८ | १८३ |
| २०११-१२ | १८३ | १८८ | २१७ | २०७ | २१८ | २०६ | २१५ | २२७ | २१२ | २०६ |
| २०१२-१३ | २१० | २१६ | २३६ | २२६ | २४१ | २३० | २३२ | २५१ | २३९ | २३४ |
| २०१३-१४ | २३१ | २३८ | २५८ | २४५ | २६२ | २५१ | २६१ | २७५ | २६६ | २५८ |
| २०१४-१५ | २२० | २४३ | २६२ | २५५ | २६६ | २६१ | २७० | २८९ | २७६ | २७३ |
| २०१५-१६ | २५० | २६२ | २७६ | २७० | २७८ | २७२ | ३०४ | ३१४ | २९६ | २९२ |
| २०१६-१७ | २६७ | २८२ | २८८ | २८१ | २८६ | २८५ | ३१८ | ३३१ | ३०३ | ३०८ |
| २०१७-१८ | २७६ | ३११ | २८४ | २९६ | २८२ | ३०३ | ३०५ | ३४३ | २९३ | ३२४ |
| २०१८-१९ | २७७ | ३३२ | २८४ | ३१० | २८५ | ३१८ | ३०५ | ३५९ | २९४ | ३३७ |
| २०१९-२० | २९३ | ३५८ | ३०९ | ३३३ | ३०९ | ३४१ | ३४३ | ३९५ | ३१७ | ३५७ |
| २०२०-२१@ | ३०३ | ३७१ | ३३३ | ३५१ | ३३३ | ३५५ | ३७५ | ४१५ | ३३७ | ३७१ |
| एप्रिल २०२० | २९५ | ३६२ | ३२० | ३४४ | ३१७ | ३४८ | ३५६ | ४०७ | ३२४ | ३६४ |
| मे २०२० | २९९ | ३६१ | ३२४ | ३४३ | ३१९ | ३४७ | ३५६ | ४०५ | ३२९ | ३६३ |
| जून २०२० | ३०० | ३६३ | ३२५ | ३४४ | ३२४ | ३४९ | ३६४ | ४०९ | ३३४ | ३६६ |
| जुलै २०२० | ३०४ | ३६५ | ३३० | ३४६ | ३२४ | ३५० | ३६८ | ४११ | ३३७ | ३६७ |
| ऑगस्ट २०२० | ३०७ | ३६६ | ३३२ | ३४८ | ३२९ | ३५२ | ३७० | ४१२ | ३३९ | ३६८ |
| सप्टेंबर २०२० | ३०० | ३७५ | ३३६ | ३५५ | ३३८ | ३५६ | ३८० | ४१७ | ३३८ | ३७५ |
| ऑक्टोबर २०२० | ३०७ | ३८१ | ३४४ | ३५९ | ३४८ | ३६३ | ३९६ | ४२५ | ३४३ | ३७७ |
| नोव्हेंबर २०२० | ३१० | ३८३ | ३४३ | ३५९ | ३५१ | ३६५ | ३९७ | ४२६ | ३४६ | ३७८ |
| डिसेंबर २०२० | ३०८ | ३८२ | ३३९ | ३५८ | ३४५ | ३६४ | ३९० | ४२३ | ३४३ | ३७७ |

*आधार* - कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.८

## महत्त्वाच्या किंमती निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचे दर

| वर्ष / महिना | चलनवाढीचे दर | | |
|---|---|---|---|
| | औद्योगिक कामगारांसाठी अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष - २००१) | शेत मजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष - १९८६-८७) | ग्रामीण मजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष — १९८६-८७) |
| (१) | (२) | (४) | (५) |
| २०१०-११ | १०.४ | १०.० | १०.० |
| २०११-१२ | ८.४ | ८.२ | ८.३ |
| २०१२-१३ | १०.४ | १०.० | १०.२ |
| २०१३-१४ | ९.७ | ११.७ | ११.५ |
| २०१४-१५ | ७.९ | ६.६ | ६.९ |
| २०१५-१६ | ५.६ | ४.४ | ४.६ |
| २०१६-१७ | ४.१ | ४.२ | ४.२ |
| २०१७-१८ | ३.१ | २.२ | २.३ |
| २०१८-१९ | ५.४ | २.१ | २.२ |
| २०१९-२० | ७.५ | ८.० | ७.७ |
| २०२०-२१@ | -- | ६.६ | ६.४ |
| एप्रिल २०२० | ५.४ | ८.८ | ८.५ |
| मे २०२० | ५.१ | ८.४ | ८.१ |
| जून २०२० | ५.१ | ७.२ | ७.० |
| जुलै २०२० | ५.३ | ६.६ | ६.५ |
| ऑगस्ट २०२० | ५.६ | ६.३ | ६.३ |
| सप्टेंबर २०२० | -- | ६.३ | ६.१ |
| ऑक्टोबर २०२० | -- | ६.६ | ६.४ |
| नोव्हेंबर २०२० | -- | ६.० | ५.९ |
| डिसेंबर २०२० | -- | ३.३ | ३.३ |

*आधार* - श्रम केंद्र, सिमला, भारत सरकार. @ ९ महिन्यांची सरासरी

टीप - चलनवाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

## परिशिष्ट ४.९

## अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष - २०११-१२)

| वर्ष/ महिना | प्राथमिक वस्तू | इंधन व वीज | निर्मित वस्तू | सर्व वस्तू | चलनवाढ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| **भारांक** | **२२.६२** | **१३.१५** | **६४.२३** | **१००.००** | -- |
| २०१२-१३ | १११.४ | १०७.१ | १०५.३ | १०६.९ | -- |
| २०१३-१४ | १२२.४ | ११४.७ | १०८.५ | ११२.५ | ५.२ |
| २०१४-१५ | १२५.१ | १०७.७ | १११.२ | ११३.९ | १.३ |
| २०१५-१६ | १२४.६ | ८६.५ | १०९.२ | १०९.७ | (-) ३.७ |
| २०१६-१७ | १२८.९ | ८६.३ | ११०.७ | १११.६ | ३.६ |
| २०१७-१८ | १३०.६ | ९३.३ | ११३.८ | ११४.९ | २.९ |
| २०१८-१९ | १३४.२ | १०४.१ | ११७.९ | ११९.८ | ४.३ |
| २०१९-२० | १४३.३ | १०२.२ | ११८.३ | १२१.८ | १.७ |
| २०२०-२१@* | १४५.३ | ९०.० | ११९.९ | १२१.७ | ०.० |
| एप्रिल २०२० | १३७.८ | ८९.८ | ११८.७ | ११९.२ | (- ) १.६ |
| मे २०२० | १३७.३ | ८०.३ | ११८.२ | ११७.५ | (- ) ३.४ |
| जून २०२० | १४०.९ | ८५.६ | ११८.६ | ११९.३ | (- ) १.८ |
| जुलै २०२० | १४५.१ | ९०.७ | ११८.७ | १२१.० | (- ) ०.२ |
| ऑगस्ट २०२० | १४६.७ | ९२.० | ११९.४ | १२२.० | ०.४ |
| सप्टेंबर २०२० | १४८.८ | ९१.९ | १२०.१ | १२२.९ | १.३ |
| ऑक्टोबर २०२० | १५१.८ | ९०.९ | १२०.४ | १२३.६ | १.३ |
| नोव्हेंबर २०२० | १५२.८ | ९४.२ | १२१.६ | १२५.१ | २.३ |
| डिसेंबर २०२०* | १४६.५ | ९४.२ | १२३.० | १२४.५ | १.२ |

*आधार* - आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार   @ ९ महिन्यांची सरासरी   * अस्थायी

## परिशिष्ट ४.१०

## जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर, २०२० रोजी)

| जिल्हा | पिवळी | केशरी | | | अन्नपूर्णा | शुभ्र | एकूण शिधापत्रिका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राधान्य कुटुंब केशरी | प्राधान्य कुटुंब शेतकरी | बिगर प्राधान्य कुटुंब केशरी | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| मुंबई | ४४,४०७ | १९,००,३०२ | ० | १३,५२,९१२ | ० | ९,१६,८६२ | ४२,१४,४८३ |
| ठाणे | १,०४,८७६ | ४७,०७६ | ० | ५९,४६२ | ० | ८,८३० | २,२०,२४४ |
| पालघर | १,९९,८५८ | १,९३,२७६ | ० | २,६८,८५२ | ३४५ | ४०,३६८ | ७,०२,६९९ |
| रायगड | १,८३,९३६ | २,४५,१६० | ० | २,०८,९८३ | ० | १,१२,११३ | ७,५०,१९२ |
| रत्नागिरी | १,०७,९७० | १,८३,७८७ | ० | १,०२,८३६ | १७३ | ४३,३०५ | ४,३८,०७१ |
| सिंधुदुर्ग | ६९,२०२ | १,०७,२५० | ० | ३५,८३२ | ० | २१,२४४ | २,३३,५२८ |
| नाशिक | ४,८४,८३६ | २,९७,७५६ | ० | ४,७७,७२९ | ० | ८७,९७० | १३,४८,२९१ |
| धुळे | २,१९,८३० | ७३,४४१ | ० | १,२९,८५९ | ० | १७,४७७ | ४,४०,६०७ |
| नंदुरबार | २,०७,२८५ | ४६,६८१ | ० | ८३,६०९ | ० | ८,०९१ | ३,४५,६६६ |
| जळगाव | ३,५२,३९१ | २,५६,३७७ | ० | ३,२१,२२६ | ० | ७४,८२० | १०,०४,८१४ |
| अहमदनगर | ३,६८,२१४ | २,९६,८४० | ० | ३,७१,७५२ | ० | ५७,६२२ | १०,९४,४२८ |
| पुणे | २,१२,६७९ | ७,६७,७१० | ० | ७,७६,०२२ | ० | २,११,२०६ | १९,६७,६१७ |
| सातारा | १,४२,५९८ | २,८४,५८२ | ० | २,४६,७७५ | ० | ५७,३५९ | ७,३१,३१४ |
| सांगली | ९६,६९६ | ३,०५,४४९ | ० | २,५१,८१५ | ४४४ | ७८,४५५ | ७,३२,८५९ |
| सोलापूर | २,३६,३४२ | २,६०,२११ | ० | ३,२३,१९१ | ० | ७४,८१९ | ८,९४,५६३ |
| कोल्हापूर | १,९९,०११ | ३,६१,८३० | ० | ३,२७,०३१ | ० | ९५,८३० | ९,८३,७०२ |
| औरंगाबाद | २,४७,५२४ | २,००,६६४ | ९४,७९८ | २,४४,६९३ | २,०७८ | १२,२७४ | ८,०२,०३१ |
| जालना | १,५६,५९१ | १,४६,२८८ | ३७,०२० | ३५,६७० | १,०८८ | २,५३० | ३,७९,१८७ |
| परभणी | १,१५,८७६ | १,४१,५२३ | ६९,१३४ | ८३,४१९ | १,५२७ | ३,२१० | ४,१४,६८९ |
| हिंगोली | ८८,२२६ | ९२,९१९ | ३०,४७५ | ३५,८८२ | ४८५ | २,४६० | २,५०,४४७ |
| बीड | ६३,९०९ | ५२,७६४ | ४३,७८५ | २३,४०९ | ४९८ | २,८९१ | १,८७,२५६ |
| नांदेड | २,२४,९२१ | २,८५,७३३ | १,२२,४०१ | १,१६,७४६ | १,२१२ | १२,१३४ | ७,६३,१४७ |
| उस्मानाबाद | १,५३,०८८ | ८३,२१५ | ८१,४४६ | ४१,६१२ | ० | १२,२६३ | ३,७१,६२४ |
| लातूर | १,२७,९८४ | २,४४,३३२ | ६६,३०० | ४८,४७० | ० | २२,१८४ | ५,०९,२७० |
| बुलढाणा | २,२०,६६४ | १,८६,५४५ | ८८,४३७ | ८९,९१० | ० | २२,४२५ | ६,०७,९८१ |
| अकोला | १,१५,७१२ | १,४७,०४० | ४९,९२९ | १,०४,६६० | ० | २२,५२० | ४,३९,८६१ |
| वाशिम | १,०८,०६४ | ९९,६१६ | ५३,०१२ | ३३,१४१ | ० | १४,४१५ | ३,०८,२४८ |
| अमरावती | २,९४,६८१ | १,२२,७४० | १,२६,७७५ | १,१८,१४८ | ० | २५,६११ | ६,८७,९५५ |
| यवतमाळ | २,७७,४७१ | १,४०,५६४ | ७०,९४८ | १,६५,०५६ | १,१४९ | २२,९१६ | ६,७८,१०४ |
| वर्धा | ९२,३०१ | १,७२,४१६ | १५,८५३ | १५,३१९ | ० | ४,१५५ | ३,००,०४४ |
| नागपूर | २,४१,७१९ | ५,१८,९४० | ० | ४,०३,४६८ | ० | ७९,६०६ | १२,४३,७३३ |
| भंडारा | १,४१,४५० | ८४,४७९ | ० | ३६,८१८ | ० | १४,८६५ | २,७७,६१२ |
| गोंदिया | १,६३,५३० | ५१,३२१ | ० | ७३,२६४ | ० | ६,३४८ | २,९४,४६३ |
| चंद्रपूर | २,३०,६५० | १,७०,७४० | ० | ५५,१८९ | ० | २१,७४४ | ४,७८,३२३ |
| गडचिरोली | १,२३,३७६ | ६७,९११ | ० | २९,६०६ | ० | ६,७६० | २,२७,६५३ |
| **महाराष्ट्र राज्य** | **६४,१७,८६८** | **८६,३७,४७८** | **९,५०,३१३** | **७०,९२,३६६** | **८,९९९** | **२२,१७,६८२** | **२,५३,२४,७०६** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ४.११

## अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना वितरण केलेला तांदूळ व गहू

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (२) + (३) | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (५) + (६) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २००१-०२ (एकूण) | ०.०२ | ५.१६ | ५.१८ | ०.०५ | ८.४८ | ८.५३ |
| पैकी, लसाविव्य | ०.०२ | ५.०० | ५.०२ | ०.०४ | ८.२७ | ८.३१ |
| २०१४-१५ (एकूण) | २.१३ | १७.९२ | २०.०५ | २.९३ | २२.७२ | २५.६५ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.८३ | १६.७७ | १८.६० | २.६० | २१.२२ | २३.८२ |
| २०१५-१६ (एकूण) | २.२८ | १९.१५ | २१.४३ | २.९२ | २२.१७ | २५.०९ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २.२८ | १८.३४ | २०.६२ | २.९२ | २०.९१ | २३.८३ |
| २०१६-१७ (एकूण) | २.०२ | १८.१० | २०.१२ | ३.०१ | २३.०५ | २६.०६ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २.०२ | १६.९२ | १८.९४ | ३.०१ | २३.०५ | २६.०६ |
| २०१७-१८ (एकूण) | १.९९ | १८.१५ | २०.१४ | २.९८ | २२.६४ | २५.६२ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.९९ | १६.९७ | १८.९६ | २.९८ | २०.८३ | २३.८१ |
| २०१८-१९ (एकूण) | १.५७ | १६.९२ | १८.४९ | २.३३ | २१.३८ | २३.७१ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.५७ | १५.९७ | १७.५४ | २.३३ | १९.६४ | २१.९७ |
| २०१९-२० (एकूण) | २.११ | १९.११ | २१.२२ | ३.१४ | २४.५० | २७.६४ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.५९ | १५.७८ | १७.३६ | २.३५ | १९.७८ | २२.१३ |
| २०२०-२१ (एकूण) + | १.५५ | १४.२७ | १५.८२ | २.३२ | १८.२६ | २०.५७ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १.२५ | १२.१७ | १३.४२ | १.८४ | १५.४७ | १७.३२ |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. + डिसेंबर पर्यंत

टीप - १. लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था (लसाविव्य) अंतर्गत व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ अंतर्गत आकडेवारीमध्ये अंत्योदय अन्न योजनेची आकडेवारी समाविष्ट केलेली आहे.

२. फेब्रुवारी, २०१४ पासून प्राधान्य गट कुटुंब व अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नियतन प्राप्त होत आहे.

# परिशिष्ट ४.१२

## भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन

(लाख मे.टन)

| वर्ष | तांदूळ | गहू |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २००१-०२ (एकूण) | ९.२३ | १७.१३ |
| पैकी, लसाविव्य | ६.५५ | १२.१६ |
| २०१४-१५ (एकूण) | २१.५७ | २७.४७ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १९.७८ | २५.२८ |
| २०१५-१६ (एकूण) | २१.३० | २७.३७ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २०.३० | २५.८८ |
| २०१६-१७ (एकूण) | २१.५६ | २७.९८ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २०.२१ | २५.८५ |
| २०१७-१८ (एकूण) | २१.५१ | २७.९८ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २०.२१ | २५.८४ |
| २०१८-१९ (एकूण) | २१.४० | २७.९० |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २०.२१ | २५.८४ |
| २०१९-२० (एकूण) | २१.२२ | २७.६४ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | २०.१० | २५.७० |
| २०२०-२१ (एकूण) + | १५.८२ | २०.५७ |
| पैकी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ | १५.०५ | १९.२४ |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. + डिसेंबर पर्यंत

टीप - १. लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था (लसाविव्य) अंतर्गत व राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम,२०१३ अंतर्गत आकडेवारीमध्ये अंत्योदय अन्न योजनेची आकडेवारी समाविष्ट केलेली आहे.

२. फेब्रुवारी, २०१४ पासून प्राधान्य गट कुटुंब व अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नियतन प्राप्त होत आहे.

## परिशिष्ट ४.१३

## जिल्हावार उपलब्ध गोदामांची संख्या, क्षमता व रास्त भाव दुकानांची संख्या

| जिल्हा | उपलब्ध गोदामे (डिसेंबर, २०२० पर्यंत) | | रास्त भाव दुकानांची संख्या (डिसेंबर, २०२० पर्यंत) |
|---|---|---|---|
| | संख्या | क्षमता (मे.टन) | |
| (१) | (२) | (३) | (४) |
| मुंबई | ७ | ५,४८१ | २,८३६ |
| ठाणे | १५ | ७,५०० | २,०३५ |
| पालघर | २१ | ८,९०० | १,०८२ |
| रायगड | २९ | १८,४४० | १,३७१ |
| रत्नागिरी | २८ | १६,७४० | ९४६ |
| सिंधुदुर्ग | १७ | ९,६६० | ४३४ |
| नाशिक | २८ | २७,७५० | २,६०८ |
| धुळे | २३ | १९,८२० | ९८० |
| नंदुरबार | २२ | ११,००० | १,०६० |
| जळगाव | ३५ | २९,०६० | १,९३३ |
| अहमदनगर | ३८ | ३९,०६० | १,८८३ |
| पुणे | २५ | २७,२३० | २,५७३ |
| सातारा | ३५ | २३,८५० | १,६८१ |
| सांगली | ३० | १९,९३० | १,३५६ |
| सोलापूर | ३८ | ४५,८०४ | १,८७२ |
| कोल्हापूर | २३ | २०,५५० | १,६३७ |
| औरंगाबाद | १६ | १९,६२६ | १,८०२ |
| जालना | ११ | १६,४०० | १,२८० |
| परभणी | १८ | ११,१८० | १,१८३ |
| हिंगोली | १० | १०,३४० | ७९७ |
| बीड | ३५ | ३४,०६० | १,९६८ |
| नांदेड | ४४ | २२,७४० | १,९९८ |
| उस्मानाबाद | २३ | १७,७०० | १,०७४ |
| लातूर | २२ | २०,२४० | १,३५० |
| बुलढाणा | ६५ | ३६,८६१ | १,५३६ |
| अकोला | १९ | १३,८२० | १,०६१ |
| वाशिम | १७ | १०,३२० | ७७६ |
| अमरावती | ३७ | २०,०२० | १,९१३ |
| यवतमाळ | ३६ | २०,३२० | २,०३९ |
| वर्धा | १४ | ८,७८५ | ८५५ |
| नागपूर | ५२ | ७५,३६३ | १,९७८ |
| भंडारा | १७ | १०,१३० | ८८८ |
| गोंदिया | १३ | १२,२१० | ९९८ |
| चंद्रपूर | ३० | २०,३४० | १,५३४ |
| गडचिरोली | ३२ | २०,५०० | १,१९६ |
| **महाराष्ट्र राज्य** | **९२५** | **७,३१,७३०** | **५२,५१३** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ४.१४

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०१९-२० करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण

(मे.टन)

| जिल्हा | राज्य शासनाचे नियतन | | | भारतीय अन्न महामंडळाकडून उचल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई | ४,७०२ | ३,९७३ | ८,६७५ | ३,४४८ | २,९०५ | ६,३५३ |
| ठाणे | १४,१८६ | ६,२८८ | २०,४७४ | १३,०२० | ६,०७७ | १९,०९७ |
| पालघर | २८,२०५ | १२,५१९ | ४०,७२४ | २६,२५४ | ११,५८७ | ३७,८४१ |
| रायगड | २४,३५७ | ९,७४१ | ३४,०९८ | २४,८५४ | ९,७४१ | ३४,५९५ |
| रत्नागिरी | १२,७०२ | ५,६३७ | १८,३३९ | ११,०१४ | ४,९०७ | १५,९२१ |
| सिंधुदुर्ग | ७,२१३ | ३,२०० | १०,४१३ | ६,५६९ | २,७३५ | ९,३०४ |
| नाशिक | २३,३८६ | ५२,७०५ | ७६,०९१ | २०,७१४ | ४६,८८७ | ६७,६०१ |
| धुळे | १०,६२५ | २१,७११ | ३२,३३६ | ८,९०४ | १९,२२९ | २८,१३३ |
| नंदुरबार | २५,३७९ | २०,६०२ | ४५,९८१ | २२,२२४ | १६,७४७ | ३८,९७२ |
| जळगाव | १८,५६० | ३८,२९० | ५६,८५० | १५,७११ | ३५,३३७ | ५१,०४८ |
| अहमदनगर | १२,०९५ | २७,२६५ | ३९,३६० | १०,०३२ | २२,१७० | ३२,२०१ |
| पुणे ग्रामीण | ८,२५१ | १४,३७८ | २२,६२९ | ६,४७२ | ११,०२० | १७,४९२ |
| पुणे शहर | १,५३० | २,६६९ | ४,१९९ | १,२४० | २,०६४ | ३,३०३ |
| सातारा | ४,८२९ | ८,४२० | १३,२४९ | ४,१७१ | ६,७९८ | १०,९६९ |
| सांगली | ४,९८६ | ८,७०५ | १३,६९१ | ४,६१२ | ७,७९७ | १२,४१० |
| सोलापूर ग्रामीण | ८,६८४ | १५,१४९ | २३,८३३ | ७,८६६ | १२,४४८ | २०,३१४ |
| सोलापूर शहर | ९३० | १,६२६ | २,५५६ | ८६६ | १,४८७ | २,३५३ |
| कोल्हापूर | ८,३४६ | १४,५६१ | २२,९०७ | ८,०२९ | १३,६४१ | २१,६७० |
| औरंगाबाद | ११,३७९ | १८,०९९ | २९,४७८ | ९,६०९ | १४,७९४ | २४,४०३ |
| जालना | ७,१५५ | ११,३९५ | १८,५५० | ६,०५० | ९,५०० | १५,५५० |
| परभणी | ७,३६४ | ११,७१४ | १९,०७८ | ५,९१६ | ९,४०२ | १५,३१८ |
| हिंगोली | ५,२९३ | ८,४१२ | १३,७०५ | ३,९५३ | ६,०७१ | १०,०२४ |
| बीड | ६,७७५ | १०,७६० | १७,५३५ | ५,५६७ | ८,१७९ | १३,७४६ |
| नांदेड | १३,१७८ | २०,९७८ | ३४,१५६ | ११,३३३ | १७,८७७ | २९,२११ |
| उस्मानाबाद | ६,४१२ | १०,१९९ | १६,६११ | ५,४६७ | ८,४७४ | १३,९४१ |
| लातूर | ६,८२० | १०,८५४ | १७,६७४ | ५,७६२ | ९,९०५ | १५,६६७ |
| अमरावती | २९,२८१ | २१,९५८ | ५१,२३९ | २३,६४४ | २१,५३९ | ४५,१८३ |
| अकोला | १०,७९१ | ८,०९७ | १८,८८८ | ९,७६६ | ७,५२५ | १७,२९१ |
| वाशिम | ११,५९२ | ८,७०० | २०,२९२ | १०,४२२ | ६,९९२ | १७,४१४ |
| बुलढाणा | १५,९२७ | ११,९४६ | २७,८७३ | १३,४३९ | ११,९६६ | २५,४०५ |
| यवतमाळ | ३१,१५१ | २३,३६६ | ५४,५१७ | २९,१०० | २१,५९४ | ५०,६९४ |
| नागपूर ग्रामीण | १७,७२१ | १३,२८२ | ३१,००३ | १७,२८९ | १३,०७६ | ३०,३६५ |
| नागपूर शहर | ९,७५४ | ७,३१३ | १७,०६७ | ९,३९३ | ७,१४१ | १६,५३४ |
| वर्धा | १०,८६६ | ८,१५५ | १९,०२१ | १०,११० | ७,७९० | १७,९०० |
| भंडारा | १९,६३२ | ७,५८४ | २७,२१६ | १७,४१६ | ७,४८१ | २४,८९७ |
| गोंदिया | २३,९२५ | ९,२४३ | ३३,१६८ | २३,४८८ | ९,०३३ | ३२,५२१ |
| चंद्रपूर | ३२,५६२ | २४,४२९ | ५६,९९१ | ३०,६३० | २४,४२९ | ५५,०५९ |
| गडचिरोली | २९,२५६ | ९,७४४ | ३९,००० | २८,९०५ | ९,७४७ | ३८,६५२ |
| **महाराष्ट्र राज्य** | **५,२५,८००** | **५,२३,६६७** | **१०,४९,४६७** | **४,७३,२५९** | **४,६६,०९२** | **९,३९,३५२** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ४.१४ (पुढे चालू)
## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०१९-२० करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण

(मे.टन)

| जिल्हा | गोदामांमधून रास्त भाव दुकानांद्वारे उचल | | |
|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (८) | (९) | (१०) |
| मुंबई | ३,४४७ | २,९०६ | ६,३५३ |
| ठाणे | १३,२१९ | ६,०४२ | १९,२६१ |
| पालघर | २७,०५२ | १२,१०६ | ३९,१५८ |
| रायगड | २३,६६७ | ९,७४१ | ३३,४०८ |
| रत्नागिरी | १०,५०२ | ४,७७५ | १५,२७७ |
| सिंधुदुर्ग | ६,५२१ | २,७८९ | ९,३१० |
| नाशिक | २०,३२९ | ४६,०६५ | ६६,३९४ |
| धुळे | ९,२४१ | १८,८३२ | २८,०७३ |
| नंदुरबार | २०,७८९ | १६,०४८ | ३६,८३८ |
| जळगाव | १७,०५० | ३५,२४५ | ५२,२९५ |
| अहमदनगर | १०,७६४ | २४,१६२ | ३४,९२६ |
| पुणे ग्रामीण | ६,७९२ | ११,४५२ | १८,२४४ |
| पुणे शहर | १,२४० | २,०६४ | ३,३०३ |
| सातारा | ४,४५३ | ७,०६४ | ११,५१७ |
| सांगली | ५,०५० | ८,५१५ | १३,५६५ |
| सोलापूर ग्रामीण | ७,८०५ | १३,०४५ | २०,८५० |
| सोलापूर शहर | ८६६ | १,४८६ | २,३५३ |
| कोल्हापूर | ८,१४६ | १३,८८३ | २२,०३० |
| औरंगाबाद | ९,५५५ | १४,७७० | २४,३२६ |
| जालना | ६,४४९ | ९,५४३ | १५,९९२ |
| परभणी | ५,७६४ | ९,११२ | १४,८७५ |
| हिंगोली | ४,३०४ | ६,५३१ | १०,८३५ |
| बीड | ५,५०८ | ८,३४२ | १३,८५१ |
| नांदेड | ११,३३३ | १७,८७७ | २९,२११ |
| उस्मानाबाद | ५,५४० | ८,३८८ | १३,९२८ |
| लातूर | ५,९१३ | ९,९६३ | १५,८७७ |
| अमरावती | २३,२२९ | २०,५६१ | ४३,७९० |
| अकोला | ९,७७५ | ७,२८९ | १७,०६४ |
| वाशिम | १०,६१७ | ७,७९५ | १८,४१२ |
| बुलढाणा | १२,२८८ | ११,१७४ | २३,४६२ |
| यवतमाळ | २७,६५० | २०,७५१ | ४८,४०० |
| नागपूर ग्रामीण | १७,७२४ | १३,२४४ | ३०,९६८ |
| नागपूर शहर | ९,५०० | ७,१४१ | १६,६४१ |
| वर्धा | १०,६८० | ८,०२६ | १८,७०६ |
| भंडारा | १९,०६१ | ७,८३८ | २६,८९९ |
| गोंदिया | २३,१०४ | ८,९४९ | ३२,०५२ |
| चंद्रपूर | ३१,४०७ | २३,७५२ | ५५,१६० |
| गडचिरोली | २८,५९० | ९,६७४ | ३८,२६४ |
| **महाराष्ट्र राज्य** | **४,७४,९२४** | **४,६६,९४०** | **९,४१,८६४** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

टिप: आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट ४.१५

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०१९-२० करिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण

(मे.टन)

| जिल्हा | राज्य शासनाचे नियतन | | | भारतीय अन्न महामंडळाकडून उचल | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई | २,०६,५६१ | ३,०९,८३० | ५,१६,३९१ | १,५५,२५२ | २,३२,२७१ | ३,८७,५२४ |
| ठाणे | १८,१२५ | १४,८५५ | ३२,९८० | १४,७०८ | १३,१२९ | २७,८३७ |
| पालघर | ४८,०६८ | ३९,४३९ | ८७,५०७ | ४०,०१६ | ३२,०८५ | ७२,१०१ |
| रायगड | ५०,४९६ | ४१,३९२ | ९१,८८८ | ३९,३३९ | ३६,३०७ | ७५,६४६ |
| रत्नागिरी | ३४,३८४ | २८,१७२ | ६२,५५६ | ३१,७८४ | २७,०१६ | ५८,८०० |
| सिंधुदुर्ग | १९,६२२ | १६,०५८ | ३५,६८० | १७,२१५ | १४,१८७ | ३१,४०२ |
| नाशिक | ७२,५२६ | १,०८,७९४ | १,८१,३२० | ६०,११० | ८९,६३९ | १,४९,७४९ |
| धुळे | २७,४७८ | ४१,२१६ | ६८,६९४ | २४,८२० | ३५,३१३ | ६०,१३३ |
| नंदुरबार | २६,१७३ | १७,४४८ | ४३,६२१ | २२,१८१ | १४,४४२ | ३६,६२३ |
| जळगाव | ५४,०४९ | ८१,०७३ | १,३५,१२२ | ४५,७८३ | ६९,६०३ | १,१५,३८५ |
| अहमदनगर | ६७,२९६ | १,००,९३८ | १,६८,२३४ | ५४,७०९ | ८२,५०४ | १,३७,२१३ |
| पुणे ग्रामीण | ६१,५८२ | ९२,३८४ | १,५३,९६६ | ५२,७८५ | ७९,४५३ | १,३२,२३८ |
| पुणे शहर | ३४,१७४ | ५१,२५० | ८५,४२४ | २६,८३८ | ४०,४१८ | ६७,२५५ |
| सातारा | ३९,७४५ | ५९,६०६ | ९९,३५१ | ३६,९७३ | ५५,२०४ | ९२,१७७ |
| सांगली | ४१,९३७ | ६२,९०६ | १,०४,८४३ | ३७,१६४ | ५५,५१५ | ९२,६७९ |
| सोलापूर ग्रामीण | ४०,३७४ | ६०,५५४ | १,००,९२८ | ३७,३७४ | ५२,२९४ | ८९,६६८ |
| सोलापूर शहर | १०,५२४ | १५,७८० | २६,३०४ | ९,७०३ | १४,६१६ | २४,३१९ |
| कोल्हापूर | ५५,४१८ | ८३,१२७ | १,३८,५४५ | ५१,७६९ | ७७,५१७ | १,२९,२८५ |
| औरंगाबाद | ४७,७९३ | ७१,६७९ | १,१९,४७२ | ४०,८९७ | ६१,३३४ | १,०२,२३१ |
| जालना | ३०,४०४ | ४५,५९९ | ७६,००३ | २६,२८० | ३९,३२५ | ६५,६०४ |
| परभणी | २१,८६८ | ४०,७१६ | ६२,५८४ | १६,२७९ | ३२,८३३ | ४९,११२ |
| हिंगोली | १५,८४९ | २९,४९३ | ४५,३४२ | १२,८११ | २३,२२७ | ३६,०३८ |
| बीड | ३७,७६९ | ५६,६६३ | ९४,४३२ | ३०,२१० | ४५,३४१ | ७५,५५१ |
| नांदेड | ४७,५०५ | ७१,२५८ | १,१८,७६३ | ३८,१२१ | ५७,९६२ | ९६,०८३ |
| उस्मानाबाद | २३,१६२ | ३४,७३७ | ५७,८९९ | १९,४१९ | २९,३७५ | ४८,७९५ |
| लातूर | ३५,७९० | ५३,६८४ | ८९,४७४ | ३३,०१६ | ४८,२५१ | ८१,२६८ |
| अमरावती | ३३,६३९ | ५०,४५६ | ८४,०९५ | २७,०६० | ४६,८६९ | ७३,९२९ |
| अकोला | २५,३०३ | ३७,९७१ | ६३,२७४ | २२,२६६ | ३४,२५४ | ५६,५२० |
| वाशिम | १७,७७२ | २६,६६४ | ४४,४३६ | १६,१९४ | २१,३६७ | ३७,५६२ |
| बुलढाणा | ३६,३६४ | ५४,५४१ | ९०,९०५ | ३१,२५३ | ५१,४८२ | ८२,७३५ |
| यवतमाळ | ३३,६९४ | ५०,५४७ | ८४,२४१ | २९,२७३ | ४५,०५३ | ७४,३२५ |
| नागपूर ग्रामीण | २९,४७१ | ४४,२०० | ७३,६७१ | २९,४२७ | ४३,१४४ | ७२,५७२ |
| नागपूर शहर | ३०,३८२ | ४५,५७८ | ७५,९६० | २६,३५५ | ४०,८६५ | ६७,२२० |
| वर्धा | १९,२८३ | २८,९०९ | ४८,१९२ | १७,८३२ | २५,४०० | ४३,२३२ |
| भंडारा | २५,६२८ | १७,०८६ | ४२,७१४ | २२,५९९ | १६,७४६ | ३९,३४५ |
| गोंदिया | २४,४१५ | १६,२८४ | ४०,६९९ | २३,२५८ | १५,७२७ | ३८,९८५ |
| चंद्रपूर | २३,२२३ | ३४,८४० | ५८,०६३ | २२,३५४ | ३२,७३६ | ५५,०९० |
| गडचिरोली | १६,५६० | ११,०४० | २७,६०० | १५,८२२ | १०,८५६ | २६,६७८ |
| **महाराष्ट्र राज्य** | **१४,८४,४०६** | **२०,४६,७६७** | **३५,३१,१७३** | **१२,५९,२४९** | **१७,४३,६६०** | **३०,०२,९०९** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ४.१५ (पुढे चालू)
## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०१९-२० करिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण

(मे.टन)

| जिल्हा | गोदामांमधून रास्त भाव दुकानांद्वारे उचल | | |
|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | एकूण |
| (१) | (८) | (९) | (१०) |
| मुंबई | १,५५,२५५ | २,३२,३५१ | ३,८७,६०६ |
| ठाणे | १५,३५७ | १३,३३३ | २८,६९० |
| पालघर | ४०,०९१ | ३३,१६५ | ७३,२५६ |
| रायगड | ३८,५५३ | ३६,२४६ | ७४,७९९ |
| रत्नागिरी | २८,५०७ | २१,८६१ | ५०,३६८ |
| सिंधुदुर्ग | १७,५०९ | १४,३६४ | ३१,८७३ |
| नाशिक | ५९,८२१ | ९०,००० | १,४९,८२१ |
| धुळे | २३,२५८ | ३४,७६९ | ५८,०२७ |
| नंदुरबार | २१,०७२ | १३,९७० | ३५,०४३ |
| जळगाव | ४७,८१३ | ७१,४८८ | १,१९,३०१ |
| अहमदनगर | ६०,४०१ | ९०,५६४ | १,५०,९६४ |
| पुणे ग्रामीण | ५३,७५९ | ७९,९९० | १,३३,७४९ |
| पुणे शहर | २६,८३८ | ४०,४१८ | ६७,२५६ |
| सातारा | ३६,५७४ | ५४,५५१ | ९१,१२५ |
| सांगली | ३६,३३१ | ५४,४१८ | ९०,७५० |
| सोलापूर ग्रामीण | ३८,४१० | ५७,५९० | ९६,००० |
| सोलापूर शहर | ९,७०३ | १४,६१६ | २४,३१९ |
| कोल्हापूर | ५१,८९४ | ७८,०३८ | १,२९,९३२ |
| औरंगाबाद | ३९,८७० | ५९,४५९ | ९९,३३० |
| जालना | २७,९०९ | ४०,५५० | ६८,४५९ |
| परभणी | १५,९१० | ३२,१६० | ४८,०७० |
| हिंगोली | १२,७९९ | २४,९०६ | ३७,७०५ |
| बीड | ३०,४६२ | ४५,५६४ | ७६,०२६ |
| नांदेड | ३८,३७३ | ५९,१९२ | ९७,५६६ |
| उस्मानाबाद | १९,४२९ | २८,९२९ | ४८,३५८ |
| लातूर | ३३,२५१ | ४९,१२१ | ८२,३७२ |
| अमरावती | २६,९७८ | ४२,६५२ | ६९,६३० |
| अकोला | २२,६९० | ३३,५३१ | ५६,२२१ |
| वाशिम | १६,१३३ | २२,८४९ | ३८,९८२ |
| बुलढाणा | २७,१९८ | ४५,१९२ | ७२,३९० |
| यवतमाळ | २८,२५६ | ४१,८९९ | ७०,१५६ |
| नागपूर ग्रामीण | २९,५५६ | ४४,१०६ | ७३,६६२ |
| नागपूर शहर | २७,८५८ | ४१,६०० | ६९,४५८ |
| वर्धा | १८,९५० | २८,०९५ | ४७,०४५ |
| भंडारा | २४,२५८ | १७,१२८ | ४१,३८६ |
| गोंदिया | २२,९७१ | १५,२९६ | ३८,२६७ |
| चंद्रपूर | २२,३३९ | ३२,४१८ | ५४,७५७ |
| गडचिरोली | १५,०१० | १०,५५७ | २५,५६७ |
| **महाराष्ट्र राज्य** | **१२,६१,३४६** | **१७,४६,९३९** | **३०,०८,२८५** |

*आधार*: अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

टिप: आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळतीलच असे नाही.

# 5

# ±ÉÉEòÊ´ÉkÉ



# ५. लोकवित्त

५.१ अर्थसंकल्प हे वार्षिक वित्तविषयक विवरणपत्र असून त्यामध्ये शासनाचे येणाऱ्या वित्तीय वर्षाकरिता जमा व खर्चाचे अंदाज, मागील वर्षाकरिता प्रत्यक्ष रकमा आणि चालू वर्षाकरिता सुधारित अंदाज यांचा समावेश असतो. जनतेला अधिक चांगल्या प्रकारे सेवा आणि सुविधा पुरवण्यासाठी आर्थिक वर्षात प्रत्येक टप्प्यावर शासकीय कामकाज, खर्चासाठी विविध वित्तीय स्रोत, निधी व्यवस्थापनाचा आढावा घेणे आवश्यक असते. शासकीय कामकाजाचे विश्लेषण करण्याकरिता महसुली तूट, राजकोषीय तूट आणि कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण, इत्यादी वित्तीय निर्देशक आहेत.

५.१.१ पायाभूत सुविधा, कृषी, आरोग्य, शिक्षण, पाणी पुरवठा, स्वच्छता आणि विकासाच्या इतर पैलुंमध्ये सार्वजनिक गुंतवणुकीस राज्याच्या वित्तीय धोरणात प्राधान्य दिले आहे. मुंबई-नागपूर हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, मेट्रो जाळे, नवी मुंबईला जोडणारी ट्रान्स हार्बर लिंक यांसारख्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम अपेक्षित आहे.

## कोविड -१९ महामारी हाताळण्याकरिता राज्याने केलेल्या आर्थिक उपाययोजना

५.२ राज्यात कोविड -१९ महामारीचा प्रसार नियंत्रित करण्याकरिता वेळोवेळी घोषित लॉकडाऊनमुळे, उद्योग व अत्यावश्यक सेवा वगळता इतर सेवा बंद राहिल्या व परिणामी राज्याची अर्थव्यवस्था मंदावली. अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क, मोटार वाहन कर आणि मुद्रांक शुल्क यामध्ये देण्यात आलेल्या सवलतीमुळे राज्याच्या महसुलावर प्रतिकूल परिणाम झाला. कोविड-१९ ची परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच राज्याची अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्याकरिता केलेल्या उपाययोजना :

- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत ₹ ५० लाखाच्या मर्यादेत वैद्यकीय उपकरणे व साहित्य खरेदी करण्यास अनुमती
- चालू वित्तीय वर्षात नवीन प्रस्तावित योजनांच्या खर्चात कपात व अनावश्यक योजना रद्द
- औषधे, अत्यावश्यक वैद्यकीय साधने व पुरवठा इ. खरेदी वगळता इतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता न देणे
- चालू वित्तीय वर्षात नवीन बांधकामासंदर्भात प्रशासकीय मान्यता, निविदा, कार्यारंभ आदेश न देणे (पावसाळ्यापूर्वीच्या आवश्यक भांडवली कामांवरील खर्च वगळता)
- सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, अनुकंपा तत्वावरील व शिक्षण सेवक वगळून इतर विभागांमधील नवीन भरतीस स्थगिती
- अखर्चित निधी शासनास सर्मपित करणे
- कोविड -१९ शी संबंधित प्रकाशनाव्यतिरिक्त छपाई न करणे
- मालमत्ता निर्मिती आणि नोकरीच्या संधी निर्माण करण्यासाठी जबाबदार असलेल्या विभागांना अर्थसंकल्पीत निधीच्या ७५ टक्के निधीचे वाटप करण्यास मान्यता
- जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (सर्वसाधारण/ अनुसूचित जाती/ जमाती घटक कार्यक्रम) १०० टक्के निधी वितरित करण्यास मान्यता
- स्थावर मिळकतीच्या अभिहस्तांतरण किंवा विक्री कराराच्या दस्तऐवजांवर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क दि.१ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता तीन टक्क्यांनी व उर्वरित राज्याकरिता दोन टक्क्यांनी कमी करण्यात आले, तर दि.१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांकरिता दोन टक्क्यांनी आणि उर्वरित राज्याकरिता १.५ टक्क्यांनी कमी करण्यात आली
- ठेकेदारांच्या कामास सहा महिन्यांची मुदतवाढ, अनामत ठेवींच्या रकमेवर सवलत (बँक गॅरंटी अथवा रोख रक्कम)
- वार्षिक कर भरणा-या मालवाहतूक व पर्यटक वाहने, खनित्रे, खाजगी सेवा वाहने, व्यावसायिक शिबिरे वाहने आणि शालेय विद्यार्थी वाहतूक वाहने यांना सन २०२०-२१ मध्ये वार्षिक कराच्या ५० टक्के कर माफ करण्यास मान्यता

# अर्थसंकल्प २०२०-२१

५.३ अर्थसंकल्प २०२०-२१ ₹ १०३ कोटी अर्थसंकल्पीय अधिक्यासह सादर करण्यात आला. अर्थसंकल्प २०२०-२१ नुसार मागील वर्षाच्या तुलनेत एकूण उत्पन्नात व एकूण खर्चात अनुक्रमे ३.६ टक्के व ३.५ टक्के वाढ अपेक्षित आहे. महत्वाचे वित्तीय निर्देशक तक्ता ५.१ मध्ये व दृष्टीक्षेपात अर्थसंकल्प परिशिष्ट ५.१ मध्ये दिला आहे.

## महसुली जमा

५.४ महसुली जमेमध्ये राज्याच्या स्वत:च्या स्त्रोतापासून कर व करेतर जमा आणि केंद्रीय अनुदाने व केंद्रीय करातील हिस्सा यांचा समावेश असतो. सन २०२०-२१ (अअं) मध्ये अपेक्षित महसुली जमा ₹ ३,४७,४५७ कोटी आहे. महसुली जमेत मागील वर्षाच्या तुलनेत १२.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. महसुली जमेचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण वाढत असून सन २०२०-२१(अअं) मध्ये ते १३.१ टक्के अपेक्षित आहे. राज्याकरिता स्वत:च्या स्त्रोतापासून अपेक्षित महसूल म्हणजेच स्वत:चा कर महसूल आणि करेतर महसूल ₹ २,४५,५७७ कोटी (७०.७ टक्के हिस्सा) आहे. केंद्रीय अनुदाने व केंद्रीय करातील हिस्सा ₹ १,०१,८७९ कोटी अपेक्षित आहे. महसुली जमा तक्ता ५.२ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.१ महत्वाचे वित्तीय निर्देशक**

(₹ कोटी)

| तपशील | २०१८-१९ (प्रत्यक्ष) | २०१९-२० (सुअं) | २०२०-२१ (अअं) |
|---|---|---|---|
| १. महसुली जमा | २,७८,९९६ | ३,०९,८८१ | ३,४७,४५७ |
| *एकूण जमेशी टक्केवारी* | (९१.६) | (७९.४) | (८५.९) |
| २. महसुली खर्च | २,६७,०२२ | ३,४१,३२४ | ३,५६,९६८ |
| *एकूण खर्चाशी टक्केवारी* | (८७.९) | (८७.३) | (८८.३) |
| ३. महसुली तूट (२-१) | (-) ११,९७५ | ३१,४४३ | ९,५११ |
| *स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी* | (-) ०.५ | १.१ | ०.४ |
| ४. भांडवली जमा# | २५,५६१ | ८०,५१४ | ५७,०३१ |
| *एकूण जमेशी टक्केवारी* | (८.४) | (२०.६) | (१४.१) |
| ५. भांडवली खर्च# | ३६,५९४ | ४९,४६३ | ४७,४१७ |
| *एकूण खर्चाशी टक्केवारी* | (१२.१) | (१२.७) | (११.७) |
| ६. एकूण जमा# (१+४) | ३,०४,५५८ | ३,९०,३९४ | ४,०४,४८८ |
| ७. एकूण खर्च# (२+५) | ३,०३,६१६ | ३,९०,७८७ | ४,०४,३८५ |
| ८. अर्थसंकल्पीय तूट (७-६) | (-)९४२ | ३९३ | (-)१०३ |
| ९. राजकोषीय तूट | २३,०१५ | ७८,६१७ | ५४,६१८ |
| *स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी* | ०.९ | २.८ | २.१ |
| १०. प्राथमिक तूट | (-)११,००६ | ४४,४४४ | १९,०८८ |
| *स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी* | (-)०.४ | १.६ | ०.७ |
| ११. व्याज प्रदाने | ३४,०२१ | ३४,१७३ | ३५,५३१ |
| *महसुली जमेशी टक्केवारी* | १२.२ | ११.० | १०.२ |

सुअं सुधारित अंदाज अअं अर्थसंकल्पीय अंदाज # कर्ज परतावा वजा जाता निव्वळ रकमा

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ५.२ महसुली जमा**

(₹ कोटी)

| वर्ष | कर महसूल | | | करेतर महसूल | | | केंद्रीय अनुदाने | एकूण महसुली जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वत:चा कर महसूल | केंद्रीय करातील हिस्सा | एकूण | व्याजाच्या जमा रकमा | इतर करेतर महसूल | एकूण | | |
| २०१६-१७ | १,३६,६१६ | ३३,७१५ | १,७०,३३१ | ३,२५९ | ९,४५० | १२,७०९ | २१,६५३ | २,०४,६९३ |
| २०१७-१८ | १,६७,९४८ | ३७,२०३ | २,०५,१५१ | ४,१६३ | १२,५१७ | १६,६८० | २१,८२३ | २,४३,६५४ |
| २०१८-१९ | १,८७,५३८ | ४१,९५३ | २,२९,४९१ | ४,१९१ | ११,६५२ | १५,८४४ | ३३,६६२ | २,७८,९९६ |
| २०१९-२० (सुअं) | १,९९,५३४ | ३६,२२० | २,३५,७५४ | २,६०० | १४,२५१ | १६,८५१ | ५७,२७६ | ३,०९,८८१ |
| २०२०-२१ (अअं) | २,२५,०७१ | ४८,१०९ | २,७३,१८१ | २,७०८ | १७,७९८ | २०,५०६ | ५३,७७० | ३,४७,४५७ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

५.४.१ मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२०-२१ (अअं) मध्ये कर महसुलामध्ये १५.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. कर महसुलाचा प्रमुख घटक असलेला राज्याच्या स्वत:च्या कर महसुलामध्ये १२.८ टक्के वाढ अपेक्षित असून सन २०२०-२१ (अअं) मध्ये त्याचा कर महसुलामध्ये ८२.४ टक्के व महसुली जमेमध्ये ६४.८ टक्के हिस्सा अपेक्षित आहे. सन २०२०-२१ (अअं) मध्ये स्वत:च्या कर महसुलाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण ८.५ टक्के अपेक्षित आहे. राज्याच्या स्वत:च्या कर महसुलामध्ये राज्य वस्तू व सेवा कराचा मोठा हिस्सा असून सन २०२०-२१(अअं) मध्ये तो ४७.६ टक्के अपेक्षित आहे. त्याखालोखाल विक्री कराचा अपेक्षित हिस्सा १७.८ टक्के आणि मुद्रांक व नोंदणी फी यांचा अपेक्षित हिस्सा १३.३ टक्के आहे. राज्य वस्तू व सेवा कर महसुलात मागील वर्षाच्या तुलनेत २३.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. राज्याचा घटकनिहाय स्वत:चा कर महसूल तक्ता ५.३ मध्ये दिला आहे. निवडक राज्यांकरिता सन २०१९-२० (सुअं) मधील राज्य वस्तू व सेवा करापासून प्राप्त महसूल तक्ता ५.४ मध्ये दिला आहे.

**आलेख ५.१ : कर महसुलाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**




**तक्ता ५.३ राज्याचा घटकनिहाय स्वत:चा कर महसूल**

(₹ कोटी)

| घटक | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० (सुअं) | २०२०-२१(अअं) |
|---|---|---|---|---|---|
| राज्य वस्तू व सेवा कर | लागू नाही | ५०,०६३ | ८२,३५२ | ८६,४७० | १,०७,१४६ |
| विक्री कर | ८१,१७४ | ५४,८९४ | ३५,७२५ | ३८,०६६ | ४०,००० |
| मुद्रांक व नोंदणी शुल्क | २१,०१२ | २६,४४२ | २८,५४५ | २९,५०० | ३०,००० |
| राज्य उत्पादन शुल्क | १२,२८८ | १३,४५० | १५,३२१ | १७,९७७ | १९,२२५ |
| विजेवरील कर व शुल्क | ६,६७० | ७,३४५ | १०,०८५ | ९,८२० | ९,५०० |
| वाहनांवरील कर | ६,७४१ | ८,६६५ | ८,६१३ | ८,५९९ | ९,५०० |
| जमीन महसूल | १,७९९ | २,३१० | २,०८८ | ३,५२० | ४,००० |
| उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | २,३१२ | २,२०५ | २,५८३ | २,४५० | २,४२० |
| माल व प्रवासी कर | १,८७७ | ९८४ | ८३७ | १,७५० | १,७६० |
| विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | २,७४३ | १,५९० | १,३८९ | १,३८१ | १,५१९ |
| कृषी उत्पन्नावरील कर | ० | नगण्य | नगण्य | ० | ० |
| **सर्व** | **१,३६,६१६** | **१,६७,९४८** | **१,८७,५३८** | **१,९९,५३४** | **२,२५,०७१** |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही

५.४.२ कर महसुलाचा घटक असलेला केंद्रीय करातील हिस्सा सन २०२०-२१ (अअं) मध्ये ₹ ४८,१०९ कोटी अपेक्षित असून त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ३२.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. केंद्रीय करांमधील निगम कराचा अपेक्षित हिस्सा ३०.८ टक्के असून त्याखालोखाल केंद्रीय वस्तू व सेवा कराचा अपेक्षित हिस्सा ३०.३ टक्के आणि निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कराचा अपेक्षित हिस्सा २८.६ टक्के आहे. निवडक राज्यांकरिता २०१९-२० (सुअं) मधील स्वत:चा कर महसूल, महसुली जमा व महसुली खर्च तक्ता ५.५ मध्ये दिले आहेत.

५.४.३ राज्याच्या करेतर महसुलामध्ये व्याजाच्या जमा रकमा, दंड, स्वामीत्वधन, सेवा शुल्क, वापर शुल्क आणि लाभांश व नफा यांचा समावेश होतो. मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२०-२१ (अअं) मध्ये राज्याच्या करेतर महसुलात २१.७ टक्के वाढ अपेक्षित असून महसुली जमेत त्याचा अपेक्षित हिस्सा ५.९ टक्के आहे. मागील वर्षाच्या तुलनेत व्याजाच्या जमा रकमांमध्ये ४.२ टक्के वाढ तर लाभांश व नफ्यासह इतर करेतर महसुलामध्ये २४.९ टक्के वाढ अपेक्षित आहे.

**तक्ता ५.४ निवडक राज्यांकरिता सन २०१९-२० (सुअं) मधील राज्य वस्तू व सेवा करापासून प्राप्त महसूल**

(₹ कोटी)

| राज्य | राज्य वस्तू व सेवा कर |
|---|---|
| आंध्र प्रदेश | २०,२२७ |
| गुजरात | ४८,७३५ |
| कर्नाटक | ४२,७४८ |
| केरळ | २३,७९० |
| मध्य प्रदेश | १९,३२३ |
| **महाराष्ट्र** | **८६,४७०** |
| राजस्थान | २५,६०५ |
| तामिळनाडु | ४४,२१८ |
| तेलंगणा | २५,८१७ |
| उत्तर प्रदेश | ५६,११० |

*आधार* : भारतीय रिझर्व बँक

**तक्ता ५.५ निवडक राज्यांकरिता सन २०१९-२० (सुअं) मधील स्वत:चा कर महसूल, महसुली जमा व महसुली खर्च**

(₹ कोटी)

| राज्य | स्वत:चा कर महसूल | | महसुली जमा | | महसुली खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | रक्कम | स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | रक्कम | स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी |
| आंध्र प्रदेश | ५७,४२९ | ५.९ | १,१०,८७१ | ११.४ | १,३७,५१८ | १४.१ |
| गुजरात | ९७,२५८ | ५.८ | १,४९,८२७ | ९.० | १,४८,६८६ | ८.९ |
| कर्नाटक | १,०१,७४० | ६.० | १,७७,२५५ | १०.४ | १,७६,९७० | १०.४ |
| केरळ | ५५,७७१ | ६.४ | ९९,०४३ | ११.४ | १,१६,५१७ | १३.४ |
| मध्य प्रदेश | ५४,६३८ | ६.० | १,४८,५६१ | १६.४ | १,५१,२५९ | १६.७ |
| **महाराष्ट्र#** | **१,९९,५३४** | **७.१** | **३,०९,८८१** | **११.०** | **३,४१,३२४** | **१२.१** |
| राजस्थान | ७०,३५१ | ६.९ | १,५६,७१६ | १५.३ | १,८४,७५७ | १८.१ |
| तामिळनाडु | १,२०,८१० | ६.५ | १,९१,८६१ | १०.४ | २,१६,९३३ | ११.८ |
| तेलंगणा | ७१,३२८ | ७.४ | १,१०,९२८ | ११.४ | १,१०,८२५ | ११.४ |
| उत्तर प्रदेश | १,३७,१६९ | ७.६ | ३,७०,२६५ | २०.६ | ३,४३,९८३ | १९.२ |

*आधार :* भारतीय रिझर्व बँक

# स्थूल राज्य उत्पन्नाच्या पहिल्या सुधारित अंदाजांनुसार

५.४.४ केंद्र शासनाकडून केंद्रीय करांव्यतिरिक्त राज्यास विशिष्ट हेतुंकरिता अनुदाने प्राप्त होतात. केंद्रीय अनुदानांमध्ये केंद्र पुरस्कृत योजना अनुदाने, वित्त आयोगाने शिफारशी केलेली अनुदाने, घटनात्मक तरतुदीनुसार अनुदाने व इतर अनुदाने यांचा समावेश होतो. मागील वर्षाच्या तुलनेत केंद्रीय अनुदानांमध्ये सन २०२०-२१ (अअं) मध्ये ६.१ टक्के घट अपेक्षित आहे. सन २०२०-२१ (अअं) मध्ये महसुली जमेमध्ये केंद्रीय अनुदानांचा अपेक्षित हिस्सा १५.५ टक्के तर केंद्र पुरस्कृत योजना अनुदानांचा केंद्रीय अनुदानांमध्ये अपेक्षित हिस्सा ४५.० टक्के आहे. सन २०२०-२१(अअं) मध्ये वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने झालेल्या हानीपोटी भरपाई ₹ १०,००० कोटी अपेक्षित आहे. केंद्राकडून राज्यास होणाऱ्या वित्तीय संसाधनांच्या हस्तांतरणामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ८.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. केंद्राकडून राज्यास होणाऱ्या वित्तीय संसाधनांच्या हस्तांतरणाचा तपशील तक्ता ५.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.६ केंद्राकडून राज्यास होणाऱ्या वित्तीय संसाधनांच्या हस्तांतरणाचा तपशील**

(₹ कोटी)

| तपशील | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० (सुअं) | २०२०-२१ (अअं) |
|---|---|---|---|---|---|
| केंद्रीय करातील हिस्सा | ३३,७१५ | ३७,२०३ | ४१,९५३ | ३६,२२० | ४८,१०९ |
| केंद्रीय अनुदाने | २१,६५३ | २१,८२३ | ३३,६६२ | ५७,२७६ | ५३,७७० |
| कर्जे व अग्रीमे | ६२७ | १६८ | ३३९ | ५०० | ४९७ |
| **एकूण** | **५५,९९५** | **५९,१९४** | **७५,९५४** | **९३,९९६** | **१,०२,३७६** |

*आधार :* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.५ सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत एकूण प्रत्यक्ष महसुली जमा अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५०.८ टक्के होती आणि कर महसूल अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ४६.५ टक्के होता. डिसेंबर, २०२० अखेर राज्य वस्तू व सेवा करापासून प्राप्त महसूल ₹ ४७,५०८ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ४४.३ टक्के) होता. करेतर महसूल (केंद्रीय अनुदाने वगळून) अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५०.४ टक्के होता. डिसेंबर पर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा तक्ता ५.७ मध्ये दिली आहे.

## चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सहायक अनुदाने

५.६ चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्रीय कर संकलनाच्या ४२ टक्के हिस्सा सर्व राज्यांना वितरित करण्यात आला. त्यानुसार केंद्रीय करापासून प्राप्त निधीपैकी वितरणासाठी निश्चित केलेला (सेवा करांव्यतिरिक्त) राज्याचा हिस्सा ५.५२१ टक्के होता व सेवा करातील हिस्सा ५.६७४ टक्के होता.

५.६.१ चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यास ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता ₹ १३,५३२.११ कोटी मूलभूत अनुदान व ₹ २९४.८४ कोटी कामगिरीवर आधारित अनुदान आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता ₹ ९,९३०.२८ कोटी मूलभूत अनुदान व ₹ १,०३७.७३ कोटी कामगिरीवर आधारित अनुदान प्राप्त झाले व ते पूर्णत: खर्च झाले. राज्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीपोटी ₹ ६,१४६.२५ कोटी सहायक अनुदान प्राप्त झाले व ते पूर्णत: खर्च झाले.

## पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सहायक अनुदाने

५.७ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सन २०२०-२१ ते २०२५-२६ करिता केंद्रीय कर संकलनाच्या वितरणातील सर्व राज्यांचा हिस्सा ४१ टक्के आहे. त्यानुसार राज्यांना केंद्रीय करापासून प्राप्त निधीपैकी वितरणासाठी निश्चित केलेला राज्याचा हिस्सा सन २०२०-२१ करिता ६.१३५ टक्के आणि २०२१-२२ ते २०२५-२६ करिता ६.३१७ टक्के आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार निवडक राज्यांकरिता केंद्रीय करातील हिस्सा तक्ता ५.८ मध्ये दिला आहे.

५.७.१ केंद्र शासनाने पंधराव्या वित्त आयोगाच्या सन २०२०-२१ करिता ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता अनुदानांबाबतच्या शिफारशी स्विकारल्या आहेत. शिफारशींनुसार राज्यास ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता मूलभूत अनुदाने(मुक्त) व बद्ध अनुदाने ५०:५० या प्रमाणात प्राप्त झाली. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकसंख्येनुसार दहा लाख व जास्त लोकसंख्या असलेली शहरे आणि दहा लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे असे वर्गीकरण करण्यात आले आहे. दहा लाख व जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना वातावरणीय हवेची गुणवत्ता आणि घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता याकरिता अनुदाने ५०:५० या प्रमाणात प्राप्त झाली. दहा लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांना मूलभूत अनुदाने (मुक्त) व बद्ध अनुदाने ५०:५० या प्रमाणात प्राप्त झाली.

**तक्ता ५.७ डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष महसुली जमा**

(₹ कोटी)

| बाब | प्रत्यक्ष जमा | |
|---|---|---|
| | २०१९-२० | २०२०-२१ |
| **अ) कर महसूल (१ + २)** | **१,६६,३३५** | **१,२७,०११** |
| १) स्वत:चा कर महसूल (१ ते ११) | १,३९,९३५ | १,०४,२१० |
| १. मूल्यवर्धित कर | २८,६५८ | २२,४८६ |
| २. राज्य वस्तू व सेवा कर | ६०,४७३ | ४७,५०८ |
| ३. मुद्रांक व नोंदणी शुल्क | २१,७०३ | १५,३४९ |
| ४. राज्य उत्पादन शुल्क | ११,५५५ | ९,६९१ |
| ५. विजेवरील कर व शुल्क | ६,९४५ | २,३४८ |
| ६. जमीन महसूल | १,४९३ | ७७१ |
| ७. वाहनांवरील कर | ६,२६९ | ४,०२१ |
| ८. उत्पन्न व खर्चावरील इतर कर | १,७५१ | १,५२५ |
| ९. माल व प्रवासी कर | ४६८ | ७ |
| १०. वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | ६२० | ५०४ |
| ११. कृषी उत्पन्नावरील कर | ० | नगण्य |
| २) केंद्रीय करांतील हिस्सा | २६,४०० | २२,८०१ |
| **ब) करेतर महसूल (१ + २)** | **४८,०४१** | **४९,४३९** |
| १) करेतर महसूल (केंद्रीय अनुदाने वगळून) | ९,२७८ | १०,३३७ |
| २) केंद्रीय सहायक अनुदाने | ३८,७६३ | ३९,१०२ |
| **एकूण ( अ+ब)** | **२,१४,३७६** | **१,७६,४५०** |

*आधार* : महालेखापाल यांचे कार्यालय, महाराष्ट्र

**तक्ता ५.८ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार निवडक राज्यांकरिता केंद्रीय करातील हिस्सा**

(टक्के)

| राज्य | २०२०-२१ | २०२१-२२ ते २०२५-२६ |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ४.१११ | ४.०४७ |
| गुजरात | ३.३९८ | ३.४७८ |
| कर्नाटक | ३.६४६ | ३.६४७ |
| केरळ | १.९४३ | १.९२५ |
| मध्य प्रदेश | ७.८८६ | ७.८५० |
| **महाराष्ट्र** | **६.१३५** | **६.३१७** |
| राजस्थान | ५.९७९ | ६.०२६ |
| तामिळनाडु | ४.१८९ | ४.०७९ |
| तेलंगणा | २.१३३ | २.१०२ |
| उत्तर प्रदेश | १७.९३१ | १७.९३९ |

*आधार:* १५ व्या वित्त आयोगाचा सन २०२०-२१ करिता आणि २०२१-२६ करिताचा अहवाल, केंद्र शासन

५.७.२ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सन २०२१-२२ ते २०२५-२६ करिता स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान मिळण्यासाठी राज्य वित्त आयोगाची स्थापना करणे आणि त्यातील शिफारशींवर कार्यवाही करणे, अस्थायी आणि लेखापरीक्षण झालेले असे दोन्ही लेखे सार्वजनिक करुन ऑनलाईन ठेवणे आवश्यक, मालमत्ता कराचे बेस रेट ठरवणे, इत्यादिंसारख्या प्रवेशस्तरीय अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांना ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता सन २०२१-२२ व २०२२-२३ करिता ६७:३३ या

प्रमाणात, सन २०२३-२४ व २०२४-२५ करिता ६६:३४ या प्रमाणात आणि सन २०२५-२६ करिता ६५:३५ या प्रमाणात अनुदाने प्राप्त होतील. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधील दहा लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये मूलभूत अनुदाने (मुक्त) आणि बद्ध अनुदाने ४०:६० या प्रमाणात तर दहा लाख व जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना दहा लाख व जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांकरिताच्या आव्हान निधीमधून कामगिरीशी निगडीत अनुदान (१०० टक्के) प्राप्त होईल. राज्यास पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार सुमारे ₹ ७०,३७५ कोटी अनुदाने प्राप्त होणे अपेक्षित आहे.

५.७.३ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींवर आधारित केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य आपत्ती धोका व्यवस्थापन निधीस करावयाच्या तरतुदींनुसार एकूण आकारमानातील केंद्र व राज्यांच्या हिश्श्याचे प्रमाण ७५:२५ आहे.

५.७.४ पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये प्राप्त सहायक अनुदाने व झालेला खर्च तक्ता ५.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.९ पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये प्राप्त सहायक अनुदाने व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| तपशील | २०२०-२१+ | |
|---|---|---|
| | प्राप्त | खर्च |
| **१. पंचायत राज संस्था** | **२,९१३.५०** | **२,९१३.५०** |
| अ. मूलभूत अनुदाने (मुक्त) | १,४५६.७५ | १,४५६.७५ |
| ब. बद्ध अनुदाने | १,४५६.७५ | १,४५६.७५ |
| **२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्था** | **१,४०३.००** | **१,४०३.००** |
| i) दहा लाख व जास्त लोकसंख्या असलेली शहरे त्यापैकी, | ७९३.०० | ७९३.०० |
| अ. वातावरणीय हवेची गुणवत्ता | ३९६.५० | ३९६.५० |
| ब. घन कचरा व्यवस्थापन व स्वच्छता | ३९६.५० | ३९६.५० |
| ii) दहा लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे, त्यापैकी | ६१०.०० | ६१०.०० |
| अ.मूलभूत अनुदाने (मुक्त) | ३०५.०० | ३०५.०० |
| ब. बद्ध अनुदाने | ३०५.०० | ३०५.०० |
| **३.राज्य आपत्ती धोका व्यवस्थापन निधी (केंद्रीय हिस्सा)** | **३,२२२.००** | **१,०००.४५** |

*आधार* :वित्त विभाग, महाराष्ट्र शासन +७ जानेवारी, २०२१ रोजी

## महसुली खर्च

५.८ मागील वर्षाच्या तुलनेत २०२०-२१ (अअं) मध्ये महसुली खर्चात ४.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. विकास खर्च हा महसुली खर्चाचा प्रमुख घटक असून विकास खर्चाचा महसुली खर्चामध्ये सन २०२०-२१ (अअं) मध्ये ६८.७ टक्के हिस्सा अपेक्षित आहे (मागील पाच वर्षांमध्ये सरासरी हिस्सा ६७.७ टक्के). मागील वर्षाच्या तुलनेत २०२०-२१ (अअं) मध्ये विकास खर्चात २.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. विकास खर्चात सामाजिक सेवा (अपेक्षित हिस्सा ६२.५ टक्के), आर्थिक सेवा (अपेक्षित हिस्सा २७.८ टक्के) आणि स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थांना सहायक अनुदाने व अंशदाने यावर झालेल्या खर्चाचा समावेश असतो. महसुली खर्च तक्ता ५.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१० महसुली खर्च**

| वर्ष | महसुली खर्च (₹ कोटी) | | | दरडोई (₹) | |
|---|---|---|---|---|---|
| | विकास | विकासेतर | एकूण | विकास खर्च | महसुली खर्च |
| २०१६-१७ | १,४१,६१९ | ७१,६१० | २,१३,२२९ | ११,८६२ | १७,८५९ |
| २०१७-१८ | १,६३,०३६ | ७८,५३५ | २,४१,५७१ | १३,५२६ | २०,०४२ |
| २०१८-१९ | १,८२,२५७ | ८४,७६५ | २,६७,०२२ | १४,९७९ | २१,९४५ |
| २०१९-२० (सुअं) | २,३८,९२० | १,०२,४०४ | ३,४१,३२४ | १९,४५३ | २७,७९१ |
| २०२०-२१ (अअं) | २,४५,१२४ | १,११,८४४ | ३,५६,९६८ | १९,७७४ | २८,७९७ |

*आधार* :वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.८.१ सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्याचा एकूण महसुली खर्च अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५५.० टक्के होता. डिसेंबर पर्यंत विकास खर्च सन २०२०-२१(अअं) च्या ५१.२ टक्के होता. एकूण विकास खर्चातील सामाजिक सेवांवर झालेला खर्च सन २०२०-२१ (अअं) च्या ४९.२ टक्के व आर्थिक सेवांवर झालेला खर्च ५०.६ टक्के होता. डिसेंबर पर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च तक्ता ५.११ मध्ये दिला आहे.

५.८.२ सन २०२०-२१ (अअं) मध्ये सामाजिक सेवांवरील एकूण अपेक्षित विकास खर्चात सर्वसाधारण शिक्षणाचा ४४.९ टक्के, त्याखालोखाल अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यांचा १२.१ टक्के, नगरविकास यांचा १०.९ टक्के आणि वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांचा ९.४ टक्के हिस्सा अपेक्षित आहे. आर्थिक सेवांवरील खर्चामध्ये कृषी व संलग्न सेवांवरील खर्चाचा अपेक्षित हिस्सा (३५.० टक्के) सर्वाधिक आहे, त्याखालोखाल ग्राम विकासावरील खर्चाचा अपेक्षित हिस्सा (२२.८ टक्के) आहे.

५.८.३ मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२०-२१ (अअं) मध्ये वेतन, निवृत्तीवेतन आणि व्याजप्रदाने यावरील अनिवार्य खर्चात ७.६ टक्के वाढ अपेक्षित असून त्याचा महसुली खर्चामध्ये अपेक्षित हिस्सा ५३.७ टक्के आहे. सन २०२०-२१ (अअं) मध्ये व्याज प्रदानांचा महसुली खर्चामध्ये अपेक्षित हिस्सा १०.० टक्के आहे. व्याजप्रदानांचे महसुली जमेशी असलेले प्रमाण कमी होत असून ते २०२०-२१ (अअं) मध्ये १०.२ टक्के अपेक्षित आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२०-२१ (अअं) मध्ये अर्थसहाय्यांच्या एकूण रकमेत २९.२ टक्के घट अपेक्षित आहे. घटकनिहाय महसुली खर्च तक्ता ५.१२ मध्ये व महसुली खर्चाचा तपशील परिशिष्ट ५.३ मध्ये दिला आहे. सन २०२०-२१ (अअं) नुसार प्रमुख अर्थसहाय्ये तक्ता ५.१३ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ५.११ डिसेंबर पर्यंत प्रत्यक्ष महसुली खर्च**

(₹ कोटी)

| बाब | प्रत्यक्ष खर्च | |
|---|---|---|
| | २०१९-२० | २०२०-२१ |
| **१. विकास खर्च** | | |
| अ.सामाजिक सेवा | ८७,८४९ | ७५,३९८ |
| ब.आर्थिक सेवा | ३१,४२२ | ३४,५३६ |
| क.स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्थांना सहायक अनुदाने व अंशदाने | १५,४८९ | १५,४९८ |
| **एकूण (अ+ब+क)** | **१,३४,७६०** | **१,२५,४३२** |
| **२. विकासेतर खर्च** | | |
| अ. सर्वसाधारण सेवा | ४९,५२० | ४८,४९१ |
| ब. व्याज प्रदाने व ऋण सेवा | २०,३७२ | २२,४८२ |
| **एकूण (अ+ब)** | **६९,८९२** | **७०,९७३** |
| **३. एकूण महसुली खर्च (१+२)** | **२,०४,६५२** | **१,९६,४०५** |

*आधार* : महालेखापाल यांचे कार्यालय, महाराष्ट्र

**आलेख ५.२ : महसुली जमा व महसुली खर्च**




**आलेख ५.३ : भांडवली जमा व भांडवली खर्च**
**(कर्ज परतावा वजा जाता निव्वळ रकमा)**




**आलेख ५.४ : घटक निहाय विकास खर्च**



**तक्ता ५.१२ घटकनिहाय महसुली खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | वेतन व मजुरी | निवृत्ती वेतन | व्याज | अर्थसहाय्य | सहायक अनुदाने (वेतनेतर) | इतर | एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ७२,०७५<br>(३३.८) | २१,७६०<br>(१०.२) | २८,५३२<br>(१३.४) | २०,९८४<br>(९.८) | ४३,४१२<br>(२०.४) | २६,४६६<br>(१२.४) | २,१३,२२९<br>(१००.०) |
| २०१७-१८ | ७५,०८८<br>(३१.१) | २३,८५३<br>(९.९) | ३३,०१८<br>(१३.७) | ३३,८९४<br>(१४.०) | ५२,६०६<br>(२१.८) | २३,११२<br>(९.६) | २,४१,५७१<br>(१००.०) |
| २०१८-१९ | ८०,२०६<br>(३०.०) | २६,५४५<br>(९.९) | ३४,०२१<br>(१२.७) | २७,३९८<br>(१०.३) | ६९,८६१<br>(२६.२) | २८,९९१<br>(१०.९) | २,६७,०२२<br>(१००.०) |
| २०१९-२० (सुअं) | १,०७,७५२<br>(३१.६) | ३५,९४७<br>(१०.५) | ३४,१७३<br>(१०.०) | ४४,५००<br>(१३.०) | ८५,०८५<br>(२४.९) | ३३,८६७<br>(९.९) | ३,४१,३२४<br>(१००.०) |
| २०२०-२१ (अअं) | १,१७,४७३<br>(३२.९) | ३८,४६७<br>(१०.८) | ३५,५३१<br>(१०.०) | ३१,५१७<br>(८.८) | ९५,६३९<br>(२६.८) | ३८,३४१<br>(१०.७) | ३,५६,९६८<br>(१००.०) |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन    टीप : कंसातील आकडे महसुली खर्चाशी टक्केवारी दर्शवितात

**तक्ता ५.१३ सन २०२०-२१ (अअं) नुसार प्रमुख अर्थसहाय्ये**

(₹ कोटी)

| तपशील | रक्कम |
|---|---|
| महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ (राज्य स्तर) | ७,००० |
| कृषि पंप ग्राहकांना वीज आकारात सूट (साधारण) | ५,०२० |
| औद्योगिक घटकांसाठी एकत्रित प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर रक्कम | ३,००० |
| धान्य वितरण आणि अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना इ. अनुषंगिक योजनांसाठी | २,३७६ |
| प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमा हप्ता (राज्य हिस्सा) | १,६५४ |
| महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, इत्यादींना दिलेल्या प्रवास खर्चातील सवलतींमुळे होणाऱ्या तोट्याची भरपाई | १,४५० |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

५.९ राज्याच्या अर्थसंकल्पातील खर्चाच्या आकडेवारीचे वर्गीकरण अर्थसंकल्पीय व्यवहाराचे आर्थिक महत्त्व विश्लेषण करण्यास आणि शासनाचा अंतिम उपभोग्य बाबींवरील खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च, इत्यादीमध्ये होणाऱ्या बदलांचे मोजमाप करण्यास उपयुक्त ठरते. राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्याच्या अर्थसंकल्पातील खर्चाच्या माहितीचे महत्वाच्या आर्थिक बाबींनुसार वर्गीकरण करुन विश्लेषण केले जाते. शासनाचा अंतिम उपभोग्य बाबींवरील खर्च व भांडवल निर्मितीचा तपशील परिशिष्ट ५.५ मध्ये दिला आहे.

## भांडवली जमा आणि भांडवली खर्च

५.१० भांडवली जमेमध्ये (i) सरकारी ऋण लेखा म्हणजेच राज्याचे देशांतर्गत ऋण व केंद्र शासनाकडील कर्जे व अग्रिमे रकमा (ii) राज्य शासनाकडून कर्जे व अग्रिमे(वसुली), (iii) लोकलेख्याच्या निव्वळ जमा रकमा, आणि (iv) इतर भांडवली जमा जसे आंतरराज्यीय तडजोड, आकस्मिकता निधी व त्यामधे केलेले विनियोजन यासारख्या भांडवली जमा यांचा समावेश होतो. सन २०२०-२१ (अअं) मध्ये एकूण भांडवली जमा ₹ ८६,७३० कोटी अपेक्षित असून भांडवली जमेचा एकूण जमेमध्ये २०.० टक्के हिस्सा अपेक्षित आहे. सन २०२०-२१ (अअं) मध्ये भांडवली जमेमध्ये देशांतर्गत ऋणाचा अपेक्षित हिस्सा ९२.९ टक्के आहे.

५.११ सन २०२०-२१ (अअं) मध्ये एकूण खर्चामधे भांडवली खर्चाचा १७.८ टक्के हिस्सा अपेक्षित आहे. विकासावरील भांडवली खर्चामध्ये भांडवली लेख्यावरील खर्च आणि राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमांचा समावेश होतो. एकूण भांडवली खर्चामध्ये भांडवली लेख्यावरील खर्चाचा अपेक्षित हिस्सा सर्वाधिक (५८.५ टक्के)आहे. एकूण भांडवली खर्चामधील कर्जाच्या परतफेडीकरिता ₹ २८,५२१ कोटी देशांतर्गत ऋणाचा विनियोग अपेक्षित आहे. भांडवली जमा व भांडवली खर्च तक्ता ५.१४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ५.१४ भांडवली जमा व भांडवली खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | भांडवली जमा | | भांडवली खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | त्यापैकी, देशांतर्गत ऋण | एकूण | *त्यापैकी* | |
| | | | | भांडवली लेखे | सरकारी ऋणाची परतफेड |
| २०१६-१७ | ५२,३०० | ४७,७१० | ४३,६९३ | २५,५२९ | ११,८८७ |
| २०१७-१८ | ४२,४५८ | ४९,५०२ | ४५,१९८ | २६,८४२ | १७,३७६ |
| २०१८-१९ | ५०,६७८ | २५,६८६ | ६५,२३९ | ३५,०४९ | २८,६४५ |
| २०१९-२० (सुअं) | १,०६,६४७ | ७४,४३२ | ७५,५९७ | ४६,३१७ | २६,१३४ |
| २०२०-२१ (अअं) | ८६,७३० | ८०,६०९ | ७७,११७ | ४५,१२४ | २९,७०० |

*आधार:* वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## तुटीचे कल

५.१२ एकत्रित वित्तीय सुधारणेच्या मार्गाने राज्याची वाटचाल सुरु असून त्याचाच परिणाम म्हणजेच राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण हा महत्वाचा निर्देशक महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम, २००६ अन्वये राज्याकरिता निश्चित केलेल्या (स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्के) मर्यादेत राहिला आहे. सन २०२०-२१(अअं) मध्ये राजकोषीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी अपेक्षित टक्केवारी २.१ टक्के आहे. निवडक राज्यांकरिता राजकोषीय तूट तक्ता ५.१५ मध्ये दिली आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यासाठी दर्शविलेली राजकोषीय तूट आणि कर्जाकरिता मार्ग तक्ता ५.१६ मध्ये दिले आहेत.

## ऋणस्थिती

५.१३ राज्याच्या ऋणभारामध्ये परतावा न केलेली संचित कर्जे व इतर दायित्वे यांचा समावेश होतो. सन २०२०-२१ (अअं) नुसार ऋणभार ₹ ५,२०,७१७ कोटी अपेक्षित असून त्याचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १९.६ टक्के आहे व ते राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र २०२०-२१ नुसार राज्यासाठी निश्चित केलेल्या मर्यादेत(स्थूल राज्य उत्पन्नाच्या २५.० टक्के) आहे. ऋणभार व व्याज प्रदाने तक्ता ५.१७ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ५.१५ निवडक राज्यांकरिता राजकोषीय तूट**

(२०१९-२० (सुअं))

| राज्य | राजकोषीय तुटीची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|
| आंध्र प्रदेश | ४.२ |
| गुजरात | १.६ |
| कर्नाटक | २.३ |
| केरळ | ३.० |
| मध्य प्रदेश | ३.६ |
| **महाराष्ट्र#** | **२.८** |
| राजस्थान | ३.२ |
| तामिळनाडु | ३.० |
| तेलंगणा | २.३ |
| उत्तर प्रदेश | २.८ |
| **भारत** | **३.८** |

# स्थूल राज्य उत्पन्नाच्या पहिल्या सुधारित अंदाजांनुसार

*आधार* : भारतीय रिझर्व बँक

**तक्ता ५.१६ पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यासाठी दर्शविलेली राजकोषीय तूट आणि कर्जाकरिता मार्ग**

(टक्के)

| ३० | यवतमाळ | २,८९० | २,२५० | ९०५ | २०० | ३,९९५ | ३८० | ४,३७५ |
| ३१ | वर्धा | १,४९७ | १,०२९ | ५३१ | ० | २,०२९ | २४७ | २,२७५ |
| ३२ | नागपूर | १,८१५ | १,१९० | ४,०१० | २७५ | ६,१०० | ४,९५० | ११,०५० |
| ३३ | भंडारा | ६२३ | ४५५ | ७१७ | ४ | १,३४४ | २३० | १,५७५ |
| ३४ | गोंदिया | ४९४ | ३०० | ४३८ | ४ | ९३६ | १६८ | १,१०४ |
| ३५ | चंद्रपूर | १,४७० | १,१२० | ७६६ | १८० | २,४१६ | २६२ | २,६७८ |
| ३६ | गडचिरोली | ३०८ | १९९ | ३१० | ० | ६१८ | ७० | ६८८ |
| | **महाराष्ट्र राज्य** | **९३,६२६** | **६२,४५९** | **३,५९,३२३** | **२१,५६२** | **४,७४,५११** | **३,९२,२८७** | **८,६६,७९८** |

*आधार* - राज्यस्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट ६.३

## जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजना

(३१ मार्च, २०२० पर्यंत)

| अ. क्र. | जिल्हा | उघडण्यात आलेली एकूण खाती | देण्यात आलेली एकूण रुपे कार्ड | किमान शिलकीची मर्यादा नसलेली खाती | एकूण ठेवी (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | मुंबई शहर | ६,३६,६९३ | ५,४७,७८५ | १,२९,७४१ | २०८ |
| २ | मुंबई उपनगर | ६,५१,०५३ | ५,५४,४९४ | ९८,१४७ | २६२ |
| ३ | ठाणे / पालघर | १६,०९,५८९ | ११,५९,८७० | २,५४,९७७ | ५११ |
| ४ | रायगड | ४,३६,०३७ | ३,०९,४८६ | ९६,१४२ | १६२ |
| ५ | रत्नागिरी | ३,२४,९६६ | १,८७,६१२ | ४५,९८८ | १४३ |
| ६ | सिंधुदुर्ग | १,६४,१८० | १,०७,५२० | १९,९९० | ८४ |
| ७ | नाशिक | १७,७७,६४५ | १०,९९,९५७ | २,७९,८६० | ६३० |
| ८ | धुळे | ६,८६,५८० | ४,८५,२०८ | १,७८,५३८ | १२५ |
| ९ | नंदुरबार | ५,२१,४९७ | ४,३४,३२८ | १,२६,४७५ | ८८ |
| १० | जळगाव | ११,९९,३९४ | ९,०७,४११ | १,५४,२९८ | २५३ |
| ११ | अहमदनगर | १२,५६,७८१ | ८,९०,४९६ | १,५९,६२६ | ३९१ |
| १२ | पुणे | १४,९६,४३९ | ९,५५,८५४ | २,९५,९७८ | ६९८ |
| १३ | सातारा | ६,८३,४४९ | ३,८८,६७४ | १,६४,९४९ | १७४ |
| १४ | सांगली | ६,५०,३७५ | ४,८९,२१२ | १,७०,५९७ | १४६ |
| १५ | सोलापूर | १३,२५,२५१ | ९,९३,१९३ | २,५६,७०३ | ३७४ |
| १६ | कोल्हापूर | १०,२६,९२७ | ७,४१,९७८ | १,९०,२६२ | २८१ |
| १७ | औरंगाबाद | १०,७६,६८७ | ६,९५,३१० | २,०२,१२० | २३३ |
| १८ | जालना | ६,७८,४५२ | ४,२८,८९८ | १,३४,३९९ | १०३ |
| १९ | परभणी | ६,१३,१२७ | ४,३७,५९१ | १,६१,४७५ | १११ |
| २० | हिंगोली | ४,११,६९४ | ३,२७,९४० | १,२३,४३५ | ६७ |
| २१ | बीड | ९,९९,२३७ | ७,४१,२३८ | २,३६,६०६ | २९० |
| २२ | नांदेड | ११,५२,९४१ | ९,०१,६०५ | २,७२,९२७ | १८७ |
| २३ | उस्मानाबाद | ५,९२,१८५ | ४,०७,१३३ | १,२७,९२६ | २०७ |
| २४ | लातूर | ७,५६,८५१ | ५,५२,९१९ | १,६८,२८८ | १६७ |
| २५ | बुलढाणा | ७,९५,४१५ | ६,२४,४०१ | ८७,२७० | ११९ |
| २६ | अकोला | ४,८५,१०८ | ३,३९,४०२ | ६४,८६३ | ९७ |
| २७ | वाशिम | ३,३८,९७२ | २,४८,०८३ | ३९,८९७ | ५४ |
| २८ | अमरावती | ७,११,३३० | ४,७०,२६५ | १,०५,९२८ | १६० |
| २९ | यवतमाळ | ९,२३,३३१ | ७,०८,७९३ | १,१४,१६४ | १४१ |
| ३० | वर्धा | २,८२,७९६ | २,१६,४६० | ३३,७८३ | ९९ |
| ३१ | नागपूर | १०,४५,५३९ | ८,५३,८२४ | १,१३,९३९ | ३४७ |
| ३२ | भंडारा | ४,७५,७७५ | ३,३२,४३३ | ४८,५६१ | १५३ |
| ३३ | गोंदिया | ४,३५,६७५ | ३,५६,७८५ | ३९,९५५ | १२८ |
| ३४ | चंद्रपूर | ५,३१,२३४ | ३,७७,६७१ | ५६,०६५ | १६६ |
| ३५ | गडचिरोली | २,६९,८५७ | १,९१,३८२ | २७,४०७ | १०५ |
| | **महाराष्ट्र राज्य** | **२,७०,२३,०६२** | **१,९४,६५,२११** | **४७,८१,२७९** | **७,४६६** |

*आधार* - बँक ऑफ महाराष्ट्र, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक

# 7

# EòÊ¹É ´É ºÉ±ÉMxÉ EòÉªÉ



# ७. कृषि व संलग्न कार्ये

७.१ कृषि व संलग्न कार्ये हे क्षेत्र नेहमीच अर्थव्यवस्थेच्या व सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहे. गेल्या काही दशकांमध्ये राज्यातील ५० टक्क्यांहून जास्त लोकसंख्या उपजीविकेसाठी या क्षेत्रावर अवलंबून आहे.

७.२ हवामान बदल आणि उपजाऊ जमिनीचा कमी होत जाणारा कस यामुळे या क्षेत्राला नेहमीच आव्हानांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, साधन सामुग्रीचा जास्त खर्च, बाजारभावातील अनिश्चितता, हवामानातील बदल इत्यादी बाबी या क्षेत्रासाठी महत्त्वाच्या आहेत. कृषि उत्पादनात वाढ, निर्यातीस चालना व कृषि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन यासाठी शासनामार्फत अनेकविध योजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. कृषि पत पुरवठा, कृषि पणन व कृषि प्रक्रिया क्षमतांमध्ये वाढ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास सहाय्यभूत ठरतात. शेतीमधील जोखीम व्यवस्थापन आणि जोखीम कमी करण्याचा उपाय म्हणून विविध पीक विमा योजना राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे या उद्देशाने शासनाद्वारे विविध धोरणात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. गेल्या दशकात कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीमधील सरासरी हिस्सा ११.७ टक्के होता तर पीक क्षेत्राचा हिस्सा ७.६ टक्के होता.

७.३ केंद्र शासनाने राष्ट्रीय ई-शासन - कृषि अंतर्गत शेतकऱ्यांमधील जागरुकता, ज्ञान आणि कार्यक्षमता यामध्ये सुधारणा होण्यासाठी सर्वसमावेशक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान कार्यप्रणाली विकसित केली आहे. कृषि क्षेत्रातील १३ योजनांखालील आर्थिक लाभ व अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात महा-डीबीटी वेबपोर्टलद्वारे थेट जमा करण्याची कार्यवाही सन २०२०-२१ पासून सुरू करण्यात आली. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या मूल्य निर्धारण प्रक्रियेमध्ये किमान मानवी हस्तक्षेप व त्रुटी रहाव्यात या उद्देशाने राज्यशासनाने महा-मदत ही ई-शासन प्रणाली स्थापित केली आहे.

७.४ कोविड-१९ महामारीच्या लॉकडाऊनचा कृषि क्षेत्रावर कमीत कमी परिणाम व्हावा आणि लॉकडाऊनच्या कठीण काळात देखील कृषि क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीमधील हिस्सा कायम राहून या क्षेत्राने राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना द्यावी यासाठी करावयाच्या प्रभावी उपाययोजनांची गरज वेळेआधीच ओळखून राज्यशासनाने कोविड-१९ लॉकडाऊनमधून कृषि क्षेत्राला सूट दिली. कृषि निविष्ठांची वाहतूक व वितरण, कृषि उत्पादनांची वाहतूक व विक्री, परवान्यांचे ऑनलाईन नूतनीकरण, शासनाच्या विभागांमधील समन्वय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, इत्यादी बाबत राज्य शासनाने केलेल्या विविध उपाययोजना लॉकडाऊन काळात कृषि व संलग्न क्षेत्राला आधार देण्यास सहाय्यभूत ठरल्या.

**आलेख ७.१: सरासरी पावसाशी राज्यात पडलेल्या पावसाची महिनानिहाय टक्केवारी**



**आलेख ७.२: राज्यात पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी दशकातील टक्केवारी**




**आलेख ७.३: पडलेल्या पावसानुसार तालुक्यांची संख्या (सरासरीशी टक्केवारी)**




## मान्सून २०२०

७.५ राज्यात मान्सून पावसाचे आगमन दि. ११ जून, २०२० रोजी झाले. राज्यात सरासरीच्या तुलनेत जून मध्ये ११३.२ टक्के, जुलै मध्ये ८६.९ टक्के, ऑगस्ट मध्ये १२३.६ टक्के, सप्टेंबर मध्ये १२१.८ टक्के व ऑक्टोबर मध्ये १७५.४ टक्के पाऊस पडला. राज्यात सन २०२० मध्ये ऑक्टोबर पर्यंत सरासरीच्या तुलनेत एकूण ११३.४ टक्के पाऊस पडला. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळून राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी १३९ तालुक्यात अतिरिक्त, १७३ तालुक्यात सरासरी आणि ४३ तालुक्यात अपुरा पाऊस पडला. पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये आणि विभागनिहाय प्रत्यक्ष पडलेल्या पावसाची आकडेवारी तक्ता ७.२ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ७.१ पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | तालुक्यांची संख्या# | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जून | | जुलै | | ऑगस्ट | | सप्टेंबर | | ऑक्टोबर | |
| | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० |
| १२० व अधिक | ३३ | १७७ | १०८ | ११३ | १३२ | १४४ | २३२ | १८० | २५६ | २२० |
| १०० - १२० | ३३ | ६४ | ७४ | ५१ | ५१ | ५८ | ५४ | ४६ | २० | २४ |
| ८० - १०० | ६३ | ५० | ९७ | ६९ | ६५ | ६० | ४२ | ५८ | ३६ | ४१ |
| ६० - ८० | ९८ | ३४ | ५२ | ५८ | ६० | ५१ | २१ | ४२ | २१ | ३५ |
| ४० - ६० | ९५ | २६ | २० | ४२ | ३६ | ३९ | ६ | २५ | १७ | २६ |
| २० - ४० | ३१ | ४ | ४ | २१ | १० | ३ | ० | ४ | ४ | ७ |
| ० - २० | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | १ | २ |

आधार : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळून

**तक्ता ७.२ विभागनिहाय प्रत्यक्ष पडलेला पाऊस**

(मिमी)

| कालावधीतील पाऊस | | | पडलेला पाऊस | | | | | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोकण# | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | | |
| जून | २०१९ | **सरासरी** | **६६०.२** | **१२७.७** | **१६६.०** | **१४५.८** | **१५४.१** | **१८७.५** | **२२३.३** | |
| | | प्रत्यक्ष | ५९३.९ | ८२.८ | १४८.० | ९४.० | १०८.४ | ९३.६ | १६०.१ | (७१.७) |
| | २०२० | **सरासरी** | **६६२.५** | **१३९.७** | **१९८.६** | **१३४.०** | **१४७.६** | **१८७.१** | **२०७.६** | |
| | | प्रत्यक्ष | ५४१.२ | २१०.० | २००.९ | २०३.२ | १८३.१ | १९३.३ | २३५.१ | (११३.२) |
| जुलै | २०१९ | **सरासरी** | **१,१६४.७** | **२३५.५** | **३३०.६** | **२०१.२** | **२६१.०** | **४१२.३** | **४०२.६** | |
| | | प्रत्यक्ष | १,४८०.५ | २४५.७ | ३७२.२ | १५१.८ | २५०.२ | ३९२.१ | ४०६.९ | (१०१.१) |
| | २०२० | **सरासरी** | **१,०६३.८** | **२१८.५** | **३२७.२** | **१८६.२** | **२३९.६** | **३६२.३** | **३३०.९** | |
| | | प्रत्यक्ष | ८८६.१ | २०४.७ | १६५.४ | २०९.० | २४७.६ | ३४७.८ | २८७.५ | (८६.९) |
| ऑगस्ट | २०१९ | **सरासरी** | **७५७.१** | **१८९.०** | **२१६.७** | **१९७.३** | **२१०.०** | **३५२.४** | **३०३.३** | |
| | | प्रत्यक्ष | ९२५.५ | २६०.५ | ३६०.२ | १४१.१ | १६८.७ | ३८५.१ | ३२८.६ | (१०८.३) |
| | २०२० | **सरासरी** | **७६६.३** | **१९७.४** | **२४७.५** | **१९३.३** | **२३१.७** | **३४७.८** | **२८६.०** | |
| | | प्रत्यक्ष | १,२२२.० | १९२.४ | ३१०.४ | १५१.१ | १९९.५ | ४४४.४ | ३५३.५ | (१२३.६) |
| सप्टेंबर | २०१९ | **सरासरी** | **३७९.०** | **१५८.६** | **१५८.१** | **१७६.९** | **१६६.७** | **२०९.५** | **२०२.१** | |
| | | प्रत्यक्ष | ८९७.१ | २०७.१ | २२१.९ | २२०.३ | २००.३ | ३३९.९ | ३०४.३ | (१५०.६) |
| | २०२० | **सरासरी** | **३७५.५** | **१५१.५** | **१७१.७** | **१६६.०** | **१३०.९** | **१७५.३** | **१७९.७** | |
| | | प्रत्यक्ष | ४२९.९ | १९३.७ | १८९.३ | २७०.३ | १५१.० | १३९.१ | २१८.८ | (१२१.८) |
| ऑक्टोबर | २०१९ | **सरासरी** | **११५.४** | **५०.८** | **९१.६** | **५८.६** | **४६.१** | **५३.५** | **६७.४** | |
| | | प्रत्यक्ष | १८३.६ | १३१.६ | २१७.५ | २०९.८ | ८०.९ | ४८.२ | १५०.३ | (२२२.८) |
| | २०२० | **सरासरी** | **१०८.६** | **५३.१** | **९६.५** | **७१.३** | **५७.५** | **५३.४** | **७१.१** | |
| | | प्रत्यक्ष | २४२.५ | ७१.० | २३२.७ | ११०.७ | ५९.२ | ५१.५ | १२४.७ | (१७५.४) |
| जून ते ऑक्टोबर | २०१९ | **सरासरी** | **३,०७६.४** | **७६१.६** | **९६३.०** | **७७९.८** | **८३७.९** | **१,२१५.२** | **१,१९८.७** | |
| | | प्रत्यक्ष | ४,०८०.६ | ९२७.७ | १,३१९.७ | ८१६.९ | ८०८.५ | १,२५८.९ | १,३४९.७ | (११२.६) |
| | २०२० | **सरासरी** | **२,९७६.७** | **७६०.२** | **१,०४१.५** | **७५०.८** | **८०७.३** | **१,१२५.९** | **१,०७५.३** | |
| | | प्रत्यक्ष | ३,३२१.७ | ८७१.८ | १,०९८.७ | ९४४.३ | ८४०.४ | १,०९७.१ | १,२१९.६ | (११३.४) |

*आधार* : कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून

टीप : कंसातील आकडे प्रत्यक्ष पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी दर्शवितात. शासनाने मान्सून २०२० पासून राज्यातील जिल्हानिहाय/तालुकानिहाय व महिनानिहाय सरासरी पर्जन्याची सुधारीत आकडेवारी दि. १२ मे, २०२० रोजी निश्चित केली आहे

## वहिती खातेदार

७.६ पहिल्या कृषिगणने (१९७०-७१) नुसार राज्यात एकूण वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र अनुक्रमे ०.५० कोटी व २.१२ कोटी हेक्टर होते आणि वहिती खात्याचे सरासरी क्षेत्र ४.२८ हेक्टर होते.

७.६.१ एकूण वहिती खातेदारांच्या १.३७ कोटी (कृषिगणना २०१०-११) या संख्येमध्ये ११.६ टक्क्यांनी वाढ होऊन ती दहाव्या कृषिगणने (२०१५-१६) नुसार १.५३ कोटी झाली. तसेच १.९८ कोटी हेक्टर इतक्या एकूण वहिती क्षेत्रामध्ये (कृषिगणना २०१०-११) ३.७ टक्क्यांनी वाढ होऊन ते २०१५-१६ मध्ये २.०५ कोटी हेक्टर झाले. कृषिगणना २०१०-११ च्या १.४४ हेक्टर सरासरी वहिती क्षेत्रामध्ये घट होऊन ते दहाव्या कृषिगणने (२०१५-१६) नुसार १.३४ हेक्टर झाले.

७.६.२ कृषिगणना (२०१५-१६) नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकडील सरासरी वहिती क्षेत्र अनुक्रमे १.२४ हेक्टर व १.७६ हेक्टर होते. महिला वहिती खातेदारांचे प्रमाण १४.१ टक्के असून सरासरी वहिती क्षेत्र १.२२ हेक्टर होते. राज्यातील वहिती खात्यांच्या आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.१ मध्ये दिली आहे तर राज्यातील वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र याबाबतची आकडेवारी तक्ता ७.३ मध्ये देण्यात आली आहे तर देशातील काही निवडक राज्यांमधील तपशील तक्ता ७.४ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.३ राज्यातील वहिती खातेदार व वहिती क्षेत्र**

| आकार वर्ग (हेक्टर) | वहिती खातेदाराची संख्या ('०००') | | वहिती क्षेत्र ('००० हेक्टर) | |
|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| अत्यल्प/सीमांतिक (१.० पर्यंत) | ६,७०९ | ७,८१६ | ३,१८६ | ३,४४९ |
| अल्प/लहान (१.० ते २.०) | ४,०५२ | ४,३३९ | ५,७३९ | ५,७७१ |
| निम-मध्यम (२.० ते ४.०) | २,१५९ | २,३२७ | ५,७६५ | ६,०२५ |
| मध्यम (४.० ते १०.०) | ७११ | ७३४ | ३,९९३ | ४,०९९ |
| मोठे (१०.० व अधिक) | ६८ | ६९ | १,०८४ | १,१६२ |
| एकूण | **१३,६९९** | **१५,२८५** | **१९,७६७** | **२०,५०६** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.४ काही निवडक राज्यांमधील वहिती खातेदार व वहिती क्षेत्र**

| राज्य | वहिती खातेदाराची संख्या ('०००) | | वहिती क्षेत्र ('००० हेक्टर) | | सरासरी वहिती क्षेत्र ( हेक्टर) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| आंध्र प्रदेश | ७,६२१ | ८,५२४ | ८,०९६ | ८,००४ | १.०६ | ०.९४ |
| गुजरात | ४,८८६ | ५,३२० | ९,८९८ | ९,९७८ | २.०३ | १.८८ |
| कर्नाटक | ७,८३२ | ८,६७७ | १२,१६१ | ११,७२४ | १.५५ | १.३५ |
| मध्य प्रदेश | ८,८७२ | १०,००४ | १५,८३६ | १५,६७१ | १.७८ | १.५७ |
| **महाराष्ट्र** | **१३,६९९** | **१५,२८५** | **१९,७६७** | **२०,५०६** | **१.४४** | **१.३४** |
| पंजाब | १,०५३ | १,०९२ | ३,९६७ | ३,९५३ | ३.७७ | ३.६२ |
| राजस्थान | ६,८८८ | ७,६५४ | २१,१३६ | २०,८७४ | ३.०७ | २.७३ |
| तामीळनाडू | ८,११८ | ७,९३८ | ६,४८८ | ५,९७१ | ०.८० | ०.७५ |
| तेलंगणा | ५,५५४ | ५,९४८ | ६,१९७ | ५,९७३ | १.१२ | १.०० |
| उत्तर प्रदेश | २३,३२५ | २३,८२२ | १७,६२२ | १७,४५१ | ०.७६ | ०.७३ |
| **अखिल भारत** | **१,३८,३४८** | **१,४६,४५४** | **१,५९,५९२** | **१,५७,८१७** | **१.१५** | **१.०८** |

*आधार* : कृषि गणना, केंद्र शासन

७.७ **दुष्काळ व नैसर्गिक आपत्ती:** सन २०२० च्या खरीप हंगामात दुष्काळ सदृश परिस्थितीमुळे गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला. जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे व फळपिकांचे नुकसान झाले. आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना कमाल दोन हेक्टर क्षेत्रासाठी, शेतीपिकांसाठी ₹ १०,००० प्रति हेक्टर व फळपिकांसाठी ₹ २५,००० प्रति हेक्टर या दराने दोन हप्त्यात एकूण ₹ ४,३७४.४३ कोटी रकमेची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

## जमिनीचा वापर

७.८ वर्ष २०१८-१९ च्या जमीन वापराच्या आकडेवारीनुसार राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी पिकांखालील स्थूल क्षेत्र २३२.१२ लाख हेक्टर तर पिकांखालील निव्वळ क्षेत्र १६८.१५ लाख हेक्टर (सुमारे ५५ टक्के) होते. राज्यातील जमीन वापराच्या आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.४: राज्यातील जमिनीचा वापर २०१८-१९**




## संभाव्य कृषि उत्पादन २०२०-२१

७.९.१ **खरीप पिके:** सन २०२०-२१ च्या खरीप हंगामामध्ये १५६.८९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली तर मागील वर्षी १५२.८८ लाख हेक्टर पेरणी क्षेत्र होते. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि ऊस पिकांखालील क्षेत्रात वाढ झाली असून, कापूस पिकांखालील क्षेत्रात घट अपेक्षित आहे. गतवर्षीच्या तुलनेत तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, ऊस व कापसाच्या उत्पादनात वाढ अपेक्षित आहे. प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.५ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९-२० (अस्थायी) | २०२०-२१ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०१९-२० (अस्थायी) | २०२०-२१ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| तांदूळ | १,४७८ | १,५४७ | ५ | २,७०२ | ३,१३७ | १६ |
| ज्वारी | ३९० | २७५ | (-)२९ | २७३ | २९६ | ८ |
| बाजरी | ६७३ | ६३७ | (-)५ | ५१२ | ८२९ | ६२ |
| नाचणी | ८२ | ७४ | (-)१० | ८७ | १०७ | २३ |
| मका | ७७२ | ९०८ | १८ | १,०५२ | ३,०६२ | १९१ |
| इतर तृणधान्ये | ४१ | ३७ | (-)१० | २२ | १६ | (-)२५ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,४३६** | **३,४७८** | **१** | **४,६४८** | **७,४४८** | **६०** |
| तूर | १,३१९ | १,२३६ | (-)६ | १,१९७ | १,१७८ | (-)२ |
| मूग | ३८७ | ४३० | ११ | १५१ | २२७ | ५१ |
| उडीद | ३४१ | ३९० | १४ | १५१ | २५८ | ७१ |
| इतर कडधान्ये | ८९ | १२३ | ३९ | ३९ | ९० | १३३ |
| **एकूण कडधान्ये** | **२,१३५** | **२,१७९** | **२** | **१,५३७** | **१,७५४** | **१४** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,५७१** | **५,६५७** | **२** | **६,१८५** | **९,२०२** | **४९** |
| सोयाबीन | ४,१२४ | ४,३५७ | ६ | ४,८२६ | ६,२०३ | २९ |
| भूईमूग | २२१ | २०५ | (-)७ | १९१ | २४३ | २७ |
| तीळ | २० | १० | (-)५३ | ४ | २ | (-)४५ |
| कारळ | ८ | ८ | (-)६ | २ | १ | (-)८ |
| सुर्यफूल | १९ | १५ | (-)२१ | ७ | ९ | ३६ |
| इतर तेलबिया | ११ | १० | (-)३ | ३ | ४ | ३४ |
| **एकूण तेलबिया** | **४,४०३** | **४,६०४** | **५** | **५,०३२** | **६,४६३** | **२८** |
| कापूस (रुई)@ | ४,४९१ | ४,२८६ | (-)५ | ६,६३९ | ८,८२२ | ३३ |
| ऊस ** | ८२२ | १,१४२ | ३९ | ६९,३१३ | ९७,२६८ | ४० |
| **एकूण** | **१५,२८८** | **१५,६८९** | **२.६३** | - | - | - |

@ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये ** तोडणी क्षेत्र # परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : सन २०१९-२० ची आकडेवारी अंतिम अंदाजावर व २०२०-२१ ची आकडेवारी द्वितीय पुर्वानुमानवर आधारीत आहे
आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.९.२ **रब्बी पिके:** सन २०२०-२१ या रब्बी हंगामात डिसेंबर अखेर ५३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली व ती मागील वर्षाच्या त्याच कालावधीच्या तुलनेत तीन टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षाच्या तुलनेत कडधान्य पिकांच्या क्षेत्रात वाढ तर तृणधान्य व तेलबिया पिकांच्या क्षेत्रात घट अपेक्षित आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्य व कडधान्य पिकांच्या उत्पादनात वाढ तर तेलबिया पिकांच्या उत्पादनात घट अपेक्षित आहे. प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.६ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९-२० (अस्थायी) | २०२०-२१ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०१९-२० (अस्थायी) | २०२०-२१ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| ज्वारी | १,९८२ | १,५८४ | (-)२० | १,५९२ | १,६११ | १ |
| गहू | १,०५७ | १,००३ | (-)५ | १,७९३ | १,७८३ | (-)१ |
| मका | २९८ | २८६ | (-)४ | ७९५ | ८४५ | ६ |
| इतर तृणधान्ये | ११ | १० | (-)८ | ४ | ४ | (-)४ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,३४७** | **२,८८३** | **(-)१४** | **४,१८४** | **४,२४३** | **१** |
| हरभरा | २,०४३ | २,२९४ | १२ | २,२४० | २,४६७ | १० |
| इतर कडधान्ये | १२५ | १४७ | १८ | ६६ | १०८ | ६४ |
| **एकूण कडधान्ये** | **२,१६८** | **२,४४२** | **१३** | **२,३०६** | **२,५७६** | **१२** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,५१५** | **५,३२५** | **(-)३** | **६,४९०** | **६,८१९** | **५** |
| तीळ | २ | १ | (-)३० | ०.६ | ०.४ | (-)२९ |
| करडई | २२ | १९ | (-)१२ | १५ | १२ | (-)२२ |
| सुर्यफूल | ३ | ३ | (-)२१ | २ | १ | (-)३७ |
| जवस | ५ | ६ | १४ | २ | २ | ९ |
| सरसू व मोहरी | ११ | १० | (-)३ | ३ | ३ | (-)७ |
| **एकूण तेलबिया** | **४३** | **३९** | **(-)८** | **२२** | **१८** | **(-)१८** |
| **एकूण** | **५,५५८** | **५,३६४** | **(-)३** | - | - | - |

# परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : सन २०१९-२० ची आकडेवारी अंतिम अंदाजावर व २०२०-२१ ची आकडेवारी द्वितीय पुर्वानुमानावर आधारीत आहे
आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.९.३ **उन्हाळी पिके:** सन २०१९-२० च्या उन्हाळी हंगामामध्ये ३.३५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. सन २०२०-२१ च्या उन्हाळी हंगामासाठी २.२० लाख हेक्टर क्षेत्र पेरणीचा लक्ष्यांक निर्धारित करण्यात आला आहे.

७.९.४ प्रमुख पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यांची समय मालिका परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे. निवडक राज्यांतील निवडक पिकांची त्रैवार्षिक सरासरी उत्पादकता तक्ता ७.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.७ निवडक राज्यांतील निवडक पिकांची त्रैवार्षिक सरासरी उत्पादकता**

| राज्य | सरासरी उत्पादकता (२०१६-१७ ते २०१८-१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तृणधान्ये (कि.ग्रॅ/हेक्टर) | कडधान्ये (कि.ग्रॅ/हेक्टर) | तेलबिया (कि.ग्रॅ/हेक्टर) | कापूस (कि.ग्रॅ/हेक्टर) | ऊस (मे.टन/हेक्टर) |
| आंध्र प्रदेश | ३,८११ | ६९४ | ८३३ | ५०७ | ७८ |
| गुजरात | २,३७२ | ९७१ | १,७६९ | ५५८ | ६१ |
| कर्नाटक | २,०२९ | ५८७ | ७७७ | ४१४ | ८१ |
| हरीयाणा | ३,८३१ | १,००० | १,९६१ | ५०३ | ८१ |
| मध्य प्रदेश | २,६४१ | ९८१ | १,१५७ | ५६१ | ५२ |
| **महाराष्ट्र** | **१,४२४** | **७७७** | **१,०९१** | **३२६** | **८४** |
| पंजाब | ४,५९१ | ९०० | १,४५६ | ७१३ | ८२ |
| राजस्थान | १,८७७ | ६२६ | १,४७० | ५३५ | ७५ |
| तामीळ नाडू | ३,०६० | ६२२ | २,३३७ | ३९६ | ९७ |
| तेलंगणा | ३,२८८ | ८४४ | १,६७० | ४१२ | ७५ |
| उत्तर प्रदेश | २,८४८ | ९६५ | १,००३ | उ ना | ७५ |
| **अखिल भारत** | **२,६४५** | **७९८** | **१,२५०** | **४४४** | **७६** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कृषि, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, केंद्र शासन    उ ना उपलब्ध नाही

७.९.५ **कृषि उत्पादनाचे निर्देशांक:** राज्याकरिता कृषि उत्पादनाच्या निर्देशांकांची (पाया: १९७९-८२ त्रैवार्षिक) समय मालिका परिशिष्ट ७.४ मध्ये दिली आहे.

७.१० **फलोत्पादन:** कृषि क्षेत्राच्या राज्य स्थूल मूल्यवृद्धिमध्ये फलोत्पादनाचा सरासरी हिस्सा ३० टक्के आहे. फलोत्पादन पिकांखालील अंदाजित क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.८ फलोत्पादन पिकांखालील अंदाजित क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० (अस्थायी) | शेकडा बदल | २०१८-१९ | २०१९-२० (अस्थायी) | शेकडा बदल |
| फळे | ७५५.५८ | ७८५.१३ | ३.९ | १०,७७८ | ११,५४४ | ७.१ |
| भाजीपाला | ६४९.२८ | ८४५.०० | ३०.१ | ११,४७२ | १४,३९४ | २५.५ |
| मसाल्याची पिके | ४६.२४ | ८४.१३ | ८१.९ | ३९१ | १,३०४ | २३३.६ |
| फळबाग पिके | १८८.७२ | १९४.४२ | ३.० | ३४८ | ५९० | ६९.५ |
| फुले@ | ११.४५ | ११.३२ | (-)१.१ | ४७ | ४३ | (-)८.२ |

@ देठासह व देठविरहीत फुले समाविष्ट

टीप : सन २०१८-१९ ची आकडेवारी अंतिम अंदाजावर व २०१९-२० ची आकडेवारी तृतीय पुर्वानुमानावर आधारीत आहे

*आधार* : फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, केंद्र शासन

## सुधारित बियाणे

७.११ दर्जेदार बियाण्याचे उत्पादन व वितरण करणाऱ्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) व राष्ट्रीय बीज निगम या सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख संस्था आहेत. विविध पिकांच्या बियाणांची विक्री खाजगी बियाणे उत्पादकांकडून देखील केली जाते. केंद्र शासनाने स्वपरागसिंचित (तांदूळ, गहू, तूर, मूग, उडीद, इत्यादी) पिकांच्या बाबतीत ३५ टक्के, परपरागसिंचित (मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इत्यादी) पिकांसाठी ५० टक्के व संकरित पिकांसाठी १०० टक्के बियाणे बदलाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सुधारित बियाण्यांचे खरीप व रब्बी हंगामासाठी केलेले वितरण तक्ता ७.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.९ सुधारित बियाण्यांचे खरीप व रब्बी हंगामासाठी केलेले वितरण**

('००० क्विंटल)

| वितरक संस्था | हंगाम | २०१८ | २०१९ | २०२० | २०१९ च्या तुलनेत २०२० मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक | खरीप | ५३१ | ६१५ | ३०७ | (-)५०.१ |
| | रब्बी | ३८२ | ३१७ | ३४२# | ७.९ |
| | **एकूण** | **९१३** | **९३२** | **६४९** | **(-)३०.४** |
| खाजगी | खरीप | १,०७७ | १,००२ | १,३७९ | ३७.६ |
| | रब्बी | १७८ | ७९० | ७५८# | (-)४.१ |
| | **एकूण** | **१,२५५** | **१,७९२** | **२,१३७** | **१९.३** |
| **एकूण** | खरीप | १,६०८ | १,६१७ | १,६८६ | ४.३ |
| | रब्बी | ५६० | १,१०७ | १,१००# | (-)०.६ |
| | **एकूण** | **२,१६८** | **२,७२४** | **२,७८६** | **२.३** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# बियाण्याची अपेक्षित उपलब्धता

## खते व किटकनाशके

७.१२ सन २०२०-२१ करीता राज्यातील रासायनिक खतांचा एकूण वापर ७८.१० लाख मे.टन व प्रति हेक्टर वापर १४४.९ किलो अपेक्षित आहे. सन २०१९-२० मध्ये रासायनिक खतांचा एकूण वापर ६१.३३ लाख मे.टन व प्रति हेक्टर वापर ११३ किलो होता. रासायनिक खतांचा वापर तक्ता ७.१० मध्ये दिला आहे व किटकनाशकांचा वापर तक्ता ७.११ मध्ये दिला आहे. नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर तक्ता ७.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१० रासायनिक खतांचा वापर**

| वर्ष | एकूण वापर (लाख मे.टन) | प्रति हेक्टर वापर (किलो) |
|---|---|---|
| २०१८-१९ | ६०.०८ | १२६.० |
| २०१९-२० | ६१.३३ | ११३.० |
| २०२०-२१# | ७८.१० | १४४.९ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

**तक्ता ७.११ किटकनाशकांचा वापर**

(मे.टन)

| वर्ष | किटकनाशके | |
|---|---|---|
| | रासायनिक | जैविक |
| २०१८-१९ | ११,७४६ | १,१६४ |
| २०१९-२० | १२,७९४ | १,०८२ |
| २०२०-२१# | १३,६८० | २,५४५ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

**तक्ता ७.१२ नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर**

('०० मे. टन)

| विभाग | रासायनिक खते | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९-२० | | | | २०२०-२१# | | | |
| | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण |
| कोकण | ३५३ | ७७ | ६५ | ४९५ | ३८६ | ९१ | ७९ | ५५६ |
| नाशिक | ३,८७३ | १,९९८ | १,५५४ | ७,४२५ | ४,४२८ | २,४१६ | १,९४८ | ८,७९१ |
| पुणे | ३,४४७ | १,६९० | १,१५१ | ६,२८८ | ४,०३९ | २,२१८ | १,८३४ | ८,०९१ |
| औरंगाबाद | ३,६३१ | २,३९६ | १,०५१ | ७,०७७ | ४,७६९ | ३,४६७ | १,८४३ | १०,०७९ |
| अमरावती | १,८९५ | १,२७४ | ५५४ | ३,७२३ | २,११७ | १,७०३ | ७६६ | ४,५८७ |
| नागपूर | १,९२८ | ९८० | ३०५ | ३,२१३ | २,१७४ | १,१७२ | ५२५ | ३,८७० |
| **महाराष्ट्र** | **१५,१२७** | **८,४१५** | **४,६८०** | **२८,२२२** | **१७,९१३** | **११,०६७** | **६,९९५** | **३५,९७५** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

## सिंचन

७.१३.१ महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील सिंचित क्षेत्र २०१९-२० मध्ये ४०.५२ लाख हेक्टर आहे. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१३ मध्ये दिले आहे. लघु सिंचन प्रकल्पांची (स्थानिक क्षेत्र) संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१३ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | |
|---|---|---|---|
| | मोठे व मध्यम | लघु | एकूण |
| ३० जून, २०२० रोजी पूर्ण व प्रगती पथावरील प्रकल्पांची संख्या | ४०५ | ३,४७२$ | ३,८७७ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | |
| (i) जून,२०१९ पर्यंत निर्माण झालेली सिंचन क्षमता | ३९.१८ | १३.८६ | ५३.०४ |
| (ii) २०१९-२० मधील कालवा व नदीद्वारे सिंचित क्षेत्र* | १९.५७ | ७.०३ | २६.६० |
| (iii) २०१९-२० मधील लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे सिंचित क्षेत्र* | ११.७९ | २.१३ | १३.९२ |
| (iv) २०१९-२० मधील वापरलेली एकूण सिंचन क्षमता (ii)+(iii)* | ३१.३६ | ९.१६ | ४०.५२ |

$ प्रकल्प संख्येमध्ये महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळांच्या उपसा सिंचन योजना समाविष्ट * अस्थायी

*आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद

**तक्ता ७.१४ लघु सिंचन प्रकल्पांची (स्थानिक क्षेत्र) संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | कोल्हापूर बंधारे | उपसा जलसिंचन योजना | इतर महत्वाचे प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लघु पाटबंधारे | पाझर तलाव | इतर[$] | |
| ३० जून, २०२० रोजी प्रकल्पांची संख्या | | | | | | |
| पूर्ण | १३,०९५ | २,८९९ | २,९७० | २४,२२२ | ६३,०८३ | १,०६,२६९ |
| प्रगतीपथावरील | १,७३२ | ८६ | ५४७ | ९७५ | ४,००९ | ७,३४९ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | |
| (i) जून,२०१९ पर्यंत निर्मित | ३.५५ | ०.४२ | २.६४ | ६.८८ | ५.४७ | १८.९६ |
| (ii) जून,२०२० पर्यंत निर्मित | ३.६२ | ०.४२ | २.६७ | ६.८९ | ५.६६ | १९.२६ |
| (iii) २०१९-२० मध्ये वापरलेली | १.२७ | ०.१५ | ०.९३ | ३.४५ | २.८३ | ८.६३ |

$ वळण बंधारा, साठवण बंधारा, माजी माल गुजारी तलाव, गाव तलाव, सिमेंट नाला बंधारे, इत्यादी समाविष्ट

टीप : प्रत्यक्ष वापरात आलेली सिंचन क्षमता निर्मित सिंचन क्षमतेच्या ३५ टक्के गृहीत धरण्यात आली आहे

*आधार* : मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक), महाराष्ट्र शासन

७.१३.२ **जलाशयांतील साठा:** मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी एकूण उपयुक्त जलसाठा ३०,५७९ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार उपयुक्त जलसाठा क्षमतेच्या सुमारे ६९.२ टक्के होता. उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र तक्ता ७.१५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१५ उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र**

| वर्ष | प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमता (दलघमी) | १५ ऑक्टोबर रोजी उपयुक्त जलसाठा (दलघमी) | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | निर्मित सिंचन क्षमता (३० जून अखेर) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र (१ जुलै ते ३० जून) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राची निर्मित सिंचन क्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ४२,९६० | १७,७१२ | ४१.२ | ४९.१० | २४.०७ | ४९.० |
| २०१६-१७ | ४३,२४१ | २९,९७१ | ६९.३ | ४९.६५ | ४०.५८ | ८१.७ |
| २०१७-१८ | ४३,७५२ | २७,६०७ | ६३.१ | ५०.३७ | ३९.४२ | ७८.३ |
| २०१८-१९ | ४३,५७२ | २३,००४ | ५२.८ | ५१.२३ | ३५.९७ | ७०.२ |
| २०१९-२० | ४४,१८३ | ३०,५७९ | ६९.२ | ५३.०४ | ४०.५२* | ७६.४ |

*आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखापरिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद दलघमी : दशलक्ष घनमीटर *अस्थायी

७.१३.३ **पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा:** शेतकऱ्यांद्वारे सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन करण्याकरीता राज्यात जलसंपदा विभागा अंतर्गत ४९.७९ लाख हेक्टर क्षेत्रासाठी एकूण १०,९७४ पाणी वापर संस्था नोव्हेंबर, २०२० अखेर स्थापन झाल्या आहेत. त्या क्षेत्रापैकी ६.७६ लाख हेक्टर क्षेत्रासाठी १,६८९ पाणी वापर संस्थांची महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत व १.७३ लाख हेक्टर क्षेत्रासाठी ४५४ पाणी वापर संस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० अंतर्गत नोंदणी झाली आहे. पाणीपट्टी बाबतची समय मालिका परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१४.१ राज्यात सुमारे ४३.२२ लाख कृषि पंप आहेत. सन २०१९-२० मध्ये महावितरणने ९६,३२७ कृषि पंपांचे आणि सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर अखेर ५२,८७० कृषि पंपांचे विद्युतीकरण केले.

७.१४.२ **अटल सौर कृषि पंप योजना:** कृषि पंपाना दिवसा वीज पुरवठा करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये (२०१५ ते २०१८) एकूण ७,५४० कृषि पंपांच्या लक्ष्यापैकी ५,६६२ सौर कृषि पंप महावितरणने कार्यान्वित केले. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये (२०१८-१९ पासून) डिसेंबर, २०१९ अखेर ७,००० सौर कृषि पंप महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांनी कार्यान्वित केले.

७.१४.३ **मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना:** कृषि पंपांना दिवसा वीज पुरवठा व्हावा आणि प्रदूषण कमी करण्यासाठी डिझेल पंपांना पर्याय उपलब्ध व्हावा या उद्देशाने राज्य शासनाने सन २०१८-१९ मध्ये ही योजना सुरू केली आहे. शासनाने सलग तीन वर्षात एक लाख ऑफ ग्रिड सौर कृषि पंप वितरीत करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. विद्युतीकरण न झालेल्या दुर्गम किंवा आदिवासी भागातील शेतकरी किंवा ज्या भागाचे महावितरणने विद्युतीकरण केलेले नाही अशा भागातील शेतकऱ्यांकरीता ही योजना राबवली जात आहे. स्वत:ची शेतजमीन व पाण्याची कायमस्वरुपी सुविधा उपलब्ध असलेल्या परंतु विजेवर चालणारे कृषि पंप नसलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. शेतकऱ्यांना सौर कृषि पंपाच्या किंमतीच्या जास्तीत जास्त १० टक्के रक्कम सहभाग म्हणून भरावी लागते. योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून डिसेंबर, २०२० अखेर एकूण ६४,५९८ सौर कृषि पंप महावितरण मार्फत कार्यान्वित केले आहेत.

## कृषि वित्त पुरवठा

७.१५.१ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य केले जाते. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था कृषि व ग्रामीण विकासासाठी कार्य करणारी देशातील शिखर बँक आहे व ती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि वाणिज्यिक बँका यांच्यामार्फत अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज वितरीत करते. राज्यासाठी सन २०२०-२१ करीता प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज आराखडा ₹ ४.७५ लाख कोटी आहे व यामध्ये कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राचा हिस्सा ₹ ०.९४ लाख कोटी (१९.७ टक्के) आहे. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांनी दिलेली कर्जे तक्ता ७.१६ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१६ वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| कर्जाचा प्रकार | वाणिज्यिक बँका$ | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१ | २०१९-२० | २०२०-२१+ |
| पीक कर्ज | १६,२९६ | २२,२८२ | १,४०९ | ३,१९७ | १०,८९९ | १५,०३६ | २८,६०४ | ४०,५१५ |
| कृषि मुदत कर्ज | ३४,२४८ | २९,८०५ | १६९ | १७२ | १० | ३७ | ३४,४२७ | ३०,०१४ |
| **एकूण** | **५०,५४४** | **५२,०८७** | **१,५७८** | **३,३६९** | **१०,९०९** | **१५,०७३** | **६३,०३१** | **७०,५२९** |

*आधार*: राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य $ राष्ट्रीयीकृत बँकांसह + डिसेंबर अखेर

७.१५.२ राज्यात निम्न स्तरावर कृषि वित्त पुरवठा करण्याशी थेट संबंधित असणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी सभासदांना अल्प मुदतीची पीक कर्जे उपलब्ध करून देतात. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून सन २०१८-१९ मध्ये एकूण ₹ १२,०१० कोटी रकमेचा कर्जपुरवठा करण्यात आला होता. सन २०१९-२० मध्ये एकूण ₹ १०,८९८ कोटी रकमेचा कर्जपुरवठा करण्यात आला तर सन २०२०-२१ मध्ये जानेवारी अखेर ₹ १५,४९६ कोटी रकमेचा कर्जपुरवठा करण्यात आला.

७.१५.३ **किसान क्रेडिट कार्ड योजना:** राज्यात सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने २२.५९ लाख नवीन किसान क्रेडिट कार्ड वाटप केले. या नवीन कार्डधारकांना सन २०१९-२० मध्ये ₹ १०,५४२ कोटी रकमेचे कर्ज मंजूर झाले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे तक्ता ७.१७ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१७ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे**

| वर्ष | लघु मुदतीची कर्जे | | दीर्घ मुदतीची कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) |
| २०१८-१९ | २,६८३ | १३,१३८ | ७.६ | ३५.४६ |
| २०१९-२० | २,२५९ | १०,५३८ | ०.२ | ३.३८ |
| २०२०-२१ + | २,८८० | १५,६४८ | १०.०१ | १६९.५४ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

## कृषि पणन

७.१६ राज्यातील कृषि पणन विभाग महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ नुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करते. शेतकऱ्यांच्या कृषि मालाला योग्य भाव मिळावा आणि व्यापारी व मध्यस्थांकडून शेतमालाला कमी भाव देऊन शेतकऱ्यांचे शोषण केले जाऊ नये या हेतूने कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमाल विकण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. राज्यात ३०६ कृषि उत्पन्न बाजार समित्या व ६२३ उप बाजार समित्या स्थापन झाल्या आहेत. दि. २५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत १,२३० थेट पणन परवाने दिले आहेत. याशिवाय ६१ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले आहेत. राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.१८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१८ राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य**

| वर्ष | आवक (लाख मे.टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१७-१८ | २११.५० | ५६,९९५ |
| २०१८-१९ | २१३.७० | ४५,८८६ |
| २०१९-२० | २०३.९० | ५४,४६३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

७.१७ **किमान आधारभूत किंमत योजना:** शेतमालाला हमी आणि शेतकऱ्यांना खात्रीशीर बाजार उपलब्ध करून देणे व त्यांना किंमतीतील चढउतारामुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देऊन शेतीव्यवसाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य करणे यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून केंद्र सरकार, कृषि खर्च व किंमती आयोगाच्या शिफारशींच्या आधारे निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती पेरणी हंगामापूर्वी जाहीर करते. या योजने अंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ आणि कृषि उत्पन्न बाजार समित्या यांच्या मार्फत केली जाते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.१९ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.१९ केंद्र शासनाने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

(₹ / क्विंटल)

| पीक | किमान आधारभूत किंमती | | |
|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| भात/धान (साधारण वाजवी प्रत) | १,७५० | १,८१५ | १,८६८ |
| भात/धान (प्रत-अ) | १,७७० | १,८३५ | १,८८८ |
| ज्वारी (संकरित) | २,४३० | २,५५० | २,६२० |
| ज्वारी (मालदांडी) | २,४५० | २,५७० | २,६४० |
| गहू | १,८४० | १,९२५ | १,९७५ |
| मका | १,७०० | १,७६० | १,८५० |
| बाजरी | १,९५० | २,००० | २,१५० |
| हरभरा | ४,६२० | ४,८७५ | ५,१०० |
| तूर | ५,६७५ | ५,८०० | ६,००० |
| मूग | ६,९७५ | ७,०५० | ७,१९६ |
| उडीद | ५,६०० | ५,७०० | ६,००० |
| सूर्यफूल | ५,३८८ | ५,६५० | ५,८८५ |
| सोयाबीन | ३,३९९ | ३,७१० | ३,८८० |
| भूईमुगाच्या शेंगा | ४,८९० | ५,०९० | ५,२७५ |
| कापूस (मध्यम धागा) | ५,१५० | ५,२५५ | ५,५१५ |
| कापूस (लांब धागा) | ५,४५० | ५,५५० | ५,८२५ |
| करडई | ४,९४५ | ५,२१५ | ५,३२७ |
| नाचणी | २,८९७ | ३,१५० | ३,२९५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

७.१८ **ईलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषि बाजार:** इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) हे देशभरात लागू असलेले इलेक्ट्रॉनिक व्यापार पोर्टल असून त्याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधील प्रत्यक्ष बाजार संलग्न असून ऑनलाईन पद्धतीने खरेदी विक्रीची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यांशी संबंधित सर्व माहिती व सेवा यासाठी एक खिडकी सुविधा उपलब्ध झाली असून त्यामध्ये शेतमालाची आवक व किंमती, खरेदी-विक्री देकार, व्यापार संधीस प्रतिसाद देण्याची तरतूद या बाबींचा समावेश आहे. शेतमालाची प्रत्यक्ष आवक जावक कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून जरी सुरु असली तरी ऑनलाईन मार्केटमुळे देवाणघेवाणीचा खर्च तसेच माहितीतील असमानता कमी होत आहे. ई-नाम या पोर्टलमध्ये महाराष्ट्रातील ११८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व ११८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, ई-ऑक्शन सुरु करण्यात आले आहे व ६७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरु करण्यात आले आहे. नोव्हेंबर, २०२० अखेर ₹ ३,८५० कोटी रकमेचे सुमारे १३ लाख मे.टन धान्याचे ई-ऑक्शन करण्यात आले व ₹ ९८.५६ कोटी रकमेचे ई-पेमेंट झाले. कृषि मालाच्या गुणवत्तेच्या तपासणीसाठी ६० कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गुणवत्ता तपासणी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

# कृषि विकासाच्या निवडक योजना

७.१९ केंद्र पुरस्कृत व राज्याच्या विविध योजना कृषि विकासासाठी राज्यात राबविण्यात येतात.

७.२० **राष्ट्रीय कृषि विकास योजना:** केंद्र शासनाने या योजनेस 'राष्ट्रीय कृषि विकास योजना - कृषि व संलग्न क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी लाभकारी दृष्टीकोन' (आरकेव्हीवाय-रफ्तार) म्हणून सन २०२०-२१ पर्यंत मान्यता दिली आहे. शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना बळकटी देणे, जोखीम कमी करणे आणि कृषि-व्यावसायिक उद्योजकतेस चालना देणे या माध्यमातून शेतीला लाभकारी आर्थिक उपक्रम बनविणे असा या योजनेचा उद्देश आहे. या योजने अंतर्गत उत्पादनात वाढ, पायाभूत सुविधा आणि राज्यांसाठी मालमत्ता यासाठी ७० टक्के निधी तर २० टक्के निधी आरकेव्हीवाय-रफ्तार अंतर्गत राष्ट्रीय प्राधान्य असलेल्या विशेष उप-योजनांसाठी आणि १० टक्के निधी नाविन्यपूर्ण उपक्रम व कृषि-उद्योजकता विकास प्रकल्पांसाठी राखीव असेल अशा पद्धतीने निधीची विभागणी केली आहे. या योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ ४०९.३२ कोटी निधी प्राप्त झाला व त्यापैकी ₹ ३४५.९० कोटी निधी डिसेंबर, २०२० पर्यंत खर्च झाला. सन २०२०-२१ करिता प्राप्त झालेल्या ₹ १४०.८० कोटी निधीपैकी ₹ ५६.५९ कोटी निधी जानेवारी, २०२१ अखेर खर्च झाला.

७.२१ **राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान:** सुयोग्य तंत्रज्ञान आणि सुधारीत कृषिविद्या पद्धती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विस्तार कार्यक्रमात सुधारणा व बळकटीकरण करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. यामध्ये कृषि विस्तार, बियाणे व लागवड साहित्य, कृषि यांत्रिकीकरण आणि पीक संरक्षण व प्रादुर्भाव रोखणे या चार उपअभियानांचा समावेश आहे.

७.२१.१ **कृषि विस्तार:** कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या (आत्मा) योजनांना सहाय्य ही मुख्य योजना कृषि विस्तार कार्यक्रमा अंतर्गत राबवली जाते. या योजनेत शेतकरी प्रशिक्षण, कृषि प्रात्यक्षिके, शेतकरी शैक्षणिक सहली, शेतकरी गटांची निर्मिती व क्षमतावृद्धी, शेतीशाळा, शेतकरी गोष्टी, कृषि प्रदर्शने, शेतकरी मेळावा, शेतकरी मित्र, इत्यादी घटकांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ₹ २६.९६ कोटी निधी खर्च झाला.

७.२१.२ **बियाणे व लागवड साहित्य उप अभियान:** या उपअभियानांतर्गत ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम आणि बियाणे प्रक्रीया केंद्र व साठवणूक गोदाम या दोन घटकांचा समावेश आहे.

**अ. ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम:** दर्जेदार व प्रमाणित बियाणे किफायतशीर किंमतीत उपलब्ध करून देऊन उत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने सन २०१४-१५ पासून हे उपअभियान 'महाबीज' मार्फत राज्यात राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत प्रमाणित बियाण्यासाठी प्रति शेतकरी एक एकर क्षेत्राकरिता तृणधान्ये पिकांसाठी ५० टक्के आणि कडधान्ये व तेलबिया पिकांसाठी ६० टक्के सहाय्य दिले जाते. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ २४.२३ कोटी खर्च झाला असून सन २०२०-२१ साठी ₹ २८.७६ कोटी निधी मंजूर करण्यात आला.

**ब. बियाणे प्रक्रिया केंद्र व साठवणूक गोदाम:** ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना सन २०१९-२० पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केंद्रशासनाने राज्यासाठी निश्चित केलेल्या ५० बियाणे प्रक्रीया केंद्र व साठवणूक गोदाम बांधण्याच्या लक्ष्यांकापैकी १२ प्रकल्प पूर्ण झाले असून पाच प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ ७.६६ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ करीता ₹ १६.९४ कोटी निधी मंजूर करण्यात आला.

७.२२ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत फळबाग लागवड योजना:** ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना सन २०११-१२ पासून राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. रोजगार हमी जॉब कार्ड धारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि रोजगार निर्मिती हे या योजनेचे उद्देश आहेत. या योजनेअंतर्गत शेतकऱ्याच्या स्वतःच्या लागवडीयोग्य किंवा पडीत शेतजमिनीत दोन हेक्टर क्षेत्रात फळबाग लागवड करता येते. लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेद्वारे केली जाते. मजूर म्हणून रोजगार हमी जॉब कार्ड धारक व्यक्तिची नेमणूक करणे या योजने अंतर्गत अनिवार्य करण्यात आले आहे. फळबाग लागवडीसाठी आवश्यक प्रशिक्षण या योजने अंतर्गत दिले जाते. सन २०१९-२० मध्ये १७,३५१ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली व ₹ ८३ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ३२,६२२ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली व ₹ १०४.८० कोटी निधी खर्च झाला.

७.२३ **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान:** क्षेत्र विस्तार व उत्पादकतेत सुधारणा, जमिनीचा कस व उत्पादकता वाढवणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य करणे या उपायांद्वारे तांदूळ, गहू आणि कडधान्ये या पिकांचे उत्पादन वाढवणे या उद्देशाने २००७-०८ मध्ये हे अभियान सुरु करण्यात आले. या अभियानात २०१४-१५ पासून भरडधान्ये आणि कापूस, ज्यूट व ऊस या नगदी पिकांचा समावेश करण्यात आला. सन २०१९-२० मध्ये तांदळासाठी ₹ ६.८८ कोटी, गव्हासाठी ₹ ३.६२ कोटी, कडधान्यांसाठी ₹ १६४.२५ कोटी, अतिरिक्त कडधान्यांसाठी ₹ ५.९० कोटी, भरडधान्यासाठी ₹ २.५४ कोटी आणि पौष्टीक तृणधान्यांसाठी ₹ ११.८० कोटी खर्च झाले. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर तांदळासाठी ₹ १.२० कोटी, गव्हासाठी ₹ ०.५७ कोटी, कडधान्यांसाठी ₹ २२.७९ कोटी, अतिरिक्त कडधान्यांसाठी ₹ ५.४१ कोटी, भरडधान्यासाठी ₹ १.१४ कोटी आणि पौष्टीक तृणधान्यांसाठी ₹ ७.२१ कोटी खर्च झाले.

७.२३.१ सन २०१४-१५ पासून राबविण्यात येत असलेले राष्ट्रीय अन्न सुरक्षा (तेलबिया व तेलताड) अभियान सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानात समाविष्ट करण्यात आले. या अभियानाअंतर्गत तेलबिया पिके व वृक्षजन्य तेलबिया पिके ही

उपअभियाने राज्यात राबविली जात आहेत. या अभियानाअंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ २९.१२ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर राज्याने ₹ ४६.९१ कोटी मंजूर निधीपैकी ₹ १५.६६ कोटी निधी वितरीत केला व त्यापैकी ₹ १३.७८ कोटी निधी खर्च झाला.

७.२३.२ सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा व्यापारी पिके (कापूस व ऊस) अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत असून या अभियानांतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ ५.८० कोटी निधी खर्च झाला व सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ₹ १.६८ कोटी निधी खर्च झाला.

७.२४ **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान:** केंद्र शासनामार्फत २००५-०६ मध्ये हे अभियान सुरू करण्यात आले असून फलोत्पादनाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढविणे आणि फळे पिकण्याची प्रक्रीया नियंत्रित करणे, खाण्यास योग्य असे फळांना आवरण करणे, फळांचे तापमान नियंत्रित करणे आणि रासायनिक प्रक्रीया इत्यादी काढणी-पश्चात व्यवस्थापनास चालना देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

७.२४.१ राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची सन २००५ मध्ये स्थापना करण्यात आली. फलोत्पादनाच्या एकात्मिक विकासासाठी सुरु करण्यात आलेले हे अभियान २०१५-१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

७.२४.२ एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाअंतर्गत महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळास अभियानाच्या सुरुवातीपासून ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण ₹ २,०७२.१८ कोटी अनुदान प्राप्त झाले व त्यापैकी ₹ २,०६८.७३ कोटी खर्च झाले. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या प्रमुख घटकांवर झालेला खर्च तक्ता ७.२० मध्ये दिला आहे.

७.२४.३ द्राक्षे, आंबा, डाळिंब आणि केळी ही राज्यातून निर्यात केली जाणारी प्रमुख फळे आहेत. राज्यात २०१९-२० मध्ये विविध फळपिकांखालील क्षेत्र ७.८५ लाख हेक्टर होते. त्यापैकी डाळिंब फळपिकाचे क्षेत्र सर्वाधिक (१.६४ लाख हेक्टर) होते. त्या खालोखाल आंबा (१.५८ लाख हेक्टर), संत्री (१.१४ लाख हेक्टर), द्राक्षे (१.०९ लाख हेक्टर), केळी (०.७७ लाख हेक्टर), मोसंबी (०.५९ लाख हेक्टर) आणि चिकू (०.१६ लाख हेक्टर) या फळपिकांचे क्षेत्र होते. फळे, भाजीपाला व फुले यांच्या निर्यातीची राशि आणि निर्यातीचे मूल्य तक्ता ७.२१ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२० एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या प्रमुख बाबींवरील खर्च**

(₹ कोटी)

| घटक | खर्च + |
|---|---|
| क्षेत्र विस्तार अंतर्गत आंबा, पेरू, संत्री इत्यादींची सघन लागवड तसेच द्राक्ष, केळी, पपई, मसाला पिके व फूल पिके इत्यादींची लागवड | ४७७.३१ |
| २२,०७७ सामूहिक तलावांचे बांधकाम | ४६२.१४ |
| संरक्षित शेती अंतर्गत हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लॅस्टिक मल्चिंग, पक्षी/किटक प्रतिरोधक जाळे, इत्यादींची उभारणी | ३५०.४० |
| काढणी पश्चात व्यवस्थापना अंतर्गत पॅक हाऊस, पिकवणी कक्ष, कांदा साठवण चाळ, शीत साठवणूक गृहे, पूर्व शीतकरणगृह, इत्यादींना उत्तेजन | २८३.९४ |
| फलोत्पादन यांत्रिकीकरणास उत्तेजन | ७७.१७ |
| जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन | ४९.०० |
| गुणवत्तापूर्ण लागवड साहित्याच्या निर्मितीकरिता उच्च तंत्रज्ञान आधारित रोपवाटिका व उती संवर्धन प्रयोगशाळा उभारणी | ३७.४७ |
| मनुष्यबळ विकासाअंतर्गत शेतकऱ्यांचे प्रशिक्षण/अभ्यास दौरे, इत्यादी | ३५.३५ |
| सेंद्रिय शेतीस उत्तेजन | २१.२० |
| एकात्मिक कीड/ अन्नद्रव्ये व्यवस्थापनास उत्तेजन | २०.७३ |
| अळंबी उत्पादनाच्या २० प्रकल्पांची स्थापना | २.५२ |
| मधुमक्षिका पालनास उत्तेजन | १.३९ |
| अभियान व्यवस्थापन | ७७.७२ |
| इंडो इस्त्राईल/इंडो डच प्रकल्प-६ | ४०.२७ |
| नाविन्यपूर्ण घटक | १८.७१ |
| इतर | ११३.४१ |

\+ सुरुवातीपासून ऑक्टोबर, २०२० पर्यंत

*आधार* : महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ

७.२५ **आदिवासी जिल्ह्यांमध्ये परसबाग लागवडीस प्रोत्साहन:** कुपोषणाची समस्या भेडसावत असलेल्या ठाणे, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, पालघर आणि गोंदिया या १४ आदिवासी जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी कुटुंबांच्या संतुलित आहारामध्ये अ आणि क जीवनसत्वे आणि लोह यासारखी खनिजद्रव्ये समाविष्ट होण्याच्या दृष्टीने त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ १४.४० लाख प्राप्त निधी पैकी ₹ १४.१८ लाख निधी खर्च झाला व सन २०२०-२१ मध्ये ₹ ७.२६ लाख निधी मंजूर झाला.

७.२६.१ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना:** या योजने अंतर्गत सहा हेक्टर पर्यंत वहिती क्षेत्र व ₹ १.५० लाख पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने शाश्वत सिंचनाच्या सुविधेसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरुपात नवीन विहीर, जुन्या विहीरीची दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण, कृषिपंप, वीज मीटर जोडणी खर्च, विहीरीत बोअरींग, इत्यादी बाबींकरीता अर्थसहाय्य देण्यात येते. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ २६८.६० कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ करीता ₹ २७६.०६ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद आहे.

**तक्ता ७.२१ फळे, भाजीपाला व फुलांची निर्यात आणि निर्यातीचे मूल्य**

| फळे / फुले | राज्य / देश | २०१७-१८ | | २०१८-१९ | | २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) |
| आंबा | महाराष्ट्र | ३५,३४३ | ३०९ | २९,३४६ | ३१४ | २९,८८४ | ३०७ |
| | भारत | ४९,१८० | ३८२ | ४६,५१० | ४०६ | ४९,६५७ | ४०० |
| द्राक्षे | महाराष्ट्र | १,७५,३७० | १,८७१ | १,९३,७०९ | २,११८ | १,५३,६९३ | २,०१९ |
| | भारत | १,८८,२२१ | १,९०० | २,४६,१३४ | २,३३५ | १,९३,६९० | २,१७७ |
| केळी | महाराष्ट्र | ४४,५५९.३ | १४९.४ | ६१,८३०.५६ | २०७.५८ | १,०८,९६१ | ४२९ |
| | भारत | १,०१,३१२ | ३४८.८ | १,३४,५०२.३३ | ४१२.०७ | १,९५,७४६ | ६५९ |
| संत्री | महाराष्ट्र | २५.२४ | ०.१६ | ३७.४३ | ०.२८ | २५.८८ | ०.१ |
| | भारत | २५.२९ | ०.१७ | ४०७.८८ | १.१८ | १३०.१६ | ०.४८ |
| डाळिंब | महाराष्ट्र | ३२,६५३ | ४१२ | ४०,७२१ | ४९१ | ३२,१३७ | ४०८.४१ |
| | भारत | ४७,३३६ | ५३८ | ६७,८९२ | ६८९ | ८०,५४८ | ६८८ |
| मनुके | महाराष्ट्र | २४,४२५ | २३१ | १८,१८३ | २४८ | २३,७२१ | २५७ |
| | भारत | २५,२५९ | २३९ | १८,९२६ | २५९ | २४,६८८ | २७० |
| गुलाबाची फुले | महाराष्ट्र | ८७७.०१ | २८.८४ | ८६३.३६ | २९.८१ | ५४९.५२ | २२.६५ |
| | भारत | २,५१७.४७ | ५७.९८ | २,१३४.३४ | ५७.४७ | १,६१३.६२ | ४७.९५ |
| गुलाबाची रोपे | महाराष्ट्र | ३७.७८ | १.८१ | ३८.६५ | ३.१७ | ४३.४३ | ३.४७ |
| | भारत | ४५.४३ | २.१९ | ४०.८८ | ३.३० | ४५.७६ | ३.६५ |
| आंब्याचा गर | महाराष्ट्र | २०,६५९ | १५६ | २१,०६८ | १६८ | १५,१९५ | ११५ |
| | भारत | १,१०,९२४ | ६७४ | १,०५,८७२ | ६५८ | ८५,७२६ | ५८४ |
| कांदा | महाराष्ट्र | १०,५४,६१८ | १,९७२ | १३,२३,४८२ | १,९४१ | ७,२९,५६३ | १,३५० |
| | भारत | १५,८८,९८४ | ३,०८९ | २१,८२,८२६ | ३,४६७ | ११,४८,९२४ | २,३१९ |
| इतर भाजीपाला (कांदा वगळून) | महाराष्ट्र | १,७१,०५३ | ७०८ | १,५४,५४८ | ६९४ | १,३१,०२३ | ६६९ |
| | भारत | ७,३९,०५६ | १,८८२ | ७,३५,७४२ | २,०७० | ७,५४,००७ | २,०६५ |
| इतर प्रक्रिया केलेली फळे व भाजीपाला (आंब्याचा गर वगळून) | महाराष्ट्र | १,८४,३४२ | १,६४५ | १,७१,८१० | १,७५५ | १,७२,७८० | १,७५९ |
| | भारत | ५,४३,८३७ | ४,८५९ | ५,८७,७२६ | ५,२७९ | ६,१३,७३६ | ५,८४७ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.२६.२ **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना:** या योजने अंतर्गत सहा हेक्टर पर्यंत वहिती क्षेत्र व ₹ १.५० लाख पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना त्यांच्या जमिनीची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने शाश्वत सिंचनाच्या सुविधेसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरुपात नवीन विहीर, जुन्या विहीरीची दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण, कृषिपंप, वीज मीटर जोडणी खर्च, विहीरीत बोअरींग, एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, परसबाग, इत्यादी बाबींकरीता अर्थसहाय्य देण्यात येते. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ १०३.१२ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ करीता ₹ ३८.३१ कोटी निधी मंजूर झाला.

७.२७ **पिकावरील किड रोग-देखरेख व सल्ला प्रकल्प:** राष्ट्रीय कृषि संशोधन संस्था व राज्य कृषि विद्यापीठांच्या सहकार्यातून हा ऑनलाईन प्रकल्प राज्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचे (१) प्रशिक्षण व भेटींच्या माध्यमातून किड व रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे व माहिती देणे, (२) किड व रोगाचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच उपाययोजना करणे शक्य व्हावे म्हणून पूर्वसूचना देणे व (३) मोबाईलवर विनामूल्य एसएमएस द्वारे माहिती देणे व शास्त्रशुद्ध सल्ला देणे हे उद्देश आहेत. तांदूळ, सोयाबीन, कापूस, मका, ज्वारी, ऊस आणि लाल हरभरा या पिकांचा या प्रकल्पामध्ये समावेश केला आहे. सन २०१९-२० मध्ये या प्रकल्पाकरिता ₹ १७.६९ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये मका व ऊस यावरील फॉल आर्मी आणि उसावरील व्हाईट ग्रबच्या प्रादुर्भावाच्या व्यवस्थापनाला विशेष महत्त्व देण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर किड व रोगाचे व्यवस्थापन विषयक सल्ल्यांचे २४८.९० लाख एसएमएस शेतकऱ्यांना पाठविण्यात आले. या प्रकल्पासाठी सन २०२०-२१ मध्ये ₹ १६.५० कोटी निधी मंजूर झाला.

७.२८ **पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम:** नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करून शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण करणे हे पाणलोट क्षेत्र विकासाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील बहुतांश क्षेत्र हे पावसावर अवलंबून असल्याने (१) कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढविणे, (२) जमिनीची धूप थांबविणे व जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन आणि (३) जलसंधारण या प्रमुख उद्देशाने विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोटांची कामे तक्ता ७.२२ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.२२ पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोटांची कामे**

| योजना | पाणलोट कामांची संख्या | | | निवडलेल्या पाणलोट कामांवरील जून, २०२० पर्यंत खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| | निवडलेले | पूर्ण | प्रगतीपथा-वरील | |
| १. विदर्भ पाणलोट विकास अभियान | १,०३२ | १,०३२ | ० | ३६५.३६ |
| २. मराठवाडा पाणलोट विकास अभियान | २८५ | २८५ | ० | १३७.३४ |
| ३. नदी खोरे प्रकल्प | २७१ | २२६ | ४५ | ५८०.८० |
| ४. पश्चिम घाट विकास कार्यक्रम | १६० | १६० | ० | १३७.१९ |
| ५. राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम | १,०२८ | ९५६ | ७२ | २९०.५९ |
| ६. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम | १०,६१४ | ५,७४७ | ४,८६७ | ३,०१२.१८ |
| ७. नाबार्ड सहाय्यित ग्रामीण पायाभूत सुविधा विकास कार्यक्रम | ३६४ | ३६४ | ० | ८६.८७ |
| ८. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | १४,९३५ | १०,२७३ | ४,६६२ | ३,०३९.६९ |
| ९. जलयुक्त शिवार अभियान | २२,५८६ | २०,५४४ | २,०४२ | ९,७३१.३२ |
| १०. इतर योजना (डीपीएपी, हरियाली, जवाहर, आश्वासित इत्यादी) | ५,६८० | ५,६८० | ० | - |

टीप : इतर योजनांमधील ५० टक्क्याहून अधिक पूर्ण झालेली सूक्ष्म पाणलोटाची कामे जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत समाविष्ट आहेत

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.२९ **राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान:** एकात्मिक शेती, पाणी वापराचे पर्याप्त व्यवस्थापन, मृद आरोग्य व्यवस्थापन आणि स्रोतांचे संरक्षण व संवर्धन करून कोरडवाहू क्षेत्रातील शेतीची उत्पादकता वाढवणे या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले आहे. यामध्ये मृद आरोग्य व्यवस्थापन व मृद आरोग्य पत्रिका वाटप, एकात्मिक पोषक द्रव्ये व्यवस्थापन व सेंद्रीय शेती, कोरडवाहू क्षेत्र विकास, ई-गव्हर्नन्स व शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन या उपअभियानांचा समावेश आहे.

७.२९.१ **मृद आरोग्य व्यवस्थापन आणि मृद आरोग्य पत्रिका वितरण:** मृद आरोग्य अबाधित राखणे व जमिनीची उत्पादन क्षमता सुधारणे यासाठी एकात्मिक पोषक द्रव्ये व्यवस्थापनास प्रोत्साहन देण्यासाठी हे उपअभियान सुरु करण्यात आले आहे. मृद व पाण्याच्या नमुन्याची तपासणी करण्यासाठी राज्यात ३१ मृद चाचणी प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली आहे, तर अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे व कोल्हापूर या पाच ठिकाणी खत नमुना तपासणी प्रयोगशाळा आहेत. मृद आरोग्य स्थितीबाबत जागरुकता निर्माण करणे व मृद आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने मृद आरोग्य पत्रिका वितरित करण्यात येत आहेत. सन २०१९-२० मध्ये दोन लाख मृद आरोग्य पत्रिकांचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले व या योजनेंतर्गत ₹ १०.६८ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये मृद आरोग्य व्यवस्थापन या कार्यक्रमांतर्गत ३,५१० गावांमध्ये (प्रत्येक तालुक्यामधून १० गावे) प्रशिक्षण कार्यक्रम व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. केंद्र शासनाने या योजनेकरीता ₹ ९.४९ कोटी निधी मंजूर केला आहे.

७.२९.२ **कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम:** कोरडवाहू शेती प्रामुख्याने हवामानावर आधारित असल्याने जोखमीची आहे. शेतीवर आधारीत उत्पन्नाच्या संधी निर्माण करून शेती व्यवसायातील जोखीम कमी करणे आणि नैसर्गिक तसेच विविध उपायांद्वारे निर्माण केलेल्या संसाधनांच्या क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करून कोरडवाहू शेती शाश्वत करणे हे कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमाचे विशेष उद्दिष्ट आहे. सन २०१९-२० मध्ये केंद्र शासनाकडून ₹ ३३.०१ कोटी निधी प्राप्त झाला व ₹ १५.७५ कोटी निधी १०,३९४ लाभार्थ्यांसाठी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर केंद्र शासनाकडून ₹ १९.९५ कोटी निधी प्राप्त झाला व ₹ १०.०९ कोटी निधी खर्च झाला.

७.२९.३ **परंपरागत कृषि विकास योजना**: ही केंद्र पुरस्कृत योजना राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानातील मृद आरोग्य व्यवस्थापन या उपअभियानातील उपघटक आहे. या योजनेची उद्दिष्टे (१) जमिनीचा कस वाढविणे व रसायनांचा वापर न करता सेंद्रीय शेतीद्वारे सकस अन्नधान्याचे उत्पादन करणे, (२) शेती व्यवसाय व्यवस्थापनामध्ये समूह केंद्रीत दृष्टिकोनाचा अंगिकार करून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करणे, (३) गुणवत्तेची हमी व (४) शेती उत्पादनाच्या थेट विक्रीसाठी नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब ही आहेत. या योजने अंतर्गत प्रत्येक समूहाला (जास्तीत जास्त ५० एकर शेती असणारा ५० शेतकऱ्यांचा समूह) सलग तीन वर्षांकरिता लाभ दिला जातो. योजनेच्या पहिल्या टप्प्यात (२०१६-१७ ते २०१८-१९) एकूण २०,३४६ हेक्टर क्षेत्रासह ४०,७६२ लाभार्थी शेतकऱ्यांचे ९३२ समूह तयार करण्यात आले व त्यांच्यासाठी ₹ ९२.६० कोटी निधी खर्च झाला. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात (२०१७-१८ ते २०१९-२०) एकूण ७,१६० हेक्टर क्षेत्रासह ११,८०३ लाभार्थी शेतकऱ्यांचे ३२६ समूह तयार करण्यात आले व त्यांच्यासाठी ₹ २९.९५ कोटी निधी खर्च झाला.

७.३० **प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना:** खात्रीशीर सिंचनाखालील लागवडीयोग्य क्षेत्र वाढवणे, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जलवापर क्षमतेत वाढ करणे, अचूक-सिंचन आणि तुषार व ठिबक सिंचन (प्रति थेंब अधिक पीक) अशा पाणी वाचवणाऱ्या सिंचन पद्धतींच्या वापरामध्ये वाढ करणे हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. ही योजना राज्यात २०१५-१६ पासून राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अंशदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा पाच हेक्टर आहे. सन २०१९-२० मध्ये १,२३,३०० हेक्टर क्षेत्र नव्याने सूक्ष्म सिंचनाखाली आले आणि १,६४,६९२ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २८ डिसेंबर, २०२० अखेर ₹ ४०२.१४ कोटी अनुदान जमा करण्यात आले. तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च तक्ता ७.२३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२३ तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि खर्च**

| वर्ष | तुषार सिंचन संच | | ठिबक सिंचन संच | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २०१७-१८ | १,१०,६१० | ७२,८१४ | १,५३,५८९ | १,३६,१८० | ६८७.८४ |
| २०१८-१९ | ७१,१६१ | ४४,८१२ | १,०३,९२१ | ८५,७३१ | ४१५.९५ |
| २०१९-२० | ६७,५३१ | ४०,७९४ | ९७,१६१ | ८२,५०५ | ४०२.१४ |
| २०२०-२१ (लक्ष्य) | ६९,९७९ | ६३,६१७ | १,२१,६८५ | १,१०,६२३ | ६६७.६६# |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

७.३१ **प्रधानमंत्री पीक विमा योजना:** अधिसूचित केलेल्या पिकांचे नैसर्गिक आपत्ती, किड किंवा रोगामुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण व आर्थिक सहाय्य देण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळून त्यांच्या शेती व्यवसायातील सहभागात सातत्य रहावे या उद्देशाने सदर योजना २०१६ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेत अन्नधान्ये, तेलबिया पिके, फळपिके आणि नगदी पिकांचा समावेश आहे. पूर्वीच्या राष्ट्रीय कृषि विमा योजनेचे या योजनेत एकत्रीकरण करण्यात आले आहे. या योजनेत शेतकऱ्यांना पिकाच्या प्रकारानुसार संरक्षित रकमेच्या कमाल पाच टक्के रक्कम विम्याचा हप्ता म्हणून भरावी लागते. सन २०१९-२० मध्ये १४०.८९ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. एकूण ७५.१५ लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ २५,२२९.१३ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ४,९२५.५७ कोटी विमा हप्ता भरण्यात आला. एकूण ८४.३६ लाख लाभार्थी शेतकऱ्यांसाठी ₹ ५,५११.६८ कोटी रकमेचे नुकसान भरपाई दावे करण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये ११९.४१ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. एकूण ६४.४८ लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ २४,४०७.९२ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ५,७७४.८१ कोटी विमा हप्ता भरण्यात आला. एकूण ४.६६ लाख लाभार्थी शेतकऱ्यांसाठी ₹ ३४६.०७ कोटी अंतरिम रकमेचे नुकसान भरपाई दावे करण्यात आले.

७.३२ **हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना:** द्राक्षे, आंबा, डाळींब, केळी, संत्री, मोसंबी, पेरु, चिकू, लिंबू आणि काजू या फळपीकांसाठी हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१९-२० मध्ये या योजनेमध्ये ४.९१ लाख शेतकरी सहभागी झाले. एकूण ४.२१ लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ ४,९९५.३८ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ १,४१५.४२ कोटी विमा हप्ता भरण्यात आला. सन २०१९-२० मध्ये एकूण ३.२२ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ १,१२५.६८ कोटी (संचित) नुकसान भरपाई अदा करण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये या योजनेमध्ये ३.९३ लाख शेतकरी सहभागी झाले. एकूण २.८६ लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ ३,४४०.२८ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ६४३.७३ कोटी विमा हप्ता भरण्यात आला.

७.३३ **उन्नत शेती-समृद्ध शेतकरी मोहीम:** शेतकऱ्यांचे उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने खरीप हंगाम २०१७-१८ पासून ही मोहिम सुरू केली आहे. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - भात, गहू, कडधान्ये, भरडधान्ये व पौष्टीक तृणधान्य यासाठी ५४,५८९ हेक्टर क्षेत्रावर गट प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले व त्यासाठी ₹ २३.४२ कोटी खर्च झाले तसेच १,२१८ शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले व त्यासाठी ₹ ०.७७ कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - तेलबिया व तेलताड पिके यासाठी ४,६८७ हेक्टर क्षेत्रावर गट प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले व त्यासाठी ₹ ०.५८ कोटी खर्च झाले. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - तेलबिया व तेलताड पिके या अंतर्गत विविध घटकांवर ₹ १४.२५ कोटी निधी खर्च झाला.

७.३३.१ **कृषि यांत्रिकीकरण:** कमी होत जाणारे वहिती क्षेत्र, बैलांच्या संख्येत होणारी घट, मजुरांची अनुपलब्धता, मजुरीचे वाढते दर, खरीप हंगामाचा कमी कालावधी, पीक लागवडीमधील विविधता इत्यादीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना म्हणून राज्यात उन्नत शेती समृद्ध शेतकरी मोहिमेअंतर्गत कृषि यांत्रिकीकरण ही मोहीम सन २०१७-१८ पासून राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना सुधारीत कृषि औजार खरेदीसाठी अनुदान देणे आणि कृषि औजार बँका स्थापन करणे हे या मोहिमेचे घटक आहेत. लाभार्थ्यांची संख्या व अनुदानाची माहिती तक्ता क्र. ७.२४ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ७.२४ कृषि यांत्रिकीकरण मोहिमे अंतर्गत लाभार्थी संख्या व अनुदान**

| वर्ष | कृषि औजारे | | कृषि औजारे बँका | | एकूण अनुदान (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अनुदान (₹ कोटी) | संख्या | अनुदान (₹ कोटी) | |
| २०१७-१८ | ६२,२५४ | ३७२.६३ | ५० | २.३१ | ३७४.९४ |
| २०१८-१९ | ६०,०४१ | ३४०.३९ | २९ | १.३३ | ३४१.७२ |
| २०१९-२० | ४५,२३८ | २४९.४३ | ४७ | २.५० | २५१.९३ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.३४ **भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत नोंदणी नसल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजनेतील अलाभार्थी शेतकऱ्यांसाठी १०० टक्के अनुदानाची भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, युवा शेतकऱ्यांसाठी रोजगार निर्मिती, पीक पद्धतीत बदल, उत्पन्नाचा शाश्वत स्रोत निर्माण करणे, कृषिप्रक्रिया उद्योगांसाठी कच्च्या मालाची उपलब्धता वाढविणे तसेच नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि वातावरणीय बदलांचे दुष्परीणाम कमी करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत एकूण १६ बहुवार्षिक फळपिके कलमांच्या व रोपांच्या लागवडीचा समावेश आहे. सन २०१९-२० मध्ये ₹ ४६.९४ कोटी निधी प्राप्त झाला व त्यापैकी ₹ ३६.६१ कोटी निधी लागवड कार्यक्रमावर खर्च झाला. एकूण १९,७०० लाभार्थी शेतकऱ्यांनी १७,७५७ हेक्टर क्षेत्रावर फळपिकांची लागवड केली. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ₹ २०.०२ कोटी निधी खर्च झाला.

७.३५ **मुख्यमंत्री कृषि आणि अन्न प्रक्रिया योजना:** राज्यात सन २०१७-१८ पासून पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री कृषि आणि अन्न प्रक्रिया योजना राबविण्यात येत आहे. कृषि मालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, निर्यातीस प्रोत्साहन देणे, कृषि व प्रक्रिया उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे आणि ग्रामीण भागात लघु व मध्यम कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या योजने अंतर्गत एकूण १५८ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. सन २०१९-२० मध्ये ₹ २४ कोटी प्राप्त निधी पैकी ₹ १५.६० कोटी निधी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर ₹ १२ कोटी प्राप्त निधी पैकी ₹ ३.३५ कोटी निधी खर्च झाला.

७.३६ **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी:** देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नास जोड देण्यासाठी केंद्र शासनाने सदर योजना २०१८-१९ पासून सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र कुटुंबांना (पती-पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये मिळून) ₹ २,००० प्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ₹ ६,००० अनुदान अनुज्ञेय असून ते लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. या योजनेअंतर्गत दि. ४ जानेवारी, २०२१ अखेर राज्यातील १०२.५४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ₹ ९,४९६.३८ कोटी रक्कम जमा करण्यात आली.

७.३७ **गटशेतीस प्रोत्साहन व सबलीकरण योजना:** सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याचे लक्ष्य साध्य होण्यासाठी शासनाने राज्यात गटशेतीस प्रोत्साहन व सबलीकरण योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली आहे. कोकण महसूल विभागातील किमान ५० एकर शेतजमीन असणारा २० शेतकऱ्यांचा गट किंवा राज्याच्या इतर महसूल विभागातील किमान १०० एकर शेतजमीन असणारा २० शेतकऱ्यांचा गट या योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र आहेत. या योजनेअंतर्गत कमाल आर्थिक सहाय्य मर्यादा कोकण विभागाकरिता प्रति एकर ₹ एक लाख असून इतर विभांगाकरिता प्रति गट ₹ एक कोटी आहे. सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये निवड करण्यात आलेल्या शेतकरी गटांची उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने स्पील ओव्हर रकमेस मान्यता दिली. सन २०२०-२१ मध्ये ₹ ११० कोटी अर्थसंकल्पिय तरतुदीपैकी ₹ ३३ कोटी निधी वितरीत करण्यात आला. योजनेची प्रगती तक्ता ७.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२५ गटशेतीस प्रोत्साहन व सबलीकरण योजना**

| वर्ष | लक्ष्य | | वितरीत अनुदान ( ₹ कोटी) | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | गट संख्या | आर्थिक सहाय्य (₹ कोटी) | | गट संख्या | आर्थिक सहाय्य (₹ कोटी) |
| २०१७-१८ | २०० | २००.०० | ३१.५० | १९६ | ३.४३ |
| २०१८-१९ | २०० | २००.०० | ८०.०० | २३२ | ७३.५३ |
| २०१९-२० $ | -- | -- | ७०.०० | -- | ४४.११ |
| २०२०-२१ $ | -- | -- | ३३.०० | -- | १५.१८ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $ स्पिल ओव्हर

७.३८ **महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९:** राज्याला सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या कालावधीत सतत दुष्काळ सदृश परिस्थितीचा सामना करावा लागला आहे. त्याच वेळी अवकाळी पावसामुळे शेतीची हानी झाली. या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे अल्प व मध्यम मुदतीचे पीक कर्ज थकीत झाल्यामुळे ते नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यापासून वंचित झाले. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना मुक्तता मिळावी या हेतूने, शेतकऱ्यांनी १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीत एकापेक्षा जास्त संस्थांकडून घेतलेले व ३० सप्टेंबर, २०१९ रोजी थकीत असलेले कर्ज माफ करण्यासाठी राज्य शासनाने ही योजना सन २०१९-२० मध्ये सुरू केली. जमीन धारणा क्षेत्राची मर्यादा विचारात न घेता मुद्दल व व्याज मिळून ₹ दोन लाखापर्यंतचे कर्ज, या योजने अंतर्गत माफ करण्यात आले आहे. ही योजना राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व प्राथमिक कृषि पत संस्थांकडून कर्ज घेतलेल्या फक्त वैयक्तिक शेतकऱ्यांना लागू आहे. योजना सुरु झाल्यापासून जानेवारी, २०२१ अखेर ३१.०४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ १९,८४७ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला.

७.३९ **प्रधानमंत्री किसान मानधन योजना**: अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वृद्धापकाळात संरक्षण आणि सामाजिक सुरक्षा पुरविण्याच्या उद्देशाने ही ऐच्छीक आणि सहभागावर आधारीत निवृत्तीवेतन योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दरमहा ₹ ३,००० निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. दि. १ ऑगस्ट, २०१९ रोजी १८ ते ४० वयोगटातील शेतकरी या योजनेत सहभागी होऊ शकतात. शेतकऱ्यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत दरमहा ₹ ५५ ते ₹ २०० रक्कम निवृत्तीवेतन फंडामध्ये जमा करावयाची आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळ व्यवस्थापित निवृत्तीवेतन फंडातून शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन दिले जाणार आहे. केंद्र शासन शेतकऱ्यांच्या सहभागाइतकीच रक्कम निवृत्तीवेतन फंडात जमा करते. दि. १९ जानेवारी, २०२१ पर्यंत राज्यातील ७७,८०७ शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला आहे.

७.४० **डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियान**: सेंद्रीय शेतीला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने ही गट केंद्रीत (एकूण ५० एकर शेती असलेला २० ते ३० शेतकऱ्यांचा गट) योजना राज्यात २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक गटाला सलग तीन वर्षासाठी लाभ दिला जातो. पहिल्या टप्प्यात विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या आपद्ग्रस्त जिल्ह्यांचा या कार्यक्रमात समावेश करण्यात आला असून अभियानांतर्गत झालेल्या भौतिक व आर्थिक साध्याची आकडेवारी तक्ता ७.२६ मध्ये दिली आहे

**तक्ता ७.२६ भौतिक व आर्थिक प्रगतीचा तपशिल**

| आर्थिक वर्ष | लक्ष्यांक (गट संख्या) | साध्य (गट संख्या) | लाभार्थी (संख्या) | क्षेत्र (हेक्टर) | वितरीत निधी (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | ३५० | ३१४ | ७,४५७ | ६,८०० | ६.०० | ०.६४ |
| २०२०-२१ | | | | | २.१६+ | १.२४+ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + जानेवारी अखेर

## कृषि क्षेत्रासाठी नवीन उपाययोजना

७.४१ **'विकेल ते पिकेल' अभियान**: राज्यात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ८१ टक्के आहे व जवळपास ८३ टक्के शेती कोरडवाहू आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शेतकरी व ग्राहकांच्या मागण्या निर्धारित करणे, शेतकऱ्यांना बाजारभावातील अनिश्चिततेमुळे होणाऱ्या हानीपासून संरक्षण देऊन शेती व्यवसाय फायदेशीर करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ऑक्टोबर, २०२० मध्ये 'विकेल ते पिकेल' अभियान सुरू केले आहे. या अभियानाची (१) मागणीप्रमाणे पीकपद्धतीत बदल करणे, (२) शेतीमालाची गुणवत्ता वाढवणे, (३) शेतीव्यवसाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य करणे, (४) शेतीमालाच्या विक्रीसाठी ब्रँड विकसित करणे, (५) मूल्य साखळी विकास प्रकल्पांच्या माध्यमातून विक्रीच्या वाढीव संधी उपलब्ध करून देणे, (६) शेतीव्यवसाय सुलभतेसाठी नवीन धोरण आखणे, (७) कृषि क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, (८) शाश्वत शेती उत्पन्न व उत्पादकता वाढवणे आणि (९) बाजाराशी संबंधित माहितीचे व बाजाराचा कल इत्यादींचे विश्लेषण करुन उत्पादकांना त्याची माहिती देणे ही उद्दिष्टे आहेत. या अभियाना अंतर्गत ग्राहक व व्यापाऱ्यांना शेतमालाची विक्री केली जाणार असून प्रक्रीया केलेल्या शेतमालाच्या विक्रीसाठी पायाभूत सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. या अभियानाची अंमलबजावणी शासनाचे संबंधित विभाग आणि नाबार्ड यांच्या मार्फत केली जाणार आहे. राज्यात सध्या सुरू असलेल्या संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियानात सप्टेंबर, २०२० अखेर एकूण ७६ आठवडे बाजार कार्यरत असून हे अभियान 'विकेल ते पिकेल' अभियाना अंतर्गत राबविण्यात येणार आहे.

७.४२ **प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना:** आत्मनिर्भर भारत अभियाना अंतर्गत केंद्रशासनाने प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन (PMFME) ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यांच्या भागीदारीने सुरू केली आहे. अस्तित्वात असलेल्या असंघटीत क्षेत्रातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना त्यांच्या दर्जा वाढीसाठी आर्थिक, तांत्रिक व व्यावसायिक सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीत 'एक जिल्हा एक उत्पादन' या संकल्पनेवर राबविली जाणार आहे. या योजनेची (१) दर्जावाढ करण्यासाठी भांडवली गुंतवणुकीसाठी सहाय्य, (२) कौशल्य विषयक प्रशिक्षण तसेच अन्न सुरक्षा मानांक व

स्वच्छता आणि गुणवत्तावाढ याबाबत तांत्रिक ज्ञान याद्वारे क्षमतावर्धन, (३) प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकेकडून कर्ज घेणे आणि दर्जा वाढवणे यासाठी सहाय्य आणि (४) शेतकरी उत्पादक गट, स्वयं सहायता गट, उत्पादकांच्या सहकारी संस्था यांना भांडवली गुंतवणुकीसाठी, सामाईक पायाभूत सुविधांसाठी, व्यावसायिक प्रतिमा (ब्रँड) विकसन व पणन यासाठी सहाय्य ही उद्दिष्टे आहेत.

७.४२.१ या योजनेअंतर्गत राज्याने पाच वर्षात २०,११९ सूक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योगांच्या सक्षमीकरणाचा लक्ष्यांक निश्‍चित केला आहे. नाशवंत शेतमाल, अन्नधान्ये, कडधान्ये, तेलबिया, मसाल्याची पिके, मत्स्योत्पादन, कुक्कुट उत्पादन, दूध, वनोपज इत्यादींच्या वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योगांचा सदर योजनेत समावेश केला जाणार आहे. या उद्योगांना प्रकल्प रकमेच्या ३५ टक्के कर्ज संलग्न भांडवली अनुदान, ₹ १० लाख रकमेच्या मर्यादेत दिले जाणार आहे.

७.४३ **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना:** महाराष्ट्र राज्य हे फळे व भाजीपाला पिकांच्या उत्पादनात तसेच निर्यातीत अग्रेसर आहे. राज्यातील शेतकऱ्यांचा रसायने विरहीत व निर्यातीस योग्य अशा भाजीपाल्याच्या उत्पादनाकडे कल आहे. राज्यात राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना सन २०२०-२१ पासून दोन वर्षांकरीता राबविण्यात येत आहे. या योजनेची (१) भाजीपाला पिकाची नियंत्रित वातावरणामध्ये तयार केलेली किडमुक्त व रसायनमुक्त रोपे उपलब्ध करून देणे, (२) स्थानिक शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायातून उत्पन्न मिळवून देणे, (३) पीक पद्धतीत बदल व नवीन तंत्रज्ञानाचा अंगिकार आणि (४) उत्तम दर्जाच्या भाजीपाल्याच्या उत्पादनात, निर्यातीत व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ ही उद्दिष्टे आहेत. किमान ०.४० हेक्टर जमीन व रोपवाटिका उभारणीसाठी पाण्याचा कायमस्वरुपी स्रोत असलेले शेतकरी सदर योजनेंतर्गत पात्र आहेत. कृषि पदवीधारक महिला व त्यांचे गट तसेच भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व त्यांचे गट यांना योजनेच्या लाभाकरीता प्राधान्य दिले जाणार आहे. पॉलि-टनेल, शेडनेट, प्लास्टिक क्रेट, नॅप्सॅक फवारणी यंत्र इत्यादी प्राथमिक सुविधा आणि तीन ते पाच दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षण या योजने अंतर्गत दिले जाणार आहे. योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या निकषांप्रमाणे केली जाणार असून प्रकल्प किंमतीच्या ६० टक्के व ४० टक्के अशा दोन हप्त्यात अर्थसहाय्य दिले जाणार आहे. राज्यासाठी २०० हेक्टर क्षेत्रातील ५०० लाभार्थ्यांचा लक्ष्यांक निर्धारित केला असून ₹ ११.६२ कोटी रकमेचे अर्थसहाय्य प्रस्तावित आहे.

७.४४ **'१०,००० शेतकरी उत्पादक संस्थांची निर्मिती व प्रोत्साहन':** जमिनधारणेमध्ये अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांची संख्या खूप मोठी असून सरासरी वहिती क्षेत्र एक हेक्टरपेक्षा कमी आहे. या शेतकऱ्यांना शेतीतून उत्पादन घेताना व पीक काढणी पश्चात समस्यांना सामोरे जावे लागते. अशा शेतकऱ्यांनी शेतकरी उत्पादक गटांच्या (एफपीओ) माध्यमातून केलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे उत्पादन खर्चात बचत होणे, उत्पादकता वाढविणे, शेतमाल विक्रीसाठी चांगली बाजार सुविधा उपलब्ध होणे व याद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे शक्य होणार आहे. यासाठी केंद्रशासनाने '१०,००० शेतकरी उत्पादक संस्थांची निर्मिती व प्रोत्साहन' ही केंद्रसहाय्यित योजना सुरु केली आहे. या योजनेची (१) शाश्वत उत्पन्न केंद्रीत शेतीच्या विकासासाठी सर्वांगीण सुविधा उपलब्ध करून देणे, (२) संसाधनांचा कार्यक्षम, किफायतशीर आणि शाश्वत वापर याद्वारे शेतीची उत्पादकता वाढवणे, (३) शेती व्यवसायाच्या व्यापक व्यवस्थापनासाठी नवीन एफपीओंना पाच वर्ष सहाय्य करणे आणि (४) आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य व आत्मनिर्भर होण्यासाठी कृषि व्यवसाय कौशल्य विकसित करण्याकरिता क्षमतावर्धन ही उद्दिष्टे आहेत. योजनेचा कालावधी सन २०२०-२१ ते सन २०२३-२४ आहे. एफपीओ ची निर्मिती पिकाच्या प्रकारानुसार केली जाणार आहे. किमान ३०० सदस्य असलेली एफपीओ या योजनेसाठी पात्र आहे. समान स्वारस्य असलेल्या आणि लगतच्या परिसरातील १५ ते २० शेतकऱ्यांचे शेतकरी हित गट, स्वयं सहाय्यता गट, शेतकऱ्यांचा क्लब, संयुक्त उत्तरदायित्व गट, रायथु मित्रा गट अशा प्रकारचे गट तयार करण्यात येणार आहेत. एकाच प्रकारची पिके असणाऱ्या भागातील किंवा गावातील/ लगतच्या गावांच्या समूहातील काही सारखेपणा असलेले २० किंवा अधिक गट एकत्र करून एफपीओ तयार करण्यात येणार आहे.

७.४५ **ग्राम कृषि विकास समितीची स्थापना:** गावातील शेतीचा सर्वांगीण विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा महत्तम वापर, विविध योजना व प्रकल्प यामधून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्‍चित करणे यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ४९(४) नुसार प्रत्येक गावामध्ये ग्राम कृषि विकास समितीची स्थापना करणे राज्य शासनाने अनिवार्य केले आहे. या समितीमध्ये कृषि व संलग्न क्षेत्राशी संबंधित १२ व्यक्तिंचा (किमान ५० टक्के महिला सदस्य) समावेश असावा.

७.४६ **कोविड -१९ लॉकडाऊन कालावधीतील उपाययोजना:**

- कृषि निविष्ठा आणि कृषि उत्पादनांच्या वाहतुकीचे सनियंत्रण करण्यासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना
- कृषि निविष्ठा आणि कृषि उत्पादनांच्या वाहतूक व विक्रीसाठी संबंधित विभागांकडून परवाने उपलब्ध करून देण्यात आले
- परवान्यांचे ऑनलाईन नूतनीकरण
- कृषि निविष्ठांचे शेतकऱ्यांना घरपोच वाटप
- खते व बियाण्याचे ९.४२ लाख शेतकऱ्यांना वाटप
- १९,७०० मे.टन बियाण्यांचे शेतकऱ्यांना वाटप
- २.७९ लाख मे.टन रासायनिक खतांचे शेतकऱ्यांना वाटप
- सहा लाखांहून अधिक कापूस बियाणे पाकिटांचे शेतकऱ्यांना वाटप
- शेतकऱ्यांच्या ३,७९० गटांच्या माध्यमातून सुमारे १.३७ लाख मे. टन फळे व भाजीपाल्याची नागरी ग्राहकांना थेट विक्री

# पशुसंवर्धन

७.४७ शेतीबरोबरच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अविभाज्य भाग आहेत. या उपक्रमांमुळे आहार, जनावरांची ओढ शक्ती व रोजगार निर्मितीला हातभार लागला आहे आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासही मदत होते. पशुपालनामुळे पशुपालक कुटुंबांना अल्प दरात आवश्यक पोषणतत्वे देखील उपलब्ध होतात. पशुधन हे लाखो ग्रामीण कुटुंबांचे महत्त्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत बनले असून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात महत्वाची भूमिका बजावते. पशुधन आरोग्य सेवा, ग्रामीण कुटुंबांना पशुपालनास प्रोत्साहन व सातत्यपूर्ण उत्पादनाकरिता पशुधनाची जनुकीय उन्नती यासाठी विविध धोरणांची अंमलबजावणी शासन करीत आहे. राज्यामध्ये उद्भवलेल्या कोविड-१९ महामारीच्या उद्रेकामुळे निर्माण झालेल्या आव्हानांवर मात करुन पशुसंवर्धन क्षेत्राला स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी राज्य शासनाने वेगवेगळया उपाययोजना राबविल्या.

## कोवीड-१९ महामारीत केलेल्या उपाययोजना

७.४८ कोवीड-१९ महामारीच्या काळात सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्वत्र पसरलेल्या अफवा आणि चुकीच्या माहितीमुळे फेब्रुवारी, २०२० ते एप्रिल, २०२० या कालावधीत कुक्कुटपालन उद्योगाला मागणीच्या संकटाचा सामना करावा लागला. शासनाने आकाशवाणी, दूरदर्शन आणि इतर प्रसार माध्यंमाद्वारे कुक्कुट आणि कुक्कुट उत्पादनांच्या सेवनाच्या सुरक्षेविषयी आणि त्यामधील पौष्टीक मुल्यांच्या फायदयांबद्दल जनजागृती केली. परिणामी कुक्कुट व कुक्कुटादी पक्षांचे मास आणि अंडी यांची मागणी पुनर्स्थापित झाली व कुक्कुटपालन उद्योग सावरला. लॉकडाऊन कालावधीत पशुधनाचे आरोग्य राखून सातत्यपूर्ण दूध उत्पादनासाठी निरंतर लसीकरण, कृत्रीम रेतन व इतर पशुवैद्यकीय सेवा, चारा उपलब्धतता, वाहतूक तसेच जनावरांच्या क्रुरतेविरुध्द कारवाईत शासनाने विविध उपाययोजना केल्या.

७.४८.१ कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीत राज्यातील व आंतरराज्य वाहतुकीवर विपरीत परिणाम झाला. परिणामी जनावरांचे खाद्य पुरवठा, खाद्य निर्मिती घटक आणि मुरघास बनविण्याच्या पिशव्यांचा तुटवडा निर्माण झाला. पशुपालक व खाद्य उत्पादक यांना चाऱ्याचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी राज्यभरात एकत्रित प्रयत्न करण्यात आले.

७.४८.२ पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात घोड्यांसाठी खाद्य पुरवठा करण्यात आला. रायगड जिल्ह्यात अडकलेल्या मजुरांना त्यांच्या मालकीच्या गाढवांकरीता आहारातील गरजेपोटी १० मे.टन गवत आणि २०० किलो तांदुळाचा कोंडा देण्यात आला. अमरावती, पालघर आणि कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ४३ मे.टन चारा पुरवठा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने करण्यात आला.

## पशुगणना

७.४९ पशुगणना २०१९ नुसार सुमारे ३.३१ कोटी पशुधानासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर आहे. कुक्कुटादी पक्ष्यांची संख्या सुमारे ७.४३ कोटी संख्येसह राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे. पशुगणना २०१९ नुसार निवडक राज्यांमधील पशुधन तक्ता ७.२७ मध्ये व आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.७ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.५: पशुगणना २०१२ व २०१९ मधील कुक्कुटादी पक्षी**



**तक्ता ७.२७ निवडक राज्यांमधील पशुगणना २०१९ नुसार पशुधन**

('०००)

| राज्य | पशुधन | | | | | एकूण कुक्कुटादी पक्षी # |
|---|---|---|---|---|---|---|
| | गाई व बैल | म्हशी व रेडे | शेळ्या व मेंढ्या | इतर@ | एकूण | |
| आंध्र प्रदेश | ४,६०१ | ६,२१९ | २३,१४९ | ९९ | ३४,०६८ | १,०७,८६३ |
| गुजरात | ९,६३४ | १०,५४३ | ६,६५५ | ६१ | २६,८९३ | २१,७७३ |
| कर्नाटक | ८,४६९ | २,९८५ | १७,२२० | ३३९ | २९,०१३ | ५९,४९४ |
| मध्य प्रदेश | १८,७५१ | १०,३०७ | ११,३८९ | १९० | ४०,६३७ | १६,६६० |
| **महाराष्ट्र** | **१३,९९३** | **५,६०४** | **१३,२८५** | **१९८** | **३३,०८०** | **७४,२९८** |
| राजस्थान | १३,९३८ | १३,६९३ | २८,७४४ | ४२६ | ५६,८०१ | १४,६२३ |
| तामिळनाडू | ९,५१९ | ५१९ | १४,३८९ | ७४ | २४,५०१ | १,२०,७८१ |
| तेलंगणा | ४,२३२ | ४,२२६ | २३,९९८ | १८५ | ३२,६४१ | ७९,९९९ |
| उत्तर प्रदेश | १९,०२० | ३३,०१७ | १५,४६५ | ५११ | ६८,०१३ | १२,५१६ |
| **अखिल भारत** | **१,९३,४६३** | **१,०९,८५२** | **२,२३,१४६** | **१०,३००** | **५,३६,७६१** | **८,५१,८१०** |

@ डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे समाविष्ट  # पोल्ट्रीफार्ममधील पक्षी समाविष्ट

*आधार* : पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, भारत सरकार

## पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा

७.५० पशुधनाच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी राज्याने गावपातळीपर्यंत पशुवैद्यकीय संस्थांच्या यंत्रणेद्वारे सुविधा पुरविल्या आहेत. राज्य शासनाची पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा तक्ता ७.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२८ राज्य शासनाची पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा**

(३१ मार्च, २०२० रोजी )

| पशुवैद्यकीय विभाग | सर्वचिकित्सालये | लघु सर्वचिकित्सालये | पशुवैद्यकीय दवाखाने | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने | एकूण | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | श्रेणी I | श्रेणी II | | | |
| मुंबई | ५ | २० | १३८ | ३५९ | १२ | ५३४ | ५ |
| नाशिक | ५ | २५ | ३६५ | ४९१ | ६ | ८९२ | ५ |
| पुणे | ५ | २६ | ४५८ | ५५९ | ७ | १,०५५ | ५ |
| औरंगाबाद | ३ | २० | १६१ | २८८ | २ | ४७४ | ४ |
| लातूर | ४ | २० | १६४ | २९१ | ३ | ४८२ | ४ |
| अमरावती | ५ | २७ | १९२ | ३९४ | १७ | ६३५ | ५ |
| नागपूर | ६ | ३० | २६३ | ४५९ | १८ | ७७६ | ६ |
| **राज्य** | **३३** | **१६८** | **१,७४१** | **२,८४१** | **६५** | **४,८४८** | **३४** |

टिप : याशिवाय मुंबई, परभणी, नागपूर, शिरवळ (सातारा), उद्‌गीर (लातूर) आणि अकोला येथील सहा सर्वचिकित्सालये पशुवैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न आहेत.

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५१ विविध आजारांकरिता पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यासोबत लसीकरण कार्यक्रमही ४,८४८ पशुवैद्यकीय संस्थांमार्फत राज्यात राबविले जातात. पशुवैद्यकीय उपचार व लसीकरणाबाबतची माहिती तक्ता ७.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२९ पशुवैद्यकीय उपचार आणि लसीकरण**

('०००)

| तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| सामान्य उपचार | १७,१५३ | १७,१५० | ८,८७० |
| खच्चीकरण | ९३१ | ८९२ | ३३८ |
| मोठी शस्त्रक्रिया | ५३ | ६० | १९ |
| लघु शस्त्रक्रिया | ५६५ | ५२१ | २०० |
| लसीकरण (कुक्कुटादी पक्ष्यांसह) | ५३,५४३ | ६२,४१७ | ३९,२०५ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन  + नोव्हेंबरपर्यंत

## कृत्रिम रेतन

७.५२ पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथील तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्यनळ्यांची निर्मिती केली जाते आणि राज्यातील ३४ जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांमार्फत ४,८४८ पशुवैद्यकीय संस्थांना वितरीत केली जाते. कृत्रिम रेतन विषयक माहिती तक्ता ७.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३० कृत्रिम रेतन विषयक माहिती**

('०००)

| तपशील | २०१८ -१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| **१) गायी (कृत्रिम रेतन)** | **१,६८७** | **१,६६८** | **९६८** |
| विदेशी | २८० | २१० | १०५ |
| संकरीत | १,०५२ | १,०३४ | ५७६ |
| देशी | ३५५ | ४२४ | २८७ |
| **जन्मलेल्या वासरांची संख्या** | **५७९** | **५७६** | **३४२** |
| संकरीत | ४६५ | ४५० | २६५ |
| देशी | ११४ | १२६ | ८७ |
| **२) म्हशी (कृत्रिम रेतन)** | **७१९** | **७१३** | **३३९** |
| **जन्मलेल्या रेडकांची संख्या** | २४३ | २४७ | १३४ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर पर्यंत

## राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम

७.५३ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये कृत्रिम रेतन व्याप्तीची टक्केवारी ५० टक्के पेक्षा जास्त करण्याच्या उद्देशाने उच्च वंशावळीच्या वळूंच्या वीर्याद्वारे राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम-१, सप्टेंबर, २०१९ ते मार्च, २०२० या कालावधीत राबविण्यात आला. केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेल्या ₹ १४.८० कोटी निधीपैकी ₹ २.८२ कोटी निधी ५.८५ लाख कृत्रिम रेतन करण्यासाठी खर्च झाला. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम-२ ची अंमलबजावणी राज्यात ऑगस्ट, २०२० ते मे, २०२१ पर्यंत सुरु आहे.

## राष्ट्रीय गोकुळ अभियान

७.५४ भारत सरकारने खालील उद्दिष्टांसह राष्ट्रीय गोकुळ अभियान सुरू केले आहे

- देशी जातींचा विकास आणि संवर्धन
- रोगमुक्त उच्च अनुवांशिक गुणवत्ता असणाऱ्या गायी व म्हशींची संख्या वाढवून दुधाचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे आणि रोगाचा प्रसार आटोक्यात आणणे
- नैसर्गिक सेवेसाठी रोगमुक्त उच्च अनुवांशिक गुणवत्तायुक्त वळूंचे वितरण
- उच्च अनुवांशिक गुणधर्मांचे जनन पेशी द्रव्य वापरून कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिक सेवेद्वारे सर्व प्रजननक्षम गायी व म्हशींना सुनियोजित प्रजनन धोरणांतर्गत आणणे
- शेतकऱ्यांच्या दारात दर्जेदार कृत्रिम रेतन सेवेची व्यवस्था करणे
- गोजातीय जनन पेशी द्रव्यासाठी प्रजनन सेवा पुरवठादार व शेतकरी यांची सांगड घालण्याकरीता ई-मार्केट पोर्टल तयार करणे

राष्ट्रीय गोकुळ अभियाना अंतर्गत झालेला खर्च तक्ता ७.३१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३१ राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत झालेला खर्च**

| घेतलेले उपक्रम | उपक्रम सुरु झाल्याचे वर्ष | झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| दोन वळू माता प्रक्षेत्रांचे बळकटीकरण व प्रत्येक वळू माता प्रक्षेत्रावर ६०० उच्च वंशावळीच्या गवळाऊ गायी व पंढरपुरी म्हशींची खरेदी | २०१६-१७ | ८.३० |
| तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळा व विद्यमान कृत्रिम रेतन केंद्रांचे बळकटीकरण | २०१६-१७ | १.४९ |
| बीएआयएफ विकास संशोधन केंद्र, पुणे येथे भ्रूण प्रत्यारोपण व कृत्रिमरित्या गर्भधारणा प्रयोग शाळेची उभारणी | २०१७-१८ | ५.०७ |
| महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथील भ्रूण प्रत्यारोपण व कृत्रिमरित्या गर्भधारणा प्रयोग शाळेचे बळकटीकरण | २०१८-१९ | १.१९ |
| भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळेची वडगांव रसाई, ता. शिरूर, जि. पुणे येथे उभारणी | २०१८-१९ | ४.८३ |
| गोठीत रेत प्रयोगशाळा, औरंगाबाद येथे सेक्स सॉर्टेड सिमेन प्रयोगशाळेची उभारणी | २०१८-१९ | २४.८४ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५४.१ राष्ट्रीय गोकुळ अभियाना अंतर्गत राज्यातील गडचिरोली, वाशिम, उस्मानाबाद आणि नंदुरबार या आकांक्षीत जिल्ह्यांमध्ये कृषि कल्याण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश उच्च देशी वंशावळीच्या गुरांचे वीर्य वापरून शेतकऱ्यांच्या दारी उत्तम दर्जाची कृत्रिम रेतन सेवा पुरविणे आहे. सन २०१८-१९ मध्ये ₹ २.६१ कोटी निधी कृषि कल्याण अभियानांतर्गत उपक्रमांसाठी प्राप्त झाला आहे.

## राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम

७.५५ भारत सरकारने लाळ्या-खूरकुत आणि ब्रुसेलावर सन २०२४-२५ पर्यंत प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आणि सन २०२९-३० पर्यंत समूळ उच्चाटन करण्यासाठी १०० टक्के केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम सन २०१९-२० पासून मिशन तत्वावर सुरू केला.

७.५५.१ प्रस्तावित १.७६ कोटी जनावरांपैकी १ सप्टेंबर, २०२० ते १ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत एकूण १.४७ कोटी जनावरांना लाळ्या-खूरकुतची लस देण्यात आली. लसीकरण केलेल्या सर्व जनावरांचे टॅगींग केले आहे आणि इनफॉर्मेशन नेटवर्क फॉर ॲनीमल प्रोडक्टिव्हिटी अँड हेल्थ (INAPH) आज्ञावली मध्ये माहिती भरण्यात येत आहे व यासाठी ₹ ४१.१९ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

७.५५.२ ब्रुसेला रोग नियंत्रणासाठी भारत सरकार चार ते आठ महिन्यांच्या वयाच्या २९.०७ लाख गायी व म्हशींसाठी लस पुरवणार आहे. लसीकरण कार्यक्रम डिसेंबर, २०२० पासून सुरु होणार आहे. लसीकरण केलेल्या जनावरांना टॅगींग केले जाईल आणि INAPH सॉफ्टवेअर मध्ये माहिती भरण्यात येईल.

## विदर्भ व मराठवाडा विभागातील दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प

७.५६ राज्य शासनाने राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ आणि मदर डेअरी फ्रूट अँड व्हेजिटेबल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ आणि मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये दूध उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प सुरू केला आहे. अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, लातूर, नांदेड, जालना, यवतमाळ व उस्मानाबाद या ११ जिल्ह्यांमधील ४,२६३ गावे दूध उत्पादन वाढीसाठी निश्चित केली आहेत. या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्याच्या दारात कृत्रिम रेतन सेवा प्रदान करणे, वैरण विकास कार्यक्रम, दर्जेदार पशुखाद्य पुरवठा, पशुखाद्य पूरक आहार (खनिज मिश्रण), लसीकरण, गोचिड व गोमाश्यांचे निर्मूलन, वंध्यत्व आणि उपचार शिबिरे यासारख्या पशुवैद्यकीय सेवा समाविष्ट आहेत. सन २०२०-२१, ऑक्टोबर पर्यंत ७.२२ लाख कृत्रिम रेतन, ४.३५ लाख वंध्यत्व निवारण उपचार, ३७.६२ लाख जनावरांच्या विविध आजारांवर उपचार केले गेले तर १२९.६५ लाख लसीकरण करण्यात आले. या प्रकल्पा अंतर्गत ऑक्टोबर, २०२० पर्यंतचा खर्च ₹ ४५.७२ कोटी झाला. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने ग्रामस्थांकडून २५३.६१ लाख लिटर आणि दूध संकलन केंद्रातून २१०.८० लाख लिटर दूध संकलन केले.

## मुख्यमंत्री पशु आरोग्य योजना

७.५७ मुख्यमंत्री पशु आरोग्य योजनेचा उद्देश ३४९ ग्रामीण तालुक्यांमधील अतिदुर्गम, डोंगराळ व आदिवासी गावांमध्ये फिरती पशुवैद्यकीय दवाखाने स्थापित करण्याचा आहे. महाराष्ट्र शासनाने पहिल्या टप्प्यात ८१ तालुक्यांमध्ये ८१ पशुवैद्यकीय पथके स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. सन २०१९-२० मध्ये ₹ १४.७७ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. फिरती पशुवैद्यकीय दवाखाने सुलभ करण्यासाठी कॉल सेंटरची स्थापना प्रगतीपथावर आहे.

## राष्ट्रीय पशुधन अभियान

७.५८ राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत केंद्र शासनाने सन २०१७-१८, मध्ये ₹ ११.९९ कोटी निधी मंजूर केला असून तीन पशुखाद्य निर्मिती केंद्रांची स्थापना, खाद्यविश्लेषण प्रयोगशाळेचे आधुनिकीकरण, २२४ मुरघास केंद्रांची स्थापना आणि १,३४१ विद्युतचलित कडबा कुट्टी यंत्रांच्या वितरणासाठी ₹ ७.६३ कोटी खर्च झाला. सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये केंद्र शासनाने अनुक्रमे ₹ १०.५३ कोटी व ₹ १८.५५ कोटी निधी मंजूर केला.

## पशुधन विमा योजना

७.५९ पशुधन विमा योजना राज्यात महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत सन २००६-०७ पासून राबविण्यात येत आहे. पशुधारकांकडे असलेल्या जनावरांचा नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगामुळे आकस्मिक मृत्यू झाल्यास होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१८ ते ३१ जानेवारी, २०२० या कालावधी करिता न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी मर्यादित व प्रूडेंट इन्श्युरन्स ब्रोकर प्रा.लि.यांच्या सोबत त्रिपक्षीय करार केला आहे. या योजने अंतर्गत ११,९६९ लाभार्थ्यांच्या एकूण ४०,३३४ जनावरांचा विमा उतरविण्यासाठी ₹ ३०३.५५ लाख विमा हप्त्यासाठी अनुदान व पशुवैद्यकांच्या मानधनासाठी ₹ २५.७९ लाख खर्च झाला. एकूण ३,८५४ दावे केले गेले त्यापैकी ₹ ९.५८ कोटी रकमेच्या ३,३०० दाव्यांचा निपटारा करण्यात आला.

## वैरण विकास

७.६० सन २०१९-२० मध्ये, लागवडीखालील क्षेत्र आणि चारा उत्पादन तक्ता ७.३२ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.३२ लागवडीखालील क्षेत्र आणि चारा उत्पादन**

| योजना | खर्च (₹ कोटी) | वैरण बियाणे वितरण (मे.टन) | ठोंबे वितरण (संख्या लाख) | क्षेत्र ('००० हेक्टर) | अपेक्षित उत्पादन (लाख मे.टन) |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा वार्षिक योजना | ८.३७ | १,२६८.४० | २५३.६० | २७.४८ | १६.९० |
| राष्ट्रीय कृषी विकास योजना व राष्ट्रीय पशुधन अभियान | १३.५८ | ९७५.०० | ४०९.०० | २६.२० | १८.२२ |
| **एकूण** | **२१.९५** | **२,२४३.४०** | **६६२.६०** | **५३.६८** | **३५.१२** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

७.६१ राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेचा उद्देश भटक्या जमाती - क प्रवर्गातील लाभधारकांना मेंढी पालनाच्या व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्याचा आहे. या योजने अंतर्गत मेंढी गट (२०+१) वाटप, सुधारीत प्रजातीचे नर मेंढ्यांचे वाटप, मेंढी पालनासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आणि संतुलित खाद्य उपलब्ध करुन देणे, या बाबींसाठी ७५ टक्के अनुदान आणि कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास बनवण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र खरेदी करणे व पशुखाद्य कारखाने उभारणे यासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येते. सन २०१९-२० मध्ये राज्य शासनाने १,५२० मेंढी गट, ५९३ लाभार्थ्यांना मेंढी पालनासाठी पायाभूत सुविधा, ४५८ मेंढी गटांकरिता संतुलित खाद्य, २५ कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास बनवण्याकरिता गासड्या बांधण्याची यंत्रे खरेदी व १० पशुखाद्य कारखाने उभारणी करीता ₹ ३९ कोटी निधी वितरीत केला.

७.६२ पशुपालनाद्वारे ग्रामीण भागातील गरिबांचे जीवनमान उंचावणे, उद्योजकता निर्माण करणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे याकरिता राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत. निवडक योजनांची प्रगती तक्ता ७.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३३ निवडक राज्यस्तरीय योजनांची प्रगती**

| योजना | २०१७-१८ | | २०१८-१९ | | २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी ( (संख्या ) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या ) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या ) | खर्च (₹ लाख) |
| ६/४/२ दुधाळ जनावरांची गटवाटप योजना | २,३३९ | १,६९५ | २,७३६ | १,५९० | २,१२४ | ९६० |
| अंशत: ठाणबंद १० शेळ्या व एक बोकड गटवाटप | २,५४७ | १,२३३ | २,५३३ | १,११२ | १,८४८ | ८२९ |
| १,००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन जोडधंदा सुरु करणे | ९४७ | १,२७९ | ८९० | १,१८६ | ६७४ | ८७९ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## कुक्कुट विकास

७.६३ राज्यामध्ये चार मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांची स्थापना औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर व पुणे येथे खालील उद्देशाने केली आहे.

- सुधारीत जातींची कुक्कुट पिल्ले, तलंगा, उबवणुकीची अंडी यांचे उत्पादन व शेतकऱ्यांना शासनमान्य दराने विक्री करणे
- विविध योजने अंतर्गत सुधारित जातींची एक दिवसीय कुक्कुट पिल्ले, अंडी, नर-मादी पक्ष्यांचे व तलंगांचे लाभार्थ्यांना वाटप करण्याची व्यवस्था करणे
- ग्रामीण भागात कुक्कुट पालन व्यवसाय करण्यासाठी सुधारित जातींच्या पक्ष्यांचा पुरवठा करणे
- शेतकरी, महिला स्व-सहायता गट, सुशिक्षित बेरोजगार युवक, विद्यार्थी, इत्यादींना कुक्कुटपालन व्यवसायासाठी प्रशिक्षण देणे
- शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला देणे व कुक्कुट पालन व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करणे

सन २०१८-१९ मध्ये ९.६० लाख पक्षी तर सन २०१९-२० मध्ये ८.४४ लाख पक्षांचा पुरवठा मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून करण्यात आला.

## स्वयं प्रकल्प

७.६४ राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील अनुसूचित क्षेत्र असलेल्या अंगणवाड्यातील मुलांच्या आहारामध्ये अंड्यांचा पुरवठा करणे व स्वयंरोजगार निर्मिती करण्यासाठी सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या कालावधीकरीता स्वयं प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना चार आठवडे वयाचे ४५ कुक्कुट पक्षी वाटप करण्याकरिता १०४ पक्षी संगोपन केंद्रे स्थापन करण्याचा उद्देश आहे. लाभार्थ्यांना शाश्वत व लक्षणीय स्त्रोत उपलब्ध होण्यासाठी पुरविलेल्या ४५ पक्षांचे गट घरगुती पध्दतीने अंडी उबवून १०० पक्ष्यांपर्यंत वाढविण्यास प्रवृत्त करणे. सदर प्रकल्पा अंतर्गत तयार झालेली अंडी अंगणवाडीतील मुलांना प्रथिन युक्त पोषणासाठी वाटप करण्यात येतात. सदर प्रकल्प ₹ २२.५६ कोटीचा आहे. लाभार्थ्यांचे प्रशिक्षण व क्षमता वर्धन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियानांतर्गत करण्यात आली होती. सन २०१९-२० मध्ये एकूण १०१ पक्षी संगोपन केंद्रांची स्थापना झाली असून चार आठवडे वयाचे ८.७६ लाख पक्षी स्वयं रोजगार निर्मितीसाठी ४०,१४२ लाभार्थ्यांना वितरित केले आहेत.

## प्रमुख पशुधन उत्पादने

७.६५ राज्याचे सन २०१९-२० चे अस्थायी माहितीनुसार प्रमुख पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासूनचे दूध उत्पादन १२०.२४ लाख मे.टन, मांस उत्पादन ११.४० लाख मे.टन, अंडी उत्पादन ६३७ कोटी व लोकर उत्पादन १४.१२ मे.टन होते.

७.६५.१ सन २०१८-१९ मध्ये मांस उत्पादनात १२.६ टक्के हिश्श्यासह महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. दुध उत्पादनात राज्याचा सातवा क्रमांक असून राष्ट्रीय स्तरावरील प्रतिदिन दरडोई ३९४ ग्रॅम उपलब्धतेच्या तुलनेत राज्यात प्रतिदिन दरडोई २६६ ग्रॅम दूधाची उपलब्धता आहे. अंडी उत्पादनात राज्याचा सातवा क्रमांक असून प्रतिवर्ष दरडोई ५० अंडी उपलब्धता राज्यात आहे, तर राष्ट्रीय स्तरावर हे प्रमाण ७९ आहे. राज्यातील पशुधनापासूनचे व कुक्कुटादी पक्ष्यांपासूनचे उत्पादन तक्ता ७.३४ मध्ये तसेच निवडक राज्यांमधील पशुधनापासूनचे व कुक्कुटादी पक्ष्यांपासूनचे सन २०१८-१९ मधील अंदाजित उत्पादन तक्ता ७.३५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३४ राज्यातील पशुधनापासूनचे व कुक्कुटादी पक्ष्यांपासूनचे उत्पादन**

| वर्ष | मांस ('००० मे.टन) | दूध ('००० मे.टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ८४५ | १०,४०२ | ५४८ | १,४०७ |
| | (११.४) | (६.४) | (६.२) | (३.२) |
| २०१७-१८ | ९२४ | ११,१०२ | ५७० | १,४३६ |
| | (१२.१) | (६.३) | (६.०) | (३.५) |
| २०१८-१९ | १,०२१ | ११,६५५ | ५९६ | १,४५७ |
| | (१२.६) | (६.२) | (५.८) | (३.६) |

टीप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात
*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.३५ निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्षी यापासूनचे सन २०१८-१९ मधील उत्पादन**

| राज्य | मांस ('००० मे.टन) | दूध ('००० मे.टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ७८१ | १५,०४४ | १,९७५ | ७९७ |
| गुजरात | ३३ | १४,४९३ | १८५ | २,२७१ |
| कर्नाटक | २५४ | ७,९०१ | ६०० | ३,०५७ |
| मध्य प्रदेश | ९७ | १५,९११ | २१४ | ४१० |
| **महाराष्ट्र** | **१,०२१** | **११,६५५** | **५९६** | **१,४५७** |
| राजस्थान | १९२ | २३,६६८ | १६६ | १४,५२२ |
| तामिळनाडू | ६३४ | ८,३६२ | १,८८४ | २ |
| तेलंगणा | ७५४ | ५,४१६ | १,३६९ | ४,२६४ |
| उत्तर प्रदेश | १,२२७ | ३०,५१९ | २६० | १,३१६ |
| **अखिल भारत** | **८,११४** | **१,८७,७४९** | **१०,३३२** | **४०,४२०** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन आणि *बेसिक ॲनिमल हस्बंडरी स्टॅटिस्टिक्स*-२०१९, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, भारत सरकार

## दुग्ध विकास

७.६६ दुग्ध व्यवसाय हा कृषि पूरक व्यवसाय असून त्यात ग्रामीण कुटुंबांच्या आहार पोषण मुल्यांचा स्तर उंचावण्याबरोबरच अतिरिक्त उत्पन्न व रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची क्षमता आहे. दूध उत्पादन व दुधाची दरडोई उपलब्धता तक्ता ७.३६ मध्ये तर विभागनिहाय दूध उत्पादन तक्ता ७.३७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३६ दूध उत्पादन व दुधाची दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दूध उत्पादन (लाख मे. टन) | | दुधाची दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रतिदिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | भारत | राज्य | भारत |
| २०१६-१७ | १०४.०२ | १,६३६.९४ | २४३ | ३५२ |
| २०१७-१८ | १११.०२ | १,७६३.४६ | २५६ | ३७५ |
| २०१८-१९ | ११६.५४ | १,८७७.४९ | २६६ | ३९४ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.६ : सहकारी व शासकीय दुग्धशाळांकडून एकत्रित दैनिक सरासरी दूध संकलन**




७.६७ सन २०१९-२० मध्ये शासकीय व सहकारी क्षेत्र मिळून १०७ दूध प्रक्रिया प्रकल्प, १४२ दूध शीतकरण केंद्रे व ९०३ बल्क मिल्क कुलर कार्यरत होते व त्यांची प्रतिदिन क्षमता ९४.०३ लाख लिटर व शीतकरण क्षमता ४४.३० लाख लिटर प्रतिदिन होती. शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे दैनिक सरासरी दूध संकलन २०१९-२० मध्ये अनुक्रमे ०.९६ लाख लिटर व ३९.७६ लाख लिटर आणि २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर पर्यंत अनुक्रमे ०.५३ लाख लिटर व ४०.०९ लाख लिटर होते. राज्यात सन २०१९-२० मध्ये २६३ शीतगृहे असून त्यांची क्षमता १७,४९४.४० मे.टन आहे, त्यापैकी २४७ शीतगृहे खाजगी क्षेत्रात असून त्यांची क्षमता १७,१७५.६५ मे. टन होती.

**तक्ता ७.३७ विभागनिहाय दूध उत्पादन**

(लाख मे. टन)

| विभाग | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|
| कोकण | ४.९८ | ५.३३ | ५.५२ |
| नाशिक | २८.०७ | २९.८५ | ३३.३४ |
| पुणे | ४२.९९ | ४६.४१ | ४९.५७ |
| औरंगाबाद | १६.४८ | १७.७० | १७.०४ |
| अमरावती | ६.७७ | ६.६२ | ६.१० |
| नागपूर | ४.७३ | ५.११ | ४.९७ |
| **महाराष्ट्र** | **१०४.०२** | **१११.०२** | **११६.५४** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ७.७: दूध उत्पादन २०१८-१९**




**आलेख ७.८: दुधाची दरडोई उपलब्धता २०१८-१९**



## मत्स्यव्यवसाय

७.६८ राज्यास ७२० किमी लांबीचा सागरी किनारा लाभला असून सागरी मासेमारीसाठी १.१२ लाख चौ. किमी क्षेत्र योग्य आहे व सागरी किनाऱ्यावर मासळी उतरविण्याची १७३ केंद्रे आहेत. या व्यतिरिक्त, राज्यात ४.१८ लाख हेक्टर क्षेत्र गोड्या पाण्यातील व ०.१० लाख हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील मासेमारीसाठी योग्य आहे. सन २०१९-२० मध्ये सागरी मासेमारीसाठी १६,०८९ मच्छीमार नौका कार्यरत असून त्यापैकी १२,९४८ यांत्रिक नौका होत्या. गोड्या पाण्यातील मासेमारीची गरज भागवणारी ३४ मत्स्यबीज उत्पादन केंद्रे राज्यात असून त्यांची प्रतिवर्ष उत्पादन क्षमता २,४१४ लाख मत्स्यबीज होती. मत्स्य उत्पादन व निर्यात तक्ता ७.३८ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३८ मत्स्य उत्पादन व निर्यात**

| बाब | परिमाण | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | |
| सागरी | | ४.६७ | ४.४४ | १.२५ |
| गोड्या पाण्यातील | | १.०० | १.१८ | ०.४४ |
| **एकूण** | | **५.६७** | **५.६२** | **१.६९** |
| **स्थूल मूल्य** | ₹ कोटी | | | |
| सागरी | | ६,२९८ | ६,७५१ | २,००० |
| गोड्या पाण्यातील | | १,१७८ | १,४७४ | ५७२ |
| **एकूण** | | **७,४७६** | **८,२२५** | **२,५७२** |
| **मत्स्य निर्यात** | | | | |
| उत्पादन | लाख मे.टन | १.६१ | १.३६ | उ ना |
| मूल्य | ₹ कोटी | ५,१२१ | ४,५३६ | उ ना |

उ ना उपलब्ध नाही + सप्टेंबरपर्यंत

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.६९ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०११-१२ पासून ₹ १७७ कोटी खर्चाच्या २५ मासेमारी धक्क्यांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यापैकी १५ धक्क्यांचे काम पूर्ण झाले असून पाच धक्क्यांचे काम प्रगतीपथावर आहे, दोन धक्क्यांच्या कामाला किनारपट्टी नियमन क्षेत्राची मान्यता प्रलंबित आहे.

७.७० भारत सरकारने दि.३ डिसेंबर, २०२० रोजी प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजना पाच वर्षांच्या कालावधीसाठी सुरू केली. सदर योजना मत्स्यउत्पादन आणि उत्पादकता यातील लक्षणीय तफावत दूर करणे, गुणवत्ता, तंत्रज्ञान, हंगामानंतरची पायाभूत सुविधा व व्यवस्थापन, आधुनिकीकरण व मूल्य शृंखलेचे सक्षमीकरण, मत्स्य व्यवसायासाठी एक ठोस ढाचा आणि मत्स्य व्यवसायीकांच्या कल्याणासाठी या योजनेची आखणी केली आहे. या योजने अंतर्गत, ४६ लाभार्थीभिमुख योजनांसाठी राज्यास ₹ १५३ कोटी मंजूर झाले आहेत.

## रेशीम उत्पादन

७.७१ ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याची क्षमता असलेला रेशीम उत्पादन हा कृषि आधारित उद्योग आहे. तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २४ जिल्ह्यांत राबविला जातो. तुती लागवडीखालील क्षेत्र व रेशीम उत्पादनाची माहिती तक्ता ७.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३९ तुती लागवडीखालील क्षेत्र व रेशीम उत्पादन**

| बाब | परिमाण | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|---|
| लागवडीखालील क्षेत्र (जुने) | हेक्टर | १०,३७७ | १२,९८४ | ११,२७९ |
| लागवडीखालील क्षेत्र (नवीन) | हेक्टर | ९,४०६ | ४,९०१ | ४,४२६ |
| लागवडीखालील क्षेत्र ( एकूण) | हेक्टर | १९,७८३ | १७,८८५ | १५,७०५ |
| लाभार्थी (शेतकरी) | संख्या | १८,१६० | १६,७४४ | १४,८५१ |
| रोग विरहीत अंडीपुंजांचा पुरवठा | लाख | ५४.६७ | ४२.२२ | २४.७१ |
| कोष उत्पादन | मे. टन | ३,२३०.२७ | २,६५५.७६ | १,३४०.६१ |
| कच्चे रेशीम उत्पादन | मे. टन | ४९६.३७ | ४०८.५० | २०६.०७ |
| कोष खरेदी | मे. टन | ०.४७७ | ०.०९३ | ०.०० |
| निर्मित रोजगार (मनुष्य दिवस) | लाख | ५४.६० | ४४.९३ | २२.६६ |

*आधार* : रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

७.७१.१ टसर रेशीम विकास कार्यक्रम गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये राबविला जातो. टसर रेशीम किड्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ऐन व अर्जुन वृक्षांचे या चार जिल्ह्यांतील लागवडी खालील क्षेत्र १८,८६६ हेक्टर आहे. सन २०१९-२० मध्ये कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन १९.०६ मे.टन होते तर सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ते १.४२ मे.टन होते.

## वने

७.७२ सन २०१९-२० अखेर राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,९५१.७६ चौ. किमी असून राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वनक्षेत्राचे प्रमाण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के असावे या उद्दिष्टाच्या तुलनेत राज्याचे वनक्षेत्र २०.१ टक्के आहे. राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी वन विभाग (५५,८५८.६४ चौ. किमी), महाराष्ट्र वन विकास महामंडळ (मवविम) (३,४६२.२६ चौ. किमी), वन विभागाच्या अधिपत्त्याखाली आणण्यात आलेले खाजगी वनक्षेत्र (१,१९०.५४ चौ. किमी) व महसूल विभागाच्या (१,४४०.३२ चौ. किमी) अधिपत्याखाली आहे. भारताचा वनस्थिती अहवाल, २०१९ नुसार राज्याचे वनाच्छादन ५०,७७८ चौ. किमी असून ते भारताचा वनस्थिती अहवाल, २०१७ मध्ये नमुद केलेल्या वनाच्छादनाच्या तुलनेत ९६ चौ. किमी ने वाढलेले आहे. राज्याच्या एकूण वनाच्छादनात अति घनदाट वने १७.२ टक्के, मध्यम घनदाट वने ४०.५ टक्के, खुली वने ४२.३ टक्के होती. राज्याचे एकूण कांदळवन आच्छादन भारताचा वनस्थिती अहवाल, २०१९ नुसार ३२० चौ. किमी असून ते भारताचा वनस्थिती अहवाल, २०१७ मध्ये नमूद केलेल्या आच्छादनाच्या तुलनेत १६ चौ. किमीने वाढले आहे. परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण तक्ता ७.४० मध्ये तर निवडक राज्यांचे वनाच्छादन तक्ता ७.४१ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४० वन परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण (३१ मार्च, २०२० रोजी)**

(चौ. किमी)

| परिमंडळ | वनक्षेत्र | | | | एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण | |
| गडचिरोली | ११,२२७.१९ | १,४०३.०५ | २६७.५९ | १२,८९७.८४ | २०.८ |
| नागपूर | ४,४१४.१७ | २,१५७.१० | १,१८४.६३ | ७,७५५.९० | १२.५ |
| धुळे | ६,१४८.१२ | ५७.०६ | २२२.७७ | ६,४२७.९५ | १०.४ |
| ठाणे | ४,३४४.२७ | १,१५६.१५ | ३३३.३२ | ५,८३५.७४ | ९.४ |
| नाशिक | ५,०६५.९२ | २४१.०२ | ३२.९६ | ५,३३९.९० | ८.६ |
| चंद्रपूर | ३,८३५.८० | ८७७.७१ | १२५.८४ | ४,८३९.३५ | ७.८ |
| अमरावती | ५,०५५.५४ | १५.८१ | १४.०६ | ५,०८५.४१ | ८.२ |
| कोल्हापूर | ३,३६१.७९ | ४१२.७८ | ७५४.६१ | ४,५२९.१८ | ७.३ |
| यवतमाळ | ३,३५२.८६ | ६.३१ | १२२.३५ | ३,४८१.५३ | ५.६ |
| औरंगाबाद | २,८१८.९४ | १०५.८६ | २२९.५७ | ३,१५४.३७ | ५.१ |
| पुणे | २,४३०.५३ | ०.०३ | १७४.०४ | २,६०४.६० | ४.२ |
| **महाराष्ट्र** | **५२,०५५.१३** | **६,४३२.८८** | **३,५६३.७५** | **६१,९५१.७६** | **१००.०** |

*आधार :* प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.४१ निवडक राज्यांचे वनाच्छादन**

(चौ. किमी)

| राज्य | भौगोलिक क्षेत्र | एकूण वनाच्छादन | भौगालिक क्षेत्राशी एकूण वनाच्छादनाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १,६२,९६८ | २९,१३७ | १७.९ |
| गुजरात | १,९६,२४४ | १४,५५७ | ७.६ |
| कर्नाटक | १,९१,७९१ | ३८,५७५ | २०.१ |
| केरळ | ३८,८५२ | २१,१४४ | ५४.४ |
| मध्य प्रदेश | ३,०८,२५२ | ७७,४८२ | २५.१ |
| **महाराष्ट्र** | **३,०७,७१३** | **५०,७७८** | **१६.५** |
| राजस्थान | ३,४२,२३९ | १६,६३० | ४.९ |
| तेलंगणा | १,१२,०७७ | २०,५८२ | १८.४ |
| उत्तर प्रदेश | २,४०,९२८ | १४,८०६ | ६.२ |
| **भारत** | **३२,८७,४६९** | **७,१२,२४९** | **२१.७** |

*आधार :* भारताचा वनस्थिती अहवाल, २०१९

## वन्यजीव, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये

७.७३ राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ४९ अभयारण्ये आणि सात संवर्धित राखीव क्षेत्रे आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्यामार्फत दर चार वर्षांनी राष्ट्रीय स्तरावर व्याघ्र गणना करण्यात येते. 'भारतातील वाघांची स्थिती, २०१८' अहवालानुसार राज्यातील वाघांची अंदाजित संख्या ३१२ होती तर सन २०१४ मध्ये १९० होती. वन्यजीव प्रकल्पांतर्गत क्षेत्र आणि खर्च तक्ता ७.४२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४२ वन्यजीव प्रकल्पांतर्गत क्षेत्र आणि खर्च**

| प्रकल्प | क्षेत्र (चौ. किमी) | | खर्च (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | गाभा | बफर | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
| **व्याघ्र प्रकल्प** | | | | | |
| मेळघाट | १,५००.४९ | १,२६८.०३ | ११९.७७ | २३.६७ | १२.८५ |
| ताडोबा-अंधारी | ६२५.८२ | १,१०१.७७ | ११.८७ | १५.४० | १.९४ |
| पेंच | २५७.२६ | ४८३.९६ | १२.४६ | १४.८० | ४.६६ |
| सह्याद्री | ६००.१२ | ५६५.४५ | ५.२४ | ८.१७ | ०.२३ |
| नवेगाव-नागझिरा | ६५३.६७ | १,२४१.२७ | १२.५४ | १२.९४ | १.१४ |
| बोर | १३८.१२ | ६७८.१४ | ७.१७ | ५.७० | ०.४८ |
| **वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास कार्यक्रम** | - | - | १५.८३ | ८.५६ | ०.२१ |
| हत्ती प्रकल्प, कोल्हापूर | क्षेत्र निर्दिष्ट नाही | | ०.७२ | ०.४३ | उ.ना. |

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## वनोत्पादने

७.७४ वनांमधून इमारती व जळाऊ लाकूड ही प्रमुख आणि बांबू, तेंदू पत्ता, डिंक, गवत, इत्यादी गौण वन उत्पादने मिळतात. वनोत्पादनांचे उत्पादन व मूल्य तक्ता ७.४३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४३ वनोत्पादनांचे उत्पादन व मूल्य**

(₹ कोटी)

| वनोत्पादन | उत्पादनाचे परिमाण | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१@ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वनोत्पादने** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.३० | ३५६.६७ | १.११ | ३३८.६९ | १.१३ | ३५४.८१ |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | २.३२ | ५०.११ | १.७९ | ४५.२ | २.२५ | ६२.२७ |
| **एकूण (अ)** | ***लाख घन मीटर*** | | **४०६.७८** | | | | **४१७.०८** |
| **(ब) गौण वनोत्पादने** | | | | | | | |
| बांबू | लाख मे. टन | ०.२२ | १४.७५ | ०.१० | १०.५० | ०.२७ | २२.०७ |
| तेंदूपत्ता | लाख स्टँडर्ड बॅग्ज | २.१२ | ५०.६९ | २.२४* | ३८.४८* | १.२९ | २६.७६ |
| गवत | मे. टन | १,४४० | ०.१७ | ४९५* | ०.११* | उना | उना |
| डिंक | क्विंटल | २२५ | ०.१५ | २,६७५* | ०.१६* | उना | उना |
| लाख | क्विंटल | २५ | ०.०६ | ० | ० | उना | उना |
| इतर ( हिरडा, शिकेकाई, इत्यादी) | - | उना | ०.९ | | ०.५१* | उना | उना |
| **एकूण (ब)** | | | **६६.७२** | | **४९.७६** | | **४८.८३** |
| **एकूण (अ+ब)** | | | **४७३.५०** | | **४३३.६५** | | **४६५.९१** |

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन उना उपलब्ध नाही * अस्थायी @अंदाजित १ स्टँडर्ड बॅग ५० तेंदुपत्त्यांचे १००० बंडल

## वृक्ष लागवड

७.७५ वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी मुख्यत: वन विभाग, महाराष्ट्र वन विकास महामंडळ व सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेमार्फत करण्यात येते. सन २०१९-२० मध्ये ₹ १,००० कोटी वृक्ष लागवडीसाठी खर्च करण्यात आला. वृक्ष लागवडी अंतर्गत क्षेत्र व खर्च तक्ता ७.४४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४४ वृक्ष लागवडी अंतर्गत क्षेत्र व खर्च**

| वर्ष | वन विभाग | | महाराष्ट्र वन विकास महामंडळ | | सामाजिक वनीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | पुरविलेली रोपे (कोटी) |
| २०१६-१७ | ३६,४५७ | १४२.९५ | २,९०६ | ९.०८ | २,७८७ | ४५.१० | १.१९ |
| २०१७-१८ | २६,४०५ | ९९.४६ | ३,५७७ | १३.८० | ३,९८५ | ६०.४६ | ०.५० |
| २०१८-१९ | ५१,७२४ | २००.८८ | ४,६३३ | २२.७९ | १२,६२० | २१०.५६ | १५.८९ |
| २०१९-२० | १,०२,९८७ | ३८८.३५ | ८,९८७ | ८९.७२ | २१,०३२ | ५२१.९४@ | ३५.१४@ |

@ १७,८५८ किमी रस्त्याच्या कडेने केलेले वृक्ष लागवड समाविष्ट आहे

*आधार :* प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## सामाजिक वनीकरण

७.७६ सन २०१९-२० मध्ये १७,१७८ हेक्टर सामूहिक जमिनीवर व १६,२६७ किमी रस्ते / लोहमार्ग / कालवे यांच्या कडेने ५३९.१२ लाख रोपांची लागवड करण्यात आली असून ग्रामपंचायती, खाजगी संस्था व वैयक्तिक वृक्ष लागवडीसाठी १७.१२ लाख रोपे पुरविण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत १८.४९ लाख रोपांची लागवड ९५१ हेक्टर सामूहिक जमिनीवर व १,३८५ किमी रस्ते / रेल्वे लाईन / कालवे यांच्या कडेने करण्यात आली. मनरेगा अंतर्गत शेतबांध लागवडीसाठी ७५४ गट पुरविण्यात आले आणि कृषि वन योजनेमध्ये ११.४९ लाख रोपांची लागवड करण्यात आली. तसेच ५.७४ लाख रोपे ग्रामपंचायती, खाजगी संस्था व वैयक्तिक वृक्ष लागवडीसाठी पुरविण्यात आली. प्रमुख योजनांखालील वृक्ष लागवडीचे क्षेत्र तक्ता ७.४५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४५ प्रमुख योजनांखालील वृक्ष लागवडीचे क्षेत्र**

| योजना | परिमाण | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|---|
| सामुहिक जमिनीवर रोपांची लागवड | लाख रोपे | १२६.०० | ५३९.१२ | १८.४९ |
| अ) गट लागवड | हेक्टर | ७,०६९.०० | १८,१७८.०० | ९५१.०० |
| ब) रस्ते / लोहमार्ग / कालवे यांच्या कडेने लागवड | किमी | १६,३८५.०० | १७,७२५.२० | १,३८५.०० |
| ग्रामपंचायती, खासगी संस्था व वैयक्तिक वृक्ष लागवडीसाठी पुविलेली रोपे | लाख रोपे | ८.८९ | १७.१२ | ५.७४ |
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना | | | | |
| अ) शेतबांध लागवड | एकक | १९०.०० | १०२.०० | ७५४.०० |
| ब) कृषी वन लागवड | लाख रोपे | - | १५.०५ | ११.४९ |
| कन्या वनसमृद्धी योजना | लाख रोपे | - | ५.४९ | ०.२० |

*आधार :* प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय,सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर अखेर

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.७७ वने आणि वन्यजीवांच्या महत्वाविषयी जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूने तसेच बेकायदेशीर वृक्षतोड, अतिक्रमण, इत्यादी पासून वनांचे संरक्षण करण्याकरिता संत तुकाराम वनग्राम योजना सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत १५,५०० गावांमध्ये एकूण १२,०८४ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठीत करण्यात आल्या. जिल्हा व राज्य स्तरावर सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या तीन समित्यांना तसेच औरंगाबाद विभागातील एका समितीला या योजने अंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समिती पुरस्कार देण्यात येतो. या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांकडून २७.०४ लाख हेक्टर वनक्षेत्राचे व्यवस्थापन केले जाते. या योजने अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये ₹ ७५ लाख खर्च झाला.

* * * * *

## परिशिष्ट ७.१

## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ | ४३,७२२ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ | ३४,४३६ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ | ४३,३९२ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ | १६,९६४ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ | ६,३०६ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ | ३,३५३ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ | ३,९८४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ | ५९० | ५७६ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ | ८९ | १२१ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** | **१,५२,८५४** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० | १०,२७८ |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० | २४,२०९ |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९१ | ५७,७११ |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ | ३८,८४४ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ | २१,४१२ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ | १४,७७८ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ | २६,२१६ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ | ७,२५१ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ | ४,३६५ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७२** | **२,०५,०६४** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ | ०.२४ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ | ०.७० |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ | १.४२ | १.३३ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ | २.३७ | २.२९ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ | ३.४० |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ | ४.४१ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ | ६.५८ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ | १२.५९ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ | ३६.०७ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** | **१.३४** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.२

## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनांखालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकांखालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापिक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागतीयोग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२१० | १,७२८ | १,४५० | ९१९ | १,२४३ | २५० | १,३७८ | १,१९१ | १७,३८५ | ५,७२० | २३,१०६ |
| २०१२-१३ | ३०,७५८ | ५,२०७ | १,७२१ | १,४५५ | ९१६ | १,२४४ | २५० | १,४१७ | १,२०० | १७,३४३ | ५,७७२ | २३,११५ |
| २०१३-१४ | ३०,७५८ | ५,२०५ | १,७२३ | १,४६० | ९१५ | १,२४२ | २४९ | १,४०१ | १,१९२ | १७,३६८ | ६,०१२ | २३,३८० |
| २०१४-१५ | ३०,७५८ | ५,२०१ | १,७२७ | १,४८२ | ९१९ | १,२४९ | २४९ | १,३९९ | १,१८८ | १७,३४४ | ५,९२९ | २३,२७३ |
| २०१५-१६ | ३०,७५८ | ५,१९४ | १,७३१ | १,५२१ | ८८७ | १,२४९ | २५१ | १,४७७ | १,२५५ | १७,१९१ | ५,६७१ | २२,८६३ |
| २०१६-१७ | ३०,७५८ | ५,१९४ | १,८२२ | १,६४२ | ९२४ | १,३५१ | २५३ | १,४०१ | १,२५७ | १६,९१० | ६,३१४ | २३,२२४ |
| २०१७-१८ | ३०,७५८ | ५,२१९ | १,८३४ | १,६५० | ९२३ | १,२८७ | २५६ | १,३६५ | १,२६२ | १६,९४२ | ६,३२६ | २३,२६८ |
| २०१८-१९ | ३०,७५८ | ५,१७४ | १,८४९ | १,६९२ | ९२४ | १,३२३ | २७२ | १,४४८ | १,२६० | १६,८१५ | ६,३९७ | २३,२१२ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - २०१०-११ ते २०१८-१९ चे आकडे अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.३

## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २०१०-११ | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ७ | २०१७-१८ | १,४५१ | २,७३१ | १,८८२ | १,१३८ | १,८८५ | १,६५७ | ३,४६४ | २,३९० | ६९० |
| ८ | २०१८-१९ | १,४६५ | ३,२७६ | २,२३६ | ८३४ | १,२४९ | १,४९७ | २,४४० | १,१९७ | ४९१ |
| ९ | २०१९-२० | १,५५३ | २,८९७ | १,८६६ | १,०५७ | १,७९३ | १,६८७ | २,३७१ | १,८६५ | ७८६ |

| अ. क्र. | वर्ष | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २०१०-११ | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६८ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ७ | २०१७-१८ | ७८८ | ६६९ | ८४९ | १,२२२ | ३,२६९ | २,६७५ | ८,०६३ | १०,९४४ | १,३५७ |
| ८ | २०१८-१९ | ६१० | ३३२ | ५४५ | १,०७९ | १,८९२ | १,७५४ | ६,४२७ | ७,९४७ | १,२३६ |
| ९ | २०१९-२० | ६७३ | ५१२ | ७६१ | १,३२२ | २,१५० | १,६२६ | ६,९७६ | ९,२१८ | १,३२१ |

| अ. क्र. | वर्ष | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २०१०-११ | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ७ | २०१७-१८ | १,३७५ | १,२५० | ९०९ | २,२३४ | २,०४९ | ९१७ | ४३२ | १५९ | ३६७ |
| ८ | २०१८-१९ | १,२६१ | ८३५ | ६६२ | १,६९४ | १,३९७ | ८२५ | ४८१ | २०४ | ४२४ |
| ९ | २०१९-२० | १,३१९ | १,१९७ | ९०७ | २,०४३ | २,२४० | १,०९६ | ३८७ | १५१ | ३९० |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.३ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | उडीद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २०१०-११ | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ७ | २०१७-१८ | ३५१ | १२१ | ३४६ | १८५ | १०५ | ५६८ | ४,५७७ | ३,६८४ | ८०५ |
| ८ | २०१८-१९ | ३६७ | १५५ | ४२१ | १९९ | ९३ | ४६७ | ४,००२ | २,६८३ | ६७० |
| ९ | २०१९-२० | ३४१ | १५१ | ४४४ | २२६ | ११० | ४८७ | ४,३१६ | ३,८४९ | ८९२ |

| अ. क्र. | वर्ष | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २०१०-११ | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,२९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ७ | २०१७-१८ | १२,६४० | १४,६२८ | १,१५७ | २९१ | ३४५ | १,१८४ | ३,६९४ | ३,८०५ | १,०३० |
| ८ | २०१८-१९ | १०,४३० | १०,६३० | १,०१९ | २४४ | २३९ | ९७७ | ४,०७५ | ४,६११ | १,१३२ |
| ९ | २०१९-२० | ११,२९२ | १३,०६७ | १,१५७ | २९१ | ३०९ | १,०६३ | ४,१२४ | ४,८२६ | १,१७० |

| अ. क्र. | वर्ष | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २०१०-११ | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ७ | २०१७-१८ | ३९ | २१ | ५४८ | ११५ | ३९ | ३३९ | ४,१३३ | ४,२०८ | १,०१८ |
| ८ | २०१८-१९ | २५ | १२ | ४७५ | ११३ | २३ | ३१२ | ४,४५८ | ४,८८५ | १,०९६ |
| ९ | २०१९-२० | २२ | १५ | ६९१ | ९० | २८ | ३१२ | ४,५२६ | ५,१७८ | १,१४४ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.३ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**नगदी पिके**

| अ. क्र. | वर्ष | ऊस | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तोडणी क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) |
| १ | १९६०-६१ | १५५ | १०,४०४ | ६६.९२ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | १६७ | १४,४३३ | ८६.५३ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | २५८ | २३,७०६ | ९१.७४ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ४४२ | ३८,१५४ | ८६.४० | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ५९५ | ४९,५६९ | ८३.२७ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २०१०-११ | ९६५ | ८५,६९१ | ८८.८५ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ७ | २०१७-१८ | ९०२ | ८३,१३८ | ९२.०० | ४,३५१ | ६,०९४ | २३८ | ०.५ | ०.७ | १,२४५ |
| ८ | २०१८-१९ | १,१६३ | ८९,७७१ | ७७.०० | ४,२१९ | ६,५९३ | २६६ | ०.५ | ०.८ | १,७४५ |
| ९ | २०१९-२० | ८२२ | ६९,३१३ | ८४.०० | ४,४९१ | ६,६३९ | २५१ | ०.५ | ०.८ | १,८१५ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - (१) २०१९-२० ची माहिती अंतिम पुर्वानुमानावर आधारित आहे.

(२) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

(३) ऊसाची उत्पादकता मेट्रीक टन / हेक्टर

## परिशिष्ट ७.४

## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया: १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२२.१ | १६२.२ | १२३.६ | १४८.३ | १३१.२ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | २३७.७ | २२८.७ | १९४.७ | १२९.० | १८५.३ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७०.५ | ५१.८ | ४८.८ | २४.४ | ३८.१ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १५५.५ | ११०.७ | ९२.६ | ४६.० | ७०.९ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | १८८.७ | उना | उना | उना | उना |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | २,१८०.५ | २,७८९.४ | २,६१८.९ | १,४७९.५ | १,६४२.५ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ५५.५ | ५२.५ | ५०.२ | ४४.२ | ४१.३ |
| (८) कोद्रा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २३.६ | उना | उना | उना | उना |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | २६.१ | ११२.५ | ५९.० | ५१.९ | १६०.२ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१३४.२** | **१३५.८** | **११७.३** | **८४.९** | **१००.१** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ७९०.७ | १,१८०.५ | १,२४६.० | ८४९.६ | १,३६२.३ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | २४५.३ | ५२५.११ | ३१४.३ | २०९.७ | ३००.८ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | १९६.५ | १३२.६ | ९२.३ | १०८.१ | ९८.८ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **३०५.६** | **४८५.१** | **३७०.६** | **२६५.६** | **३८२.२** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१६८.२** | **२०५.०** | **१६७.४** | **१२०.७** | **१५६.०** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | | |
| **(अ) तेलबिया** | | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७४.३ | ४६.६ | ५५.९ | ३८.७ | ५०.२ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ५८.९ | ४१४.४ | १९.७ | १९.३ | १५.३ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ५.१ | ११.३ | ९.० | ८.० | ८.७ |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ३३३.३ | ४५५.७ | ३१६.७ | ३०३.९ | २७०.७ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | २६७.३ | ७०.५ | ४१.६ | १४.५ | २४.४ |
| **एकूण - तेलबिया** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **७९.८** | **६८.४** | **४९.०** | **३३.७** | **४३.१** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | ५१२.३ | ७३७.३ | ४१७.८ | ४५२.० | ४५५.२ |
| (२) अंबाडी | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २६.४ | उना | उना | उना | उना |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **५१०.४** | **७३४.४** | **४१६.१** | **४५०.२** | **४५३.३** |
| **(क) संकीर्ण** | | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | २९७.२ | २०४.५ | ३१३.४ | ३३८.४ | २६१.३ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ३२.७ | ०.२ | १०.२ | ११.९ | १२.३ |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | उना | उना | उना | उना | उना |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | उना | उना | उना | उना | उना |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **२७३.४** | **१८८.०** | **२८८.२** | **३११.२** | **२४०.३** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **२८५.६** | **२७९.५** | **२६८.८** | **२८६.७** | **२४६.८** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **२२३.८** | **२४०.२** | **२१५.४** | **१९९.३** | **१९९.०** |

*आधार*- कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

उना उपलब्ध नाही.

टीप - २०१६-१७ ते २०१९-२० चे निर्देशांक अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.५

## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

('००० हेक्टर)

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | १.७२ | २१,६१९ | १७.८ |
| ६ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | १.५२ | २०,९९१ | १७.८ |
| ७ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | १.६१ | २०,९१५ | १८.२ |
| ८ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ ना | उ ना | २२,१९० | १६.४ |
| ९ | २००४-०५ | १,९४२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ ना | उ ना | २२,३७६ | १६.४ |
| १० | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ ना | उ ना | २२,५५६ | १६.९ |
| ११ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ ना | उ ना | २२,५५७ | १७.६ |
| १२ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ ना | उ ना | २२,६५५ | १७.८ |
| १३ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ ना | उ ना | २२,४५४ | १७.७ |
| १४ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ ना | उ ना | २२,६१२ | १७.९ |
| १५ | २०१०-११ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,१७५ | उ ना |
| १६ | २०११-१२ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,१०६ | उ ना |
| १७ | २०१२-१३ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,११५ | उ ना |
| १८ | २०१३-१४ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,३८० | उ ना |
| १९ | २०१४-१५ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२७३ | उ ना |
| २० | २०१५-१६ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २२,८६३ | उ ना |
| २१ | २०१६-१७ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२२४ | उ ना |
| २२ | २०१७-१८ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२६८ | उ ना |
| २३ | २०१८-१९ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२१२ | उ ना |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

उ ना उपलब्ध नाही.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

(२) स्तंभ क्र. ७ मध्ये (स्तंभ क्र. ६ ÷ स्तंभ क्र. ५) x १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.

(३) २००३ -०४ ते २०१८-१९ चे आकडे अस्थायी आहेत.

(४) जलसंपदा विभागाच्या, महाराष्ट्र शासन, दि.२६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शा.नि. अन्वये माहिती संकलनाच्या पद्धती बाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |
| २०१३-१४ | ७०.३७ | ५३६.६७ | ६०७.०४ | ५७.५७ | ४५७.२० | ५१४.७७ | ६३१.४९ | ७२८.२४ | १,३५९.७३ |
| २०१४-१५ | ७८.१५ | ५९३.५९ | ६७१.७४ | ६१.९७ | ५७४.५३ | ६३६.५० | ६४८.२९ | ६९५.८० | १,३४४.०९ |
| २०१५-१६ | ८०.०४ | ६६०.१३ | ७४०.१६ | ४९.१६ | ५२३.४२ | ५७२.५९ | ६७९.०२ | ८३५.१३ | १,५१४.१५ |
| २०१६-१७ | ७३.०५ | ६९०.४७ | ७६३.५२ | ५९.४८ | ५१३.४३ | ५७२.८९ | ६९३.९९ | १,०१०.२९ | १,७०४.२८ |
| २०१७-१८ | ९३.७२ | ७३५.०६ | ८२८.७८ | ७४.३० | ६१३.८४ | ६८८.१४ | ७१४.०० | १,१३५.१९ | १,८४९.१९ |
| २०१८-१९ | १०५.७९ | १,०३०.९५ | १,१३६.७४ | ७८.२७ | ९६५.८७ | १,०४४.१४ | ७४९.०७ | १,१९८.५२ | १,९४७.५९ |
| २०१९-२० | ११४.०३ | १,१९५.६९ | १,३०९.७२ | ५९.९७ | ९०८.३४ | ९६८.३१ | ८०९.४० | १,५९३.७१ | २,४०३.११* |

*आधार* — जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद * अस्थायी

# परिशिष्ट ७.७

## राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी

('०००)

| पशुधन गणना वर्ष | गाई-बैल | म्हशी -रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन + | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई व कुरण क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | दर शंभर हेक्टर निव्वळ पिकांखालील क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये मागे पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी $ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७५१ |
| १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३० |
| १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४६ | ३२,१८७ |
| १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३६ | ३४,५९६ |
| २००७ | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६@ |
| २०१२ | १५,४८४ | ५,५९५ | ११,०१६ | ३९४ | ३२,४८९ | ८८५ | १८७ | २९ | ७७,७९५@ |
| २०१९ | १३,९९३ | ५,६०४ | १३,२८५ | १९८ | ३३,०८० | उ ना | उ ना | उ ना | ७४,२९८ |

*आधार* - पशुधन गणना        उ ना    उपलब्ध नाही.

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

+ इतर पशुधन यामध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचा समावेश.

$ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी.

@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहे.

# 8

# =tÉMÉ +ÉÊhÉ ºÉ½ÉòÉ®



# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ महाराष्ट्र, सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेल्या राज्यांपैकी एक असून उद्योगाच्या सर्व क्षेत्रांमध्ये राज्याने प्राबल्य प्रस्थापित केले आहे. राज्य नेहमीच अग्रस्थानी राहीले असून आर्थिक कार्यांना चालना देण्यासाठी राज्याने नेहमीच क्षेत्र विशिष्ट विविध धोरणे आखणे, नियामक उपक्रम सुरू करणे, विविध कार्यक्रम आयोजित करणे, प्रोत्साहन योजना आखणे, इत्यादी बाबी वेळोवेळी केल्या आहेत. प्रगत सुविधा आणि किफायतशीर किंमतींसह राज्याने पूर्ण कारखाना सुरू करण्यासाठी तयार (रेडी-टू-मूव्ह-इन-फॅक्टरी) वातावरण देऊ केले आहे. नवीन औद्योगिक घटकांसाठी एकल परवाना प्रणाली अंमलात आणण्यासाठी राज्य सज्ज आहे. कोविड-१९ महामारीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम झाला आहे. या महामारीमुळे बाधित झालेल्या क्षेत्रांना पुन्हा मार्गावर आणण्यासाठी राज्याने लक्ष केंद्रीत केले आहे.

### राज्यातील औद्योगिक परिस्थिती

८.२ महाराष्ट्र हे राज्य एक औद्योगिक केंद्र असून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत राज्याचे मोठे योगदान आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला प्रामुख्याने वस्तुनिर्माण, वित्तीय सेवा, आंतरराष्ट्रीय व्यापार, जनसंपर्क माध्यमे, तंत्रज्ञान, पेट्रोलियम, फॅशन, प्रावर्णे, रत्ने व आभूषणे, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा आणि पर्यटन या क्षेत्रांद्वारे चालना मिळते. राज्यात वाहने (पुणे व औरंगाबाद विभाग), इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन (पुणे विभाग), औषधे व रसायने (मुंबई-ठाणे, औरंगाबाद व पुणे विभाग), अभियांत्रिकी (अहमदनगर-नाशिक, पुणे व औरंगाबाद विभाग), कापड (सोलापूर-पुणे, नागपूर व अमरावती विभाग), खाद्य प्रक्रिया (सोलापूर-पुणे, अहमदनगर-नाशिक, नागपूर व अमरावती विभाग), लॉजिस्टिक (मुंबई-ठाणे आणि नागपूर व अमरावती विभाग), सिमेंट व स्टील उद्योग (विदर्भ-मराठवाडा विभाग) आणि माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा (मुंबई-ठाणे, पुणे, नागपूर व अमरावती विभाग) या उद्योगांसाठी सुविकसित औद्योगिक परिसंस्था आहे. देशातील मोठ्या व विशाल प्रकल्पांपैकी सर्वाधिक प्रकल्प राज्यात आहेत.

८.३ उद्योजकांना एकाच ठिकाणी मंजुरी प्राप्त होण्याच्या उद्देशाने राज्यात यापूर्वीच गुंतवणुकदारांसाठी मैत्री या एक खिडकी सुविधा कक्षाची स्थापना केली आहे. राज्यात सर्वोत्तम औद्योगिक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. राज्यभरात विस्तारलेल्या विविध औद्योगिक वसाहतींमधील औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित आणि सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही जबाबदार संस्था आहे. राज्यात औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' आणि 'मेक इन इंडिया' सारख्या अनेक भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, वेगवेगळ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रोड शोमध्ये देखील राज्य सहभागी होते.

८.४ उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विकास होण्याच्या दृष्टीने, राज्याच्या औद्योगिक धोरण २०१९ मध्ये १४ प्राधान्य क्षेत्रे निश्चित करण्यात आली असून या क्षेत्रांना जमीन वाटप आणि प्रोत्साहने यात प्राधान्य देण्यात येत आहे. भविष्यातील उद्योग ४.० च्या दृष्टीने पायाभूत सुविधा वाढविण्याबाबत राज्याचे नियोजन आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका, सागरमाला, भारतमाला, इत्यादी विशेष प्रकल्पांच्या सभोवताली औद्योगिक वसाहती उभारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा राज्याचा उद्देश आहे. त्याशिवाय, आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन नवीन उद्योजकांना त्यांच्या कल्पनांचे आदान-प्रदान करणारे सुलभ वातावरण निर्माण करुन त्यांना मदत, मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य देणे याद्वारे नाविन्यपूर्ण स्टार्ट-अप्सना देखील राज्य चालना देत आहे. स्थानिक उद्योजकता व रोजगार निर्मितीस चालना देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला सक्षम व प्रोत्साहित करणे हा राज्याचा उद्देश आहे. पर्यावरणावरील प्रतिकूल प्रभाव कमी होण्याच्या दृष्टीने पात्र घटकांना पाणी, उर्जा व पर्यावरण यांचे संवर्धन करण्याची प्रक्रिया हाती घेण्यासाठी हरित औद्योगिकीकरण सहाय्य देण्यात येईल. या धोरणाद्वारे वीज, व्याज आणि अदा केलेल्या राज्य वस्तू व सेवा करांवरील अनुदाने तसेच मुद्रांक शुल्क व वीज शुल्क यावर सूट या स्वरूपात प्रोत्साहने पूर्वीप्रमाणे देण्यात येतील.




## राज्यातील औद्योगिक गुंतवणूक

८.५ उदारिकरणाच्या धोरणापासून (ऑगस्ट, १९९१) ऑक्टोबर, २०२० पर्यंतच्या कालावधीत ₹ १४,२९,१४२ कोटी गुंतवणुकीसह २०,९०९ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले. सन २०२० मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ ३७,८८७ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या २४७ प्रकल्पांची नोंदणी झाली.

८.५.१ मंजूर झालेल्या एकूण औद्योगिक प्रकल्प आणि त्यातील गुंतवणुकीमध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे १८.० टक्के आणि १०.७ टक्के आहे. निवडक राज्यांमधील मंजूर औद्योगिक प्रकल्पांची माहिती तक्ता ८.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१ निवडक राज्यांमधील मंजूर औद्योगिक प्रकल्प@**

(ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर , २०२०)

| तपशील | महाराष्ट्र | गुजरात | तामीळनाडू | आंध्र प्रदेश$ | उत्तर प्रदेश | कर्नाटक | अखिल भारत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प (संख्या) | २०,९०९ (१८.०) | १४,८७९ (१२.८) | ९,८९८ (८.५) | ९,३३६ (८.०) | ८,७११ (७.५) | ६,०२८ (५.२) | १,१६,२५७ (१००.०) |
| गुंतवणूक (₹ कोटी) | १४,२९,१४२ (१०.७) | १९,८८,२९२ (१४.९) | ५,६९,३९१ (४.३) | १०,७८,५३३ (८.१) | ४,०६,२६९ (३.०) | १४,९९,७८९ (११.२) | १,३३,४३,४३८ (१००.०) |

@ आवेदन पत्र/इरादा पत्र/१०० टक्के निर्यातभिमुख प्रस्तावांसह $ तेलंगणासह

टीप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

८.५.२ गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगार निर्मितीच्या उद्देशाने राज्यात जून, २०२० मध्ये मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० कार्यक्रम आयोजित करण्यात आला. देशांतर्गत व जागतिक गुंतवणुकदार अशा दोन्ही गुंतवणूकदारांनी राज्यात गुंतवणूक करण्यासाठी प्रचंड पसंती

दर्शविली आहे. राज्यात ₹ १.१३ लाख कोटी गुंतवणूक व २.५० लाखांपेक्षा जास्त अपेक्षित रोजगार असलेले प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. स्टील उत्पादन (२४ टक्के), माहिती केंद्रे (२३ टक्के), लॉजिस्टिक (२० टक्के), माहिती तंत्रज्ञान (९ टक्के), रसायने व औषधी (५ टक्के) आणि वाहने (४ टक्के) ही गुंतवणूक आकर्षित करणारी प्रमुख क्षेत्रे होती.

## विशाल प्रकल्पांमधील गुंतवणूक

८.६ राज्यात सन २००५ पासून विशाल प्रकल्पांबाबतचे धोरण राबविण्यात येत आहे. राज्यामध्ये डिसेंबर, २०१९ पर्यंत ₹ ४,७९,९५० कोटी गुंतवणुकीच्या व ५.२३ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीच्या ६४३ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. यापैकी नोव्हेंबर, २०२० पर्यंत ₹ १,१३,१३२ कोटी प्रत्यक्ष गुंतवणूकीसह सुमारे १.४७ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीच्या २२० प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

**तक्ता ८.२ प्रकारनिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम**

(ऑक्टोबर , २०१५ ते मार्च, २०२०)

| प्रकार | उद्योग आधार सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या) | रोजगार (लाख) | गुंतवणूक (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| सूक्ष्म | १५,६०,४८१ | ५७.०४ | ६५,४४१ |
| लघु | १,९८,६८३ | २८.१७ | १,२३,११३ |
| मध्यम | ८,१९५ | ५.८० | ४९,९८९ |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक

८.७ ऑक्टोबर, २०१५ पासून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, केंद्र शासन यांच्या मार्फत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना ऑनलाईन प्रक्रीयेने बारा अंकी एकमेव ओळख असणारा उद्योग आधार क्रमांक उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सुलभ प्रक्रियेने नोंदणी झाल्यावर हे उपक्रम कमी दराने व्याज, सुलभ कर्ज, हमी न देता कर्ज, अनुदाने, इत्यादींसारखे शासनाचे सर्व लाभ व योजना मिळविण्यास पात्र ठरतात. मार्च, २०२० पर्यंत, राज्यात एकूण १७.६७ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांनी उद्योग आधारासाठी नोंदणी केली आहे. या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची राज्यात एकूण ₹ २,३८,५४३ कोटी गुंतवणूक असून त्याद्वारे ९१.०१ लाख रोजगार निर्माण झाला. उद्योग आधार असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची प्रकारनिहाय माहिती तक्ता ८.२ मध्ये तर विभागनिहाय माहिती तक्ता ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३ विभागनिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम**

(ऑक्टोबर , २०१५ ते मार्च, २०२०)

| विभाग | उद्योग आधार सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या) | रोजगार (लाख) | गुंतवणूक (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| मुंबई # | ३,६६,४४९ | २१.५५ | ४२,६७४ |
| कोकण (मुंबई वगळून) | ३,८६,२०९ | २०.२४ | ४८,३१७ |
| नाशिक | १,५७,५१५ | ७.५३ | २५,८४५ |
| पुणे | ४,०४,०७८ | २३.५९ | ६९,८५६ |
| औरंगाबाद | १,८१,३५५ | ८.७९ | २५,५०१ |
| अमरावती | ६७,२०६ | २.५४ | ७,६१३ |
| नागपूर | २,०४,५४७ | ६.७८ | १८,७३७ |
| **एकूण** | **१७,६७,३५९** | **९१.०१** | **२,३८,५४३** |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन # शहर व उपनगर यांसह

## थेट विदेशी गुंतवणूक

८.८ थेट विदेशी गुंतवणुकीच्या माध्यमातून औद्योगिक घटकांमध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आले असून घटकांमधील स्पर्धात्मकता वाढविली आहे. तसेच, राज्यातील देशांतर्गत गुंतवणूक सुद्धा वाढली आहे. देशात झालेल्या एकूण थेट विदेशी गुंतवणुकीत राज्याचा हिस्सा सुमारे २८ टक्के आहे. निवडक राज्यांसाठी थेट विदेशी गुंतवणूक तक्ता ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.४ निवडक राज्यांसाठी थेट विदेशी गुंतवणूक**

(₹ कोटी)

| राज्य | २०१९-२० | | २०२०-२१+ | संचित गुंतवणूक (एप्रिल, २००० - सप्टेंबर, २०२०) |
|---|---|---|---|---|
| | एप्रिल - सप्टेंबर | ऑक्टोबर - मार्च | | |
| तेलंगणा | ३,५८२$ | ४,८६५ | ५,०४५ | १,१९,७३४ (४.०) |
| गुजरात | २४,०१२ | १८,९६४ | १,१९,५६६ | २,७९,६९१ (९.५) |
| कर्नाटक | ३२,४३१ | ३०,७४६ | २७,४५८ | ३,१६,१४५ (१०.७) |
| **महाराष्ट्र** | **२५,३१६#** | **५२,०७३** | **२७,१४३** | **८,१८,५२२** (२७.७) |
| तामीळनाडू | ९,३९४ | ७,२३० | ७,०६२ | १,९७,५८२ (६.७) |
| **अखिल भारत** | **३,५३,५५८** | | **२,२४,६१३** | **२९,५७,०५८** |

$ आंध्र प्रदेश सह # दादरा व नगर हवेली आणि दमण व दिव सह + सप्टेंबरपर्यंत

टीप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात

*आधार* : उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग, भारत सरकार

## महाराष्ट्रातून निर्यात

८.९ रस्ते, रेल्वे, हवाई आणि बंदरे यांच्या माध्यमातून हे राज्य चांगले जोडलेले आहे. राज्यातून होणाऱ्या निर्यातीमध्ये रत्ने व आभूषणे, पेट्रोकेमिकल्स, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधी द्रव्ये व औषधी आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू या उत्पादनांचा समावेश आहे. औद्योगिक धोरण, २०१९ नुसार राज्य शासनाने राज्यात निर्यात वाढीसाठी महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद स्थापन केली आहे. महाराष्ट्र आणि देशातून झालेली निर्यात तक्ता ८.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.५ महाराष्ट्र आणि देशातून झालेली निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|
| २०१८-१९ | ५,०८,९७५ | २३,०७,७२६ |
| २०१९-२० | ४,५९,६३७ | २२,१९,८४५ |
| २०२०-२१+ | १,७२,२६२ | ९,३९,९२४ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

## विशेष आर्थिक क्षेत्रे

८.१० थेट विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी राज्याने सन २००१ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र धोरण घोषित केले आहे. ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण २५३ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी ४,५५३ हेक्टर क्षेत्रावर ₹ ५८,५३१ कोटी गुंतवणूक व सुमारे ७.८० लाख रोजगार असलेली ३७ विशेष आर्थिक क्षेत्रे कार्यान्वित झाली. कार्यान्वित विशेष आर्थिक क्षेत्रांची क्षेत्र, रोजगार व गुंतवणूक बाबत माहिती तक्ता ८.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.६ कार्यान्वित विशेष आर्थिक क्षेत्रांची क्षेत्र, रोजगार व गुंतवणूकीचा तपशील**

(ऑक्टोबर , २०२० पर्यंत)

| विभाग | संख्या | क्षेत्र (हेक्टर) | रोजगार (लाख) | गुंतवणूक (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| कोकण | ११ | ७०० | ३.१४ | १२,५४९ |
| पुणे | २० | ७७२ | ३.२५ | ३२,४१५ |
| नाशिक | १ | १,००७ | १.२५ | १,३८० |
| औरंगाबाद | ३ | ३७५ | ०.१६ | ४,४८७ |
| अमरावती | ० | ० | ० | ० |
| नागपूर | २ | १,६९९ | ०.०१ | ७,७०० |
| **महाराष्ट्र** | **३७** | **४,५५३** | **७.८०** | **५८,५३१** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.११ राज्यात माहिती तंत्रज्ञान उद्योगांच्या संतुलित वाढीस चालना देण्यासाठी शासनाने माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा धोरण लागू केले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी विकसित केलेली ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले सुमारे ₹ १८,००० कोटी गुंतवणूक व सुमारे २.६८ लाख रोजगारासह राज्यात कार्यान्वित आहेत.

८.११.१ माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी खाजगी क्षेत्रास सहभागी करून घेण्यात आले आहे. या अंतर्गत एकूण ₹ ९२,४८४ कोटी प्रस्तावित गुंतवणूकीसह ५४६ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली असून, त्यापैकी ₹ २९,७२९ कोटी गुंतवणुकीची व सुमारे ७.७५ लाख रोजगार असलेली १९९ माहिती तंत्रज्ञान संकुले नोव्हेंबर, २०२० पर्यंत कार्यान्वित आहेत. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (१९३), मुंबई शहर व मुंबई उपनगर (१७५), ठाणे (१६४), नागपूर (५), नाशिक (५), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) या जिल्ह्यांमध्ये आहेत.

## जैव-तंत्रज्ञान संकुले

८.१२ राज्याच्या जैव-तंत्रज्ञान धोरणानुसार राज्यात जैव-तंत्रज्ञान घटक स्थापित करणाऱ्या कंपन्यांना विविध आर्थिक प्रोत्साहने व कर सवलती दिल्या जातात. राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात जालना आणि हिंजवडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव-तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. राज्यात सुमारे ₹ ४,९६८ कोटी गुंतवणूक व सुमारे १.७७ लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असलेली पंधरा जैव-तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत. सुमारे ₹ ३०५ कोटी अपेक्षित गुंतवणुकीची सहा खाजगी जैव-तंत्रज्ञान संकुले राज्यात प्रस्तावित आहेत.

८.१२.१ मार्च, २०२० पर्यंत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांतर्गत ₹ २६४ कोटी गुंतवणुकीच्या ६७ घटकांची नोंदणी झाली असून, त्याद्वारे ०.८७ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. मोठ्या उद्योगांतर्गत ₹ १,१२० कोटी गुंतवणूकीची व ०.७१ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित असलेली १६ घटकांची नोंदणी झाली आहे.

## दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका

८.१३ दिल्ली व मुंबई दरम्यानच्या दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका या नियोजित औद्योगिक विकास प्रकल्पाचा उद्देश पायाभूत क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून नवीन औद्योगिक शहरे 'स्मार्ट शहरे' म्हणून विकसित करणे हा आहे. या मार्गिकेत राज्यातील शेंद्रा-बिडकीन आणि दिघी बंदर या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्राला विशाल औद्योगिक समुह (क्लस्टर) आणि दिघी बंदर औद्योगिक क्षेत्रास मुंबई बंदराला पुरक बंदर तसेच व्यापार व औद्योगिक केंद्र बनविणे अशी संकल्पना आहे. या मार्गिकेचा एक भाग म्हणून कामावर चालत जाणे (वॉक-टू-वर्क) या संकल्पनेवर आधारित सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील १०,००० एकर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच स्वच्छ, पुनर्वापर व पुनर्निर्मिती पद्धतींचा अवलंब करण्यात आलेल्या पायाभूत सुविधा आहेत. ऑरिकमध्ये सुमारे २१२ एकर एकूण क्षेत्राची ६२ भूखंड गुंतवणुकदारांना वाटप करण्यात आली आहेत. ऑरिकमध्ये ₹ ५,००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे २,८११ रोजगार निर्मिती झाली आहे.

## औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

८.१४ सूक्ष्म व लघु उद्योग उपक्रमांच्या सर्वांगिण विकासाकरिता शासनाने औद्योगिक समूह विकास कार्यक्रम घोषित केला आहे. या क्षेत्रास कार्यक्षमता व परिणामकारकतेद्वारे समूह व्यूहरचना फायदेशीर ठरते. या कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञान, कौशल्य व दर्जात सुधार, क्षमता वर्धन, पणन सुविधा, भांडवल उपलब्धता, पायाभूत सुविधा निर्मिती/अद्ययावतीकरण करणे, सामाईक सुविधा केंद्रांची उभारणी, इत्यादी बाबी हाताळण्यात येत आहेत. अनुदानाच्या स्वरूपात शासन ७० ते ९० टक्के वित्तीय सहाय्य देते.

८.१४.१ **सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास कार्यक्रम :** केंद्र शासनाने ३० औद्योगिक समूह प्रकल्पांना मान्यता दिली असून, एकूण ₹ १६९.८५ कोटी अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी १७ प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्यामधील उच्च-स्तरीय तंत्रज्ञानावर आधारित सामाईक सुविधा केंद्रांच्या सोयी या समूहामधील घटकांना उपलब्ध आहेत.

८.१४.२ **महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रम :** या कार्यक्रमांतर्गत राज्यातील १७४ समूह प्रकल्पांना शासनामार्फत प्राथमिक मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ७३ समूह प्रकल्पांना सामाईक सुविधा केंद्र उभारणीसाठी मंजुरी देण्यात आली असून, एकूण ₹ १२७.०३ कोटी निधी वितरीत केला आहे.

## व्यवसाय सुधारणा कृती योजना

८.१५ व्यावसायिक सुलभतेसाठी उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग, भारत सरकार यांनी प्रसिद्ध केलेल्या व्यवसाय सुधारणा कृती आराखडा अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या सुधारणांची राज्याने सातत्याने अंमलबजावणी केली आहे. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा २०१९ अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या सुधारणांपैकी जवळपास सर्व सुधारणा राज्याने अंमलात आणल्या आहेत.

## महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सहाय्य कक्ष

८.१६ राज्यात गुंतवणूक व रोजगार वाढीसाठी शासनाने इंटरनेटला जोडलेले एक स्टॉप शॉप महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सहाय्य कक्ष (मैत्री) स्थापन केले आहे. याद्वारे सध्याचा व संभाव्य गुंतवणुकदारांना गुंतवणूक प्रक्रीयेबाबत सर्वसमावेशक माहिती उपलब्ध केली जाते. मैत्रीमार्फत १२ विभागांकडून देण्यात येणाऱ्या एकूण ५३ एकात्मिक सेवा उपलब्ध आहेत. मैत्रीमार्फत डिसेंबर, २०२० पर्यंत १,९३५ तक्रारी हाताळण्यात आल्या असून, १,८७० अडचणींचे निराकरण करण्यात आले. राज्याने ५० कोटी व त्यापेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या औद्योगिक घटकांसाठी महा परवाना ही एकल परवानगी प्रणाली सुरू केली आहे.

## सहकारी औद्योगिक वसाहती

८.१७ शहरी भागांमध्ये एकवटलेले उद्योग ग्रामीण भागांमध्ये विकेंद्रीत करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राबाहेर सहकारी तत्वावर औद्योगिक वसाहती विकसित करण्यास राज्याने प्रोत्साहन दिले. दि.३० ऑक्टोबर, २०२० अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहती नोंदणीकृत असून त्यापैकी १०७ कार्यरत सहकारी वसाहतींमधील ८,०३७ कार्यन्वित घटकांमध्ये सुमारे १.७९ लाख रोजगार आहे.

## सामूहिक प्रोत्साहन योजना

८.१८ औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात नवीन किंवा विस्तारीत उद्योग घटक स्थापन व्हावेत यासाठी राज्य शासन सामूहिक प्रोत्साहन योजना राबवित आहे. सन १९६४ मध्ये योजना सुरू झाल्यापासून सदर योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. 'सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९' अंतर्गत पात्र असलेले खाजगी क्षेत्रातील, राज्य सार्वजनिक/संयुक्त क्षेत्रातील आणि सहकारी क्षेत्रातील उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी विचारात घेतले आहेत. या योजनेअंतर्गत वितरण तक्ता ८.७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.७ सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वितरण**

(₹ कोटी)

| तपशील | वितरण | | |
|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
| **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** | | | |
| विशाल प्रकल्प | २,३०४ | २,७७० | २०३ |
| मोठे उद्योग | ७६ | १४१ | १४ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ३४६ | २५८ | ४७३ |
| **इतर प्रोत्साहने** | | | |
| मोठे उद्योग | १०० | ६० | ६ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | २०९ | १६१ | ५४ |
| **एकूण** | **३,०३५** | **३,३९०** | **७५०** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.१९ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही राज्य शासनाची प्रमुख औद्योगिक पायाभूत विकास संस्था आहे. नियोजित व सुयोग्यरित्या औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे तसेच औद्योगिक क्षेत्रांच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे देशातील सर्व औद्योगिक विकास महामंडळांमध्ये सर्वाधिक औद्योगिक जमिनींची मालकी असलेल्यांपैकी एक आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, सिल्वर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव-तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) व रत्ने ही विशेष संकुले विकसित केली आहेत. दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २८९ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून, त्यापैकी २५३ मोठे औद्योगिक क्षेत्रे, २५ लघु औद्योगिक क्षेत्रे व ११ विकास केंद्रे आहेत.

८.१९.१ प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रांसाठी अनुरूप अशी प्रगत सुविधा आणि किफायतशीर किंमत रचनेसह परिपूर्ण असे कारखाना सुरू करण्यासाठी तयार (रेडी-टू-मूव्ह-फॅक्ट्री) वातावरण उपलब्ध केले आहे. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुमारे ४०,००० एकर जागेचे वाटप करीत आहे जी मुंबई-ठाणे-रायगड (१५,००० एकर),

पुणे-चाकण-तळेगाव-सातारा (८,००० एकर), नाशिक-मालेगाव-अहमदनगर (५,००० एकर), औरंगाबाद (ऑरिक, दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिका)-जालना (८,००० एकर) आणि नागपूर-अमरावती (४,००० एकर) येथे विस्तारली आहे. या व्यतिरिक्त, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योगांची त्वरित स्थापना करण्यासाठी भाडेतत्वावर औद्योगिक शेडसाठी जागा देखील पुरवणार आहे.

८.१९.२ दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत ₹ २,०५,६९७ कोटी गुंतवणूक व १५.४३ लाख रोजगार क्षमता असलेले ५१,६१३ उद्योग घटक आहेत. एकूण ९७,४६२ विकसित भूखंडांपैकी ७०,५८६ भूखंडांचे उद्योजकांना वाटप करण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता ८.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.८ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक**

(३१ डिसेंबर, २०२० रोजी)

| विभाग | घटक (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) | विकसित भूखंड (संख्या) |
|---|---|---|---|---|
| मुंबई | १,०१२ | २०,६८५ | १.३९ | ९,१३१ |
| कोकण (मुंबई वगळून) | १४,०१० | ५९,२४८ | ४.५३ | १३,४४९ |
| नाशिक | ८,६४७ | ९,५१५ | १.१० | ९,२१० |
| पुणे | १३,५८२ | ७८,१६७ | ५.९९ | २७,१५१ |
| औरंगाबाद | ७,९१७ | १२,३५४ | ०.८७ | १९,९५५ |
| अमरावती | २,५९९ | ७,७८४ | ०.४२ | ८,९६८ |
| नागपूर | ३,८४६ | १७,९४४ | १.१३ | ९,५९८ |
| **एकूण** | **५१,६१३** | **२,०५,६९७** | **१५.४३** | **९७,४६२** |

*आधार* : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.२० महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगांचा विकास करण्यासाठी उद्योजकांना सहाय्य करते आणि सल्लामसलत, समुपदेशन, पणन, प्रशिक्षण, आयात-निर्यात, उद्योजकता विकास कार्यक्रम यांसाठी पूरक सेवा पुरवते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.९ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| पणन सहाय्य | १७.१२ | १४.२९ | ६.०० |
| इतर | ३.०५ | २.१८ | ०.४० |
| **एकूण** | **२०.१७** | **१६.४७** | **६.४०** |

*आधार*: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ + डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.२१ राज्यामध्ये खादी व ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तारासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, कारागीर रोजगार हमी योजना, विशेष घटक योजना अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते, ज्यामध्ये कारागिरांना विविध ग्रामोद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. मधमाशी पालन करणाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक मधमाशी पालन, मधमाशी पैदास आणि मध उत्पादन योजना यांची देखील अंमलबजावणी करण्यात येते.

८.२१.१ राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना सन २०१९-२० मध्ये ₹ २०.०२ कोटी अनुदानाच्या स्वरुपात वितरित करण्यात आले आणि सन २०२०-२१ मध्ये जानेवारी पर्यंत ₹ १२.५३ कोटी वितरित करण्यात आले. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१० खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २०१८-१९ | १.६७ | ३,६६० | २.५ |
| २०१९-२० | १.९५ | १,८९० | २.८ |
| २०२०-२१+ | ०.७२ | १,५६९ | १.२ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ + नोव्हेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था

८.२२ राज्याने 'महाराष्ट्र राज्य स्टार्ट अप धोरण, २०१८' तयार केले असून आर्थिक विकास आणि रोजगार निर्मिती करण्याच्या उद्देशाने जैव-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स, स्वच्छ ऊर्जा इत्यादी नव युग क्षेत्रांमध्ये उद्योजकांना नाविन्यपूर्ण उपाय आखण्यास प्रोत्साहित करणे व त्याचबरोबर पारंपरिक क्षेत्रे सुधारित करणे हा हेतू आहे. व्यवसाय इनक्युबेटरचे जाळे तयार करणे, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक विचारांची जोपासना करणे, संबंधित भागधारकांना जोडणे, नियामक वातावरण सुलभ करणे आणि मोक्याची गुंतवणूक करणे हा एक समग्र दृष्टीकोन अवलंबला आहे. 'महाराष्ट्र राज्य स्टार्ट-अप धोरण, २०१८' ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेची प्रमुख संस्था म्हणून नेमणूक केली आहे. राज्यातील स्टार्ट-अप्सची संख्या सप्टेंबर, २०१९ मधील ४,३२३ वरुन डिसेंबर, २०२० मध्ये ७,६०३ झाली आहे. महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने हाती घेतलेले काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेतः

- विविध शासकीय विभागात नाविन्यता आणण्यास मदत करणारा महाराष्ट्र स्टार्ट अप सप्ताह ही स्टार्ट अप्ससाठी राज्यातील प्रमुख स्पर्धा आहे. ही स्पर्धा जून, २०१८, जानेवारी, २०१९ आणि आभासी पद्धतीने ऑगस्ट, २०२० मध्ये आयोजित केली होती ज्यामध्ये ४,१०० स्टार्ट अप्सनी भाग घेतला आणि यातील ७२ स्टार्ट अप्सना कार्यादेश देण्यात आले. ५८ स्टार्ट-अप्ससाठी लाभार्थी विभाग निश्चित गेले असून २१ स्टार्ट-अप्सनी त्यांचे प्रकल्प पूर्ण केले आहेत.
- राज्यभरात १६ व्यवसाय इनक्यूबेटर मंजूर झाले असून त्यापैकी १४ इनक्यूबेटरने कामास सुरूवात केली आहे.
- राज्यातील महिलांमध्ये उद्योजकता आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'हिरकणी महाराष्ट्राची' हा उपक्रम सुरू करण्यात आला आणि या अंतर्गत सन २०१९-२० मध्ये २० जिल्ह्यांत ५,००० हून अधिक स्वसहायता गट / उद्योजकांना लाभ झाला आहे.
- प्रयोगशाळा, संगणक आज्ञावली, पणन उपाय, इत्यादी सारख्या अनेक सामायिक इनक्यूबेटर सेवा सवलतीच्या दरात प्रदान करणारे महाराष्ट्र आभासी (व्हर्च्युअल) इनक्यूबेटर केंद्र, एक आभासी इनक्यूबेटर, विकसित करण्यात येत आहे.
- कोविड-१९ माहामारीला सामोरी जाण्यास सर्जिकल मास्क, व्हेंटीलेटर, पीपीई किट, N९५ मास्क, सॅनिटाईझर, गरम अन्न, बिस्किटाचे पुडे, सॅनिटरी पॅड, किराणा, इत्यादी आवश्यक उपकरणे व अन्नधान्यांच्या खरेदीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी आणि देणगी मिळवण्यास सहाय्य केले.
- कॉन्टॅक्ट ट्रेसिंग आणि विलगीकरणातील व्यक्तीचा मागोवा घेण्यासाठी 'महाकावच', हे डिजिटल प्लॅटफॉर्म, विकसित केले.
- नागरिकांना कोविड -१९ संबंधित लक्षणांसाठी दूरध्वनीवर स्वतःची तपासणी करण्यास मदत करणारी 'कोविड-मदत', ही टेलिमेडिसिन हेल्पलाइन, विकसित केली.

## खनिजे

८.२३ सुमारे ५८ हजार चौ. किमी क्षेत्र (राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के) राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, गोंदिया व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये, तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये कोळसा, चुनखडी, कच्चे मँगनिज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट, इत्यादी प्रमुख खनिजांचे साठे आहेत. राज्यात ३१ मार्च, २०२० अखेर ४१,१४२ रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या १८९ खाणी कार्यरत होत्या. सन २०१९-२० मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ १४,९०५ कोटी होते. सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबर पर्यंत उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ २,९८४ कोटी होते. सर्व खनिजांमध्ये कोळशाचे उत्पादन सर्वाधिक होते. सन २०१९-२० मध्ये सुमारे ७६८.६८ लाख मेट्रीक टन कोळश्याचे उत्खनन झाले असून त्याचे मूल्य ₹ १३,४०१ कोटी (उत्खनन केलेल्या खनिजांच्या एकूण मूल्याच्या ८९.९ टक्के) होते. राज्यातील महत्वाच्या खनिजांचे उत्पादन व मूल्य परिशिष्ट ८.१ मध्ये दिले आहे.

## वस्त्रोद्योग

८.२४ **धोरण :** राज्यात कापूस व रेशीम यांचे विपुल प्रमाणात तर लोकरीचे चांगल्या प्रमाणात उत्पादन होते. त्या व्यतिरिक्त, अपारंपरिक धाग्याचे चांगले स्रोत असलेल्या बांबू, केळी, घायपात, अंबाडी आणि काथ्या यांचे देखिल मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. राज्याने पिकविलेल्या सर्व कापसाची १०० टक्के प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. राज्याने जानेवारी, २०१२ मध्ये घोषित केलेल्या वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ मुळे या क्षेत्रात सुमारे **₹** २०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन सुमारे तीन लाख रोजगार निर्मिती झाली. वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ वस्त्रोद्योगाच्या पुढील पुनरुज्जीवनावर लक्ष केंद्रीत करीत असून या धोरणाचे उद्दिष्ट राज्यातील उत्पादन व प्रक्रिया यांमधील अंतर कमी करणे हे आहे.

८.२४.१ **कापड गिरण्या :** राज्यात ४८.३९ लाख चाती आणि ४३,८६३ रोटर्स स्थापित क्षमता असलेल्या १८८ सूत गिरण्या आणि ३६ संयुक्त कापड गिरण्या आहेत. सन २०१९-२० मध्ये यामधून अंदाजे २८.८० कोटी किलो सूती धागा तयार करण्यात आला. सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर पर्यंत, अंदाजे १४.२० कोटी किलो सूती धागा तयार करण्यात आला. पॉवरटेक्स इंडिया, या यंत्रमाग क्षेत्र विकासाच्या व्यापक योजनेंतर्गत कापडाचे उत्पादन व गुणवत्ता सुधारण्यासाठी २६,२९१ साध्या यंत्रमागांचे रूपांतर निम-स्वयंचलित/शटललेस यंत्रमागांमध्ये केले असून यासाठी सन २०१७-१८ ते २०१९-२० मध्ये केंद्र शासनाकडून **₹** ३०.७१ कोटींचे वित्त सहाय्य देण्यात आले आहे.

८.२४.२ **तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजना :** वस्त्रोद्योगास जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्यासाठी आणि त्याचा भांडवली खर्च कमी व्हावा या करीता नवीन व सुयोग्य तंत्रज्ञान प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाने १९९९ मध्ये तंत्रज्ञान श्रेणीवाढ निधी योजना सुरू केली. वस्त्र उद्योगातील गुंतवणूक, उत्पादकता, गुणवत्ता, रोजगार, निर्यात आणि आयात वाढविण्यासाठी तसेच वस्त्रोद्योग यंत्रांच्या निर्मितीस अप्रत्यक्षरित्या गुंतवणूक व्हावी यासाठी या योजनेत बदल करण्यात आला आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत ३,०२६ वस्त्रोद्योग प्रकल्प दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज अनुदानासाठी तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजनेत अंतर्भूत केले आहेत. या प्रकल्पांपैकी सन २०१८-१९ मध्ये १,३४२ प्रकल्पांना **₹** २३७.८१ कोटी तर सन २०१९-२० मध्ये १,८८१ प्रकल्पांना **₹** ६१.२४ कोटी व्याज व भांडवल अनुदान देण्यात आले आहेत.

८.२४.३ **वस्त्रोद्योग संकुले :** अनेक लघु व मध्यम उद्योगांच्या व्यवसाय वृद्धिसाठी वस्त्रोद्योग संकुले ही व्यासपीठे आहेत. राज्यात हिंगणघाट (वर्धा), बसमत (हिंगोली), लातूर (लातूर), शिरपूर, धुळे व देगाव (धुळे), भिवंडी (ठाणे), बारामती (पुणे), इस्लामपूर (सांगली) आणि इचलकरंजी (कोल्हापूर) येथे एकूण १३ वस्त्रोद्योग संकुले आहेत. राज्यात या १३ वस्त्रोद्योग संकुलांमध्ये २५,५७६ रोजगारासह ६३१ घटक कार्यरत आहेत.

## पर्यटन

८.२५ राज्यात पर्यटन वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असून ते मोठ्या प्रमाणात परकीय चलन निर्माण करण्यासोबतच महत्त्वपूर्ण रोजगार संधी देखिल निर्माण करित आहे. महाराष्ट्र देशातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक असून समुद्र किनारे, वन्यजीवन अभयारण्ये, थंड हवेची ठिकाणे, नैसर्गिक गुंफा, धबधबे, किल्ले, रंगीबेरंगी सण, प्राचीन तीर्थक्षेत्र मंदीरे, संग्रहालये व ऐतिहासिक स्मारके अशा विविध पर्यटनाचा अनुभव देतो. राज्याने नेहमीच विविध राज्यांमधील आणि देशांमधील पर्यटकांना आकर्षित केले आहे. 'दृष्टीक्षेपात भारत पर्यटन सांख्यिकी - २०२०' च्या अहवालानुसार २०१९ मध्ये राज्यात १४.९३ कोटी देशांतर्गत पर्यटकांनी आणि ०.५५ कोटी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या, तर २०१८ मध्ये ११.९२ कोटी देशांतर्गत पर्यटकांनी आणि ०.५१ कोटी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या.

८.२५.१ सन २०२५ पर्यंत राज्याला अग्रगण्य पर्यटनस्थळ बनविणे आणि या उद्योगात दहा लाख अतिरिक्त रोजगार निर्मितीसह **₹** ३०,००० कोटी गुंतवणूक आकर्षित करणे हे महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ चे ध्येय आहे. डिसेंबर, २०२० पर्यंत राज्यात १,४१६ निवास

व न्याहरी उद्योजक आणि १२४ महाभ्रमण उद्योजक होते. सन २०१९-२० मध्ये **₹** १,९७०.२७ कोटी अपेक्षित गुंतवणुकीचे एकूण २१ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी **₹** १,६३८.०३ कोटी अपेक्षित गुंतवणुकीचे १० प्रस्तावांना मंजूरी प्राप्त.

८.२५.२ राज्याने आपले कृषी पर्यटन (पर्यटन धोरण २०१६ मध्ये पूर्वी संकल्पित केलेले) धोरण सप्टेंबर २०२० मध्ये जाहीर केले. कृषी-पर्यटनाद्वारे ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ सुनिश्चित करणे, शेतीशी संबंधित व्यवसायांना प्रोत्साहन देणे, लोककला व परंपरा प्रदर्शित करणे, ग्रामीण महिला व तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि शहरी लोकांना शेतीविषयक कामांची माहिती व अनुभव प्रदान करणे ही या धोरणाची उद्दीष्टे आहेत. वैयक्तिक शेतकरी, कृषी सहकारी संस्था, कृषी संशोधन केंद्रे, कृषी महाविद्यालये व विद्यापीठे आणि शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या कंपन्या / भागीदारी संस्था कृषी-पर्यटन केंद्रे स्थापन करण्यास पात्र आहेत. हे उपक्रम कर्ज आणि इतर कर लाभासाठी पात्र आहेत.

८.२५.३ ऑगस्ट, २०२० मध्ये राज्यात बीच शॅक धोरण जाहीर करण्यात आले असून या माध्यमातून कोकण किनारपट्टीवर तात्पुरते पर्यावरणपुरक आणि सीआरझेडची पुर्तता करणाऱ्या बीच शॅक, आरामखुर्च्या, छत्र्या आणि सार्वजनिक सुविधा केंद्रे सुरू करता येतील. पहिल्या वर्षात या प्रकल्पासाठी पालघर मधील केळवे आणि बोर्डी, रायगड मधील दिवेआगर व वरसोली, रत्नागिरीतील आरे वारे व गुहागर आणि सिंधुदुर्गातील कुंडकेश्वर व तारकर्ली अशा चारही जिल्ह्यांतील दोन लोकप्रिय किनाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

८.२५.४ कोविड-१९ महामारी कालावधीत आदरातिथ्य क्षेत्र सर्वाधिक बाधित झाले आहे. या क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्यासाठी राज्याने या क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. आदरातिथ्य क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी यापूर्वी १२ विभागांकडून सुमारे ७० परवानग्या / मान्यता / परवान्यांची आवश्यकता होती. तथापि, या क्षेत्रावर कोविड-१९ च्या प्राधूरभावामूळे झालेला परिणाम आणि या क्षेत्रातील रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावरील क्षमतेचा विचार करून, शासनाने या परवानग्या / मान्यता / परवान्यांची संख्या कमी करून १५ वर आणली असून त्या सात विभागांकडून प्राप्त होऊ शकतात.

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२६ वार्षिक उद्योग पाहणी (वाउपा) ही औद्योगिक सांख्यिकीचा प्रमुख स्रोत आहे. या पाहणीवरुन नोंदणीकृत वस्तुनिर्माण क्षेत्रातील निविष्टा, स्थिर व खेळते भांडवल, रोजगार, उत्पादन, मुल्यवृद्धि, इत्यादीबाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग-२ एम (i) आणि २ एम (ii) खाली नोंदणी झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंदणी झालेल्या विडी व सिगारेट कारखान्यांचा समावेश आहे.

**आलेख ८.१ : देशाच्या स्थूल मूल्यवृद्धितील हिस्सा २०१७-१८**




८.२६.१ वार्षिक उद्योग पाहणी २०१७-१८ च्या निष्कर्षानुसार देशाच्या स्थूल मूल्यवृद्धित १७.६ टक्के हिश्श्यासह राज्याने आपले सर्वोच्च स्थान आबादित राखले आहे. एकूण कामगार व कामगार वेतन या बाबतीत राज्य दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांचा हिस्सा अनुक्रमे ११.६ टक्के व १४.७ टक्के आहे.

८.२६.२ देशातील एकूण उत्पादन मूल्य, खेळते भांडवल व निव्वळ मूल्यवृद्धि मध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे १४.९ टक्के, १८.२ टक्के व १८.२ टक्के होता. वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांचे निवडक वैशिष्टे तक्ता ८.११ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.११ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांची निवडक वैशिष्टे**

(₹ कोटी)

| वैशिष्टे | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| उद्योग (संख्या) | २८,२१० (१२.१) | २,३३,११६ | २७,०१० (११.५) | २,३४,८६५ | २६,३९३ (११.१) | २,३७,६८४ |
| रोजगार (लाख) | १९.७० (१३.९) | १४२.१० | १९.२६ (१२.९) | १४९.१० | २०.०८ (१२.९) | १५६.१५ |
| स्थिर भांडवल | ३,४६,१७५ (१२.३) | २८,०९,६४७ | ३,३७,९८२ (१०.६) | ३१,९०,३८६ | ३,५८,४४१ (१०.९) | ३२,८५,८८९ |
| खेळते भांडवल | २,३२,३३४ (३१.४) | ७,४०,५२९ | २,०२,५५७ (३०.५) | ६,६३,०८३ | १,१७,१५२ (१८.२) | ६,४४,११९ |
| एकूण उत्पादन | ११,६८,०१७ (१७.०) | ६८,६२,३५४ | १०,७४,९७० (१४.८) | ७२,६५,५१४ | ११,९९,७१८ (१४.९) | ८०,७२,१७३ |
| एकूण निविष्टा | ९,१९,५४० (१६.५) | ५५,८९,०७४ | ८,३२,८१९ (१४.१) | ५८,९७,४६४ | ९,४१,०८७ (१४.२) | ६६,०५,२०२ |
| स्थूल मूल्यवृद्धि | २,४८,४७६ (१९.५) | १२,७३,२८० | २,४२,१५२ (१७.७) | १३,६८,०५० | २,५८,६३१ (१७.६) | १४,६६,९७० |
| निव्वळ मूल्यवृद्धि | २,१७,२५९ (२०.३) | १०,७२,४८५ | २,०८,८०० (१८.२) | ११,४५,९१९ | २,२३,७२४ (१८.२) | १२,२९,६७४ |
| नफा | १,१८,२१२ (२३.०) | ५,१३,१९३ | १,१२,५७६ (२०.९) | ५,३९,३५३ | १,१७,३८० (२०.४) | ५,७६,२४२ |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार — कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात

८.२६.३ सन २०१७-१८ मध्ये एकूण उत्पादन मुल्यामध्ये खाद्य उत्पादने व पेये (१३.५ टक्के), रसायने आणि रासायनिक उत्पादने (१३.० टक्के), कोळसा व शुद्ध पेट्रोलियमची उत्पादने (११.१ टक्के), मोटार वाहने, ट्रेलर्स (१०.२ टक्के), मुलभूत धातू (९.७ टक्के) आणि यंत्र व यंत्र सामग्री, यंत्र व यंत्र सामग्रींची दुरूस्ती व उभारणी (८.५ टक्के) हे प्रमुख उद्योग आहेत. सन २०१७-१८ मध्ये सर्व उद्योग गटांमध्ये या उद्योग गटांचे एकूण उत्पादन मुल्यामधील प्रमाण ६६.१ टक्के आहे, तर स्थिर भांडवलातील हे प्रमाण ६५.९ टक्के आहे. वार्षिक उद्योग पाहणीनुसार राज्यातील उद्योगांबाबतची महत्वाची वैशिष्ट्ये परिशिष्ट ८.२ मध्ये दिली आहेत. वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित महत्वाचे निर्देशक तक्ता ८.१२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.१२ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित महत्त्वाचे निर्देशक**

(₹ लाख)

| निर्देशक | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| **अ) प्रति कारखाना** | | | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | १,२२७ | १,२०५ | १,२५१ | १,३५८ | १,३५८ | १,३८२ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | ४,१४० | २,९४४ | ३,९८० | ३,०९३ | ४,५४६ | ३,३९६ |
| निव्वळ मूल्यवृद्धि | ७७० | ४६० | ७७३ | ४८८ | ८४८ | ५१७ |
| रोजगार (संख्या) | ४९ | ४८ | ५१ | ५० | ५४ | ५१ |
| **ब) प्रति कामगार** | | | | | | |
| निव्वळ मूल्यवृद्धि | १५.८ | ९.६ | १५.३ | ९.८ | १५.८ | १०.१ |
| वार्षिक वेतन | १.८ | १.४ | १.९ | १.५ | २.० | १.६ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

## औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२७ औद्योगिक उत्पादन निर्देशांक पायाभूत वर्षाच्या तुलनेत निश्चित केलेल्या कालावधीत औद्योगिक उत्पादन सुचीतील उत्पादनात अल्प कालावधीतील बदलाचे मापन आहे. यामध्ये अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील उत्पादन कार्यांचा मागोवा घेता येतो आणि म्हणूनच शासनाला धोरण निश्चितीसाठी तसेच विविध संस्थांना देखिल हा निर्देशक अत्यंत उपयुक्त आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करुन जाहीर करते. अखिल भारतीय सरासरी सर्वसाधारण औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२) एप्रिल ते डिसेंबर, २०१९ या कालावधी मधील १२८.८ वरुन एप्रिल ते डिसेंबर, २०२० या कालावधी मध्ये १११.४ झाला. गटनिहाय व वापर-आधारित वर्गनिहाय अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांक तक्ता ८.१३ मध्ये दिले आहेत. अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१३ गटनिहाय व वापर-आधारित वर्गनिहाय अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| बाब | भार | सरासरी औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक (एप्रिल ते डिसेंबर ) | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | टक्केवारी बदल |
| **गटनिहाय** | | | | |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १२८.८ | १११.४ | (-) १३.५ |
| खाणकाम | १४.३७ | १०४.० | ९२.२ | (-) ११.४ |
| वस्तुनिर्माण | ७७.६३ | १३०.२ | ११०.५ | (-) १५.१ |
| वीज | ७.९९ | १६०.५ | १५४.८ | (-) ३.६ |
| **वापर-आधारित वर्ग** | | | | |
| प्राथमिक वस्तू | ३४.०५ | १२५.० | ११२.४ | (-) १०.१ |
| भांडवली वस्तू | ८.२२ | ९४.१ | ६८.२ | (-) २७.६ |
| पूर्ननिर्माण वस्तू | १७.२२ | १३७.१ | ११६.५ | (-) १५.० |
| पायाभूत/ बांधकाम वस्तू | १२.३४ | १३६.६ | ११५.९ | (-) १५.२ |
| टिकाऊ उपभोग्य वस्तू | १२.८४ | १२२.६ | ९२.३ | (-) २४.७ |
| अल्पजीवी उपभोग्य वस्तू | १५.३३ | १४५.५ | १३८.९ | (-) ४.६ |

*आधार* : सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

**आलेख ८.२ : क्षेत्रनिहाय मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक**



# सहकार

८.२८ सहकाराने सामाजिक-आर्थिक विकासात आणि सामाजिक एकात्मिकतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुरुवातीस सहकार चळवळ मुख्यत्वे कृषी पत पुरवठा क्षेत्रापुरती मर्यादित होती, तदनंतर वित्त, कृषी प्रक्रिया, पणन, गृहनिर्माण, दुग्धव्यवसाय, साठवणूक, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय व विविध उद्योग क्षेत्रात विस्तारली गेली.

८.२९ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी सुमारे २.१३ लाख सहकारी संस्था होत्या. त्यांपैकी सुमारे ५२ टक्के या गृहनिर्माण सहकारी संस्था होत्या. सहकारी संस्थांची संक्षिप्त माहिती तक्ता ८.१४ मध्ये दिली आहे व महाराष्ट्रातील सहकारी संस्थाचा तपशील परिशिष्ट ८.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१४ सहकारी संस्थाची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१९ च्या तुलनेत २०२० मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२०* | |
| संस्था (संख्या) | १,९८,२५२ | २,०६,४१४ | २,१२,९५१ | ३.२ |
| सभासद (लाख) | ५५० | ५६६ | ५५६ | (-)१.८ |
| भरणा भाग भांडवल | २१,८११ | २३,५८३ | २२,३५४ | (-)५.२ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ३,८८७ | ३,९५४ | ३,९३१ | (-)०.६ |
| खेळते भांडवल | ३,८४,५०६ | ४,०७,४८१ | ३,९७,४६६ | (-)२.५ |
| ठेवी | १,९४,६६७ | २,१०,९२३ | २,१०,४०४ | (-)०.२ |
| वितरीत कर्ज | १,४४,२६८ | १,५७,३८५ | १,५८,७१७ | ०.८ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ५४,२१० | ५५,९५१ | ५७,६२४ | ३.० |
| नफा | ४,३२६ | ५,५६९ | ४,६०६ | (-)१७.३ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३४,७७७ | ३८,९६१ | ३७,९५२ | (-)२.६ |
| तोटा | ९,०२८ | १०,४६९ | ६,६२१ | (-)३६.८ |
| येणे कर्ज | १,५०,८६९ | १,५८,३१६ | १,६२,९०० | २.९ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख ८.३ : सहकारी संस्था व खेळते भांडवल**




## शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

८.३० राज्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. ही शिखर सहकारी बँक आहे, जिल्हा स्तरावर ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती तक्ता ८.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१९ च्या तुलनेत २०२० मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२० | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | | |
| सभासद (संख्या) | २,००० | २,००० | २,००० | ०.० |
| खेळते भांडवल | २५,०२१ | २७,९४९ | ३३,४५४ | १९.७ |
| ठेवी | १४,१०६ | १५,८४० | २०,८४९ | ३१.६ |
| वितरीत कर्ज | १४,०९४ | २१,६७७ | २५,४८५ | १७.६ |
| येणे कर्ज | १५,९९२ | १९,६०० | २०,८१७ | ६.२ |
| थकीत कर्ज | १,६५० | १,४१६ | १,५६९ | १०.८ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | | |
| सभासद (लाखात) | २.०० | २.०१ | २.०१ | ०.० |
| खेळते भांडवल | १,०४,००६ | १,१३,३०६ | १,१०,५०१ | (-)२.५ |
| ठेवी | ७५,०९१ | ८३,४५८ | ८७,९९८ | ५.४ |
| वितरीत कर्ज | ३६,३२५ | ३७,१७६ | ३९,८६३ | ७.२ |
| येणे कर्ज | ५०,९७८ | ५०,४४२ | ५८,२६६ | १५.५ |
| थकीत कर्ज | १४,४३२ | १३,५७४ | १४,५६७ | ७.३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई.

## प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था

८.३१ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था मुख्यत: अल्प मुदतीसाठी कृषी पतपुरवठा करतात. राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी २०,७४४ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होत्या. यामध्ये २० कृषक सेवा संस्था व ८९३ आदिवासी सहकारी संस्थांचा समावेश असून त्यांची सभासद संख्या अनुक्रमे सुमारे ०.५४ लाख व ६.७९ लाख होती. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थाची माहिती तक्ता ८.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१६ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१९ च्या तुलनेत २०२० मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२०* | |
| संस्था (संख्या) | २१,१०२ | २०,७४७ | २०,७४४ | नगण्य |
| सभासद (लाख) | १५० | १५१ | १४७ | (-)२.६ |
| खेळते भांडवल | २०,७६६ | २०,८३६ | २०,०४३ | (-)३.८ |
| स्वनिधी | ३,८२३ | ४,४५१ | ३,९३६ | (-)११.६ |
| भाग भांडवल | २,४६२ | २,९७७ | २,५७५ | (-)१३.५ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ६.६० | ७.९० | ६.९० | (-)१२.७ |
| कर्जदार सभासद (लाख) | ३१.२६ | २९.८९ | २९.८७ | (-)०.१ |
| *पैकी,* १) अत्यल्प भूधारक (एक हेक्टर पर्यंत) | ९.८५ | १०.५२ | ९.९६ | (-)५.३ |
| २) अल्प भूधारक (एक ते दोन हेक्टर पर्यंत) | ८.३५ | ८.९७ | ८.४७ | (-)५.६ |
| वितरीत कर्ज | १५,६६२ | १३,०९३ | १४,४९५ | १०.७ |
| *पैकी,* अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलेले | ६,४३५ | ६,००६ | ६,३०२ | ४ .९ |
| येणे कर्ज | १३,४०६ | १३,८२३ | १३,३७६ | (-)३.२ |
| कर्ज वसुली | ११,०६१ | १०,६७० | १०,७४८ | ०.७ |
| थकीत कर्ज | ६,२१४ | ६,१४३ | ६,०७४ | (-)१.१ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ८,९३९ | ८,७६० | ८,७३७ | (-)०.३ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ११,८७० | ११,६८५ | ११,७५३ | ०.६ |

आधार : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन        * अस्थायी

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.३२ अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेअंतर्गत प्रत्येक वर्षाच्या ३० जूनपर्यंत नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज सवलत दिली जाते. ₹ एक लाख रकमेपर्यंतच्या कर्जासाठी तीन टक्के आणि ₹ एक लाखापेक्षा जास्त, परंतु ₹ तीन लाखापेक्षा कमी रकमेच्या कर्जासाठी एक टक्का व्याज सवलत दिली जाते. सन २०१८-१९ मध्ये या योजनेअंतर्गत ९.७३ लाख लाभार्थ्यांना ₹ १२०.६४ कोटी व्याज अनुदान देण्यात आले. तर सन २०१९-२० मध्ये या योजनेंतर्गत ४.२६ लाख लाभार्थ्यांना ₹ ५२.८९ कोटी व्याज अनुदान देण्यात आले.

## कृषी प्रक्रिया सहकारी संस्था

८.३३ सहकारी संस्थांना कृषी प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासन अर्थसहाय्य पुरविते. सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग, दुग्ध, मत्स्य व्यवसाय, भात गिरणी, तेल गिरणी आणि इतर प्रक्रिया हे कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचे घटक आहेत. राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी २६,६६१ कृषी प्रक्रिया संस्था कार्यरत असून त्यांची सभासद संख्या अंदाजे ६२ लाख आहे.

८.३३.१ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी १७५ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने होते. देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३३ टक्के कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २१ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. देशातील एकूण साखर उत्पादनात राज्याचा हिस्सा २९ टक्के आणि उत्तर प्रदेश राज्याचा वाटा ४६ टक्के आहे. सहकारी साखर कारखान्यांची माहिती तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ सहकारी साखर कारखान्यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१९च्या तुलनेत २०२० मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२० | |
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | १७८ | १७५ | १७५ | ०.० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | १०१ | १०२ | ७९ | (-)२२.५ |
| सभासद ('००) | २७,६३३ | २५,४७० | २२,००० | (-)१३.६ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल | १,२९९ | १,३०५ | १,३०५ | ०.० |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता # ( लाख मे. टन) | ३.८५ | ४.०२ | ३.२१ | (-)२०.१ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) | ५७३.३५ | ५५७.५५ | ३३६.४७ | (-)३९.७ |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) | ६५.६९ | ६४.०६ | ३९.०५ | (-)३९.० |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.४६ | ११.४९ | ११.६१ | १.० |
| उसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन ) | | | | |
| अ) खरेदी (रास्त व किफायतशीर दर) | २,५५० | २,४७७ | २,५६६ | ३.६ |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,८६९ | १,९७६ | २,१६० | ९.३ |
| मळी (लाख मे. टन) | २२.९१ | २२.३० | १३.४७ | (-)३९.६ |
| कारखान्यांची संख्या | | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६९ | ६८ | ६८ | ०.० |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ५९ | ६० | ६० | ०.० |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | १,२११.९० | १,२३७.९० | १,२३७.९० | ०.० |
| नफ्यातील कारखाने (संख्या) | २९ | ३० | २* | (-)९३.३ |
| नफा | १८८.५१ | ३९९.६५ | ६०.८७* | (-)८४.८ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ८० | ५९ | ५* | (-)९१.५ |
| तोटा | ४,१७५.५१ | २,४७४.७२ | २११.७८* | (-)९१.४ |

*आधार* : साखर आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन   # प्रतिदिन गाळप क्षमता   * अस्थायी

## सहकारी दुग्ध संस्था

८.३३.२ राज्यात ३१ मार्च, २०२० अखेर १२,७८१ सहकारी दुग्ध संस्था व ७८ सहकारी दुग्ध संघ होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१८ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | | सहकारी दुग्ध संघ | | |
| | २०१९ | २०२०* | शेकडा बदल | २०१९ | २०२०* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | १२,९३२ | १२,७८१ | (-)१.२ | ७५ | ७८ | ४.० |
| सभासद (लाख) | ११.६८ | ११.९२ | २.१ | १.०७ | १.३२ | २३.४ |
| भाग भांडवल | १२.४५ | १२.६४ | १.५ | ८१.९० | ८२.०३ | ०.२ |
| खेळते भांडवल | २७.५१ | २७.८२ | १.१ | ८९.६४ | ८९.७५ | ०.१ |
| दूध खरेदी (किंमत) | ३०१.२५ | ३०७.४७ | २.१ | ९८२.३० | ९८३.१५ | ०.१ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | ४४२.५९ | ४५३.७८ | २.५ | १,२३५.६३ | १,२४१.०१ | ०.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ७,६११ | ७,७२४ | १.५ | ५८ | ६० | ३.४ |
| नफा | १५९.४६ | १६३.९८ | २.८ | १०१.९२ | ११०.५३ | ८.४ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,३१९ | ५,०५६ | (-)४.९ | १७ | १८ | ५.९ |
| तोटा | ६९.८३ | ६८.७२ | (-)१.६ | ४९.३७ | ४८.८५ | (-)१.१ |

*आधार* : आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३३.३ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या ७८ सहकारी संस्था होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

८.३३.४ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी २९१ सहकारी सूत गिरण्या होत्या व त्यापैकी ६९ सूत गिरण्या कार्यरत होत्या. कार्यरत असलेल्या सुमारे २० टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. सहकारी सूत गिरण्यांची माहिती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०* | |
| संस्था (संख्या) | ८० | ७८ | (-)२.५ |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ७३ | ७१ | (-)२.७ |
| सभासद ('००) | ९९३ | ८७० | (-)१२.३ |
| भाग भांडवल | ७.५० | ७.३२ | (-)२.४ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.८९ | १.७८ | (-)५.८ |
| खेळते भांडवल | ६६.२० | ५१.७९ | (-)२१.८ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | २८.३६ | ३२.९० | १६.० |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४१ | ३८ | (-)७.३ |
| तोटा | १.७८ | १.६० | (-)१०.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन * अस्थायी

**तक्ता ८.२० सहकारी सूत गिरण्यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०* | |
| गिरण्यांची संख्या | २८७ | २९१ | १.४ |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६९ | ६९ | ०.० |
| सभासद ('००) | ४,९९६ | ५,००८ | ०.२ |
| भाग भांडवल | २,१९०.८३ | २,१९४.५८ | ०.२ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १,९१५.४५ | १,९५३.१५ | २.० |
| खेळते भांडवल | ९,१३७.६६ | ९,१४०.०४ | नगण्य |
| चात्यांची संख्या (लाख) | १५.४० | १५.६० | १.३ |
| उत्पादित सूताचे मूल्य | २,८७५.०८ | २,४४१.४० | (-)१५.१ |
| नफ्यातील गिरण्या (संख्या) | ४ | ० | (-)१००.० |
| नफा | ८.३६ | ० | (-)१००.० |
| तोट्यातील गिरण्या(संख्या) | ६५ | १४ | (-)७८.५ |
| तोटा | २,१०१.१४ | ३१२.७४ | (-)८५.१ |

*आधार* : आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय , महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.३३.५ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी ६४४ सहकारी हातमाग व १,६०६ सहकारी यंत्रमाग संस्था होत्या. सुमारे ६६ टक्के सहकारी हातमाग व ९१ टक्के सहकारी यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची माहिती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२१ सहकारी हातमाग व सहकारी यंत्रमाग संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | | यंत्रमाग | | |
| | २०१९ | २०२०* | शेकडा बदल | २०१९ | २०२०* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | ६४४ | ६४४ | ०.० | १,६०४ | १,६०६ | ०.१ |
| सभासद ('००) | ५९९.७८ | ५९६.६६ | (-)०.५ | ८०७.४१ | ७९९.५२ | (-)१.० |
| भाग भांडवल | ८.१३ | ८.१३ | ०.० | १९९.११ | १६८.७९ | (-)१५.२ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.७२ | १.७२ | ०.० | १४०.५९ | १४७.८७ | ५.२ |
| खेळते भांडवल | ८.६७ | ९.०७ | ४.६ | १,२८३.८६ | १,२७९.९८ | (-)०.३ |
| मागांची संख्या ('०००) | ३.८१ | ३.८१ | ०.० | १४.३७ | १४.४० | ०.२ |
| उत्पादन मूल्य | ३६.७१ | ३८.२६ | ४.२ | ८७.०९ | ८६.९९ | (-)०.१ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | २३८ | २३९ | ०.४ | १५४ | १५० | (-)२.६ |
| नफा | २.१९ | २.०८ | (-)५.० | २.६९ | ३.३१ | २३.१ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४०६ | ४२७ | ५.२ | १,४५० | १,४५६ | ०.४ |
| तोटा | ६.५७ | ६.९५ | ५.८ | १७.४८ | १९.११ | ९.३ |

*आधार :* आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय , महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मच्छिमारी सहकारी संस्था

८.३४ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी ३,२५५ प्राथमिक मच्छिमारी सहकारी संस्था कार्यरत होत्या. याशिवाय ४० मच्छिमारी सहकारी संघ आणि एक सहकारी महासंघ होते. मच्छिमारी सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ मच्छिमारी सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२० | |
| संस्था (संख्या) | ३,१३३ | ३,२५५ | ३.९ |
| सभासद (लाख) | ३.२३ | ३.२८ | १.६ |
| भाग भांडवल | ६९.९० | ७०.१३ | ०.३ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ५५.६७ | ५५.६७ | ०.० |
| खेळते भांडवल | २५१.४० | २५२.३२ | ०.४ |
| मासे व मत्स्य उत्पादन विक्री | ७११.३९ | ७३५.२२ | ३.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | २,०१९ | २,०५२ | १.६ |
| नफा | १४.८९ | १५.६२ | ४.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ९९२ | १,२०३ | २१.३ |
| तोटा | ४७.९० | ५८.१३ | २१.४ |

*आधार :* आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## सहकारी पणन संस्था

८.३५ सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. सहकारी पणन संस्थांची माहिती तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ सहकारी पणन संस्था**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०* | बदल |
| संस्था (संख्या) | १,२६४ | १,३४५ | ६.४ |
| सभासद (लाख) | १०.१८ | १०.२५ | ०.७ |
| भाग भांडवल | ९०.०० | ९३.०० | ३.३ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २२.७३ | २४.८८ | ९.५ |
| खेळते भांडवल | १,५९० | १,६१७ | १.७ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | ४,५५६ | ३,२५९ | (-)२८.५ |
| (ब) खते | ७५२ | ६६७ | (-)११.३ |
| (क) बियाणे | ८१ | ७६ | (-)६.२ |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | ३७२ | ३४४ | (-)७.५ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ६२४ | ७०९ | १३.६ |
| नफा | २४.४४ | ३२.०९ | ३१.३ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५६३ | ४९४ | (-)१२.३ |
| तोटा | ९९.०० | ८७.०० | (-)१२.१ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

८.३६ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी २०,८६३ बिगर कृषी पतसंस्था असून त्यांपैकी १३,७७९ नागरी सहकारी पतसंस्था, ६,६१३ पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था व ४७१ नागरी सहकारी बँका होत्या. सुमारे २३.५ टक्के बिगर कृषी सहकारी पतसंस्था तोट्यात होत्या आणि १५.७ टक्के नागरी सहकारी बँका अवसायनात आहेत. बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची माहिती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२४ बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०* | बदल |
| संस्था (संख्या) | २०,६६३ | २०,८६३ | १.० |
| सभासद (लाख) | २७६.३२ | २६६.०० | (-)३.७ |
| ठेवी | १,०९,७०३ | ९९,४७३ | (-)९.३ |
| स्वनिधी | २५,३१७ | २३,७१३ | (-)६.३ |
| भाग भांडवल | १०,५६७ | ९,४४१ | (-)१०.७ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.१२ | १.१२ | ०.० |
| खेळते भांडवल | १,९३,४९१ | १,८०,७२१ | (-)६.६ |
| वितरीत कर्जे | ८१,६६९ | ७५,७१५ | (-)७.३ |
| येणे कर्ज | ६९,८५५ | ६६,८२० | (-)४.३ |
| कर्जे वसुली | ६०,९६१ | ५९,०५१ | (-)३.१ |
| थकीत कर्जे | ९,६३५ | ९,०२२ | (-)६.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १५,२०९ | १५,३०४ | ०.६ |
| नफा | ३,२१२ | २,६४९ | (-)१७.५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४,९१० | ४,९१० | ०.० |
| तोटा | २,३९१ | १,९७७ | (-)१७.३ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन * अस्थायी

## इतर सहकारी संस्था

८.३७ राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी १,११,५५५ सहकारी गृहनिर्माण संस्था असून त्यांची सभासद संख्या सुमारे ३२.०० लाख होती. तसेच १०,८४५ मजूर कंत्राट सहकारी संस्था असून सभासद संख्या सुमारे ५.४० लाख होती. एकूण २७० जंगल कामगार सहकारी संस्था असून सभासद संख्या सुमारे ७१,००० होती.

## महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

८.३८ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित यांची माहिती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित संस्थेची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२० | |
| सभासद (संख्या) | १०,२८७ | १०,२५१ | (-)०.३ |
| खेळते भांडवल | ८३.५५ | ८७.९१ | ५.२ |
| वितरीत कर्ज | ६४४ | ६४४ | ०.० |
| येणे कर्ज | ४७.८५ | ४६.४८ | (-)२.९ |
| कर्ज वसुली | ५.०७ | ३.९० | (-)२३.१ |
| थकीत कर्ज | १८.६२ | १८.५० | (-)०.६ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

## सहकारी ग्राहक संस्था

८.३९ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यांवर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरित करतात.

राज्यात ३१ मार्च, २०२० रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १२७ घाऊक ग्राहक भांडारे व १,६०१ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी ग्राहक महासंघ | | घाऊक सहकारी ग्राहक भांडार | | प्राथमिक सहकारी ग्राहक भांडार | |
| | २०१९ | २०२०* | २०१९ | २०२०* | २०१९ | २०२०* |
| संख्या | १ | १ | १२५ | १२७ | १,६०३ | १,६०१ |
| सभासद ('००) | ६.७३ | ६.८५ | ३,१७० | ३,२३६ | १२,११९ | ११,६११ |
| भाग भांडवल | ०.५१ | ०.५१ | २०.३१ | १९.०३ | ७६.७२ | ७०.७२ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | - | - | ३.३२ | ३.१५ | ३.८५ | ३.०६ |
| नफ्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | १ | १ | ८१ | ७३ | ९५३ | ९४९ |
| नफा | १.४५ | ६.१० | १३.८८ | १३.०८ | ४०.८८ | ३८.९६ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | ० | ० | ४४ | ५४ | ६४१ | ६४९ |
| तोटा | ० | ० | २.७२ | २.७९ | १४.६२ | १२.५६ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक संघ लि. * अस्थायी

## परवानाधारक सावकार

८.४० कृषी व बिगर कृषी पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त परवानाधारक सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. यासाठी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत परवाने दिले जातात. परवानाधारक सावकारांची माहिती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ परवानाधारक सावकारांची माहिती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१९ | २०२०* | |
| सावकार | १२,७५४ | १२,९६३ | १.६ |
| कर्जदारांची संख्या | ६,४९,५३७ | ६,२३,४१८ | (-)४.० |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | १,२३७.४० | १,२३५.३८ | (-)०.२ |

* अस्थायी

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

* * * * *

# परिशिष्ट ८.१

## राज्यातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन: '००० टनात)
(मूल्य: ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन / मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | १२४ |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ७६,८६८ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | १३,४०,०६८ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६० | -- | -- |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | -- |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,०७९ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | १६,४२६ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १४,५४८ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | ४१,४९५ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | ७१७ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | ८४,८७३ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२० | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | ६९० |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | ६,३०६ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | -- |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | -- |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | -- |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | -- |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | १ |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | ८८ |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | -- |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | -- |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२० | ३ | ३ |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | ११९ |
| १४ | इतर$$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | ५९४ |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | १,१५० |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ सॅन्ड स्टोविंग व सिलीमानाईट हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

# परिशिष्ट ८.२

## राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी
## (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत)

(₹ कोटी)

| कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) कापूस पिंजणी, सफाई | २०१६-१७ | ७०५ | १,४०६ | ३,०१० | १०९ | १९,२१९ | १३,९८२ | १७,५६४ | १,५११ |
| इत्यादी (०१) | २०१७-१८ | ५६८ | १,१५३ | ३,२६१ | ८२ | १८,०७० | १३,६८३ | १७,१९८ | ७७१ |
| (२) मीठ उत्पादन (०८) | २०१६-१७ | ३७ | १ | २ | १ | ३ | अल्प | १ | २ |
| | २०१७-१८ | ३० | १ | १ | २ | ५ | अल्प | ३ | २ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१६-१७ | २,८०८ | ४०,८०१ | १०,१०४ | २,४०८ | १,२६,९२५ | ८३,८२६ | १,०५,९८० | १७,८३६ |
| | २०१७-१८ | २,७६२ | ४९,३६० | (-)२४५ | २,८८३ | १,६१,८०७ | १,१०,५२९ | १,३७,८०६ | २०,६०७ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१६-१७ | ९२ | २,२४४ | ८६२ | १७९ | ४,३०० | १,३८७ | १,५९१ | २,५७५ |
| | २०१७-१८ | ८१ | १,२३७ | ६६५ | १८९ | ३,३५० | १,२३९ | १,४३२ | १,७९३ |
| (५) वस्त्रे (१३) | २०१६-१७ | १,८२१ | १५,३९८ | २,२०७ | १,८७६ | ४१,०४३ | २२,४४५ | ३२,८२७ | ६,६८४ |
| | २०१७-१८ | १,७९२ | १५,०१९ | १,५३५ | २,००७ | ३८,३१५ | २०,६४८ | ३१,०६५ | ५,७१८ |
| (६) वस्त्र प्रावरणे (१४) | २०१६-१७ | १,०३८ | १,९५६ | १,३३० | ४२१ | ७,२७५ | २,५६३ | ५,६३४ | १,४६८ |
| | २०१७-१८ | १,०१७ | २,१२९ | २,१८६ | ६५७ | १०,६४२ | ५,०५८ | ८,१३५ | २,२८२ |
| (७) चामडे व त्यासंबंधित | २०१६-१७ | १२३ | १९२ | २५४ | ६६ | १,०३६ | ५६० | ७९२ | २२२ |
| उत्पादने (१५) | २०१७-१८ | ११८ | १६२ | २१८ | ५२ | ८९० | ४६९ | ६५५ | २१८ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने | २०१६-१७ | २२८ | ३९९ | १३१ | ३७ | १,०९९ | ७०९ | ८९४ | १७३ |
| आणि बूच (फर्निचर वगळून) (१६) | २०१७-१८ | २२२ | ३८८ | ३०१ | ५५ | १,६८३ | १,१७२ | १,३९६ | २५८ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१६-१७ | ८५१ | ८,६०० | १,४०५ | ४०४ | १४,९३४ | ८,३९२ | १२,३८१ | १,९८३ |
| | २०१७-१८ | ८८३ | ८,१७९ | १,१६२ | ४२१ | १७,५९३ | १०,३४८ | १३,०४४ | ३,९२८ |
| (१०) छपाई व मुद्रित माध्यमांचे | २०१६-१७ | ८६४ | ४,३९८ | (-)३८५ | ३९० | ८,८६३ | ३,९०२ | ६,२३१ | २,२१३ |
| पुनरुत्पादन (१८) | २०१७-१८ | ८३९ | ३,५११ | ३५७ | ४१० | ९,६३४ | ४,१८० | ६,७९३ | २,३६६ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम | २०१६-१७ | १८६ | १७,९०८ | (-)१२,६३४ | ६६५ | १,२४,६१६ | ७२,७६३ | ७७,४५९ | ४५,७२७ |
| यांची उत्पादने (१९) | २०१७-१८ | १६२ | १६,३०४ | ३,५८३ | ६१० | १,३३,७१५ | ७८,६८१ | ८५,०६१ | ४७,४११ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने, | २०१६-१७ | २,६२२ | ४७,५२७ | २३,२६९ | ३,२१५ | १,४१,२०४ | ७१,६०५ | १,०२,२७० | ३४,५९९ |
| औषध, वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने (२०,२१) | २०१७-१८ | २,५३४ | ५४,६२६ | २९,१८३ | ३,५३६ | १,५६,२१७ | ८२,८१८ | १,१५,८०४ | ३५,५६८ |
| (१३) रबर आणि प्लास्टिक उत्पादने (२२) | २०१६-१७ | १,७४५ | १७,७४६ | १९,८२९ | १,७४७ | ५०,६५१ | ३०,१७३ | ३९,११८ | ९,९४२ |
| | २०१७-१८ | १,७६२ | १७,६१९ | १५,०१५ | १,४७२ | ४६,३३५ | २७,४४१ | ३६,०११ | ८,३६५ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१६-१७ | ९१५ | १०,४३३ | १,००,३७९ | ६८५ | २१,१६२ | ७,५०० | १४,६२८ | ५,४८६ |
| | २०१७-१८ | ८९१ | ९,३४७ | १,९७४ | ५१३ | १७,४२८ | ७,४७१ | १२,९२१ | ३,७७४ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१६-१७ | १,२८५ | ४७,३९६ | (-)१७३ | १,८२५ | १,०८,६५३ | ७०,२६७ | ९५,८९६ | ९,४६७ |
| | २०१७-१८ | १,३४५ | ४९,५७७ | ९६४ | १,९३६ | १,१६,१९१ | ७८,९२५ | १,००,३९९ | १२,३८३ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ८.२ (समाप्त)

| | कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१६) | धातूच्या वस्तूंची उत्पादने | २०१६-१७ | ३,४५० | १३,९६१ | ४,९६९ | १,८२२ | ४३,०७१ | २४,७३८ | ३३,११२ | ८,५६३ |
| | यंत्रे व यंत्रसामग्री वगळून (२५) | २०१७-१८ | ३,२३४ | १५,४२० | ५,७२८ | १,८८७ | ५३,५८७ | ३२,३९८ | ४२,३४९ | ९,५४४ |
| (१७) | संगणक, विद्युत आणि | २०१६-१७ | ४३१ | ३,२०९ | ५,६३९ | ४८८ | १९,९७५ | ११,६२३ | १५,४२८ | ४,१४३ |
| | ऑप्टीकल उत्पादने (२६) | २०१७-१८ | ४३४ | ४,४७५ | ४,३३६ | ५३० | २०,३२१ | १२,५७५ | १६,२४७ | ३,५४६ |
| (१८) | विद्युत सामग्री (२७) | २०१६-१७ | १,४३२ | ११,०९५ | ८,४२८ | १,२९४ | ५५,८०७ | ३२,९९८ | ४२,७५६ | ११,६६१ |
| | | २०१७-१८ | १,२५३ | १०,३५८ | ७,५९८ | १,३२५ | ४८,३६९ | ३०,६८६ | ३८,१९२ | ९,०२५ |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री (इतरत्र वर्गीकृत नसलेले), यंत्र व | २०१६-१७ | २,१५० | २५,७०८ | १३,१४७ | २,६६० | ७३,३१६ | ३९,३८५ | ५४,५७८ | १५,८८६ |
| | यंत्रसामग्रीची दुरुस्ती आणि उभारणी (२८,३३) | २०१७-१८ | २,२६० | २६,२१० | १६,६८४ | ३,१४७ | १,०२,१९४ | ५४,७३१ | ७४,९३० | २४,२४८ |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स व | २०१६-१७ | १,४०४ | ३८,३७१ | ३,५४१ | ३,१८८ | १,१७,१०३ | ७१,२२९ | ९६,६५१ | १५,९७६ |
| | निम ट्रेलर्स (२९) | २०१७-१८ | १,३९६ | ४०,२९० | ५,१४५ | ३,९०४ | १,२२,८६३ | ८४,८९३ | १,०२,४६२ | १४,५०१ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०१६-१७ | ३५१ | ८,०३० | ७२९ | ८६० | ३२,८६१ | २०,८५६ | २४,३७१ | ७,५९२ |
| | | २०१७-१८ | ३३८ | ७,९६५ | १,२७६ | ९६८ | ४१,०३२ | २७,८२७ | ३२,४६४ | ७,५२२ |
| (२२) | फर्निचर उत्पादने व इतर | २०१६-१७ | १,२५१ | ४,५६१ | १५,०८९ | ९५४ | ३७,१६९ | २६,२३४ | ३१,५१६ | ५,१३६ |
| | वस्तुनिर्माण (३१,३२) | २०१७-१८ | १,२०० | ४,५११ | १६,७७० | १,०३२ | ४९,१५१ | ३१,४९९ | ४३,००३ | ५,६५७ |
| (२३) | इतर (टाकाऊ वस्तुंचे संचयन, प्रक्रिया व विल्हेवाट संबंधी | २०१६-१७ | १,२२१ | १६,६४२ | १,४२५ | ५४० | २४,६८६ | ४,३४३ | २१,१४० | (-)४६ |
| | कार्य, वस्तुंचा पुनर्वापर, प्रकाशन कार्य, इतर उद्योग) (३८,५८, इतर) | २०१७-१८ | १,२७१ | २०,६०२ | (-)५४४ | ७४६ | ३०,३२६ | ७,४२८ | २३,७१८ | ४,२३५ |
| | **एकूण** | **२०१६-१७** | **२७,०१०** | **३,३७,९८२** | **२,०२,५५७** | **२५,८३५** | **१०,७४,९७०** | **६,२१,४८०** | **८,३२,८१९** | **२,०८,८००** |
| | | **२०१७-१८** | **२६,३९३** | **३,५८,४४१** | **१,१७,१५२** | **२८,३६५** | **११,९९,७१८** | **७,२४,६९९** | **९,४१,०८७** | **२,२३,७२४** |

*आधार -* वार्षिक उद्योग पाहणी, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

## परिशिष्ट ८.३
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| अ.क्र. | बाब | भार | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१++ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **११४.७** | **१२०.०** | **१२५.३** | **१३०.१** | **१२९.०** | **१११.४** |
| **II** | **खाणकाम** | **१४.३७** | **९७.३** | **१०२.५** | **१०४.९** | **१०७.९** | **१०९.६** | **९२.२** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७७.६३** | **११५.९** | **१२१.०** | **१२६.६** | **१३१.५** | **१२९.६** | **११०.५** |
| | **उद्योग गट** | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने | ५.३० | १०४.७ | ९८.९ | १०८.१ | १२१.३ | १२३.७ | ११३.५ |
| २ | पेय | १.०४ | १०९.७ | १०६.३ | १०५.४ | १०९.२ | १०६.४ | ७१.४ |
| ३ | तंबाखू उत्पादने | ०.८० | १३६.३ | ११५.९ | ९५.१ | ९४.२ | ९५.४ | ७६.२ |
| ४ | कापड उत्पादने | ३.२९ | ११९.४ | ११७.४ | ११७.१ | ११८.७ | ११५.७ | ८२.५ |
| ५ | वस्त्रप्रावरणे | १.३२ | १३१.० | १५१.७ | १३७.५ | १५४.२ | १५४.६ | ९८.३ |
| ६ | चामडे व संबंधित उत्पादने | ०.५० | १२३.६ | १२२.३ | १२३.९ | १२५.० | १२२.७ | ९२.९ |
| ७ | लाकुड व लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वगळता), काड्यापासून बनविलेल्या व मुलामा दिलेल्या वस्तु | ०.१९ | ९७.५ | ९३.१ | ९२.४ | १०५.१ | ११३.८ | ८२.७ |
| ८ | कागद आणि कागदाची उत्पादने | ०.८७ | ११६.५ | ११४.० | १०८.९ | १०४.१ | ९०.८ | ६५.२ |
| ९ | छपाई व मुद्रित माध्यमांचे पुनरुत्पादन | ०.६८ | १०३.८ | १०६.० | ९९.७ | ९७.६ | ९०.७ | ६२.५ |
| १० | कोळसा आणि शुध्द पेट्रोलियम उत्पादने | ११.७७ | ११३.७ | ११९.१ | १२३.५ | १२६.७ | १२६.७ | १०६.७ |
| ११ | रसायने व रासायनिक उत्पादने | ७.८७ | ११३.७ | ११६.५ | ११६.१ | ११९.० | ११८.५ | ११२.६ |
| १२ | औषध,वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने | ४.९८ | १३२.१ | १७२.३ | २१२.१ | २१५.५ | २१५.२ | २१८.७ |
| १३ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.४२ | ११८.३ | १२०.५ | ११०.६ | १०८.० | १००.० | ९१.६ |
| १४ | इतर अधातू खनिज उत्पादने | ४.०९ | ११०.४ | १०९.९ | ११३.९ | १२३.६ | १२१.३ | ९७.१ |
| १५ | मूलभूत धातू | १२.८० | १२४.३ | १३०.६ | १३८.० | १४३.३ | १५९.१ | १४०.३ |
| १६ | धातूंच्या वस्तुंची उत्पादने (यंत्र व सामग्री वगळून) | २.६५ | १०३.४ | १०५.५ | १०७.९ | १०६.२ | ९०.६ | ७२.२ |
| १७ | संगणक, विद्युत आणि ऑप्टिकल उत्पादने | १.५७ | १२३.६ | १२६.७ | १४८.५ | १६८.७ | १५१.० | ११६.९ |
| १८ | विद्युत सामग्री | ३.०० | १२८.४ | १२२.६ | १०७.४ | ११०.१ | १०५.२ | ८६.६ |
| १९ | यंत्रे व यंत्रसामग्री , इतरत्र वर्गीकृत नसलेले | ४.७७ | १०५.९ | ११४.१ | १२०.५ | १२३.४ | १०७.७ | ८२.८ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स आणि निमट्रेलर्स | ४.८६ | १०१.१ | १०१.७ | ११४.५ | १२२.७ | १००.२ | ७१.४ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.७८ | ११२.५ | ११७.५ | १३३.९ | १४५.७ | १३६.६ | १०३.१ |
| २२ | फर्निचर | ०.१३ | १६३.९ | १७६.२ | १९६.६ | २१२.६ | १९७.३ | १३४.३ |
| २३ | इतर वस्तुनिर्माण | ०.९४ | ११९.९ | १२५.६ | १०६.२ | ९२.८ | ८१.२ | ५४.३ |
| **IV** | **वीज** | **७.९९** | **१३३.८** | **१४१.६** | **१४९.२** | **१५६.९** | **१५८.४** | **१५४.८** |

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    ++ एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२० ची सरासरी

## परिशिष्ट ८.४

## राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०[*] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३३ | ३३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०[$] | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,१०२ | २०,७४७ | २०,७४४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २०,६६८ | २०,६६३ | २०,८६३ |
| (४) पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,२२१ | १,२६४ | १,३४५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम[@] | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | २५,६३४ | २५,८०५ | २६,६६१ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था[@] | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,२९,५९३ | १,३७,९०२ | १,४३,३०५ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,३०६** | **१,९८,२५२** | **२,०६,४१४** | **२,१२,९५१** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था[$$] | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | २१३ | २१३ | २१३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,०१० | १५,०७७ | १४,६८३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २६,०९७ | २७,६३२ | २६,६०० |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | ९६२ | १,०१८ | १,०२५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ६,२४४ | ६,२७० | ६,२१५ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ६,४९२ | ६,४१२ | ६,८२८ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५५,०१८** | **५६,६२४** | **५५,५६४** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,३१,२०० | १,४१,३३८ | १,४४,०४३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | २०,७६६ | २०,८३६ | २०,०४३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | १,७७,५३३ | १,९३,४९१ | १,८०,७२१ |
| (४) पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | २,५४३ | १,५१० | १,६१७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ४४,६३२ | ४२,४५६ | ४२,४४३ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ७,८३१ | ७,७७१ | ८,५९९ |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **३,८४,५०६** | **४,०७,४८१** | **३,९७,४६६** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ५१,०६३ | ५९,४९७ | ६५,९९२ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १५,६६२ | १३,०९३ | १४,४९५ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ७५,३३१ | ८१,६६९ | ७५,७१५ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | ३ | ३ | २ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | २,०१६ | २,९२० | २,३१५ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | १९४ | २०३ | १९८ |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,४४,२६८** | **१,५७,३८५** | **१,५८,७१७** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१७-१८ | २०१८-१९* | २०१९-२०* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ६७,०२० | ७०,०८९ | ७९,१३० |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १३,४०६ | १३,८२३ | १३,३७६ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ६६,८९० | ६९,८५५ | ६६,८२० |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | १६ | २४ | १९ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ३,०७२ | ४,०६१ | ३,०७३ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ४६६ | ४६४ | ४८२ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,५०,८६९** | **१,५८,३१६** | **१,६२,९००** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ८०८ | ८०४ | ८२९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | -- | ३८ | ७६ | -- | -- | -- |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | ६,०८७ | ५,७६२ | ४,३४६ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | २३,४९६ | २३,८९६ | २२,७२६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | ५,५६२ | ५,६१९ | ६,२४७ |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **३५,९५३** | **३६,०८१** | **३४,१४८** |

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी ला ना - लागू नाही

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

# 9

# {ÉÉªÉÉ¦ÉÚiÉ ºÉÖÊ´ÉvÉÉ



# ९. पायाभूत सुविधा

९.१ चांगल्या पायाभूत सुविधांची उपलब्धता सर्व क्षेत्रातील आर्थिक वृद्धीस सहाय्य करते. पायाभूत सुविधांमध्ये ऊर्जा, रस्ते व रेल्वे वाहतूक व्यवस्था, बंदरे, विमानतळ आणि पोस्ट, दूरध्वनी, भ्रमणध्वनी इ. दळणवळण प्रकारांचा समावेश होतो.

## ऊर्जा

९.२ आर्थिक विकासाकरिता आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्याकरिता ऊर्जा हे एक आवश्यक साधन आहे. वीज, नैसर्गिक वायू, पेट्रोलियम हे ऊर्जेचे विविध प्रकार आहेत.

## वीज

९.३ पारंपरिक आणि नवीकरणीय स्रोतांद्वारे वीज निर्मिती केली जाते.

### स्थापित क्षमता

९.३.१ राज्यातील वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता ३१ मार्च, २०२० रोजी ३६,६४४ मेगावॅट असून त्यात खाजगी क्षेत्राचा ५८.६ टक्के, सार्वजनिक क्षेत्राचा ३६.० टक्के आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्या.) ५.४ टक्के हिस्सा होता. खाजगी क्षेत्रातील विजेच्या स्थापित क्षमतेत नवीकरणीय ऊर्जेचा ४४.६ टक्के हिस्सा होता. राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ३१ मार्च, २०२० रोजी देशात सर्वाधिक (११.७ टक्के) होती. स्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील क्षेत्रनिहाय स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | ३१ मार्च रोजी | | | ३१ डिसेंबर, २०२० रोजी | २०२० मध्ये २०१९ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२० | | |
| **राज्यात** | **३६,३१७** | **३६,७२९** | **३६,६४४** | **३६,८७४** | **(-)०.२** |
| औष्णिक | २२,०९६ | २२,०९६ | २१,१७६ | २१,१७६ | (-)४.२ |
| नवीकरणीय | ८,३४१ | ८,७५३ | ९,५८८ | ९,८१८ | ९.५ |
| जलजन्य | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य | २,८१९ | २,८१९ | २,८१९ | २,८१९ | ०.० |
| **केंद्रीय क्षेत्राकडून वाटप** | **७,४२०** | **७,७५४** | **७,८३१** | **७,९१९** | **१.०** |

*आधार :* महानिर्मिती, महाऊर्जा, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

## वीज निर्मिती

९.३.२ राज्यात २०१९-२० मध्ये १,२३,३१४ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली व केंद्रीय क्षेत्राकडून ३४,९८८ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध झाली. वर्ष २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत कोविड-१९ महामारीच्या परिणामामुळे राज्यात ६९,६०६ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली असून मागील वर्षीच्या समान कालावधीच्या वीज निर्मितीच्या (८०,८१३ दशलक्ष युनिटस्) तुलनेत १३.९ टक्के कमी आहे. राज्यात २०१९-२० मध्ये झालेल्या वीज निर्मितीत खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी क्षेत्राचा अनुक्रमे ५३.५ टक्के, ४३.० टक्के आणि ३.५ टक्के हिस्सा होता. स्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.२ : राज्यातील क्षेत्रनिहाय वीज निर्मिती**




**तक्ता ९.२ स्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिट्स)

| स्रोत | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ | २०१९-२० मध्ये २०१८-१९ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| **राज्याअंतर्गत** | **१,२०,१६०** | **१,२७,०५९** | **१,२३,३१४** | **६९,६०६** | **(-)२.९** |
| औष्णिक | ९३,९५० | ९८,७२० | ९५,४६० | ५२,६२८ | (-)३.३ |
| नैसर्गिक वायुजन्य | ९,०६२ | ८,४५२ | ७,९९९ | ३,८०१ | (-)५.४ |
| जलजन्य | ५,११४ | ५,३८७ | ६,१०४ | ३,५२८ | १३.३ |
| नवीकरणीय $ | १२,०३४ | १४,५०० | १३,७५१ | ९,६४९ | (-)५.२ |
| **केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त** | **३३,००३** | **३४,२३८** | **३४,९८८** | **२३,०९३** | **२.२** |

टीप : १ युनिट = १ किलोवॅट तास $ बंदिस्त विजेसह + नोव्हेंबरपर्यंत

*आधार :* महानिर्मिती, महावितरण, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

## वीज खरेदी

९.३.३ सन २०१९-२० मध्ये महावितरणने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ५.०६ आणि बेस्टने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ५.१० होता. महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या विजेचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेली वीज**

| वर्ष | महावितरण | | बेस्ट | |
|---|---|---|---|---|
| | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिटस्) | एकूण किंमत (₹ कोटी) | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिटस्) | एकूण किंमत (₹ कोटी) |
| २०१८-१९ | १,३६,२५३ | ६२,७५४ | ४,७७१ | २,३१५ |
| २०१९-२० | १,३२,०२० | ६६,७७५ | ४,७९१ | २,४४५ |
| २०२०-२१+ | ९३,८०० | ४५,५१२ | २,९५० | १,७५४ |

*आधार* : महावितरण, बेस्ट + डिसेंबरपर्यंत

## विजेचा वापर

९.३.४ राज्यात २०१९-२० मध्ये विजेचा एकूण वापर १,२५,४६४ दशलक्ष युनिटस् होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३७.१ टक्के) तर त्या खालोखाल घरगुती क्षेत्रात (२३.४ टक्के) आणि कृषि क्षेत्रात (२३.२ टक्के) होता. कोविड-१९ महामारी कालावधीतील शासनाने लादलेल्या निर्बंधांमुळे वीज वापरावर परिणाम होवून औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रात विजेची मागणी कमी झाली. वर्ष २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत राज्यातील एकूण विजेचा वापर ७५,७७२ दशलक्ष युनिटस् असून मागील वर्षीच्या समान कालावधीच्या वीज वापराच्या (८३,८४० दशलक्ष युनिटस्) तुलनेत ९.६ टक्के कमी आहे. वर्ष २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत वाणिज्यिक व औद्योगिक क्षेत्रातील वीज वापर अनुक्रमे ३७.६ टक्के व १६.७ टक्क्यांनी कमी झाला असून कृषी क्षेत्रातील वीज वापरामध्ये ७.४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.४ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| क्षेत्र | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ | २०१९-२० मध्ये २०१८-१९ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| औद्योगिक | ४०,७९३ | ४८,२४५ | ४६,५०७ | २६,०७९ | (-)३.६ |
| कृषि | ३०,३०७ | ३३,७२२ | २९,११८ | १८,२५२ | (-)१३.७ |
| घरगुती | २८,२८२ | २९,१७५ | २९,३०१ | २१,२३१ | ०.४ |
| वाणिज्यिक | १३,७८७ | १३,०१० | १३,१२३ | ५,७६४ | ०.९ |
| सार्वजनिक सेवा@ | ६,२२३ | ६,६९५ | ६,५७९ | ४,०१६ | (-)१.७ |
| रेल्वे | १६३ | १८१ | १८४ | ८४ | १.७ |
| इतर | ४,३५१ | ८२३ | ६५२ | ३४६ | (-)२०.८ |
| **सर्व** | **१,२३,९०६** | **१,३१,८५१** | **१,२५,४६४** | **७५,७७२** | **(-)४.८** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा समाविष्ट + नोव्हेंबरपर्यंत

*आधार :* महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

९.३.५ महाराष्ट्रातील आणि भारतातील विजेचा दरडोई अंतिम वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.५ विजेचा दरडोई अंतिम वापर**

(युनिटस्)

| क्षेत्र | २०१७-१८ | | २०१८-१९ | | २०१९-२०* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| **सर्व** | **१,०२८.०** | **७५३.१** | **१,०८३.६** | **७८४.२** | **१,०२१.५** | **७८३.७** |
| वाणिज्यिक | ११४.४ | ७२.६ | १०६.९ | ७४.६ | १०६.८ | ७७.६ |
| औद्योगिक | ३३८.४ | २४६.३ | ३९६.५ | २६१.१ | ३७८.७ | २५५.५ |
| कृषि | २५१.४ | १५४.२ | २७७.१ | १६०.९ | २३७.१ | १५६.९ |
| घरगुती | २३४.६ | २११.७ | २३९.८ | २१९.० | २३८.६ | २२६.७ |

*आधार :* केंद्रीय विद्युत प्राधिकरण, महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. * अस्थायी

९.३.६ स्थापित क्षमता, वीज निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि विजेचा दरडोई अंतिम वापर या संबंधीची मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दिली आहे.

## विजेची मागणी व पुरवठा

९.३.७ राज्याने क्षमता वाढ, पारेषण व वितरण जाळ्यातील सुधारणा आणि ऊर्जा संवर्धनाच्या बाबतीत केलेल्या विविध उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. मागील तीन वर्षांत विजेच्या सरासरी कमाल मागणीच्या तुलनेत अधिक वीज पुरवठा उपलब्ध असल्याचे दिसून आले. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व अधिशेष तक्ता ९.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.६ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व अधिशेष**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | अधिशेष |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | १७,४१२ | १७,६०६ | १९४ |
| २०१८-१९ | १८,४७८ | १९,८१४ | १,३३६ |
| २०१९-२० | १९,१०३ | २१,७७१ | २,६६८ |
| २०२०-२१+ | १७,३४५ | २१,८४१ | ४,४९६ |

*आधार :* महावितरण + डिसेंबरपर्यंत

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.३.८ वीज निर्मिती केंद्रांतून वीज ग्राहकांपर्यंत पोहोचवणे सुकर करणारे पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे हा विद्युत प्रणालीचा कणा आहे. पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अति उच्च दाब उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे यासह वीजचोरी विरुद्ध मोहिम अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

९.३.९ महापारेषणचे ४८,३२१ सर्किट किमीचे जाळे व ६८१ उपकेंद्रे यांसह २०१९-२० पर्यंतची पारेषण क्षमता सुमारे १,२८,९९० मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत पारेषण क्षमता ४८,८०५ सर्किट किमी जाळे व ६८८ उपकेंद्रे यांसह १,२९,५२० एमव्हीए झाली. महापारेषणची २०१८-१९ व २०१९-२० ची पारेषण हानी अनुक्रमे ३.११ टक्के व ३.१७ टक्के होती तर २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंतची पारेषण हानी २.८६ टक्के होती.

९.३.१० महावितरणच्या वितरण जाळ्यात २०१९-२० अखेरीस ३,८६५ उपकेंद्रे, १०,८७,१७३ सर्किट किमी वाहिन्या व ६,८७,९१६ वितरण रोहित्रे होती. सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर अखेर ३,८९९ उपकेंद्रे, १०,९८,००५ सर्किट किमी वाहिन्या व ७,१८,८६८ वितरण रोहित्रे होती.

९.३.११ महावितरणाचे वितरण जाळे राज्यात सर्वत्र (मुंबई शहर वगळता) आहे. बेस्टचे वितरण जाळे मुंबई शहर आणि टाटा पॉवर व अदानी इलेक्ट्रीसिटीचे वितरण जाळे मुंबई उपनगरात आहे. सन २०१९-२० मध्ये राज्यातील वीज वितरण यंत्रणेत महावितरणचा हिस्सा ८६.० टक्के असून त्या पाठोपाठ अदानी इलेक्ट्रीसिटीचा ६.७ टक्के, टाटा पॉवरचा ३.७ टक्के आणि बेस्टचा ३.६ टक्के होता. वितरण हानी तक्ता ९.७ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.३ : महावितरणची एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी आणि वितरण हानी**




**तक्ता ९.७ वितरण हानी**

(टक्के)

| परवानाधारक | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|---|
| महावितरण | १३.९० | १३.६३ | १५.९१ | १२.७२ |
| बेस्ट | ५.८२ | ४.१८ | ४.६२ | ३.७१ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ८.१६ | ७.८४ | ७.३७ | ७.५५ |
| टाटा पॉवर कं. मर्या. | ०.९० | ०.६३ | १.०२ | २.०५ |

*आधार :* महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. + सप्टेंबरपर्यंत

९.३.१२ ***उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजना (उदय)*** : केंद्र शासनाने २०१५ मध्ये राज्य वितरण यंत्रणांच्या कार्यान्वयन व वित्तीय कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ही योजना मंजूर केली. राज्य शासनाने २०१६-१७ मध्ये ₹ ४,९५९.७५ कोटी महावितरणला सदर योजनेअंतर्गत हस्तांतरीत केले. मार्च, २०२० अखेर राज्यात फिडर मीटरिंग, वीज जोडणी न झालेल्या घरांना वीज पुरवठा, फिडर विलगीकरण, ग्रामीण फिडर परिक्षण आणि एलईडी दिवे वितरण पूर्ण झाले आहे तर वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंगचे काम प्रगतीपथावर आहे.

९.३.१३ **औष्णिक ऊर्जेची क्षमता वाढ :** महानिर्मितीने विविध औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रांत प्रकल्पांची स्थापना व कार्यान्वयन करण्याच्या कृती आराखड्यास मान्यता दिली आहे. भुसावळ येथील ६६० मेगावॅट प्रकल्पात क्षमता वाढीचे काम सुरू असून ते मे, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. कोराडी येथील १,३२० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी राज्य शासन आणि महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची तत्वत: मान्यता मिळाली आहे.

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.४ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची स्थापना वीज दर निश्चिती, वीज खरेदी आणि पारेषण व वितरण यंत्रणांच्या प्रापण प्रक्रियांचे नियमन आणि वीज क्षेत्रामधे स्पर्धा व कार्यक्षमतेस प्रोत्साहन देणे यासाठी करण्यात आली आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने एप्रिल, २०२० ते मार्च, २०२५ या नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता वितरण परवानाधारकांसाठी प्रवर्गनिहाय दर निश्चित करण्याकरिता 'बहुवार्षिक दर नियमन २०१९' अधिसूचित केले आहे. सन २०२०-२१ मधील सरासरी वीज दर तक्ता ९.८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.८ सन २०२०-२१ मधील सरासरी वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहक गट | महावितरण | बेस्ट | अदानी इलेक्ट्रीसिटी | टाटा पॉवर |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्र्यरेषेखालील | ३.६९ | @ | @ | @ |
| ० ते १०० युनिट्स | ६.०३ | ३.५४ | ४.८७ | २.१६ |
| १०१ ते ३०० युनिट्स | ९.९४ | ६.४९ | ७.२९ | ५.२४ |
| ३०१ ते ५०० युनिट्स | १२.८४ | ८.९८ | ८.८७ | ८.७८ |
| ५०० युनिट्स पेक्षा अधिक | १३.५४ | १०.३९ | १०.०१ | ९.८१ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| ० ते २० किलोवॅट भार | १०.६१ | ७.८९ | ८.३१ | ६.४९ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक आणि ५० किलोवॅट पर्यंत भार | १४.०१ | ८.६७ | ९.३० | ८.२३ |
| ५० किलोवॅट पेक्षा अधिक भार | १६.११ | ८.७३ | ९.६० | ८.२३ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| २० किलोवॅट पेक्षा कमी भार | ७.२४ | ७.०९ | ७.४८ | ६.१७ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक भार | ८.९० | ८.१० | ८.६६ | ७.६१ |
| **लघु दाब - कृषि** | | | | |
| कृषि पंप (मीटर शिवाय) | ४.४८ | ला ना | ला ना | ला ना |
| कृषि पंप (मीटर सह) | ३.७१ | @ | @ | @ |
| इतर (मीटर सह) | ७.९५ | @ | @ | @ |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| ग्रामपंचायत आणि अ, ब व क वर्ग नगरपालिका | ६.५१ | ला ना | ला ना | ला ना |
| महानगरपालिका क्षेत्रे | ७.९६ | # | # | # |
| **लघु दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ८.०९ | ६.८२ | ७.२७ | ६.७७ |
| इतर | ८.७७ | ६.९५ | ७.६५ | ८.२५ |
| **उच्च दाब - उद्योग** | ८.५० | ७.०९ | ७.८९ | ७.१५ |
| **उच्च दाब — रेल्वे/मेट्रो/मोनोरेल** | ८.२४ | ७.२५ | ७.७१ | ७.३९ |
| **उच्च दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ९.२८ | ७.१४ | ८.०० | ८.१८ |
| इतर | ११.१२ | ७.६८ | ८.२८ | ७.९२ |
| **उच्च दाब - कृषि पंप** | ४.२२ | ला ना | ला ना | ला ना |

@ ग्राहकांची संख्या निरंक वा अत्यंत कमी असल्याने सरासरी दर दर्शविले नाहीत ला ना लागू नाही

\# लघु दाब पथदिवे, लघु दाब इतर सार्वजनिक सेवांमध्ये समाविष्ट

*आधार :* महाराष्ट्र वीज नियामक आयोग

## नवीकरणीय ऊर्जा

९.५ नवीकरणीय व स्वच्छ ऊर्जेचे पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक, इत्यादी स्रोत आहेत. ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१ मधील तरतुदींचे समन्वयन, विनिमय व अंमलबजावणीसाठी अधिकृत यंत्रणा म्हणून महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस अधिसूचित केले आहे. नवीकरणीय ऊर्जेचा प्रचार व प्रसार आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीय आहे.

**आलेख ९.४ : नवीकरणीय ऊर्जेची स्थापित क्षमता**
(३१ मार्च २०२० रोजी)




९.५.१ केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून १५ टक्के पर्यंत वीज खरेदीचे बंधन साध्य करण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. त्यास अनुसरुन नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे निर्मित वीज ग्रीड जोडणीमध्ये आणण्यासाठी धोरणे जाहीर केली आहेत. नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेनुसार कर्नाटक (१५,३१५ मेगावॅट), तामिळनाडू (१४,८२७ मेगावॅट) आणि गुजरात (११,८२६ मेगावॅट) नंतर राज्य देशात चौथ्या क्रमांकावर आहे. नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता तक्ता ९.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.९ नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च रोजी | | | ३० नोव्हेंबर, २०२० रोजी |
| | | २०१८ | २०१९ | २०२० | |
| पवन | ९,४०० | ४,७८२ | ४,७९२ | ४,९९८ | ४,९९८ |
| चिपाडांपासून वीज सहनिर्मिती | २,२०० | १,९५४ | २,२८४ | २,३०१ | २,३०१ |
| सौर | ७,५०० | १,०१७ | १,०५८ | १,६६२ | १,८८८ |
| लघु जल विद्युत प्रकल्प# | ७३२ | ३३६ | ३६६ | ३७० | ३७० |
| कृषि अवशेष | ७८१ | २१५ | २१५ | २१५ | २१५ |
| औद्योगिक कचरा | ३५० | ३५ | ३५ | ३८ | ४२ |
| शहरी घनकचरा | २८७ | ३ | ३ | ३ | ३ |
| **एकूण** | **२१,२५०** | **८,३४२** | **८,७५३** | **९,५८७** | **९,८१७** |

*आधार* : महाऊर्जा

# जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प

९.५.२ **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व नवीकरणीय ऊर्जेसंबंधीच्या इतर उपाययोजना** : नवीकरणीय ऊर्जेची स्वतंत्रपणे कार्यरत असलेली उपकरणे मोठ्या प्रमाणात अनुदानित तत्वावर वितरीत करण्यात आली आहेत. ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य तक्ता ९.१० मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१० ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य**

(संख्या)

| तपशील | ३१ मार्च रोजी | |
|---|---|---|
| | २०१९ | २०२० |
| **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम** | | |
| अ) ऊर्जा लेखा परिक्षण | १,३१४ | १,६२० |
| ब) सहज ऊर्जा लेखा परिक्षण | २,८७२ | ३,६०९ |
| क) अपव्ययित उष्म्याचा पुनर्वापर$ | ११ | ११ |
| ड) ग्रामपंचायत क्षेत्रात सीएफएल दिवे बदलणे# | १,५३,०६६ | १,५३,०६६ |
| इ) शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प | १०६ | ११३ |
| ई) नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविणे | ३८ | ३९ |
| पवन निरिक्षण केंद्रे | ४०९ | ४०९ |
| शासकीय इमारतीतील सौर ऊर्जा प्रकल्प | ११३ | ३४७ |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिक्वेटींग) प्रकल्प | १८९ | १९१ |
| प्रदर्शने | ३०५ | ३२१ |
| अटल सौर कृषी पंप | ७९ | ७,००० |
| सौर लघुजल व नळ पाणी पुरवठा योजना | १,१९८ | -- |

*आधार* : महाऊर्जा  $ सद्य:स्थितीत योजना बंद आहे.  # वर्ष २०१९-२० साठी प्रस्ताव अप्राप्त

९.५.३ **नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन ('आरपीओ') व नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्रे ('आरईसी') पद्धती** : नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन हे महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नियमनाद्वारे बंधनकारक केले असून बांधील यंत्रणेद्वारे (वितरण परवानाधारक, ग्रीडला जोडलेले बंदिस्त वीज निर्मिती प्रकल्प व वितरण मुक्त प्रवेश असलेले ग्राहक) वापर केलेल्या एकूण विजेपैकी किमान टक्केवारी इतकी नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे बंधनकारक आहे.

९.५.४ नवीकरणीय ऊर्जेस चालना देण्यासाठी आणि उपलब्ध असलेले नवीकरणीय ऊर्जा स्रोत व नवीकरणीय ऊर्जा खरेदीसाठी बांधील यंत्रणांना साध्य करावयाचे नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन यांच्यात असलेली तफावत दूर करण्याकरिता 'आरईसी' हे बाजाराधारीत साधन आहे. 'आरपीओ', त्याचे अनुपालन व 'आरईसी' पद्धतीची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा ही राज्य यंत्रणा आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या 'आरपीओ-आरईसी नियमन २०१६' नुसार बांधील यंत्रणांना त्यांच्या एकूण पारंपरिक वीज वापराच्या किमान मर्यादेपर्यंत (२०१९-२० पर्यंत सौर ऊर्जेकरिता ३.५ टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जेकरिता ११.५ टक्के) नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे अनिवार्य आहे. नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) अंतर्गत झालेले साध्य तक्ता ९.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.११ नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधनअंतर्गत झालेले साध्य**

(टक्के)

| वितरण परवानाधारक | सौर | | इतर नवीकरणीय ऊर्जा | |
|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२०* | २०१८-१९ | २०१९-२०* |
| महावितरण | १.७४ | २.०१ | ९.५२ | ८.३० |
| बेस्ट | ४.१४ | २.३३ | ११.१४ | १३.०४ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ०.७९ | ०.६८ | २.२९ | २.६३ |
| टाटा पॉवर कं मर्या. | ३.२३ | ०.९७ | ११.०१ | १२.५१ |

*आधार* : महाऊर्जा  * अस्थायी

## ग्रामीण विद्युतीकरण, पारेषण व वितरण जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा अक्षय्यता संबंधित योजना

९.६.१ **ग्रामीण विद्युतीकरण** : राज्यातील वस्ती असलेल्या एकूण ४१,९२८ गावांपैकी मार्च, २०२० पर्यंत ४१,६१८ गावांचे पारंपरिक ऊर्जेद्वारे व ३०५ गावांचे अपारंपरिक नवीकरणीय ऊर्जेद्वारे विद्युतीकरण झाले. अमरावती जिल्ह्यातील पाच गावांचे पुनर्वसन झाले आहे.

९.६.२ **कृषि पंपांचे विद्युतीकरण** : राज्यात ३१ मार्च, २०२०, अखेर एकूण ४३.२२ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण झाले आहे. सन २०१९-२० मध्ये ९६,३२७ आणि सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ५२,८७० कृषि पंपांचे विद्युतीकरण झाले.

९.६.३ **अटल सौर कृषि पंप योजना** : शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात (सन २०१५ ते २०१८) राज्यात १०,००० सौर कृषि पंप स्थापित करण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ५,६६२ सौर कृषि पंप कार्यान्वित करण्यात आले. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात (सन २०१८-१९ पासून) ७,००० सौर कृषि पंप स्थापित करण्याचे उद्दिष्ट मार्च, २०२० अखेर साध्य झाले आहे. सदर योजना राबविल्यानंतर एकूण ३०.६० मे. वॅ. ऊर्जेची बचत झाली असून ७३.४१ दशलक्ष युनिट्स वीज बचत झाली आहे.

९.६.४ **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना** : महावितरणाच्या जवळपास उप केंद्रांवर किंवा विकेंद्रीकरण पद्धतीद्वारे सौर प्रकल्प स्थापित करुन शेतक-यांना दिवसा वीजपुरवठा करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत शेतक-यांना दिवसा वीजपुरवठा करण्याकरिता राज्यातील कृषी प्राबल्य क्षेत्रातील कृषी फीडर्सचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यात येणार आहे. सन २०१९-२० मध्ये १६९ मे. वॅ. आणि डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण २९२ मे. वॅ. क्षमता स्थापित झाली आहे.

९.६.५ **प्रधान मंत्री किसान ऊर्जा व उत्थान महा-अभियान (पीएम कुसुम) :** केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी सौर पंप आणि ग्रीड कनेक्टेड सौर आणि इतर नवीकरणीय ऊर्जा संयंत्र स्थापित करण्यासाठी सदर योजना देशात सुरु केली आहे. या योजनेंतर्गत ३ एचपी, ५ एचपी व ७.५ एचपी क्षमतेचे सौर पंप स्थापित करण्यात येत असून त्यामध्ये केंद्र शासनाचा ३० टक्के, राज्य शासनाचा ६० टक्के व लाभार्थ्याचा १० टक्के हिस्सा आहे. सदर योजना सन २०१९-२० पासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता राज्यात राबविली जात आहे. सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये अनुक्रमे ३०,००० व ७०,००० सौर पंप स्थापित करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.

९.६.६ **दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना** : केंद्र शासनाने २०१५ पासून ग्रामीण भागातील कुटुंबांना वीज जोडणी देण्यासाठी ही योजना सुरु केली असून राज्यासाठी ₹ २,१६४.१५ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत १२.४८ लाख ग्रामीण कुटुंबांना (दारिद्रय रेषेखालील ३.८६ लाख कुटुंबांसह) वीज जोडणी देण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेचा डिसेंबर, २०२० पर्यंतचा प्रगती तक्ता ९.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१२ दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेची प्रगती**

(योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर, २०२० पर्यंत)

| कामांचा तपशील | परिमाण | उद्दिष्ट | उद्दिष्टपूर्ती | प्रगतीपथावर |
|---|---|---|---|---|
| नवीन केंद्रे | संख्या | २१० | २०१ | ९ |
| अस्तित्वातील ट्रान्सफॉर्मर्सचे अद्ययावतीकरण / जोडणी | संख्या | १४९ | १४८ | १ |
| नवीन ट्रान्सफॉर्मर्स | संख्या | ९,२६६ | ७,४२६ | २८७ |
| फिडर विलगीकरण | संख्या | ७०९ | ६२९ | ३२ |
| फिडर विलगीकरण | कि.मी. | ९,७५५ | ८,२४५ | २९२ |
| उच्च दाब वाहिनी | कि.मी. | ६,४६७ | ५,४२६ | १९० |
| लघु दाब वाहिनी | कि.मी. | ५,५३९ | ४,०६६ | १३७ |
| सांसद आदर्श ग्राम योजनेतील गावे | संख्या | ७९ | ७९ | ० |
| दारिद्य रेषेखालील कुटुंबांना वीज जोडणी | संख्या | ३,८६,४३९ | ३,८६,४३९ | ० |

*आधार :* महावितरण

९.६.७ **घरगुती कार्यक्षमता प्रकाश कार्यक्रम** : या कार्यक्रमांतर्गत १५ डिसेंबर, २०२० पर्यंत राज्यात सुमारे २.२० कोटी एलईडी दिवे, ५.३१ लाख एलईडी ट्युब्ज व १.८६ लाख पंचतारांकित मानक असलेले छत पंखे वितरित करण्यात आले.

९.६.८ **प्रधानमंत्री सहज बिजली हर घर (सौभाग्य) योजना** : केंद्र शासनाने ऑक्टोबर, २०१७ पासून सौभाग्य योजना राबविली आहे. सदर योजना दुर्गम भागातील कुटुंबांकरिता सौर संयंत्रांद्वारे पाच वर्षांच्या सर्वंकष देखभालीसह विद्युतीकरण करण्याच्या उद्देशाने लागू केली आहे. या योजनेंतर्गत ३०,५३८ घरांमध्ये सौर दिवे आस्थापित करण्यात आले आहेत.

९.६.९ **ऊर्जा बचत कार्यक्रम :** औद्योगिक, कृषि, घरगुती आणि व्यावसायिक क्षेत्रासाठीची ऊर्जा बचतीची संभाव्य क्षमता सुमारे ३० टक्के आहे. ऊर्जा लेखापरीक्षण करणे ही ऊर्जा बचतीची प्रथम पायरी आहे. ऊर्जा लेखापरीक्षणामध्ये ऊर्जेचा प्रामुख्याने वापर करणारे विभाग आणि उपकरणे यांतील ऊर्जा प्रवाह जाणून घेण्यासाठी व ऊर्जेचा कार्यक्षम वापर होण्याच्या दृष्टीने पद्धतशीर अभ्यास केला जातो. या कार्यक्रमांतर्गत पद्धतशीर ऊर्जा लेखापरीक्षण करण्यासाठी तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. मार्च, २०२० पर्यंत एकूण १,६२० ऊर्जा लेखापरीक्षणे करण्यात आली.

९.६.९.१ **लघु व मध्यम उद्योगांकरिता सहज ऊर्जा लेखापरीक्षण योजना** : पात्र लघु व मध्यम उद्योगांना महाऊर्जा कडे नोंदीत ऊर्जा लेखापरीक्षण संस्थांद्वारे ऊर्जा लेखापरीक्षण करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. ऊर्जा लेखापरीक्षणाचा अहवाल सादर केल्यानंतर ऊर्जा लेखापरीक्षण संस्थेस महाऊर्जा कार्यालयातर्फे ₹ ३,०००/- अदा करण्यात येतात. मार्च, २०२० अखेर ३,६०९ लघु व मध्यम उद्योगांनी या योजनेत भाग घेतला.

## ऊर्जेचे इतर प्रकार

### पेट्रोलियम व नैसर्गिक वायू

९.७ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापरात मागील वर्षीच्या तुलनेत २०१९-२० मध्ये देशात ०.१४ टक्के वाढ व महाराष्ट्रात १.०५ टक्के घट झाली. भारतात व महाराष्ट्रात प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापराचा तपशील तक्ता ९.१३ मध्ये दिला आहे.

**आलेख ९.५ : पेट्रोलियम उत्पादनांचा दरडोई वापर**




**तक्ता ९.१३ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा वापर**

('००० मे.टन)

| पेट्रोलियम उत्पादने | २०१८-१९ | | २०१९-२०* | |
|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| नाफ्था | ११,४२० | ३६३ | ११,९०४ | ३४५ |
| द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) | २४,५९१ | २,९९० | २६,१२६ | ३,१२४ |
| मोटर स्पिरीट/गॅसोलिन (एमएस) | २८,२८४ | ३,३५८ | २९,९७५ | ३,४६२ |
| उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ) | ३,४५९ | २०० | २,३९७ | ५४ |
| एव्हीएशन टर्बाईन इंधन (एटीएफ) | ८,०४१ | १,६३९ | ७,९९९ | १,३९९ |
| हाय स्पीड डिझेल (एचएसडी) | ८३,४३५ | ९,२९२ | ८२,४८५ | ९,५२९ |
| कमी प्रतीचे डिझेल (एलडीओ) | ५९८ | ७८ | ६२८ | ८१ |
| फर्नेस ऑईल (एफओ) | ५,५८३ | ८१५ | ५,१३७ | ७६६ |
| हॉट हेवी स्टॉक (एचएचएस)/ लो सल्फर हेवी स्टॉक (एलएसएचएस) | ३६९ | ४ | ३९० | ६ |
| लुब्रीकंट /वंगण | १,३१३ | २८५ | १,३१७ | ३०३ |
| डांबर | ५,८३० | ७१२ | ५,०९८ | ६५३ |
| इतर | १७,४२८ | १,२८१ | १७,१७२ | १,०७४ |
| **एकूण** | **१,९०,३५२** | **२१,०१७** | **१,९०,६२७** | **२०,७९७** |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार * अस्थायी

९.७.१ एलपीजी घरगुती ग्राहक, एलपीजी वितरक, उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ) / कमी प्रतीचे डीझेल ऑईल (एलडीओ) वितरक आणि एसकेओ/ एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे तक्ता ९.१४ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ९.१४ एलपीजी घरगुती ग्राहक, वितरक, उच्च दर्जाचे केरोसिन / कमी प्रतीचे डीझेल ऑईल वितरक आणि किरकोळ विक्री केंद्रे**

| तपशील | २०१७-१८ | | २०१८-१९ | | २०१९-२०* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| एलपीजी सक्रिय घरगुती ग्राहक (लाख) | २,२४३ | २४१ | २,६५४ | २६९ | २,७८७ | २७६ |
| एलपीजी वितरक (संख्या) | २०,१४६ | १,८२७ | २३,७३७ | २,१३४ | २४,६७० | २,१८४ |
| एसकेओ /एलडीओ वितरक (संख्या) | ६,५३६ | ७६७ | ६,५२८ | ७६७ | ६,५२१ | ७६६ |
| एसकेओ /एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे (संख्या) | ६२,५८५ | ५,९७० | ६४,६२७ | ६,१५९ | ६९,०९३ | ६,४५८ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी उच्च दर्जाचे केरोसीनचे (एसकेओ) वाटप ('००० मे. टन) | ५,०२२ | ३८५ | ४,४३३ | २८७ | ३,१२१ | १०७ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी उच्च दर्जाच्या केरोसीनची (एसकेओ) उचल ('००० मे. टन) | ४,६६९ | ३७८ | ४,१५२ | २४२ | २,७९३ | ५३ |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार * अस्थायी

९.७.२ पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणी व कॅाम्प्रेस्ड नैसर्गिक वायू (सीएनजी) केंद्रे यासंदर्भात महानगर गॅस लि., महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. आणि गॅस ॲथॉरीटी ऑफ इंडिया लि. (गेल) या राज्यातील कार्यरत यंत्रणा आहेत. देशात मार्च, २०२० अखेर २,२०८ सीएनजी केंद्रे होती, त्यापैकी ३७० सीएनजी केंद्रे राज्यात होती. देशात ६१.०१ लाख पीएनजी जोडण्या होत्या, त्यापैकी १७.६१ लाख जोडण्या राज्यात होत्या.

९.७.३ **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना** : दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना आठ कोटी एलपीजी जोडण्या देण्याचे या योजनेचे उद्दिष्ट सप्टेंबर, २०१९ अखेर साध्य झाले आहे. या योजनेअंतर्गत राज्यात एकूण ४४.३८ लाख एलपीजी जोडण्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कोविड-१९ महामारीमध्ये केंद्र शासनाने 'प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज' योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत एलपीजी सिलेंडरचे तीन रिफिल मोफत देण्यात आले. ऑगस्ट, २०२० पर्यंत देशात १३.०६ कोटी सिलेंडर रिफिल्स प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले आहेत, त्यापैकी राज्यात ७३.२४ लाख रिफिल्स वितरीत करण्यात आले आहेत.

## ऊर्जा कार्यक्षमता

९.८ सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील ऊर्जा कार्यक्षमतेच्या उपक्रमांचे मोजमाप करणारा ९७ महत्वपूर्ण निर्देशकांवर आधारित 'राज्य ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांक २०१९' ऊर्जा दक्षता ब्युरो, विद्युत मंत्रालय, भारत सरकार आणि 'अलायन्स फॉर एनर्जी इफिशिअन्सी इकॉनॉमी' यांनी विकसित केला आहे. हा निर्देशांक ऊर्जा कार्यक्षमतेच्या अंमलबजावणीसाठी केलेले प्रयत्न आणि साध्य यांच्या आधारावर सर्व राज्यांचे 'अग्रणी', 'सफल', 'प्रतियोगी' आणि 'आकांक्षी' या श्रेणींमध्ये वर्गीकरण करतो. राज्य ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांक २०१९ नुसार हरयाणा, केरळ व कर्नाटक ही 'सफल' या श्रेणीमध्ये वर्गीकृत करण्यात आली आहेत. 'अग्रणी' श्रेणीमध्ये कोणतेही राज्य वर्गीकृत करण्यात आलेले नाही. मणीपुर, झारखंड, राजस्थान व जम्मू काश्मिर ही किमान कामगिरी करणारी राज्ये असून ती 'आकांक्षी' या श्रेणीमध्ये वर्गीकृत करण्यात आली आहेत. महाराष्ट्र 'प्रतियोगी' श्रेणीमध्ये वर्गीकृत आहे.

# वाहतूक व दळणवळण

९.९ चांगली वाहतूक व दळणवळण यंत्रणा अर्थव्यवस्थेच्या वाढीस मदत करते. रस्ते, रेल्वे, हवाई, जल, टपाल सेवा, दूरध्वनी, भ्रमणध्वनी व इंटरनेट सेवा ही राज्यातील वाहतूक व दळणवळणाची विविध साधने आहेत. मजबूत पायाभूत सुविधांमुळे प्राथमिक, व्दितीय व तृतीय क्षेत्रांसाठी विस्तृत बाजारपेठ तसेच सुलभ सेवाप्रदानता उपलब्ध होते.

## भूपृष्ठ वाहतूक

### रस्त्यांचे जाळे

९.१० रस्त्यांच्या जाळ्यामध्ये महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. राज्यात ३.३७ लाख किमी लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे लक्ष्य निर्धारीत करुन रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ ची अंमलबजावणी केली जात आहे. मार्च, २०१९ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळून) ३.०९ लाख किमी होती. सन २०२०-२१ मध्ये ₹ १४,०८५ कोटी निधी मंजूर असून डिसेंबर अखेर ₹ ५,४०१.८६ कोटी खर्च झाला. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी तक्ता ९.१५ मध्ये दिली आहे. रस्त्यांच्या प्रकारानुसार राज्यातील रस्त्यांची लांबी परिशिष्ट ९.२ आणि जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

**आलेख ९.६ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२०२१) साध्य**




**तक्ता ९.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| वर्ष | रस्ते (किमी) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| २०१६-१७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| २०१७-१८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| २०१९-२०* | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही *अस्थायी

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

### केंद्रीय रस्ते निधी योजना

९.११ राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते आणि राज्य रस्ते (आंतरराज्य जोडणारे व आर्थिक दृष्ट्या महत्वाचे) यांचा विकास व देखभाल दुरुस्ती करणे तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी रेल्वे रुळावरील उड्डाण पूल व भुयारी मार्ग बांधणे आणि कर्मचारी नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कामे करणे यासाठी केंद्र शासनाने २००१-०२ पासून केंद्रीय रस्ते निधी ही योजना सुरु केली आहे. केंद्रीय रस्ते निधी योजनेअंतर्गत कामांची राज्यातील प्रगती तक्ता ९.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१६ केंद्रीय रस्ते निधी योजनेअंतर्गत कामांची राज्यातील प्रगती**

| वर्ष | मंजूर कामे (संख्या) | मंजूर लांबी (किमी) | मंजूर रक्कम (₹ कोटी) | कामे (संख्या) | | पूर्ण झालेल्या रस्त्यांची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रगतिपथावर | पूर्ण | | |
| २००१-०२ ते २०१५-१६ | ८३२ | ८,२९८.०४ | ४,८०६.३० | १५ | ८१२ | ८,३३६.५४ | ३,०७२.१४ |
| २०१६-१७ | १७० | १,१०२.०० | ३,०३०.३६ | ५९ | ९३ | १०९५.६१ | १,५१६.०२ |
| २०१७-१८ | १ | ३.९० | ११.४१ | १ | ० | ३.९० | ९२८.०० |
| २०१८-१९ | ५२ | ५७५.५५ | २,६३८.५६ | ५१ | ० | १९१.८० | १,१०९.१२ |
| **एकूण** | **१,०५५** | **९,९७९.४९** | **१०,४८६.६३** | **१२६** | **९०५** | **९,६२७.८५** | **६,६२५.२८** |

टीप : २४ कामे रद्द करण्यात आली आहेत

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## प्रधान मंत्री ग्राम सडक योजना

९.१२ सन २००० पासून प्रधान मंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात ५०० व अधिक (आदिवासी भागात २५० व अधिक) लोकसंख्या असलेल्या तसेच रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचा उद्देश आहे. लोकवस्त्या जोडणीची १०० टक्के लक्ष्यपूर्ती व रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची ७५ टक्के लक्ष्यपूर्ती केलेल्या राज्यांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना - दोन सन २०१३ पासून मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत केवळ रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामे घेता येतात. डिसेंबर २०२० अखेर बांधलेल्या आणि/किंवा दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी आणि वस्त्या जोडणीचे संचित भौतिक लक्ष्य अनुक्रमे २७,४०२ किमी आणि १०,८०८ होते. योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर २०२० अखेर बांधलेल्या आणि / किंवा दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी २६,४४१ किमी होती आणि जोडण्यात आलेल्या वस्त्या १०,६७४ होत्या.

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

९.१३ प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेत समाविष्ट नसलेल्या, रस्त्यांनी न जोडलेल्या वस्त्यांना जोडणे व अस्तित्वात असलेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नत्ती करणे याकरिता सन २०१५-१६ पासून राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून डिसेंबर, २०२० अखेर दर्जोन्नत्ती करिता मंजूर रस्त्यांची लांबी ३०,३६७ किमी होती. डिसेंबर, २०२० अखेर दर्जोन्नत्ती केलेली संचित रस्ते लांबी आणि संचित खर्च अनुक्रमे १५,०११ किमी आणि ₹ ९,४६७.९६ कोटी होता.

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्प

९.१४ रस्त्यांचा व संलग्न पायाभूत सुविधांचा, खाजगी सहभागाद्वारे विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची जुलै १९९६ मध्ये स्थापना करण्यात आली असून नोव्हेंबर, २०२० पर्यंत महामंडळाने ₹ १०,९८३ कोटी किंमतीचे ३४ प्रकल्प पूर्ण केले आहेत. नोव्हेंबर, २०२० पर्यंत अंशत: पूर्ण व पूर्ण झालेल्या प्रकल्पांवरील एकूण ₹ ४४,४२८ कोटी खर्चाच्या तुलनेत एकूण टोल वसुलीची रक्कम ₹ १०,०८० कोटी होती. महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१७ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती**

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च+ (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग | २०१६-१७ | ५५,३३५.३२ | २५,१६५.३४ | २०२१-२२ |
| पुणे चक्राकार मार्ग | २०१६-१७ | ४,२००.०० | ११.३७ | २०२४-२५ |
| ठाणे- घोडबंदर उन्नत मार्ग | २०१६-१७ | ३,०००.०० | १.८० | उना |
| भिवंडी- कल्याण-शिळफाटा उन्नत मार्ग (फेज १ व फेज २) | २०१६-१७ | २,६००.०० | ४.९७ | २०२१-२२ |
| विदर्भातील रेल्वे वरील पूल | २०१६-१७ | ८७०.०० | ४.३० | उना |
| ठाणे खाडी पूल- टप्पा तीन | २०१६-१७ | ७७५.५८ | १९.८५ | २०२३-२४ |
| मुंबई - पुणे जून्या - राष्ट्रीय महामार्ग - ४ -चे - ६ पदरी रुंदीकरण | २०१६-१७ | ३१४.०० | ३२९.६९ | २०२०-२१ |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाचे आवर्धन | २००९-१० | ६,६९५.३७ | १,०२६.८१ | २०२२-२३ |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | २००८-०९ | १,५००.०० | ५२.६६ | उना |
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | ११,३३२.८२ | ४०२.३३ | २०२३-२४ |
| विक्रीकर भवन (ठेवी तत्वावरील प्रकल्प) | २०१२-१३ | ४७.३० | ५४.६० | उना |
| राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (ठेवी तत्वावरील प्रकल्प) | २०१६-१७ | ९,६३०.०० | ६,३६७.१९ | उना |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उना उपलब्ध नाही + नोव्हेंबर, २०२० पर्यंत

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

९.१५ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग हा ७०१ किमी लांब व १२० मी रुंद आठ पदरी मुंबई आणि नागपूरला जोडणारा द्रुतगती महामार्ग प्रस्तावित असून प्रवाशांना हे अंतर आठ तासांत गाठता येईल. हा महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके व ३९२ गावांमधून जाणार आहे व त्यामुळे २४ जिल्हे जोडले जातील. राज्य व राष्ट्रीय महामार्ग एकत्र येणाऱ्या ठिकाणी २४ 'कृषी समृद्धी केंद्राचा' विकास करण्याचे योजिले आहे. हा महामार्ग बुटीबोरी, वर्धा, अमरावती, जालना, चिकलठाणा, शेंद्रा, वाळूज व सिन्नर या औद्योगिक ठिकाणांना तर सेवाग्राम, कारंजा(लाड), लोणार, सिंदखेडराजा, वेरुळ व शिर्डी या पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्रांना जोडेल. या प्रकल्पासाठी एकूण ९,५९९.९९ हेक्टर जमीन आवश्यक असून त्यापैकी ८,८६१.०२ हेक्टर भूसंपादन झाले आहे. डिसेंबर, २०२० पर्यंत भूसंपादनाकरिता ₹ ७,४२४.३७ कोटी खर्च झाला.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रकल्प

९.१६ मुंबई महानगर प्रदेशात संपूर्ण मुंबई शहर,मुंबई उपनगर आणि ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांचा काही भाग समाविष्ट आहे. या महानगर प्रदेशात नऊ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा, एक नगर पंचायत आणि सुमारे १४,७६९ गावे अशा एकूण ६,५०० चौ. किमी क्षेत्राचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१८ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्यस्थिती**

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च+ | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| **विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प :** | | | | | |
| टप्पा - एक, दोन व तीन : रस्ते व उड्डाणपूल | २००७ | ६,२३५.१२ | ४,३६१.१२ | २०२२ | काम प्रगतीपथावर |
| **मिठी नदी कामे टप्पा २** खोलीकरण, रुंदीकरण, सुशोभीकरण, सेवारस्ते, इत्यादी | २००७ | ५७०.७६ | ४९२.५८ | २०१७ | अंतिम टप्प्यात |
| **विरार ते अलिबाग बहुविध मार्ग:** वाहनांसाठी आठ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधकाम (१२६ किमी) | २०१० | ३९,८४१.९३ | ४४.८१ | - | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडे हस्तांतरीत |
| **बाह्य रस्ते विकास योजना** | २०१४ | ९५६.६६ | ४१७.४७ | २०२२ | काम प्रगतीपथावर |
| **सांताक्रूज ते चेंबूर लिंक रोड कुर्ला ते वाकोला टप्पा एक** | २०१६ | ४४९.०० | २९४.१२ | २०२२ | काम प्रगतीपथावर |
| **भारत डायमंड बोर्स ते वाकोला जंक्शन टप्पा दोन** (सांताक्रूज चेंबूर लिंक रोड विस्तारांतर्गत) | २०१७ | १४९.०० | ४३.०३ | २०२१ | काम प्रगतीपथावर |
| **मुंबई ट्रान्स - हार्बर लिंक :** शिवडी ते न्हावा सागरी सेतू बांधकाम (२२ किमी) | २०१७ | १७,८४३.०० | ५,८९९.०० | २०२२ | काम प्रगतीपथावर |
| **पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधार** | २०१८ | २२३.८५ | ७४.३८ | २०२१ | काम प्रगतीपथावर |
| **ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली सहापदरी बोगदा** | २०२० | ११,२७०.८८ | - | २०२६ | काम प्रगतीपथावर |
| **अन्य प्रकल्प** | | | | | |
| भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक | २०१८ | १,०८३.९५ | १५४.३३ | २०२३ | काम प्रगतीपथावर |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण + नोव्हेंबर, २०२० पर्यंत

## मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण)

९.१७ बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुल ते वांद्रे वरळी सी लिंकचे वरळी टोक असा तीन वळणमार्ग असलेला १०.५८ किमी लांबीचा आठ पदरी किनारी रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पात नवीन तंत्रज्ञानाने सुसज्ज प्रत्येकी ३.४५ किमी लांबीच्या दुहेरी बोगद्याचा समावेश आहे. समुद्र हटवून तयार केलेले सुमारे ७० हेक्टर क्षेत्र हरीत पट्टा आणि मनोरंजन सुविधांसाठी असेल. या प्रकल्पात बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम (बीआरटीएस) डेपोसह बीआरटीएससाठी समर्पित मार्गीकेद्वारे सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांचा आणि सुमारे १,८०० मोटारींच्या एकत्रित क्षमतेसह चार भूमिगत पार्किंग क्षेत्रांचा समावेश आहे. प्रकल्पाचे काम ऑक्टोबर, २०१८ पासून सुरू झाले असून जुलै, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत ₹ १२,७२१ कोटी आहे. नोव्हेंबर, २०२० पर्यंतचा खर्च ₹ १,४३९.७० कोटी होता. नोव्हेंबर, २०२० अखेर सुमारे २० टक्के काम पूर्ण झाले.

## मोटार वाहने

९.१८ राज्यात १ जानेवारी, २०२१ रोजी मोटार वाहनांची एकूण संख्या ३.८६ कोटी होती, ती मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २.३ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यातील एकूण नोंदणीकृत वाहनांपैकी १०.३ टक्के वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यातील रस्त्यांवरील (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभाली खालील) वाहनांची प्रति किमी सरासरी संख्या १२५ होती. मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या तक्ता ९.१९ मध्ये आणि त्याची मालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१९ मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या**

('०००)

| वाहन प्रकार | १ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | | बृहन्मुंबई | | |
| | २०२० | २०२१* | शेकडा बदल | २०२० | २०२१* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | २७,७११.४३ | २८,३४०.४१ | २.३ | २,२९०.२२ | २,३६१.७५ | ३.१ |
| ऑटो रिक्षा | १,०५२.२३ | १,०६०.६२ | ०.८ | २२१.१६ | २२२.३६ | ०.५ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ५,६०७.८१ | ५,७६१.७१ | २.७ | १,२३९.०७ | १,२६५.९८ | २.२ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, शालेय बसेस व सार्वजनिक सेवा वाहने) | १५७.४२ | १५८.४२ | ०.६ | १९.१२ | १९.४० | १.५ |
| माल मोटारी [आर्टीक्युलेटेड/मल्टी एक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलीव्हरी व्हॅन्स (तीन व चार चाकी), इत्यादी] | १,८७७.३१ | १,९०७.४१ | १.६ | ८८.१० | ९१.१० | ३.४ |
| ट्रॅक्टर्स | ८२७.५८ | ८६८.७५ | ५.० | ०.२० | ०.२० | ०.० |
| ट्रेलर्स | ४२५.२६ | ४३२.४१ | १.७ | ०.१४ | ०.१५ | ७.१ |
| रूग्णवाहिका | १६.७७ | १७.३६ | ३.५ | १.५७ | १.७६ | १२.१ |
| इतर | ८५.७९ | ८९.१६ | ३.९ | २.७१ | २.९२ | ७.७ |
| **एकूण** | **३७,७६१.५९** | **३८,६३६.२५** | **२.३** | **३,८६२.२९** | **३,९६५.६२** | **२.७** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

९.१८.१ ‘सारथी’ सॉफ्टवेअरद्वारे वाहन चालक परवाना आणि *‘वाहन’* सॉफ्टवेअरद्वारे वाहन नोंदणी प्रमाणपत्र स्मार्ट कार्डच्या स्वरुपात ऑन लाईन पद्धतीने दिले जातात. डिसेंबर, २०२० अखेर राज्यात मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या ३६४.३२ लाख होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत दोन टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात २०१९-२० मध्ये २८.६५ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले.

९.१८.२ राज्यामध्ये दरवर्षी रस्ता सुरक्षा या संकल्पनेवर आधारित विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात. राज्यात प्रति दहा हजार वाहनांमागे २०२० मध्ये झालेल्या अपघातांची संख्या पाच होती. रस्ते अपघात सांख्यिकी तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२० रस्ते अपघात सांख्यिकी**

(संख्या)

| वर्ष | अपघात | | मृत व्यक्ती | | जखमी व्यक्ती | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई |
| २०१८ | ३५,७१७ | ३,१६२ | १३,२६१ | ४७५ | ३१,३६५ | ३,२९२ |
| २०१९ | ३२,९२५ | २,८७२ | १२,७८८ | ४४७ | २८,६२८ | २,९२५ |
| २०२०+ | १९,५५२ | १,३६९ | ८,७४७ | २२३ | १५,५२९ | १,३९३ |

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक यांचे कार्यालय (वाहतूक), महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

# सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.१९ सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (मरामाप) महामंडळाच्या बस सेवेद्वारे प्रतिदिन सरासरी ६०.०७ लाख प्रवाशांनी प्रवास केला. मरामाप महामंडळातर्फे बस सेवा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२१ मध्ये दिली आहे. मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१ मरामाप महामंडळातर्फे बस सेवा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी**

| बस सेवा | सेवा पुरविण्यात आलेल्या गावांची टक्केवारी | | सेवा पुरविण्यात आलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | २०१८-१९ | २०१९-२० |
| थेट | ७६.४२ | ७७.३० | ९१.९५ | ९२.०८ |
| ३ किमी पर्यंत | १४.६७ | १४.०९ | ५.४५ | ५.३० |
| ३ ते ५ किमी पर्यंत | ५.५७ | ५.११ | १.५६ | १.५६ |
| ५ किमी पेक्षा अधिक | ३.६३ | ३.५१ | १.०४ | १.०६ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**तक्ता ९.२२ मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+# |
|---|---|---|---|
| ताब्यातील एकूण वाहने | १८,७९६ | १८,२७२ | १७,७७३ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १६,४१४ | १५,५०५ | १,८९१ |
| एकूण कर्मचारी (दि. ३१ मार्च रोजी) | १,०१,८७९ | १,००,१७१ | ९६,४४१ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख) | ५५.८३ | ५३.२९ | ४.४३ |
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ६५.९७ | ६०.०७ | १.५४ |
| वाहन उत्पादकता (किमी) | २९७.०३ | २९१.६४ | २४.९४ |
| चालक-वाहक उत्पादकता (किमी) | २१८.०८ | २१७.१५ | १८५.१० |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (मार्गस्थ वाहनांच्या आधारे) | ६.२१ | ६.५४ | ५०.९९ |
| सरासरी आसन क्षमता | ४३.३३ | ४३.०६ | ४२.९२ |
| भारमान (सवलतींच्या रकमा वगळून) टक्के | ५४.०४ | ५१.२८ | ३३.६१ |
| भारमान (सवलतींच्या रकमेसह) टक्के | ६९.१४ | ६८.३८ | ३४.५८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ #कोविड -१९ लॉकडाऊन काळात मरामाप महामंडळाची वाहतूक सेवा प्रतिबंधित + ऑगस्टपर्यंत

९.१९.१ नियमित वाहतुकी शिवाय मरामाप महामंडळ यात्रा व नैमित्तिक करार तत्वावर विशेष वाहतूक सेवा पुरविते. यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ मरामाप महामंडळाची यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| विवरण | यात्रा | | नैमित्तिक करार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१८-१९ | | | २०१९-२० | | |
| | २०१८-१९ | २०१९-२० | सवलतीत | सवलती शिवाय | सर्व | सवलतीत | सवलती शिवाय | सर्व |
| सार्थ किमी (लाख) | १६२.५४ | १६९.४५ | ५६.४४ | ४०.४६ | ९६.९० | ११९.४६ | १०१.१८ | २२०.६४ |
| उत्पन्न (₹ कोटी) | ६५.७५ | ६८.५६ | १६.७७ | २२.२६ | ३९.०३ | ३५.२९ | ७९.७७ | ११५.०६ |
| प्रति किमी उत्पन्न (₹) | ४०.४५ | ४०.४६ | २९.७१ | ५५.०२ | ४०.२८ | २९.५४ | ७८.८४ | ५२.१५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.१९.२ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांवरील वयाचे), कर्क रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इत्यादी प्रवाशांना मरामाप महामंडळ बस भाड्यात विविध सवलती देते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०१९-२०, मध्ये सवलतीची रक्कम ₹ १,७०६.६० कोटी होती.

९.१९.३ मरामाप महामंडळाने सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये अनुक्रमे ₹ १३६.९७ कोटी व ₹ १२८.२९ कोटी टोल रक्कम अदा केली.

९.१९.४ अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२४ अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाने दिलेली भरपाई**

| विवरण | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|
| अपघात (संख्या) | ३,३१० | ३,३३७ |
| मृत व्यक्ती (संख्या) | ४४१ | ४७४ |
| जखमी व्यक्ती (संख्या) | ४,८१४ | ४,७०३ |
| दर लाख किमी मागे अपघात दर | ०.१६ | ०.१७ |
| अपघातस्थळी अदा केलेली रक्कम (₹ कोटी) | ०.३३ | ०.२९ |
| अंतिम भरपाई (₹ कोटी) | ७९.३१ | ५०.५२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## कोविड -१९ महामारी कालावधीत मरामाप महामंडळाने केलेल्या उपाययोजना

९.२० कोविड - १९ लॉकडाऊन कालावधी दरम्यान राज्य शासनाच्या निर्देशानुसार मरामाप महामंडळाने अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी वाहतूक सुरू केली. यासाठी महामंडळाने दररोज सरासरी ४२५ नियते व २,००४ फेऱ्यांद्वारे एक लाख किमीची शहरी वाहतूक केली आहे. मालवाहतुकीवर होणाऱ्या विपरित परिणामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाने प्रवासी वाहनांमधून अत्यावश्यक व इतर वस्तू वाहून नेण्याची परवानगी दिली. मरामाप महामंडळाने वाहनांची अंतर्गत रचना बदलून माल वाहतुकीच्या उद्देशाने १,१०६ प्रवासी वाहने उपलब्ध करुन दिली. सन २०२०-२१ दरम्यान डिसेंबर अखेर महामंडळाने एकूण ५६,५९५ फेऱ्यांद्वारे एकूण ८२.६२ लाख सार्थ किमीद्वारे सुमारे ३.९६ लाख मे.टन मालाची वाहतूक केली आहे. तसेच महामंडळाच्या एकूण २२,७४९ प्रवासी वाहनांमधून १.७१ कोटी सार्थ किमी व्दारे ४.९२ लाख अडकलेल्या व्यक्तींची वाहतूक केली.

## शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक

९.२१ सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील प्रवासी वाहतुकीच्या प्रमुख साधनांपैकी एक साधन आहे. राज्यातील २२ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात मरामाप महामंडळ, बृहन्मुंबईत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १२ शहरात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषद प्रवासी वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा (₹ लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० |
| मरामाप महामंडळ (शहर वाहतूक) | ३३१ | २८३ | १.४७ | १.१८ | ०.५९ | ०.४४ | (-)२,४२१ | (-)२,६७९ |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन (बेस्ट) | २,८६५ | २,८३९ | २२.१० | २५.०८ | ४.६३ | ४.४१ | (-)१,०१,२८५ | (-)१,४२,४८१ |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड | १,९७२ | १,३८३ | १०.३५ | १०.४७ | २.८४ | २.८९ | (-)२४,७०५ | (-)३१,५१० |
| नवी मुंबई मनपा परिवहन | ३९१ | ३२६ | ३.०० | १.९२ | ०.८८ | ०.८० | (-)८,६९५ | (-)८,२३२ |
| नागपूर मनपा परिवहन | ३०१ | ३२१ | १.५६ | १.४५ | ०.६३ | ०.६६ | (-)९,४०० | (-)९,६०४ |
| ठाणे मनपा परिवहन | २८१ | २७४ | २.०८ | २.०५ | ०.५६ | ०.५५ | (-)७,०२५ | (-)१२,५३७ |
| वसई-विरार मनपा परिवहन | १३५ | १३० | ०.८६ | १.०० | ०.२८ | ०.२५ | - | - |
| कोल्हापूर मनपा परिवहन | ९६ | ९४ | ०.७१ | ०.७१ | ०.२१ | ०.२१ | (-)२५१ | (-)३८७ |
| सोलापूर मनपा परिवहन | ३१ | २८ | ०.१२ | ०.१४ | ०.०८ | ०.०५ | (-)१,०७४ | (-)१,०६७ |
| कल्याण-डोंबिवली मनपा परिवहन | ६२ | ६५ | ०.३५ | ०.३४ | ०.११ | ०.१० | (-)२,५२० | (-)१,८१० |
| मिरा-भाईंदर मनपा परिवहन | ३१ | ४४ | ०.२६ | ०.३५ | ०.०८ | ०.११ | (-)८७६ | (-)१,२५३ |
| अमरावती मनपा परिवहन | २५ | २५ | ०.२६ | ०.२७ | ०.०३ | ०.०३ | (-)१२२ | (-)१२७ |
| अकोला मनपा परिवहन | १६ | ८ | ०.०५ | ०.०२ | ०.०३ | ०.०२ | - | (-)२४ |
| खोपोली नगरपरिषद परिवहन | १० | १६ | ०.०४ | ०.०४ | ०.०२ | ०.०२ | ७ | १३ |
| लातूर मनपा परिवहन | ९ | १४ | ०.२४ | ०.०४ | नगण्य | ०.०२ | ४४ | १६ |
| अहमदनगर मनपा परिवहन | - | १२ | - | ०.०५ | - | ०.०२ | - | (-)३.८३ |

टिप : अहमदनगर मनपा परिवहन बस सेवा जुलै २०१९ पासून सूरु झाली आहे

*आधार :* मरामाप महामंडळ , बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, पुणे महानगर परिवहन महामंडळ व संबधित महानगरपालिका / नगरपरिषद

## रेल्वे

९.२२ रेल्वे ही प्रमुख सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक हे रेल्वे वाहतुकीचे दोन प्रमुख विभाग आहेत. दि.३१ मार्च, २०२० रोजी राज्यातील लोहमार्गाची कोकण रेल्वेसह एकूण लांबी ६,२०९.९८ किमी होती व ती भारतातील एकूण (६७,९५५.६४ किमी) लांबीच्या ९.१ टक्के आहे. राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२६ राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती**

(दि. ३१ डिसेंबर,२०२० रोजी)

| मार्गाचे नाव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|
| पुणे-मिरज लोंढा (दुपदरीकरण) | ४६६ | ४,६७०.०० | २५ |
| वर्धा - नांदेड, यवतमाळ - पुसद मार्गे (नवीन मार्ग) | २८४ | ३,१६८.२९ | २७ |
| इटारसी - नागपूर तिसरा मार्ग | २८० | २,४४९.९१ | १० |
| अहमदनगर - नारायणडोह - बीड - परळी - वैजनाथ (नवीन मार्ग) | २६१ | ४,७९४.६० | ६२ |
| दौंड - मनमाड | २४८ | २,०८१.२७ | ३१ |
| मनमाड - जळगांव तिसरा मार्ग | १६० | १,०३५.१६ | २० |
| वर्धा - बल्लारशहा तिसरा मार्ग | १३२ | १,२८३.४९ | २२ |
| वर्धा - नागपूर चौथा मार्ग | ७६ | ६३७.९५ | ३६ |
| वर्धा - सेवाग्राम-नागपूर तिसरा मार्ग | ७६ | ५४०.०२ | ३६ |
| कल्याण - कसारा तिसरा मार्ग | ६८ | १,३८७.५२ | २५ |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ६४ | ७३६.४४ | ४०$ |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | ५४ | १,७८१.९८ | ६८$$ |
| भुसावळ - जळगांव तिसरा मार्ग | २४ | ३२५.०० | ९४ |
| जळगांव - भूसावळ चौथा मार्ग | २४ | २६१.३७ | ४० |
| तिगाव - चिचोंदा तिसरा मार्ग | १७ | १७५.६६ | १०० |

*आधार :* मध्य रेल्वे $ फलटण ते लोणंद मार्ग कार्यान्वेत $$ बेलापूर ते खारकोपर मार्ग कार्यान्वेत

## मुंबई उपनगर रेल्वे

९.२३ उपनगरीय रेल्वे जाळे हे मुंबईमधील सार्वजनिक वाहतूकीचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे यंत्रणा पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे या दोन विभागीय रेल्वे द्वारे चालविली जाते. हार्बर व ट्रान्स हार्बर मार्ग हे मध्य रेल्वेचे भाग आहेत. सन २०१९-२० मध्ये दर दिवशी एकूण २२५ लोकल गाड्यांच्या ताफ्याने ३,०३१ फेऱ्यांद्वारे सरासरी ८५.३ लाख प्रवाशांची वाहतूक केली.

९.२४ मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पातील रेल्वे मार्गाची कामे करीत आहे. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा एक मधील कामे पूर्ण झाली आहेत. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील प्रकल्पांची सद्यस्थिती**

(दि. ३१ ऑक्टोबर, २०२० रोजी)

| प्रकल्पाचे नाव | मार्गिकेची लांबी (मार्ग किमी) | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प - टप्पा २** | | | | |
| ठाणे-दिवा (अतिरिक्त पाचवा व सहावा मार्ग) | ९ | ५०२.३६ | ५५१.०५ | जून, २०२१ |
| मुंबई सेंट्रल-बोरीवली (अतिरिक्त सहावा मार्ग) | ३० | ९१८.५३ | ३९८.५६ | मार्च, २०२३ |
| सीएसएमटी-कुर्ला (अतिरिक्त पाचवा व सहावा मार्ग) | १५ | १,३६७.०० | १९६.५७ | मार्च, २०२४ |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प - टप्पा ३** | | | | |
| मध्य रेल्वे अंतर्गत पनवेल - कर्जत मार्गावरील नवीन उपनगरीय कॉरीडोर | २८ | २,७८२.०० | २९१.४७ | मार्च, २०२४ |
| मध्य रेल्वे अंतर्गत ऐरोली - कळवा (उन्नत) मार्गावरील नवीन उपनगरीय कॉरीडोर | ४ | ४७६.०० | ८३.३५ | मार्च, २०२३ |
| पश्चिम रेल्वे अंतर्गत विरार - डहाणू रोड रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण | ६३ | ३,५७८.०० | १२७.३६ | मार्च, २०२४ |
| मध्य व पश्चिम रेल्वेवरील मीड सेक्शनवर बेकायदा प्रवेश नियंत्रण | - | ५५१.०० | १३०.९९ | मार्च, २०२४ |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा ३ अ** | | | | |
| कल्याण-बदलापूर (तिसरा व चौथा मार्ग) | १४ | १,५१०.०० | ०.४० | मार्च, २०२५ |
| स्थानक सुधारणा | - | ९४७.०० | १.०५ | मार्च, २०२५ |
| बोरीवली - विरार पाचवा व सहावा मार्ग | २६ | २,१८४.०० | ०.२० | मार्च, २०२५ |

*आधार :* मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन सीएसएमटी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

९.२५ दुर्घटना टाळण्यासाठी उपनगरीय रेल्वे आगमन तसेच सुरक्षेविषयीच्या जागरुकतेच्या घोषणांव्यतिरिक्त फूट ओव्हरब्रिजचे बांधकाम, भुयारी मार्ग, उपनगरीय रेल्वे ट्रॅकवरील नागरीकांच्या बेकायदा प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी भिंतींचे बांधकाम, बेकायदा प्रवेश ठिकाणांवर सील बंदी, विद्युत खांबांचे स्थलांतरण करणे, इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमींची (कारणनिहाय) संख्या तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमींची (कारणनिहाय) संख्या**

| अपघाताचे कारण | २०१८ | | २०१९ | | २०२० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी |
| रुळ ओलांडतांना | १,६१९ | ३२३ | १,४५५ | २७६ | ७३० | १२९ |
| रेल्वे व फलाट दरम्यान पडून | ६ | ८ | ४ | ७ | १ | १ |
| रेल्वेमधून पडून | ७११ | १,५८५ | ६११ | १,४०६ | १७७ | ३६१ |
| रेल्वेच्या खांबाचा धक्का लागून | १९ | ९० | ९ | ५५ | २ | १२ |
| अन्य $ | ६२६ | १,३४३ | ६१२ | १,४५० | २०६ | ३७५ |
| **एकूण** | **२,९८१** | **३,३४९** | **२,६९१** | **३,१९४** | **१,११६** | **८७८** |

$ विजेचा धक्का लागून, आत्महत्या, नैसर्गिक मृत्यू, रासायनिक विश्लेषणासाठी संदर्भित केलेली प्रकरणे, इत्यादी

*आधार* : मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२६ महानगर क्षेत्रासाठी सुरक्षित, विश्वसनीय, कार्यक्षम, किफायतशीर, प्रवाशांकरिता सुलभ आणि पर्यावरण दृष्ट्या शाश्वत अशा शीघ्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

## मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२६.१ शीघ्र वाहतूक व्यवस्थेवर आधारीत मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प हा सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येत आहे. मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची ऑक्टोबर, २०२० पर्यंतची सद्यस्थिती तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची सद्यस्थिती**

(₹ कोटी)

| मेट्रो लाईन / प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च + | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती+ |
|---|---|---|---|---|---|
| २ ए - दहिसर - डी. एन. नगर (१८.६ किमी) | २०१६ | ६,४१० | २,४७०.९६ | २०२०-२१ | ८८ टक्के स्थापत्य काम पूर्ण |
| २ बी -डी. एन. नगर-मंडाळे (२३.६ किमी) | २०१८ | १०,९८६ | ८३४.०९ | २०२२-२३ | काम प्रगतीपथावर |
| ३ कुलाबा - वांद्रे - सीप्झ (३३.५ किमी) | २०१६ | २३,१३६ | १५,९१०.०० | २०२२-२३ | काम प्रगतीपथावर |
| ४ वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१७ | १४,५४९ | ५७८.६२ | २०२१-२२ | स्थापत्य कामे प्रगतीपथावर |
| ४ अ कासारवडवली - गायमुख (२.७ किमी) | २०१९ | ९४९ | ४४.५० | २०२२-२३ | स्थापत्य कामे प्रगतीपथावर |
| ५ ठाणे -भिवंडी - कल्याण (२३.५ किमी) | २०१९ | ८,४१७ | १६४.९५ | २०२३-२४ | काम प्रगतीपथावर |
| ६ स्वामी समर्थ नगर - विक्रोळी (१४.५ किमी ) | २०१८ | ६,६७२ | ४७५.०० | २०२१-२२ | २३ टक्के स्थापत्य काम पूर्ण |
| ७ अंधेरी (पू.) - दहिसर (पू.) (१६.५ किमी) | २०१६ | ६,२०८ | १,९९६.१७ | २०२०-२१ | ८३ टक्के स्थापत्य काम पूर्ण |
| ९ दहिसर (पु) ते मिरा भाईंदर आणि अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (१३.५ किमी) | २०१९ | ६,६०७ | १५०.०० | २०२३-२४ | स्थापत्य कामे प्रगतीपथावर |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ + ऑक्टोबर, २०२० पर्यंत

## नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२६.२ महाराष्ट्र शासन सिडको मार्फत नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाची टप्या - टप्याने अंमलबजावणी करीत आहे. पहिल्या टप्प्यात सीबीडी बेलापूर - पेंधार हा ११ उन्नत स्थानके असलेला ११.१० किमीचा उन्नत मार्ग सिडकोमार्फत विकसित करण्यात येत असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ३,०६३.६३ कोटी आहे. सदर प्रकल्पांतर्गत डिसेंबर, २०२० अखेर ₹ २,०४० कोटी खर्च झाला.

## नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२६.३ नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प ३८.२२ किमी लांबीचा असून यामध्ये ३८ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण विस्तार उत्तर-दक्षिण मार्ग (१९.८१ किमी व १८ स्थानके) व पूर्व-पश्चिम मार्ग (१८.४१ किमी व २० स्थानके) या दोन मार्गामध्ये विभागला आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ८,६८० कोटी आहे. डिसेंबर, २०२० अखेर ₹ ७,४८८.१९ कोटी खर्च झाला. या प्रकल्पामधील खापरी ते सीताबर्डी (१३.५ किमी) उत्तर दक्षिण मार्ग आणि लोकमान्य नगर ते सीताबर्डी (१०.८२ कि.मी.) पूर्व पश्चिम मार्ग जनतेसाठी खुले करण्यात आले आहेत.

## पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२६.४ पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची लांबी ३३.२८ किमी असून यामध्ये दोन मार्गांचा समावेश आहे. पिंपरी चिंचवड ते स्वारगेट मार्ग (परपल लाईन) १७.५३ किमी (११.४५ किमी उन्नत मार्ग व ६.०८ किमी भुयारी मार्ग) लांबीचा असून उन्नत मार्गावर नऊ व भुयारी मार्गावर पाच स्थानके आहेत. वनाज ते रामवाडी (ॲक्वा लाईन) हा १५.७५ किमी लांबीचा संपूर्णपणे उन्नत मार्ग असून १६ उन्नत स्थानके आहेत. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ११,४२० कोटी आहे. या प्रकल्पासाठी ४५.८६ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून त्यापैकी ४०.१५ हेक्टर जमीन संपादित केली आहे. जानेवारी, २०२१ अखेर भौतिक प्रगती ५० टक्के होती आणि ₹ ५,३८५.९३ कोटी खर्च झाला. हा प्रकल्प डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

# जलवाहतूक

९.२७ जलवाहतूक ही वाहतूकीच्या अन्य पर्यायांच्या तुलनेत किफायतशीर आणि पर्यावरणस्नेही आहे. राज्य शासन बंदरे क्षेत्रास चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विस्तारीत करुन त्याद्वारे औद्योगिक विकास साधण्याकरिता 'महाराष्ट्र मेरीटाईम बंदर विकास धोरण-२०१६' राबवित आहे. या धोरणाअंतर्गत हरितक्षेत्र बंदरे आणि संपर्क व्यवस्था, जेट्टी, किनारी मालवाहतूक आणि आंतरदेशीय जलमार्ग, शिपयार्ड, किनारी आर्थिक क्षेत्रे व सागरी प्रकल्प सुविधा, इत्यादी क्षेत्रांचा समावेश आहे. बंदर प्रकल्पांना विद्युत शुल्क, बिगर-शेती उपकर, मुद्रांक शुल्क, बंदर शुल्क यामध्ये सवलती आणि स्वामित्व हक्क रकमेत सूट देण्यात येत आहे.

## मोठी बंदरे

९.२७.१ राज्यात मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ही दोन मोठी बंदरे आहेत. सन २०१९-२० मध्ये मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट यांनी अनुक्रमे ६०६.९५ लाख मे. टन व ६८४.४९ लाख मे. टन मालाची वाहतूक केली. मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | मुंबई पोर्ट | | | जवाहरलाल नेहरू पोर्ट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | शेकडा बदल | २०१८-१९ | २०१९-२० | शेकडा बदल |
| **एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे.टन)** | **७८४.००** | **७७८.५०** | **(-)०.७०** | **१,१८८.३०** | **१,१८८.३०** | **०.००** |
| **माल वाहतूक (लाख मे.टन)** | **६०५.८८** | **६०६.९५** | **०.१८** | **७०७.०६** | **६८४.४९** | **(-)३.१९** |
| पैकी अ) आयात | ४२२.७३ | ४१८.६३ | (-)०.९७ | ३९३.६१ | ४०८.५१ | ३.७९ |
| ब) निर्यात | १८३.१५ | १८८.३२ | २.८२ | ३१३.४५ | २७५.९८ | (-)११.९५ |
| प्रवासी वाहतूक (हजार) | ४८.९० | १७५.१० | २५८.०८ | निरंक | निरंक | - |
| बंदरात आलेल्या बोटी (संख्या) | ५,८४९ | ६,१६२ | ५.३५ | २,५८२ | २,४९८ | (-)३.२५ |

*आधार* : मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट

## लहान बंदरे

९.२७.२ राज्यातील ४८ लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय जेट्टी असून त्या ठिकाणाहून देखील मालाची वाहतूक केली जाते. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | **४५७.८६** | **४३६.६१** | २२५.२६ |
| *पैकी* अ) आयात | ३६२.४४ | ३६९.०४ | १९१.७९ |
| ब) निर्यात | ९५.४२ | ६७.५७ | ३३.४७ |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | **१९२.९१** | **१५९.०७** | ३२.५८ |
| *पैकी* अ) यांत्रिकी बोटीतून | १९०.०३ | १५७.३० | ३२.२६ |
| ब) बिगर-यांत्रिकी बोटीतून | २.८८ | १.७७ | ०.३२ |

आधार : महाराष्ट्र सागरी मंडळ + नोव्हेंबरपर्यंत

## सागरमाला कार्यक्रम

९.२७.३ बंदरामुळे होणाऱ्या विकासास चालना देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. किनारपट्टीवरील बंदरांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासासाठी या कार्यक्रमांतर्गत ₹ ३३६.२६ कोटी अंदाजित किंमतीच्या २२ प्रकल्पांना केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे.

## मरीना

९.२७.४ अनधिकृत व असंघटीत नांगरवाड्यांमुळे जलक्षेत्रामध्ये झालेली दाटी कमी होण्यास मरीनामुळे मदत होईल. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३० बोटी नांगरण्याकरिता पनवेल जवळील बेलापूर खाडी येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. गेट वे ऑफ इंडिया नजिकच्या समुद्रात नांगरुन ठेवलेल्या नौका व स्पीड बोटी मरीनामध्ये सुरक्षित ठेवता येतील.

## रो-रो सेवा

९.२७.५ नवीन भाऊचा धक्का (मुंबई) ते मांडवा बंदर (रायगड) येथे आणि रायगड जिल्ह्यातील आगरदांडा ते दिघी येथे रो-रो सेवा सुरु करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील करंजा येथे जेट्टी व प्रवासी सुविधांचे काम पूर्ण झाले असून रेवस येथील काम प्रगती पथावर आहे. गोराई-बोरीवली, मार्वे-मनोरी, भाईंदर-वसई आणि नारिंगी (विरार) - खारवाडेश्री या जलमार्गांवर रो-रो सेवा सुरु करण्यासाठी रो रो जेट्टींची कामे प्रगतीपथावर आहेत.

## हवाई वाहतूक

९.२८ राज्यात १३ विमानतळे कार्यान्वित आहेत. निवडक विमानतळ निहाय वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ निवडक विमानतळ निहाय वाहतूक विषयक सांख्यिकी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | माल वाहतूक (मे.टन) | |
|---|---|---|---|---|
| | २०१९ | २०२० | २०१९ | २०२० |
| **अ) देशांतर्गत** | **४६८.१४** | **४५८.४९** | **३,४४,७८८** | **३,३०,१७०** |
| मुंबई | ३४३.९३ | ३३५.१८ | २,८६,४८८ | २,८२,५०६ |
| पुणे | ८८.१९ | ७९.२७ | ४७,२७८ | ३७,६४५ |
| नागपूर | २६.९६ | २९.४६ | ८,४५० | ८,६६९ |
| औरंगाबाद | ३.४७ | ३.४६ | २,००७ | ९८१ |
| जुहू (मुंबई) | १.४८ | १.५८ | ३४० | ३६२ |
| जळगाव | ०.०२ | ०.१५ | ० | ० |
| कोल्हापूर | ०.१८ | १.३१ | ० | ० |
| नांदेड | १.१८ | १.३७ | ० | ० |
| शिर्डी | २.२९ | ५.६९ | ० | ० |
| ओझर नाशिक (एचएएल) | ०.४४ | १.०२ | २२५ | ७ |
| **ब) आंतरराष्ट्रीय** | **१४६.३३** | **१२५.२१** | **६,७८,०६४** | **५,८२,५३४** |
| मुंबई | १४२.७६ | १२२.४९ | ६,७६,९७२ | ५,८१,२७६ |
| पुणे | २.५० | १.५५ | ११४ | ३४१ |
| नागपूर | १.०६ | १.१५ | ९६६ | ९१७ |
| औरंगाबाद | ०.०१ | ०.०२ | - | ० |
| ओझर नाशिक (एचएएल) | - | - | १२ | ० |
| **एकूण (अ + ब)** | **६१४.४७** | **५८३.७०** | **१०,२२,८५२** | **९,१२,७०४** |

*आधार :* भारतीय विमानतळ प्राधिकरण एचएएल हिंदुस्थान ऐरोनॉटीक्स लिमिटेड

९.२८.१ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळाचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर चार टप्प्यात प्रस्तावित असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची अंदाजित मूलभूत किंमत ₹ १४,१७९ कोटी आहे. हे विमानतळ वार्षिक सहा कोटी प्रवासी व १५ लाख मे.टन माल वाहतूक क्षमतेचे नियोजन असणारे सर्वात मोठ्या हरित क्षेत्र विमानतळांपैकी एक असेल.

## दळणवळण

९.२९ टपाल, दूरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. राज्यातील टपाल सेवेबाबतची सांख्यिकी तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

९.३० राज्यात सप्टेंबर, २०२० अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या ९.७ कोटी होती, ती सर्व राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे.

९.३१ नोव्हेंबर, २०२० अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ४३.६१ लाख होती. प्रति लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ३,५१८ व १,०३,७०० होती. दूरध्वनी व भ्रमणध्वनीं जोडण्यांची आकडेवारी तक्ता ९.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३३ राज्यातील टपाल सेवेबाबतची सांख्यिकी**

(संख्या)

| विवरण | क्षेत्र | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|
| टपाल कार्यालये | ग्रामीण | ११,५०७ | ११,४९९ |
| | नागरी | १,२३७ | १,२४६ |
| | **एकूण** | १२,७४४ | १२,७४५ |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ३५,८४२ | ३१,६५६ |
| | नागरी | ७,९३४ | ६,४४९ |
| | **एकूण** | ४३,७७६ | ३८,१०५ |
| डिलिव्हरी पोस्टमेन (टपाल सेवकांसह) | ग्रामीण | ४,५०० | ७,०९५ |
| | नागरी | ४,९५० | ४,०६२ |
| | **एकूण** | ९,४५० | ११,१५७ |

*आधार :* जीपीओ, मुंबई

**तक्ता ९.३४ दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्या**

(लाख)

| सेवापुरवठादार | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १७.६२ | १२.४० | १६.९८ | ११.७८ | १६.३८ | ११.५३ |
| बीएसएनएल | १०.८४ | ७२.०४ | ८.७८ | ७०.५१ | ८.४९ | ६९.०० |
| भारती | ४.६५ | २४१.८४ | ५.१२ | २६०.२१$ | ५.१६ | २७०.६०$ |
| टाटा | ८.३८ | १९.७० | ७.९७ | - | ७.३३ | - |
| वोडाफोन आयडीया | ०.७६ | ६१०.९७ | १.१६ | ५०८.३९ | १.२३ | ४३७.३९ |
| रिलायन्स/जिओ | - | ३५३.३७ | २.५१ | ४५५.३३ | ४.०५ | ४९६.९५ |
| रिलायन्स कॉम | २.२० | ०.०६ | १.७४ | ०.०३ | ०.९७ | ०.०२ |
| **एकूण** | **४४.४५** | **१,३१०.३८** | **४४.२६** | **१,३०६.२७** | **४३.६१** | **१,२८५.४९** |
| **भारत एकूण** | **२१६.९६** | **११,६१८.१२** | **२०२.१८** | **११,५७७.४८** | **२००.६९** | **११,५५१.९५** |

$ भारती व टाटा टेली सर्व्हीसेस एकत्रित + नोव्हेंबरपर्यंत

*आधार :* भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण

* * * * *

# परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७[$] | १,०६५[$] | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | २१,१७६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | ९,५८८ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६१ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | २,८१९ |
| **एकूण (अ-१)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३६,६४४** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णि ऊर्जा महामंडळ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २,०४८[@] | ४,६८६ | ७,१४१ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ ना** | **उ ना** | **उ ना** | **उ ना** | **२,१८५** | **५,३७६** | **७,८३१** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **४४,४७५** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३[$] | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ९५,४६० |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ७,९९९ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ६,१०४ |
| (४) नवीकरणीय ऊर्जा [#] | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | १३,७५१ |
| **एकूण** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९[#]** | **८३,०१७** | **१,२३,३१४** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ४६,५०७ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २९,३०१ |
| (३)कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २९,११८ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | १३,१२३ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | १८४ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ ना | १,१९९ | १,९८३ | ६,५७९ |
| (७)सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | |
| (८) संकीर्ण | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | ६५२ |
| **एकूण** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,२५,४६४** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ३७८.७ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | १०६.८ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण
(२) महानिर्मिती
(३) महावितरण
(४) बेस्ट
(५) टाटा पॉवर कं. मर्या.
(६) अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या.

उ ना उपलब्ध नाही

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.

(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.

(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे.

(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.

(५) टाटा पॉवर व अदानी इलेक्ट्रिसिटी वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.

(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

# परिशिष्ट ९.२

## राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी

## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | -- | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १४ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १५ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| १६ | २०१५-१६ | ४,९०१ | ५,२४९ | ३३,६९५ | ५२,२७५ | ५६,५६४ | १,५३,४३५ | ३,०५,११९ |
| १७ | २०१६-१७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| १८ | २०१७-१८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| १९ | २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| २० | २०१९-२०* | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

# परिशिष्ट ९.३

## जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. क्र. | जिल्हा / रूंदी (मीटर) | साध्य लांबी २०१८-१९ ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | साध्य लांबी २०१९-२०* ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ४९ | ० | ० | ० | ४९ | ४९ | ० | ० | ० | ४९ |
| २ | ठाणे | १९५ | २४३ | ८७२ | २,०३८ | ३,३४७ | ३९८ | २५३ | १,२२१ | २,४६६ | ४,३३८ |
| ३ | पालघर | ३,६०५ | ४३९ | १,९१७ | ९३७ | ६,८९८ | ५५० | ४९२ | १,६५५ | ४,३५० | ७,०४६ |
| ४ | रायगड | १,०८७ | ७९५ | १,०६० | २,३१२ | ५,२५३ | ८६२ | १,५९२ | ९०५ | २,४७० | ५,८२९ |
| ५ | रत्नागिरी | ४६५ | ८५९ | ८,३४५ | २२७ | ९,८९६ | ५३३ | ८५९ | ८,३६० | २२७ | ९,९७९ |
| ६ | सिंधुदुर्ग | ११७ | ९४६ | ६,९१९ | ० | ७,९८२ | १९७ | ९६१ | ३,४७५ | ३,४३३ | ८,०६६ |
| | **कोकण विभाग** | **५,५१८** | **३,२८२** | **१९,११३** | **५,५१३** | **३३,४२६** | **२,५८८** | **४,१५७** | **१५,६१५** | **१२,९४७** | **३५,३०७** |
| ७ | अहमदनगर | ५३१ | १,४७० | ११,१४९ | ६,९१४ | २०,०६४ | १,६०० | १,३९२ | ९,२७९ | ३,३७९ | १५,६५० |
| ८ | नाशिक | ३३१ | १,८२५ | १०,४०४ | ५,८९६ | १८,४५६ | १,५२५ | १,७४८ | ९,७२८ | ६,६८२ | १९,६८३ |
| ९ | धुळे | २७७ | ५३८ | ४,१३८ | १,१९८ | ६,१५१ | ९४७ | ५१९ | ४,२२१ | ७७ | ५,७६५ |
| १० | नंदुरबार | १८० | ५०५ | ३,९४५ | १,९७१ | ६,६०१ | ३६६ | ५१४ | ४,४९७ | ७८ | ५,४५५ |
| ११ | जळगाव | ३३० | १,०७२ | ५,२३० | ५,६८३ | १२,३१६ | ९४१ | १,२८३ | ४,९६८ | २,७६० | ९,९५३ |
| | **नाशिक विभाग** | **१,६४९** | **५,४०९** | **३४,८६६** | **२१,६६३** | **६३,५८८** | **५,३७९** | **५,४५७** | **३२,६९४** | **१२,९७६** | **५६,५०६** |
| १२ | पुणे | ८०१ | १,२६४ | १६,३७९ | २०१ | १८,६४६ | १,९२९ | १,२४५ | १६,३६७ | १३० | १९,६७० |
| १३ | सातारा | ३८३ | ९४३ | ७,९५३ | ३,१६१ | १२,४३९ | ९९० | १,०९६ | ८,६६८ | ३,३१४ | १४,०६९ |
| १४ | सांगली | ६८५ | १,०६५ | ४,४११ | ६,१८८ | १२,३४९ | ८६५ | १,०७० | ४,२५३ | ६,१३८ | १२,३२६ |
| १५ | कोल्हापुर | ५७१ | १,०१७ | ३,८६९ | ३,१५४ | ८,६११ | ८६४ | १,०४४ | ३,८५३ | ३,१४६ | ८,९०७ |
| १६ | सोलापूर | ९२८ | ८८८ | ४,८६२ | १०,०७९ | १६,७५७ | १,६१३ | ९८९ | १०,२२५ | ४,९६४ | १७,७९० |
| | **पुणे विभाग** | **३,३६८** | **५,१७७** | **३७,४७५** | **२२,७८२** | **६८,८०२** | **६,२६२** | **५,४४३** | **४३,३६६** | **१७,६९१** | **७२,७६२** |
| १७ | औरंगाबाद | ६७१ | ६९५ | ६,७८९ | १,९७१ | १०,१२६ | ८५८ | ८३३ | ६,७२१ | १,८८८ | १०,३०० |
| १८ | जालना | ३९३ | ४५२ | ४,८१९ | १,७३२ | ७,३९६ | ७०२ | ३९४ | ४,८२४ | १,५७९ | ७,४९९ |
| १९ | परभणी | १९३ | ३१७ | ३,९८१ | ९३५ | ५,४२६ | ४३८ | १८४ | ३,८९८ | ८९८ | ५,४१८ |
| २० | हिंगोली | १३४ | २८६ | ३,४२४ | १७ | ३,८६१ | १७२ | २२० | ३,३९८ | ६९ | ३,८५९ |
| २१ | नांदेड | ३२१ | १,२९७ | ८,२६१ | १,५३१ | ११,४१० | १,०८८ | ६६७ | ७,८०५ | २,१३७ | ११,६९७ |
| २२ | बीड | ६६० | ६२९ | ८,३९५ | २,६४३ | १२,३२७ | १,०८९ | ४३५ | ८,२५२ | २,५८९ | १२,३६५ |
| २३ | उस्मानाबाद | ३७९ | १,०३३ | ४,८६८ | १,२११ | ७,४९१ | ५१५ | ९०८ | ४,५८४ | १,४४७ | ७,४५४ |
| २४ | लातूर | २८५ | १,००२ | ५,४०३ | ९८२ | ७,६७२ | ६९४ | ७६७ | ५,३५८ | ९९७ | ७,८१६ |
| | **औरंगाबाद विभाग** | **३,०३६** | **५,७११** | **४५,९४०** | **११,०२२** | **६५,७०९** | **५,५५५** | **४,४०८** | **४४,८४०** | **११,६०४** | **६६,४०७** |
| २५ | बुलढाणा | ३०२ | ८१३ | २,८५९ | १,४७० | ५,४४३ | ४३० | ७१३ | २,८५१ | १,४७० | ५,४६५ |
| २६ | अकोला | १९१ | ५४७ | १,४२९ | १,०७९ | ३,२४६ | ६२६ | ५१० | १,३७८ | १,१०१ | ३,६१५ |
| २७ | वाशिम | २२५ | ४४१ | १,१३८ | १,१६५ | २,९७० | ३५४ | ४०३ | १,१४१ | १,१६२ | ३,०६० |
| २८ | अमरावती | ४९१ | ९२० | १,८६४ | ४,६८४ | ७,९५९ | ६४९ | ९२७ | १,८५६ | ४,६८२ | ८,११४ |
| २९ | यवतमाळ | ३८८ | ९२६ | ३,५३९ | ३,४९४ | ८,३४७ | ७२७ | ९२८ | ३,५३९ | ३,४९४ | ८,६८८ |
| | **अमरावती विभाग** | **१,५९७** | **३,६४७** | **१०,८२९** | **११,८९२** | **२७,९६४** | **२,७८६** | **३,४८१** | **१०,७६५** | **११,९०९** | **२८,९४२** |
| ३० | वर्धा | ३२३ | ६५७ | १,८०३ | २,५३४ | ५,३१६ | ४४४ | ५१८ | १,८०३ | २,५३४ | ५,२९९ |
| ३१ | नागपूर | ६३५ | १,०४३ | ६,००२ | ६,६९३ | १४,३७२ | १,०८२ | ६४५ | ६,३५४ | ६,५८४ | १४,६६६ |
| ३२ | भंडारा | १३४ | ४१४ | २,८२९ | २,७९८ | ६,१७५ | ३४८ | २४६ | २,८५९ | २,७६९ | ६,२२१ |
| ३३ | गोंदिया | १६८ | ४३९ | ३,५६२ | ३,२३४ | ७,४०३ | २१८ | ३१७ | ३,६७५ | ३,२२७ | ७,४३८ |
| ३४ | चंद्रपुर | ३९७ | ६०२ | ५,९४८ | २,६१८ | ९,५६५ | ३१२ | ६१२ | ५,९४२ | २,६१८ | ९,४८४ |
| ३५ | गडचिरोली | २९६ | ७२३ | ४,६७७ | ५८२ | ६,२७८ | ४२२ | ७४६ | ४,६२२ | ५२० | ६,३१० |
| | **नागपूर विभाग** | **१,९५३** | **३,८७५** | **२४,८२१** | **१८,४५९** | **४९,१०९** | **२,८२६** | **३,०८४** | **२५,२५५** | **१८,२५३** | **४९,४१८** |
| | **महाराष्ट्र राज्य** | **१७,१२०** | **२७,१०२** | **१,७३,०४४** | **९१,३३२** | **३,०८,५९७** | **२५,३९६** | **२६,०३०** | **१,७२,५३६** | **८५,३७९** | **३,०९,३४२** |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

* अस्थायी

## परिशिष्ट ९.४

## राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

(१ जानेवारी रोजी)

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१९ | २०२० | २०२१* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | २,५५,६६,१३४ | २,७७,११,४३० | २,८३,४०,४०८ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ४८,५७,२०३ | ५२,३६,३७७ | ५३,८८,४७५ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | ३,४३,४०२ | ३,७१,४२९ | ३,७३,२३७ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ९,५१,२२२ | १०,५२,२२८ | १०,६०,६१६ |
| ५ | स्टेज कॅरेजेस | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ३७,५३३ | ४०,३३५ | ४०,४८२ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ६४,१०२ | ७१,६५६ | ७२,२७३ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | | १८,७७,३१३ | १९,०७,४०८ |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | १६,३०,२९५ | -- | -- |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | ११,५७० | -- | -- |
| | (३) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | उ ना | उ ना | ७५,३०१ | -- | -- |
| | (४) विद्युत | -- | -- | -- | -- | -- | २९९ | -- | -- |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १५,८४८ | १६,७७३ | १७,३६२ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | २९,२६४ | ३२,५३० | ३२,६२८ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | १२,५४६ | १२,८९७ | १३,०३७ |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ४,१०,६१० | ४,२५,२५९ | ४,३२,४१२ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ७,५४,५९८ | ८,२७,५८१ | ८,६८,७५० |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ६७,५८५ | ८५,७८५ | ८९,१५९ |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **३,४८,२७,५१२** | **३,७७,६१,५९३** | **३,८६,३६,२४७** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | २८,७८८ | ३०,७४६ | ३१,१६८ |
| | सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील असलेल्या दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | ११५ | १२२ | १२५ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | १३ | १४ | १४ |

*आधार* - परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी    उ ना उपलब्ध नाही.

# 10

# ºÉÉ¨ÉÉÊVÉEò IÉjÉ



# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ सक्षम, सुशिक्षित व कुशल मनुष्यबळ यांच्या सहभागाने आर्थिक विकास अधिक परिणामकारक होऊ शकतो व म्हणूनच योजनाबद्ध विकासात सामाजिक क्षेत्राच्या विकासावर अधिक भर देण्यात येतो. समाजातील विशेषत: गरीब व कमकुवत वर्गाचे रहाणीमान उंचावणे हा नियोजनबद्ध विकासाचा मूळ उद्देश आहे. वंचित घटकांना केंद्रस्थानी ठेऊन शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बाल कल्याण, रोजगार, गृहनिर्माण, पाणी पुरवठा व स्वच्छता, सामाजिक न्याय, इत्यादी सामाजिक क्षेत्रामध्ये शासन सेवा पुरवते.

## शिक्षण

१०.२ शिक्षण हे राष्ट्रीय तसेच वैयक्तिक विकास साधण्यासाठी एक महत्त्वाचे साधन असल्याचे सर्वत्र मानण्यात येते. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याची संधी सर्वांना उपलब्ध झाल्यामुळे शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासन शिक्षण गुणवत्ता वृद्धी करिता व उपलब्धततेसाठी विविध उपाययोजना करीत आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

१०.३ केंद्र शासनाने दि. २९ जुलै, २०२० रोजी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' मंजूर केले आहे. शाश्वत विकास ध्येय ४ मध्ये नमुद लक्ष साध्य करण्याकरीता देशातील शालेय तसेच उच्च शिक्षण प्रणालीमध्ये परीवर्तनशील सुधारणा घडवून आणण्याकरीता मार्ग सुकर करणे हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची ठळक वैशिष्ट्ये

१. शालेय शिक्षण

- सन २०३० पर्यंत १०० टक्के पटसंख्येचे प्रमाण साध्य करण्याकरीता पूर्व प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण
- खुल्या शालेय शिक्षण व्यवस्थेव्दारे शाळाबाह्य मुलांना मुख्य शिक्षण प्रवाहात आणणे
- प्रचलित १०+२ रचने ऐवजी ३ ते ८ वर्षे (पायाभूत टप्पा), ८ ते ११ वर्षे (प्रारंभिक), ११ ते १४ वर्षे (मध्यम) आणि १४ ते १८ वर्षे (माध्यमिक) वयोगटास अनुरूप अनुक्रमे ५+३+३+४ अशी नवीन अभ्यासक्रम रचना अंमलात आणणे. नवीन अभ्यासक्रम अंतर्गत शाळाबाह्य ३ ते ६ वयोगटातील बालकांना १२ वर्षाच्या शालेय अभ्यासक्रमांतर्गत समाविष्ट करून घेणे
- इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षांमध्ये सहजता आणणे
- पतांकन प्रणाली अंगिकारणे आणि सार्वजनिक तसेच खाजगी शाळांचे नियमन करण्यासाठी स्वतंत्र प्राधीकरण
- पायाभूत साक्षरता व अंक ज्ञानावर विशेष भर
- इयता सहावी पासून इंटर्नशिप सह व्यवसाय शिक्षण देणे
- अध्यापनशास्त्रासाठी नवीन व सर्वसमावेशक 'राष्ट्रीय अभ्यासक्रम व रचना २०२१' तयार करणे

२. उच्च शिक्षण

- सन २०३५ पर्यंत उच्च शिक्षणामध्ये एकूण पटसंख्येचे प्रमाण ५० टक्कयांपर्यंत वाढवणे (सध्याचे देशाकरिता एकूण पटसंख्येचे प्रमाण २६.३ टक्के)
- बहुविध प्रवेश तसेच प्रस्थान पर्याय उपलब्ध असलेले तीन अथवा चार वर्षांकरिता लवचिक अभ्यासक्रमयुक्त पदवीपूर्व स्तरावरील व्यापक शिक्षण
- गुणांक स्थानांतर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता शैक्षणिक बँकेची स्थापना
- देशात जागतिक दर्जाच्या बहुविध शाखांमध्ये शिक्षण घेण्याची सुविधा असलेल्या 'शैक्षणिक व संशोधन विद्यापिठांची' स्थापना
- देशामध्ये संशोधन संस्कृतीचे संवर्धन व बळकटीकरण करण्याकरिता 'राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशन' ची निर्मिती
- देशातील वैद्यकीय व विधी शिक्षणाव्यतिरिक्त इतर सर्व शाखांमधील शिक्षणाकरीता 'भारतीय उच्च शिक्षण आयोग' या एकछत्री संस्थेची स्थापना

३. इतर बदल

- शिक्षण, मूल्यांकन, नियोजन आणि प्रशासनामध्ये सुधारणा घडविण्यासाठी तंत्रज्ञान वापराच्या कल्पनांचे मुक्त आदानप्रदान करण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच' या स्वायत्त मंडळाची स्थापना

- विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याकरिता 'परख' या राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राची स्थापना
- परदेशी विद्यापीठांना देशात केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करणे
- नवीन धोरणा अंतर्गत वंचित प्रदेश व घटकांसाठी विशेष शैक्षणिक विभाग आणि जेंडर समावेशाकरिता निधीची स्थापना करण्यावर भर

# प्राथमिक शिक्षण

## कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधी मधे केलेल्या उपाययोजना

१०.४ कोविड-१९ प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मार्च, २०२० पासून लॉकडाऊन अंतर्गत राज्यातील सर्व शाळा बंद करण्यात आल्या. लॉकडाऊन कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य रहाण्यासाठी शासनाने माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला व विविध संकेतस्थळे, पोर्टल, प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्लीकेशन्सच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येत असून 'घरी राहून शिक्षण' ही संकल्पना राबविण्यात आली. या प्रक्रियेत पालकांनाही सहभागी करून घेण्यात आले. घरी राहून शिक्षण घेण्यासाठी खालील उपक्रम राबविण्यात येत आहेत.

- अभ्यासमाला ('दीक्षा' ॲप च्या माध्यमातून शिक्षण) : राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषदेने माहिती तंत्रज्ञानावर आधारीत 'दीक्षा डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर फॉर स्कूल एज्युकेशन' हे वेबपोर्टल विकसित केले आहे.दीक्षा ॲपचा दैनिक दोन लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी, शिक्षक व पालक लाभ घेत आहेत. दीक्षा ॲपचा देशाच्या एकूण सरासरी वापरापैकी ४६ टक्के हिस्सा हा महाराष्ट्र राज्याचा आहे.
- शैक्षणिक दिनदर्शिका : इंटरनेट सुविधा उपलब्ध नसलेल्या भागातील विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेमार्फत शैक्षणिक दिनदर्शिका तयार करण्यात आली. जून, २०२० ते नोव्हेंबर, २०२० पर्यंत शैक्षणिक दिनदर्शिका विद्यार्थी, शिक्षक व पालकांपर्यंत स्मार्ट पीडीएफ तसेच विविध व्हॉट्सॲप समूहाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली.
- पाठ्यपुस्तकांचे वितरण : घरी राहून शिक्षण घेता यावे यासाठी शासनामार्फत सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.
- जिओ टी.व्ही. व जिओ सावन च्या माध्यमातून शिक्षण : जिओ टी.व्ही. च्या एकूण १२ शैक्षणिक चॅनेल च्या माध्यमातून इयत्ता तिसरी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण देण्यात येत आहे. याव्दारे विषयातील तज्ञ शिक्षकांच्या तासिकांचे प्रक्षेपण केले जाते.
- दूरदर्शन वरील कार्यक्रम : दूरदर्शन वरील गली गली सिम सिम, टिली मिली, विविध ज्ञानगंगा इ. शैक्षणिक कार्यक्रमांव्दारे शिक्षण देण्याचे काम सुरू आहे.
- गुगल क्लासरूम ऑनलाईन प्रशिक्षण : विद्यार्थी व शिक्षकांमध्येसंवाद राहाण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचे मार्फत शिक्षकांना ऑनलाईन स्वरूपामध्ये गुगल क्लासरूमचे प्रशिक्षण देण्यात आले.
- गोष्टींचा शनिवार ऑनलाईन कार्यक्रम: विद्यार्थ्यांमधील वाचन कौशल्याचा विकास करणे तसेच विद्यार्थ्यांसाठी सुश्राव्य व बोधात्मक गोष्टींचे वाचन करणे यासाठी युनिसेफ व प्रथम संस्थेच्या मदतीने 'गोष्टींचा शनिवार' या ऑनलाईन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली आहे.
- मैत्री विज्ञान व गणिताशी : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र व भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांच्या संयुक्त प्रकल्पांतर्गत विज्ञान व गणित विषयांच्या 'मैत्री करूया विज्ञान व गणिताशी' या प्रयोग व कृतींवर आधारित नाविन्यपूर्ण ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.
- शालेय पोषण आहार योजना : लॉकडाऊन कालावधीमध्ये पात्र विद्यार्थ्यांना शाळेत अथवा घरोघरी जाऊन तयार अन्नाऐवजी तांदूळ, मूगडाळ, हरभरा, इत्यादी धान्याचे वाटप करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थ्यांना धान्याचे वाटप घरपोच करण्याचे विशेष निर्देश देण्यात आले.

१०.५ राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या द्वारे विविध शैक्षणिक कार्यक्रम विशेषतः प्राथमिक शिक्षणासाठी राबविले जातात. सन २०१९-२० मध्ये राज्य शासनाचा प्राथमिक शिक्षणावरील खर्च ₹ २८,१०० कोटी होता. प्राथमिक (इयत्ता पहिली ते पाचवी) व उच्च प्राथमिक (इयत्ता सहावी ते आठवी) शिक्षणाचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.१ मध्ये देण्यात आले आहेत तर विभागनिहाय आकडेवारी परिशिष्ट १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (U-DISE) अंतर्गत नोंदविलेल्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | | १,०६,५४६ | १,०६,२३७ | १,०६,४९१ |
| ग्रामीण भागातील शाळांची टक्केवारी | | ७७.६ | ७७.२ | ७७.२ |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता | (अ) प्राथमिक | ३.२ | ३.२ | ३.२ |
| | (ब) उच्च प्राथमिक | १.७ | १.८ | १.७ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्षे वय) प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | | ९.९ | १०.० | १०.१ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्षे वय) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | | ९.० | ९.४ | ९.३ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | २१.१ | २१.५ | २१.६ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | | १५९.१ | १५७.४ | १५६.९ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४६.८ | ४६.९ | ४७.० |
| एकूण पटसंख्या प्रमाण | (अ) प्राथमिक | १००.१ | ९९.२ | ९८.५ |
| | (ब) उच्च प्राथमिक | ५९.० | ५८.३ | ५८.७ |
| सरासरी विद्यार्थी-वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | ३१ | ३० | २९ |
| शिक्षकांची संख्या (लाख) | | ५.४ | ५.२ | ५.३ |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | | २९:१ | ३०:१ | २९:१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | | |
| पिण्याचे पाणी | | ९८.८ | ९८.८ | ९९.३ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९८.८ | ९५.९ | ९२.९ |
| संरक्षक भिंत | | ८३.४ | ८२.६ | ८३.७ |
| संगणक | | ६८.२ | ५८.९ | ६३.३ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ८७.१ | ८९.५ | ९०.० |
| खेळाचे मैदान | | ८७.६ | ८५.१ | ८५.१ |
| ग्रंथालय | | ९५.० | ८१.२ | ८३.९ |
| विद्युत जोडणी | | ९४.७ | ९४.३ | ९३.५ |
| गळतीचे प्रमाण | (अ) प्राथमिक | ०.२१ | १.०९ | ०.०४ |
| | (ब) उच्च प्राथमिक | १.५६ | २.१५ | १.१७ |
| मुली मुले असमानता निर्देशांक | (अ) प्राथमिक | ०.८७ | ०.८९ | ०.८९ |
| | (ब) उच्च प्राथमिक | ०.८८ | ०.८८ | ०.८८ |

*आधार* : १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९

१०.६ एप्रिल, २०१० पासून राज्यात बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंमलात आहे. या अधिनियमांतर्गत बालकांना नजिकच्या शाळेत मोफत व सक्तीचे पूर्ण प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिनियमाद्वारे कोणत्याही बालकाला प्राथमिक शिक्षण घेण्यास व पूर्ण करण्यास प्रतिबंध होईल असे कोणत्याही प्रकारचे शुल्क अथवा आकार अथवा खर्च अदा करण्याची जबाबदारी नसेल अशी हमी देण्यात आली आहे. सदर अधिनियमांतर्गत स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळेतील (अल्पसंख्याक शाळा वगळून) एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश तसेच पूर्व प्राथमिक ते आठवी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्यात येते. या अधिनियमांतर्गत सन २०२०-२१ मध्ये एकूण ८६,९६२ विद्यार्थ्यांना शाळेमध्ये प्रवेश देण्यात आला. अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या सुरूवातीपासून वर्ष २०२०-२१ पर्यंत एकूण ४,७८,३३४ विद्यार्थ्यांना शाळेमध्ये प्रवेश देण्यात आला.

१०.६.१ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक शाळाबाह्य मुलास/मुलीस शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. सन २०१९-२० मध्ये ३३,८८८ शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यापैकी २०,९२१ मुलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये २६,४५३ शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यापैकी १३,७८४ मुलांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण

१०.७ सन २०१९-२० मध्ये राज्य शासनाचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च ₹ २२,०८९ कोटी होता. माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता नववी ते १२ वी) शिक्षणाचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.२ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (U-DISE) अंतर्गत नोंदविलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | | २६,८५७ | २७,४४६ | २८,०९३ |
| ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण | | ६२.५ | ६२.४ | ६१.९ |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता | (अ) माध्यमिक | ०.८ | ०.८ | १.८ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.३ | ०.३ | ३.५ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | ३२.६ | ३३.३ | ३४.७ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | | ६६.५ | ६६.१ | ६४.८ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४५.८ | ४६.० | ४६.५ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ९२.७ | ९१.५ | ९१.० |
| | (ब) उच्च माध्यमिक | ७१.२ | ७१.४ | ६८.७ |
| सरासरी विद्यार्थी-वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | ५५ | ४७ | ४४ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | | २.१० | २.४३ | २.५१ |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | | ३१:१ | २७:१ | २६:१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | | |
| पिण्याचे पाणी | | ९७.४ | ९९.७ | ९९.८ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९८.२ | ९७.७ | ९८.६ |
| संरक्षक भिंत | | ९१.४ | ९३.१ | ९३.७ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ७६.९ | ८२.५ | ८६.८ |
| खेळाचे मैदान | | ९५.५ | ९४.७ | ९५.१ |
| ग्रंथालय | | ९६.८ | ९०.२ | ९३.० |
| विद्युत जोडणी | | ९७.३ | ९८.४ | ९८.८ |
| संगणक | | ९५.१ | ८०.० | ८६.२ |
| संगणक व इंटरनेट | | ६६.३ | ७०.८ | ७०.४ |
| गळतीचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ६.६ | ८.८ | ६.४ |
| | (ब) उच्च माध्यमिक | २.९ | ४.८ | ४.४ |
| मुली मुले असमानता निर्देशांक | (अ) माध्यमिक | ०.९८ | १.०० | ०.८६ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.९६ | ०.९६ | ०.८७ |

*आधार*: १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## स्वअर्थसहाय्यित शाळा

१०.८ जानेवारी, २०१३ मध्ये स्वअर्थसहाय्यित नवीन शाळा स्थापन करणे व विद्यमान शाळांचा दर्जा वाढविणे यासाठी अधिनियम अस्तित्वात आला. स्वअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता प्राप्त शाळांची मंडळ निहाय व माध्यम निहाय संख्या तक्ता १०.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३ मंडळ निहाय व माध्यम निहाय स्वअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता प्राप्त शाळा**

| वर्ष | मंडळ | | | | माध्यम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य मंडळ | सीबीएसई | आयसीएसई/आयजीसीएसई/आयबी | एकूण | मराठी | इंग्रजी | उर्दू/हिंदी |
| २०१८ | ९१२ | १७३ | २२ | १,१०७ | १३८ | ९४२ | २७ |
| २०१९ | १,०४८ | २०३ | २६ | १,२७७ | २०० | १,०५६ | २१ |
| २०२० | १,०५० | २०३ | २७ | १,२८० | २०० | १,०५९ | २१ |

सीबीएसई सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयसीएसई इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयजीसीएसई इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयबी इंटरनॅशनल बॅचलरेट

*आधार* : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

## समग्र शिक्षा

१०.९ सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या तीन योजना समायोजित करून शिक्षणाच्या शाश्वत विकास ध्येयाच्या अनुषंगाने पूर्व-शालेय पासून उच्च माध्यमिक पर्यंत सर्वसमावेशक व समान दर्जेदार शिक्षणाची हमी देण्याकरिता 'समग्र शिक्षा' ही नवीन एकात्मिक योजना राज्यात सन २०१८-१९ पासून राबविण्यात येतआहे. या कार्यक्रमांतर्गत शालेय किमान मानकांची पूर्तता करण्याची खात्री देण्यात आली आहे. शालेय शिक्षणातील सामाजिक व मुला-मुलींमधील भेद कमी करणे हे सुद्धा लक्ष आहे. या कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययन फलनिष्पत्तीमध्ये वाढ करण्यास प्रोत्साहन दिले जाते. समग्र शिक्षा अंतर्गत आर्थिक प्रगती तक्ता १०.४ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.४ समग्र शिक्षा अंतर्गत आर्थिक प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | मंजूर निधी | खर्च |
|---|---|---|
| २०१८-१९ | १,८५४.५४ | १,३५४.०६ |
| २०१९-२० | २,८२५.४७ | १४०४.५३ |
| २०२०-२१+ | १८०७.४९ | ३२२.९६ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + डिसेंबरपर्यंत

## दिव्यांग समावेशक शिक्षण

१०.१० विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण व्यवस्थेत सर्वसाधारण मुलांसोबत दर्जेदार शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी राज्यात 'दिव्यांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात विशेष गरज असलेली मुले शोधून त्यांची वैद्यकीय तपासणी करणे, आवश्यकतेनुसार ब्रेललिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवणयंत्रे व उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादी शिक्षण विषयक आणि पुनर्वसनाकरिता सहाय्यभूत सेवा पुरवणे यांचा समावेश आहे. दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.५ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५ दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रमाची प्रगती**

| शैक्षणिक स्तर | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च+ (₹ कोटी) |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी) | २.५२ | ८७.३२ | २.५२ | ३१.६५ | २.५१ | २२.९६ |
| माध्यमिक (९ वी ते १२ वी) | ०.५५ | ४.४९ | ०.५५ | १.९७ | ०.५६ | ०.०० |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + नोव्हेंबरपर्यंत

## शालेय पोषण आहार योजना

१०.११ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पट नोंदणी व उपस्थिती वाढविणे आणि याबरोबरच त्यांचा पोषण मूल्य स्तर सुधारणे या उद्देशाने केंद्र शासनाने 'शालेय पोषण आहार योजना' सुरू केली. ह्या योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना तयार भोजन पुरविण्यात येते. शालेय पोषण आहार योजनेची प्रगती तक्ता १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६ शालेय पोषण आहार योजनेची प्रगती**

| इयत्ता | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ५ वी | ५६.९९ | ९३८ | ५१.४७ | ८०८ | ६०.७० | १५१ |
| ६ वी ते ८ वी | ३६.३४ | ६२८ | ३२.५६ | ६६१ | ३९.२४ | १२४ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजना

१०.१२ मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे व पालकांचा आर्थिक भार कमी करणे यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना सवलती देत आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७ शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | अपेक्षित खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | १.१० | ०.८८ | २.५७ | २.१२ | ३.३५ | २.३० |
| शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | २६.३४ | ३.७२ | १५.७१ | २.३८ | १५.७१ | ४.०० |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११ वी व १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण | १.३६ | १.२८ | ०.११ | ०.५४ | ०.६२ | १.५० |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | ०.०१ | ०.०३ | ०.०१ | ०.०२ | ०.०१ | ०.०५ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजना

१०.१३ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थिती भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर योजना (महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून मोफत प्रवास), ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, अध्यापक विद्यालयामध्ये ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, इत्यादी विविध योजना राबवित आहे. मुलींच्या शिक्षणाच्या निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | अपेक्षित खर्च (₹ कोटी) |
| उपस्थिती भत्ता योजना | १.४७ | ३.२४ | १.४७ | १.७८ | - | - |
| अहिल्याबाई होळकर योजना | १९.६१ | ९६.८१ | २४.७६ | १४१.५९ | ९.२८ | ४४.०७ |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | २.४४ | १.८३ | २.९८ | १.२४ | ०.५१ | २.०० |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | १८.७० | ०.०४ | २०.०७ | ०.०४ | ५.२८ |

*आधार* : १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्रशासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + नोव्हेंबरपर्यंत

## सैनिकी शाळा

१०.१४ राज्यातील युवकांना सैन्यदलात भरती होण्यासाठी विद्यार्थी दशेपासूनच आकर्षण निर्माण व्हावे याकरीता शासनाने राज्यात सैनिकी शाळांची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,आत्मविश्वास, शौर्य, नेतृत्व, देशभक्ती, इत्यादी गुणांची जोपासना करणे हा मुख्य उद्देश आहे. राज्यात ४२ सैनिकी शाळा असून त्यापैकी चार शाळा केवळ मुलींकरिता, चार सह-शिक्षणासाठी आणि ३४ शाळा केवळ मुलांसाठी आहेत. यापैकी ३८ शाळा अनुदानित असून २०२०-२१ मध्ये १८,६८५ विद्यार्थ्यांची पटनोंदणी झाली आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१५ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व खेळाडूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे 'शिवछत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली आहे.राज्यस्तरावर मानांकित किंवा राष्ट्रीय स्तरावर अधिकृत स्पर्धेत सहभागी खेळाडूंना या क्रीडापीठामध्ये थेट प्रवेश दिला जातो. राज्यस्तरावर सहभागी होणाऱ्या निवडक खेळाडूंसाठी कौशल्य चाचणी द्वारे प्रवेश दिला जातो. निवडलेल्या खेळाडूंना १४ खेळ प्रकारांमध्ये आठते १० वर्षे प्रशिक्षण दिले जाते. या क्रीडापीठांतर्गत नऊ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत क्रीडा प्रबोधिनीतील ३० खेळाडूंना राज्य शासनाचा 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' प्राप्त झाला तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये ८१ खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधीत्व केले. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी ₹ ९,००० खर्च करते. कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ करिता प्रशिक्षणार्थ्यांची निवड प्रक्रिया राबवण्यात आली नाही. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदकांचा तक्ता १०.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेली पदके**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तर पदके | | | | राष्ट्रीय स्तर पदके | | | | राज्य स्तर पदके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१७-१८ | ५६१ | २ | २ | १ | ५ | ३३ | ३३ | ३१ | ९७ | १४२ | १०९ | ६३ | ३१४ |
| २०१८-१९ | ५४५ | १ | ३ | ३ | ७ | ३८ | ३८ | ३२ | १०८ | १४८ | १०३ | ८२ | ३३३ |
| २०१९-२० | ५४५ | २ | १ | १ | ४ | २२ | २५ | ३३ | ८० | १५२ | ८३ | ६९ | ३०४ |
| २०२०-२१ | ४०८ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

टीप : कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळेमुळे सन२०२०-२१ मध्ये राज्यस्तरीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या नाहीत.

*आधार* : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१६ कोविड-१९ प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मार्च, २०२० पासून लॉकडाऊन अंतर्गत राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था व औद्योगिक प्रशिक्षण संस्था बंद करण्यात आल्या. लॉकडाऊन कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य रहाण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात आल्या.

- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता अंतिम परीक्षा ऑनलाईन घेण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये सर्व विद्यापीठे व महाविद्यालये ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आली आहेत. फक्त पी.एचडी. आणि संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कामासाठी महाविद्यालयातील उपस्थितीस परवानगी देण्यात आली आहे.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्हीसीज, मायक्रोसॉफ्ट टीम व्हीसी, व्हॉटस ॲप, यूट्यूब, झूम व्हीसी, इत्यादी विविध पध्दतींचा वापर करून ऑनलाईन प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत आहेत. संस्थांमधील प्रशिक्षकांसाठी विविध विषयांवर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.
- अभियांत्रिकी पदविका, हॉटेल व्यवस्थापन पदविका आणि पृष्ठभाग विलेपन पदविका : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक एसएमएस द्वारे कळविण्यात आले. कागदपत्र पडताळणी करिता, नियमित पडताळणी पद्धती बरोबर ई-स्क्रुटीनी पद्धतीचा अवलंब करण्यात आला. शासनामार्फत सुविधा केंद्रावरील अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. नोडल अधिकारी आणि विद्यार्थ्यांकरिता गुगल मीट द्वारे ई-स्क्रुटीनी विषयक विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. एकूण २,३५,३०९ उमेदवारांपैकी १,२४,६४६ उमेदवारांनी ई-स्क्रुटीनी सुविधेचा लाभ घेतला.
- एमएचटीसीईटी-२०२०, बीएचएमसीटी-२०२०, एमएचएचसीटी-२०२०, एम आर्च-२०२० आणि एमसीए-२०२० इत्यादी प्रवेश परिक्षा पुढे ढकलून त्या ऑक्टोबर, २०२० मध्ये घेण्यात आल्या. जानेवारी, २०२१ अखेर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

१०.१७ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल, २०१८-१९ नुसार राज्यात ६२ विद्यापीठे आहेत. त्यापैकी ३४ राज्य विद्यापीठे (२२ सार्वजनिक, ११ खाजगी व एक मुक्त), २१ अभिमत विद्यापीठे (१२ खाजगी, सात शासकीय व दोन शासकीय अनुदानित), सहा राष्ट्रहितासाठीच्या संस्था आणि एक केंद्रिय विद्यापीठ आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षणाच्या पाहणीवर आधारित उच्च शिक्षणाची सांख्यिकी तक्ता १०.१० मध्ये दिली आहे. सन २०१८-१९ च्या अभ्यासक्रमाकरिता प्रथम वर्षात घेण्यात आलेल्या प्रवेशानुसार संस्थांची संख्या, त्यांची प्रवेश क्षमता आणि विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.२ ते परिशिष्ट १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०  अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालावर आधारित राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| विद्यापीठांची संख्या | | ४९ | ५४ | ६२ |
| महाविद्यालयांची संख्या | | ४,२८६ | ४,३१४ | ४,३४० |
| स्वायत्त संस्थांची संख्या | | १,९५९ | १,९५० | २,२६० |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या (लाख) | एकूण | ४०.१६ | ४१.३१ | ४२.३० |
| | स्त्रियांची टक्केवारी | ४४.२ | ४५.० | ४५.१ |
| विद्यापीठातील व इतर संस्थांतील पटसंख्या | एकूण | ९.४० | ९.४३ | ९.४३ |
| | स्त्रियांची टक्केवारी | ४०.२ | ३९.६ | ३९.४ |
| एकूण पटसंख्या प्रमाण | सर्व प्रवर्ग | ३०.२ | ३१.१ | ३२.० |
| (१८ - २३ वर्ष) | अनुसूचित जाती | ३०.१ | ३०.६ | ३१.२ |
| | अनुसूचित जमाती | १४.८ | १५.१ | १५.२ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक | सर्व प्रवर्ग | ०.८८ | ०.९१ | ०.९० |
| (१८ - २३ वर्ष) | अनुसूचित जाती | ०.८८ | ०.९१ | ०.९५ |
| | अनुसूचित जमाती | ०.६५ | ०.७० | ०.७५ |
| शिक्षकांची संख्या (लाख) | एकूण | १.५१ | १.५२ | १.५८ |
| विद्यार्थी-शिक्षक प्रमाण | सर्व संस्था | २७ | २७ | २७ |

*आधार* : अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल २०१८-१९, केंद्र शासन

## स्व-वित्त सहाय्यित विद्यापीठे

१०.१८ केंद्रशासनाने हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणांमुळे उच्च शिक्षणासंबंधित धोरणांमध्ये बदल करण्यात आले आणि पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता खाजगी क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार, उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करून उच्च शिक्षणामधील प्रवेश, उच्चतम गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि संशोधन वाढविण्यासाठी राज्य शासनाने खाजगी सहभागास प्रोत्साहन दिले आहे. राज्यात २० स्व-वित्त सहाय्यित मान्यताप्राप्त विद्यापीठे आहेत. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल, २०१९-२० नुसार राज्यातील ११ कार्यरत स्व-वित्त सहाय्यित विद्यापीठांमधील एकूण पटसंख्या ३१,९६६ इतकी आहे. एकूण पटसंख्येपैकी १०,८६० विद्यार्थीनी आहेत.

## राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान

१०.१९ उच्च शिक्षण प्रणाली मध्ये संधी उपलब्धता, समानता आणि उच्चतम गुणवत्ता उपलब्ध करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान ही केंद्रपुरस्कृत योजना सन २०१३ पासून राबविण्यात येत आहे. सन २०२०-२१ पर्यंत विद्यापीठे / महाविद्यालये / संस्थांना एकूण ₹ ३७५.९५ कोटी अनुदान वितरीत केले आणि ₹ २६१.५४ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान अंतर्गत काही साध्ये खालीलप्रमाणे

- गुणवत्ता आणि सर्वोत्कृष्टता वाढवणे या घटकांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास ₹ १०० कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे आणि राज्यातील २५ स्वायत्त महाविद्यालयांना प्रत्येकी ₹ ५ कोटी इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
- देशात नवीन संशोधन व तंत्रज्ञान हस्तांतरण केंद्रे स्थापन करण्यासाठी संशोधन व नाविन्यता या घटकांतर्गत ₹ २० कोटींचे अनुदान प्राप्त होणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.
- अभियानांतर्गत डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई व हैद्राबाद (सिंध) राष्ट्रीय महाविद्यालयीन विद्यापीठ, मुंबई ही दोन समूह विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत.
- राज्यातील वाशिम व नंदूरबार जिल्हयांमध्ये दोन आदर्श पदवी महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत.

## तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रम

१०.२० देशातील तंत्रशिक्षण प्रणालीमध्ये परिवर्तन घडविण्याकरीता वर्ष २००३ मध्ये 'तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रम' हा दिर्घ कालावधीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तंत्रशिक्षणाचा दर्जावाढ व गुणवत्तेमध्ये सुधारणा करणे आणि तंत्रशिक्षण संस्थांच्या सध्याच्या क्षमतेमध्ये वाढ करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. सदर कार्यक्रम जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाची माहिती तक्ता क्र. १०.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.११ तंत्रशिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रमाची माहिती**

| तपशील | TEQIP-I | TEQIP-II | TEQIP-III |
|---|---|---|---|
| कालावधी | २००३-२००९ | २०११-२०१७ | २०१७-२०२१ |
| भाग घेतलेल्या एकूण संस्थांची संख्या | १७ | १७ | १२ |
| शासकीय / शासकीय अनुदानित | १२ | १८# | १२ |
| खाजगी | ५ | ४ | ० |
| एकूण वितरित निधी (₹ कोटी) | १६१.९४ | २२९.७८ | १०१.८० |

*आधार*: तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

# पाच उत्कृष्टता केंद्रे समाविष्ट

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

१०.२१ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना (कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ₹ ८ लाख) शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेअंतर्गत राज्यातील विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील सुमारे ६०५ व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आले आहेत. या योजनेची प्रगती तक्ता १०.१२ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.१२ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रगती**

| माध्यम | वर्ष | लाभार्थ्यांची संख्या | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| उच्च शिक्षण | २०१८-१९ | १,६३,४०६ | ८०.०८ |
| | २०१९-२० | १,७४,४९६ | ६९.२८ |
| | २०२०-२१ | ९७,४८१ | २८.०६ |
| तंत्र शिक्षण | २०१८-१९ | १,७८,४४० | ५७९.३९ |
| | २०१९-२० | १,८०,५५९ | ६२०.२२ |
| | २०२०-२१ | १,९९,५०९@ | ६००.००# |
| वैद्यकिय शिक्षण व संशोधन | २०१८-१९ | ८,४५५ | ४९.०७ |
| | २०१९-२० | ६,३५६ | ५०.६५ |
| | २०२०-२१$ | - | - |
| कृषि | २०१८-१९ | १०,११२ | २४.८६ |
| | २०१९-२० | ११,३०३ | १४.९७ |
| | २०२०-२१$ | - | - |
| पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय | २०१८-१९ | ३०५ | ०.३९ |
| | २०१९-२० | ४५४ | ०.७९ |
| | २०२०-२१ | ५२८ | १.२६ |

@ उद्दीष्ट # मंजूर निधी $ कोविड-१९ प्रादुर्भावामुळे प्रवेश प्रक्रिया अपूर्ण आहे

*आधार*: १) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन
३) वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, महाराष्ट्र शासन ४) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद
५) महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ

# सार्वजनिक आरोग्य

१०.२२ रोगप्रतिबंध करण्यासाठी तसेच जनतेच्या निरामय व दिर्घायुष्यासाठी शासन विविध आरोग्यविषयक योजना व कार्यक्रम राबवित आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, किफायतशीर आरोग्य सेवा, पायाभूत वैद्यकीय सुविधा, लक्ष्यनिर्धारित आरोग्य सुविधा हे देशातील आरोग्य सेवेचे प्रमुख स्तंभ आहेत. आरोग्य सेवांमधील सुधारणांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे आणि पायाभूत ते तृतीय स्तरापर्यंतच्या आरोग्य सेवा राज्यात सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांमार्फत तसेच विश्वस्त संस्थांमार्फत पुरविल्या जातात. या आरोग्य सेवासुविधांच्या एकात्मिक व्यवस्थापनामुळे कोविड-१९ महामारीची गंभीर परिस्थिती हाताळण्यास मदत झाली आहे.

## कोविड-१९ महामारी

१०.२३ कोविड-१९ या आजाराचा जगातील पहिला रूग्ण डिसेंबर, २०१९ मध्ये चीन मधील वुहान शहरात आढळला. भारतात या आजाराचा पहिला रूग्ण दि.३० जानेवारी, २०२० रोजी केरळ येथे आढळला. फेब्रुवारी, २०२० अखेर ५४ पेक्षा जास्त देशामध्ये या आजाराच्या संसर्गाचा प्रसार होऊन ८५,४०३ पेक्षा जास्त लोकांना संसर्ग झाला व परिणामी जगभरात जवळपास ३,००० मृत्यू झाले. राज्यात अति जोखीम असलेल्या देशातून येणाऱ्या प्रवाशांची विमानतळावर तपासणी करण्यात आली. दि.९ मार्च, २०२० रोजी पुणे येथे पहिला रूग्ण आढळला. राज्य शासनाने दि.१३ मार्च, २०२० रोजी मुंबई, नवी मुंबई, पुणे व नागपूर या चार शहरांमध्ये या साथरोगाचा उद्रेक होत असल्याचे जाहीर केले आणि साथरोग अधिनियम, १८९७ च्या तरतूदी लागू केल्या, ज्यामुळे रोगाची लक्षणे आढळलेल्या संशयित रूग्णांना सक्तीने रूग्णालयात दाखल करणे शक्य झाले. या रोगाच्या प्रसारावर नियंत्रण आणण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून राज्यातील चित्रपटगृहे, नाट्यगृहे, मॉल, जलतरण तलाव, व्यायाम शाळा आणि हॉटेल व उपहारगृहे या व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या तसेच सर्व सार्वजनिक सभा व समारंभ यावर देखील बंदी घालण्यात आली. शारीरीक अंतर राखणे व गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी किराणा मालाची व औषधाची दुकाने वगळता सर्व दुकाने व व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या. अत्यावश्यक सेवा वगळता सार्वजनिक वाहतूक व सर्व कार्यालये बंद ठेवण्यात आली. आवश्यकता नसल्यास लोकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात आले. संपूर्ण देशात दि.२३ मार्च, २०२० मध्यरात्रीपासून लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या सीमा बंद करण्यात आल्या, कलम १४४ अंतर्गत जमावबंदी लागू करण्यात आली व राज्यात सर्वत्र कडक संचारबंदी लागू करण्यात आली.

१०.२४ दि.१५ जानेवारी, २०२१ रोजीची कोविड-१९ रूग्णांची स्थिती तक्ता १०.१३ मध्ये दर्शविण्यात आली आहे. सर्वाधिक बाधित देशातील कोविड-१९ रूग्णांची स्थिती तक्ता १०.१४ मध्ये दिली आहे. जगात अमेरीका हा सर्वात जास्त बाधित देश असून त्या खालोखाल भारत व ब्राझील या देशांचा क्रमांक लागतो.

**तक्ता १०.१३ कोविड-१९ रूग्णांची स्थिती**

(संख्या) (दि.१५जानेवारी, २०२१ रोजी)

| बाब | महाराष्ट्र | भारत | जग |
|---|---|---|---|
| एकूण बाधित रूग्ण | १९,८४,७६८ | १,०५,२८,०६२ | ९,३५,३३,९१७ |
| बरे झालेले रूग्ण | १८,८१,०८८ | १,०१,६२,७३८ | ६,६८,३५,१४६ |
| रूग्ण बरे होण्याचा दर (टक्के) | ९४.८ | ९६.५ | ७१.५ |
| एकूण मृत्यू | ५०,३३६ | १,५१,९१८ | २०,०२,४११ |
| रूग्ण मृत्यूदर (टक्के) | २.५ | १.४ | २.१ |
| प्रति दहा लाख लोकसंख्येमागे रूग्ण | १५,६४९ | ८,७१२ | १२,००० |
| रूग्णसंख्या दुप्पट होण्याचा कालावधी (दिवस) | ४२०.१ | ४२७.१ | उ.ना. |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन उ. ना. उपलब्ध नाही

**तक्ता १०.१४ सर्वाधिक बाधित देशातील कोविड-१९ रूग्णांची स्थिती**

(संख्या) (दि. १५जानेवारी, २०२१ रोजी)

| देश | एकूण लोकसंख्या (लाख) | एकूण बाधित रूग्ण (लाख) | प्रति दहा लाख लोकसंख्येमागे रूग्णांची संख्या | एकूण मृत्यू (लाख) | रुग्ण मृत्यूदर (टक्के) | एकूण रूग्णांपैकी उपचार घेत असलेल्या रूग्णांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| अमेरीका | ३,३२०.५ | २३८.५ | ७१,८२१ | ३.९८ | १.७ | ३९.२ |
| भारत | १३,८७३.१ | १०५.३ | ७,५९० | १.५२ | १.४ | २.० |
| ब्राझील | २,१३३.७ | ८३.३ | ३९,०२१ | २.०७ | २.५ | ९.४ |
| रशिया | १,४५९.७ | ३४.९ | २३,९५१ | ०.६४ | १.८ | १५.७ |
| इंग्लंड | ६८०.८ | ३२.६ | ४७,८८६ | ०.८६ | २.६ | ५४.२ |
| इटली | ६०४.१ | २३.४ | ३८,६६७ | ०.८१ | ३.५ | २४.० |

*आधार* : www.worldometer.info/coronavirus

१०.२५ भारतात दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी प्रति दहा लाख लोकसंख्येमागे कोविड-१९ बाधित रूग्णांची संख्या सर्वाधिक दिल्ली (३७,६३९) आणि त्याखालोखाल गोवा (३५,८३२) राज्यात आहे. महाराष्ट्र देशात सहाव्या स्थानावर असून राज्यात ही संख्या १५,६४९ आहे. तसेच प्रति दहा लाख लोकसंख्येमागे मृत्यूचे प्रमाण सर्वात जास्त दिल्ली (६३९) आणि त्याखालोखाल गोवा (५१६) येथे असून राज्यात हे प्रमाण ३९७ आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात इतर आजारांसोबत कोविड-१९ बाधित असताना रुग्णाचा मृत्यू झाल्यास त्याचा समावेश देखील कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या रुग्णांच्या संख्येत केला आहे. काही निवडक राज्यांतील कोविड-१९ रूग्णांची माहिती तक्ता १०.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ निवडक राज्यांतील कोविड-१९ रूग्णांची माहिती**

(संख्या) (दि. १५जानेवारी, २०२१ रोजी)

| राज्य | प्रति दहा लाख लोकसंख्येमागे | | | रूग्ण मृत्यूदर (टक्के) | उपचार घेत असलेले रूग्ण |
|---|---|---|---|---|---|
| | बाधित रूग्ण | चाचणी केलेले रूग्ण | मृत्यू | | |
| आंध्रप्रदेश | १०,४७२ | २,४०,१३६ | ८४ | ०.८ | २,१९९ |
| दिल्ली | ३७,६३९ | ४,९४,८८२ | ६३९ | १.७ | २,७९५ |
| गोवा | ३५,८३२ | २,७७,०७९ | ५१६ | १.४ | ८६६ |
| गुजरात | ४,२१७ | १,५२,२६५ | ७२ | १.७ | ६,८५० |
| कर्नाटक | १५,२३३ | २,४१,४२० | १९९ | १.३ | ८,८०९ |
| केरळ | २५,०५२ | २,५१,००१ | १०२ | ०.४ | ६७,७११ |
| **महाराष्ट्र** | **१५,६४९** | **१,०३,७१५** | **३९७** | **२.५** | **५२,५५८** |
| तामिळनाडू | ११,४९८ | २,००,५०३ | १७० | १.५ | ६,२९९ |
| तेलंगणा | ८,३२४ | १,९९,५८० | ४५ | ०.५ | ४,२७३ |
| **भारत** | **८,७१२** | **१,३९,९५४** | **१२६** | **१.४** | **२,११,०३३** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.२६ राज्यातील उपाचाराधीन कोविड-१९ रुग्णांच्या मासिक आकडेवारीवरून दिसून येते की, साप्ताहिक सरासरी वाढ मार्च, २०२० मध्ये सर्वात जास्त (२७.२ टक्के) होती व जानेवारी, २०२१ पर्यंत कमी होऊन ०.१६ टक्के झाली. बाधित रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी मार्च, २०२० मध्ये ५.४ दिवसांचा होता व त्यात वाढ होवून जानेवारी, २०२१ मध्ये तो ४२०.१ दिवसांचा झाला. रुग्ण बरे होण्याचा दर मार्च, २०२० मधील १२.९ टक्क्यांच्या तुलनेत वाढ होऊन जानेवारी, २०२१ मध्ये ९४.८ टक्के झाला. या कालावधीत प्रति दहा लाख लोकसंख्येमागे केलेल्या चाचण्यांची संख्या ६०० वरुन १,०३,७१५ झाली. कोविड-१९ बाबत राज्यातील काही महत्वाच्या निर्देशकांची मासिक माहिती तक्ता १०.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१६ काही महत्वाच्या निर्देशकांची मासिक माहिती**

| निर्देशक | महिन्याच्या शेवटच्या दिवशी | | | | | | | | | | दि.१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मार्च, २०२० | एप्रिल, २०२० | मे, २०२० | जून, २०२० | जुलै, २०२० | ऑगस्ट, २०२० | सप्टेंबर, २०२० | ऑक्टोबर, २०२० | नोव्हेंबर, २०२० | डिसेंबर, २०२० | जानेवारी, २०२१ रोजी |
| साप्ताहिक सरासरी वाढ (टक्के) | २७.२ | ७.३ | ४.४ | ३.३ | २.४ | १.९ | १.३ | ०.३ | ०.३ | ०.२ | ०.१६ |
| बाधित रुग्ण दुप्पट होण्याचा कालावधी (दिवस) | ५.४ | ९.९ | १६.३ | २१.२ | २९.० | ३६.३ | ५३.२ | २०४.० | २२१.४ | २९३.० | ४२०.१ |
| रुग्ण बरे होण्याचा दर (टक्के) | १२.९ | १४.९ | ३६.२ | ५२.३ | ५८.८ | ७२.४ | ७८.६ | ९०.० | ९२.४ | ९३.४ | ९४.८ |
| रुग्ण मृत्यू दर (टक्के) | ३.३ | ४.४ | ३.४ | ४.५ | ३.६ | ३.१ | २.७ | २.६ | २.६ | २.६ | २.५ |
| प्रति दहा लाख लोकसंख्येमागे चाचण्या (संख्या) | ६०० | ९१७ | ३,४१८ | ६,८९७ | १६,००२ | ३१,२५८ | ५३,४९८ | ६६,९७९ | ८१,६६१ | ८५,७२० | १,०३,७१५ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.२७ दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यातील प्रति दहा लाख लोकसंख्येमागे कोविड-१९ रुग्णांची संख्या सर्वाधिक असलेले जिल्हे पुणे (३३,४८८), ठाणे (२७,५८४), नागपूर (२६,१३५) आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर एकत्रित (२५,८०७) आहेत.

**आलेख १०.१ : प्रति दहा लाख लोकसंख्येमागे रुग्णांची संख्या १०,००० पेक्षा जास्त असलेले जिल्हे (दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी)**




१०.२८ राज्यातील नव्याने सापडलेल्या बाधित रुग्णसंख्येच्या दिवसनिहाय विश्लेषणावरुन निर्दशनास येते की, दि.१७ सप्टेंबर, २०२० रोजी सर्वात जास्त कोविड-१९ रुग्णांची संख्या (२५,४७७) नोंदविली गेली. त्यात घट होऊन दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी रुग्णसंख्या ३,४०५ इतकी नोंदविली गेली.

**आलेख १०.२ : राज्यातील नव्याने सापडलेल्या कोविड-१९ बाधित रुग्ण संख्येचा कल**




१०.२९ दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यातील ७० टक्के पेक्षा जास्त उपचाराधीन रुग्ण पुणे (१५,७७७), ठाणे (९,७९९), मुंबई शहर व मुंबई उपनगर एकत्रित (७,१०७), नागपूर (४,९९८) आणि नाशिक (१,५०२) या जिल्ह्यात आढळले.

**आलेख १०.३ : जास्त उपचाराधीन रुग्ण असलेले दहा जिल्हे (दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी)**




१०.३० दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी एकूण ५२,५५८ उपचाराधीन रुग्णांपैकी ३५,९८४ रुग्णांना रुग्णालयात दाखल केले होते. एकूण ५,६३७ रुग्ण ऑक्सीजन बेड वर होते. एकूण २,९८४ रुग्ण अति दक्षता विभागात होते त्यापैकी ६९४ रुग्ण व्हेंटिलेटरवर होते. दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी विविध रुग्णालयात दाखल असलेल्या कोविड-१९ रुग्णांचा तपशील तक्ता १०.१७ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१७ विविध रुग्णालयात दाखल असलेल्या कोविड-१९ रूग्णांचा तपशील**

(संख्या)

| रुग्णालय | एकूण दाखल रूग्ण | दि.१५ जानेवारी, २०२१ रोजी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल रूग्ण | अति दक्षता विभागात | | अति दक्षता विभागाबाहेर ऑक्सिजन वर |
| | | | व्हेंटिलेटरवर | ऑक्सिजन वर | |
| केंद्र शासन | ३,९६१ | ४७ | ० | ० | १४ |
| सार्वजनिक आरोग्य विभाग | ६,१३,९७२ | १०,६६५ | ९९ | ३०३ | ४०६ |
| वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न | ४७,७७९ | ८९१ | ८० | २१२ | १७७ |
| महानगरपालिका | ७,९८,९१६ | ११,८४९ | ८६ | ३५७ | ८३९ |
| रेल्वे | २,७६५ | ३६ | ३ | ० | ६ |
| संरक्षण | ११,०५९ | १४४ | १ | १७ | १९ |
| पोर्ट ट्रस्ट | १,४८६ | २७ | ० | १ | ३ |
| खाजगी * | ४४,०११ | ९८३ | ६३ | २३९ | १६९ |
| खाजगी | ४,४०,२२९ | ११,३४२ | ३६२ | १,१६१ | १,७१४ |
| **एकूण** | **१९,६४,१७८** | **३५,९८४** | **६९४** | **२,२९०** | **३,३४७** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

* महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत सुचीबध्द

**राज्यात कोविड-१९ प्रतिबंध आणि नियंत्रणाकरीता केलेल्या उपाययोजना**

१०.३१ कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी राज्य शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

**१.** प्रारंभीच्या काळात अति जोखीम असलेल्या देशातून येणाऱ्या प्रवाशांची विमानतळावर व प्रवासी बंदरावर तपासणी करण्यात आली आणि आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात आल्या.

**२. प्रयोगशाळा निदान सुविधा**

- सुरुवातीच्या काळात कोविड-१९ रूग्ण निदान सुविधा केवळ एकाच ठिकाणी उपलब्ध होती. दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात कोविड-१९ रूग्ण निदानासाठी एकूण ४८७ प्रयोगशाळा (पैकी ३६३ शासकीय आणि १२४ खाजगी) आहेत. वैद्यकीय महाविद्यालये व जिल्हा रुग्णालयांमध्ये आरटीपीसीआर चाचणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

- केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार खाजगी प्रयोगशाळांचे चाचणी शुल्क ₹ ४००० पेक्षा जास्त होते. राज्य शासनाने आरटीपीसीआर चाचण्यांचे दर ₹ ९८० ते ₹ १,८०० च्या मर्यादेत कमी केले आहेत.
- निदानासाठी प्रयोगशाळेच्या संख्येत वाढ झाल्यामुळे चाचणीचा निदान कालावधी ४८ तासापेक्षा कमी झाला.
- दि. १५ जानेवारी, २०२१ पर्यंत, राज्यात एकूण १.३७ कोटी कोविड-१९ च्या चाचण्या करण्यात आल्या. प्रति दहा लाख लोकसंख्येमागे राज्यात कोविड-१९ चाचण्यांची संख्या १,०३,७१५ आहे तर देशात १,३९,९५४ इतकी आहे.
- राज्य शासनाने जून, २०२० पासून, रॅपीड अॅन्टीजेन टेस्ट सुविधा (चाचणी संच) उपलब्ध करुन दिली. जिल्हास्तरावर चाचणी संच खरेदी करण्याकरीता शासनाकडून जिल्ह्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला.

**३. संनिरीक्षण**

- प्रत्येक बाधित रूग्णाच्या निकट संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी क्षेत्रीय पातळीवर संपर्क शोध पथकांची स्थापना करण्यात आली.
- राज्यातील ९५.२ टक्के बाधित रूग्णांच्या निकट संपर्कात आलेल्या व्यक्तींना शोधण्याचे काम पूर्ण झाले. प्रत्येक बाधित रूग्णामागे निकट संपर्क झालेल्या सरासरी १५.७ व्यक्ती प्रत्यक्ष व १७.६ व्यक्ती पोर्टलद्वारे शोधण्यात आल्या.
- प्रतिबंधित क्षेत्रांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात ७,६०० प्रतिबंधित क्षेत्रे होती.
- ताप सदृष्य लक्षणे असणाऱ्या (आयएलआय) आणि श्वसनसंस्थेचा तीव्र आजार असणाऱ्या (सारी) व्यक्तींची नियमित तपासणी करण्यात येत आहे. दि. १५ जानेवारी, २०२१ पर्यंत एकूण ९४,९४२ सर्वेक्षण पथकाद्वारे ३४.९५ लाख लोकांचे सर्वेक्षण करण्यात आले.

**४. त्रिस्तरीय उपचार सुविधा**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात त्रिस्तरीय उपचार व निगा यंत्रणा स्थापन करण्यात आली. त्यामुळे खाटांची संख्या तसेच व्हेंटीलेटरची उपलब्धता यामध्ये वाढ झाली. मार्च, २०२० मध्ये राज्यातील २११ रुग्णालयात एकूण ७,७२२ खाटा, ३,०९१ अतिदक्षता विभागातील खाटा आणि १,१४३ व्हेंटीलेटर उपलब्ध होते. दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात कोविड-१९ बाधित रुग्णांसाठी उपलब्ध उपचार सुविधा तक्ता १०.१८ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.१८ कोविड-१९ बाधित रूग्णांसाठी उपलब्ध उपचार सुविधा**

(संख्या) (दि. १५जानेवारी, २०२१ रोजी)

| वर्गीकरण | संख्या | एकूण विलगीकरण खाटा (अतिदक्षता विभागातील खाटा वगळून) | कोविड-१९ बाधित रूग्णांसाठी विलगीकरण खाटा | संशयीत रूग्णांसाठी विलगीकरण खाटा | ऑक्सिजनसह सुसज्ज खाटा | एकूण अतिदक्षता विभागातील खाटा | व्हेंटिलेटरची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोविडसाठी राखीव रूग्णालये | ६०१ | ४६,६७२ | ३४,९५९ | ११,७१२ | २९,९४५ | ११,७१० | ६,०३४ |
| कोविडसाठी राखीव आरोग्य केंद्रे | १,०५३ | ५०,९२३ | ३८,५११ | १२,४२१ | २९,३२३ | ६,०९६ | १,९६५ |
| कोविडसाठी राखीव केंद्रे | १,८९८ | २,४६,३७१ | १,२८,५९२ | १,१७,६१२ | ० | ० | ० |
| **एकूण** | **३,५५२** | **३,४३,९६६** | **२,०२,०६२** | **१,४१,७४५** | **५९,२६८** | **१७,८०६** | **७,९९९** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

**५. ऑक्सिजन व्यवस्थापन सुविधा**

- कोविड-१९ रूग्णांच्या उपचारासाठी ऑक्सिजन व्यवस्थापन सुविधा अत्यंत महत्वाची आहे. त्या दृष्टिने १४,८८४ मोठे सिलेंडर्स, १३,७४९ 'बी' प्रकारचे सिलेंडर्स तसेच ४२४ 'डुरा' सिलेंडर्स उपलब्ध करण्यात आले. कोविडसाठी राखीव रूग्णालयांत व कोविडसाठी राखीव आरोग्य केंद्रात पाईपद्वारे ऑक्सिजन पुरवठा यंत्रणा स्थापित करण्यात आली. राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये ऑक्सिजन टाक्या कार्यान्वीत करण्यात आल्या.
- ऑक्सिजनच्या उपचारासाठी प्राधान्यक्रम आणि मार्गदर्शक तत्वे प्रसृत केली. तसेच ऑक्सिजनच्या उपचाराबाबत वेबिनारद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.
- दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी राज्याची ऑक्सिजन साठवण क्षमता ९२१ मेट्रीक टन असून नजिकच्या काळात ३५८ मेट्रीक टनाने वाढविण्यात येत आहे.

### ६. विविध प्रोटोकोल

राज्य स्तरावरून कोविड -१९ च्या अनुषंगाने संनिरीक्षण, प्रयोगशाळा चाचणी, उपचार, लहान मुले व गरोदर मातांची काळजी, नवजात शिशू कक्षामध्ये नवजात शिशूंची घ्यावयाची काळजी याबाबत केंद्र शासनाकडून उपचारपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना प्राप्त होण्यापूर्वीच राज्यस्तरावरुन विविध मार्गदर्शक सुचना तज्ञांच्या मदतीने तयार केल्या गेल्या व संबंधितांना पाठविण्यात आल्या.

### ७. विलगीकरण सुविधा

कोविड-१९ उद्रेकाच्या सुरवातीच्या कालावधीत राज्यात ३५३ संस्थांमध्ये १६,१९२ खाटांची विलगीकरण सुविधा उपलब्ध होती. दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी ८१६ संस्थांमध्ये १,१३,७९९ खाटांची विलगीकरण सुविधा उपलब्ध आहे.

### ८. कोविड-१९ च्या उपचारासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात प्लाझ्मा उपचार, रेमिडीसीवीर, टोसिलीझुमाब, इटोलीझुमाब यांचा वापर करण्यात आला.

### ९. टास्क फोर्स (कृती दल) स्थापना

विविध क्षेत्रातील तज्ञांचा समावेश करून राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर कृती दलांची स्थापना करण्यात आली. कृती दलातील तज्ञ सर्व जिल्ह्यांच्या डॉक्टरांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करीत आहेत. कोविड-१९ संबंधित तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ञांच्या मदतीने मोठया प्रमाणावर वेबिनार आयोजित करण्यात आले.

### १०. मृत्यू लेखा परिक्षण समिती

कोविड-१९ मुळे होणाऱ्या प्रत्येक मृत्यूचे विश्लेषण करुन मृत्यूचे कारण निश्चित करण्याच्या उद्देशाने जिल्हा, महानगरपालिका तसेच राज्यस्तरावर मृत्यू लेखा परिक्षण समित्यांची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारची समिती प्रत्येक कोविड रुग्णालय स्तरावर स्थापन करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या. मृत्यूची टाळता येण्याजोगी कारणे प्राधान्याने ओळखून समिती तज्ञांच्या शिफारसी संबंधितांना कळविण्यात आल्या.

### ११. आवश्यक साधन सामग्रीचा पुरेसा साठा

- आवश्यक साधन सामग्री व वैयक्तिक संरक्षक किट (पी.पी.ई.किट), औषधे, कोविड टेस्टींग किट, ऑक्सिजन सिलेंडर आणि इतर साधन सामग्री यांचा पुरवठा केंद्र शासनाकडून करण्यात आला तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधी, जिल्हा वार्षिक योजना निधी व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी यामधून खरेदी करण्यात आले. डिसेंबर, २०२० पर्यंत केंद्र शासनाकडून ४,३८४ व्हेंटीलेटर्स प्राप्त झाले. जिल्हा वार्षिक योजना व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून डिसेंबर, २०२० पर्यंत ५३३ व्हेंटीलेटर्स, ८४,८६६ इन्फ्रारेड थर्मोमीटर / ऑक्सिमीटर, १६.६० लाख पी.पी.ई.किट, १३७.२५ लाख एन-९५ / ट्रिपल लेयर मास्क, २०.५३ लाख कोविड टेस्टींग किट, २३,१४९ ऑक्सिजन सिलेंडर किट व इतर आवश्यक साधन सामग्री व औषधे खरेदी करण्यात आली.
- सर्व साधन सामग्री वेळेवर उपलब्ध होण्याच्या दृष्टिने खरेदी प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आणि ही प्रक्रिया पारदर्शक केली गेली.
- राज्यातील आवश्यक पी.पी.ई.किटचा दैनंदिन उपलब्ध साठ्याबाबत माहिती घेवून दररोज राष्ट्रीय कोविड-१९ पोर्टल वर अद्ययावत करण्यात येते.

### १२. इतर महत्वाचे निर्णय

- महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना अलाभार्थ्यांना देखील लागू करण्यात आली.
- खाजगी रूग्णालयातील ८० टक्के खाटा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली आणल्या.
- आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या खाजगी रूग्णालयातील १० टक्के खाटा मोफत व अतिरिक्त १० टक्के खाटा सवलतींच्या दरात उपलब्ध करण्यात आल्या.
- खाजगी रूग्णालयांतील देयकांचे शासकीय लेखा परिक्षकांकडून परिक्षण करण्यात आले.
- खाजगी रूग्णालयांच्या बिलाबद्दल तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करण्यात आल्या.
- आरटीपीसीआर चाचणी दरांचे नियमितपणे पुर्नविलोकन करुन दर कमी करण्यात आले.
- कोविड-१९ च्या निदान व उपचारांसाठी लोकांवर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार टाळण्यासाठी विविध आवश्यक गोष्टींच्या किंमतींवर नियंत्रण आणले.

## १३. राज्य व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण व क्षमता वर्धन

दि.६ मार्च, २०२० रोजी कोविड-१९ संदर्भात देश पातळीवरील प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले असून दि. १२ व १३ मार्च, २०२० रोजी राज्यपातळीवरील प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये राज्यातील २०५ यंत्रणांना प्रशिक्षित करण्यात आले. जिल्हा व महानगरपालिका स्तरावर ८१ प्रशिक्षण सत्रांव्दारे २,४६२ यंत्रणांना व ८९,८८७ आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय प्रादेशिक स्तरावर तज्ञांसाठी व्हेंटिलेटर व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित केले. भारती विद्यापीठाच्या क्रिटिकल केअर मेडिसिन विभागाच्या मदतीने राज्यातील सर्व जिल्हास्तरीय डॉक्टरांचे कोविड-१९ रूग्णांच्या श्वसना संदर्भातील समस्यांचे व्यवस्थापन करण्याबाबत प्रशिक्षण आयोजित केले.

## १४. आरोग्य शिक्षण

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सर्वसामान्य जनता, वैद्यकीय व्यावसायिक आणि बाधित भागातून आलेल्या प्रवाशांसाठी आरोग्य विषयक शिक्षण साहित्य तयार करुन प्रसृत केले.

- दि. १२ मार्च, २०२० पासून विविध प्रसार माध्यमांद्वारे व्यापक जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली.
- जनजागृती करण्यासाठी ‘अ’ दर्जाची वर्तमानपत्रे, ३० सेकंदाच्या टिव्ही स्पॉटचे ११ खाजगी वृत्त वाहिन्या व दुरदर्शनद्वारे प्रसारण, ६० सेकंदाच्या ऑडीओ जिंगल्सचे ५५ खाजगी एफ एम चॅनेल व आकाशवाणीद्वारे प्रसारण, होर्डींग्स, बॅनर्स तसेच समाज माध्यमांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला.
- सर्वसामान्य नागरीकांसाठी आजारा विषयीची माहीती, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच काय करावे व काय करू नये याबद्दलची एकत्रित माहिती असलेली पुस्तिका तयार करून वितरीत करण्यात आली.
- फेसबुक, व्हॉट्सॲप, ट्विटर, इंस्टाग्राम या समाज माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला.
- संपूर्ण राज्यात जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम पथकांद्वारे स्थलांतरीत मजूर आणि कोविड केंद्र, कोविड सर्मपित रुग्णालये, कोविड आरोग्य केंद्र व इतर कोविड युनिटमध्ये दाखल झालेल्या कोविड बाधित रुग्णांमधील मानसिक आजारविषयक समस्यांबाबत समुपदेशन, निदान व उपचार करण्यात आले. ऑनलाईन व्यासपीठाचा वापर करुन प्रख्यात मानसोपचार तज्ञांद्वारे प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण व वेबिनार आयोजित करण्यात आले. जानेवारी, २०२१ पर्यंत एकूण ६९,९४८ समुपदेशन सत्रे आयोजित करण्यात आली व त्याचा ५.२३ लाख लोकांना फायदा झाला.

## १५. माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचा वापर

अद्ययावत तंत्रज्ञानांचा तसेच विविध मोबाईल ॲपचा वापर करुन विविध प्रतिबंधात्मक आणि नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या.

- केंद्र शासनाच्या मदतीने आरटीपीसीआर ॲप व कोविड-१९ पोर्टलचा वापर करून कोविड-१९ विषयक अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली.
- कोविड-१९ नियंत्रण उपाययोजनांमध्ये जिल्ह्यातील स्वयंसेवकांना सहभागी करुन घेण्यासाठी ‘कोविड योद्धा’ या ॲपचा वापर करण्यात आला.
- बाधित रुग्णांच्या निकट संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी तसेच विलगीकरणातील व्यक्तींच्या निगराणीसाठी ‘महाकवच’ ॲपचा वापर करण्यात आला.
- लोकांना ऑनलाईन वैद्यकीय सल्ला मिळण्यासाठी ई-संजीवनी व्यासपीठाचा वापर करण्यात आला.

## १६. अतिरिक्त मनुष्यबळ

- कोविड रुग्णालये व केंद्रे यासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात आले. जिल्हा स्तरावर व मंडळ स्तरावर नियुक्तीचे अधिकार देण्यात आले. तज्ञ डॉक्टर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ₹ दोन लाख पर्यंत मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.
- शासनाने खाजगी डॉक्टरांना किमान १५ दिवस कोविड रुग्णालयात सेवा देण्याच्या सुचना दिल्या.

## १७. राज्य हेल्पलाईन

सर्वसामान्य नागरिकांना कोविड-१९ विषयक मार्गदर्शन मिळण्यासाठी टोल फ्री १०४ क्रमांक उपलब्ध करण्यात आला. कोविड आजाराबद्दलच्या प्रमुख मार्गदर्शक सुचना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आल्या व सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्या.

## १८. कोरोना वॉर रुम

सर्व जिल्हा व महानगरपालिका प्रशासनाशी समन्वय साधून विविध प्रकारची माहिती गोळा करुन दैनिक अहवाल तयार करण्यासाठी राज्यस्तरावर दि.१९ मार्च, २०२० पासून कोरोना वॉर रुम ची स्थापन करण्यात आली. जिल्हा व महानगरपालिका निहाय कोविड-१९ रुग्ण व मृत्यूबाबतची माहिती दररोज प्रसारीत करण्यात येत आहे.

## १९. समाजाधारित सिरो सर्वेक्षण

राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये समाजाधारित सिरो सर्वेक्षण करण्यात आले. तक्ता १०.१९ मध्ये सिरो सर्वेक्षणाचा तपशील दिला आहे. याच धर्तीवर मुंबई, पुणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सिरो सर्वेक्षण करण्यात आले.

**तक्ता १०.१९ सिरो सर्वेक्षण तपशील**

| जिल्हा | पहिली फेरी (मे - जून, २०२०) | | | दुसरी फेरी (ऑगस्ट - सप्टेंबर, २०२०) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | घेतलेले एकूण नमुने | बाधित नमुने | बाधित असण्याचे प्रमाण (टक्के) | घेतलेले एकूण नमुने | बाधित नमुने | बाधित असण्याचे प्रमाण (टक्के) |
| बीड | ३९६ | ४ | १.० | ४४३ | ३३ | ७.४ |
| परभणी | ३९६ | ६ | १.५ | ४८० | ७३ | १५.२ |
| नांदेड | ३९३ | ५ | १.३ | ४३९ | ४३ | ९.८ |
| सांगली | ४०० | ५ | १.३ | ४६७ | ५५ | ११.७ |
| अहमदनगर | ४०४ | ५ | १.२ | ४४७ | ३९ | ८.७ |
| जळगाव | ३९६ | २ | ०.५ | ४०५ | १०५ | २५.९ |
| **एकूण** | **२,३८५** | **२७** | **१.१** | **२,६८१** | **३४८** | **१३.०** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## २०. रुग्णवाढीचा कल लक्षात घेऊन केलेली पुर्वतयारी (पूर्वानुमान मॉडेल)

गणितीय सिध्दांताचा उपयोग करुन जिल्हास्तरावर १५ दिवसानंतर रुग्णांमध्ये किती वाढ होऊ शकेल याचे पूर्वानुमान विचारात घेऊन पायाभूत सुविधांची कमतरता येण्याची शक्यता वर्तविण्यास मदत झाली व जिल्ह्यांत वेळेआधीच साधनसुविधा वाढविण्याचे काम करता आले.

## २१. माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिम

ही मोहिम दि.१५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर,२०२० दरम्यान घेण्यात आली, यामध्ये प्रत्येक कुटुंबाला दोनदा भेटी देण्यात आल्या.

**मोहिमेची उद्दिष्टे**

- राज्यातील कोविड-१९ संशयित रूग्णांचे गृहभेटीद्वारे सर्वेक्षण व उपचार
- अति जोखमीच्या व्यक्तींचे सर्वेक्षण, उपचार, समुपदेशन आणि कोविड प्रतिबंधासाठी मार्गदर्शन
- ताप सदृष्य लक्षणे असणाऱ्या (ILI) आणि श्वसनसंस्थेचा तीव्र आजार (SARI) असणाऱ्या व्यक्तींचे सर्वेक्षण, कोविड-१९ तपासणी आणि उपचार
- कोविड-१९ बाबत आरोग्य शिक्षण

**मोहिमेची व्याप्ती**

- पहिल्या टप्प्यामध्ये २.७६ कोटी कुटुंबांपैकी २.७४ कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. एकूण १२.४३ कोटी लोकसंख्येपैकी ११.९२ कोटी लोकांशी थेट संपर्क साधण्यात आला.
- दुसऱ्या टप्प्यात २.७० कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आणि १०.०१ कोटी लोकांना भेटी दिल्या.
- प्रशिक्षित पथकाद्वारे भेट दिलेल्या प्रत्येक व्यक्तीची ताप व ऑक्सिजन पातळी तपासण्यात आली आणि कोविड-१९ प्रतिबंध करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.
- एकूण ५९,६७९ पथकाद्वारे तपासणी करण्यात आली. प्रत्येक पथकामध्ये आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि स्थानिक स्वयंसेवक यांचा समावेश होता.

**मोहिमेची फलनिष्पत्ती**

- राज्यात सर्वेक्षणात आढळलेल्या तापसदृष्य लक्षणे असलेल्या व श्वसनसंस्थेचा तीव्र आजार असलेल्या ३.५७ लाख रुग्णांपैकी ३.२२ लाख रुग्णांची कोविड-१९ साठी तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५१,०६४ रुग्णांना कोविड-१९ चा संसर्ग झाल्याचे आढळून आले व त्यांचेवर आवश्यकतेनुसार उपचार करण्यात आले.

- सर्वेक्षण कालावधीत घरोघरी दिलेल्या भेटीमध्ये ८.६९ लाख मधुमेह असलेले, सुमारे १.३१ कोटी उच्च रक्तदाब असलेले, ७३,०५५ हृदयविकार असलेले, १७,८४३ कर्करोग असलेले आणि १.०७ लाख इतर आजार असलेले असे एकूण २३.७५ लाख आजार असलेले रुग्ण आढळून आले आणि त्यांचेकरीता आवश्यकतेनुसार पुढील उपचारांची सोय करण्यात आली.
- एकूण २.४० लाख कोविड होऊन गेलेल्या व्यक्तींची कोविड पश्चात लक्षणांकरिता तपासणी करण्यात आली आणि त्यांना पुढील मार्गदर्शन करण्यात आले.

**'मास्क नाही प्रवेश नाही' अभियान**

हे अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणी तसेच सार्वजनिक व खाजगी वाहनांमध्ये मास्क घालणे अनिवार्य केले आहे. कोविड-१९ प्रतिबंध व नियंत्रणाकरीता मास्क घालणे, हात धुणे, शारीरिक अंतर राखणे आवश्यक आहे हे लोकांना सांगण्यासाठी प्रभावी जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहेत.

**२२. कोविड -१९ लसीकरण**

जगातील सर्वात मोठा कोविड-१९ लसीकरण कार्यक्रम दि. १६ जानेवारी, २०२१ रोजी कोविशिल्ड व कोव्हॅक्सिन या दोन लसींच्या माध्यमातून देशभर सुरू झाला. राज्यात पहिल्या फेरीत डॉक्टर, पोलीस, नर्स, वॉर्ड बॉय, आशा स्वयंसेविका इत्यादी व आघाडीवरील इतर कर्मचारी अशा एकूण आठ लाख कोविड योद्धयांना लस देण्यात येत आहे. दि. ०८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत एकूण ५,०९,७४६ कोविड योद्धयांना लस देण्यात आली.

**विविध स्रोतांद्वारे उपलब्ध निधी**

१०.३२ कोविड-१९ आजारावरील प्रतिबंध व नियंत्रणासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडून सर्व जिल्ह्यांना पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आपत्कालीन योजना तयारीसाठी केंद्र शासनाने ₹ ७१६.५० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. या व्यतिरिक्त राज्याने ₹ ६३४ कोटी रुपयांच्या पुरवणी मागणीला मंजुरी दिली. तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधी, जिल्हा वार्षिक योजना व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीमधून खरेदी करण्याचे अधिकार राज्य शासनाने दिले आहेत. डिसेंबर,२०२० पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडून ₹ ३६१.७९ कोटी, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून ₹ ८६०.९२ कोटी आणि जिल्हा वार्षिक योजना व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून ₹ ६९०.८२ कोटी खर्च झाला.

## आरोग्य सुविधा

१०.३३ सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी राज्यात त्रिस्तरीय पायाभूत वैद्यकीय सेवासुविधा आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरामध्ये समावेश होतो. द्वितीय स्तरावर उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो तर तृतीय स्तरावर वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेली सुसज्ज रुग्णालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचा समावेश होतो. राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा तक्ता १०.२० मध्ये तर त्यांची तपशीलवार मालिका परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे.

**१०.२० राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा**

(दि.३१ डिसेंबर, २०२० रोजी)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| उपकेंद्र (आरोग्यवर्धिनी केंद्रांसह) | १०,६६८ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र (आरोग्यवर्धिनी केंद्रांसह) | १,८३० |
| सामूहिक आरोग्य केंद्र | ३६४ |
| प्राथमिक आरोग्य पथक | १०८ |
| फिरती वैद्यकीय पथक | ५८ |
| उपजिल्हा रुग्णालय | ९१ |
| जिल्हा रुग्णालय | २३ |
| वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालय | १९ |
| सामान्य रुग्णालय | ८ |
| स्त्री रुग्णालय | १३ |
| मनोरुग्णालय | ४ |
| कुष्ठरोग रुग्णालय | ४ |
| क्षयरोग रुग्णालय | ४ |
| इतर रुग्णालय (अस्थिव्यंग) | १ |
| विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय | २ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.३४ उपकेंद्र स्तरावर आरोग्यसुविधा देण्याबरोबरच माता व बाल आरोग्यनिगा, कुटुंब कल्याण, पोषण, लसीकरण, अतिसार आणि संसर्गजन्य आजार नियंत्रण याबाबत समुपदेशन केले जाते. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग, सहा खाटांचा आंतररुग्ण विभाग, आपत्कालीन सेवा, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा व औषधे या सुविधा उपलब्ध असून उपकेंद्राने संदर्भित केलेल्या रुग्णांवर उपचार आणि कुटुंबनियोजन या सेवाही पुरविल्या जातात. सामूहिक आरोग्य केंद्रे, उप जिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमार्फत अहोरात्र आपत्कालीन आरोग्य सेवा पुरविल्या जातात.

१०.३५ शासकीय निकषांनुसार आदिवासी क्षेत्रामध्ये ३,००० लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र तर बिगर आदिवासी ग्रामीण क्षेत्रामध्ये ५,००० लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र आणि २०,००० लोकसंख्या असलेल्या आदिवासी क्षेत्रामध्ये एक प्राथमिक आरोग्य केंद्र तर ३०,००० लोकसंख्या असलेल्या बिगर आदिवासी ग्रामीण क्षेत्रामध्ये एक प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापित केले जाते. साधारणत: ८०,००० ते १.२० लाख लोकसंख्येचा समावेश असलेल्या चार ते पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी संदर्भ सेवा केंद्र म्हणून एक सामूहिक आरोग्य केंद्र स्थापित केले जाते. राज्यातील आदिवासी भागात २,१६२ उपकेंद्रे, ३४१ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ६७ सामूहिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत.

१०.३६ शाश्वत विकास ध्येयात समाविष्ट असलेले सार्वत्रिक आरोग्य व्याप्तीचे लक्ष्य साध्य करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने दि.२३ सप्टेंबर, २०१८ रोजी 'आयुष्यमान भारत' ही फ्लॅगशीप योजना सुरू केली. क्षेत्रीय व विभाजीत आरोग्य सेवा वितरण व्यवस्थेकडून सर्वसमावेशक व आवश्यकतेनुसार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी 'आयुष्यमान भारत' हा एक प्रयत्न आहे. प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावर रोगप्रतिबंध, प्रचार व रुग्णवाहिका सेवा देणारी सार्वत्रिक आरोग्य व्यवस्था पुरविण्याच्या उद्देशाने ही योजना वाटचाल करीत आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना हे या योजनेचे दोन घटक आहेत.

१०.३६.१ उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रुपांतर करुन आरोग्यवर्धिनी केंद्र तयार केले जात आहेत. या केंद्रांद्वारे सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा लोकांच्या घराजवळ पुरविण्यात येत आहेत. फिरती वैद्यकीय पथके, आरोग्य शिबीरे, गृह भेटी तसेच लोकांशी संवाद या माध्यमातून आरोग्यवर्धिनी केंद्रांद्वारे खालील आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

- प्रसूतीपुर्व निगा व प्रसूती सेवा
- नवजात शिशू व अर्भकांसाठी आरोग्य सेवा
- बाल्य व किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा
- कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक व प्रजनन विषयक इतर आरोग्य सेवा
- संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन
- सर्वसाधारण आजार व किरकोळ व्याधींसाठी सामान्य बाह्य रूग्ण सेवा
- क्षयरोग व कुष्ठरोगासह संसर्गजन्य रोग, जुनाट आजार, असंसर्गजन्य रोग यांची तपासणी, प्रतिबंध, नियंत्रण आणि व्यवस्थापन
- डोळे आणि कान, नाक व घसा यांच्या सामान्य आजारांसंबंधीच्या सेवा
- प्राथमिक मौखिक आरोग्य सेवा
- वृद्धांचे आजार व उपशमन निगा
- भाजणे व अपघात यासह आपत्कालीन सेवा
- मानसिक आजारांची तपासणी व प्राथमिक उपचार

१०.३६.२ आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये आयुर्वेद/ युनानी / परिचारीका पदवीधारकांची समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून नियुक्ती केली जात आहे. आरोग्यवर्धिनी केंद्रात समुदाय आरोग्य अधिकारी प्रमुख असून त्यांच्या सोबत आरोग्य सेवक, बहुउद्देशीय आरोग्य सेवक, आशा स्वयंसेविका यांचा समावेश असलेले प्राथमिक आरोग्य सेवा देणारे पथक कार्यरत आहे.

१०.३६.३ राज्यात डिसेंबर, २०२० पर्यंत ४,२३४ उपकेंद्र, १,८१३ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ४४२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र म्हणून कार्यरत आहेत. त्यापैकी राज्यातील आदिवासी भागात ४२० उपकेंद्र - आरोग्यवर्धिनी केंद्र व १२६ प्राथमिक आरोग्य केंद्र - आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यरत आहेत. सन २०२२ पर्यंत टप्प्याटप्प्याने सर्व उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे रूपांतर आरोग्यवर्धिनी केंद्रात करण्यास राज्य कटीबध्द आहे.

१०.३६.४ या कार्यक्रमा अंतर्गत ३० वर्षांवरील वयाच्या सर्व लोकांची उच्च रक्तदाब, मधुमेह व सामान्य कर्करोगासाठी तपासणी करून मोफत उपचार केले जात आहेत.

## डॉक्टर-लोकसंख्या प्रमाण

१०.३७ पदवी प्राप्त केल्यानंतर राज्यातील ॲलोपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना (डॉक्टर) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेकडे नोंदणी व दर पाच वर्षांनी परवाना नूतनीकरण करावे लागते. डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण १,६१,३७९ (त्यापैकी ७२,५३९ पदव्युत्तर) ॲलोपॅथी डॉक्टरांनी नोंदणी केली होती. मागील पाच वर्षात ३१,९९१ ॲलोपॅथी डॉक्टरांनी नव्याने नोंदणी केली असून ७२,३५८ डॉक्टरांनी त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण केले आहे. या मागील पाच वर्षाच्या आकडेवारीवर आधारीत डॉक्टरांचे लोकसंख्येशी अंदाजित प्रमाण १ : ११८८ इतके आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.३८ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा उद्देश आरोग्य यंत्रणांचे तसेच संस्था व मानवी संसाधन क्षमतेचे सक्षमीकरण करून सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे हा आहे. ग्रामीण व नागरी भागातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांचे नियंत्रण करणे आणि प्रजनन, माता, नवजात शिशू, बालके व किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम राबविणे हे या अभियानाचे प्रमुख घटक आहेत. स्वच्छता व आरोग्यनिगा, पोषण आणि सुरक्षित पेयजल यासारख्या आरोग्याशी निगडीत सेवांच्या परिणामकारक एकत्रिकरणावर राष्ट्रीय आरोग्य अभियानात भर दिला आहे.

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

१०.३८.१ ग्रामीण जनतेस विशेषत: गरीब व वंचित कुटुंबांना किफायतशीर व दर्जेदार आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान एप्रिल, २००५ मध्ये सुरु करण्यात आले. प्रजनन, माता, नवजात शिशू, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम, हिवताप, अंधत्व, आयोडिन कमतरता, हत्तीरोग, क्षयरोग, कुष्ठरोग व एकात्मिक रोग नियंत्रण हे सर्व आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यक्रम राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये समाविष्ट आहेत.

१०.३८.१.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेसाठी ४० फिरत्या वैद्यकीय पथकांद्वारे आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात येतात. दैनंदिन आरोग्यसेवा पुरविण्याकरिता ही पथके स्वयंसेवी संस्था / रुग्ण कल्याण

**तक्ता १०.२१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत भौतिक प्रगती**

(संख्या)

| घटक | तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|---|
| आयुष | उपचार घेतलेले रुग्ण | | | |
| | बाह्यरुग्ण विभाग | ४२,५१,४२८ | ५१,१२,१०२ | १५,१४,४४२ |
| | आंतररुग्ण विभाग | ८९,२९८ | १,०९,२६२ | ७२,९३७ |
| फिरते वैद्यकीय पथक | उपचार घेतलेले रुग्ण | १६,०१,९८४ | १६,९३,०१९ | १०,४६,४५२ |
| | प्रजनन, माता, नवजात शिशू , बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम (प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात आरोग्य निगा) | २,२१,०१६ | २,२३,०२० | १,५२,९२५ |
| | प्रयोगशाळा तपासणी | ७,९२,६४३ | ९,०३,७८० | ५,७१,२२३ |
| | भेटी दिलेली गावे | २२,५०१ | २०,५७८ | १६,४०२ |
| टेलिमेडीसीन | संदर्भित केलेले व तज्ञ सल्ला मिळालेले रुग्ण | २८,२११ | ३१,२८६ | ८,३५३ |
| सिकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रम | एकूण तपासण्या | ७,४८,०९७ | १०,५०,२२५ | २,५४,११० |
| | बाधित रुग्ण | ७४४ | १,५१७ | ३७७ |
| | वाहक | ७,७४१ | १०,४१३ | ३,९५६ |
| उपशमन निगा (पॅलिॲटिव्ह केअर) | उपचार घेतलेले रुग्ण | ७,०९६ | ९,७७६ | ३,९६६ |
| संदर्भ सेवा सुविधा (वाहतूक) | गर्भवती महिला | | | |
| | रुग्णालयीन प्रसुती | ५,५८,६३३ | ५,१९,५६२ | ५,६७,३६४ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४,३८,५२२ | ४,६३,११२ | ३,७४,४६८ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १,७५,२७८ | १,८६,२४४ | १,४३,५२१ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ४,९३,२८३ | ५,०३,५२० | ३,८३,२३८ |
| | आजारी नवजात शिशू | | | |
| | आजारी नवजात शिशू | ८६,०८९ | ८८,८३९ | ५२,९९९ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४०,११८ | ५५,०६१ | ५२,७४८ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | २०,१६५ | २५,८८३ | २२,९९५ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ५१,४७९ | ७०,६३३ | ५९,५१९ |
| सार्वजनिक खाजगी भागिदारी | | | | |
| अ) आरोग्य सल्ला संपर्क केंद्र | एकूण कॉल्स | ४,२०,६६६ | ३,४७,४१८ | ३,६४,४३४ |
| ब) अपस्मार (इपिलेप्सी कार्यक्रम) | आयोजित शिबिरे | ११ | ९ | ० |
| | उपचार घेतलेले रुग्ण | ३,०५५ | २,१०८ | ० |
| | शिबिरे (ई. ई. जी. सुविधा असलेली ) | ३७९ | ३१८ | ० |
| | ऑक्युपेशन थेरपी/ फिजीओथेरपी / स्पिच थेरपी घेतलेले | ७८३ | ५७४ | ० |
| क) वैद्यकीय व दंत शिबिरे | आयोजित शिबिरे | ४८ | ४८ | ० |
| | उपचार केलेले रुग्ण | ६२,९६१ | ५९,२७७ | ० |
| | केलेल्या शस्त्रक्रिया | ४,२२३ | २,५८९ | ० |
| ड) माहेरघर | लाभार्थी माता | २,६४९ | २,५२५ | २,२०९ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन ई.ई.जी. इलेक्ट्रो इन्सेफेलो ग्राम + डिसेंबरपर्यंत

समिती यांचेमार्फत चालविली जातात. या फिरत्या वैद्यकीय पथकात एक डॉक्टर, परिचारिका, रेडीओलॉजिस्ट, प्रयोगशाळा सहायक, फार्मासिस्ट, मदतनीस व चालक यांचा समावेश असतो. टेलिमेडीसीन सुविधा २३ जिल्हा रुग्णालये, ३९ उपजिल्हा रुग्णालये / सामूहीक आरोग्य केंद्रे व सहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. या कार्यक्रमांतर्गत एकूण १३,६६० (६,९५६ नियमित संवर्गावरील व ६,७०४ कंत्राटी) विशेषज्ञांसह वैद्यकीय अधिकारी ४३,९४३ गावातील सुमारे १.४५ कोटी जनतेला आरोग्य सुविधा पुरवित आहेत. या योजने अंतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंत ६०,८८७ आशा स्वयंसेविकांची नियुक्ती केली आहे. सिकल सेल रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये सिकल सेल रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१०.३८.१.२ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ २,१४८.७८ कोटी व सन २०२०-२१ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १,३६२.४६ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची भौतिक प्रगती तक्ता १०.२१ मध्ये दिली आहे.

## प्रजनन, माता, नवजात शिशू , बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम

१०.३८.२ प्रजनन, माता, नवजात शिशू , बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम हा बालकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावून व लोकसंख्या स्थिर ठेवून त्याद्वारे माता मृत्यूप्रमाण, अर्भक मृत्यूदर व एकुण जननदर कमी करण्यासाठी राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ ३४५.०१ कोटी व सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १८४.०३ कोटी खर्च झाला. आरोग्यविषयक निवडक निर्देशक तक्ता १०.२२ मध्ये व त्यांची मालिका परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ आरोग्य विषयक निवडक निर्देशक**

| निर्देशक | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|
| जन्मदर | १५.९ | १५.७ | १५.६ |
| मृत्यूदर | ५.९ | ५.७ | ५.५ |
| अर्भक मृत्यूदर | १९ | १९ | १९ |
| नवजात शिशू मृत्यूदर | १३ | १३ | १३ |
| पाच वर्षा खालील बालकांचा मृत्यूदर | २१ | २१ | २२ |
| एकूण जननदर | १.८ | १.७ | १.७ |
| | (२०१४-१६) | (२०१५-१७) | (२०१६-१८) |
| माता मृत्यूप्रमाण | ६१ | ५५ | ४६ |

*आधार* : नमुना नोंदणी पद्धती, भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## जननी सुरक्षा योजना

१०.३८.३ ग्रामीण व नागरी भागात रुग्णालये/ प्रसूतीगृहात प्रसूती करण्यास चालना देऊन दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील बालमृत्यू व माता मृत्यू कमी करण्याकरीता जननी सुरक्षा योजना राबविण्यात येत आहे. सर्व प्रसूती कुशल प्रसूती सेवकांमार्फत करुन त्याद्वारे माता मृत्यू कमी करणे हे या योजनेचे ध्येय आहे. रुग्णालये / प्रसूतीगृहात प्रसूती झाल्यानंतर सात दिवसांच्या आत ग्रामीण भागात ₹ ७०० व नागरी भागात ₹ ६०० लाभार्थ्याला दिले जातात. कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या ग्रामीण व नागरी भागातील लाभार्थ्यास ₹ ५०० दिले जातात. सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती झालेल्या लाभार्थ्यास झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी ₹ १,५०० पर्यंत रक्कम दिली जाते. जननी सुरक्षा योजनेची प्रगती तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२३ जननी सुरक्षा योजनेची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) |
|---|---|---|
| २०१८-१९ | ४५.३५ | २.३६ |
| २०१९-२० | ४७.५५ | २.७१ |
| २०२०-२१+ | ३०.४६ | १.४४ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

१०.३८.४ गरोदर महिलांना प्रत्येक महिन्याच्या ठराविक दिवशी आश्वासित आणि गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व सेवा मिळावी या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची सुरुवात केली. प्रयोगशाळेतील तपासण्या, सोनोग्राफी तपासणी, प्रसूतीतज्ञाकडून शारीरिक आणि उदर चिकित्सा, अति जोखमीच्या गरोदरपणाचे वेळेवर निदान, तत्पर संदर्भसेवा हे या अभियानाचे महत्वाचे घटक आहेत. दर महिन्याच्या नऊ तारखेला या सेवा आरोग्यसुविधा केंद्रात लाभार्थ्यांना मोफत दिल्या जातात. जर नऊ तारखेला रविवार किंवा

सार्वजनिक सुट्टी असेल तर पुढील कामकाजाच्या दिवशी या सेवा पुरविल्या जातात. नियमित प्रसूतीपूर्व सेवांव्यतिरिक्त या सेवा दिल्या जातात. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची प्रगती तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ लाख) | प्रसूतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत पहिल्यांदा प्रसूतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | अति जोखमीच्या गरोदरपणाचे निदान झालेल्या महिलांची संख्या (लाख) |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ५०.०२ | ७.०३ | ३.४८ | ०.२४ |
| २०१९-२० | २२.७४ | ३.०१ | १.४७ | ०.३२ |
| २०२०-२१+ | ६.३२ | ०.४९ | ०.२१ | ०.०७ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

१०.३८.५ देशातील बहुतांश गर्भवती महिला अर्थार्जनासाठी गरोदरपणाच्या शेवटच्या दिवसापर्यंत काम करतात. तसेच प्रसूती नंतर शारीरिक क्षमता नसतानाही त्या तात्काळ कामावर रूजू होतात. परिणामी अल्पपोषित गर्भवती महिला व स्तन्यदा मातांनी जन्म दिलेल्या नवजात बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने त्यांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्याकरीता दि. १ जानेवारी, २०१७ पासून 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शासकीय रुग्णालयात नोंदणी केलेल्या गर्भवती महिलेस तिच्या पहिल्या जिवीत अपत्याकरीता ₹ ५,००० लाभाची रक्कम तीन हप्त्यात बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाते. पगारी प्रसूतीरजा उपभोगणाऱ्या महिला हा लाभ घेण्यास पात्र नाहीत. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची प्रगती तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२५ प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) |
|---|---|---|
| २०१८-१९ | २१९.९८ | ५.९८ |
| २०१९-२० | ३८१.८८ | ७.१९ |
| २०२०-२१+ | १७६.२५ | ३.३२ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## नवसंजीवनी योजना

१०.३८.६ आदिवासी भागातील माता मृत्यूप्रमाण व अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १६ जिल्ह्यांतील ८,४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत २८१ फिरती वैद्यकीय पथके स्थापन करण्यात आली असून प्रत्येक पथकात एका वैद्यकीय अधिकाऱ्यासह प्रशिक्षित रुग्णसेवक व वाहन यांचा समावेश आहे. ही पथके प्रत्येक गावाला व वस्तीला भेट देऊन कुपोषित व आजारी बालके यांना घरपोच आरोग्य सेवा पुरवतात व आवश्यकतेनुसार जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करतात. नवसंजीवनी योजने अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, दाई बैठका, मान्सून पूर्व उपाययोजना, तीव्र व अतितीव्र कुपोषित बालकांना आहार पुरविणे व पालकांना बुडीत मजुरी भरपाई इत्यादी योजनांची अंमलबजावणी केली जाते.

## मातृत्व अनुदान योजना

१०.३८.६.१ मातृत्व अनुदान योजना ही नवसंजीवनी योजने अंतर्गत राबविण्यात येत असून यामध्ये आदिवासी भागातील गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक ती औषधे पुरविणे या आरोग्य सेवा पुरविल्या जातात. या योजने अंतर्गत प्रसूतीपूर्व तपासणीकरीता वैद्यकीय केंद्रात जाण्यासाठी ₹ ४०० रोख देण्यात येतात व ₹ ४०० ची औषधे मोफत पुरविण्यात येतात. मातृत्व अनुदान योजनेची प्रगती तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ मातृत्व अनुदान योजनेची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| २०१८-१९ | ४.९२ | ६६,८५१ |
| २०१९-२० | २.४८ | ४६,३९३ |
| २०२०-२१+ | ०.६० | १४,८८३ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.३८.७ क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, हिमोफिलस इंफ्ल्युएंझा टाईप बी, काविळ-ब, गोवर, इत्यादी आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण सेवा पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत राज्यामध्ये सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या तक्ता १०.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२७ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या**

(लाखात)

| लस | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.४६ | १९.४२ | १९.३२ | २०.०८ | १९.३२ | १४.८९ |
| पोलिओ III | १९.४६ | १८.९२ | १९.३२ | १९.१९ | १९.३२ | १३.५५ |
| काविळ ब - 0 | ९.६७ | १०.७७ | १९.३२ | १०.३३ | १९.३२ | ८.५७ |
| गोवर व रुबेला | १९.४६ | १८.४४ | १९.३२ | १९.३३ | १९.३२ | १३.८६ |
| घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात (डीपीटी) - बुस्टर | १९.०८ | १७.१९ | १९.३२ | १८.३४ | १९.३२ | १२.६७ |
| पोलिओ (बुस्टर) | १९.०८ | १७.३० | १९.३२ | १८.४४ | १९.३२ | १२.६५ |
| डीपीटी (५ वर्षे) | १९.०८ | १३.७८ | १८.९६ | १४.९० | १८.९६ | ९.४० |
| धनुर्वात (१० वर्षे) | २५.९८ | १६.४४ | २६.०८ | १७.२० | २६.०८ | ७.६० |
| धनुर्वात (१६ वर्षे) | २३.५० | १६.५९ | २३.५९ | १६.५९ | २३.५९ | ७.२० |
| धनुर्वात (गरोदर माता) | २१.४० | १९.३८ | २१.३६ | १९.३७ | २१.२६ | १४.०९ |
| पेंटावॅलेन्ट ३ | १९.४६ | १८.९५ | १९.३२ | १९.२३ | १९.३२ | १३.५९ |
| रोटा व्हायरस | ला.ना. | ला.ना. | १९.३२ | ८.६२ | १९.३२ | १३.११ |
| मेंदुज्वर | ३.४० | २.३५ | २.९९ | २.७७ | २.९९ | १.९६ |
| खर्च (₹ कोटी) | ५५.७७ | | ५७.५० | | ३१.८३ | |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन    ला.ना. लागू नाही    + डिसेंबरपर्यंत

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.३८.८ पाच वर्षाखालील मुलांना पूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी राष्ट्रीय लसीकरणाच्या दिवशी पोलिओ डोस देण्यात येतो. राज्याने पोलिओ विषाणूचा प्रसार नियंत्रणात ठेवण्यासाठी चांगली प्रगती केली असून पोलिओचा एकही रुग्ण आढळलेला नाही. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२८ पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | लसीकरण केलेल्या मुलांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१८-१९ | १७०.९४ | १३.९३ |
| २०१९-२० | १६९.२८ | १७.४१ |
| २०२०-२१+ | ४३.३२ | २.२४ |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन    + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

१०.३८.९ जन्माच्या वेळी उद्भवणारे दोष, मुलांचे आजार, न्युनता आणि अपंगत्व व विलंबाने होणारी वाढ या दोषांचे लवकर निदान होऊन त्यावर उपचार करणे हा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा उद्देश आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून सहा वर्षापर्यंतच्या शालापूर्व बालकांची वर्षातून दोनदा नियमितपणे आरोग्य तपासणी करणे हा या कार्यक्रमाचा अविभाज्य घटक आहे. त्याचबरोबर सहा ते १८ वर्षे वयोगटातील शासकीय तसेच शासन अनुदानित शाळेत शिकणाऱ्या मुलांची देखील नियमित आरोग्य तपासणी केली जाते. या तपासणीत आजाराचे निदान झालेल्या बालकांना संदर्भसेवा व शस्त्रक्रियेसह वैद्यकीय उपचार मोफत दिले जातात. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/ अंगणवाडी | विद्यार्थी (लाख) | | | केलेल्या शस्त्रक्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आरोग्य तपासणी केलेले | उपचार केलेले | संदर्भित केलेले | हृदया संबंधीत | इतर |
| २०१८-१९ | ८४,४३७ | १२१.२४ | १०.४७ | १.७६ | २,६१४ | १७,६३८ |
| | १,०१,६४७# | ६३.५५ | ५.०७ | ०.४५ | | |
| | १,०३,७७७## | ६४.७१ | ५.०५ | ०.७३ | | |
| २०१९-२० | ८५,३८६ | ११३.९६ | १०.३२ | ३.६० | २,३४० | २३,८३२ |
| | १,०३,२१६# | ६९.८८ | ४.९९ | १.०१ | | |
| | १,०३,३०३## | ७१.०८ | ६.४१ | १.८२ | | |
| २०२०-२१+ | | @ | | | ९८ | २६४ |

# अंगणवाडी सत्र १ ## अंगणवाडी सत्र २ @ कोव्हीड-१९ महामारीमुळे एप्रिल, २०२० पासून शाळा व अंगणवाडी बंद होत्या + डिसेंबरपर्यंत

*आधार*: राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३८.१० किटकजन्य रोगांमुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी व या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या तक्ता १०.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३० किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या**

(संख्या)

| किटकजन्य रोग | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | १०,२३१ | १४ | ९,४९१ | ६ | ११,१६३ | ११ |
| स्वाईन फ्लू | २,५९४ | ४६२ | २,२८७ | २४६ | १२१ | ३ |
| हत्तीरोग | १,४७४ | ० | १,१८७ | ० | ३९४ | ० |
| डेंग्यू | ११,२४९ | ७० | १५,३६३ | ४९ | २,४२९ | ४ |
| मेंदूज्वर | ६ | १ | ३५ | १० | २ | १ |
| चिकुनगुनिया | १,०६१ | ० | १,७८० | ० | ५३२ | ० |
| एईएस/चंडीपुरा | ५४ | १ | ११४ | ११ | १२ | ० |
| खर्च (₹ कोटी) | ७.५१ | | १५.१८ | | २.७१ | |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन एईएस : ॲक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबरपर्यंत

## आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द आणि होमिओपॅथी

१०.३८.११ आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द आणि होमिओपॅथी (आयुष) या उपचार पद्धती निश्चित वैद्यकीय तत्वज्ञानावर आधारित असून रोगप्रतिबंध व आरोग्य संवर्धनाच्या स्थापित संकल्पनांसह निरामय जीवनाचे प्रतिनिधीक मार्ग दर्शवतात. योग उपचार पद्धतीस आता जागतिक स्तरावर आरोग्याचे प्रतिक मानले जात असून अनेक देशांनी त्यांच्या आरोग्यसेवेत याचा अंतर्भाव केला आहे. असंसर्गजन्य रोगांच्या औषधोपचार पद्धती समोरील वाढती आव्हाने, ढासळलेली जीवनशैली, जुनाट आजार, इत्यादींवर आयुष उपचार पद्धतीच्या संकल्पना व सेवा कशा उपयुक्त ठरतील याबाबत मोठया प्रमाणात उत्सुकता दिसून येत आहे. सध्याच्या वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाकडून आयुष उपचार पद्धतीचा समावेश मुख्य आरोग्यसेवा यंत्रणेत करण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आयुष उपचार पद्धतीच्या सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच सामूहिक आरोग्य केंद्रात पुरविल्या जात असून प्रशिक्षित आयुष तज्ञ नियुक्त करण्यात येत आहेत. दि.३१ डिसेंबर, २०२० रोजी राज्यात ७६ आयुर्वेदिक रुग्णालये, ४६९ आयुर्वेदिक दवाखाने, सात युनानी रुग्णालये, २५ युनानी दवाखाने आणि ५५ होमिओपॅथी रुग्णालये आहेत. डिसेंबर, २०२० पर्यंत ८८,१६६ आयुर्वेदिक डॉक्टरांनी (त्यापैकी ४,०६१ पदव्युत्तर) आणि ७,८३३ युनानी डॉक्टरांनी (त्यापैकी ११० पदव्युत्तर) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांचेकडे नोंदणी केली तर ७४,००० होमिओपॅथी डॉक्टरांनी (त्यापैकी २,५१७ पदव्युत्तर) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीकडे नोंदणी केली आहे.

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

१०.३८.१२ नागरी भागातील जनतेच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी सन २०१३ पासून राज्यात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत प्रामुख्याने ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे/नगरे यातील झोपडपट्ट्या व इतर सिमांतीक घटकांवर लक्ष्य केंद्रीत केले आहे. झोपडपट्टीतील अस्वच्छ वातावरण आणि लोकसंख्येच्या दाट घनतेमुळे तेथील लोक दमा, क्षयरोग, इत्यादीसारख्या फुफ्फुसाच्या रोगांमुळे बाधित होतात. तसेच झोपडपट्ट्यांमध्ये किटकजन्य आजाराचे प्रमाणही जास्त असते. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाना अंतर्गत ९५ शहरे समाविष्ट करण्यात आली आहेत. राज्यातील झोपडपट्टीत राहणारी सुमारे २.०१ कोटी लोकसंख्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत समाविष्ट आहे.

१०.३८.१३ राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण ६५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व १० फिरती वैद्यकीय पथके कार्यरत असून ७,१३७ आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. सुमारे १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे नसलेल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी १० महानगरपालिका क्षेत्रात १०० 'आपला दवाखाना' चिकित्सालये मंजूर केली आहेत. ही चिकित्सालये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची उपकेंद्रे म्हणून काम करतील. सन २०१९-२० साठी केंद्र शासनाकडून ₹ २२०.२३ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास मंजुरी देण्यात आली असून ₹ १३५.२२ कोटी खर्च झाले. सन २०२०-२१ साठी ₹ २७२.७९ कोटी रक्कमेच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयास मंजुरी देण्यात आली असून डिसेंबर पर्यंत ₹ १२३.४२ कोटी खर्च झाले.

## महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा

१०.३८.१४ महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेमार्फत रुग्णांना नजीकच्या रुग्णालयामध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी प्राथमिक आरोग्यसेवेसह जीवरक्षक प्रणालीयुक्त रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येतात. ही आपत्कालीन सेवा १०८ या मोफत दूरध्वनी क्रमांकावर निरंतर उपलब्ध आहे. एकूण ९३७ रुग्णवाहिका कार्यरत असून त्यापैकी २३३ रुग्णवाहिका अद्ययावत जीवरक्षक प्रणालीसह आणि ७०४ रुग्णवाहिका प्राथमिक जीवरक्षक प्रणालीसह आहेत. आपत्कालीन सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३१ आपत्कालीन सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या**

(संख्या)

| आपत्कालीन स्थिती | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| प्रसूती | ६,५०१ | ३,८४७ | १,२४६ |
| गरोदरपणा | २,३१,३७४ | १,७५,१२४ | ७७,८८७ |
| वैद्यकीय | ८,८६,६७४ | ५,९५,८५६ | ३,५५,९२३ |
| अपघात (वाहनांमुळे) | ७३,४३१ | ५१,९८३ | २४,७११ |
| प्राणघातक हल्ला | ११,९११ | ८,८०४ | ४,१७१ |
| भाजणे | ३,६०६ | २,०६८ | ७६२ |
| हृदयविकार | १,७७७ | १,०९५ | ३२४ |
| पडून अपघात | २७,३१४ | २१,९९४ | ६,४४० |
| विषप्राशन/ विषबाधा | ३२,३३१ | २५,८९९ | ११,१६५ |
| मोठी दुर्घटना | ४,५८६ | २,१०७ | ९१८ |
| बहु आघात | १,२३३ | ४६९ | ९८ |
| इतर | ६४,९२३ | ५२,०५३ | २,३९,४४१@ |
| **एकूण** | **१३,४५,६६१** | **९,४१,२९९** | **७,२३,०८६** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र @ कोविड-१९ बाधित रुग्ण समाविष्ट + डिसेंबरपर्यंत

## सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३८.१५ क्षयरोग हा संसर्गजन्य रोग असल्याने 'क्षयरोग मुक्त भारत' बनविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. लागण झालेल्या क्षयरोग रुग्णांची डायरेक्टली ऑब्झर्वड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉट्स) द्वारे तपासणी केली जाते व ते पूर्ण बरे होईपर्यंत प्रभावीपणे उपचार देण्यात येतात. यामध्ये संपूर्ण उपचार कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा व औषधोपचाराला रुग्णांचा प्रतिसाद यावर नियमितपणे देखरेख केली जाते. सन २०१९ मध्ये दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या ८९३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८८ टक्के होते, तर सन २०२० मध्ये दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या ८०३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८३ टक्के होते. सन २०१९-२० मध्ये या कार्यक्रमावर एकूण ₹ १३५.०७ कोटी व सन २०२०-२१ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ₹ ६१.८० कोटी खर्च झाले.

## राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम

१०.३८.१६ मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करणे आणि शाळेत जाणाऱ्या मुलांची तपासणी करून दृष्टीदोष आढळणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्मा पुरविणे या उद्देशाने राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१९-२० मध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रियांच्या निर्धारित ७.५० लाख लक्ष्यापैकी ७.०४ लाख शस्त्रक्रिया करण्यात आल्या व ₹ ७.२२ कोटी खर्च झाले तर सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत तेवढयाच लक्ष्यापैकी १.०१ लाख शस्त्रक्रिया करण्यात आल्या व ₹ ०.९५ कोटी खर्च झाले.

## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम

१०.३८.१७ कुष्ठरोगाचे निर्मूलन करणे (सर्व जिल्ह्यांमध्ये दर १०,००० लोकसंख्येमागे एक पेक्षाही कमी कुष्ठरोगी आढळणे), कुष्ठरोग बाधित रुग्णाचे अपंगत्व प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन तसेच कुष्ठरोगाबाबतची कलंक भावना कमी करणे या उद्देशाने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम सुरु केला. सन २०१९-२० मध्ये नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व कुष्ठरोगग्रस्त रुग्णांची संख्या अनुक्रमे १६,५३१ व १०,२०३ होती आणि कुष्ठरोगाचे प्रमाण प्रति १० हजार लोकसंख्येमागे ०.८१ होते. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व कुष्ठरोगग्रस्त रुग्णांची संख्या अनुक्रमे ९,७९३ व ९,८४९ होती.

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.३८.१८ लोकसंख्या स्थिर ठेवणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू आहेत. मुखावाटे घ्यावयाच्या गोळ्या, तांबी, प्रसुतीपश्चात तांबी, पारंपरिक संतति प्रतिबंधक साधने याबरोबरच काही नवीन गर्भनिरोधनाच्या पद्धतींचा म्हणजेच इंजेक्टेबल एमपीए, आठवडी सेंटक्रोमॅन गोळ्या, इत्यादी पद्धतींच्या प्रचार व प्रसारावर जास्त भर दिला जातो. कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३२ कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची प्रगती**

('०००)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २०१८-१९ | ५६५ | ८.९ | ३९०.९ | ३९९.६ (७०.७) | ४९० | ४१८.४ (८५.४) | २३.४५ |
| २०१९-२० | ५६५ | ८.९ | ३६२.७ | ३७१.७ (६५.८) | ४९० | ३९६.६ (८१.०) | २९.१८ |
| २०२०-२१+ | ५६५ | २.४ | १०२.२ | १०४.६ (१८.५) | ४९० | २६०.९ (५३.३) | १०.२० |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात + डिसेंबरपर्यंत

## एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

१०.३९ पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना या नावाने रोख रक्कम विरहीत उपचारांकरिता राष्ट्रीय विमा कंपनीच्या सहयोगाने राज्यात राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने द्वितीय व तृतीय स्तरावरील रुग्णालयात दाखल होवून उपचार घेण्यासाठी प्रतिवर्ष प्रति कुटुंब ₹ पाच लाख पर्यंत आरोग्य विमा संरक्षण असलेली आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दि.२३ सप्टेंबर, २०१८ रोजी सुरू केली. सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ नुसार ग्रामीण व नागरी भागाकरीता अनुक्रमे वंचितता व व्यवसाय या निकषांवर आधारित कुटुंबांचा समावेश या योजने अंतर्गत केला आहे. राज्यात ही योजना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रित केली आहे.

१०.३९.१ महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत निवडक उपचारांसाठी सूचीबद्ध रुग्णालयात रोख रक्कम विरहीत वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी पिवळी शिधापत्रिका धारक (दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, अन्नपूर्णा व अंत्योदय योजनेचे लाभार्थी), दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारक आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा) शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे, बांधकाम कामगार मंडळाने ओळखपत्र दिलेले नोंदणीकृत बांधकाम कामगार पात्र आहेत. या योजने अंतर्गत लाभार्थी कुटुंबास रुग्णालयात दाखल झाल्यावर होणाऱ्या खर्चाची पुर्तता करण्यासाठी प्रतिवर्ष प्रतिकुटुंब ₹ १.५० लाख पर्यंत व मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ₹ २.५० लाख पर्यंत आरोग्य विमा संरक्षण देण्यात येते.

१०.३९.२ प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत नोंद झालेल्या ८३.६३ लाख कुटुंबातील सदस्य संगणकीकृत ई-कार्ड चा वापर करुन सर्व सुचीबद्ध रुग्णालयांत लाभ मिळण्यास पात्र असणार आहेत. डिसेंबर, २०२० पर्यंत एकूण ६९.८३ लाख ई-कार्ड वितरीत करण्यात आले आहेत. सदर योजना संपूर्णत: कागदपत्र विरहीत असून वर नमूद वैध

ओळखपत्र व फोटो ओळखपत्राच्या आधारे कुठल्याही राज्यातील रुग्ण कुठल्याही राज्यातील सुचीबद्ध रुग्णालयात जाऊन उपचारांचा लाभ घेऊ शकतात. एकात्मिक योजने अंतर्गत ₹ १.५ लाखापर्यंतचे विमा संरक्षण विमा कंपनीकडून तर ₹ १.५ लाखावरील व पाच लाखांपर्यंत हमी तत्वावर 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' कडून देण्यात येत आहेत.

१०.३९.३ महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थी ३४ निवडक विशेष सेवा अंतर्गत ९९६ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक शस्त्रक्रिया/ उपचार व १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा लाभ घेऊ शकतात. एकात्मिक योजना किंवा प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेले लाभार्थी १,२०९ वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया आणि १८३ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. एकात्मिक योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये एकूण ६.०३ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून ₹ १,२८४.८१ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत एकूण ४.५४ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून ₹ ७४४.६५ कोटी खर्च झाला. कोविड-१९ महामारीच्या काळात राज्यातील सर्व नागरीकांना (लाभार्थी व अलाभार्थी कुटुंब) कोविड-१९ उपचार व इतर वैद्यकीय सेवा खाजगी सुचीबद्ध रुग्णालयात उपलब्ध करुन देण्यासाठी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली. सर्व सुचीबद्ध रुग्णालयात एकूण ९३,८८४ लाभार्थ्यांना रोख रक्कम विरहीत उपचार पुरविण्यात आले असून डिसेंबर, २०२० पर्यंत ₹ ४१.९२ कोटी खर्च झाला. एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत देण्यात आलेल्या प्रमुख शस्त्रक्रिया व उपचारांची आकडेवारी तक्ता १०.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३३ एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रमुख शस्त्रक्रिया व उपचारांची आकडेवारी**

| अति विशेष उपचार | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) |
| कर्करोगावरील वैद्यकीय उपचार | १,४४,२३२ | ७२.०३ | १,५९,७६९ | ८४.७५ | १,१३,८६५ | ५९.२२ |
| मूत्रपिंड उपचार | ८४,८०८ | ७१.६२ | ९३,५८८ | ८६.७४ | ६१,७३२ | ६५.६४ |
| हृदयविकार | ६६,१०४ | २४४.९५ | ७९,३६८ | ३१५.८७ | ४४,९६४ | १६४.०९ |
| फुफ्फुसांच्या आजारावरील उपचार | ५,०९० | १०.३६ | ५,३०६ | ११.९५ | ४४,६६२ | ३२.६७ |
| स्त्री रोग व प्रसूती | ४,७१० | ७.६२ | ४,३३९ | ८.४० | २८,२९६ | १०.४७ |
| बहु आघात | ३५,००७ | ४७.०१ | ४०,१६४ | ६१.२४ | २४,४५६ | ४४.९० |
| प्रजनन संस्थेविषयी उपचार | ४५,५८१ | ८३.१३ | ४६,१९८ | ९२.६८ | २३,५३५ | ४३.२० |
| कर्करोगावरील रेडिएशन थेरेपी | २२,८९० | १०६.८९ | २३,९९७ | ११९.३४ | १६,३४० | ७८.३४ |
| बालरोगावरील उपचार | २०,०१३ | ४०.१२ | २३,४८८ | ४७.९० | १५,८९६ | ३५.४८ |
| कर्करोगावरील शस्त्रक्रिया | १६,७०६ | ४३.९३ | १७,६४० | ५२.४६ | ११,७२३ | १४.५१ |
| **एकूण** | **४,४५,१४१** | **७२७.६६** | **४,९३,८५७** | **८८१.३३** | **३,८५,४६९** | **५४८.५२** |

आधार : राज्य आरोग्य हमी सोसायटी, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.४० राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. जनजागृती मोहीम राबवून मार्गदर्शन करणे आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व देखरेख यावर या कार्यक्रमाचा भर आहे. यामध्ये लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांच्या व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांच्या रक्ताच्या नमुन्याची तपासणी करुन देखरेख केली जाते. सन २०१९-२० मध्ये ₹ १०९.२८ कोटी खर्च झाला असून सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ७५.६१ कोटी खर्च झाला. एचआयव्ही / एड्सग्रस्त रुग्णांची माहिती तक्ता १०.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३४ एचआयव्ही / एड्स रुग्णांची संख्या**

('०००)

| बाब | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती | ५,८०६ | ७,००४ | ५,१६६ |
| तीन चाचणी पद्धतीवरुन एचआयव्ही बाधित | २६ | २३ | १३ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के)@ | ०.५ | ०.३ | ०.३ |
| एड्स रुग्ण | १६.१३ | ११.५० | ८.२० |
| एड्सने मृत्यू | ३.७२ | ३.५२ | २.२० |

@ तपासणी केलेल्या जोखीम गटातील व्यक्तींशी

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.४१ सुरक्षित रक्ताचा व रक्तातील घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सिकल सेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसीमिया व हिमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाची माहिती तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३५ रक्त संकलनाची माहिती**

| वर्ष | रक्तपेढ्या (संख्या) | एकूण संकलन (लाख युनिट) | पैकी, स्वेच्छेने केलेले (लाख युनिट) | कार्ड वितरीत केलेल्या रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सिकल सेल | थॅलेसीमिया | हिमोफिलिया |
| २०१८ | ३३४ | १६.५६ | १६.३७ | ६११ | ६३१ | १११ |
| २०१९ | ३४१ | १७.२३ | १७.०७ | १,१६९ | ६८२ | ३२१ |
| २०२० | ३४५ | १५.२८ | १५.१३ | ५९७ | ४६५ | ९९ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.४२ कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, संसर्गजन्य काविळ, विषमज्वर, इत्यादी जलजन्य आजार यांचा उद्रेक झाल्यास व तुरळकपणे उद्भवल्यास साथरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत संनियंत्रण केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. सदर जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या तक्ता १०.३६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३६ जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या**

(संख्या)

| आजार | २०१८ | | २०१९ | | २०२० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू |
| कॉलरा | ३५६ | २ | २४५ | ३ | ७ | ० |
| गॅस्ट्रो | ६१,००३ | ५ | ५५,०९७ | ० | २३,२३६ | ० |
| अतिसार | ६,५५,३४७ | ३ | ७,३८,४८० | ० | ४,४२,२९५ | ० |
| संसर्गजन्य काविळ | ४,४६३ | १ | ४,२८० | ० | १,३०९ | ० |
| विषमज्वर | ७२,४५३ | ० | ७२,८७६ | ० | २५,५४८ | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | ३०९ | १३ | ६८४ | १५ | ५०२ | १६ |
| **एकूण** | **७,९३,९३१** | **२४** | **८,७१,६६२** | **१८** | **४,९२,९६१** | **१६** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.४३ मानवी उपचारांकरिता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे तसेच मानवी अवयवांचे व्यापारीकरण रोखणे याबाबत नियमन करण्याकरिता केंद्र शासनाने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. राज्यात दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत २११ नोंदणीकृत केंद्रे असून त्यापैकी एक अवयव प्रत्यारोपणासाठी १११ केंद्रे व एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी १०० केंद्रे आहेत. या व्यतिरिक्त नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी एकुण २६३ केंद्रे आहेत. तसेच ६७ रुग्णालयांना प्रत्यारोपणाशिवाय अवयव काढण्याचे केंद्र (नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर) म्हणून नोंदणीकृत करण्यात आले आहे. प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.३७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३७ प्रत्यारोपणांची संख्या**

(संख्या)

| प्रत्यारोपण | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|
| जीवित | | | |
| अ) मूत्रपिंड | ६४६ | ५९३ | ७९ |
| ब) यकृत | ११९ | १२३ | ७४ |
| मृतवत | | | |
| अ) मूत्रपिंड | २०६ | २४२ | १९ |
| ब) यकृत | १३८ | १४२ | २४ |
| क) हृदय | ३७ | ३९ | ४ |
| ड) फुफ्फुस | ६ | ८ | ० |
| ई) बुब्बुळ | ३,८१३ | २,२९५ | २४२ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना

१०.४४ रस्ते अपघातग्रस्त रुग्णांना तत्पर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना १४ ऑक्टोबर, २०२० पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये रस्ते अपघातातील रुग्णाची स्थिती स्थिर करण्यासाठी पहिल्या ७२ तासांसाठी लागणाऱ्या वैद्यकीय सेवा नजीकच्या सुचीबध्द रुग्णालयामधून ७४ उपचार पद्धतींच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत. प्रति रुग्ण प्रति अपघात ₹ ३० हजार पर्यंतचा खर्च अंतिम केलेल्या पॅकेजच्या दरानुसार या योजनेंतर्गत सुचीबध्द रुग्णालयास विमा कंपनीकडून अदा करण्यात येईल. ही योजना विमा तत्वावर राज्य आरोग्य हमी सोसायटी मार्फत राबविण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण

१०.४५ राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ वर्ष २०१९-२० मध्ये घेण्यात आले. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ व राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ नुसार राज्याकरीता निवडक निर्देशक तक्ता १०.३८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३८ राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ व राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ करीता निवडक निर्देशक**

(टक्के)

| निर्देशक | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ (२०१५-१६) | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५ (२०१९-२०) |
|---|---|---|
| गर्भधारणेची नोंदणी करुन माता व बाल संरक्षक कार्ड प्राप्त झालेल्या गर्भवती महिला | ९०.९ | ९५.५ |
| रुग्णालये/ प्रसूतीगृहात प्रसूती | ९०.३ | ९४.७ |
| कुशल आरोग्य सेवकांमार्फत प्रसूती | ९१.१ | ९३.८ |
| डॉक्टर/ नर्स/ इतर आरोग्य कर्मचारी यांचेकडून प्रसूती नंतर दोन दिवसांच्या आत प्रसूती पश्चात सेवा मिळालेल्या माता | ७८.५ | ८५.४ |
| जन्म नोंदणी झालेली मुले (पाच वर्षाखालील) | ९५.१ | ९६.३ |
| सार्वजनिक आरोग्य केंद्रात प्रति प्रसूती सरासरी वैयक्तीक खर्च (₹) | ३,५७८ | २,९६६ |
| १५ ते ४९ वर्षे वयोगटातील अशक्त स्त्रिया | ४८.० | ५४.२ |
| वयाच्या मानाने कमी उंची असलेली पाच वर्षापेक्षा कमी वयाची मुले$ | ३४.४ | ३५.२ |
| उंचीच्या मानाने वजन कमी असलेली पाच वर्षापेक्षा कमी वयाची मुले$ | २५.६ | २५.६ |
| वयाच्या मानाने वजन कमी असलेली पाच वर्षापेक्षा कमी वयाची मुले$ | ३६.० | ३६.१ |
| रक्त शर्करा पातळी उच्च किंवा खूप उच्च असणारी (> 140 mg/dl) अथवा रक्त शर्करा पातळी नियंत्रित करणारी औषधे घेणारे# | | |
| स्त्री | ला.ना. | १२.४ |
| पुरुष | ला.ना. | १३.६ |
| उच्च रक्तदाब (सिस्टॉलीक ≥ १४० mm of Hg आणि/किंवा डायस्टोलीक ≥ ९० mm of Hg) अथवा रक्तदाब नियंत्रणात ठेवणारी औषधे घेणारे | | |
| स्त्री | ला.ना. | २३.१ |
| पुरुष | ला.ना. | २४.४ |

$ डब्लू एच ओ मानकानुसार २ प्रमाण विचलनाखाली # यादृच्छिक रक्त शर्करा पातळी मापन ला.ना. लागू नाही

*आधार :* आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्था

# महिला व बाल विकास

१०.४६ महिलांचे सक्षमीकरण व बालविकास हे राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे अविभाज्य भाग आहेत. महिलांचे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे याद्वारे महिलांचे सक्षमीकरण साधणे शक्य आहे. महिला सक्षमीकरणासाठी सन १९९४ मध्ये महिला धोरण करणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम राज्य असून, सन २००१ मध्ये सुधारित धोरण करण्यात आले, तर त्यानंतर तिसरे धोरण सन २०१४ मध्ये जाहीर करण्यात आले.

१०.४७ राज्यात महिला विकासाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी निवडक महिला विकास योजनांची प्रगती तक्ता १०.३९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३९ महिला विकासाच्या निवडक योजनांची प्रगती**

(₹ कोटी)

| योजना | २०१९-२० | | | २०२०-२१+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | लाभार्थ्यांची संख्या | प्रस्तावित निधी | खर्च | लाभार्थ्यांची संख्या |
| शासकीय महिला वसतिगृहे/ महिला आधार गृहे/ संरक्षण गृहे/ राज्य गृहे | १५.७८ | १३.११ | ७,१८८ | १७.०७ | १४.४७ | ४,२४२ |
| महिला समुपदेशन केंद्रे | १०.०० | २.२४ | २२,३९८ | ८.०० | १.०८ | १४,४१२ |
| शुभ मंगल सामूहिक विवाह योजना | ०.५८ | ०.३९ | ३२४ | ०.०१ | ०.०० | ७ |
| मनोधैर्य योजना | ३०.०० | ३.४४ | ४६२ | २.०० | ०.०० | ६५० |
| कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण | २७.४३ | २५.३९ | १२,७७० | ३२.६४ | ५.०२ | २,१८१ |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.४८ राज्यात महिलांसाठी विविध केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत.

१०.४८.१ **नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे :** नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या मुलांसाठी दिवसा संगोपन केंद्र सुविधेसह सुरक्षित आणि सोयीस्कर निवासस्थानाची उपलब्धता करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजने अंतर्गत, महानगरांसाठी ₹ ५०,००० व इतर ठिकाणांसाठी ₹ ३५,००० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेल्या नोकरी करणाऱ्या अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, विवाहित परंतु ज्यांचे पती किंवा जवळचे कुटुंबीय त्याच भागात राहत नसणाऱ्या आणि नोकरीसाठी प्रशिक्षण सुरु असलेल्या महिलांसाठी वसतिगृह इमारत बांधण्यासाठी किंवा भाड्याने घेतलेल्या जागेत वसतिगृह चालविण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. वसतिगृहातील महिलांना त्यांच्या निवासासाठी भाडे आकारले जाते. राज्यात अशी ८१ वसतिगृहे कार्यरत आहेत. या योजने अंतर्गत, सन २०१९-२० मध्ये ५,१६० महिलांनी आणि सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोंबरपर्यंत १,३८० महिलांनी या सुविधेचा लाभ घेतला.

१०.४८.२ **स्वाधार :** या योजने अंतर्गत निराधार, बेघर, विधवा, कुटुंबाने सोडून दिलेल्या, तुरुंगातून सुटका झालेल्या परंतु कुटुंबांचा आधार नसलेल्या महिला कैदी, कुंटणखान्यांतून सुटका केलेल्या महिला, इत्यादी कठीण परिस्थितीतील महिलांचे संरक्षण, निवारा, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण पुरवून पुनर्वसन करण्यात येते. राज्यात डिसेंबर, २०२० अखेर नऊ स्वाधारगृहे कार्यरत आहेत. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ९९९ महिला आणि सन २०२०-२१ नोव्हेंबरपर्यंत १६५ महिला लाभार्थी होत्या.

१०.४८.३ **उज्वला :** लैंगिक शोषणासाठी केली जाणारी महिलांची तस्करी रोखणे, पीडित महिलांना सुटकेसाठी मदत करणे, त्यांना समाजामध्ये पुन्हा सामावून घेणे आणि संरक्षण, सुरक्षित निवारा, वैद्यकीय मदत, कायदे विषयक मदत, शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. राज्यात डिसेंबर, २०२० अखेर पाच संस्था कार्यरत होत्या. या योजने अंतर्गत, सन २०१९-२० मध्ये ४३३ महिला आणि सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ८२ महिला लाभार्थी होत्या.

१०.४८.४ **'सखी' वन स्टॉप सेंटर :** खाजगी आणि सार्वजनिक ठिकाणी हिंसाचाराने पीडित महिलांना एकाच ठिकाणी आधार व मदत करणे, एकाच छताखाली वैदयकिय, कायदेशीर, मनोवैज्ञानिक आणि समुपदेशन सहाय्यासह कोणत्याही हिसांचाराविरूध्द लढा देण्यासाठी महिलांना आपात्कालीन व सर्वसाधारण स्थितीत देखील तात्काळ सहकार्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे. राज्यात ३७ केंद्रे आहेत. केंद्र शासनामार्फत ₹ ११.४३ कोटी निधी 'सखी' वन स्टॉप केंद्र उभारण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे.

१०.४८.५ **कोविड-१९ साथीच्या कालावधीतील उपक्रम :** अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६अंतर्गत सुटका करण्यात आलेल्या पीडित तसेच वेश्या व्यवसाय करून आपल्या कुटुंबांचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोविड-१९ चा प्रार्दूभाव संपेपर्यंतच्या कालावधीत प्रति महिना ₹ ५,००० तसेच अशा महिलांपैकी ज्या महिलांची मुले शाळेत जातात त्यांना अतिरिक्त ₹ २,५०० आर्थिक सहाय्य करण्यात आले. त्याकरिता ₹ ५४.४८ कोटी खर्च झाले.

## निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

१०.४९ महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक-तृतीयांश आरक्षण देण्याचे केंद्र शासनाचे निर्देश असले तरी राज्य शासनाने हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठीच्या राखीव जागांची माहिती तक्ता १०.४० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४० राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठीच्या राखीव जागांची माहिती**

| स्थानिक स्वराज्य संस्था (संख्या) | एकूण जागा (संख्या) | महिलांसाठी राखीव जागा+ (संख्या) |
|---|---|---|
| महानगरपालिका (२७) | २,७३६ | १,३७४ |
| नगरपरिषद (२४१) | ५,४४२ | २,७९८ |
| नगरपंचायत (१२८) | २,१७६ | १,१५२ |
| जिल्हा परिषद (३४) | २,००० | १,००९ |
| पंचायत समिती (३५१) | ४,००० | २,००० |
| ग्रामपंचायत (२७,८३२) | २,५७,१४० | १,२८,५७० |
| **एकूण** | **२,७३,४९४** | **१,३६,९०३** |

*आधार :* १. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन २. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर, २०१९ पर्यंत

१०.४९.१ सतराव्या लोकसभेत एकूण ५४२ खासदारांपैकी ७८ महिला खासदार आहेत, तर महाराष्ट्रातील ४८ खासदारांपैकी आठ महिला खासदार आहेत. दि.२ फेब्रुवारी, २०२१ अखेर राज्यसभेत २४० खासदार असून, त्यामध्ये २७ महिला खासदारांचा समावेश आहे. चौदाव्या महाराष्ट्र विधानसभेतील एकूण २८८ आमदारांपैकी २४ महिला आमदार आहेत आणि डिसेंबर, २०२० अखेर महाराष्ट्र विधान परिषदेच्या एकूण ६६ सदस्यामध्ये दोन महिला सदस्यांचा समावेश आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.५० केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विकास योजना राबविण्याकरिता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. माविम स्वंयसहाय्य बचत गट, वित्तिय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणूनही काम करते. माविमला विविध योजनांसाठी शासनाकडून सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबरपर्यंत ₹ ४.९८ कोटी निधी प्राप्त झाला असून ₹ ४.९८ कोटी खर्च झाला.

१०.५०.१ महिला उत्थान आणि कल्याणासाठी स्वंयसहाय्य बचत गट ही एक अपूर्व आणि नाविन्यपूर्ण संघटनात्मक रचना आहे. सर्व महिलांना प्रशिक्षण आणि विकासासाठी कोणत्याही स्वंयसहाय्य बचत गटात सामील होण्याची संधी दिली जाते, त्यामुळे महिलांना भावी उद्योजक वा कुशल कामगार होण्यासाठी मदत मिळते. पुरेशी संसाधने उपलब्ध नसलेल्या महिलांना उद्योजक होण्यासाठी शासनाने स्वंयसहाय्य बचत गटांना प्रोत्साहन दिले आहे. स्वंयसहाय्य बचत गट महिलांना त्यांचेसाठी योग्य असलेले विशिष्ट प्रकारचे कार्य करण्यासाठी प्रशिक्षण सुविधांची व्यवस्था करतात. उत्पादन, व्यापार आणि विपणन याकरिता बँका आर्थिक सहाय्य करतात. शासन स्वंयसहाय्य बचत गटाने उत्पादित केलेला मालास बाजारपेठ मिळवुन देणे, महिलांमधील नेतृत्व गुण व प्रशासकीय क्षमता वृध्दींगत करण्यासाठी प्रशिक्षण आयोजीत करते. सन २०२०-२१ मध्ये सप्टेंबरपर्यंत स्वंयसहाय्य बचत गटांची एकूण संचित बचत ₹ ८१०.८० कोटी होती तसेच स्वंयसहाय्य बचत गटांना विविध वित्तीय संस्थांकडून एकूण ₹३,४४५.२८ कोटी कर्ज प्राप्त झाले आणि त्यांनी एकूण ₹ ४,४५०.७७ कोटी अंतर्गत कर्ज वितरीत केले. महिला स्वंयसहाय्य बचत गटांची माहिती तक्ता १०.४१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४१ महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती**

(संख्या)

| विभाग | क्षेत्र | गावे/शहरे | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्वंयसहाय्य बचत गट | सदस्य | स्वंयसहाय्य बचत गट | सदस्य | स्वंयसहाय्य बचत गट | सदस्य |
| कोकण | ग्रामीण | ९६८ | १०,७५१ | १,३१,३९२ | १०,७५५ | १,३१,५४७ | १०,८४८ | १,३२,५२९ |
| | नागरी | ३६ | ५,१५१ | ५६,४६८ | ५,८२२ | ६३,३९८ | ६,९०० | ६४,३६० |
| | एकूण | १,००४ | १५,९०२ | १,८७,८६० | १६,५७७ | १,९४,९४५ | १७,७४८ | १,९६,८८९ |
| नाशिक | ग्रामीण | १,६०० | ९,२४१ | १,०९,४६५ | ९,३४६ | १,०९,७३० | ९,५३० | १,११,६१८ |
| | नागरी | ४३ | ५,५७० | ५७,४०४ | ६,५३९ | ६७,३०३ | ७,९१९ | ७५,०९८ |
| | एकूण | १,६४३ | १४,८११ | १,६६,८६९ | १५,८८५ | १,७७,०३३ | १७,४४९ | १,८६,७१६ |
| पुणे | ग्रामीण | १,०३९ | १४,३२५ | १,८५,८२३ | १४,९२९ | १,९२,७२९ | १५,६६७ | २,०१,४१५ |
| | नागरी | ४८ | ५,४५४ | ६६,०५१ | ६,२९० | ७६,७९६ | ७,६६६ | ९१,२४४ |
| | एकूण | १,०८७ | १९,७७९ | २,५१,८७४ | २१,२१९ | २,६९,५२५ | २३,३३३ | २,९२,६५९ |
| औरंगाबाद | ग्रामीण | २,५१० | १४,६२६ | १,७५,९२६ | १४,७९४ | १,७७,८३४ | १५,०८६ | १,८१,२४० |
| | नागरी | ५७ | ६,८४१ | ७६,१४२ | ८,०४१ | ८८,५३७ | ९,४७७ | ९६,९६४ |
| | एकूण | २,५६७ | २१,४६७ | २,५२,०६८ | २२,८३५ | २,६६,३७१ | २४,५६३ | २,७८,२०४ |
| अमरावती | ग्रामीण | १,९४२ | १६,९१५ | १,८७,०२० | १६,९९६ | १,८७,८६२ | १७,०८३ | १,८८,८९२ |
| | नागरी | ४२ | ४,२०२ | ४१,९७१ | ४,७४४ | ४७,३७१ | ५,९४४ | ६१,५८५ |
| | एकूण | १,९८४ | २१,११७ | २,२८,९९१ | २१,७४० | २,३५,२३३ | २३,०२७ | २,५०,४७७ |
| नागपूर | ग्रामीण | २,४३६ | १५,८८९ | १,९९,७५१ | १६,००४ | २,००,७८६ | १६,२३९ | २,०३,१३५ |
| | नागरी | ३३ | ३,८२२ | ४०,२८४ | ४,२४३ | ४४,६९४ | ५,०३८ | ४६,२२० |
| | एकूण | २,४६९ | १९,७११ | २,४०,०३५ | २०,२४७ | २,४५,४८० | २१,२७७ | २,४९,३५५ |
| प्रादेशिक स्वयंसेवी संस्था | ग्रामीण | - | १३,६२१ | १,६९,७८१ | १३,६२१ | १,६९,७८१ | १३,६२१ | १,६९,७८१ |
| | **ग्रामीण** | **१०,४९५** | **९५,३६८** | **११,५९,१५८** | **९६,४४५** | **११,७०,२६९** | **९८,०७४** | **११,८८,६१०** |
| | **नागरी** | **२५९** | **३१,०४०** | **३,३८,३२०** | **३५,६७९** | **३,८८,०९९** | **४२,९४४** | **४,३५,४७१** |
| | **एकूण** | **१०,७५४** | **१,२६,४०८** | **१४,९७,४७८** | **१,३२,१२४** | **१५,५८,३६८** | **१,४१,०१८** | **१६,२४,०८१** |

*आधार* : माविम, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

१०.५०.२ **लोकसंचलित संसाधन केंद्र** : लोकसंचलित संसाधन केंद्र हा सोसायटी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असलेला गट आहे. यात २५ किमीच्या परिघात येणाऱ्या सुमारे २० गावांतील १५० ते २०० स्वंयसहाय्य बचत गटांचा समूह तयार केला जातो. लोकसंचलित संसाधन केंद्रांमार्फत स्वंयसहाय्य बचत गटांना उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, बँक जोडणी, उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे यासारख्या सेवा महिला सक्षमीकरणासाठी पुरविल्या जातात. राज्यात नोव्हेंबर, २०२० अखेर ३६१ लोकसंचलित संसाधन केंद्रे कार्यरत आहेत.

१०.५०.३ **तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस योजना** : तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस ही अति गरीब व कर्जाने पिडित महिलांना कर्जमुक्त करण्यासाठी स्वंयसहाय्य बचत गटांमार्फत सन २०१८-१९ पासून राबविली जाणारी योजना आहे. एक लाख महिलांना ₹ १०,००० रक्कमेपर्यंत वैयक्तिक कर्ज, दहा हजार कर्जपिडीत महिलांना कर्ज परतफेड करण्यासाठी ₹ २०,००० पर्यंतचे वित्तीय सहाय्य, ३०० महिला सामाजिक उपक्रमासाठी ₹ दोन लाखापर्यंत खेळते भांडवल उपलब्ध करून देणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेचा

कालावधी पाच वर्षांचा आहे. या योजने अंतर्गत एकूण ₹ १३.१९ कोटी रक्कमेची कर्ज वितरित करण्यात आली आहेत. सुमारे ३,००० महिलांनी नवीन व्यवसाय सुरू केले आहेत अथवा त्यांच्या व्यवसायात वाढ केली आहे.

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

१०.५१ महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही एक वैधानिक संस्था असून ती पीडित महिलांनी दाखल केलेल्या तक्रारींवर नियमितपणे सुनावण्या/ सार्वजनिक सुनावण्या घेते, मोफत कायदे विषयक सेवा व समुपदेशन पुरविते. पीडित महिलांना त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व नि:संकोचपणे संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे या प्राथमिक उद्दिष्टासह विभागवार व जिल्हावार सार्वजनिक सुनावण्यांचे आयोजन करुन 'महिला आयोग आपल्या दारी' नावाचा एक अभिनव उपक्रम व्यापकपणे राबविण्यात आला. स्व-संरक्षण कार्यक्रम, स्त्री-पुरूष समानतेविषयी जागरुकता, कायदेविषयक साक्षरता, सायबर गुन्हे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ यांची अंमलबजावणी, ॲसिड हल्ल्याने पीडित महिलांचे पुनर्वसन, पाळणा घरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, इत्यादी महिलांशी निगडीत विविध मुद्यांवर कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम व चर्चासत्रे या आयोगामार्फत आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांवर सन २०१९-२० मध्ये ₹ ५.९४ कोटी खर्च झाला तर सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ २.५९ कोटी खर्च झाला.

## महिलांवरील अत्याचार

१०.५२ महिलांवर शारीरिक किंवा मानसिकरित्या केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रूर कृत्यांना 'महिलांवरील अत्याचार' असे संबोधले जाते. अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोदवलेले गुन्हे तक्ता १०.४२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४२ अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदवलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१८ | २०१९ | २०२०+ |
|---|---|---|---|
| बलात्कार | ४,९७४ | ५,४१६ | ३,९७० |
| अपहरण व पळवून नेणे | ६,८२५ | ६,९०६ | ५,३२७ |
| हुंडाबळी | २०० | १९६ | १९२ |
| पती व नातेवाईकांकडून झालेली क्रूर कृत्ये | ६,८६२ | ८,४३० | ४,८८६ |
| विनयभंग | १४,०७० | १३,६३२ | १०,५६१ |
| लैंगिक अत्याचार | १,१२७ | १,०७४ | ८२९ |
| अनैतिक व्यापार | २०० | १५२ | १०८ |
| इतर | १,२४३ | १,३०६ | ७१३ |
| **एकूण** | **३५,५०१** | **३७,११२** | **२६,५८६** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन + ऑक्टोंबरपर्यंत

# बाल विकास

१०.५३ बालकांचे हक्क व अधिकार, बालकांची निगा व संरक्षण तसेच बालविकासाकरीता राज्याचे बाल धोरण सन २०१४ मध्ये जाहीर करण्यात आले. सामाजिक स्थितीमुळे बालकांवरील असमानता, भेदभाव व अन्याय दूर करण्यासाठी योग्य, ठोस व सुधारणात्मक उपाययोजना करणे, तसेच प्रत्येक बालकास कुटुंबात किंवा कुटुंबासारख्या वातावरणात प्रेम व निगा, संरक्षण, सहकार्य व बालसंगोपनाचा अधिकार देणे ही बालधोरणाची महत्वाची उद्दिष्टे आहेत. बाल विकासाच्या विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

१०.५३.१ **एकात्मिक बाल संरक्षण योजना** : आधारगृहे , विशेष दत्तक स्रोत संस्था, बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळ, जिल्हा बाल संरक्षण संस्था, राज्य बाल संरक्षण संस्था, शासकीय / स्वयंसेवी संस्थांची बालगृहे, निरीक्षण गृहे, अनुरक्षण गृहे, इत्यादी कार्यक्रम एकात्मिक बाल संरक्षण या एकाच योजने अंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत. एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत लाभार्थी संख्या व झालेला घटकनिहाय खर्च तक्ता १०.४३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.४३ एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च**

(₹ लाख)

| घटक | संस्थांची संख्या | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|
| | | खर्च | लाभार्थी संख्या | खर्च | लाभार्थी संख्या |
| आधार गृह | ३ | १८.९४ | १२१ | ०.०० | १०७ |
| दत्तक संस्था | १७ | ८२.२६ | १९० | १३.२१ | १४९ |
| शासकीय बालगृहे | १९ | १,३१६.०४ | ८७३ | ७६३.६४ | ३२२ |
| शासकीय निरीक्षण गृहे | १५ | ५६६.७० | १९८ | ३२८.८४ | ७८ |
| शासकीय अनुरक्षण गृहे | ६ | ७८९.८७ | १८३ | १५०.७८ | १२० |
| स्वयंसेवी संस्थांची निरीक्षण गृहे | ४० | ७२२.७६ | १,३९८ | ८६६.३५ | ७८६ |
| स्वयंसेवी बाल गृहे | ४११ | ३,४७६.१२ | १७,४४० | २,४७४.१३ | १०,४२८ |
| **एकूण** | **५११** | **६,९७२.६९** | **२०,४०३** | **४,५९६.९५** | **११,९९०** |

*आधार* : महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.५३.२ **निरीक्षण गृहे** : विधी संघर्षग्रस्त आणि न्यायिक चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतलेली मुले बाल न्याय मंडळांच्या आदेशानुसार निरीक्षण गृहात दाखल केली जातात. निरीक्षण गृहात दाखल झालेल्या मुलांना निवासी, वैद्यकीय, शैक्षणिक, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. डिसेंबर, २०२० अखेर १२ जिल्ह्यांत १५ शासकीय निरीक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता ५५० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांची ४० निरीक्षण गृहे (१६ मुलींसाठी व २४ मुलांसाठी) असून त्यांची प्रवेश क्षमता २,०४९ आहे. शासनाकडून प्रति निवासी दरमहा ₹ २,००० सहायक अनुदान दिले जाते.

१०.५३.३ **बालगृहे :** संगोपन आणि संरक्षणाची गरज असलेल्या १८ वर्षे वयापर्यंतच्या अनाथ, सोडलेल्या, हरवलेल्या, विशेष काळजीची गरज असलेल्या एच.आय.व्ही. / एड्सबाधित, संकटग्रस्त आणि अत्याचारित मुला/ मुलींना बालगृहांत प्रवेश दिला जातो. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत, समुपदेशन, शिक्षण, प्रशिक्षण आणि मनोरंजन यांसारख्या सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन केले जाते. राज्यात १९ शासकीय बालगृहे असून त्यांची प्रवेश क्षमता ९७५ आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांची २१,५२५ प्रवेश क्षमता असलेली ४११ अनुदानित बालगृहे आणि ३,८४० प्रवेश क्षमता असलेली ६३ विनाअनुदानित बालगृहे आहेत. शासनाकडून प्रति निवासी प्रमाणे दरमहा ₹ २,००० याप्रमाणे या बालगृहांना सहायक अनुदान देण्यात येते. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये १७,४४० निवासी बालकांवर ₹ ३४.७६ कोटी आणि सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १०,४२८ निवासी बालकांवर ₹ २४.७४ कोटी खर्च झाला.

१०.५३.४ **अनुरक्षण गृहे :** वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालगृहातील मुलांना बालगृह सोडावे लागते. तथापि, प्रशिक्षण किंवा शिक्षण अपूर्ण राहिल्याने त्यांच्यापैकी काही मुलांचे पूर्णत: पुनर्वसन झालेले नसल्यामुळे त्यांना अन्न, वस्त्र व निवाऱ्याची आवश्यकता असते. अशा मुलांचे अनुरक्षणगृहांत पुनर्वसन केले जाते. शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा रोजगार मिळेपर्यंत प्रवेशितांना अनुरक्षण गृहांत निवारा, अन्न, वस्त्र, शिक्षण, वैद्यकिय उपचार, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. राज्यात सहा शासकीय व तीन स्वयंसेवी संस्थांची अनुरक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता अनुक्रमे ६०० व ११० आहे. राज्य शासनाकडून प्रति निवासी दरमहा ₹ २,००० सहायक अनुदान या अनुरक्षण गृहांना देण्यात येते.

१०.५३.५ **बाल संगोपन योजना :** अनाथ, निराधार, गरजू व बेघर मुलांना कौटुंबिक जीवन प्रदान करण्यासाठी स्वंयसेवी संस्थांमार्फत ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. नोव्हेंबर, २०२० अखेर १११ स्वयंसेवी संस्था राज्यात कार्यरत आहेत. या योजनेतंर्गत सन २०१९-२० मध्ये १२,९६१ मुलांचे संगोपन करण्याकरिता ₹ २.८८ कोटी खर्च झाला व सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १२,९६१ मुलांचे संगोपन करण्याकरिता ₹ ५.७६ कोटी खर्च झाला.

१०.५३.६ **चाचा नेहरू बाल महोत्सव योजना :** राज्यातील पुनर्वसनासाठी शासकीय / स्वयंसेवी संस्थांमध्ये दाखल झालेल्या सर्व मुलांच्या सुप्त गुणांना प्राधान्याने वाव देऊन त्यांच्यात बंधुत्व व संघभावना निर्माण व्हावी यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यांत व प्रादेशिक विभागांत दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येतो. क्रीडा, खेळ, वक्तृत्व, इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या जातात आणि विजेत्यांना बक्षीसे दिली जातात. दरवर्षी प्रत्येक जिल्हयासाठी ₹ पाच लाख तर प्रत्येक विभागासाठी ₹ ५.८२ लाख निधी मंजूर करण्यात येतो. या योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ १.२७ कोटी खर्च झाला.

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.५४ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी एकात्मिक पद्धतीने सेवा पुरविणे हे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. हा कार्यक्रम ९७,४७५ अंगणवाड्या, १३,०११ मिनी अंगणवाड्या आणि ५५३ बाल विकास प्रकल्पांमार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.५४.१ 'पूरक पोषण कार्यक्रम' हा एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत बालके, गर्भवती महिला आणि स्तन्यदा माता यांच्या किमान पौष्टिक गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी राबविला जातो. समाजातील वंचित घटकातील सहा वर्षांपेक्षा कमी वयाची बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांना पौष्टिक आहार देणे व त्यांचे आरोग्य सुधारणे हे पूरक पोषण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील अर्भक मृत्यू कमी करण्यासाठी कुपोषण नियंत्रित करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. सन २०१९-२० मध्ये ६६.९३ लाख लाभार्थ्यांवर ₹ १,५११.११ कोटी खर्च झाला आणि सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ७२.८६ लाख लाभार्थ्यांवर ₹ ९४७.४६ कोटी खर्च झाला. कोविड-१९ लॉकडाऊनच्या काळात ३ ते ६ वर्षे वयोगटातील सर्व लाभधारकांना शिजवलेले अन्नाऐवजी अन्नधान्ये व किराणा मालाचा पुरवठा करण्यात आला. याशिवाय ३ ते ६ वर्षे वयोगटातील स्थलांतरीत बालकांना सुध्दा या योजनेतंर्गत लाभ देण्यात आला. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी तक्ता १०.४४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४४ वयोवर्षे ० ते ५ गटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | वजन केलेली बालके (संख्या) | बालकांची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सर्वसाधारण वजनाची बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
| २०१८-१९ | ग्रामीण | ३८,६४,१८० | ९२.८ | ६.२ | १.० |
| | आदिवासी | ८,४७,९६२ | ८१.५ | १५.३ | ३.२ |
| | नागरी | १०,६०,८१५ | ८५.५ | १३.७ | ०.८ |
| | **एकूण** | **५७,७२,९५७** | **८९.८** | **८.९** | **१.३** |
| २०१९-२० | ग्रामीण | ३८,९६,२५० | ९१.६ | ७.१ | १.३ |
| | आदिवासी | ८,५०,९६३ | ७९.० | १६.८ | ४.२ |
| | नागरी | १०,२४,४४२ | ८३.१ | १४.६ | २.३ |
| | **एकूण** | **५७,७१,६५५** | **८८.२** | **९.९** | **१.९** |
| २०२०-२१+ | ग्रामीण | ३७,९२,१९५ | ९१.६ | ७.१ | १.३ |
| | आदिवासी | ८,८१,३६७ | ७७.५ | १७.६ | ४.९ |
| | नागरी | ६,५१,३१४ | ८४.७ | १३.० | २.३ |
| | **एकूण** | **५३,२४,८७६** | **८८.४** | **९.६** | **२.०** |

*आधार* : एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन +जुलैपर्यंत

१०.५४.२ **पोषण अभियान :** एकात्मिक बालविकास सेवा योजने अंतर्गत राष्ट्रीय पोषण अभियानाची सर्व जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. कुपोषणाचे प्रमाण सहा टक्क्यांनी (प्रति वर्षी सुमारे दोन टक्के याप्रमाणे) कमी करणे, लहान बालके, किशोर वयीन मुली व महिलांमधील रक्तक्षयाचे (ॲनिमिया) चे प्रमाण नऊ टक्क्यांनी प्रति वर्षी सुमारे तीन टक्के याप्रमाणे) कमी करणे व कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण सहा टक्क्यांनी (प्रति वर्षी सुमारे दोन टक्के याप्रमाणे) कमी करणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. सन २०१९-२० मध्ये ₹ २५६ कोटी खर्च झाला असून, सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर अखेर ₹ २०.४० कोटी खर्च झाला.

१०.५४.३ **बेबी केअर किट :** प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा शासकीय रूग्णालयात नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या मातांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी नवजात बालकांसाठी ₹ २,००० रक्कमेपर्यंतच्या बेबी केअर किट बॅग उपलब्ध करून देण्यात येतात. सन २०१९-२० मध्ये २.६४ लाख बेबी केअर किट बॅगसाठी ₹ ४४.७५ कोटी व सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १.३६ लाख बेबी केअर किट बॅगसाठी ₹ ३५.२५ कोटी खर्च झाला.

१०.५५ बाल विकास विषयक विविध राज्य व केंद्र स्तरीय योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

१०.५५.१ **किशोरवयीन मुलींसाठी योजना :** वय वर्षे ११ ते १४ या गटातील शाळा सोडलेल्या किशोरवयीन मुलींना पुन्हा शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने फेब्रुवारी, २०१९ पासून राज्यातील ५५३ एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पात किशोरवयीन मुलींसाठी योजना राबविण्यात येत आहे. किशोरवयीन मुलींना आत्मनिर्भर व जागरूक नागरीक बनण्यासाठी सहाय्य करणे, शिक्षण देणे व सक्षम करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सर्व किशोरवयीन मुलींना अंगणवाड्यांमध्ये सुक्ष्म पोषक घटकयुक्त अन्न, घरपोच धान्य, लोह व फॉलिक ॲसीड पूरकता, जंतनाशक गोळ्या, नियमित आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा दिल्या जातात. या योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये ५५,१२५ लाभार्थ्यांवर ₹ १०.८४ कोटी खर्च झाला, सन २०२०-२१ मध्ये डिसेंबरपर्यंत ५०,००० लाभार्थ्यांवर ₹ ०.१५ कोटी खर्च झाला.

१०.५५.२ **बेटी बचाओ बेटी पढाओ योजना :** मुलींच्या जीविताची, सुरक्षिततेची व शिक्षणाची हमी किंवा खात्री देणे आणि लिंग भेदावर आधारीत लिंग निवड प्रथेचे निर्मूलन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजने अंतर्गत, जन-जागरण मोहिमेद्वारे मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविणे, गर्भवती महिलांची नोंदणी, मुलींचा जन्म साजरा करणे, आरोग्य शिबिरे आयोजित करणे, मुलींच्या शिक्षणाविषयी मार्गदर्शन करणे, गुड्डा- गुड्डी फलक लावणे, मुले व मुली यांच्या जन्माची संख्या असलेले फलक सार्वजनिक ठिकाणी लावणे व जिल्हास्तरीय विविध स्पर्धा राबविणे असे अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

१०.५५.३ **माझी कन्या भाग्यश्री योजना :** मुलींच्या जन्मदरात वाढ करणे, गर्भलिंग चाचणी रोखणे, मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन व हमी देणे आणि मुलींच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे ही या योजनेची उद्दिष्टे असून सदर योजना समाजाच्या सर्व घटकांतील मुलगी असलेल्या व कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ₹ ७.५० लाखपर्यंत असलेल्या कुटुंबाना लागू करण्यात आली. या योजनेतंर्गत एका मुलीच्या जन्मानंतर मातेने / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर मुलीच्या नावे ₹ ५०,००० रक्कम बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात येते. दोन मुलींच्या जन्मानंतर मातेने / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर प्रत्येक मुलीच्या नावे ₹ २५,००० रक्कम बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात येते. मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी केवळ सदर रकमेवरील व्याज काढता येते आणि मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पूर्ण रक्कम (मुद्दल व व्याज) देय होते. या योजनेअंतर्गत, सन २०१९-२० मध्ये ४,१०० लाभार्थ्यांवर ₹ ८.४३ कोटी आणि सन २०२०-२१ मध्ये डिसेंबरपर्यंत ३,५३८ लाभार्थ्यांवर ₹ २.२८ कोटी खर्च झाला.

१०.५५.४ **ग्राम बाल विकास केंद्र :** एकात्मिक बाल विकास सेवा कार्यक्रमा अंतर्गत कुपोषणास आळा घालण्यासाठी गाव / अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अतितीव्र कुपोषित बालकांना महिनाभर अंगणवाडीत ठेवले जाते. अतितीव्र कुपोषित बालकांतील कुपोषण निर्मूलनासाठी खास तयार केलेल्या उर्जायुक्त पौष्टीक आहारासह वैद्यकीय सल्ला दिला जातो. अंगणवाडीत तीन नियमित आहारा सोबत मुलांना दिवसातून तीन वेळा अतिरिक्त आहार दिला जातो तसेच सर्व वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात. या योजने अंतर्गत, सन २०१९-२० मध्ये ८,२०१ अतितीव्र कुपोषित बालकांवर ₹ ८.६४ कोटी खर्च झाला. कोविड-१९ लॉकडाऊनच्या कालावधीत ग्राम बाल विकास केंद्राचे रूपांतर होम बेस्ड ग्राम बाल विकास केंद्रात करण्यात आले व ८,०३७ बालकांना उर्जायुक्त पौष्टीक आहार देण्यात आला.

१०.५५.५ **पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने मुलाच्या शैक्षणिक विकासाच्या अवस्थांवर आधारित तीन ते पाच वर्षे वयोगटासाठी 'बालशिक्षणक्रम' अभ्यासक्रम विकसित केला असून या अभ्यासक्रमास 'आकार' असे नाव देण्यात आले. अंगणवाडीत येणाऱ्या मुलांना 'आकार' बाल शिक्षणक्रमाच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. कोविड-१९ लॉकडाऊन कालावधीत ९,०९,४३२ पालकांच्या २,४०,७५० व्हॉटसअॅप गटांच्या माध्यमातून 'आकार' बालशिक्षण कार्यक्रमांद्वारे ऑनलाईन पद्धतीने सर्व अंगणवाड्यांमधील २८ लाख विद्यार्थ्यांचे शालेयपूर्व उपक्रम पूर्ण करण्यात आले.

## बालकांवरील अत्याचार

१०.५६ बालकांवरील अत्याचाराचे जे गुन्हे घडतात किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात असे गुन्हे 'बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे' म्हणून संबोधले जातात. अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदवलेले गुन्हे तक्ता १०.४५ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४५ ज्या गुन्ह्यात बालके पिडीत असतात असे नोंदवलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१८ | २०१९ | २०२०+ |
|---|---|---|---|
| खून | १६९ | १४१ | १०७ |
| या पैकी, | | | |
| गर्भातील जीव | २२ | ९ | ३ |
| इतर | ११ | ११ | ९ |
| बालकांवरील बलात्कार | २,६८८ | ३,२५४ | २,३३४ |
| अपहरण व पळवून नेणे | ९,१७४ | १०,९०३ | ६,१२५ |
| परित्याग | ११० | १११ | ८१ |
| इतर | ३,३७० | ३,०८८ | २,४९५ |
| **एकूण** | **१५,५४४** | **१७,५१७** | **११,१५४** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

# रोजगार व दारिद्र्य

१०.५७ दारिद्र्य निर्मूलन हे सर्वात मोठे आव्हान आहे आणि बेरोजगारी हे दारिद्र्यच्या मुख्य कारणांपैकी एक आहे. 'सर्वांसाठी शाश्वत सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वृद्धी तसेच पूर्ण वेळ व उत्पादक रोजगार आणि प्रतिष्ठापूर्वक काम या गोष्टींना चालना देणे' हे शाश्वत विकास ध्येयामधिल एक लक्ष आहे.

## रोजगार

१०.५८ रोजगाराबाबतची स्थिती दर्शविणाऱ्या आकडेवारीचे जनगणना, आर्थिक गणना, नियतकालीक श्रमबल पाहणी आणि राष्ट्रीय नमुना पाहणी हे मुख्य स्त्रोत आहेत. कारखान्यांमधील (कारखाने अधिनियम, १९४८ खालील नोंदणीकृत) रोजगार विषयक माहिती वैधानिक विवरणपत्रांन्वये उपलब्ध होते. याव्यतिरिक्त सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमधील रोजगार विषयक माहिती रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम अंतर्गत गोळा केली जाते.

### जनगणनेनुसार रोजगाराची स्थिती

१०.५९ जनगणना २०११ नुसार, राज्यात ४.९४ कोटी कामगार होते, त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण ३४ टक्के होते. जनगणना २०११ नुसार, कृषी व संलग्न कार्ये क्षेत्रांमध्ये कार्यरत मुख्य कामगारांची टक्केवारी ५२.१ होती. जनगणना २०११ नुसार मुख्य कामगारांमध्ये स्त्री कामगारांची टक्केवारी ३१.५ तर सिमांतिक कामगारांमध्ये स्त्रियांची टक्केवारी ५३.६ होती. उद्योग प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता १०.४६ मध्ये व व्यवसाय प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता १०.४७ मध्ये दिली आहे. जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.४६ उद्योग प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | जनगणना २०११ | | जनगणना २००१ | |
|---|---|---|---|---|
| | मुख्य | सीमांतिक | मुख्य | सीमांतिक |
| कृषी व संलग्न कार्ये | ५२.१ | ६२.८ | ५३.५ | ७७.२ |
| खाणकाम व दगडकाम | ०.३ | ०.२ | ०.४ | ०.२ |
| वस्तूनिर्माण | ११.८ | ७.६ | १३.१ | ८.६ |
| वीज, वायू आणि पाणी पुरवठा | ०.४ | ०.१ | ०.५ | ०.१ |
| बांधकाम | ४.६ | ५.३ | ४.१ | ३.७ |
| व्यापार, दुरूस्ती, वाहतूक आणि साठवण, दळणवळण | १३.७ | ६.१ | १४.८ | ५.२ |
| वित्तीय सेवा आणि स्थावर मालमत्ता | १.९ | ०.६ | ३.८ | १.५ |
| लोक प्रशासन आणि संरक्षण | ५.३ | १.८ | ९.८* | ३.५* |
| इतर | ९.९ | १५.५ | | |
| **एकूण कामगार (कोटी मध्ये)** | **४.३८** | **०.५७** | **३.४६** | **०.६४** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

* विभक्त माहिती उपलब्ध नाही

**तक्ता १०.४७ व्यवसाय प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| व्यवसाय प्रकार | जनगणना २०११ | | | जनगणना २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| लोक प्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि व्यवस्थापक | ९.० | ४.२ | ८.० | ४.३ | १.७ | ३.८ |
| व्यावसायिक | ६.० | ७.३ | ६.३ | ५.१ | ६.३ | ५.३ |
| तंत्रज्ञ आणि सहयोगी व्यावसायिक | ६.६ | १३.४ | ८.१ | ६.० | १२.१ | ७.१ |
| लिपिक | ६.४ | ६.८ | ६.५ | ५.९ | ६.५ | ६.० |
| सेवा कामगार आणि दुकाने व बाजारपेठेतील विक्रेते | १३.४ | ८.३ | १२.३ | २०.२ | १२.२ | १८.८ |
| कुशल शेतकी आणि मत्स्य कामगार | १.५ | १.६ | १.५ | २.७ | ५.९ | ३.३ |
| कला क्षेत्र आणि संबंधित व्यवसायामधील कामगार | १७.५ | १०.७ | १६.० | २२.३ | १८.९ | २१.७ |
| कारखाने, यंत्रचालक आणि यंत्रांची जुळवणी करणारे | १२.१ | २.७ | १०.० | १३.७ | ३.० | ११.८ |
| प्राथमिक व्यवसाय करणारे | १७.८ | १८.८ | १८.१ | १६.३ | २४.० | १७.७ |
| व्यावसायिक प्रकारानुसार वर्गीकृत नसलेले कामगार | ९.६ | २६.१ | १३.२ | ३.४ | ९.४ | ४.५ |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## आर्थिक गणनेनुसार रोजगाराची स्थिती

१०.६०	सहाव्या आर्थिक गणनेत (२०१३) पीक उत्पादन व लागवड, लोक प्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा, घरगुती कामगाराचे मालक म्हणून कुटुंबाचे कार्य, विदेशी संघटना व संस्थाचे कार्य तसेच अनधिकृत कार्ये वगळता सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आला होता. पाचव्या आणि सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार तक्ता १०.४८ मध्ये दिली आहे. सातव्या आर्थिक गणनेचे क्षेत्रिय काम प्रगतीपथावर आहे.

**तक्ता १०.४८ पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार**

(लाख)

| तपशील | पाचवी आर्थिक@ गणना-२००५ | सहावी आर्थिक गणना-२०१३ |
|---|---|---|
| एकूण आस्थापना | ४१.५३ | ६१.३७ |
| शेतकी आस्थापना | ६.०४ | १५.९२ |
| बिगर शेतकी आस्थापना | ३५.४९ | ४५.४६ |
| एकूण आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | १०५.२७ | १४५.१२ |
| शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | १०.५१ | २६.३९ |
| बिगर शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | ९४.७६ | ११८.७३ |

@ पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेच्या अर्थपूर्ण तुलनेसाठी पाचव्या आर्थिक गणनेतील लोक प्रशासन, संरक्षण व अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा ही कार्ये विचारात घेण्यात आलेली नाही

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## नियतकालिक श्रमबल पाहणी नुसार रोजगाराची स्थिती

१०.६१	नियोजन आणि धोरणात्मक निर्णयासाठी श्रमबलाची माहिती नेहमीच महत्वपूर्ण असते. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने एप्रिल, २०१७ पासून नियतकालिक श्रमबल पाहणी सुरू केली. रोजगार व बेरोजगारीच्या मापनासाठी दोन मुख्य उद्दीष्टांसह नियतकालिक श्रमबल पाहणीची रचना करण्यात आली आहे. त्यापैकी पहिले उद्दिष्ट नागरी भागात तीन महिन्यांच्या अल्प कालावधीसाठी वर्तमान साप्ताहिक स्थितीत श्रमबल आणि रोजगाराची गतिशीलता मोजणे आहे. ग्रामीण तसेच नागरी भागासाठी श्रमबल अंदाजाचे मोजमाप करणे हे दुसरे उद्दिष्ट्य आहे. प्रत्येक तिमाहीत नियतकालिक श्रमबल पाहणीद्वारे कामगार लोकसंख्या प्रमाण, श्रमबल सहभाग दर, बेरोजगारी दर सारखे महत्वाचे श्रमबल निर्देशक प्राप्त होतात.

१०.६१.१	वर्ष २०१९-२० साठी वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार नागरी भागाकरिता वयोगटनिहाय राज्यातील कामगार लोकसंख्या प्रमाण तक्ता १०.४९ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४९ वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार वर्ष २०१९-२० साठी राज्यातील नागरी भागाकरिता कामगार लोकसंख्या प्रमाण**

(टक्के)

| कालावधी | पुरूष | | स्त्री | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील |
| एप्रिल-जून, २०१९ | ४९.७ | ६८.२ | १५.० | १९.० | ३२.९ | ४४.१ |
| जुलै-सप्टेंबर, २०१९ | ५०.६ | ६९.३ | १८.० | २१.८ | ३४.९ | ४५.९ |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०१९ | ५०.३ | ६९.९ | १७.७ | २२.१ | ३४.७ | ४६.४ |
| जानेवारी-मार्च, २०२० | ४७.५ | ६८.७ | १७.२ | २२.७ | ३३.७ | ४६.० |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

१०.६१.२	वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार १५ वर्ष व त्यावरील वयोगटातील नागरी भागातील काम करणाऱ्या व्यक्तिंचे क्षेत्र निहाय वर्गीकरणाची टक्केवारी तक्ता १०.५० मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता १०.५० वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार १५ वर्ष व त्यावरील वयोगटातील नागरी भागातील काम करणाऱ्या व्यक्तिंची टक्केवारी**

(टक्केवारी)

| क्षेत्र | २०१८-१९ | | २०१९-२० | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महाराष्ट्र | | | | अखिल भारत | | | |
| | महाराष्ट्र | अखिल भारत | एप्रिल-जून, २०१९ | जुलै-सप्टें, २०१९ | ऑक्टो-डिसें, २०१९ | जाने-मार्च, २०२० | एप्रिल-जून, २०१९ | जुलै-सप्टें, २०१९ | ऑक्टो-डिसें, २०१९ | जाने-मार्च, २०२० |
| कृषी व संलग्न कार्य | ३.४ | ५.१ | ३.१ | २.९ | २.७ | ३.० | ४.९ | ५.२ | ५.१ | ५.१ |
| उद्योग | ३०.२ | ३३.५ | ३०.१ | ३०.१ | ३०.९ | २९.८ | ३३.२ | ३२.८ | ३३.२ | ३२.५ |
| सेवा | ६६.४ | ६१.४ | ६६.७ | ६७.१ | ६६.४ | ६७.२ | ६२.० | ६२.० | ६१.७ | ६२.४ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

१०.६१.३ नागरी भागासाठी वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार सन २०१९-२० साठी वयोगटानुसार त्रैमासिक बेरोजगारीचा दर तक्ता १०.५१ मध्ये देण्यात दिला आहे.

**तक्ता १०.५१ वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार वर्ष २०१९-२० करिता राज्यातील नागरी भागासाठी त्रैमासिक बेरोजगारी दर**

(टक्केवारी)

| कालावधी | पुरूष | | स्त्री | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील | १५ ते २९ वर्ष | १५ वर्ष व वरील |
| एप्रिल-जून, २०१९ | १५.१ | ६.५ | २३.३ | ११.४ | १७.१ | ७.६ |
| जुलै-सप्टेंबर, २०१९ | १३.५ | ५.७ | १५.३ | ६.४ | १३.९ | ५.८ |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०१९ | १२.४ | ५.२ | १४.५ | ६.६ | १२.९ | ५.५ |
| जानेवारी-मार्च, २०२० | १२.५ | ५.६ | १७.७ | ८.० | १३.८ | ६.२ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

१०.६१.४ निवडक राज्यांकरिता वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ साठी वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार बेरोजगारी दर तक्ता १०.५२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५२ वर्तमान साप्ताहिक स्थितीनुसार निवडक राज्यातील बेरोजगारी दर**

(टक्के)

| राज्य | २०१७-१८ | | २०१८-१९ | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| आंध्र प्रदेश | ८.३ | ८.७ | ९.४ | ९.४ |
| गुजरात | ५.६ | ४.६ | ३.६ | ३.६ |
| कर्नाटक | ५.५ | ७.३ | ५.२ | ६.० |
| मध्य प्रदेश | ७.६ | १०.६ | ८.२ | १०.५ |
| **महाराष्ट्र** | **६.८** | **९.१** | **९.२** | **९.२** |
| राजस्थान | ९.४ | ९.३ | ८.३ | ११.६ |
| तामीळनाडू | १२.६ | ९.४ | १०.५ | ९.२ |
| तेलंगाना | ७.२ | १०.९ | ९.३ | १२.२ |
| उत्तर प्रदेश | ९.४ | १२.१ | ७.९ | १२.७ |
| **अखिल भारत** | **८.५** | **९.६** | **८.४** | **९.५** |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

## कारखान्यातील रोजगार

१०.६२ सन २०२० मध्ये कारखाना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत एकूण ३०,९२८ कार्यरत कारखान्यातील सरासरी दैनिक रोजगार सुमारे २८.०७ लाख होता. एकूण कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण ३३ टक्के होते. उद्योगनिहाय राज्यातील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी तक्ता १०.५३ मध्ये दिली आहे. राज्यातील विविध उद्योगातील सरासरी दैनिक रोजगार माहिती परिशिष्ट १०.९ मध्ये दिली आहे. कार्यरत कारखाने व त्यातील रोजगारा बाबतची माहिती परिशिष्ट १०.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५३ सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | वर्ष | | |
|---|---|---|---|
| | २०१८ | २०१९ | २०२० |
| ग्राहक वस्तू | २५.० | २४.५ | २४.२ |
| पुनर्निर्माण वस्तू | २०.३ | १८.८ | १८.९ |
| भांडवली वस्तू | ११.२ | ११.२ | १०.७ |
| इतर | ४३.४ | ४५.५ | ४६.२ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

१०.६३ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संरचनेबाबतची माहिती उपलब्ध करणे तसेच रोजगाराच्या स्तरातील बदलांबाबतचे संनियंत्रण करणे आहे. या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार यांची त्रैमासिक आकडेवारी गोळा करण्यात येते. बृहन्मुंबई क्षेत्रासाठी २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश असून राज्याच्या इतर भागात १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश आहे. सप्टेंबर, २०२० पर्यंत राज्यातील एकूण रोजगार ७३.८७ लाख होता, त्यापैकी स्त्रियांचे प्रमाण २७.६ टक्के होते. एकूण रोजगारापैकी ३१ टक्के रोजगार सार्वजनिक क्षेत्रातील होता. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम अंतर्गत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगाराची आकडेवारी तक्ता १०.५४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५४ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम अंतर्गत रोजगार**

('०००)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्र | | | खाजगी क्षेत्र | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| २०१८ | १,६६७ | ६१६ | २,२८३ | ३,६४४ | १,४२३ | ५,०६७ | ५,३११ | २,०३९ | ७,३५० |
| २०१९ | १,६४७ | ५९१ | २,२३८ | ३,६३५ | १,४२३ | ५,०५८ | ५,२८२ | २,०१४ | ७,२९६ |
| २०२०+ | १,६६० | ६२३ | २,२८३ | ३,६८९ | १,४१४ | ५,१०३ | ५,३४९ | २,०३७ | ७,३८६ |

*आधार* : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + सप्टेंबर पर्यंत

## 'कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना 'नुसार रोजगार

१०.६४ सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, केंद्र शासन मार्फत रोजगार संबंधित सांख्यिकी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या माहिती वर आधारित प्रकाशित केली जाते. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी २० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू होतो. वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० साठी राज्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी साठी पुर्णत: नव्याने नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे १५.७६ आणि १७.४४ लाख होती, तर वर्ष २०२०-२१ साठी सप्टेंबर पर्यंत २.५ लाख होती.

## राज्य शासनाच्या सेवेमधील रोजगार

१०.६५ दिनांक १ जुलै, २०२० रोजी राज्य शासनाच्या सेवेमध्ये (गट अ ते ड) एकूण ७.१९ लाख मंजूर पदे होती व त्यापैकी एकूण रिक्त पदे ३२.२ टक्के होती. राज्य सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे तक्ता १०.५५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.५५ राज्य सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे**

(१ जुलै, २०२० रोजी ) (लाख)

| गट | पदे* | | |
|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त |
| अ | ०.४१ | ०.२६ | ०.१५ |
| ब | ०.७३ | ०.४४ | ०.२९ |
| क | ४.७७ | ३.५१ | १.२६ |
| ड | १.२८ | ०.७४ | ०.५४ |
| **अ ते ड** | **७.१९** | **४.९५** | **२.२४** |
| इ# | **२.३३** | **२.३३** | - |
| **एकूण** | **९.९५** | **७.२७** | **२.६८** |

# रोजंदारीवरील, मानधनावर काम करणारे, अंशकालीन व वेतन श्रेणी लागू नसलेले कर्मचारी * अस्थायी

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे

१०.६६ कामाच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगारासाठी समुपदेशन, मार्गदर्शन व मदत करण्यासाठी राज्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात अशी एकूण ५० केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी ३६ जिल्हा स्तरावर, सहा विद्यापीठात आणि आठ आदिवासींकरिता आहेत. यामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी एका केंद्राचा समावेश आहे.

१०.६६.१ या केंद्रांच्या चालू नोंदवहीत डिसेंबर, २०२० अखेर नोंद असलेल्या व्यक्तींची संख्या ५३.६६ लाख होती. सन २०२० मध्ये डिसेंबरपर्यंत या केंद्रांत नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ५.७५ लाख होती आणि ८.०१ लाख अधिसूचित रिक्त जागांपैकी १.९९ लाख जागांवर नेमणुका करण्यात आल्या. अधिसूचित रिक्त पदे, भरण्यात आलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.११ व परिशिष्ट १०.१२ मध्ये दिला आहे.

## रोजगार निर्मिती व कौशल्य विकास कार्यक्रम

१०.६७ केंद्र तसेच राज्य शासनामार्फत विविध रोजगार निर्मिती व कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येतात.

## रोजगार प्रोत्साहनाकरिता कार्यक्रम

१०.६७.१ राज्य शासनामार्फत खालील रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येतात.

- **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण अथवा इतर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे.
- **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम :** शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे.
- **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत व प्रशिक्षित करणे.

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च तक्ता १०.५६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५६ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व खर्च**

| कार्यक्रम | लाभार्थी (संख्या) | | | खर्च (₹ लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
| रोजगार प्रोत्साहन | २७,०४९ | २७,८६० | १३,६८३ | २५८.७५ | १९५.१३ | ० |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | २७,४६६ | ३६,६६० | ३४,१०३ | १,३२१.९३ | १,६२५.७७ | १,६२३.२५ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण | ३४,९६३ | ३४,५६२ | $ | १,२६२.१८ | १,२८८.५८ | $ |

$ कोविड-१९ मुळे स्थगिती देण्यात आली आहे +डिसेंबरपर्यंत

*आधार :* कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.६७.२ कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी व त्याद्वारे उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्य शासनामार्फत सन २००९-१० पासून सर्व जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. आयोजित केलेले रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेला रोजगार तक्ता १०.५७ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५७ आयोजित रोजगार मेळावे व पुरविण्यात आलेला रोजगार**

(संख्या)

| तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| रोजगार मेळावे | १७१ | १४८ | १६० |
| सहभागी उद्योजक | २,१९० | १,६४७ | १,६४७ |
| रोजगार मेळाव्यात उपस्थित युवक | १,६७,६४१ | ८४,६३५ | ९४,११२ |
| पुरविण्यात आलेला रोजगार | ४७,४२१ | २२,८७७ | १,८०७ |

*आधार:* कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

१०.६७.३ राज्यात कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी नोडल संस्था आहे. या द्वारे युवकांना अधिक चांगले उपजिवीकेचे साधन उपलब्ध करण्याकरिता उद्योग संबंधित प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र पुरस्कृत *प्रधान मंत्री कौशल्य विकास योजनेची* अंमलबजावणी केली जाते. तसेच ‘ कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र ’ या ध्येयपूर्तीसाठी राज्यातील १५ ते ४५ वर्ष वयोगटातील व्यक्तींना रोजगार व उद्योजकते बाबत संधी निर्माण होणाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीद्वारे *प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानातर्गत* कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांची वर्ष २०२०-२१ मधिल नोव्हेंबर पर्यंतची स्थिती तक्ता १०.५८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५८ महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या प्रशिक्षण योजना**

| योजना | नोंदणी केलेले उमेदवार | प्रशिक्षित उमेदवार | रोजगार / स्वयंरोजगार उमेदवार | रोजगार / स्वयंरोजगार उमेदवारांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **केंद्र पुरस्कृत योजना** | | | | |
| प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना | | | | |
| i) उद्योगांशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण | ६१,४०८ | १८,१५० | ४,७०९ | २५.९ |
| ii) कृषी प्रकल्प - सामुदायिक कौशल्य प्रशिक्षण | ३,३४,०३९ | २,६०,०४५ | लागू नाही | लागू नाही |
| iii) कृषी प्रकल्प - वैयक्तिक कौशल्य प्रशिक्षण | ३,७२० | ७८३ | ० | ० |
| दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान | २,५२,७४१ | १,८५,९२१ | १,१२,८०१ | ६०.७ |
| **राज्य पुरस्कृत योजना** | | | | |
| प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान | १,७४,७०४ | १,३३,२१० | ८५,४६० | ६४.२ |
| किमान कौशल्य विकास कार्यक्रम | ४४,१९९ | २२,०९९ | ११,५०२ | ५२.१ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन नोव्हेंबर, २०२० पर्यंत

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम

१०.६८ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम म्हणून राबविण्यात येतो. या कायाद्याअंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य निधी योजना राबविण्यात येतात.

१०.६८.१ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र** - सदर योजने अंतर्गत ग्रामीण भागामधिल अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रौढ व्यक्तीच्या कुटुंबास एका वर्षात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी केंद्र शासनामार्फत देण्यात येते व प्रती कुटुंब १०० दिवसापेक्षा जास्त रोजगारावरील खर्चाची प्रतीपुर्ती राज्य शासनामार्फत करण्यात येते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती तक्ता १०.५९ मध्ये दिला आहे. कामाच्या वर्गीकरणानुसार कामांची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५९ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यातील प्रगती**

| कामाचे वर्गीकरण | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | १७.९३ | १५.३७ | १३.९१ |
| मनुष्य दिवस निर्मिती (कोटी) | ८.४६ | ६.३० | ५.०३ |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ४७ | ४१ | ३६ |
| रोजगारातील हिश्शाची टक्केवारी | | | |
| अनुसूचित जाती | १०.५ | १०.९ | ८.८ |
| अनुसूचित जमाती | २०.० | २०.९ | २७.३ |
| महिला | ४४.९ | ४३.४ | ४२.२ |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | ३,२२,५०४ | ३,३१,७४४ | २,१६,७५८ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | २,३८१.५६ | १,८२५.६७ | १,४२७.५४ |
| एक दिवसाच्या रोजगार निर्मितीचा खर्च (₹) | २८२ | २८९ | २८४ |

*आधार*: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना ), महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

१०.६८.२ **राज्य निधी योजना** - मागेल त्याला शेततळे योजना आणि नागपूर विभागात ११,००० सिंचन विहीर योजना राज्य निधीतून राबविण्यात येतात. राज्य निधी योजनांचा प्रगती तक्ता १०.६० मध्ये दिला आहे.

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

१०.६९ राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) सन २०११ पासून राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. तळागाळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबांना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्रय कमी करणे, परिणामी कायमस्वरूपी तत्वावर त्यांच्या उपजीविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. सन २०२०-२१ जानेवारी पर्यंत एकूण ६३,०६३ स्वसहाय्यता गटांना एकूण ₹ ८७१.५२ कोटींचा पतपुरवठा करण्यात आला. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती तक्ता १०.६१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६० राज्य निधी योजनांची प्रगती**

^नोव्हेंबर, २०२० पर्यंत

| तपशील | २०२०-२१^ |
|---|---|
| **मागेल त्याला शेततळे** | |
| पूर्ण झालेली कामे | १,४९,५९० |
| प्रगतीपथावरील कामे | ३८४ |
| वितरीत अनुदान (₹ कोटी) | ६३९.४१ |
| **नागपूर विभागामध्ये ११,००० सिंचन विहिर योजना** | |
| उद्दीष्ट | ११,००० |
| जारी केलेले कार्यादेश | ११,५९४ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या विहिरी | ११,४११ |
| बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या विहिरी | ११५ |
| वितरीत अनुदान (₹ कोटी) | २८६.६२ |

*आधार* : नियोजन विभाग (रोजगार हमी योजना ), महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.६१ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (*उमेद*) प्रगती**

| तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| स्थापन झालेले स्वसहाय्यता गट (संख्या) | १,१५,३९५ | १,४३,७१५ | ४३,५६३ |
| स्वसहाय्यता गटांतील सदस्य (संख्या) | १२,६९,३४५ | १५,८०,८६५ | ४,७९,१९३ |
| प्राप्त निधी (₹ कोटी) | ४०३.४३ | ५५१.१५ | २५६.८७ |
| खर्च (₹ कोटी) | ४८९.९७ | ४६९.५५ | १९६.२५ |
| कर्ज देण्यात आलेले स्वसहाय्यता गट (संख्या) | १,०१,२३२ | १,१४,०८३ | ६३,०६३ |
| पत पुरवठा (₹ कोटी) | १,५२७.४१ | १,८००.९६ | ८७१.५२ |

*आधार* : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन. + जानेवारीपर्यंत

## दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

१०.७० राज्यात दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाचे उद्दिष्ट नागरी भागातील गरीब कुटुंबांना स्वयंरोजगाराच्या व कुशल रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे दारिद्रय व असुरक्षितता कमी करणे हे आहे. सदर अभियान मे, २०१७ पासून राज्यातील २५९ नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत 'कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता' या घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीद्वारे करण्यात येते. या अभियानाची प्रगती तक्ता १०.६२ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.६२ राज्यातील दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाची प्रगती**

| तपशील | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| **वितरीत निधी** | | | |
| केंद्र शासन (₹ कोटी) | ०.०० | ०.०० | ५०.९६ |
| राज्य शासन (₹ कोटी) | ०.२३ | ०.३५ | ३२.३ |
| **स्थापन झालेले स्वसहाय्यता गट संख्या** | १७,९५६ | १४,६३६ | ७,२८२ |
| **बचत गटांना फिरता निधी** | | | |
| स्वसहाय्यता गट संख्या | १५,४९८ | १५,५१३ | १,५८८ |
| खर्च (₹ कोटी) | १५.५० | १५.५१ | १.५८ |
| **कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता** | | | |
| प्रशिक्षण घेतलेले लाभार्थी | ९५,९९१ | ६३,०३९ | १,१८० |
| रोजगार/स्वयंरोजगार प्राप्त झालेले लाभार्थी | २७,१८९ | ३४,२२४ | १,३१५ |
| खर्च (₹ कोटी) | १४३.४१ | ८८.९१ | ११.०० |
| **स्वयंरोजगार कार्यक्रम** | | | |
| **व्यक्तीगत उद्योग** | | | |
| लाभार्थी | ६,६६७ | ४,४४२ | १,३८२ |
| खर्च (₹ कोटी) | ०.८९ | २.३१ | १.०० |
| **गट उद्योग** | | | |
| लाभार्थी | ४८५ | ३१५ | १६० |
| खर्च (₹ कोटी) | ०.१२ | ०.३० | ०.११ |
| **बँक जोड कार्यक्रम** | | | |
| लाभार्थी | ८,२२० | ११,२१६ | ५,६९३ |
| खर्च (₹ कोटी) | ०.४४ | ६.५७ | ३.१५ |

*आधार* : नगर परिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र शासन. + जानेवारीपर्यंत

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.७१ पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. शहरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी पारंपरिक कारागीर वा बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करुन नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे व कारागिरांच्या मजुरी मिळविण्याच्या क्षमतेत वाढ करुन रोजगाराच्या संधीत वाढ करणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. हा कार्यक्रम राज्यात खादी आणि ग्रामोद्योग आयोग, खादी आणि ग्रामोद्यक मंडळ व जिल्हा उद्योग केंद्र यांचे मार्फत राबविला जातो. सन २०१९-२० मध्ये ४,३०३ प्रकल्पांना ₹ १०८.६४ कोटी निधी (मार्जिन मनी) वितरीत करण्यात आला असून त्याद्वारे ३४,४२४ रोजगार निर्माण झाला, तर सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत १,२२७ प्रकल्पांना ₹ ३२.७५ कोटी निधी (मार्जिन मनी) वितरित करण्यात आला व त्याद्वारे १६,९७६ रोजगार निर्माण झाला.

## बीज भांडवल योजना

१०.७२ बेरोजगार व्यक्तिंना उद्योग, सेवा व व्यवसाय यासारखे स्वयंरोजगार सुरू करण्याकरिता संस्थांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या कर्जासाठी बीज भांडवल पुरवुन प्रोत्साहित करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक बेरोजगार व्यक्ती किंवा १८ ते ४५ वर्षे वयोगटातील सातवी उत्तीर्ण व्यक्तींचा गट या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सन २०१९-२० मध्ये १,०८४ प्रकल्पांना ₹ ११.८९ कोटी निधी (बीज भांडवल) वितरीत करण्यात आला असून सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ मुळे सदर योजनेस स्थगिती देण्यात आली आहे.

## औद्योगिक संबंध

१०.७३ मागील वर्षातील ३१ कामबंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) व त्यामुळे बाधित झालेल्या ९,५७२ कामगारांच्या तुलनेत २०२० मध्ये काम बंद झालेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) २३ होती व त्यामध्ये ६,४३४ कामगार बाधित झाले. सन २०२० या वर्षात संप व टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्य दिवसांची संख्या १६.२१ लाख होती, तर सन २०१९ मध्ये ती २१.८४ लाख होती. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशील परिशिष्ट १०.१४ मध्ये दिला आहे.

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

१०.७४ कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्याच्या उद्देशानें तसेच सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठीच्या पुरविण्याकरिता, केंद्र शासनाने 'इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन ) कायदा १९९६' ची तरतूद केली आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ' स्थापना करण्यात आली.

१०.७४.१ वर्ष २०१९-२० मध्ये ७,५५,९७२ बांधकाम कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली तर २०२०-२१ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ५,४८४ बांधकाम कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली. सन २०१४-१५ ते २०२०-२१ (ऑगस्ट, २०२० पर्यंत) दरम्यान विविध योजना अंतर्गत ४८,९४,३६१ कामगारांनी विविध योजनांचे लाभ घेतले आणि ₹ २,२२४.६७ कोटी या कालावधीत वितरीत करण्यात आले. कोवीड-१९ लॉकडाउनमध्ये मंडळाने ९,७२,२३४ नोंदणीकृत बांधकाम कामगारांना त्यांच्या उपजीविकेसाठी प्रत्येकी ₹ ५,००० चे आर्थिक सहाय्य दोन हप्त्यांमध्ये त्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरीत केले.

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

१०.७५ 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ' द्वारे कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कामाच्या ठिकाणाव्यतिरिक्त कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मंडळावरील नोंदणीकृत आस्थापनांची व कामगारांची संख्या तसेच मंडळाच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी यांची संख्या तक्ता १०.६३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६३ मंडळावरील नोंदणीकृत आस्थापनांची, कामगारांची संख्या आणि लाभार्थी**

(लाखात)

| वर्ष | नोंदणीकृत | | लाभार्थी | | |
|---|---|---|---|---|---|
| | आस्थापना | कामगार | कामगार | कुटुंब सदस्य | इतर |
| २०१७-१८ | १.२६ | ४४.५६ | १.८६ | १.५५ | ०.५० |
| २०१८-१९ | १.३१ | ४८.५६ | २.४५ | १.६२ | ०.५१ |
| २०१९-२० | १.३६ | ४९.७१ | २.६१ | १.६० | ०.४७ |

# दारिद्र्य

१०.७६ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय, केंद्र शासन यांच्याकडून दर पाच वर्षांनी व्यापक स्तरावर घेतल्या जाणाऱ्या 'कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्च' या विषयावरील पाहणीच्या आधारे तत्कालीन योजना आयोगाकडून दारिद्र्य रेषा व दारिद्र्याचे प्रमाण यांचे अंदाज तयार करण्यात येत होते. राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ व्या फेरीच्या 'कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च' या पाहणीतील माहितीच्या आधारे तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार सन २०११-१२ साठी दारिद्र्याचे अंदाज तयार केले आहे.

१०.७६.१ सन २०११-१२ साठी देशस्तरावर दारिद्र्य रेषा ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ₹ ८१६ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,००० अशी निश्चित करण्यात आली. राज्यातील ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ₹ ९६७ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,१२६ निश्चित करण्यात आली. राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ग्रामीण भागासाठी २४.२ टक्के तर नागरी भागात ९.१ टक्के होते. निवडक राज्यांतील सन २०११-१२ साठी राज्यनिहाय दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण तक्ता १०.६४ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६४ निवडक राज्यातील सन २०११-१२ साठी दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण#**

| राज्य | दारिद्र्य रेषा (₹ दरडोई दरमहा) | | दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | सर्व |
| आंध्र प्रदेश | ८६० | १,००९ | ११.० | ५.८ | ९.२ |
| बिहार | ७७८ | ९२३ | ३४.१ | ३१.२ | ३३.७ |
| गुजरात | ९३२ | १,१५२ | २१.५ | १०.१ | १६.७ |
| कर्नाटक | ९०२ | १,०८९ | २४.५ | १५.३ | २०.९ |
| केरळ | १,०१८ | ९८७ | ९.१ | ५.० | ७.१ |
| मध्य प्रदेश | ७७१ | ८९७ | ३५.७ | २१.० | ३१.७ |
| **महाराष्ट्र** | **९६७** | **१,१२६** | **२४.२** | **९.१** | **१७.४** |
| पंजाब | १,०५४ | १,१५५ | ७.७ | ९.२ | ८.३ |
| राजस्थान | ९०५ | १,००२ | १६.१ | १०.७ | १४.७ |
| तामीळनाडू | ८८० | ९३७ | १५.८ | ६.५ | ११.३ |
| उत्तर प्रदेश | ७६८ | ९४१ | ३०.४ | २६.१ | २९.४ |
| पश्चिम बंगाल | ७८३ | ९८१ | २२.५ | १४.७ | २०.० |
| **अखिल-भारत** | **८१६** | **१,०००** | **२५.७** | **१३.७** | **२१.९** |

आधार : तत्कालीन नियोजन आयोग, भारत सरकार # तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार

# गृहनिर्माण

१०.७७ लोकसंख्या वाढीमुळे घरांची मागणी वाढत आहे. सर्वांना परवडणारी घरे हे शाश्वत विकास ध्येयाअंतर्गत लक्ष्यांपैकी एक लक्ष्य आहे. समाजातील विविध घटकांच्या घरांची गरज पूर्ण करण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे.

कोविड-१९ महामारीमुळे गृहनिर्माण क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने सप्टेंबर, २०२० ते डिसेंबर, २०२० या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यात तीन टक्क्यांनी आणि उर्वरित राज्यात दोन टक्क्यांनी मुद्रांक शुल्कामध्ये कपात केली आहे. जानेवारी, २०२१ ते मार्च, २०२१ या कालावधीकरिता मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यात दोन टक्क्यांनी आणि उर्वरित राज्यात १.५ टक्क्यांनी मुद्रांक शुल्कामध्ये कपात केली आहे.

# नागरी गृहनिर्माण

१०.७८.१ राज्य शासनाने नागरी भागातील गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) व इतर प्राधिकरण यांची स्थापना केली आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना

१०.७८.२ सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी 'प्रधानमंत्री आवास योजना- सर्वांसाठी घरे' ही केंद्रशासनाची महत्त्वाकांक्षी (फ्लॅगशीप) योजना आहे. सदर योजनेत नागरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यांचा समावेश आहे. सदर योजनेअंतर्गत राज्य शासनाने ३९१ शहरांमध्ये १९.४० लाख घरे बांधण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. राज्य शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहप्रकल्पांना गती देण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाची स्थापना केली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहप्रकल्पांना निवासी क्षेत्रासाठी २.५ चटई क्षेत्रफळ आणि हरित किंवा ना- विकास क्षेत्रासाठी एक चटई क्षेत्रफळ निर्धारित केले आहे. या योजनेअंतर्गत डिसेंबर, २०२० पर्यंत १४.४३ लाख घरकुलांचा समावेश असलेल्या एकूण १,००८ प्रकल्पांना मान्यता दिली असून त्यापैकी ६.६८ लाख घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

१०.७८.३ सन १९७७ मध्ये मुंबई तसेच राज्याच्या काही भागात किफायतशीर दरात घरे उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य शासनाने म्हाडाची स्थापना केली. स्थापनेपासून नोव्हेंबर, २०२० पर्यंत म्हाडाने एकूण ४,८०,८८० घरकुले (पुनर्विकासासह) बांधली आहेत. म्हाडाकडून बांधण्यात आलेली घरकुले तक्ता १०.६५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.६५ म्हाडाकडून बांधण्यात आलेली घरकुले**

(संख्या)

| वर्ष | आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | सदनिका | एकूण | संक्रमण शिबिरे | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | १,९३१ | २,४०२ | ५५३ | २१२ | १८ | ५,११६ | ३,२९५ | १,२५०.५७ |
| २०१९-२० | ७४२ | ८१३ | ० | ० | ५१९ | २,०७४ | २८४ | ६५१.४३ |
| २०२०-२१+ | १,११० | ० | ० | ० | ५३ | १,१६३ | २७८ | ३८९.३२ |

आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट मासिक उत्पन्न < ₹ २५,००० अल्प उत्पन्न गट मासिक उत्पन्न ₹ २५,००१ ते ₹ ५०,००० + नोव्हेंबरपर्यंत

मध्यम उत्पन्न गट मासिक उत्पन्न ₹ ५०,००१ ते ₹ ७५,००० उच्च उत्पन्न गट मासिक उत्पन्न > ₹ ७५,००१

*आधार* : म्हाडा

१०.७८.४ सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत बांधण्यात आलेली घरकुले तक्ता १०.६६ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.६६ म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत सन २०२०-२१ मध्ये बांधण्यात आलेली घरकुले**

(नोव्हेंबरपर्यंत) (संख्या)

| म्हाडा मंडळ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | सदनिका | एकूण | संक्रमण शिबिरे | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ० | ० | ० | ० | ० | ० | २७८ | ५९.१८ |
| कोकण | १,०१४ | ० | ० | ० | ० | १,०१४ | ० | १६०.७७ |
| नाशिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १३.६८ |
| पुणे | ० | ० | ० | ० | ५३ | ५३ | ० | ४८.९४ |
| औरंगाबाद | ९६ | ० | ० | ० | ० | ९६ | ० | ३१.४७ |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २६.५४ |
| नागपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४८.७४ |
| **एकूण** | **१,११०** | **०** | **०** | **०** | **५३** | **१,१६३** | **२७८** | **३८९.३२** |

*आधार* : म्हाडा

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको)

१०.७८.५ सिडको हे नियोजनबद्ध गृहनिर्माण विकास कार्यक्रम राबवित आहे. स्थापनेपासून (१९७०) मार्च, २०१९ पर्यंत सिडकोने १,८३,११० सदनिका बांधल्या आहेत. सिडकोने बांधलेल्या सदनिकांची संख्या तक्ता १०.६७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६७ सिडकोमार्फत बांधण्यात आलेल्या सदनिका**

(मार्च, २०१९ पर्यंत ) (संख्या)

| शहर | आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट / अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| नवी मुंबई | ६४,६४१ | ३५,२४५ | २८,७३६ | १,२८,६२२ | २,४७६ |
| औरंगाबाद | १९,५०१ | २,१२७ | ४३२ | २२,०६० | ५६ |
| नाशिक | २१,३४३ | २,६१९ | ५८२ | २४,५४४ | ४२ |
| नांदेड | ७,७५८ | १२६ | ० | ७,८८४ | ९ |
| **एकूण** | **१,१३,२४३** | **४०,११७** | **२९,७५०** | **१,८३,११०** | **२,५८३** |

*आधार* : सिडको

१०.७८.६ प्रधानमंत्री आवास योजना - सर्वांसाठी घरे अंतर्गत सिडकोने प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट आणि अल्प उत्पन्न गट यांचेकरिता सुमारे १५,४३२ सदनिका बांधण्याचे काम मार्च, २०१७ पासून हाती घेतले आहे. या योजनेअंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी अशा वेगवेगळ्या ठिकाणी बांधकाम सुरु करण्यात आले आहे. या योजनेच्या वाढीव टप्प्याअंतर्गत एकूण ७,९०५ सदनिकांचे बांधकाम तळोजा, नवी मुंबई येथे हाती घेण्यात आले आहे.

### झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.७८.७ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना सदनिका पुरविण्यात येत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून (१९९५) नोव्हेंबर, २०२० पर्यंत एकूण १,९९३ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या २,१६,०१६ कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. या योजनेची प्रगती तक्ता १०.६८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६८ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | प्रकल्प | | सदनिका | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | पूर्ण | लक्ष्य | पूर्ण |
| २०१९-२० | २९ | ५९ | ३,८२७ | ८,१५५ |
| २०२०-२१+ | १७ | ५६ | १,६८७ | ६,२०१ |

*आधार :* झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण + नोव्हेंबरपर्यंत

## महारेरा

१०.७९ राज्य शासनाने स्थावर संपदा क्षेत्राचे नियमन करण्यासाठी व चालना देण्यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) ची स्थापना केली असून या क्षेत्रात पारदर्शकता, नागरिक केंद्रितता, उत्तरदायित्वता आणि वित्तीय शिस्त आणणे या बाबींचा समावेश आहे. डिसेंबर, २०२० पर्यंत महारेराकडे एकूण २७,८७३ प्रकल्पांची नोंदणी करण्यात आली आहे. महारेराकडे १२,३८८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८,४६४ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.

## ग्रामीण गृहनिर्माण

१०.८०.१ शासन ग्रामीण गृहनिर्माणसाठी प्रधानमंत्री आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२, शबरी आदिवासी घरकुल योजना, रमाई आवास योजना, इत्यादी विविध योजना राबवित आहे.

### प्रधानमंत्री आवास योजना

१०.८०.२ या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्यांना ₹ १.३० लाख अनुदान देण्यात येते. प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती तक्ता १०.६९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६९ प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती**

| वर्ष | घरकुले (संख्या) | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | |
| २०१८-१९ | ६८,४६४ | ५५,५१३ | ७०६.०८ |
| २०१९-२० | ३,५४,५०१ | १,६५,१७२ | २,५०१.४५ |
| २०२०-२१+ | ३,९१,०६९ | ७९० | ३३१.१४ |

*आधार :* ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

### राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२

१०.८०.३ सदर योजना दारिद्र्य रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना घर बांधण्याकरिता राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत प्रति घरकुल ₹ एक लाख किंमत निर्धारित करण्यात आली असून त्याकरिता जिल्ह्यातील अग्रणी बँकेकडून ₹ ९०,००० कर्ज पुरविले जाते व उर्वरित ₹ १०,००० लाभार्थ्याने खर्च करावयाचे आहेत. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. या योजनेअंतर्गत नोव्हेंबर, २०२० पर्यंत ₹ ७७.९३ कोटी व्याजाची रक्कम म्हाडामार्फत अग्रणी बँकांना वितरित करण्यात आली आहे.

### पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

१०.८०.४ प्रधानमंत्री आवास योजना व अन्य ग्रामीण घरकुल योजनेअंतर्गत पात्र परंतु जागेअभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांसाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना' सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ५०० चौ. फूट जागा खरेदीसाठी ₹ ५०,००० मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. योजनेच्या सुरवातीपासून (२०१७) ऑक्टोबर, २०२० पर्यंत ९,१८७ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात आले.

## शबरी आदिवासी घरकुल योजना

१०.८१ शबरी आदिवासी घरकुल योजना ही राज्य योजना अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या व्यक्तिंकरिता राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत आदिम व पारधी जमातीच्या व्यक्तिंना प्राधान्य देण्यात येते. या योजनेअंतर्गत सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण २०११ च्या प्राधान्य क्रम यादीत समाविष्ट नसणाऱ्या आणि ₹ १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामीण भागातील साधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी अनुक्रमे ₹ १.३२ लाख व ₹ १.४२ लाख अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण २०११ च्या प्राधान्य क्रम यादीत समाविष्ट नसणाऱ्या व ₹ तीन लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या नागरी भागातील लाभार्थ्याला २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ २.५० लाख अनुदान देण्यात येते. सन २०१९-२० करिता एकूण ३३,५३८ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ९,७३२ घरकुले जानेवारी, २०२१ पर्यंत बांधण्यात आली आहेत.

## रमाई आवास योजना

१०.८२ रमाई आवास ही राज्य योजना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील व्यक्तिंना स्वत:च्या मोकळ्या जागेवर किंवा कच्च्या घराच्या जागेवर घर बांधून देण्यासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सामाजिक आर्थिक जात सर्वेक्षण २०११ च्या प्राधान्य क्रम यादीत समाविष्ट नसणाऱ्या आणि ग्रामीण भागातील ₹ १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या तर नागरी भागातील ₹ तीन लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील साधारण क्षेत्रातील लाभार्थ्याला तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्याला २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी अनुक्रमे ₹ १.३२ लाख व ₹ १.४२ लाख अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत नागरी भागातील लाभार्थ्याला ३२३ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ २.५० लाख अनुदान देण्यात येते. एकूण लाभार्थ्यांपैकी ७.५ टक्के हिस्सा हा नगर परिषद क्षेत्रात राहणाऱ्या व १० टक्के हिस्सा हा महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या लाभार्थ्यांचा असतो. या योजनेची प्रगती तक्ता १०.७० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७० रमाई आवास योजनेची प्रगती**

(संख्या)

| घरकुले (संख्या) | ग्रामीण | | | नागरी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| लक्ष्य | ९८,३३६ | ९१,५१७ | ० | १०,८३८ | १८,९८५ | ० |
| मंजुर | ९२,८८१ | ५३,७५५ | ० | ४,०२८ | १,४२३ | ० |
| पूर्ण | ५२,१८६ | ० | ० | १,०३९ | ० | ० |
| अपूर्ण | ४०,६९५ | ५३,७५५ | ० | २,९८९ | १,४२३ | ० |
| खर्च (₹ कोटी) | ४००.०० | ३००.०० | ४००.०० | १६०.०० | ६०.०० | २०.०० |

*आधार :* सामाजिक न्याय व विशेष प्राधिकरण, महाराष्ट्र शासन

# पाणी पुरवठा व स्वच्छता

## पाणी पुरवठा

१०.८३ निरामय मानवी जीवनाकरिता स्वच्छ, किफायतशीर व पुरेसे पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहाय्याने शासन अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबवित आहे.

### राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.८४ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्रशासनाचा महत्वाचा कार्यक्रम राज्यामध्ये सन २००९ पासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात पिण्यायोग्य व पुरेसे पाणी पुरविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. योजनेच्या सुरूवातीपासून मार्च, २०२० पर्यंत एकूण ९९,६०६ निर्धारीत गावे/ वाडयांपैकी ७३,६९३ गावे/ वाड्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.७१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७१ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | गावे / वाड्यांची संख्या | | खर्च |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | (₹ कोटी) |
| २०१६-१७ | १,८९१ | १,२७० | ८५४.०० |
| २०१७-१८ | ९७८ | ६३८ | ४७४.४७ |
| २०१८-१९ | ७४८ | ६३५ | ६५४.२६ |
| २०१९-२० | १,२०६ | ४३२ | ७३६.१८ |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

१०.८४.१ ग्रामीण भागातील किमान ५० टक्के जनतेला प्रतिदिन दरडोई ४० लिटर या प्रमाणात नळाद्वारे पाणी पुरवठ्याची सोय आणि ३५ टक्के कुटुंबांना वैयक्तिक नळ जोडणी सन २०१७ पर्यंत राज्यांनी साध्य करावी असा धोरणात्मक दृष्टीकोन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत ठरविला होता. राज्यात मार्च, २०२० पर्यंत ९०.२ टक्के ग्रामीण जनतेला पाणी पुरवठा योजनांद्वारे आणि ३८ टक्के ग्रामीण कुटुंबांना नळ जोडण्या देण्यात आल्या.

### जल जीवन अभियान

१०.८५ केंद्र शासनाने सन-२०२४ पर्यंत 'हर घर नल से जल' हे उद्दिष्ट समोर ठेवून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सप्टेंबर, २०२० पासून जल जीवन अभियानामध्ये रुपांतरीत केला आहे. या अभियानानुसार शासन ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना स्वच्छ, पुरेसा, शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबांना वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई प्रति दिन किमान ५५ लिटर, गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करणे हे या जल जीवन अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

### दुहेरी पंप नळ पाणी पुरवठा योजना

१०.८६ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा घटक असलेली सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप नळ पाणी पुरवठा योजना राज्यात सन २००९ पासून राबविण्यात येत आहे. ज्या लहान गावे/वस्त्यांवर विद्युत पुरवठा उपलब्ध नाही किंवा विद्युतीकरण आर्थिकदृष्ट्या किफायतशीर/सोयीस्कर नाही किंवा ज्या ठिकाणी विद्युत पुरवठा शाश्वत/पुरेसा नाही अशा सर्व साधारणपणे हातपंपावर अवलंबून असलेल्या गावे/वस्त्यांकरीता सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप नळ पाणी पुरवठा योजना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येत आहे. राज्यात मार्च, २०२० पर्यंत या योजनेअंतर्गत एकूण ५,११० सौर ऊर्जेवर आणि २,९१५ विद्युत ऊर्जेवर आधारित दुहेरी पंप नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या व त्यासाठी एकूण ₹ २५३.७८ कोटी निधी खर्च झाला. मार्च, २०२० पासून ही योजना जल जीवन अभियानाअंतर्गत राबविण्यात येत आहे. सन २०२०-२१ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२० अखेर प्रगतीपथावरील सौर ऊर्जेवर आधारित २०२ योजनांपैकी एकूण १०४ योजना पूर्ण झाल्या असून, एकूण ₹ १०.५९ कोटी निधी खर्च झाला आहे.

### मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.८७ पाणी पुरवठ्यात सुधारणा करुन पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता ग्रामीण भागामध्ये 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम' राज्यात सन २०१६-१७ पासून २०१९-२० पर्यंत राबविण्यात आला असून प्रगतीपथावरील/अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता सदर कार्यक्रमास दोन वर्ष (सन २०२१-२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे. ऑक्टोबर, २०२० पर्यंत या कार्यक्रमाअंतर्गत ₹ ६०२.०६ कोटी रकमेच्या ७४३ नवीन नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली आहे त्यापैकी ३९४ योजना पूर्ण झाल्या. तसेच बंद असलेल्या ₹ १२४.७८ कोटी रकमेच्या ३३ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजुरी मिळाली असून त्यापैकी १६ योजना पूर्ण झाल्या आहेत. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत वितरीत निधीचा तपशील तक्ता १०.७२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७२ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वितरीत निधीचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | नवीन पाणी पुरवठा योजना | बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरूज्जीवन | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरूस्ती |
|---|---|---|---|
| २०१७-१८ | २२७.१३ | ०.८७ | १२.०० |
| २०१८-१९ | १२३.८९ | ११.३१ | ८.०० |
| २०१९-२० | १५१.१२ | १९.३२ | ०.०० |
| २०२०-२१+ | ३९.५२ | ९.०० | ०.०० |

*आधार* : पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन +ऑक्टोबरपर्यंत

## पिण्याच्या पाण्याचा शाश्वतता कार्यक्रम

१०.८८ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा घटक असलेला पिण्याच्या पाण्याचा शाश्वतता हा कार्यक्रम पारंपरिक व अपारंपरिक उपाययोजनांद्वारे पाण्याचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी साठविण्यासाठी डोंगराळ भागात टाक्या बांधणे, कुपांचे व चरांचे पुनर्भरण, सिमेंट नाला बांध, विहीर खोलीकरण, इत्यादी उपाययोजना केल्या जातात. पिण्याच्या पाण्याचा शाश्वतता या कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची माहिती तक्ता १०.७३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७३ पिण्याच्या पाण्याचा शाश्वतता कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण झालेली कामे**

| वर्ष | गावे /वाडया (संख्या) | पूर्ण झालेली कामे (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २०१६-१७ | ८०२ | ४,३९६ | ८.९१ |
| २०१७-१८ | ४४८ | १,४८० | ६.६५ |
| २०१८-१९ | ५२४ | १,९०२ | २.७१ |
| २०१९-२० | १२५ | ५१४ | १.३६ |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

## पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

१०.८९ पाणी टंचाईग्रस्त गावे व वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात येतो. सन २०१९-२० मध्ये या कार्यक्रमाअंतर्गत राज्याने ₹ ७४२.६१ कोटी व सन २०२०-२१ मध्ये ऑक्टोबर अखेर ₹ २९४.७३ कोटी निधी वितरीत केला. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत विभागनिहाय वितरीत निधी तक्ता १०.७४ मध्ये दिला आहे.

१०.८९.१ टंचाईग्रस्त गावे व वाड्यांमधील टंचाईची परिस्थिती हाताळण्याकरीता राज्याने तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना, कूपनलिका व इतर पाण्याच्या स्रोतांचे पुनर्जीवन, टँकरने पाणी पुरवठा, इत्यादी विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट असलेली गावे व वाड्या तक्ता १०.७५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७४ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत विभागनिहाय वितरीत निधी**

(₹ कोटी)

| विभाग | वितरीत निधी | |
|---|---|---|
| | २०१९-२० | २०२०-२१+ |
| कोकण | १६.०५ | ९.८० |
| नाशिक | १३४.०० | ५३.०० |
| पुणे | ९३.२५ | ३३.९४ |
| औरंगाबाद | ३१५.४७ | १९६.०७ |
| अमरावती | ९४.९४ | ०.९२ |
| नागपूर | ६६.६७ | १.०० |
| **एकूण** | **७४२.६१@** | **२९४.७३@** |

@ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरीत केलेल्या निधीसह + ऑक्टोबरपर्यंत

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.७५ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट असलेली गावे व वाड्या**

(संख्या)

| कामाचे स्वरूप | गावे | | वाड्या | |
|---|---|---|---|---|
| | २०१८-१९@ | २०१९-२०$ | २०१८-१९@ | २०१९-२०$ |
| नवीन विंधण विहिरी | ३,६२९ | १,९६० | १,३७७ | ६४२ |
| तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा - विशेष दुरुस्ती | २,१७३ | १,५३१ | ३७९ | २४६ |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | १,२९३ | १,२२७ | ६९१ | ४४७ |
| तात्पुरती पूरक नळ जोडणी | ४६६ | ३२४ | ५१ | ६४ |
| टँकर/बैलगाडीने पाण्याचा पुरवठा | ५,६०७ | १,२८१ | ११,८७५ | २,३५२ |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | ६,८३१ | २,६१६ | १,४१२ | २६८ |
| विहिरी खोलीकरण/गाळ काढणे | ८३३ | २५० | ११६ | १२० |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर, २०१८ ते सप्टेंबर ,२०१९ $ ऑक्टोबर, २०१९ ते सप्टेंबर, २०२०

## जलस्वराज्य-२ कार्यक्रम

१०.९० जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य-२ हा कार्यक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून हा कार्यक्रम राज्यात जानेवारी, २०१४ ते सप्टेंबर, २०२० पर्यंत राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे १) जलधर पाणी व्यवस्थापन व सामूहिक भूजल व्यवस्थापन, २) पाण्याची गुणवत्ता बाधित झालेल्या भागांमध्ये पाण्याच्या गुणवत्तेच्या संबंधित उपाययोजना व सेवा सुधारणे, ३) ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची पाणी टंचाईग्रस्त वाड्या/वस्त्यांमध्ये पाणीपुरवठ्याच्या उपाययोजना करणे, ४) खेड्यांमध्ये भूजल पातळी सनियंत्रण यंत्रणा स्थापित करणे, ५) जलविज्ञान हवामान केंद्र बळकटीकरण, ६) सहा प्रादेशिक भूजल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे बळकटीकरण, आणि ७) प्रत्यक्ष वेळी भूजल पातळीच्या माहितीचे सनियंत्रण हे घटक आहेत. जलस्वराज्य-२ हा कार्यक्रम प्रत्येक प्रादेशिक विभागातील दोन जिल्हे याप्रमाणे अमरावती, बुलढाणा, नांदेड, औरंगाबाद, रायगड, रत्नागिरी, नागपूर, चंद्रपूर, जळगाव, अहमदनगर, पुणे, व सातारा मध्ये राबविण्यात येत आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमाअंतर्गत शहरालगतच्या गावांमध्ये ६३ नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत असून त्यापैकी ४४ योजना कार्यान्वित करण्यात आल्या तर उर्वरित योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. पाणी टंचाईग्रस्त भागात आणि पाणी गुणवत्ता बाधित क्षेत्रात खात्रीदायक व सुरक्षित पुरेसा पाणी पुरवठा व्हावा यासाठी ७९ सामूहिक साठवण टाक्या आणि ६३ पाणी शुद्धीकरण संयंत्रे स्थापित करण्यात आले. या कार्यक्रमाची एकूण किंमत ₹ १,२८४ कोटी असून, त्यामध्ये जागतिक बँकेचा ७० टक्के व राज्य शासनाचा ३० टक्के हिस्सा आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची आर्थिक प्रगती तक्ता १०.७६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७६ जलस्वराज्य - २ कार्यक्रमाची आर्थिक प्रगती**

(₹ कोटी)

| वर्ष | जागतिक बँकेडून वितरीत कर्ज | राज्य शासनाकडून वितरीत रक्कम | खर्च |
|---|---|---|---|
| २०१४-१५ ते २०१६-१७ | ७७.१५ | १७०.३० | १७०.३० |
| २०१७-१८ | १२७.४३ | १६०.०० | १६०.०० |
| २०१८-१९ | ० | १४४.०० | १४४.०० |
| २०१९-२० | २०८.९० | १०८.०० | १०८.०० |
| २०२०-२१+ | ८२.०० | ५४.०० | ३८.७० |
| **एकूण** | **४९५.४८** | **६३६.३०** | **६२१.००** |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + सप्टेंबरपर्यंत

## अटल भूजल योजना (अटल जल)

१०.९१ अटल जल ही केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्यित योजना राज्यामध्ये सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात येत असून या योजनेचे उद्दिष्ट शाश्वत भूजल व्यवस्थापन सुलभ करणे हे आहे. राज्यातील अतिशोषित, शोषित आणि अंशतः शोषित पाणलोट क्षेत्र असलेल्या १३ जिल्ह्यातील (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, जळगाव, जालना, लातूर, उस्मानाबाद, अमरावती, बुलढाणा, व नागपूर), ३८ तालुक्यातील, १,३३९ ग्रामपंचायतीमधील, १,४४३ गावांची निवड केलेली आहे. या योजनेमध्ये सामूहिक सहभाग, मागणी व्यवस्थापन आणि सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांची सांगड घालणे, व पर्यायाने भूजल पातळी सुधारण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या योजनेचे १) संस्थात्मक बळकटीकरण व क्षमतावर्धन आणि २) पूर्वनिर्धारित परिणामांच्या साध्यावर आधारित प्रोत्साहन अर्थसहाय्य हे दोन घटक असून त्यासाठी सन २०२०-२१ मध्ये केंद्र शासनामार्फत नोव्हेंबर, २०२० पर्यंत अनुक्रमे ₹ १८८ कोटी व ₹ ७३७.५१ कोटी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

## अटल पुनरुज्जीवन व नागरी परिवर्तन अभियान (अमृत)

१०.९२ अटल पुनरुज्जीवन व नागरी परीवर्तन अभियानाचा उद्देश राज्यातील निवडक शहरांना पाणी पुरवठा व मलनि:सारण विषयक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे हा असून या अभियानाअंतर्गत राज्यातील ४४ शहरांचा समावेश आहे व त्यात नागरी भागातील ७६ टक्के जनतेचा समावेश आहे.

१०.९२.१ या अभियानाअंतर्गत राज्यातील ३४ शहरांमधील ₹ ४,३१३ कोटी रक्कमेचे ३८ पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर आहेत. यापैकी सहा शहरांमधील एकूण ₹ २७५ कोटी रक्कमेचे सात प्रकल्प कार्यान्वित होऊन त्याठिकाणी प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू झाला आहे व उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगती पथावर आहेत.

१०.९२.२ या अभियानाअंतर्गत एकूण ₹ ३,२६७ कोटी रक्कमेचे ३० मलनि:सारण प्रकल्प मंजूर झाले आहेत. त्यापैकी ऑक्टोबर, २०२० अखेर नाशिक शहरातील ₹ २९ कोटी रकमेचा प्रकल्प कार्यान्वित झाला असून उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

१०.९२.३ या अभियानाअंतर्गत राज्य शासनाने एकूण ₹ १७९ कोटी रक्कमेचे १२८ 'हरितक्षेत्र' (अमृतवन) प्रकल्प मंजूर केले आहेत. त्यापैकी ऑक्टोबर, २०२० अखेर ९६ प्रकल्प कार्यान्वित झाले असून उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

## महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान

१०. ९३ राज्यातील महानगरपालिका (ड वर्ग), नगरपरिषदा आणि नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीपासून नोव्हेंबर, २०२० पर्यंत या अभियानाअंतर्गत ₹ ११,१९५ कोटी रक्कमेचे १९४ प्रकल्प मंजूर असून यापैकी ₹ ३,६४८ कोटी रक्कमेचे ५८ प्रकल्प पूर्ण झाले. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाची प्रगती तक्ता १०.७७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७७ महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाची प्रगती**

| कामाचे स्वरूप | मंजूर प्रकल्प+ (संख्या) | मंजूर निधी+ (₹ कोटी) | पूर्ण झालेले प्रकल्प+ (संख्या) | खर्च+ (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| पाणीपुरवठा | १०० | ४,९०६ | २० | १,००० |
| मलनि:सारण | ३५ | २,३२० | ८ | ८१९ |
| इतर (रस्ते, पर्जन्य जलवाहिनी, उड्डाणपूल, घन कचरा व्यवस्थापन इत्यादी) | ५९ | ३,९६९ | ३० | १,८२९ |

*आधार* : नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## स्वच्छता

१०.९४ सुरक्षित स्वच्छता म्हणजे मानवी मलमूत्राची सुरक्षितरित्या विल्हेवाट, शौचालयाचा योग्य वापर आणि खुले शौचालय टाळण्याबरोबरच घन आणि द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन होय. स्वच्छता सुविधांमध्ये वाढ केल्यामुळे पर्यावरणाला मदत होते आणि समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये योगदान दिले जाते. स्वच्छता सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

१०.९५ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) राज्यात दि.२ ऑक्टोबर, २०१४ पासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात स्वच्छता राखणे, उघडयावर मलविसर्जन करण्यास प्रतिबंध करणे, कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालये बांधणे व त्याचा सातत्याने वापर करणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. या अभियानाद्वारे प्रत्येक घरासाठी शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे आणि देशास खुले हागणदारी मुक्त व कचरा मुक्त करणे आणि कार्यक्षम घनकचरा व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करणे, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. या अभियानातंर्गत मुख्यत्वे घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्यक्ष अनुदान देण्यात येते.

१०.९५.१ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) च्या सुरुवातीपासून ते दि.११ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत एकूण ५९.३५ लाख वैयक्तिक शौचालये आणि १.०७ लाख कुटुंबाना सामूहिक/ सार्वजनिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. राज्यामधील सर्व ३४ जिल्हे, ३५१ पंचायत समिती आणि २७,६६८ ग्रामपंचायतींमध्ये १०० टक्के स्वच्छता लक्ष्य साध्य केले व दि.१८ एप्रिल, २०१८ रोजी राज्यास खुली हागणदारी मुक्त म्हणून घोषित करण्यात आले. पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेली व पायाभूत सर्वेक्षणाबाहेरील वैयक्तिक शौचालय

सुविधा उपलब्ध नसलेली १०.५ लाख कुटुंबे आढळून आली त्यापैकी १०.४ लाख कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालयांची बांधकामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०१९-२० मध्ये सदर योजनेंतर्गत ₹ ७०९.२६ कोटी निधी खर्च झाला. केंद्र निधी व्यतिरिक्त, राज्याने केलेल्या हागणदारीमुक्ततेच्या कामाकरिता केंद्र शासनाकडून सन २०१८-१९ पासून जागतिक बँक कामगिरी आधारित प्रोत्साहन अनुदान निधी प्राप्त झाला असून त्याचा वापर मुख्यत्वे वैयक्तिक शौचालये बांधणाऱ्या लाभार्थ्यांना प्रोत्साहन निधी देण्याकरिता करण्यात आला असून या अंतर्गत १५ जानेवारी, २०२१ पर्यंत ₹ ४१२.९२ कोटी निधी खर्च झाला.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)-२

१०.९६ केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२४-२५ च्या दरम्यान स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ राबविण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. या अभियानाअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबरपर्यंत एकूण ₹ २००.१८ कोटी खर्च झाला. ग्रामीण भागातील सर्वांगीण स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) दुसऱ्या टप्प्यांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

## स्वच्छ भारत अभियान (नागरी)

१०.९७ जनगणना २०११ नुसार एकूण ८,९९,७४१ नागरी कुटुंबांना त्यांच्या आवारात शौचालय सुविधा उपलब्ध नव्हती. स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत नोव्हेंबर,२०२० पर्यत नागरी भागात ७.१० लाख कुटुंबांसाठी शौचालये बांधण्यात आली व त्यासाठी ₹ ८५२ कोटी खर्च झाला. केंद्र शासनाने १ ऑक्टोबर, २०१७ रोजी राज्यातील ३८४ शहरे खुली हागणदारी मुक्त घोषित केली असून त्यापैकी डिसेंबर, २०२० पर्यंत २२६ शहरे खुली हागणदारी मुक्त + (ओडीएफ+) व ११७ शहरे खुली हागणदारी मुक्त ++ (ओडीएफ++) झाली आहेत.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

१०.९८ स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राज्यातील सर्व शहरे खुली हागणदारी मुक्त करणे, आरोग्यदायी स्वच्छतेच्या सवयीतील बदल सुनिश्चित करून घन कचऱ्याचे व मलनि:सारणाचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन या उद्देशाने राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला दि.१५ मे, २०१५ रोजी सुरूवात केली. या अभियानाअंतर्गत ७.०९ लाख कुटुंबांसाठी शौचालये बांधण्यात आली. डिसेंबर, २०२० पर्यंत राज्यातील ४६ शहरांना ओडीएफ दर्जा, २१७ शहरांना ओडीएफ+ दर्जा व ११६ शहरांना ओडीएफ++ दर्जा घोषित झाला. शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या मैलावर प्रक्रिया करण्याकरिता राज्यस्तरावर धोरण राबविणारे महाराष्ट्र हे एक अग्रणी राज्य आहे. राज्यशासनाने एकूण ३११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मैला प्रक्रिया केंद्र उभारण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी १४८ शहरात प्रत्यक्ष कामास सुरूवात झाली व उर्वरित मैला प्रक्रिया केंद्रांचे बांधकाम सुरु आहे.

## स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)-२०२०

१०.९९ राष्ट्रीय स्तरावर आयोजित स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)- २०२० मध्ये देशातील एकूण ४,२४२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी भाग घेतला व त्यापैकी ३८४ सहभागी शहरे राज्यातील होती. सलग तिसऱ्या वर्षी राज्याला सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य म्हणून घोषित करण्यात आले व राज्यातील १४ शहरांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. देशातील पहिल्या १०० अमृत शहरांमध्ये राज्यातील ३१ शहरांचा समावेश होता. पहिल्या १०० बिगर अमृत शहरांमध्ये राज्यातील ६० शहरांचा समावेश होता.

## गंदगी मुक्त भारत मोहीम

१०.१०० केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्याच्या ग्रामीण भागात दि.८ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२० या कालावधीत गंदगी मुक्त भारत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत राज्यास तृतीय पुरस्कार प्राप्त झाला.

## सामुदायिक शौचालय अभियान-२०२०

१०.१०१ कोविड-१९ महामारीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात कामगार/ मजुरांनी त्यांच्या निवासी गावी स्थलांतर केल्यामुळे त्यांना आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता विषयक महत्वाच्या सोयी-सुविधा असणे आवश्यक झाले. ग्रामीण भागात सामुदायिक शौचालय/स्वच्छता संकुल उभारणे हे स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) चे महत्वाचे घटक असून केंद्र शासनाने दि.१५ जून ते १५ सप्टेंबर, २०२० या तीन महिन्याच्या कालावधीत सामुदायिक शौचालय अभियान राबविले. या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील आणि गावातील सामुदायिक शौचालयांची बांधणी व देखभालीची कामे करण्यास चालना देण्यात आली. या अभियानाअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर देशातील सर्व ग्रामपंचायतीमधून भंडारा व यवतमाळ ह्या दोन जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पुरस्कार, सर्व जिल्ह्यांमधून जळगाव जिल्ह्याला तृतीय पुरस्कार व राज्याला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाले.

## घनकचरा व्यवस्थापन (नागरी)

१०.१०२ शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या १०० टक्के कचऱ्याचे, कचरा निर्मितीच्या जागीच ओला व सुका कचरा असे विलगीकरण करण्यासाठी राज्यात दि. १ मे, २०१७ पासून 'कचरा लाख मोलाचा' ही मोहीम व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. राज्यात दररोज सरासरी २२,०८१ मे. टन कचरा निर्माण होतो, त्यापैकी ९६ टक्के कचरा दारोदारी जावून गोळा केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ८८ टक्के कचरा हा ओल्या व सुक्या स्वरूपात विलगीकृत केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ७५ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. राज्यातील सर्वच ३९६ शहरांमध्ये कचऱ्याचे विलगीकरण करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

१०.१०२.१ विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून कंपोस्ट खताची निर्मिती केली जाते. व त्याच्या विक्री व विपणनासाठी राज्याने 'हरित महासिटी कंपोस्ट' ब्रँडची नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण ९५ शहरांना कंपोस्ट खताच्या विक्रीसाठी 'हरित महासिटी कंपोस्ट' ब्रँड वापरण्यास परवानगी दिली आहे. शासनाने घन कचरा व्यवस्थापनसाठी ₹ ३,१३८ कोटी मंजूर केले आहेत.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.१०३ नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकामे व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त व गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर दरात उपलब्ध करुन देणे व तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करणे हा महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान या अभियानाचा उद्देश आहे. अभियानाच्या सुरूवातीपासून (२००८-०९) ते ऑक्टोबर, २०२० पर्यंत पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या ₹ १,२०८.८८ कोटी खर्चाच्या २५८ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून ₹ ९१६.१५ कोटी निधी वितरीत केला आहे. सन २०१९-२० मध्ये ₹ २७.८९ कोटी सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यत ₹ ५.५३ कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय नमुना पाहणीचे निष्कर्ष

१०.१०४ 'पिण्याचे पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि घराची स्थिती' या विषयावरील राष्ट्रीय नमुना पाहणीच्या जुलै-डिसेंबर, २०१२ (६९ वी फेरी) व जुलै-डिसेंबर, २०१८ (७६ वी फेरी) या कालावधीत घेण्यात आलेल्या केंद्र नमुन्यावर आधारित राज्यासाठीचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.७८ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.७८ राष्ट्रीय नमुना पाहणी ६९ वी फेरी (जुलै-डिसेंबर, २०१२) व ७६ व्या (जुलै-डिसेंबर, २०१८) फेरीचे पाणीपुरवठा व स्वच्छता संबंधित महत्वाचे निर्देशक**

(टक्के)

| निर्देशक | ग्रामीण | | नागरी | | ग्रामीण+नागरी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१८ | २०१२ | २०१८ | २०१२ | २०१८ |
| पिण्याचे पाणी | | | | | | |
| घराच्या आवारात पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळणारी कुटुंबे | ४६.८ | ६७.१ | ८७.४ | ९३.६ | ६४.४ | ७९.० |
| पिण्याचे पाणी सुधारित मुख्य स्त्रोताद्वारे मिळणारी कुटुंबे | ८५.५ | ९३.४ | ९८.७ | ९९.७ | उ.ना. | ९६.२ |
| शौचालय उपलब्धता | | | | | | |
| शौचालय उपलब्ध असणारी कुटुंबे | ४६.० | ७८.० | ९३.१ | ९८.६ | ६६.५ | ८७.२ |
| स्वतंत्र शौचालय सुविधा उपलब्ध असणारी कुटुंबे | ३२.२ | ७२.७ | ५८.० | ७५.० | ४३.४ | ७३.७ |

*आधार*: राष्ट्रीय नमुना पाहणी अहवाल, भारत सरकार — उ.ना. उपलब्ध नाही

# पर्यावरण संवर्धन

१०.१०५ स्वच्छ आणि निरोगी शाश्वत पर्यावरण हा जागतिक व राष्ट्रीय पातळीवर लोकांचा मूलभूत हक्क मानला जातो. लोकसंख्येच्या वाढीमुळे बांधकाम, औद्योगिकीकरण, हवा व जल प्रदूषण, सांडपाणी इत्यादींमध्ये वाढ होते. परिणामी जंगलतोड, हवामानातील बदल, हवा व पाण्याच्या गुणवत्तेचा ऱ्हास अशा प्रकारचे वातावरणीय बदल घडतात. संयुक्त राष्ट्रांनी शाश्वत विकास ध्येये निश्चित करताना महत्त्वाच्या आयामांपैकी पर्यावरण हा एक महत्त्वाचा आयाम म्हणून विचारात घेतला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी आणि हवामानातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या समस्या हाताळण्यासाठी राज्याने प्रभावी उपाय योजीले आहेत. राज्यात पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरण विषयक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रदूषण पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी उपषमण उपाय करणारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ही नियामक संस्था आहे.

## हवा प्रदूषण

१०.१०६ हवेचे प्रदूषण हे मानवी आरोग्य आणि पर्यावरणासाठी सर्वात मोठी जोखीम आहे. जागतिक परिसर हवा गुणवत्ता माहितीकोष (२०१८) नुसार जगात दरवर्षी सुमारे ७० लाख लोक हवा प्रदूषणामुळे मृत्यु पावतात. हवेच्या प्रदूषणामुळे हृदय व फुफ्फुसाचे आजार तसेच फुफ्फुस व श्वसना संबंधी संसर्ग यासारख्या आरोग्य विषयक समस्या उद्भवतात. हवा प्रदूषण ही सर्व शहरांमध्ये गंभीर समस्या बनली आहे. हवेचे प्रदूषण प्रतिबंधित, नियंत्रित व कमी करण्यासाठी राज्यात हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ लागू करण्यात आला आहे. राष्ट्रीय हवा गुणवत्ता मूल्यांकन कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राज्यातील २७ शहरांमधील १०२ केंद्रांवर सतत हवा गुणवत्ता मूल्यांकन पद्धतीद्वारे सद्यस्थितीतील आणि अपेक्षित हवा प्रदूषणाचे मूल्यांकन केले जाते. निवडक नियंत्रण केंद्रात सन २०२० मध्ये नोंदविलेली परिसर हवा गुणवत्ता तक्ता १०.७९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७९ निवडक नियंत्रण केंद्रात सन २०२० मध्ये नोंदविलेली परिसर हवा गुणवत्ता**

| नियंत्रण केंद्र | हवा प्रदूषकांची गुणवत्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) | | नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$) | | श्वसन प्रवण दूषित कण (RSPM) | |
| | मर्यादा ५० $\mu g/m^3$ | | मर्यादा ४० $\mu g/m^3$ | | मर्यादा ६० $\mu g/m^3$ | |
| | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल |
| मुंबई - सायन | ४ | ३३ | १९ | १५८ | ७५ | ३४९ |
| नवी मुंबई - महापे | ४ | १०५ | ९ | २९० | १० | २८९ |
| पुणे - स्वारगेट | ६ | ३१ | १० | १२१ | ४० | २७५ |
| पुणे - भोसरी | ७ | ४२ | ९ | १६२ | १३ | २१८ |
| नाशिक - मनपा इमारत | ४ | १४ | ९ | ४४ | १६ | ९२ |
| नाशिक - एमआयडीसी सातपूर | ४ | १२ | ८ | ३७ | १६ | ६४ |
| औरंगाबाद - कडा कार्यालय | ३ | ३७ | ५ | ७९ | १६ | १७२ |
| औरंगाबाद - एमआयडीसी वाळूज | ४ | ३९ | ४ | ९७ | १२ | १८७ |
| अमरावती - शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय | ५ | १५ | ६ | १७ | २६ | ९२ |
| अमरावती - एमआयडीसी अमरावती | ५ | १९ | ७ | २० | १८ | १०१ |
| नागपूर - सिविल लाईन्स | ४ | २२ | ६ | ५३ | १४ | १४५ |
| नागपूर - हिंगणा रोड | ४ | २४ | ९ | ५८ | ४४ | १९२ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

$\mu g/m^3$ मायक्रोग्राम प्रति घन मीटर

१०.१०७ डिझेल, पेट्रोल व नैसर्गिक वायू यासारख्या जीवाश्म इंधनाच्या ज्वलनाने कार्बन डायऑक्साईड वायू मोठ्या प्रमाणात उत्सर्जित होतो. अल्प प्रमाणात गंधक असलेले डिझेल, शिसेरहीत पेट्रोल, एलपीजी/ सीएनजी यांचा पर्यायी इंधन म्हणून वापर, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अनिवार्य करणे, १५ वर्षे जुन्या वाहनांवर बंदी घालणे आणि आठ वर्षे जुनी वाहने एलपीजी/ सीएनजी मध्ये रूपांतरित करणे अशा काही महत्वाच्या उपाय योजना हवा प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी करण्यात येत आहेत. दि. ३१ डिसेंबर, २०१९ रोजी एकूण नोंदणीकृत ३७१.२२ लाख वाहनांपैकी २.७ टक्के एलपीजी/ सीएनजी आणि ०.०७ टक्के विजेवर चालणारी होती. राज्यातील एलपीजी/ सीएनजी व विजेवर चालणाऱ्या नोंदणीकृत वाहनांची संख्या तक्ता १०.८० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८० राज्यातील एलपीजी/ सीएनजी व विजेवर चालणाऱ्या नोंदणीकृत वाहनांची संख्या**

(संख्या)

| वर्ष | एकूण | त्यापैकी | |
|---|---|---|---|
| | | एलपीजी/ सीएनजीवर चालणारी | विजेवर चालणारी |
| २०१७-१८ | २६,९८,६८८ | १,३९,००५ | १,४१८ |
| २०१८-१९ | २५,३८,८३३ | १,३५,९८८ | ४,९५८ |
| २०१९-२० | २३,६९,४२६ | १,१६,६५१ | ७,३९६ |
| २०२०-२१+ | ७,७७,२२६ | ३६,७६४ | ३,६६६ |

\+ नोव्हेंबरपर्यंत

*आधार* : परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन

### कोविड-१९ लॉकडाउनचा हवा गुणवत्तेवरील परिणाम

१०.१०८ कोविड-१९ लॉकडाउन कालावधीत (दि.२१ मार्च, २०२० ते १ जून, २०२०) राज्यात प्रवासावरील कठोर निर्बंध घालण्यात आले तसेच बिगर अत्यावश्यक कार्ये व विविध उद्योग बंद करण्यात आले. परिणामी म्हणून राज्यातील बहूतेक शहरांमध्ये हवेच्या गुणवत्तेत सुधारणा दिसून आली. हवा गुणवत्ता बाबतची माहिती गुणात्मक दृष्टीने प्रसृत करण्यासाठी हवा गुणवत्ता निर्देशांक महत्त्वाचे साधन आहे. हवा गुणवत्ता नियंत्रण केंद्रांकडून हवा गुणवत्तेच्या प्राप्त माहितीच्या आधारे हवा गुणवत्ता निर्देशांक तयार करण्यात येतो. लॉकडाउन पूर्व व लॉकडाउन कालावधीतील सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक तक्ता १०.८१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.८१ लॉकडाउन पूर्व व लॉकडाउन कालावधीतील सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक**

| नियंत्रण केंद्र | लॉकडाउन पूर्व<br>०१-०३-२०२०<br>ते<br>२०-०३-२०२० | लॉकडाउन<br>२१-०३-२०२०<br>ते<br>०१-०६-२०२० |
|---|---|---|
| खडकपाडा, कल्याण | १७४.७६ | ८१.०७ |
| सायन, मुंबई | १६४.२५ | ७०.१६ |
| कुर्ला, मुंबई | १६१.९५ | ७९.९१ |
| छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टर्मिनल २), मुंबई | १५३.०५ | ५४.४१ |
| महापे, नवी मुंबई | १४८.९५ | ७४.८४ |
| नेरूळ, नवी मुंबई | १४८.३९ | ९७.३५ |
| वसई पश्चिम, मुंबई | १२१.६८ | ४५.१८ |
| सोलापूर, सोलापूर | ११०.३० | ६३.२८ |
| वरळी, मुंबई | १०८.९५ | ६१.१७ |
| विले पार्ले पश्चिम, मुंबई | १०७.०५ | ५८.९६ |
| कुलाबा, मुंबई | १०४.२४ | ५६.०० |
| वांद्रे, मुंबई | १०१.६७ | ६८.९६ |
| कर्वे रोड, पुणे | ९८.७५ | ६०.९७ |
| पवई, मुंबई | ९८.५८ | ५९.०३ |
| गंगापूर रोड, नाशिक | ९६.८० | ५७.८८ |
| पिंपळेश्वर मंदिर, ठाणे | ९०.५५ | ६०.१५ |
| ऐरोली, नवी मुंबई | ८७.८५ | ८९.४५ |
| मोरे चौक, वाळूज | ८५.२९ | ५२.०१ |
| एमआयडीसी खुटाळा, चंद्रपूर | ८१.८२ | ७७.३६ |
| बोरिवली पूर्व, मुंबई | ७९.५६ | ६२.८८ |
| चंद्रपूर, चंद्रपूर | ७८.०६ | ७१.८१ |
| जीपीओ समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर | ७७.७३ | ५९.९८ |

टीप : हवा गुणवत्ता निर्देशांक श्रेणी - चांगली (०-५०), समाधानकारक (५१-१००), मध्यम (१०१-२००), खराब (२०१-३००), अति खराब (३०१-४००), तीव्र (४०१-५००)
*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## जल प्रदूषण

१०.१०९ जल प्रदूषण म्हणजे जलस्रोतांमधील दूषितपणामुळे ते पाणी पिण्यासाठी अथवा वापरासाठी हानिकारक होय. औद्योगिक कारखान्यांमधून निघणाऱ्या घातक रसायनांचे थेट जलस्रोतांमध्ये केल्या जाणाऱ्या विसर्गामुळे प्रामुख्याने जल प्रदूषण होते. अस्वच्छता, पिकांवर होणारी किटकनाशकांची फवारणी, नदी अथवा तलावाजवळ स्नान व कपडे धुणे यामुळे सुद्धा जल प्रदूषण होते. हे पर्यावरण व मानवी आरोग्यासाठी हानिकारक आहे. जल प्रदूषण प्रतिबंधित व नियंत्रणासाठी तसेच जल गुणवत्ता राखण्यासाठी किंवा पूर्ववत करण्यासाठी जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ राज्यात लागू करण्यात आला आहे. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून राबविण्यात येत असून या कार्यक्रमांतर्गत नियमितपणे भूपृष्ठावरील (यामध्ये नद्यांवर १५५, समुद्र/ खाड्यांवर ३४, नाल्यांवर १०, धरणावर एक) तसेच भूपृष्ठाखालील (यामध्ये २४ कूप नलिका, २४ विहिरी, एक हातपंप, एक नलिका विहीर) अशा एकूण २५० जल गुणवत्ता संनियंत्रण केंद्रात पाण्याचे नमुने तपासले जातात. भूपृष्ठावरील पाण्याच्या नमुन्याचे दरमहा गुणवत्तेशी संबंधीत नऊ मुख्य बाबी व १९ सामान्य बाबींचा आणि भूजल नमुन्याचे धातू व किटकनाशकांचे अंश शोधण्यासाठी सहामाही गुणवत्ता संनियंत्रण केले जाते. सन २०१९-२० करिता राज्यातील गोदावरी, कृष्णा, पंचगंगा आणि भीमा या नद्यांच्या ३९ केंद्रांवरील जल गुणवत्ता तक्ता १०.८२ मध्ये दिली आहे. जानेवारी ते सप्टेंबर, २०२० या कालावधीची राज्यातील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रांतील जल गुणवत्ता तक्ता १०.८३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८२ सन २०१९-२० या कालावधीतील राज्यातील गोदावरी, कृष्णा, पंचगंगा आणि भीमा या नद्यांच्या ३९ केंद्रांवरील जल गुणवत्ता**

| बाब | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| pH मूल्य | | जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी | | विरघळलेला प्राणवायू | | फिकल कॉलिफॉर्म | |
| ६.० ते ९.०# | | ३ मि ग्रॅ / लि# पेक्षा कमी | | ४ मि ग्रॅ / लि# पेक्षा जास्त | | एमपीएन/ १०० मि लि# | |
| विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने |
| ५.५ - ६.४ | ० | २.५ पेक्षा कमी | ८ | ३ पेक्षा कमी | ० | ० - १०० | ३० |
| ६.५ - ७.४ | २ | २.५ - ५.४ | २२ | ३ — ४.९ | २ | १०० - २०० | ६ |
| ७.५ - ८.४ | ३७ | ५.५ - ८.४ | ७ | ५ — ६.९ | ३४ | २०० - ३०० | ० |
| ८.५ - ९.५ | ० | ८.५ - ११.४ | ० | ७ — ८.९ | ३ | ३०० व त्यापेक्षा अधिक | ३ |
| | | ११.५ व त्यापेक्षा अधिक | २ | ९ व त्यापेक्षा अधिक | ० | | |

मिग्रॅ/लि मिलिग्रॅम / लिटर # केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे जल गुणवत्तेचे निकष, वर्ग क एमपीएन मोस्ट प्रोब्याबल नंबर

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.८३ जानेवारी ते सप्टेंबर, २०२० या कालावधीतील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रातील जल गुणवत्ता**

| केंद्राचे नाव | pH मूल्य | विरघळलेला प्राणवायू (मि ग्रॅ / लि) | बी.ओ.डी. (मि ग्रॅ / लि) | सी.ओ.डी. (मि ग्रॅ / लि) | नायट्रेट (मि ग्रॅ / लि) | फिकल कॉलीफार्म (मि ग्रॅ / लि) |
|---|---|---|---|---|---|---|
| कृष्णा नदी वरील राजापूर बंधारा | ७.८० | ६.४० | १.९० | १६.०० | ०.५९ | १०.१० |
| गोदावरी नदी वरील जायकवाडी धरण - पैठण | ७.७० | ६.८० | ३.०० | ९.७८ | ०.५३ | २.४५ |
| मुळा-मुठा नदी वरील मुंढवा पूल | ७.४० | ५.२० | ९.५६ | २७.०० | ३.७० | ५४६.०० |
| कान्हन नदी वरील मेसर्स विदर्भ पेपर मिल्सच्या उतारावर | ८.२९ | ६.९७ | ५.३७ | २७.५६ | २.३२ | ३५.३३ |
| पुर्णा नदी वरील धुपेश्वर येथे मलकापूर वॉटर वर्क्स च्या वरील बाजूस | ८.२२ | ६.३८ | ४.८४ | २५.६० | २.६६ | ३४.८० |
| दारणा नदी वरील दारणा धरण - अस्वली | ७.७६ | ६.१२ | ३.१९ | १३.३३ | ०.४९ | १४.०० |
| सावित्री नदी वरील मुठावली गाव | ७.६० | ६.७० | २.१० | ५०.०० | ०.७८ | ११.०० |
| मिठी नदी वरील नजीकच्या पुलाजवळ | ७.३७ | २.७० | २१.२२ | ६६.६७ | २.०९ | ४८,८२४.४४ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बी.ओ.डी. जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी सी.ओ.डी. रासायनिक प्राणवायूची मागणी

## सांडपाणी प्रक्रिया

१०.११० सन २०१९-२० मध्ये २७ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रति दिन अंदाजित ६,७१० दशलक्ष लिटर्स सांडपाण्याची निर्मिती झाली असून त्यापैकी अंदाजे ४,०६७ (६०.६ टक्के) दशलक्ष लिटर्स सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सन २०१९-२० मधील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया याबाबतची माहिती तक्ता १०.८४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८४ राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सन २०१९-२० मधील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया**

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या संस्था | सांडपाणी | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्मिती (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | प्रक्रिया (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | प्रक्रियेची निर्मितीशी टक्केवारी |
| महानगर पालिका | २७ | ६,७१० | ४,०६७ | ६०.६ |
| नगर पालिका | | | | |
| अ वर्ग | १७ | २८० | ५६ | २०.० |
| ब वर्ग | ७३ | ४०१ | ४१ | १०.२ |
| क वर्ग | १४३ | ३३४ | २२ | ६.६ |
| नगर पंचायत | १२६ | १५४ | ३ | २.० |
| कटक मंडळे | ७ | ३९ | ७ | १८.० |
| **एकूण** | **३९३** | **७,९१८** | **४,१९६** | **५२.९** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घन कचरा व्यवस्थापन

१०.१११ घन कचऱ्यामध्ये घरगुती घन कचरा, बांधकाम व पाडलेल्या बांधकामाचा मलबा, औद्योगिक घन कचरा, ड्रेनेज मलबा, निवासी व वाणिज्यिक संकुलातील घन कचरा यांचा समावेश होतो. राज्यात निर्माण होणाऱ्या घन कचऱ्यावर ५६ महानगरपालिका अथवा नगरपालिका व ७ कटक मंडळांनी पुरविलेल्या सामाईक सुविधा प्रक्रिया केंद्रांवर प्रक्रिया करण्यात येते. एकूण निर्मित घन कचऱ्यापैकी ६९.९ टक्के घन कचऱ्यावर दर दिवशी प्रक्रिया केली जाते. राज्यातील सन २०१९ मधील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया तक्ता १०.८५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८५ राज्यातील सन २०१९ मधील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया**

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभाग | घन कचरा | | |
|---|---|---|---|
| | निर्मिती (प्रति दिन मे.टन) | प्रक्रिया (प्रति दिन मे.टन) | प्रक्रियेची निर्मितीशी टक्केवारी |
| मुंबई | ६,६६१.०० | ५,५००.०० | ८२.६ |
| नवी मुंबई | ७६१.०० | ६२६.५० | ८२.३ |
| रायगड | ५६२.८२ | ४४३.८२ | ७८.९ |
| ठाणे | २,१७२.०२ | १,५६३.८२ | ७२.० |
| कल्याण | १,६८३.३२ | ३०९.०० | १८.४ |
| पुणे | ३,८७५.४८ | ३,३५५.८९ | ८६.६ |
| नाशिक | १,९४६.८९ | १,४२०.८९ | ७३.० |
| औरंगाबाद | १,७४४.०६ | १,१८५.८५ | ६८.० |
| नागपूर | १,३८९.९४ | ४५५.८६ | ३२.८ |
| अमरावती | ९१०.०७ | ३१९.६० | ३५.१ |
| कोल्हापूर | ७९१.८९ | ५५१.९२ | ६९.७ |
| चंद्रपूर | ४४६.७६ | ३०४.११ | ६८.१ |
| **एकूण** | **२२,९४५.२५** | **१६,०३७.२६** | **६९.९** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ध्वनी प्रदूषण

१०.११२ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ध्वनी प्रदूषणाचा आघात जाणून घेण्यासाठी प्रमुख शहरांमध्ये प्रतिवर्षी सलग दोन दिवस-रात्र परिसर ध्वनी स्तर नियंत्रण कार्यक्रम आयोजित केला जातो. दोन्ही दिवशी त्याच ठिकाणी दिवसा तसेच रात्री ठराविक वेळेस ध्वनी स्तर मोजल्या जातात. निवडक शहरांतील निवासी क्षेत्रातील २०१९ व २०२० मधील दिवाळी दरम्यान दिवसा व रात्रीचे ध्वनीस्तराचे प्रमाण तक्ता १०.८६ मध्ये दिले आहे. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० नुसार निवासी भागाकरिता ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणक दिवसा ५५ डेसिबल व रात्री ४५ डेसिबल आहे.

**तक्ता १०.८६ निवडक शहरांतील २०१९ व २०२० मधील दिवाळी दरम्यान दिवस-रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण**

(डेसिबल)

| ठिकाण | १४ नोव्हेंबर, २०२० | | २७ ऑक्टोबर, २०१९ | | १६ नोव्हेंबर, २०२० | | २९ ऑक्टोबर, २०१९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| मुंबई (शिवाजी पार्क-दादर) | ७३.८ | ६०.२ | ७१.६ | ६२.१ | ७१.६ | ५९.४ | ६८.५ | ६२.४ |
| मुंबई (चेंबूर) | ७०.३ | ६०.१ | ६८.७ | ५९.१ | ७५.४ | ६२.२ | ७१.२ | ५८.३ |
| ठाणे (गोखले रोड) | ७२.६ | ६७.२ | ६२.३ | ५९.० | ७७.७ | ६७.६ | ६६.० | ५७.९ |
| ठाणे (वागळे इस्टेट) | ६९.३ | ६२.९ | ७०.२ | ५९.१ | ७३.० | ६२.८ | ६६.२ | ५७.९ |
| पुणे (स्वारगेट) | ८०.६ | ६९.० | ८५.३ | ७७.६ | ७५.४ | ६२.५ | ७९.९ | ६५.८ |
| पुणे (लक्ष्मी रोड) | ७९.७ | ७३.० | ८२.८ | ७४.६ | ७३.८ | ६०.४ | ७८.८ | ६३.८ |
| नाशिक (मुख्य बस स्थानक ) | ७०.० | ७२.४ | ७०.६ | ७१.५ | ६५.६ | ६०.८ | ७०.६ | ६५.७ |
| नाशिक (बीटको पॉईंट) | ६९.७ | ६५.९ | ७०.६ | ६६.६ | ६५.५ | ६१.७ | ६७.८ | ६५.६ |
| औरंगाबाद (सिटी चौक) | ६६.२ | ६१.१ | ६६.४ | ६१.० | ६५.३ | ५७.९ | ६४.५ | ५७.१ |
| नांदेड - वाघाळा (गणेश नगर) | ६१.५ | ५४.६ | ६२.२ | ५१.५ | ६३.२ | ५०.४ | ६१.४ | ४८.६ |
| नागपूर (सदर) | ७२.४ | ६६.२ | ७४.२ | ६८.६ | ६९.१ | ५१.७ | ६९.५ | ५७.६ |
| चंद्रपूर (जटपूरा गेट) | ७२.९ | ६०.६ | ७६.२ | ६६.५ | ७६.१ | ६३.३ | ७३.१ | ६५.२ |
| अमरावती (राजकमल चौक) | ७८.७ | ६९.८ | ७७.७ | ७०.२ | ७५.४ | ५५.४ | ७६.२ | ६६.६ |
| अकोला (जिल्हाधिकारी कार्यालय) | ७५.० | ६४.५ | ७३.४ | ५६.८ | ७२.७ | ५९.७ | ७२.१ | ५७.७ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## उद्योगांमुळे होणारे प्रदूषण

१०.११३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेत सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत एकूण १,०१,९४८ उद्योग होते. लघु उद्योगांमध्ये निर्माण घातक घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाटीसाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्याकरिता सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. एकूण २६ औद्योगिक वसाहतींमध्ये ७,८५१ उद्योगांसाठी सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे कार्यान्वित केली आहेत. सन २०१९-२० मध्ये प्रति दिन सरासरी १७९.५० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. प्रदूषण निर्देशांकावर आधारित सन २०१९-२० करिता उद्योगांचे वर्गीकरण तक्ता १०.८७ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.८७ प्रदूषण निर्देशांकावर आधारित सन २०१९-२० मधील उद्योगांचे वर्गीकरण**

(संख्या)

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभाग | उद्योग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाल | | | नारंगी | | | हिरवा | | | धवल | एकूण |
| | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | | |
| मुंबई | २३१ | २१ | ६७७ | ५९३ | २३५ | १,०५६ | २४ | ३५ | २,४३५ | ४५ | ५,३५२ |
| ठाणे | २१० | ४२ | ९७९ | २४७ | ३७ | ९३० | ३२ | २५ | १,८९९ | ११३ | ४,५१४ |
| कल्याण | १२७ | ६६ | २,०३८ | ९७ | ५९ | १,२५९ | ३५ | ३७ | १,९४१ | ४५५ | ६,११४ |
| नवी मुंबई | १९६ | ४५ | १,०३८ | १६२ | ९४ | १,१५७ | ७४ | ८३ | २,०३५ | ४१९ | ५,३०३ |
| रायगड | २१२ | ३७ | ४२७ | १०२ | ३५ | ६०८ | ३१ | ३३ | ६४१ | ६० | २,१८६ |
| पुणे | १,००७ | १४२ | २,४९८ | १,४२२ | ३५१ | ४,७४६ | ४१३ | ३१५ | ८,१२६ | १,५२३ | २०,५४३ |
| कोल्हापूर | २६५ | ६३ | १,१९८ | ७३ | ९० | ४,६६८ | ३८ | ३१ | ७,७०० | ४,००१ | १८,१२७ |
| नाशिक | ३५४ | ७७ | १,६७४ | १४६ | १०१ | २,९४४ | ८० | ५६ | ६,००१ | २,५५१ | १३,९८४ |
| औरंगाबाद | २६८ | ३५ | ४८१ | १०० | ९९ | २,४४० | ५२ | ६२ | ५,८२४ | १५७ | ९,५१८ |
| अमरावती | ४१ | ८ | १५७ | १७ | १६ | २,०१६ | १ | ११ | ४,७७५ | ४६० | ७,५०२ |
| नागपूर | २३३ | २५ | १,०६५ | १२३ | ७४ | २,८३५ | २० | २३ | २,६७६ | १७३ | ७,२४७ |
| चंद्रपूर | १२४ | ३२ | ८८ | ९ | ३३ | ४४७ | ४ | ६ | ६८५ | १३० | १,५५८ |
| **एकूण** | **३,२६८** | **५९३** | **१२,३२०** | **३,०९१** | **१,२२४** | **२५,१०६** | **८०४** | **७१७** | **४४,७३८** | **१०,०८७** | **१,०१,९४८** |

लाल प्रदूषण निर्देशांक ६० किंवा अधिक
नारंगी प्रदूषण निर्देशांक ४१ ते ५९ च्या दरम्यान
हिरवा प्रदूषण निर्देशांक २१ ते ४० च्या दरम्यान
धवल प्रदूषण निर्देशांक २० किंवा कमी

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घातक कचरा

१०.११४ मानवी आरोग्य किंवा पर्यावरणास हानीकारक असणारा कचरा म्हणजे घातक कचरा होय. घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सिमापार वाहतूक) नियम, २०१६ हा घातक व इतर कचरा व्यवस्थापनाकरिता लागू आहेत. राज्यात ७,२५७ उद्योगांनी प्राधिकार पत्र प्राप्त केले असून या उद्योगांमधून ३०.०७ लाख मे.टन घातक कचरा निर्माण होणे अपेक्षित आहे. सन २०१९-२० मध्ये एकूण ३.६१ लाख मे.टन औद्योगिक कचरा सामाईक घातक कचरा प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात आला व ६.२९ लाख मे.टन घातक कचऱ्यावर पूनर्वापर प्रक्रिया करण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यात २१२ वाहतूकदारांना घातक कचरा वाहतुकीसाठी प्राधिकृत केले असून या घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम स्थापित करणे अनिवार्य करण्यात आले आहे. राज्यात मे. ट्रान्स ठाणे वेस्ट मॅनेजमेंट असोसिएशन, महापे (ठाणे), मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा (ठाणे), मे. महाराष्ट्र एन्विरो पॉवर लिमिटेड, रांजणगाव (पुणे) आणि मे. विदर्भ एन्विरो प्रोटेक्शन लिमिटेड, बुटीबोरी (नागपूर) या चार प्रमुख ठिकाणी घातक कचरा व्यवस्थापनासाठी सामाईक सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. सामाईक सुविधा केंद्रांमधील संकलित करण्यात आलेल्या घातक कचरा संकलनाची माहिती तक्ता १०.८८ मध्ये दिली आहे. सामाईक सुविधा केंद्रांमधील प्रक्रिया केलेल्या घातक कचरा संकलनाची माहिती तक्ता १०.८९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८८ सामाईक सुविधा केंद्रांमधील संकलित करण्यात आलेल्या घातक कचरा संकलनाची माहिती**

(मे.टन)

| वर्ष | मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड | ट्रान्स ठाणे वेस्ट मॅनेजमेंट असोसिएशन | महाराष्ट्र एन्विरो पॉवर लिमिटेड | विदर्भ एन्विरो प्रोटेक्शन लिमिटेड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | १,७९,०५७ | ३३,७५६ | १,०३,४८९ | २५,४१९ | ३,४१,७२१ |
| २०१८-१९ | २,०५,४३० | १,३७,०८९ | १,१०,२८८ | २८,०७२ | ४,८०,८७९ |
| २०१९-२० | २,१०,५२८ | २२,६९५ | १,०७,७६५ | २०,२०१ | ३,६१,१८९ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.८९ सामाईक सुविधा केंद्रांमधील प्रक्रिया केलेल्या घातक कचरा संकलनाची माहिती**

(लाख मे.टन)

| वर्ष | प्रक्रियेचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जमिनीत खोलवर पुरणे | प्रक्रिया केल्यानंतर जमिनीत पुरणे | भस्मीकरण | |
| २०१७-१८ | १.१६ | १.७८ | ०.५४ | ३.४८ |
| २०१८-१९ | २.१९ | २.०३ | ०.५९ | ४.८१ |
| २०१९-२० | ०.९२ | २.११ | ०.५३ | ३.५६ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ई-कचरा

१०.११५ मोडीत काढलेले विद्युत तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणे व त्यांचे सुटे भाग म्हणजे ई-कचरा होय. सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ई-कचऱ्याचे विघटन/ पुनर्प्रक्रिया करता यावी यासाठी ई-कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६ नुसार पर्यावरणास अनुकुल तंत्रज्ञान असलेल्या ९९ उद्योगांना मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष ८५,८०० मे.टन आहे.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.११६ जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम - २०१६ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य सेवा आस्थापनांना जैव-वैद्यकीय कचऱ्याचे विल्हेवाट लावण्याचे प्राधिकार प्रदान करत आहेत. डिसेंबर, २०१९ पर्यंत राज्यात एकूण ६३,६४२ आरोग्य सेवा आस्थापना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यक्षेत्रात आहेत. राज्यात एकूण ३१ सामाईक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्रे असून त्यापैकी २९ केंद्रे भस्मीकरण व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरणे या पद्धतीवर कार्यरत आहेत. सन २०१९-२० मध्ये प्रति दिन सरासरी ६२.२५ मे.टन जैव-वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात आली.

१०.११६.१ सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर पर्यंत २१,०१७ मे.टन जैव-वैद्यकीय कचरा सामाईक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्रांद्वारे संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. यापैकी ८,०७९ मे.टन कोविड-१९ संबंधित जैव-वैद्यकीय कचरा होता व उर्वरित १२,९३८ मे.टन कचरा कोविड-१९ व्यतिरिक्त संबंधित जैव-वैद्यकीय कचरा होता. कोविड-१९ संबंधित जैव-वैद्यकीय कचऱ्यापैकी ६,१०४ मे.टन कचऱ्याचे भस्मीकरण करण्यात आले.

## प्लास्टिक कचरा

१०.११७ प्लास्टिक उत्पादने ही आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. प्लास्टिक व थर्माकोल कचऱ्याचे संकलन, विलगीकरण व विल्हेवाट लावण्याच्या अयोग्य पद्धतींमुळे पर्यावरणविषयक अनेक समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. जैव-विघटनशील नसणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामध्ये होत असलेली वाढ पर्यावरणास व आरोग्यास हानीकारक आहे. राज्य शासनाने एप्रिल, २०१८ पासून काही प्रकारच्या प्लास्टिक आणि थर्माकोलच्या उत्पादन आणि वापरास बंदी घातली आहे. सन २०१९-२० मध्ये राज्य शासनाने बंदी घातलेले प्लास्टिक/ थर्माकोल वापरल्याबद्दल ₹ २.७४ कोटी दंड वसूल केला तसेच १४५ मे.टन बंदी घातलेले प्लास्टिक जप्त केले आणि २८ प्लास्टिक उत्पादक कारखान्यांवर बंदी घातली. सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत राज्य शासनाने बंदी घातलेले प्लास्टिक/ थर्माकोल वापरल्याबद्दल ₹ ३.५ लाख दंड वसूल केला तसेच ०.३२ मे.टन बंदी घातलेले प्लास्टिक जप्त केले. सन २०१९-२० मध्ये राज्यात प्लास्टिक पुनर्प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची संख्या ९६ असून त्यांची एकूण क्षमता २.७१ लाख मे.टन प्रति वर्ष आहे.

## पर्यावरणविषयक मान्यता

१०.११८ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने तटीय नियमन क्षेत्र शिफारशी व पर्यावरणविषयक परवानगी प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (१९९८), राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (२००८) व राज्य स्तर तज्ञ मूल्यमापन समित्या गठीत केल्या आहेत. जानेवारी, २०१६ पासून पर्यावरणविषयक परवानग्या ऑनलाईन सेवेद्वारे प्रदान करण्यात येतात. जानेवारी, २०२१ पर्यंत ३,३३५ प्रकरणांना शासनाने ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पर्यावरणविषयक परवानग्या दिल्या आहेत. महाराष्ट्र सागरी तटीय व्यवस्थापन प्राधिकरणाने ८१ प्रकल्पांना जानेवारी ते डिसेंबर, २०२० दरम्यान तटीय नियमन क्षेत्राच्या शिफारसी लागू केल्या आहेत.

## राज्य सरोवर संवर्धन योजना

१०.११९ तलावांची अवनती रोखण्यासाठी राज्य शासनाने 'अवनत तलावांसाठी राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना' अंतर्गत सन २००७ पासून ८० तलावांचा समावेश केला आहे. राज्य शासनाकडून सन २०१९-२० करिता ₹ १५ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून या योजनेअंतर्गत ₹ ८.५८ कोटी खर्च झाला.

## कांदळवन संवर्धन

१०.१२० राज्याला सुमारे ७२० किमी लांबीचा सागरी किनारा लाभला आहे. भारतीय राज्य वन अहवाल - २०१९ च्या अहवालानुसार राज्यात ३२० चौ. किमी क्षेत्रावर कांदळवनाचे आच्छादन आहे. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १२० पेक्षा जास्त गावांचा समावेश असलेल्या महाराष्ट्रातील संपूर्ण किनारपट्टीवरील स्थानिक समुदायांच्या सहभागासह राज्यात कांदळवन संवर्धन व उपजीविकेची साधने निर्मिती करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे.

१०.१२०.१ सन २०२०-२१ मध्ये शासनाने या योजनेंतर्गत ₹ १५.४६ कोटी निधीची तरतूद खेकडा पालन शेती, पिंजऱ्यातील मत्स्य शेती, कालव व शिंपल्यांची शेती, शोभेच्या माशांची पैदास, इको टुरीझम आणि कांदळवन लागवड अशाप्रकारच्या उपजीविकेची उपक्रम विकसित करण्यासाठी केली आहे. सदर उपक्रम गटाने किंवा वैयक्तिक लाभार्थी म्हणून करता येतात. गटाद्वारे केल्या जाणाऱ्या उपक्रमांना राज्य शासनामार्फत ९० टक्के तर वैयक्तिक लाभार्थी (एक एकर पेक्षा जास्त कांदळवन असणारे जमीन मालक) ७५ टक्के आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहेत. या उपक्रमांमधून गावकरी/ लाभार्थींना सन २०१९-२० मध्ये ₹ २०.५५ लाख नफा झाला. कांदळवन लागवड कार्यक्रमाच्या अनुषंगाने, सन २०१९-२० मध्ये एकूण ६५५ हेक्टर कांदळवन लागवड करण्यात आले असून सन २०२०-२१ मध्ये सुमारे १२० हेक्टर मध्ये कांदळवन लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

१०.१२०.२ राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभाग तसेच कांदळवन कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मच्छिमारांसाठी भरपाई योजना सन २०१८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मच्छिमारांना समुद्रातील संरक्षित प्राणी जसे व्हेल, शार्क, डॉल्फिन, समुद्री कासव, इत्यादी जे त्यांच्या जाळ्यामध्ये अडकतात यांना समुद्रात परत सोडण्यासाठी (वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ अंतर्गत) त्यांचे मासे पकडण्याचे जाळे कापण्याकरिता प्रोत्साहित केले जाते. या प्राण्यांना समुद्रात परत सोडल्यानंतर आणि पुरावे सादर केल्यावर मच्छीमारांना आर्थिक स्वरूपात नुकसान भरपाई (प्रत्येक प्रकरणी कमाल ₹ २५,०००) देण्यात येते. सन २०१९-२० मध्ये ४१ मच्छिमारांना ₹ ८.२७ लाख नुकसान भरपाई देण्यात आली. सन २०२०-२१ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ६६ मच्छिमारांना ₹ १०.९८ लाख नुकसान भरपाई देण्यात आली.

# सामाजिक न्याय

१०.१२१ सामाजिक न्याय मुख्यत: समाजातील सर्व दुर्बल घटकांना समान पातळीवर आणण्यासाठी आणि त्यांना उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकडे लक्ष केंद्रित करते. समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अल्पसंख्यांक, दिव्यांग व जेष्ठ नागरीक इत्यादी दुर्बल घटकांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी शासन विविध योजना राबवित आहे.

# अनुसूचित जाती घटक कार्यक्रम

१०.१२२ दरवर्षी अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाकरिता वार्षिक कार्यक्रमाच्या एकूण निधीपैकी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात (११.८ टक्के) निधी उपलब्ध करून दिला जातो. सन २०२०-२१ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाअंतर्गत एकूण ३५५ योजना (१९३ राज्यस्तरीय, ८० जिल्हास्तरीय व ८२ केंद्र पुरस्कृत योजना) राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.९० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९० अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **७,२४९.२२** | **४,११६.४३** | **६,४३२.००** | **३,८२८.७१** | **६,९३९.३६** | **१,५५६.१८** |
| कृषि व संलग्न कार्ये | १,३१३.८२ | १३८.६५ | २२२.१६ | ९१.९७ | १५८.५८ | ११.०१ |
| ग्राम विकास | १२०.३४ | २०७.५८ | ११२.७० | ७२.५४ | २०३.९० | ३१.३४ |
| ऊर्जा | ०.०० | २००.०० | ०.०० | ०.०० | ७०.०० | ०.०० |
| उद्योग व खनिजे | ६०.०० | ५०.५३ | ६०.०० | १८.७९ | ४५.०० | ०.०० |
| वाहतूक व दळणवळण | ०.०० | ०.०० | २५०.०० | १५०.०० | ०.०० | ०.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ४.२० | १.५७ | ०.०० | ०.०० | ५.०० | ०.०० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ५,७५०.८६ | ३,५१८.१० | ५,५५५.६४ | ३,४०४.९८ | ६,३४५.३८ | १,४४८.१२ |
| सामान्य सेवा | ०.०० | ०.०० | ११.५० | ०.०० | ११.५० | ०.०४ |
| इतर कार्यक्रम | ०.०० | ०.०० | २२०.०० | ९०.४३ | १००.०० | ६५.६७ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,७००.००** | **२,३५२.३२** | **२,७७६.००** | **२,५६०.८१** | **२,७२८.६४** | **२८९.३०** |
| कृषि व संलग्न कार्ये | ३३१.८१ | ३३९.६० | ३५१.९२ | ३२९.७९ | ३५१.१४ | २१.५२ |
| ग्राम विकास | २४२.९४ | ४७.४८ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | १३५.९३ | ११४.४८ | १३४.४७ | १४६.१२ | १५२.८१ | ४४.५३ |
| उद्योग व खनिजे | ११.१४ | ९.५४ | १०.९० | ८.४९ | ८.५९ | ०.०० |
| वाहतूक व दळणवळण | ७०.०३ | ४७.८१ | ६८.५६ | ३१.२५ | ७१.७० | ३.१४ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | १,८२७.१५ | १,७३६.२५ | २,१२६.८७ | १,९८४.९१ | २,०६२.७३ | २१६.११ |
| नाविन्यपूर्ण योजना | ८१.०० | ५७.१६ | ८३.२८ | ६०.२५ | ८१.६७ | ४.०० |
| **एकूण (अ + ब)** | **९,९४९.२२** | **६,४६८.७५** | **९,२०८.००** | **६,३८९.५२** | **९,६६८.००** | **१,८४५.४८** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही + जानेवारीपर्यंत

*आधार* : समाजकल्याण आयुक्तालय, पुणे

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

१०.१२२.१ अनुसूचित जातीच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासन राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबवित आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये १८१ लाभार्थ्यांना ₹ ३४.९८ कोटी वितरीत करण्यात आले, तर सन २०२०-२१ मध्ये माहे डिसेंबर पर्यंत १३७ लाभार्थ्यांना ₹ २४ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

१०.१२२.२ इयत्ता ११ वी पासून पुढील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक शाखा व निवासस्थान यावर आधारित भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधांचे आर्थिक स्वरूपात सहाय्य त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केले जाते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची प्रगती तक्ता १०.९१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९१ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| पात्र विद्यार्थी (संख्या) | २१,६५१ | १७,१०० | १४,९०८* |
| खर्च | ८३.९८ | ५७.५५ | ७३.४७ |

*आधार* : समाजकल्याण आयुक्तालय, पुणे *अस्थायी + डिसेंबरपर्यंत

## केंद्र शासनाच्या स्टँडअप इंडिया या योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकाकरिता मार्जिन मनी

१०.१२२.३ केंद्र शासनाने २०१५ पासून अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना आणि महिला नवउद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी ही नवीन योजना सुरू केली आहे. उद्योजकांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के रक्कम भरणा करावयाची आहे, आणि उर्वरित ७५ टक्के कर्जाच्या रक्कमेस भारतीय लघु उद्योग विकास बँक (सीडबी) हमी देईल. राज्य शासनाने अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या उद्योजकांना मार्जिन मनी देण्याची योजना सन २०१९ पासून सुरू केली आहे. प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के रक्कमेपैकी स्वहिस्सा १० टक्के व १५ टक्के मार्जिन मनी रक्कम राज्य शासन उपलब्ध करून देईल.

## ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या वस्त्यांचा विकास करणे

१०.१२२.४ या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण सुविधा, वीज, जोडरस्ते, समाजमंदिर, इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. राज्यातील ग्रामीण भागात अनुसूचित व नवबौद्ध घटकांच्या एकूण ३७,६०४ इतक्या वस्त्या आहेत. सन २०१९-२० मध्ये ₹ ८८७.१९ कोटी खर्च झाला.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना

१०.१२२.५ या योजनेअंतर्गत महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या वस्त्यांमध्ये डांबरी/सिमेंटचे रस्ते, नाली बांधकाम, विहीर दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सार्वजनिक शौचालय, वाचनालय, व्यायामशाळा, बालवाडी, विजेचे दिवे, इत्यादी कामे केली जातात. सन २०१९-२० मध्ये ₹ ८३१.१६ कोटी खर्च झाला.

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.१२३ चर्मकार समाजाच्या विकासासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित स्थापन करण्यात आली असून, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत विविध कर्जाच्या योजना राबविण्यासाठी या महामंडळास राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ७३.२१ कोटी असुन, वितरीत व भरणा केलेले भागभांडवल ₹ ३०६.२१ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). या महामंडळाची कामे पुढीलप्रमाणे आहेत.

- चर्मोद्योग कार्यरत असणाऱ्यांसाठी कच्या मालाचे प्रापण व पुरवठा करणे तसेच त्यांच्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक व्यवस्था करणे.
- स्वदेशी तसेच आंतरराष्ट्रीय बाजारांमध्ये तयार मालाच्या विक्रीसाठी समन्वयक म्हणून काम करणे तसेच त्यांना आवश्यक सहाय्य करणे.
- उत्पादन आणि पणन याबाबतच्या प्रशिक्षण सुविधा पुरविणे.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.९२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९२ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹ लाख)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ३१७ | १९२ | ८९ |
| वितरीत रक्कम | ३५.३० | २१.२२ | ८.४० |

*आधार* : संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.१२४ राज्य शासनाने मातंग समाज व १२ उपजातींच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ३०० कोटी असून, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे

एनएसएफडीसी ची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.९३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९३ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹ लाख)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | २,०६६ | १,२३२ | ३८७ |
| वितरीत रक्कम | ४६०.४६ | २८०.०१ | १३३.४५ |

*आधार :* लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

१०.१२५ अनुसूचित जाती आणि नवबौद्धांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ६३२.६४ कोटी असून, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळ, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ यांचेकरिता वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.९४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९४ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹ लाख)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ५,१८५ | ११,६०७ | ७९२ |
| वितरीत रक्कम | २,०८६.०८ | ३,६१२.०५ | ८९६.१९ |

*आधार :* महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

# आदिवासी घटक कार्यक्रम

१०.१२६ आदिवासी घटक कार्यक्रमाकरिता वार्षिक कार्यक्रमाच्या एकूण निधीपैकी अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात (९.४ टक्के) निधी उपलब्ध करून दिला जातो. सन २०२०-२१ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत एकूण ३६८ योजना (१५६ राज्यस्तरीय, १४८ जिल्हास्तरीय व ६४ केंद्र पुरस्कृत योजना) राबविण्यात येत आहेत. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.९५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९५ आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **५,०७४.०६** | **४,१३५.०९** | **६,३२९.८९** | **४,७१६.९३** | **७,५५९.०३** | **२,२९३.५२** |
| कृषि व संलग्न कार्ये | ७०६.७७ | ९०.३७ | ११८.६४ | ४२.०९ | १५०.९९ | २७.७२ |
| ग्राम विकास | २३९.३० | २३०.५५ | ३२४.८९ | १९९.९९ | ७८२.४१ | २२६.२८ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ५०.०० | ५०.०० | ५०.०० | ५१.८५ | २५.०० | ०.०० |
| ऊर्जा | ४३३.१७ | २५९.७९ | ३१०.०० | १३२.०० | २३७.८० | ५०.०० |
| उद्योग व खनिजे | ८.०० | ७.०० | १०.०० | ०.०० | ९.०० | ०.०० |
| वाहतूक व दळणवळण | ५५३.२० | ५४१.८६ | ३२६.०२ | १९६.५६ | ४५६.३२ | ५.०० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ३,०८३.६१ | २,९५५.५२ | ५,१९०.३४ | ४,०९४.४४ | ५,८९७.५१ | १,९८४.५३ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **३,२०८.००** | **३,१५६.८२** | **२,२०१.११** | **२,१०४.५९** | **१,९२५.९१** | **१११.९०** |
| कृषि व संलग्न कार्ये | २७१.८४ | २७१.०० | २८४.३२ | २५१.४७ | २३१.५० | ३.४८ |
| ग्राम विकास | ४८१.१८ | ४६३.५३ | ३५०.९६ | ३२१.१३ | १४५.२५ | ६.६८ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ०.०९ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | ०.०० | ०.०० | १२४.९६ | १२२.०४ | ११४.८५ | ०.२२ |
| उद्योग व खनिजे | १२९.०२ | ११५.५५ | ४.७० | १.२२ | १.३० | ०.०० |
| वाहतूक व दळणवळण | २०३.३५ | १९९.१० | २५४.३९ | २५२.९३ | २४०.३६ | २.३२ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | २,१२२.५६ | २,१०७.६४ | १,१८१.७९ | १,१५५.७९ | १,१९२.६५ | ९९.२१ |
| **एकूण (अ + ब)** | **८,२८२.१०** | **७,२९१.९०** | **८,५३१.००** | **६,८२१.५२** | **९,४८४.९४** | **२,४०५.४२** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही + डिसेंबरपर्यंत

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## शासकीय आश्रमशाळा

१०.१२६.१ राज्यातील डोंगरी आणि दुर्गम भागात आदिवासी मुलांसाठी ५०० शासकीय निवासी आश्रमशाळा आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांना जेवण, निवास, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधा मोफत पुरविल्या जातात. सन २०१७-१८ पासून शैक्षणिक साहित्य व साधनसामग्री खरेदीकरिता आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जात आहे. शासकीय आश्रमशाळांची प्रगती तक्ता १०.९६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९६ शासकीय आश्रमशाळांची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | २,०६,१६३ | १,८३,५४६ | १,९१,७१३ |
| अर्थसंकल्पीय तरतूद | ९३७.८६ | १,४६५.४० | १,३९२.०६ |
| खर्च | १,०३५.०० | १,१९९.३५ | ५२७.०१ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## अनुदानित आश्रमशाळा

१०.१२६.२ अनुदानित आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत पुरविल्या जातात. राज्यात ५५६ अनुदानित आश्रमशाळा आहेत. अनुदानित आश्रमशाळांची प्रगती तक्ता १०.९७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९७ अनुदानित आश्रमशाळांची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | २,४२,५४६ | २,३३,४८५ | २,४१,४६८ |
| अर्थसंकल्पीय तरतूद | १,०००.१० | १,१६५.०० | १,२३०.०० |
| खर्च | ९६७.१० | १,०८८.९८ | ७५१.३० |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे

१०.१२६.३ आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर शासकीय वसतिगृहांची सुविधा पुरविण्यात येते. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत पुरविण्यात येतात. राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ४९५ शासकीय वसतिगृहे आहेत. सन २०१७-१८ पासून अंथरूण/पांघरूण, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, इत्यादी विकत घेण्याकरिता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात निधी थेट जमा करण्यात येत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांची प्रगती तक्ता १०.९८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९८ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ४८,६५८ | ५४,१५० | ४,१२२ |
| अर्थसंकल्पीय तरतूद | ४०८.४० | ५००.३० | ५२१.६१ |
| खर्च | ३४६.८२ | ३५३.२४ | ७४.७१ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण

१०.१२६.४ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये विनामूल्य शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक व निवासी सुविधा पुरविण्यात येतात. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षणची प्रगती तक्ता १०.९९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९९ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षणची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ४९,३५४ | ५३,६२७ | ५३,६२७ |
| अर्थसंकल्पीय तरतूद | ३७८.०० | ३४५.०० | ३६०.०० |
| खर्च | २९७.३४ | २४१.४१ | ७६.१४ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना

१०.१२६.५ या योजनेअंतर्गत आदिवासी शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना (इयत्ता बारावी नंतरच्या) उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व निर्वाह भत्ता इत्यादी सुविधांसाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजनेची प्रगती तक्ता १०.१०० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०० पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजनेची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| पात्र विद्यार्थी (संख्या) | ३,७५० | ९,२१९ | # |
| अर्थसंकल्पीय तरतूद | ४५.०० | ६०.०० | ६०.०० |
| खर्च | ३३.०० | २५.७६ | ०.०० |

# सन २०२०-२१ करिता ऑनलाईन पोर्टल सुरू करण्यात आलेले नसल्याने विद्यार्थ्यांची संख्या देण्यात आलेली नाही. + डिसेंबरपर्यंत

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## पेसा ग्रामपंचायतींना थेट निधी

१०.१२६.६ पेसा कायदा अंमलबजावणी अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पित निधीच्या पाच टक्के निधी वितरीत करण्यात येतो. या निधीतून मूलभूत पायाभूत सुविधा, वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनीकरण, वन्यजीव पर्यटन व वन उत्पादने या संबंधित कामे ग्रामसभांना घेता येतात. पेसा कायद्यांतर्गत ३,०५० ग्रामपंचायतींना थेट अर्थसहाय्य दिले जाते. सन २०१९-२० मध्ये ₹ १६०.७३ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ करिता ₹ २६७.८९ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली व त्यापैकी डिसेंबर अखेर ₹ ६६.९७ कोटी खर्च झाला.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

१०.१२६.७ ही योजना अनुसूचित क्षेत्रातील १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत, अनुसूचित जमातीच्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना ‘ एक वेळचा पूर्ण आहार’ आणि सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार वेळा अंडी किंवा केळी पुरविण्यात येतात. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची प्रगती तक्ता १०.१०१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०१ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची प्रगती**

(₹ कोटी)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ९,९०,०९७ | ७,७२,००० | ७,९७,४६५ |
| अर्थसंकल्पीय तरतूद | १२८.९३ | १४४.६५ | २०४.२७ |
| खर्च | १४४.१८ | १७५.६९ | ६७.८६ |

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

१०.१२६.८ या योजनेअंतर्गत अनुसूचित क्षेत्रामध्ये कायमस्वरुपी सामूहिक विकास सुविधा निर्माण करण्यात येतात. सन २०१९-२० मध्ये ₹ १६७.१५ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ करिता ₹ १७५.०२ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली व त्यापैकी डिसेंबर अखेर ₹ ३०.५५ कोटी खर्च झाला.

## खावटी अनुदान योजना

१०.१२६.९ अनुसूचित जमातीच्या आर्थिक दुर्बल कुटुंबांना मदत देण्यासाठी खावटी अनुदान योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत वस्तू स्वरूपात (५० टक्के) व रोख रूपात (५० टक्के) (ज्या मध्ये ७० टक्के कर्ज व ३० टक्के अनुदान) सहाय्य करण्यात येत होते. सन २०१३-१४ पासून बंद असलेली खावटी योजना कोविड-१९ महामारीमुळे उद्भवलेल्या आर्थिक परिस्थितीचा सामना करण्यासाठी पुनर्जिवित करण्यात आली. सदर योजना १०० टक्के अनुदान स्वरुपात राबविण्यात येत आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना

१०.१२६.१० अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने ही शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये पाच लाभार्थ्यांना ₹ १.०४ कोटी तर सन २०२०-२१ मध्ये डिसेंबर अखेर पाच लाभार्थ्यांना ₹ ८२.६० लाख वितरीत करण्यात आले. या योजनेंतर्गत २०२०-२१ या वर्षासाठी दोन नवीन लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

## इतर मागास बहुजन यांचे कल्याण

१०.१२७ इतर मागास बहुजन या समाजातील लोकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन केला आहे. या समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सन २०१९-२० मध्ये ₹ २,९७४.०३ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ करिता ₹ ३,५३३.०१ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली व त्यापैकी जानेवारी अखेर ₹ १,६८१.७७ कोटी खर्च झाला.

## तांडा/वस्ती सुधार योजना

१०.१२७.१ या योजनेअंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विद्युतीकरण, पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंतर्गत रस्ते, गटारे, शौचालये, समाजमंदिर/वाचनालय, इत्यादी पायाभूत सुविधांची कामे केली जातात. या योजनेअंतर्गत सन २०१९-२० मध्ये ₹ ३३.३५ कोटी खर्च झाला.

## विजाभज, इमाव आणि विमाप्र विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना

१०.१२७.२ विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने सदर शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये १० लाभार्थ्यांना ₹ ३.९४ कोटी वितरीत करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

१०.१२८ राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, प्राप्त भाग भांडवल ₹ १६१.५४ कोटी आहे. (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के) हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. महामंडळामार्फत बीज भांडवल, थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा, गट कर्ज व्याज परतावा इत्यादी योजना राबविण्यात येतात. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता क्र.१०.१०२ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता १०.१०२ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹ लाख)

| बाब | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | १५९ | ७८ | १३० |
| वितरीत रक्कम | ५६.०९ | २८.७६ | १२३.५० |

*आधार:* महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

# अल्पसंख्याक विकास

१०.१२९ अल्पसंख्याकांच्या विकासासाठी विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. सन २०१९-२० मध्ये ₹ १६०.०५ कोटी खर्च झाला. सन २०२०-२१ मध्ये ₹ ६२४.५० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून त्यापैकी जानेवारी अखेर ₹ ५५.५४ कोटी खर्च झाला.

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१३० अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची राज्यात स्थापना करण्यात आली आहे. सदर महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून भरणा केलेले भाग भांडवल ₹ ४७५.६९ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सन २०१९-२० मध्ये ३,००९ विद्यार्थ्यांना ₹ २,३३९.३७ लाख रक्कमेचे शैक्षणिक कर्ज देण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये जानेवारीपर्यंत १,४१६ विद्यार्थ्यांना ₹ १,१७७.८९ लाख रक्कमेचे शैक्षणिक कर्ज देण्यात आले.

## अल्पसंख्याकांसाठी वस्ती / क्षेत्र विकास योजना

१०.१३१ राज्यात अल्पसंख्याकांसाठी वस्ती/क्षेत्र विकास योजना राबविण्यात येत आहेत. अल्पसंख्याकांसाठी वस्ती/क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.१०३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१०३ अल्पसंख्याकांसाठी वस्ती/ क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा प्रस्तावित निधी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजना | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रविकास | २६.४० | १७.१८ | ४१.८९ | २५.१३ | ४४.६३ | ४.१८ |
| अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास | ३८.०० | २२.४९ | ५१.०० | २२.१६ | ५७.३३ | ६.९७ |

*आधार* : अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

# दिव्यांग व्यक्तींचे कल्याण

१०.१३२ दिव्यांग व्यक्तींच्या क्षमता ओळखून कौशल्य विकास करणे, त्यांना समान संधी देणे व त्यांच्या अधिकारांचे रक्षण याद्वारे सक्षमीकरण करणे, तसेच समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. सन २०१९-२० करिता ₹ ५४६.३४ कोटी खर्च झाला आहे. सन २०२०-२१ करिता ₹ ८७४.१३ कोटी प्रस्तावित तरतूद मंजूर केली असून माहे डिसेंबर अखेर ₹ ३२८.३८ कोटी खर्च झाला आहे.

## महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१३३ दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सदर महामंडळ राष्ट्रीय दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भाग भांडवल ₹ ४७.५२ कोटी आहे (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के). महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.१०४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०४ महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹लाख)

| योजना | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या | वितरीत रक्कम+ |
| थेट कर्ज | - | - | ८३ | १६.६० | - | - |
| मुदत कर्ज | २३४ | ३३४.९७ | ६ | ७.९३ | २ | २.७० |

*आधार* : महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित + जानेवारीपर्यंत

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

१०.१३४ राज्यातील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.१०५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०५ अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

(₹ लाख)

| विकास महामंडळ | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या/ गट संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या/गट संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या/गट संख्या | वितरीत रक्कम |
| वैयक्तिक कर्ज व्याज परतावा | १,३२५ | २६०.८२ | ७,५८४ | ३,२४६.८३ | ५,०४१ | २,९७२.०२ |
| गट कर्ज व्याज परतावा | - | - | ४ | ३.३३ | ८ | ९.०६ |
| गट प्रकल्प कर्ज | ५ | ५०.०० | १४ | १४०.०० | ६ | ६०.०० |

*आधार :* अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## सामाजिक सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण योजना

१०.१३५ राज्य सामाजिक सुरक्षेच्या विविध योजना राबविते. कोविड-१९ लॉकडाउन कालावधीत विविध सामाजिक सुरक्षा योजनेंतर्गत एप्रिल ते जून २०२० या कालावधीत लाभार्थ्यांच्या वैयक्तिक खात्यात आगाऊ पैसे माहे एप्रिल २०२० मध्ये जमा केले गेले आहेत. महत्त्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च तक्ता १०.१०६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१०६ महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

| योजना | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च+ (₹ कोटी) |
| संजय गांधी निराधार अनुदान | ८.९७ | ८६५.६५ | १०.८२ | १,१६१.५० | १२.३१ | १,०१६.३१ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | १९.६२ | १,३९६.४७ | २१.७४ | १,८९६.९१ | २४.७४ | २,०६२.०६ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | १०.८४ | ३०२.२८ | ११.६१ | २९९.८३ | १२.०८ | ३२९.२० |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.५७ | १६.७१ | ०.६७ | २२.९३ | ०.७६ | २५.६४ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन | ०.०७ | २.०२ | ०.०८ | ३.८१ | ०.०९ | ३.२० |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.०८ | २८.३६ | ०.११ | २७.४५ | ०.०५ | १२.६७ |

*आधार :* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

# मानव विकास व शाश्वत विकास ध्येये

१०.१३६ लोकांच्या गरजा व रुची लक्षात घेऊन व्यक्तिगत क्षमता विकसित करण्यासाठी तसेच फलदायी व सृजनशील आयुष्य जगण्यासाठी वातावरण निर्मिती करणे हे मानव विकासात अभिप्रेत आहे. मानव विकास निर्देशांक (माविनि) हा आरोग्यसंपन्न व दीर्घायुष्य, ज्ञानार्जनाची संधी व दर्जेदार राहणीमान या तीन मुलभूत मापदंडांच्या दीर्घकालीन प्रगतीचे मूल्यांकन करणारा संयुक्त निर्देशांक आहे. संयुक्त राष्ट्र विकास परिषदेने प्रकाशित केलेल्या 'मानव विकास अहवाल २०२०' नुसार नॉर्वे प्रथम स्थानावर (माविनि ०.९५७), तर भारत १३१ व्या स्थानावर (माविनि ०.६४५) असून तो मानव विकास अहवाल २०१९ नुसार १२९ व्या (माविनि ०.६४७) स्थानावर होता.

१०.१३७ संयुक्त राष्ट्र विकास परिषदेच्या उपराष्ट्रीय मानव विकास अहवाल (४.०) नुसार भारताचा मानव विकास निर्देशांक २०१८ करिता ०.६४७ तर २०१७ करिता ०.६४३ होता. केरळ राज्याचा माविनि सर्वाधिक असून तो २०१८ करिता ०.७७९ तर २०१७ करीता ०.७७४ होता. महाराष्ट्रासाठी तत्सम आकडेवारी अनुक्रमे ०.६९६ व ०.६९२ अशी होती.

१०.१३८ महाराष्ट्र मानव विकास अहवाल-२०१२ नुसार राज्याचा माविनि ०.७५२ आहे. मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) (माविनि ०.८४१) पहिल्या क्रमांकावर असून त्याखालोखाल पुणे (माविनि ०.८१४) होता. तर नंदुरबार (माविनि ०.६०४) शेवटच्या क्रमांकावर होता. महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ नुसार जिल्हानिहाय माविनि परिशिष्ट १०.१५ मध्ये दिला आहे.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

१०.१३९ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमधील ग्रामीण भाग व त्या तालुक्यांमधील 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत शिक्षण, आरोग्य व उत्पन्न यांचा स्तर उंचविणाऱ्या योजना राबविण्यात येत आहे. तालुक्यांच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक स्थिती आणि स्थानिक गरजांनुसार तालुका विवक्षित योजना तयार करण्यात येतात. तालुक्यासाठी मिळणाऱ्या एकूण निधीच्या २० टक्के निधी या करिता राखून ठेवण्यात येतो. मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत सन २०२०-२१ साठी ₹ ३५९.२० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून नोव्हेंबर, २०२० अखेर ₹ ४५.६२ कोटी खर्च झाला. महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची भौतिक प्रगती तक्ता १०.१०७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०७ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची भौतिक प्रगती**

| योजना | लाभार्थ्याचा प्रकार | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१+ |
| **शिक्षण** | | | | |
| अ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अभ्यासिका (२,८८९ अभ्यासिका) | विद्यार्थी | ९२,१८६ | ६८,२१९ | @ |
| ब) ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना मोफत बस सेवा (८७१ बस) | विद्यार्थिनी | १,००,५९५ | ९९,९७८ | @ |
| क) बालभवन विज्ञान केंद्रे (१२४ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | २,३५,७९६ | १,८४,९३३ | @ |
| ड) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता दहावी पर्यंत विस्तारणे (३९शाळा) | विद्यार्थिनी | २,०२९ | १,९०० | १,५२५ |
| इ) इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरापर्यंत राहाणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप | विद्यार्थिनी | ३१,२५२ | ४३,६०६ | @ |
| फ) अंगणवाड्यांचे बांधकाम $ | | ६३० | ६६७ | ६६८ |
| **आरोग्य** | | | | |
| अ) गर्भवती महिला, स्तन्यदा माता तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य शिबिरे | गर्भवती महिला, स्तन्यदा माता व बालके | ९,७४,८९९ | ९,४८,६६६ | १,६९,१४२ |
| ब ) अजा, अज, दारिद्र्य रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजुरी देणे | गर्भवती महिला | १,२५,८८५ | १,१९,८३६ | २८,६९३ |
| क) आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम $ | | २७ | ३७ | ३७ |
| **उत्पन्न निर्मिती** | | | | |
| अ) माती परिक्षण फिरती प्रयोगशाळा | मातीचे तपासलेले नमुने | ४९,५०० | ३६,९२२ | ४,९१९ |
| ब) गौण वनोत्पादने गोळा करणे/ मत्स्य व्यवसायासाठी ग्रामसभेला बीज भांडवल देणे | ग्रामसभेचे प्रस्ताव | ३ | ० | ० |

$ योजनेच्या सुरवातीपासून बांधकाम पूर्ण झालेल्या @ कोविड-१९ च्या लॉकडाऊनमुळे सदर योजना राबविण्यात आलेल्या नाहीत + नोव्हेंबरपर्यंत

*आधार*: आयुक्तालय, महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

# शाश्वत विकास ध्येये

१०.१४० संयुक्त राष्ट्र संघाच्या सहभागी देशांनी १७ शाश्वत विकास ध्येये व त्या अंतर्गत १६९ लक्ष्ये २०३० पर्यंत साध्य करण्याचे निश्चित केले आहे. शाश्वत विकास ध्येये सामाजिक, आर्थिक, पर्यावरण आणि शांतता या चार एकमेकांशी निगडीत स्तंभावर आधारीत आहे. ही शाश्वत विकास ध्येय सर्वसमावेशक, सार्वत्रिक आणि एकमेकांशी संलग्नीत आहे. 'कोणीही वंचित राहू नये' ही शाश्वत विकासाची संकल्पना आहे.

१०.१४०.१ सर्व राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय योजना व कार्यक्रमांची शाश्वत विकास ध्येये व त्यांच्या लक्ष्यांशी सांगड घातलेली आहे. राज्य वार्षिक योजना व जिल्हा वार्षिक योजना तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या महाराष्ट्र योजना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MP-SIMS) मध्ये शाश्वत विकास ध्येये व लक्ष्यांबाबतची माहिती नोंदणी करण्याचे निर्देश सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाने नियोजन विभागा अंतर्गत येणाऱ्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखाली शाश्वत विकास ध्येय- अंमलबजावणी व समन्वय केंद्र सुरु केले आहे. महिला सबलीकरणासाठी 'तेजश्री फायनान्शियल सर्विसेस' योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अतिगरीब महिलांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. शाश्वत विकास ध्येयांवर लक्ष केंद्रीत करुन एक हजार गावांमधील विकासाची पोकळी भरून काढण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि उद्योग क्षेत्र व सेवाभावी संस्था यांच्यात सार्वजनिक खाजगी भागीदारीस चालना देण्यासाठी ग्राम सामाजिक परिवर्तन संस्थेची स्थापना केली आहे.

# शाश्वत विकास ध्येये निर्देशांक

१०.१४१ भारताचा शाश्वत विकास ध्येय निर्देशांक अहवाल २०१८ नुसार देशातील २९ राज्यांमध्ये महाराष्ट्र ६४ गुणांकासह चौथ्या क्रमांकावर होता, तर भारताचे ५७ गुणांक होते.

